९८२६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. १६८

ॐ तत्सत्।

ब्रह्मर्षि

# श्री अण्णासाहेब पटवर्धन

## 'संकेतरेखा नवभारतस्य।'

लेखक—'अप्रबुद्ध'

---

प्रथमावृत्ति

किंमत रु. ३.

---

REFBK-0003054

[शके १८४८.] [सन १९२६.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........

# अर्पण व प्रार्थना.

ज्याच्यापासून सर्व कर्मांची प्रवृत्ति आहे,

व

ज्याच्या ठिकाणीं सर्व कर्मांची परिसमाप्ति होणार

त्या कर्माध्यक्ष श्रीमंगलमूर्ति श्रीगुरुरूपास

ही लहानशी कर्मस्फूर्ति अर्पण करून

श्रीतुकोबांच्या म्हणण्याप्रमाणें

'नेणों युक्तीची हे खोली ।
म्हणवुनि ठेविली डोई पायीं' ॥

स्वामींचें हें देणें । येथें पावलों दर्शनें ॥
करूं आवडीनें वाद । तुमच्या सुखाचा संवाद ॥
कळावया वर्म । हा तो पायाचाची धर्म ॥
तुका म्हणे सिद्धि । हेचि पाववावी बुद्धी ॥

हर ! हर !! महादेव !!!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3058
दा. क्र. ........

**प्रकाशकः**—दिवाकर यशवंत फाटक.
एंजिनियर ६३५ बुधवार पेठ, पुणें शहर.


[सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविलें आहेत.]

श्री.


# अण्णासाहेब पटवर्धन यांची
# जन्मकुंडली.

शके १७६९ वैशाख वद्य चतुर्थी मंगळवार जन्म लग्न मिथुन.

ज. लग्न कुंडली.




राशि कुंडली.




[ ज्योतिषरत्न पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन ज्योतिषी, पुणें यांजकडून ही कुंडली मिळाली आहे. ]

# अनुक्रमणिका.

मराठी ग्रंथ संग्रहालय

विषय

प्रस्तावना.

श्री० दादासाहेब यांचे दोन शब्द.

खण्ड १ ला.

| | | |
|---|---|---|
| १ | बाल्य. | १ |
| २ | पुण्यांतील शिक्षण | १६ |
| ३ | मुंबईतील बारा वर्षें. | २४ |
| ४ | सालरजंग प्रकरण व मद्रास. | ६४ |
| ५ | स्थित्यंतर. | ८७ |
| ६ | श्रीमहाराजांचें निर्याण. | १११ |
| ७ | श्रीअप्पासाहेब यांचा मृत्यु. | ११७ |
| ८ | पुढील आयुष्य. | ११९ |
| ९ | निर्याण. | १५६ |

खण्ड २ रा.

| | | |
|---|---|---|
| १० | ‘साक्षात्परिचय’ | १७१ |
| ११ | वैद्यकी. | २६७ |
| १२ | श्रीअण्णासाहेब यांचीं दोन स्तोत्रें | २८५ |

खण्ड ३ रा.

| | | |
|---|---|---|
| १३ | चातुर्वर्ण्य. | १ |
| १४ | मांसाशन. | २५ |
| १५ | भाषाशास्त्र व मानवशास्त्र. | ३४ |
| १६ | स्त्रिया आणि वैदिक संस्कृति. | ४३ |
| १७ | राष्ट्रीय चळवळ. | ५९ |
| १८ | राष्ट्रीय शिक्षण. | ७४ |
| १९ | इतिहास. | ९० |

## खण्ड ४ था.

( परिशिष्ट )


२० श्री० तात्यासाहेब रायरीकर. ... ... ९५
२१ श्रीनरसिंहसरस्वती महाराज. ... ... १०२
२२ धुळ्याचे बोवासाहेब. ... ... १०९
२३ श्रीकिंचिस्वामी. ... ... ... ११३
२४ श्रीभक्त दादा दांडेकर. ... ... ११६
२५ कांहीं इतर मंडळी. ... ... १२०
२६ श्रीमंत बाळासाहेब नातु. ... ... १२१
२७ लोकमान्य व अण्णासाहेब. ... ... १२३
२८ साधु गुलाबराव माधानकर. ... ... १२७
२९ वकिली. ... ... ... १२९
३० नंतर. ... ... ... १३५
३१ उपसंहार. ... ... ... १३८
३२ सांप्रदायिक आरत्या. १५६
३३ स्तोत्र वगैरे. १५९

क्र. ... 

॥ श्री ॥

# प्रस्तावना.

पार्थ ह्मणे तो कोण ब्रह्मर्षि असे मनोरमहि ज्यां तें ।
तद्यश नसे परिशिलें सांग सख्या तूं तदीय महिम्यातें ॥१॥
पंत.

१ श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचें चरित्र आणि तें माझे हातून व्हावें ही एक थोडी अकल्पितच गोष्ट आहे. धड मला नाहीं त्यांचा दीर्घकाल सहवास घडला. नाहीं धड कधीं त्यांच्या विषयीं विचार केला. सर्वांगाचे कान करून त्यांचे शब्दही कधीं ऐकिले नाहींत अथवा अंतःकरणाच्या पेटींत मोठ्या लोभानें ते जपून ठेवण्याचा प्रयत्नही कधीं केला नाहीं. शोधकदृष्टीनें त्यांच्याकडे पाहण्याची माझी ताकद नव्हती, शिष्यबुद्धीनें त्यांच्या पायापाशीं बसण्याइतकी पात्रता नव्हती, विद्यार्थीपणानें त्यांचा फायदा घेण्याइतका साक्षेप आंगीं नव्हता, प्राप्त पुरुष म्हणून त्यांचेकडे बघण्याइतकें वैराग्य नव्हतें, अवतार म्हणून म्हणण्याइतकी श्रद्धा नव्हती, संत म्हणून भजण्याइतका भाविकपणा नव्हता, राष्ट्रपुरुष म्हणून आदर करण्याइतकी राष्ट्रहितैकता नव्हती, विद्वान् म्हणून कौतुक करण्याइतकें बुद्धिसामर्थ्य नव्हतें. गुणरत्नाकर म्हणून बुडून जाण्याइतका बेकूब नव्हता अथवा विक्षिप्त पुरुष म्हणून चेष्टा करण्याइतकी टवाळीही आंगीं नव्हती. एकादें ओझरतें दर्शन व्हावें अथवा एकादा गोड विचार क्षणमात्र चमकून जावा अथवा पवित्रपणाची एकादी बारीक लहरी सहज अंतःकरणास थरारून जावी त्याप्रमाणें या आयुष्यांतील अतिशयच अल्प काळ भासलेलें तें एक स्वप्न होतें. त्यांतच आधिव्याधींनीं अगदीं त्रस्त होऊन गेलों होतों. अशा स्थितींत चरित्रकारास लागणारी दृष्टी त्या वेळीं कोठून असणार ? वर सांगितलेल्या गोष्टींपैकीं कित्येक ज्यांच्याजवळ आहेत, ज्यांनीं आस्थापूर्वक आणि भक्तिपूर्वक एकनिष्ठेनें वर्षेंचीं वर्षें त्यांच्या सेवेंत घातलीं आहेत त्यांची बारीक सारीक गोष्ट त्यांचा एकादा शब्द देखील कृपणपणानें आपल्या स्मृतिरूप खजिन्यांत सांठवूनही पंताच्या म्हणण्याप्रमाणें ज्यांचा हावरेपणा गेलाच नाहीं किंबहुना नदीनें समुद्रांत मिळून जावें त्याप्रमाणें आपलें सर्व

जीवनच त्यांच्या नांवांत मिळून दिलें असे जे कोणी असतील त्यांचाच हा अधिकार होता. परंतु असा कांहीं उद्योग म्हटला कीं थोडा तो तरी चार लोकांचा विषय होतोच आणि या लोकांना तर 'मान दंभ चेष्टा । हें तों सूकराची विष्ठा' असें वाटत असतें. कोणाच्या मनांत यांच्याविषयीं आदर आहे असें जर यांना कळलें तर तो मनुष्य बरा न वाटतां यांना विषासारखा वाटूं लागतो. आणि म्हणूनच बहुतेक हे मोठे लोक असल्या कार्यास प्रवृत्त होत नसावेत. माझी तशी स्थिति नसल्यामुळें अथवा जास्त ठीक बोलावयाचें म्हणजे माझी खरोखर काय स्थिति आहे हेंच माझें मला कळत नसल्यानें fools rush in where angels fear to tread ( ज्या ठिकाणीं देवांना पाऊल टाकायचें देखील जिवावर येतें तेथें मूर्ख खुशाल धिंगाणा घालतो. ) या न्यायानें मी या साहसास प्रवृत्त होत आहें. परंतु साहसास प्रवृत्त झालों म्हणून अधिकार-संपन्नता थोडीच येते ! तेव्हां हें चरित्र दोषपूर्णच असणार हें काय सांगावयास पाहिजे ! तरी पण श्रीअण्णासाहेब यांस शांत होऊन ९ वर्षें होऊन गेलीं तरी देखील त्यांचें दृढाभ्यासपूर्वक लिहिलेलें चरित्र तयार करण्याचें कोणाचि मनांवर घेईना आणि काल तर सर्व गोष्टींचा मागमूसही लागणार नाहीं अशा रीतीनें गाडून टाकण्यास नेहमीं तयारच होऊन बसलेला असतो हें जाणून हा अल्पसा प्रयत्न केला आहे. या त्रोटक चरित्रावरून तरी ब्रह्मर्षींचें संपूर्ण चरित्र प्रसिद्ध करण्याची स्फूर्ती खऱ्या अधिकारी महात्म्यांना व्हावी एवढाच याचा हेतु आहे. याच दृष्टीनें या चरित्राकडे वाचक पहातील व बहुदोषमय अशा या कृतीचाही आदर करतील अशी आशा आहे.

२ या ग्रंथाचा सर्वच प्रकार भगवान् श्रीकृष्णाबद्दल श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटल्या-प्रमाणें ' देवकी उदरीं जन्मला । यशोदागृहीं वाढला । शेखीं उपयोगा आला पांडवासी ॥ १ ॥' असाच थोडासा आहे. व तसें होत असतां त्यांच्यावर जशीं अनेक संकटें आलीं व अनेक अडचणींतून त्यांना जावें लागलें तसाच प्रकार याचाही झाला आहे. परंतु तें सर्व सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. कोण-चेंही विशेष काम म्हटलें कीं असें व्हावयाचेंच. या ग्रंथास ' **जवळ जवळ** श्रीअण्णासाहेब यांचें आत्मचरित्रच **म्हणतां येईल** ' असें आम्ही जाहिरातींत कां म्हटलें तें चरित्र सूक्ष्मपणानें संपूर्ण वाचणाराच्या तेव्हांच लक्षांत येईल. परंतु त्याबरोबरच हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं पूर्वीपासून

चरित्र लिहिण्याची कल्पना नसल्यानें हा साराच आठवणींचा खेळ झाला आहे. त्यामुळें चूक घडूं न देण्याची जरी पराकाष्ठेची काळजी घेतली आहे तरी देखील पुरुषाच्या 'भ्रमधर्मा'प्रमाणें कित्येक चुका घडून आल्या आहेत. क्वचित् कोठें माहितीच्या भिन्नपणामुळें व कांहीं ठिकाणीं लोकांकडून आमच्या विनंतिप्रमाणें वेळेवर माहिती न आल्यामुळेंही कांहीं दोष राहून गेले आहेत. परंतु ते सर्व गौण असून चरित्राचा मुख्य उद्देश साधण्यास त्यामुळें यत्किंचितही अडथळा होत नाहीं. त्याचप्रमाणें प्रुफें तपासण्याचें कामही एका हातीं न झाल्यामुळें कित्येक ठिकाणीं मुद्रणप्रमादानेंही चुका झालेल्या आहेत व विशेषतः विरामचिन्हांनीं तर बरीच कामकारता केलेली आढळून येईल. एकादें लांबलचक शुद्धिपत्र देऊन हें सर्व दुरुस्त करतां आलें नसतें असें नाहीं पण तसें करून जागा न अडवितां जेथें कोठें अगदींच अर्थविपर्यास होत असेल अशाच फक्त थोड्या स्थळांचें शुद्धिपत्र दिलें आहे. बाकीचीं सर्व स्थळें अशीं आहेत कीं पूर्वापर संदर्भानें त्यांचा अर्थ लागण्यास कांहींच अडचण पडत नाहीं. भाषेसंबंधींही असेंच म्हणतां येईल. सर्व ग्रंथ तोंडानें सांगून लिहवून घेतला असल्यामुळें त्या दृष्टीनेंही कांहीं दोष असतीलच. परंतु फलनिष्पत्तीच्या ते आड येऊं शकणार नाहींत.

३ अवतरणांतील 'पंतां'च्या उक्तीप्रमाणें अण्णासाहेब यांचें चरित्रही 'राजर्षी'चा 'ब्रम्हर्षि' झाला असेंच आहे. आणि त्यामुळें त्यांच्या चरित्रांतही चमत्कार वगैरेंची बरीच गर्दी असण्याचा संभव आहे अशी पुष्कळांनीं अटकळ केली असेल. कारण संत अथवा सत्पुरुष या दृष्टीनें त्यांच्याकडे पहाणारेही कित्येक लोक असतीलच व त्यांनीं तशी कल्पना केल्यास ती योग्यच आहे. परंतु या बाबतींत मात्र त्यांची निराशा होईल. चमत्कारांचे हें एक सदर आम्हीं अजीबाद सोडूनच दिलें आहे. त्याचीं कारणें उघडच आहेत. एक तर असें कीं त्यांचेंही चमत्कार सांगणारे जरी कित्येक लोक भेटतात तरी ते सारे चमत्कार अशा स्वरूपाचे आहेत कीं त्यांचा चमत्कार म्हणून उल्लेख करावा किंवा नाहीं याचा विचारच पडतो. म्हणजे कोणचाही आड पडदा न ठेवितां त्यांनीं उघड चमत्कार असा कधींच केला नाहीं. दुसरें असें कीं त्यांनीं चमत्कार केले नाहींत म्हटल्यानें त्यांची योग्यता कांहीं कमी होते अथवा केले म्हटल्यानें कांहीं जास्त वाढते असें मला तरी वाटत नाहीं.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणें लिहावयाचें म्हणजे चमत्कारांचा मुख्य उपयोग ' मनुष्याच्या मनांत ईश्वराच्या सत्तेची खात्री पटून विश्वास उत्पन्न व्हावा व धैर्य यावें ' येवढाच आहे. आणि त्या दृष्टीनें पाहिलें तर ' असे चमत्कार होतात व देवाची निरपेक्ष रीतीनें अनन्यगतिक सेवा करणाराला त्यांचा अनुभव अजूनही येतो ' म्हणून त्यांनीं सांगितलेले शब्द देखील त्यांच्या शब्दाची किंमत बाळगणाऱ्या कोणालाही पुरे होतील.

तिसरें असें कीं त्यांचें एकंदर धोरण जर पाहिलें तर असें दिसतें कीं " साधुत्वाच्या शेजेवर साधुसंतांच्या पाखरेखालीं अनंत काल लोळत पडणाऱ्या या महाराष्ट्राला दिव्यत्वाच्या भावना आणि अनुभव पारखे थोडेच आहेत? परंतु गेल्या कैक वर्षांच्या पिछेहाटींत तो इतका मागें गेला आहे कीं या आपल्या वतनदारीची वहिवाट पुनः करूं लागण्यास ' मनुष्यत्वा'ची ही एक पायरी ओलांडणें त्याला प्राप्त झालें आहे ! " आणि म्हणूनच मीही 'राष्ट्रपुरुष' या दृष्टीवरच जास्त भर ठेविला आहे व चटकदार होण्यापेक्षां पुस्तक जास्त उपयुक्त कसें होईल तेंच पाहिलें आहे. सोईकरितां ग्रंथाचे चार खंड केले आहेत. पहिल्या खंडांत त्यांचें साद्यंत चरित्र, दुसऱ्यांत त्यांच्या साक्षात्परिचयानें मनावर उठणारा ठसा, तिसऱ्यांत त्यांच्या कांही मतांचें दिग्दर्शन आणि चवथ्यांत त्यांच्या सहवासांतील कांहीं लोकांची माहिती अशी वांटणी केली आहे. लोकांकडून आलेल्या माहितीचा समावेश याच खंडांत करावयाचा होता. परंतु ग्रंथ फार विस्तारल्यामुळें तो विचार सोडून द्यावा लागत आहे. ग्रंथास उपसंहार जोडला असून शेवटीं त्रिकांड सूत्रात्मक अशा सांप्रदायिक तीन आरत्या दिल्या आहेत. केवळ त्यांच्या मननेंही कर्म, उपासना आणि ज्ञान यांचा यथार्थ बोध होईल. आमचे मित्र रा० मुकुंदशास्त्री मिरजकर यांनीं केलेलें श्रीअण्णासाहेब यांचें एक सुबोध स्तोत्रही दिलें आहे. ह्या स्तोत्राबद्दल मी त्यांचा आभारी आहें. ग्रंथांतील प्रमुख विषय व नांवें यांची विस्तृत सूची दिली असून छोटेसें शुद्धिपत्रही दिलें आहे.

४ लहान मुलानें एकादें काम केलें म्हणजे जसें घरच्या वडील माणसांस नेऊन दाखवावें त्याप्रमाणेंच या चरित्राचे कांहीं भाग वाचून विदर्भस्थ सुप्रसिद्ध विद्वान् श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांस दाखविलें होतें. त्यांच्या श्रवणानें त्यांना येवढा आनंद झाला कीं मांडीवरील जखम पुरी बरी झाली नसल्यामुळें बस-

ण्याचा अतिशय त्रास होत होता व दुखण्यानें अतिशय क्षीणता आली होती तरी त्यांनीं ' चार शब्द ' मोठ्या प्रेमानें लिहून दिले. ते तसेच आरंभीं जोडले आहेत. माझ्या कृतीचें त्यांनीं जें हें कौतुक केलें त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे असें म्हणणें देखील एका दृष्टीनें अनुचितच आहे. तरी तसें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

५ ग्रंथ प्रसिद्ध करावयाचें ठरलें तरीही त्याचें पुढील खरकटें कोणीं निपटावें अगर त्याची काय सोय करावी तें ठरलें नव्हतें. परंतु लोकांस अगाऊ कळवून कांहीं मिळालें तर पहाणें जरूर होतें. त्या करितां आम्हीं आळंदीचें श्रीमहाराजांचे हल्लींचे प्रतिनिधि श्रीभक्त माधवराव बुवासाहेब यांना विनंति केली व येणारी माहिती व मागण्या त्यांचेचकडे नोंदविण्याची व्यवस्था करून त्याप्रमाणें केसरींत जाहिरातही दिली परंतु त्या जाहिरातीखालीं बुवासाहेबांचा पत्ता देऊन वेगळी ' क्ष ' ' लेखक ' किंवा अशीच कांहीं सही करण्याचें धोरण न राहिल्यामुळें स्वतः बुवासाहेबच हा ग्रंथ लिहीत आहेत असा पुष्कळांचा गैरसमज होऊन त्याप्रमाणें पुष्कळांनीं त्यांना विचारलेंही व त्या प्रत्येकाला उत्तरें देण्याचा त्यांना त्रासही झाला. याबद्दल मी त्यांची क्षमा मागतों. परंतु त्यांचा यांत कांहीं भाग नाहीं असें मात्र माझ्याच्यानें म्हणवत नाहीं. वरील प्रमाणें सर्व त्रास त्यांनीं सोसला हें तर खरेंच परंतु त्यांची आशीर्वादयुक्त सहानुभूति जर नसती तर मला हें पुस्तक इतक्या लवकर प्रकाशित करण्याचा धीर आला नसता. त्याबद्दल त्यांचाही मी ऋणीच आहें.

६ जाहिरात दिल्याप्रमाणें अर्थातच कांही माहिती तर आलीच व त्यांतील कांहीं फार उपयुक्त ही आहे. श्रीअण्णासाहेब यांना गुरुस्थानीं मानणारे प्रो० दीक्षित[1], श्रीगुंडगजाननाचे पुजारी ह. भ. केशवभट[2] बाभळे, धुळ्यास कांहीं काळ

---

१ यांच्या आठवणींत श्रीअण्णासाहेबांशीं परिचय कसा झाला व त्यांची योग्यता समजून त्यांचे ठिकाणीं गुरुत्वभावना कशी उत्पन्न झाली त्याचप्रमाणें त्यांच्या प. वा. कुटुंबाचे हस्तें श्रीमहाराजांनीं श्रीअण्णासाहेब यांच्या समाधीमंदिराच्या घुमटीचें काम कसें करून घेतलें वगैरे हकीकत आहे.

२ श्रीअण्णासाहेब यांची श्रीगुंडगजाननाचे ठिकाणीं केवढी भक्ति होती, मद्रासेहून आल्यापासून ते होते तोंपर्यंत कोणत्याही तऱ्हेनें आड न देतां त्या

चाललेल्या ' लोकमान्य ' मासिकाचे संपादक श्रीयुत निफाडकर ऊर्फ 'नाथकवि' इत्यादिकांच्या माहितीचा समावेश याच पुस्तकांत व्हावयास पाहिजे होता. परंतु मूळ प्रकरणच थोडें करितां करितां इतकें लांबलें कीं आंखून ठेविलेली पृष्ठसंख्या संपून गेली. व पुस्तक मोठें करावें तर द्रव्यबळाचा अभाव अशा अडचणमुळें तो मजकूर या प्रतींत गाळून टाकणें भाग पडलें. तरी पण आणखी थोडी माहिती गोळा झाल्यास रा. बापट यांच्या ' लोकमान्यांच्या आठवणी ' प्रमाणें वेगळाच भाग काढून त्यांत तो संग्रह प्रसिद्ध करावा असें योजिलें आहे. विधात्या भगवंताच्या इच्छेप्रमाणें काय घडेल तें खरें ! या सर्व माहिती देणाऱ्यांचाही मी आभारी आहें.

७ जरी हें श्रीअण्णासाहेब यांचेंच कार्य आहे तरी देखील श्री. भ. माधवबुवासाहेब यांच्यासारख्या संतांवर ओझें देऊन त्यांच्या भगवच्चिंतनाच्या उद्योगांत व्यत्यय आणणेंही योग्य नाहीं असें वाटून याची पुढील सर्व व्यवस्था रा. ए. पी. बापट आणि मंडळी यांचेवर सोंपविली आहे. पुस्तकाच्या प्रकाशनास लागलेल्या जाहिराती वगैरेसुद्धां सर्व खर्चवेंच वजा जातां जें उत्पन्न राहील तें सर्व श्रीअण्णासाहेब यांच्या समाधीकडे खर्च करण्याकरितां श्री. भ. माधवराव बुवासाहेब यांचेकडेच जमा केलें जाईल व भक्तमंडळींच्या व आमच्या विचारानें ठरेल त्याप्रमाणें त्याचा विनिमय होईल. पुस्तकाची किंमत जाहिरातींत २॥ रु. अशी दिली असतांही थोडी वाढवून ३ रु. करणें भाग पडलें. कारण नाहीं नाहीं म्हणतांही पृष्ठसंख्या पावणेपांचशेंच्यावर गेली आहे व चित्रें ही दाढलीं आहेत. तरी या वाढीचें ग्राहकभक्तांना जड वाटणार नाहीं अशी आशा आहे.

---

देवस्थानाचा योगक्षेम त्यांनींच मुकाट्यानें कसा चालविला वगैरे मजकूर यांच्या माहितींत आहे.

३ रावबहादूर गणेश व्यंकटेश जोशी यांच्या पत्रांचा समूह वाचींत असतां विलायतेंतून पाठविलेल्या एका पत्रांत प. वा. गोपाळराव गोखले यांनीं ' टिळकांना सर्व प्रकारच्या माहितीचा पुरवठा करून त्यांची तयारी करून देणारे जसे अण्णासाहेब पटवर्धन तसेच आपण मला आहांत ' असें लिहिलेलें वाचल्याचें यांच्या आठवणींत आहे.

८ कोणचेंही काम म्हटलें कीं, त्याला अनेकांचे साह्य झाल्याखेरीज कसें चालेल? या ग्रंथासही अनेकांचें अनेकप्रकारानें साह्य झालें आहे त्या सर्वांचा पृथक् निर्देश करणेंही शक्य नाहीं. तरी पण ज्यांचा माझा मोठासा पूर्वपरिचय नसतांही आपण होऊन कार्यप्रेमानें लेखक होण्याचें ज्यांनीं पत्करिलें, मला स्वतःस ग्रंथ करण्यास प्रवृत्त करून, माझ्या तवीयतखोरपणामुळें होणारा त्रास सोसून व आपले सर्व व्यवसाय सांभाळूनही ग्रंथ, पुन्हा प्रत देखील करावी लागली नाहीं इतक्या शुद्ध आणि सुवाच्यपणानें मोठ्या दगदगीनें लिहून काढिला व इतकेंही करून पुनः स्वतः आपले नामानिराळेच राहिले त्या रा. नरूभाऊंचे आभार कसे मानावेत तें समजत नाहीं. त्याचप्रमाणें ज्या कित्येक मित्रांनीं प्रकाशनास आगाऊ लागणारें द्रव्यसाहाय्य करून मला कायमचा ऋणीं करून ठेविला आहे त्यांचेंही आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्यांच्या साहाय्याखेरीज हा ग्रंथ बाहेर येणेंच अशक्य होतें.

रा० दिवाकरपंत तर या ग्रंथाचे प्रकाशकच आहेत; मननामोदाचे व्यासंगी लेखक रा० माधवराव भिडे यांनीं प्रुफें तपासण्याचें काम निरपेक्षपणें करून आपला पुष्कळ वेळ मोडला; रा० बाबासाहेब पटवर्धन यांनीं आमच्या विनंतीप्रमाणें एक प्रकरणच लिहून दिलें; रा० बाबासाहेब विद्वांस यांनीं चित्रें करण्याकरितां श्रीअण्णासाहेब यांचा व रा० देव यांनीं श्रीमंत तात्यासाहेब रायरीकर यांचा फोटो देण्याची मेहेरबानी केली; गणेश प्रिंटिंगचे सेक्रेटरी गोखले, म्यानेजर व इतरही मंडळी यांनीं हा केवळ धंद्याचा प्रश्न न समजतां आपलेपणानें हें काम मोठ्या तडकाफडकी करून दिलें व प्रो. सहस्रबुद्धे पूना लीथोवर्क्सचे मालक, यांनींही मनाप्रमाणें चित्रें काढून दिलीं याबद्दल मी या सर्वांचा व त्याचप्रमाणें रा. सदाशिवराव बापट, रा. नरहर गणेश वाडेकर, भागवतभक्त कृष्णाजी वामन तळवळकर यांचाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अशा सर्व तऱ्हेच्या मदती करितां मी मनःपूर्वक आभारी आहें. सौ० भागीरथीबाई बापट यांचा माझा अल्पस्वल्पही परिचय नाहीं. परंतु त्यांच्या सुंदर 'पुष्पमाळे' चा परिमळ जो या पुस्तकांत इतस्ततः दरवळलेला दिसतो त्याबद्दल त्यांचे आभार मानणें हें तर माझें कर्तव्यच आहे.

९ याप्रमाणें या ग्रंथाचा इतिहास आहे. अशा थोर व्यक्तींचें चरित्र व विशेषतः मतें वगैरे काम एकाद्या सामान्य माणसाकडे आलें म्हणजे 'शिष्या-

पराधे गुरोर्दण्डः ' असें होण्याचा फार संभव असतो. परंतु सुदैवानें तेवढ्या-बाबतींत मी निर्धास्त आहें. कारण कीं, जरी श्रीअण्णासाहेब यांचें संगतवार चरित्र कोणांस फारसें माहीत नसलें तरी त्यांचें आयुष्य इतकें उघड्यावर गेलें आहे व त्यांची सर्व प्रकारें योग्यता किती मोठी होती याची सर्वांस इतकी निर्विवाद जाणीव आहे कीं, प्रमादस्थळीं गैरसमज न होतां पूर्वी सांगितलेल्या इंग्रजी ह्मणी प्रमाणेंच ( fools rush in where augels fear to tread ) उद्गार वाचकांच्या तोंडून बाहेर पडतील यांत शंका नाहीं. तेव्हां आतां अधिक तें काय लिहावयाचें आहे. सरते शेवटीं त्या अकुंठशक्तिस्वरूप योगेश्वरास एवढीच प्रार्थना आहे कीं,

**चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघे देशांतरा पाठवा ।**
**हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवा ॥**

तथाऽस्तु । तथाऽस्तु ! तथाऽस्तु !

पुणें बुधवार पेठ.
श्रावण शुद्ध १५ सोमवार
शके १८४८

' अप्रबुद्ध '

॥ श्री ॥

# श्री० दादासाहेब खापर्डे यांचे 'चार शब्द'.

वैकुंठवासी श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्रासंबंधीं चार शब्द लिहिण्याचा सुयोग मला आला हें मी माझें महद्भाग्य समजतों. श्रीगीतेंतील 'स्थितप्रज्ञ' वगैरे संज्ञा आणि भगवंतांनीं त्यांच्या केलेल्या व्याख्या माझ्या वाचण्यांत आल्यापासून त्यांत दर्शविल्याप्रमाणें तंतोतंत वागणारा मूर्तिमान् पुरुष पहावयास मिळावा असें मला वाटत होतें. आणि गीता वाचणाऱ्या पुष्कळांनाही असेंच वाटत असेल. सुदैवानें श्रीअण्णासाहेब यांच्याशीं माझा स्नेह जडला व ही माझी इच्छा पूर्ण झाली.

मला त्यांचें प्रथम दर्शन मुंबईस मुरारजी गोकुळदासचे चाळींत सन १८७७। ७८ चे सुमारास घडलें. तेथपासून त्यांचें सर्व वर्तन पहावयास सांपडून माझी खात्री झाली कीं, श्रीकृष्णांनीं 'स्थितप्रज्ञ' इ. पुरुषांचें जें वर्णन केलें आहे तें श्रीअण्णासाहेबांना तंतोतंत लागू पडतें. याची जाणीव जसजशी वाढत गेली तसतशी त्यांच्याविषयींची माझी प्रेमभक्तिही वाढत गेली. त्यांच्याकडे केव्हांही पहा, योगवासिष्ठांत वसिष्ठांनीं श्रीरामांना सांगितल्याप्रमाणें 'अंतस्त्यागी बहिः संगी० एवं विहर राघव' इत्यादि सूत्ररूप वाक्य सर्व प्रसंगांत, सर्वकाळीं, सर्वठिकाणीं जणूं काय ते स्वतःच्या वर्तनानें लावून दाखवीत आहेत व अशा रीतीनें जणूं काय मुकाट्यानें जगताला बोधच करीत आहेत असें वाटे. त्यांच्या स्वभावांतील दुसरा विशेष असा कीं, अंतर्यामीं अशा रीतीनें पूर्णपणें अभिमानशून्य असतांही, मन्वादि ग्रंथांत ब्राह्मणांनीं आपला वर्णाश्रमधर्म कसा आचरावा याविषयीं जें सांगितलें आहे तें हल्लींच्या स्थितींतही कसें आचरावें तें त्यांनीं अत्यंत स्वाभिमानतेनें दाखविलें.

अगदीं वर वर पहाणाऱ्यालाही त्यांच्या ठिकाणच्या २।३ गोष्टींचें आश्चर्य वाटल्यावांचून रहात नसे. अलौकिक बुद्धिमत्ता, धर्मशास्त्र ( Law ) आणि वैद्यक ( medicine ) यांच्यांत पारंगतता असल्यामुळें त्यांना अगणित द्रव्य प्राप्त करून घेतां आलें असतें. परंतु वैराग्य धारण करून त्यांनीं त्याच्या-

वर लाथ मारली. इतकेंच नाहीं तर गुप्तरूपानें अथवा कांहीं व्यावहारिक मिषानें कोणीं कांहीं देण्याचें मनांत आणिलें असतां त्याचा घरांत नुसता प्रवेशही न होऊं देतां भीष्मांप्रमाणें कठोरपणानें व्रतपालन केलें. वरें इतकेंही असून त्यांचा गर्भश्रीमंती बाणा आपला नेहमीं कायमच होता. कोणी कांहीं मागावयास आला आणि त्यांनीं त्याची अवहेलना केली असें एकही उदाहरण सांपडावयाचें नाहीं इतकेंच तर काय पण बोलण्यांत, चालण्यांत, अथवा इतर कोणत्याही व्यवहारांत नुसता त्रासिकपणाही कधीं पहाण्यांत आला नाहीं. सर्व गोष्टी ऐकून घेत, सर्वांशीं अतिशय प्रेमानें वागत आणि योग्य सल्ला किंवा मदत देत. त्यामुळें पुण्याचेंच तर काय पण महाराष्ट्रांतील सर्व प्रकारच्या लोकांचें तें एक मायपोटच झालें होतें. ' दया करणें जें पुत्रासी । तेची दासा आणि दासी ' अशी ती भगवंतमूर्ति होती !

त्यांच्या अलोलुप्त्वाप्रमाणेंच त्यांची कर्मनिरतताही अद्भुतच होती. केव्हांही पहा ते आपले उद्योगांत असावयाचे. आपल्याचे व परक्याचे हा तर तेथें भेदच नव्हता. परंतु काम म्हटलें कीं मग तेथें लहान मोठें असाही प्रश्न नव्हता. सारीं कामें सारख्याच कळकळीनें व अवंचकतेनें व्हावयाचीं. इतकेंच तर काय पण धनलुब्ध सावकार जशी नित्य द्रव्याची शिल्लक पहातो आणि ती वाढविण्याची तजवीज ठेवतो त्याचप्रमाणें सदाचारनिष्ठ श्रीअण्णासाहेबही आपल्या जपतपांची रोजकीर्द ठेवीत होते असें म्हटलें तरी चालेल. त्याच्या-प्रमाणेंच काम पडल्यास ते ५।५ दिवसांनींही आपल्या साऱ्या नित्यकर्मांच्या हिशोबाची मिळवणी करीत !

आपल्या सर्व व्यवहारांतील पूर्वपरंपरा रक्षण करण्याकडे त्यांचें फार बारीक लक्ष असे. घरांतील सामानसुमान, वस्त्रपात्र, किंवा उठण्या बसण्याच्या रीति येथपासून तों थेट राजकारणापर्यंत सर्व गोष्टींत ते आपली जुनी परंपरा पाळीत. आणि त्यांत विशेष गोष्ट अशी कीं, अशा परंपरा पाळण्यामुळें त्यांचें कोठें उणेंही पडलें नाहीं. अशा त्यांच्या अनेक गोष्टींची आठवण होते. ही आठवण जिवंत ठेवून जशीच्या तशीच पुढील पिढ्यांच्या स्वाधीन करण्याकरितां चरित्ररूपानें ग्रथित करणें आवश्यकच होतें.

अशा ब्रम्हर्षि महापुरुषाचे चरणीं ही पुष्पांजली देण्याची संधी मला आली याबद्दल मी जो आनंद व्यक्त केला आहे तो अनाठायीं नाहीं असें ग्रंथ वाच-

त्यावर सहज लक्ष्यांत येईल. चरित्रकारांनीं आपलें नांव प्रसिद्ध केलें नाहीं. हें त्यांचें वर्तन हल्लींच्या सार्वत्रिक रीतीरिवाजाच्या आणि आवडींच्या विरुद्ध आहे. तरी मला त्यांचा नामनिर्देश करितां येत नाहीं. चरित्र लिहिण्यांत त्यानीं नवीन पद्धतीचा उपयोग केला आहे आणि तो फार यशस्वी झाला आहे असें मला वाटतें. त्यांनीं स्वतः प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें चटकदार होण्यापेक्षां पुस्तक जास्त उपयुक्त कसें होईल तेंच त्यांनीं पाहिलें आहे व तेवढ्याकरितां प्रचलित विषयांपैकीं जितके येऊं शकतील तितके प्रायशः सर्व आणून त्यावरील श्रीअण्णासाहेब यांचीं मतें थोडक्यांत सोपपत्तिक दिलीं आहेत. त्यांचें वाचकवर्गानें खोल मनन करावें अशी माझी कळकळीची विनंति आहे. विषय मोठमोठे व महत्वाचें आणि वर्णन सूत्ररूपाचें असें असल्यामुळें ग्रंथ कित्येक स्थळीं थोडासा कठीण वाटण्याचा संभव आहे. परंतु अभ्यासानें जसजसें त्याचें मनन अधिक घडेल तसतशी अंतःस्फूर्ती जागृत होऊन विचाराच्या नवीन नवीन दिशा उजळू लागतील. पुढें यथावकाश श्रीअण्णासाहेब यांच्या 'आठवणी' प्रसिद्ध करण्याचा लेखकांचा विचार आहे. तो सिद्ध झाल्यावर प्रस्तुत चरित्र आणि त्या आठवणी एकत्र करून जो वाचील आणि त्यांचा मेळ मनामधें घालील त्याला

**'यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।**
**यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते'॥**

असा लाभ प्राप्त होईल यांत संशय नाहीं. व्यावहारिक दृष्टीनें त्यापासून काय बोध घ्यावयास पाहिजे तें चरित्रकारांनींच उपसंहारामध्यें तिखटपणानें निर्भीडपणानें, आणि स्पष्टपणानें परंतु अत्यंत कळकळीनें सांगितलें आहे तें विचार करण्याजोगे आहे.

सबंध ग्रंथ तोंडानें सांगून दुसऱ्याकडून लिहवून घेतला असल्यामुळें झालेलें कांहीं साहजिक दोष जर सोडले तर ग्रंथाची वर्णनशैली व भाषा अशा चरित्रास साजेशीच आहेत. राष्ट्राच्या प्रचलित स्थितीविषयीं अंतःकरण तुटून ती बाहेर आली असल्यामुळें भेदक, उद्बोधक आणि सूचक अशी झाली आहे. आणि कृत्रिमतेचा तिला गंध नसल्यामुळें 'कृताभ्यंगस्नाना कनकमणि-

भूषाविरहिता' अशा उग्रतेज पतिव्रतेच्या पवित्र साध्यासुध्या सौंदर्याप्रमाणें तिच्यांत एक प्रकारची मोहकता आली आहे.

अशा या ग्रंथाच्या परिशीलनानें मजप्रमाणेंच वाचकांनाही आनंद होईल असें वाटतें.

उमरावती.
रविवार आषाढ शु॥ २ शके १८४८. } **गणेश श्रीकृष्ण खापर्डे.**



श्री अण्णासाहेब



श्री महाराज



श्री बुवासाहेब



श्रीमंत तात्यासाहेब रायरीकर.

बालोद्यान प्रेस, पुणें.

# श्रीअण्णासाहेब पटवर्धन
## यांचें चरित्र.

२२०
२८-११-२५
२८-११-२५

## बाल्य.

ध्यायेत् सिंहगतं विनायकममुं दिग्बाहुमाद्ये युगे
त्रेतायां तु मयूरवाहनममुं षड्बाहुकं सिद्धिदम् ।
द्वापारे तु गजाननं युगभुजं रक्तांगरागं विभुं
तुर्ये तु द्विभुजं सितांगरुचिरं सर्वार्थदं सर्वदा ॥

—श्रीगणेशपुराण.

॥ श्री ॥

श्रीअण्णासाहेब यांचें घराणें मूळचेंच सरदारी बाण्याचें. परंतु ते महाराष्ट्री सरदार असें कधींच नव्हतें. कोंकणांत पेशव्यांच्या आरमाराचे आधिपति धुळप म्हणून होते, त्यांचे पदरीं अण्णासाहेबांचे पूर्वज फडणिशीचे कामावर होते. अण्णासाहेबांचे तीर्थरूप रामचंद्र भाऊसाहेब, त्यांचे वडील धोंडदेव, व त्यांचे वडील अनंत. त्यांचेविषयीं अशी आख्यायिका आहे कीं ते फार कडक व निस्पृह असत. एकदां धुळप पेशव्यांना भेटावयास आले असतां त्यांचे बरोबर अनंतराव होते. पेशव्यांनीं धुळप यांचा जो सन्मान केला त्यामुळें नाना फडणिसांना वैषम्य वाटून त्यांनीं धुळपांचा अपमान व्हावा, असें वर्तन केलें. त्याबरोबर अनंतराव यांना तें सहन न होऊन त्यांनीं दरबारांतच त्यांना सांगितलें कीं "पेशवाईचें नशीब फुटलें! चाकराचें शौर्य व वैभव जेथें धन्याला सहन होत नाहीं, तेथें नौकरी करणें पाप होय!" असें म्हणून त्यांनीं नौकरी सोडली. असो.

भाऊसाहेब यांची थोरली बहीण पुण्यास प्रसिद्ध असलेल्या रामचंद्र नाइकांचे येथें दिली होती. शनिवारवाड्याजवळच परांजपे यांचा वाडा आहे.

तेथें भाऊसाहेब लहान असतांनाच आले. त्यावेळीं ते वाड्यांत कित्येक वेळां जात असत. पर्वणी वगैरेंना जेवावयासही जात. पेशवाई गेली तेव्हां यांचें वय सुमारें १८ वर्षांचें होतें. म्हणजे त्या वेळच्या मानानें कार्यक्षम असें होतें. पेशवाईच्या माध्यान्हीचीं माणसें त्यांनीं पाहिलीं होतीं. बारभाईचीं कारस्थानें खेळणारीं माणसें त्यांच्या परिचयाचीं होतीं. खर्ड्याच्या रणांगणांत निजामाला स्वारी भरणारे अमृतराव जाखडे त्यांचे स्नेही होते, आणि बाळाजीपंता-सारख्या नराधमानें ब्राह्मणी सत्तेचा झेंडा आपल्या हातानें उतरून इंग्रज–सर-कारचें निशाण तेथें लावलेलें त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें होतें. पेश-वाईच्या अखेरचा नीचपणा, त्यावेळच्या इंग्रजांचें सौजन्य आणि शील, सर्व राष्ट्राच्या अवनतीचें पाप इतिहासानें ज्याच्या एकट्याच्या माथीं मारलें तो दुर्दैवी बाजीराव पेशवा, कोथरूडच्या रस्त्यावर पेशव्यांच्या स्वारीची तास तास वाट पाहत बसणारा, व 'कसेंही करून आमची वर्दी पोहोंचवाच' म्हणून चोपदारांची मनधरणी करणारा, आणि त्यांनीं "अंग्रेजका वकील खडा है, निगा रखो महाराज!" असें म्हटल्यावर, गुडघे टेंकून बसलेल्या त्याचेकडे वांकडी मान करून श्रीमंतांनीं रुकार दिला कीं मिळविली, असें मानणारा एल्फिन्स्टन, आणि पेशवाईनंतर स्वराज्याच्या जिवंत आठवणीनें रात्रंदिवस जळणाऱ्या मराठे सरदारांचीं अंतःकरणें आपल्या गोड शब्दांनीं आणि दिलदार परंतु खोल अशा वर्तनानें हळूं हळूं थंडगार करून, त्यांच्या मिशांचे पीळ कायमचे उतरून ठेवणारे धोरणी इंग्रज अधिकारी,––हे त्यांच्या आयुष्याचे पूर्वरंग होते. स्वराज्याच्या उतारावरून वैभवाच्या समुद्राकडे जोरानें वहात जाणाऱ्या विविध शक्तींचा ओघ अशा रीतीनें बांध घालून एकाएकीं तुंबवल्या-वर त्यांतील पाणी निरनिराळ्या रीतींनीं चौफेर उधळून देऊन, इंग्रजी सत्तेची कृषी, इंग्रज मुत्सद्यांनीं त्याच पाण्यावर किती खुबीदार रीतीनें सोळा आणे पिकवून घेतली, हें त्यांना उत्तररंगांत पहावयाचें होतें. परंतु या गोष्टीशीं अण्णासाहेब यांचा प्रत्यक्ष संबंध थोडा असल्यामुळें, त्या उपसण्याचें काम इतिहासावर सोंपवून, आपण मूळ विषयापुरतेंच पाहूं. या अठरा आणे पिक-लेल्या शेतींतील मालाचे भारे, जेव्हां त्यांच्याकरतां राबणाऱ्या कुळंब्यांच्या घरांत न पडतां, विलायतेंतल्या पेवांत सोन्याच्या रूपानें साचूं लागले, तेव्हां हळूं हळूं कुळंब्यांचे डोळे कसे उघडले, आणि ते उघडल्यावर आपली चूक

सुधारण्याचे त्यांनीं काय प्रयत्न केले, आणि त्यामुळें जागे झालेले हिंदु, आणि तट्ट फुगलेले अँग्लो इंडियन अधिकारी यांची एक प्रकारची अशस्त्र लढाई कायमचीच कशी लागून राहिली, हें अण्णासाहेबांच्या आयुष्याचे मूळ विषय होत.

अशा रीतीनें हें चरित्र म्हणजे सुमारें अर्ध्या शतकांतील महाराष्ट्राचा एक लॉकेट साइझ फोटोच होय. अशा प्रकारच्या चित्रांना जशा तऱ्हेचा परभाग* ( Back ground ) हवा असतो, तशाच प्रकारचें हुबेहुब भाऊसाहेब व त्यांच्या पत्नी साध्वी जानकीबाई, यांचें जोडपें होतें. भाऊसाहेब यांचें शरीर धिप्पाड, भाषण व वागणूक रुबाबदार, स्वभाव विलासी परंतु अत्यंत मानी, बाणेदार, करारी, आणि उदार, आणि राहणी पिढीजाद सरदारास साजेशी खर्चीक, थाटामाटाची व ऐटदार असे; तर जानकीबाईंचा स्वभाव त्याहींपेक्षां विलक्षण करारी व अभिमानी, पण तपस्वी आणि श्रद्धाळु असा होता. श्री—अण्णासाहेब यांचे ठिकाणीं जो जुन्याविषयींचा कमालीचा अभिमान, व आमच्या पूर्वपरंपरांविषयीं उत्कट प्रेम दिसून येई, तें उगीच नव्हतें. आनुवंशिकतेमुळेंच त्यांना त्या आवडत, असें नाहीं,—त्यांनीं त्यांचे उत्कृष्ट नमुनेही पाहिले होते, व त्यामुळें त्यांच्या हृद्गतासह या गोष्टी त्यांच्या ठिकाणीं उतरल्या होत्या. " मातृजं चास्य हृदयं " म्हणून म्हटलें आहे, तें कांहीं खोटें नाहीं. त्यांची आई अत्यंत श्रद्धाळू, परम भक्तिमती, मोठी तपस्विनी, आणि साक्षात्कारी होती, त्यामुळें वैदिक धर्माचें मंगल ध्येय, त्या ध्येयाची प्राप्ती सुलभ रीतीनें करून देणारे शेंकडों मार्ग, आणि कोणच्या ना कोणच्या तरी रीतीनें, त्यांत अनायासें मिळून जाईल अशा रीतीनें ठरवून दिलेलें, आमचें पवित्र, विश्वमंगल, आणि धीरोदात्त असें चारित्र्य, आणि या सर्वांचा सर्वांगपरिपोष करून, जीवाला त्या परमध्येयाकडे सहज नेणाऱ्या अशा, पोटभरू लोकांच्या पचनीं न पडणाऱ्या अनेक गूढ, साध्यासुध्या परंपरा याविषयींचें ज्ञान त्यांच्या ठिकाणीं उपजतच होतें. या सर्व तंतूंनींच त्यांच्या हृदयाची रचना झाली होती. त्याचप्रमाणें श्रेष्ठ बुद्धिमत्ता, थोर स्वभाव आणि औदार्य, जातिवंत स्वदेशप्रीति, हाडाच्या ब्राह्मणास साजेल असली निर्भयता, आणि

---

* आभाति लब्धपरभागतयाधरोष्ठे। लीलास्मितं सदशनार्चिरिवत्वदीयं॥

—कालिदास.

तेजस्विता, स्वभावसिद्ध लोकनायकत्व, आणि इकडचा डोंगर तिकडे करून टाकणारा दीर्घोद्योग, या भाऊसाहेबांच्या ठिकाणीं असलेल्या बीजभूत तत्त्वांनींच त्यांचा पिंड बनलेला होता. म्हणूनच पूर्णपणें विकास पावून, तीं अण्णासाहेब यांचे ठिकाणीं पराकाष्ठेच्या उत्कटतेनें वास करीत. असो.

पेशवाईची अखेर झाल्यावर भाऊसाहेब सुरतेला गेले. तेथें त्यावेळची वकीलीची परीक्षा त्यांनीं दिली. ते कांहीं दिवस मुंबईस वकीली करीत असत, परंतु तेथील हवा त्यांच्या प्रकृतीस न मानल्यामुळें, ते पुन्हा पुण्यास परत आले, ते अखेरपर्यंत तेथेंच होते. पुण्यास आल्यावरही ते बहिणीकडे म्हणजे परांजपे यांचेकडेच राहात. पुण्यास पटवर्धनांचा छोटासा वाडा आहे, तो याच सुमारास अण्णासाहेबांच्या मातोश्रींनीं बांधविला. त्याची रचना साधी परंतु मोठी सोईवार आहे. ती पाहिली कीं, या बाईच्या उद्योगप्रियतेची आणि धोरणीपणाची किंचित् साक्ष पटते. असें सांगतात कीं, वाडा बांधून तयार होईपर्यंत, भाऊसाहेब यांस त्याचा पत्ताच नव्हता; आणि तो आपलाच वाडा आहे असें कळल्यानंतर, बरेच दिवस त्या वाड्यांत जावयास ते तयार होईनात. शेवटीं एक दिवस जेव्हां त्यांना बळेंच तेथें आणून बसविलें, तेव्हां कुठें ते तेथें राहूं लागले! त्यांचा एकंदर परिवार फार मोठा होता. पांच भाऊ व त्यांचे परिवार, चार आश्रित मंडळी, स्नेही सोबती; नौकरचाकर आणि येणारे जाणारे, मेणागाडी, इत्यादिकांच्या योगानें शनवारवाड्याच्या अत्यंत लगत असणाऱ्या त्या जागेंत, वैभवाची छोटीशी मूर्ती नांदतांना दिसत असे. एकादें अत्यंत सुंदर आणि मौल्यवान् वस्त्र प्रचंड वातानें कुठल्याकुठें उडून जावें, त्याप्रमाणें पाहतां पाहतां उडून गेलेल्या शनवारवाड्यांतील राजवैभवाची ही एक लहानशी दशीच शेजारच्या झुडुपावर अडकून डुलत होती कीं काय कोण जाणें! चरित्रकारांच्या चालीप्रमाणें मी हें कांहींतरी खुलवून लिहितों आहे असें नाहीं; नायकाशीं संबंध असलेल्या प्रत्येक गोष्टीचें कौतुकच करावयाचें, म्हणूनही हें लिहीत नाहीं; यापेक्षां किती तरी पटीनें श्रीमान् असलेलीं घराणीं त्या वेळीं पुण्यांत वागत होतीं, परंतु तीं बहुतेक अस्ताव्यस्त रीतीनें आणि कुठें कांहीं तर कुठें कांहीं अशा रीतीनें राजलक्ष्मीचीं अंगें पृथक्पणें कशींतरी सांभाळून होतीं. परंतु येथें तीच राजलक्ष्मी अत्यंत सूक्ष्म प्रमाणांत कां होईना, परंतु आपल्या संपूर्ण अवयवांनीं एकत्र नांदत होती. श्रीअण्णा-

साहेब यांचे ठिकाणीं झळकणारें राजतेज आणि राजपुरुषासच साध्य असला त्यांचा जीवनक्रम आणि श्रेष्ठ उद्योग यांचें तरी कारण हेंच आहे.

पेशवाईच्या गतवैभवाचीं चित्रें डोळ्यापुढें असणारे, आणि त्याच्या पुनरावर्तनाचीं नित्य नवीं स्वप्नें पाहणारेही कांहीं मायेचे पूत त्यावेळीं पुण्यांत होतेच. असल्या लोकांशीं तर भाऊसाहेबांचें विशेष सख्य असे. आपल्या निराश झालेल्या अंतःकरणास घटकाभर करमणुक व्हावी म्हणून अशी मंडळी नेहमी गप्पा मारण्याकरितां भाऊसाहेब यांचेकडे येत. यांच्या सहवासांतच अण्णासाहेबांचें बाळपण गेलें. त्या सर्वांचें योग्य तें परिवर्तन बालरूपधर विनायकाचे अंतःकरणांत होणें साहजिक होतें; आणि तें किती कमालीच्या उत्कटतेनें झालें, हें अगदीं शेवटशेवटच्या त्रिगुणातींत स्थितींतही, अण्णासाहेब हे त्या वेळच्या आठवणी सांगतांना, किती रंगून गेल्यासारखे दिसत, तें पाहिलें म्हणजे ध्यानांत येई. खर्ड्यांच्या लढाईत गाडा मोडला असतां स्वतःच्या पाठीवरूनच तोफ सोडणारे अमृतराव जाखडे, व तरवारीच्या सफाईदार हातासरसे केळीच्या खुंटांतील बोटभर जाडीचा गज बेमालुमपणानें दुखंड करणारे, आणि मांडीच्या सांगडींत अण्णासाहेब व नानासाहेब या बालमूर्तींना बसवून हातांवर उलटेंच चालून शनवारवाड्यास फेरी करणारे माधवराव सोमवंशी वगैरेंचीं वर्णनें विनोदी रीतीनें सांगतांना ' सांगावेसेंच वाटतें रे ! ' असें त्यांना होऊन जाई !

नेहमींच्या नियमाप्रमाणें भाऊसाहेबांच्या ऐश्वर्यांतही एक कमीपणा होता. मुली झाल्या होत्या परंतु पोटीं पुत्रसंतान नव्हतें. या गोष्टीचें त्यांचेपेक्षां जानकीबाईसच जास्त वाईट वाटे. परंतु नुसतें वाईट वाटलें म्हणून स्वस्थ बसणारी आणि जागच्याजागीं हळहळणारी ती बाई नव्हती. ही आपली आपत्ती दूर करण्याचा तिनें निश्चय केला, आणि त्या काळच्या समजुतीला अनुरूप अशा तपादिक कडक उपायांनीं आपले मनोरथ पूर्ण करून घेण्यासाठीं त्यांनीं कास बांधली. त्यांची श्रद्धा आणि दृढनिश्चय अंबेसारखीं बिनतोड होतीं. शेवटीं अनेक व्रतवैकल्यांचें फळ म्हणून म्हणा, किंवा पुढें पोटीं येणाऱ्या विनायकाला उचित अशी जास्त कडक तपस्या त्यांच्या हातून घडावी म्हणून त्यांना जरा डंवचावें म्हणून म्हणा, त्यांना गर्भ राहिला. त्याचें नीट रक्षण व्हावें म्हणून त्या कांहीं दिवसांनंतर कारकोळपुऱ्यांतील श्रीनृसिंहाचे देवळांत मुलीसुद्धां जाऊन राहिल्या होत्या. पूर्ण दिवस झाल्यावर त्यांना त्यांच्या

कल्पनेप्रमाणें मुलगा झाला. परंतु हा आनंद फार दिवस टिकावयाचा नव्हता. थोडे दिवस गेल्यावर एके दिवशीं माध्यान्हीचे सुमारास मुलाला न्हाऊं वगैरे घालून देवापुढें पाळण्यांत निजवून त्या प्रदक्षिणा घालीत होत्या. एकाएकीं मूल दचकून उठलें आणि त्यानें एक लहानशी किंकाळी फोडली. जानकीबाई घाबऱ्या घाबऱ्या जवळ येऊन पाहतात तों पोराचा प्राण निघून गेलेला ! या प्रकारामुळें त्यांना अत्यंतच खेद झाला.

असें सांगतात कीं, या मुलावर कोणी तरी दुष्ट मंत्रप्रयोग करीत होता. त्याचा तो परिणाम होऊन गेला. कोण प्रयोग करीत होतें तें जानकीबाईस ठाऊक होतें. मुलाचा प्राण गेला तेव्हां तो प्रयोग उलटून देतों, म्हणून म्हणणारा एक माणूसही त्यांना मिळाला होता; परंतु तसें करण्यानें त्या प्रयोग करणाऱ्याचा मृत्यु ओढवणार होता, म्हणून त्यांनीं त्या माणसास सम्मति दिली नाहीं. श्रीअण्णासाहेब यांच्या मातृपदाचा मान ज्यांना मिळावयाचा होता, त्यांचे ठिकाणीं असलें थोरपण असणें योग्यच होतें.

आघात झाला म्हणून कमर खचून हातांतला उद्योग सोडून देणें त्यांना ठाऊकच नव्हतें, उलट त्यायोगें त्यांना दुप्पट अवसान मात्र आलें. कोणच्याही मंत्रतंत्रांना भीक न घालणारें सर्वांत श्रेष्ठ असें जें आदिशक्ति परमेश्वराच्या कृपेचें सामर्थ्य, तेंच प्रत्यक्ष अंगीं आल्याखेरीज काम भागणार नाहीं, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली. सुदैवानें त्यांना एक मार्गदर्शक गुरूही भेटला. पटवर्धनांचें कुळदैवत गजानन आहे. त्याची उपासना त्यांनीं समजून घेतली, व देहावर उदार होऊन त्याची सेवा त्या करूं लागल्या. दिवसाचा पुष्कळ भाग त्यांचा जपध्यानादिकांतच जात असे. याप्रमाणें नित्यनेम सारून त्या दर्शनाकरितां देवळांत जात व तेथें बराच वेळ प्रदक्षिणा घालून परत येत. हाच क्रम पुढें श्रीअण्णासाहेबांनींही उचलला होता, आणि बहुतकरून अखेर-पर्यंत अव्याहत चालला होता.

पुण्यास जीं अनेक देवस्थानें आहेत, त्या सर्वांत श्री ओंकारेश्वरप्रभु, श्री गुंडगणपती, आणि भिकारदासाचे गेटाजवळील श्रीमारुतिराय हीं मोठीं जागृत स्थानें आहेत, असें म्हणतात. श्रीअण्णासाहेब यांचें त्यांचेवर मोठें प्रेम असे. यांतील श्री गुंडगणपतीवर जानकीबाईची फार श्रद्धा होती. नाना चित्राव म्हणून एक भव्य व तेजस्वी वृद्ध गृहस्थ त्याचे पुजारी होते. त्यांना

ध्यानाचा अभ्यास चांगला होता. जानकीबाईंना ध्यानयोग नानांनीं शिकविला. बहुतकरून ध्यानाभ्यासी डोळे मिटून ध्यान करतात. परंतु जानकीबाई आसन घालून डोळे उघडे ठेवून ध्यान करीत. त्या अवस्थेंत कित्येक प्रसंगीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असलेल्या पाहिल्याचें अण्णासाहेब सांगत. ध्यान-योगांत त्यांची गति किती झाली होती, हें पुढें एकदोन आख्यायिका सांगावयाच्या आहेत, त्यांवरून लक्षांत येईल. असो. मेण्याशिवाय घराबाहेर पाऊलही पडावयाचें नाहीं अशी जिची स्थिति, तीच जानकीबाई रोज पायीं देवाला जाऊन गुंडाच्या श्रीगणेशास प्रदक्षिणा घालूं लागली, तेव्हां अर्थातच तो एक टीकेचा विषय झाला. घरांतील वडील माणसें व खुद्द भाऊसाहेब यांचीं बोलणीं त्यांना निमूटपणें सोसावीं लागत. भाऊसाहेबासारख्या विलासप्रिय माणसाला बायकोचें असलें तपस्वी वर्तन कसें खपणार ? परंतु तिच्या तेजस्वितेमुळें त्यांनासुद्धां 'अशा गोष्टी करूं नको' असें जोरानें सांगण्याचा धीर होत नसे. तरी पण पहिल्या पहिल्यांदा जानकीबाईंना बराच त्रास सोसावा लागला, असें श्रीअण्णासाहेब सांगत. पुढें एक लहानसा चमत्कार घडून आल्यामुळें भाऊ-साहेब यांची समजूत पटली. मग त्यांनीं कधीं जानकीबाईंना अटक केली नाहीं. तो प्रकार असाः—प्रदक्षिणा घालतां घालतां जानकीबाईचे पाय सूजून गेले. परंतु त्या तशाच उठत बसत देवाला जात व फरपटत प्रदक्षिणा घालीत. तेव्हां एक दिवस मंगलमूर्तीला दया येऊन त्यांनीं नानांना सांगितलें कीं, 'जानकीबाईची सेवा मला पावली. आतां पुरे कर म्हणून तिला सांगावें.' त्याप्रमाणें त्यांनीं जानकीबाईस सांगितलें. परंतु असली सांगोवांगीची उडवाउडवी कोठून खपणार ? त्यांनीं उलट उत्तर दिलें कीं, 'देवानें तुम्हांस सांगितलें तें मलाच कां नाहीं सांगितलें ? मला सांगायला लाज वाटते कीं काय त्यांना ? त्यांना शेवटीं दर्शनाचे वेळीं एकदां असें दिसलें कीं 'आतां प्रदक्षिणा पुरे कर' म्हणून आज्ञा करून श्रीगजाननानें त्यांच्या पायांवर तीर्थ शिंपडलें. दर्शनास जातांना पायांवर मोठी सूज होती, परत येऊन पहातात तों सूज मुळींच नाहीं! तेव्हां त्यांनीं तें भाऊसाहेबांना दाखविलें. तो प्रकार पाहून मात्र त्यांची पक्की खात्री झाली, व त्यांनीं पत्नीस रागें भरणें सोडून दिलें. जानकीबाईंनीं अर्था-तच इतर कोणाच्याही दृष्टोत्पत्तीस हा प्रकार येऊं दिला नाहीं. पुढें फक्त श्री. अण्णासाहेब यांनाच तो ठाऊक होता, व त्यांनीं सांगितल्यावरूनच तो मला

कळला. इतकें झाल्यावर मग प्रदक्षिणा थांबल्या. परंतु दर्शनास जाण्याचा पाठ मात्र सुरूंच होता.

नंतर त्यांनीं चतुर्थीव्रत सुरू केलें. संकष्टी चतुर्थीला सूर्योदयापासून तों चंद्रोदयापर्यंत उभ्या राहून त्या जप करीत. असें करतां करतां २१ चतुर्थ्या पुऱ्या झाल्यावर त्यांना दिवस राहिले. त्यावेळीं त्यांना पूर्वीसारखीं कांहीं भीति वाटत नव्हती. आपणास पुत्र होणार म्हणून खात्री असल्याकारणानें एक प्रकारचा आनंद वाटत होता. रीतीनें पूर्ण दिवस झाल्यावर शके १७६९ च्या वैशाख वा। ४ स प्रातःकाळीं सुखप्रसूती होऊन श्रीअण्णासाहेबांचा जन्म झाला. त्यावेळीं मूळ नक्षत्र असून मंगळवार होता. ( इ. स. १८४७ मे ४ ).

त्यावेळचीं एक आख्यायिका ऐकण्यांत आहे. नाना चित्राव नित्यनियमाप्रमाणें श्रींचें ध्यान करीत होते. तों ध्यानमूर्ति नेहमींप्रमाणें न दिसतां पायांत साखळ्या आणि तोडर घालून आनंदानें नाचत असलेली अशी बालस्वरूपी दिसूं लागली. त्यासरसे श्रीगजाननाचा अवतार झाला, असें समजून त्यांनीं ध्यान विसर्जन केलें, व डोळे उघडून चौकशी करतात तों जानकीबाई आज अजून दर्शनास आली नसल्याचें त्यांना समजलें. तेव्हां त्या बाळंत होऊन त्यांना पुत्ररत्न झालें, असें त्यांनीं सांगितल्यावरून मंडळींनीं चौकशी केली तों खरेंच ! भाऊसाहेबांनीं मुलाचें नांव विनायक ठेविलें.

नवानवसानें झालेलें मूल, तेव्हां त्याचें लालनपालन किती कौतुकानें झालें असेल, हें कांहीं सांगावयास नको. अण्णासाहेबांचें हाडपेर जन्मापासूनच बळकट आणि बांधेसूद होतें. रंग खरोखरच एखाद्या कागदी निंबासारखा सुंदर होता. इतकें असून ते अत्यंत नाजूक होते. क्वचित् प्रसंगीं त्यांच्या करचरणादिकांस स्पर्श करावयाची संधी सुदैवानें येई; त्यावेळीं त्या रेशमाप्रमाणें मऊ लागणाऱ्या आणि कोंवळ्या आम्रपल्लवांप्रमाणें पातळ वाटणाऱ्या त्वचेची मोठी मौज वाटे. बाळपणीं तर अर्थात्च ते अधिकच मनोहर दिसत असतील. अत्यंत लहानपणापासूनच—म्हणजे केवळ ५।६ महिन्यांचे होते, तेव्हांपासूनच—त्यांचें अंगींचे हट्टीपणा, धर्मभोळेपणा, विषयसेवनाविषयीं तिटकारा वगैरे गुण प्रकट झाले होते. देवाचा अंगारा लावला असतां रडत असले तरी थांबणें, तेल अंगास लाविलें कीं तें धुवून टाकीपर्यंत सारखें रडत राहणें, वगैरे गोष्टी नित्याच्याच असत. न्हाऊं घालणें म्हणजे तर एक मोठा समारंभच होता. कमींत कमीं

दीड दोन तास चालावयाचा. यावेळीं ते येवढा आरडाओरडा व धामधूम करीत कीं सारें घर त्रासून जाई. शेवटीं भाऊसाहेबांस त्रास होऊं नये म्हणून, त्यांच्या आईनें समोरच्या बोळांतलें घर मुद्दाम घेतलें, आणि पुढें स्नानादिक विधी तेथें होऊं लागले. असें त्यांना जरा समजूं लागेपर्यंत चाललें होतें. देवाच्या अंगाऱ्याचें वेड तर पुढें पुढें इतकें वाढलें कीं, त्याखेरीज त्यांचें जेवणच होत नसे. लहान पोरांना आपण कडेवर घेऊन काऊचिऊ करीतों, अथवा 'हा अमक्याचा' 'हा तमक्याचा' असे घांस देऊन जेऊं घालतों, त्याप्रमाणें, एक राखेचा ढेंपसा पुढें ठेवून प्रत्येक घांसाला राख लावून देव्हाऱ्यांतल्या एकाद्या देवाचें नांव जेव्हां आईनें घ्यावें, तेव्हां कुठें बाळाचें खाणें व्हावें! त्याची वडील बहीण त्यांना नेहमीं म्हणत असे कीं, 'कोण जोगडा आला आहे जन्माला कोण जाणें!' कोणच्याही गोष्टींत थोडेपणा त्यांना कधींच खपला नाहीं. लहानपणीं देखील असेंच होतें. त्यांच्याकरतां वेगळ्या बोटकुलींत भात करून ती तांबली त्यांच्यासमोर सगळीच्या सगळी पालथी करावी लागे! जर कां एकाद्या दिवशीं यांत हयगय झाली, तर आकाश--पाताळांतल्या साऱ्या देवता गलबलून जातात कीं काय एवढा गोंधळ व्हावयाचा म्हणून समजावें! अखेरीस कंटाळून ज्यावेळीं आई मोठें थोरलें भाताचें भांडें त्यांच्यापुढें परातींत पालथें घाली, तेव्हां कुठें हें गोंधळदेव तृप्त व्हावयाचे; आणि प्रसन्नतेनें त्यांतून दोन चार घांस आपल्या कोंवळ्या केळफणीसारख्या नाजुक बोटांनीं उचलून घ्यावयाचे! एरव्हीं कोणत्याही रीतीनें समजूत होणें शक्यच नसे!

मूळव्याधीचा त्रास त्यांना सहाव्या महिन्यापासूनच होता. शौचाचे वेळेस सबंध अंग बाहेर पडत असे, व मग तें हळू हळू परत आंत जाईपर्यंत मोठा त्रास होई. मुक्ता म्हणून त्यांचेकडे जुनी कुळंबीण होती. तिच्या अंगावर श्रीअण्णासाहेब लहानपणापासून होते. तिनें त्यांना पायांवर घ्यावें व हळूं हळूं युक्तीनें तें आंत घालावें. यामुळें त्यांना शौचास वेळ लागणें, शौचाचे वेळीं त्रास होणें, रक्त पडणें वगैरे ज्या कांहीं संवयी लागल्या त्या शेवटपर्यंत तशाच होत्या. शौचास त्यांना कमींत कमी पाऊण तास लागे. शौचाचे वेळीं त्रास व मधून मधून रक्त पडणें, हें तर नित्याचेंच होतें. अशी रक्तस्रावाची नित्य संवय असतां, त्यांची प्रकृति अखेरपर्यंत ताब्यांत व कार्यक्षम राहिलेली पाहून आचंबा वाटतो.

जसेजसे हे मोठे होऊं लागले, तसे तसे यांचे एक एक गुण प्रकट होऊं लागले. हट्टीपणा, अवचट स्मरणशक्ति, शरीरसामर्थ्य, दयालुत्व, अलोलुपत्व, तेजस्विता, प्रखर स्वाभिमान, निर्भयता, कोणत्याही गोष्टीची प्रत्यक्ष अनुभव घेऊन खात्री करून घेण्याची तयारी, विश्वकुटुंबिता, आणि या सर्वांच्या जोडीला निःसीम श्रद्धा, कर्मठपणा, वगैरे दैवी संपत्ती ओतप्रोत भरलेली ही खाण, काळ, वाढत्या वयाच्या कुदळ्या मारून हळूं हळूं उघडी करूं लागला. एकटें राहणें किंवा कोणतीही सुखाची गोष्ट एकट्यानें करणें, त्यांना कधींही आवडलें नाहीं. दहा पंधरा समवयस्क स्नेह्यांच्या तांड्यांत झोरक्याप्रमाणें ते सांपडत. ही सर्व मंडळी नेहमीं त्यांच्या घरीं पडलेली असत. कांहींचीं घरें गांवांत असून देखील त्यांचें निजणें बसणें यांच्या येथेंच असे. सर्व प्रकारच्या मर्दानी खेळांचा नाद यांना असे, व विशेषतः त्यांत दांडगाई व मारामारी यांत तर त्यांना विशेषच आनंद; तरीपण त्यांपैकीं एकाद्यांत विशेष प्राविण्य त्यांनीं संपादिलें होतें, असें दिसत नाहीं. त्यांचें डोकें प्रथमपासून मोठमोठ्या विषयांत गढून गेलेलें असे. इतकेंहि असून त्यांचा व्यासंग, ज्ञान व अवलोकन ही चौरस होतीं. त्यांच्या बाळपणींच्या गोष्टी सांगणारें कोणी उपलब्ध नसल्यानें त्यांच्या आयुष्यांतील मोठ्या मौजेच्या भागास आपणास अंतरावें लागत आहे. तरीही या वेळच्या काहीं त्रोटक गोष्टी त्यांच्या तोंडच्या ऐकलेल्या सांगतां येतील.

भय म्हणून काय पदार्थ आहे, हें त्यांना मुळापासूनच ठाऊक नव्हतें. त्यांना एकदां प्रश्न केला होता कीं ‘ तुम्हीं पिशाच पाहिलें आहे काय ? ’ तेव्हां ते म्हणाले ‘ होय. ’ मी विचारलें कीं ‘ केव्हां पाहिलें व कोठें पाहिलें?’ यावरून त्यांनीं सांगितलें कीं ‘ लहानपणीं सुमारें बारा वर्षांचे असतां आम्हीं मुलें मुलें बंगलींत बसत उठत असूं. एक दिवस रात्रीं ( रात्र काळोखी कीं चांदणी होती तें त्यांनीं सांगितलें, पण माझे लक्षांत नाहीं, बहुत करून चांदणी रात्र असावीसें वाटतें ) खेळ चालला असतां मीं उठून सहज रस्त्याकडे पाहिलें. तों तें रस्त्यांत खिडकी समोरच खेळत होतें. लहान मुलें गाऱ्या भिंगाऱ्या करतात त्याप्रमाणें स्वतःभोंवतीं गिरक्या घालून तें लहान मोठें होत होतें. ’ मीं विचारलें ‘ मग तुम्हीं काय केलें ? ’ ते ह्मणाले ‘ मला मोठी मौज वाटली, आणि मी सर्व मुलांना बोलावून ‘ तें पहा रे कसें खेळत आहे!’

म्हणून दाखविलें.' एवढ्या छोट्या वयांत भूत आहे असें कळून देखील त्यांना मुळीं देखील भीति वाटली नाहीं, उलट गंमत वाटली.

याचप्रमाणें एकादी गोष्ट कठीण म्हणून तिचा नाद सोडणें ही कल्पनादेखील कधीं त्यांना शिवली नाही. उलट समर्थांच्या उक्तीप्रमाणें 'कानडेंचि अभ्यासावें,' असा प्रसंग आला ह्मणजे त्यांना दुप्पट अवसान येई. त्यांचें सारें आयुष्य अशा प्रकारच्या कटाकटींत गेलें. इंग्रजी शाळेंत शिकावयाला गेल्यानंतर लवकरच असा प्रसंग आला कीं, जो कोणी दोन इयत्तांचा अभ्यास करील त्याला ६ महिनेपर्यंत शाळेंत न येण्याची परवानगी होती. यांनीं पाहिलें, ठीक झालें; तितकेंच झालें. पुढें परीक्षेचे वेळीं हे तिसरीच्या मुलांत जाऊन बसले. परंतु मास्तरशीं यांच्या नेहमीं कटाकटी चालत. त्यामुळें त्यांची त्यांच्यावर प्रीति नव्हती. त्यांना अर्थातच ही गोष्ट पसंत पडली नाहीं. त्यांनीं यांना तेथून उठून दुसरीचे मुलांत बसण्यास सांगितलें. तेव्हां अर्थातच मोठी कटाकट होऊन ती गोष्ट कर्फहॅम साहेबांचे कानावर गेली. साहेब मजकुरांस तंटा काय आहे तें कळल्यावर सहज विनोद करण्याकरितां त्यानीं म्हटलें कीं 'तूं मोठा उद्धट दिसतोस. जर तूं तिसरीचे परीक्षेंत नापास होशील, तर तुला उलट पहिलींत बसवीन.' अण्णासाहेबांनीं उत्तर दिलें 'असें कसें? हा तर अन्याय आहे. फार झालें तर दुसरींत बसवा, परंतु तशीच तुमची इच्छा असली तर होऊन जाऊं द्या, मी तयार आहें.' पुढें परीक्षा घेतली. तेव्हां Howard चें पुस्तक होतें. त्यांतील प्रश्न विचारतांना कांहीं नियम पाठ ह्मणावयाचा होता, व साहेबबहादूर मुद्दाम कसून तो पुस्तकाबरहुकूम आहे किंवा नाहीं हें पहात होते. होतां होतां त्यांत कोठें Being शब्द आला. तेव्हां त्यानीं सांगितलें 'साहेब, पान उलटा; Being चें ing सतराव्या पानावर आहे.' यामुळें चोहोंकडे एकच हंशा पिकला. खुद्द साहेबांसही त्यांच्या अचुक स्मरणाचें व तेजस्वितेचें कौतुक वाटून त्यांनाही हंसूं आलें, व त्यांनीं परीक्षा पुरी करून त्यांस शाबासकी दिली.

त्या वेळच्या साहेब शिक्षकांच्या व परीक्षकांच्या पुष्कळ मौजेच्या गोष्टी अण्णासाहेब सांगत. But for a moment and Boby was dead, हें वाक्य भाषांतरित करतांना एका वर्गांत कुशी मौज झाली, तें ते मोठ्या मौजेनें सांगत. 'एका पळाचा उशीर कीं बॉबी मेलाच होता' असें

८२४८
२८-११-२५
सं. ३९४
ता. २८-११-२५

मुलानें सांगितलें, कीं साहेब बहादुरांनीं Nonsence, next म्हटलेंच. शेवटीं जेव्हां कोणासच नीट ( ! ) उत्तर देतां येईना, तेव्हां मास्तरसाहेबांच्या स्वारीनें स्वतःच त्याचें उत्तर सांगितलें:–' इतका सोपा येत नाहीं ? एका मिनिटाचा उशीर कीं बोबी मरलाच होता ! ! '

यांची आई यांच्या लहानपणींच, म्हणजे हे सुमारें दहाबारा वर्षांचे असतां वारली. अण्णासाहेब यांचे पाठीवर तिला लागलाच म्हणजे सुमारें २।३ वर्षांनीं एक मुलगा झाला. त्याचें नांव नारायणराव असें होतें. म्हणून त्यांना नानासाहेब असें म्हणत असत. अण्णासाहेब यांस त्यांची बहीण बाळ म्हणत असे. श्रीमन्नृसिंव्हसरस्वती महाराज, धुळ्याचे श्रीपद्मनाभस्वामी ऊर्फ बुवासाहेब वगैरे दादा म्हणत, आणि इतर सर्वत्र अण्णासाहेब म्हणत असत. आईचें सुख यांना कांहीं फार दिवस लाभलें नाहीं. परंतु जाण्यापूर्वीच तिनें श्री गुंडगजाननाची व यांची गांठ घालून दिली होती. श्रीगजाननाला जाण्याचा व प्रदक्षिणेचा क्रम सात वर्षें वयापासूनच यांना घालून दिला होता. आईनें जाण्यापूर्वी आपण जाणार म्हणून सांगून ठेवलें होतें. आई निवर्तल्यावर लवकरच यांचें लग्न झालें. शुक्रवारांत लोणीविके दामले म्हणून प्रसिद्ध होते, ( अजूनही या नांवानें प्रसिद्ध आहेत, परंतु कालमहात्म्यानें घराची ती स्थिति राहिली नाहीं. ) त्यांची मुलगी रमाबाई. असें सांगतात कीं, मुलगी पसंत केल्यावर भाऊसाहेब यांस कोणी सांगितलें कीं ती काळी आहे. तेव्हां ते म्हणाले ' जरा हळद लागली कीं, दिसेल गोरी ! ' खरोखरच अण्णासाहेब यांच्या सौंदर्याच्या मानानें त्यांच्या पत्नी दिसावयास काळ्यासांवळ्याच होत्या. परंतु नाकाडोळ्यांनीं नीटस असून स्वभावानें तर अतीच चांगल्या. ज्याचें आयुष्य पुढें इतक्या चमत्कारिक रीतीनें जाणार होतें, अशा मुलाकरितां भाऊसाहेबांनीं एकाद्या श्रीमंत सरदाराची मोत्याच्या दाण्यासारखी मुलगी न करतां रूपानें साधारणच परंतु स्वभावानें लोकोत्तर मुलगी पसंत केली, यांत त्यांच्या धोरणीपणाची व मनुष्यस्वभावाच्या परीक्षेची कमाल दिसून येते.

या वेळच्या अण्णासाहेबांच्या तल्लख स्वभावाची एक गोष्ट सांगतात. लग्नानंतर लवकरच पुढें रंगपंचमीचा सण आला. त्यावेळीं तो सण सासुरवाडीस झाला. तेव्हां मागाहून अंगावर टाकण्याकरितां रंग आला. यांना असल्या गोष्टीची मनापासून चीड असल्यामुळें 'तसें करूं नका,' म्हणून त्यांनीं निक्षून सांगितलें.

परंतु त्यामुळें अधिकच थट्टा होऊन कोणीतरी अंगावर रंग टाकला. त्यासरशीं त्यांचें पित्त एवढें खवळलें कीं त्यांनीं टरकन् अंगावरचा शेला फाडून पुढें टाकला ! तेव्हां सर्वजण विस्मित होऊन स्तब्ध बसले.

यांचें बाल्यप्रकरण संपवून जातां जातां त्यांच्या मातोश्रीच्या अधिकाराविषयीं दोन गोष्टी सांगितल्या तर विशेष विषयातिक्रम होईल असें नाहीं. म्हणून त्यांच्या ध्यानयोगसिद्धीच्या २।३ गोष्टी पुढें देतों.

बंडाचे वेळीं इकडील मंडळींना मोठीच तळमळ लागून राहिली होती. परंतु तिकडील बातमी कळण्यास मार्ग मात्र कांहींच नव्हता. त्यामुळें त्यांना वाईट वाटूं लागलें. तेव्हां जानकीबाईनीं सांगितलें ' चिंता करूं नका, मी तिकडील बातमी सांगतें. ' आणि ध्यानस्थ होऊन सर्व वृत्तांत त्यांनीं सांगितला. पुढें तिकडून बातम्या पत्रें वगैरे आलीं, तों तें सर्व खरें ठरलें ! त्यावरून मोठें कौतुक वाटून लोक त्यांना पुन्हा पुन्हा प्रश्न करूं लागले. हा एक उपसर्गच त्यांना झाला. तेव्हां एक दिवस जवळ पडलेला एक आरसा घेऊन त्या म्हणाल्या कीं, ' फिरून मला त्रास देऊं नका. जें कांहीं हवें असेल, तें हा आरसा सांगेल. याला धूपदीप दाखवून यांत पहात जा, म्हणजे झालें. सर्व कांहीं त्यांत दिसेल. ' आणि खरोखरच त्यांत तसें दिसत असे. ही गोष्ट स्वतः अण्णासाहेबांनीं सांगितली. जानकीबाईचे मरणानंतर तो आरसा कांहीं दिवस त्यांचेजवळ होता. पुढें एकदां कोणाच्या तरी हलगर्जीपणानें तो फुटला, व त्यांतील गुण नाहींसा झाला.

गांवांत एक गरीबाची म्हातारी होती. तिच्या मनांत काशीयात्रेला जाण्याची इच्छा होती. पण दारिद्र्य म्हणत होतें ' मी. ' तेव्हां जाणार कशी? तेव्हां तिनें रोज गुंडांच्या श्रीगणेशाची प्रार्थना करावी कीं, ' देवा जानकीबाई पटवर्धनाच्या मनांत, मला काशीयात्रेपुरतें द्रव्य देण्याची प्रेरणा कर. ' असा तिचा क्रम एक वर्षभर चालला. शेवटीं एक दिवस दर्शनाचे वेळीं मोठा वैताग येऊन तिनें हातांतला गडवा श्रींचे मस्तकांत घातला ! इकडे जानकीबाई ध्यानांत पाहतात तों, कपाळास प्रहारामुळें इजा झालेली ! तेव्हां त्यांनीं कळवळून ' हें काय ? ' म्हणून विचारलें. एकंदर प्रकार समजल्यावर तर त्यांना फारच वाईट वाटलें व त्यांनीं ताबडतोब त्या बाईस बोलावून रुपये तिच्या पदरांत घातले, व म्हटलें " सटवे, हें काय केलेंस ? तुला पैसे पाहिजे

होते, तर मला कां नाहीं मागितलेस ? " ती बाईही पण पुरीच होती. तिनें उत्तर केलें ' बरें झालें, असेंच पाहिजे ! त्याखेरीज कां तो ऐकतो ? '

श्रींचे येथें मागील दारीं वृंदावनाखालीं, एक वीतभर उंचीची श्रीगजाननाची पाषाणमूर्ती आहे. तिची हकीगत मोठी विलक्षण आहे. त्यांचे वडील भाऊसाहेब हे एक दिवस नित्याप्रमाणें मेण्यांत बसून वेलस्ली पुलावरून कचेरींत जात असतां त्यांचें लक्ष सहज दूर नदीच्या पात्रांत गेलें. इतक्या दूरची बारीक गोष्ट त्यांना दिसली कशी याचेंच आश्चर्य वाटतें. सरासरी अर्धा फर्लांगावर एकदोन छोटे दगड खालीं असून वर एकदोन मोठे दगड होते, आणि त्यांच्या बेचक्यांत एक दगड दिसत होता. ती कोणातरी देवाची मूर्ति असें त्यांस वाटून, त्यांनीं लगेच मेणा थांबविला, व माणसें खालीं पाठवून ती वर आणविली. तों ती खरोखरच श्रीगजाननाची मूर्ति ! तेव्हां त्यांनीं मेण्यांत घालून ती मूर्ति तशीच घरीं पाठविली व आपण पायींच पुढें गेले. इकडे ती मूर्ति घरीं जों पोहोंचते आहे, तों दारांत जानकीबाई उभ्याच. त्यांनीं मोठ्या आनंदानें त्यांना खालीं उतरविलें व म्हटलें कीं, ' आलांत आपण ? बसा, फार लांबून आलांत. थकला असाल ! ' भाऊसाहेब मूर्ति काढवीत असतांच यांना इकडे दृष्टांत झाला होता कीं, ' मी पूर्वसमुद्राहून ( चीन ) तुझेकडे येतों.' नंतर, अंगुष्ठप्रमाणाचे वर शिलामूर्ति घरांत ठेवूं नये असें शास्त्र असल्यामुळें, वृंदावन बांधून ती मूर्ति अंगणांत ठेवली.

अशा अधिकारी जननीपासून जी ठेव श्रीअण्णासाहेबांस मिळाली, ती खरोखरच अमोल असली पाहिजे. अगदींच लहानपणीं त्यांना देवदर्शनें होत असत, व बागेंतील झाडांकडे बोट दाखवून " या ठिकाणीं इंद्र आहे ", ' या ठिकाणीं सूर्य, ' असें ते म्हणत असत. काय असेल तें असो, पण बागेंतील दोनचार झाडांवर चुळकाभर पाणी टाकून त्यांना नमस्कार करणें, हा त्यांचा अखेरपर्यंत नित्यनेम होता. बेल, अश्वत्थ, उंबर वगैरेंना नमस्कार करतात, पण निंबास नमस्कार कोणीच करीत नाहीं; काय कारण असेल, त्यांचें त्यांनाच ठाऊक ! जरा कांहीं झालें कीं गुडघ्यापर्यंत पाय धुणें किंवा आंघोळ करणें, वगैरे कर्मचळेपणा तर तेव्हांपासूनच होता; असो.

असल्या यजमानिणीची कुळंबीणही तशीच विलक्षण. मुक्तेचें म्हातारपणापर्यंत सर्व आयुष्य यांचे घरींच गेलें. जानकीबाईवर तिचें अलोट प्रेम असे. श्री.

अण्णासाहेबांस जन्म मात्र त्यांनीं दिला, परंतु त्यांचा दाईपणा सर्व मुक्तेनेंच केला. बाळपणीं जर झोंपेंतून जाग आली, तर ‘ मुक्ता ’ म्हणून अण्णासाहेबांची हांक-यावयाची ! व तिनें येऊन ‘ काय ? आहे बरें मीं जवळ,’ असें म्हणून अंगा-वरून हात फिरविला, कीं बरें वाटून पुन्हा झोंप लागावयाची. ज्यावेळीं जानकीबाईंनीं आपला अंतकाळ जवळ आल्याचें सांगितलें, त्यावेळेस मुक्तेस फारच वाईट वाटलें. आपली धनीण चालल्यावर आपणच मागें राहून उप-योग काय, असा विचार करून तिनें रात्रींच्या रात्रींच गच्चीवरून उडी टाकून जीव दिला ! दुसरे दिवशीं जानकीबाईंनींही प्रयाण केलें !

---

# पुण्यांतील शिक्षण.

ज्ञात्वा समस्तयवनागमतत्वमादौ
दृष्ट्वा तदीय कुटिलात्रपराजनीतिम् ।
स्वीयानसारामिति दर्शयितुं तदेव
योऽभूत् स्वयं विगतनायक आत्मदेवः ॥

मागील त्रोटक विवेचनावरून सहजच लक्षांत येतें कीं, अण्णासाहेबांचें बाळपण व कौमार्य यांचा इतिहास अतीशय मनोरम असला पाहिजे; परंतु माहितीच्या अभावीं, तो समजण्याची आपली इच्छा दाबून टाकणें भाग आहे. प्रसंगाशिवाय मुद्दाम आपण होऊन एकादी गोष्ट सांगणें अण्णासाहेबांस शक्य नव्हतें, व त्या वेळची माहिती असणारीं माणसें व त्यांचे समवयस्क स्नेहीमंडळ यांपैकीं आज कोणीही हयात नसल्यामुळें, हा सर्व भाग गाळून टाकून, पुढें जाणें भाग आहे; आणि पुढेंदेखील क्रमशः अथवा संगतवार माहिती सांगतां येईल असें नाहीं. तरी पण होतां होईल तों व्यवस्थितपणें सांगण्याचा प्रयत्न मी करणार आहें.

अण्णासाहेबांच्या हायस्कूलमधील कारकीर्दीसंबंधानें विशेष माहिती नाहीं. वस्तुतः हा काळच त्यांच्या आयुष्यांत एका तऱ्हेनें फार महत्त्वाचा असला पाहिजे. त्या वेळची पुण्याची परिस्थिति, पारतंत्र्यांत बुडून गेलेल्या लोकांचा अधःपातास जाण्याविषयींचा अट्टाहास, दोन संस्कृतींचा नुकताच सुरू झालेला झगडा, व त्यामुळें उत्पन्न झालेले समाजांतील भिन्न भिन्न वर्ग, त्यांचीं नानाप्रकारचीं मतें वगैरे सर्व गोष्टींचे यथायोग्य परिणाम अंतःकरणावर होऊनच त्यांची मनोरचना बनली असेल. या काळाचें सामान्य चित्र रा. नरसोपंत केळकर यांनीं लिहिलेल्या टिळकचरित्राच्या पहिल्या खंडांत पहावयास मिळतें. त्याची पुनरुक्ति न करितां एवढेंच म्हणतां येईल कीं, सामान्यतः असा जो एक समज आहे कीं, अण्णासाहेब हे एककल्ली विक्षिप्त पुरुष होऊन गेले, तो अतीशय चुकीचा असून, सर्व तऱ्हेच्या नव्याजुन्याच्या झगड्यांतून स्वतः बाहेर पडल्यानंतर, प्रत्यक्ष अनुभवानें त्यांचीं मतें बनलीं होतीं. या अंतःकरणाच्या वाढीस कोणापासून कशी कशी मदत झाली, आणि कोणच्या कोणच्या प्रसंगांनीं

कसले संस्कार त्यांनीं मिळविले, अथवा त्यांचे पूर्वसंस्कार पालटले, हें समजणें अशक्यच आहे. परंतु एवढें मात्र म्हणतां येईल कीं राष्ट्रीय दृष्ट्या जे अनेक प्रकारचे अनुभव घेतल्यावर, आजच्या स्थितीस हिंदुस्तान आलें आहे, ते सर्व अनुभव आणि प्रयोग यांची पूर्वकल्पना करून आणि थोडक्यांत थोडक्यांत त्यांचा अनुभव घेऊनच त्यांनीं आपले याविषयींचे सिद्धांत ठरविले होते. अण्णासाहेब मॅट्रिकची परीक्षा १८६४ मध्यें पास झाले. यापूर्वीच त्यांचा संबंध पुण्यांतील एक घरंदाज सरदार रा. तात्यासाहेब रायरीकर यांच्याशीं पडला होता.

श्री. तात्यासाहेब रायरीकर हे त्यांचे आद्य गुरु असावे असें वाटतें. श्रीमंत दादासाहेबांस भर देऊन ज्या कांहीं महापुरुषांनीं इंग्रजांचें पाऊल आपल्या घरांत घेतलें, त्यांत तात्यासाहेबांचे पूर्वज इतिहासप्रसिद्ध चिंतो विठ्ठल हे होते. ही गोष्ट तात्यांच्या मनास अत्यंत लागून राहिली होती. आपल्या पूर्वजांनीं स्वदेशाचा सत्यानास होण्यास मदत केली, याची त्यांस अत्यंत लाज वाटत असे; आणि स्वतः शक्य तेवढा प्रयत्न करून ही काळोखी धुवून काढावी म्हणून ते अहर्निश तळमळत असत. असें सांगतात कीं, पुण्यांतील त्या वेळचे अधिकारी सिद्ध पुरुष नरहरस्वामी यांच्या कृपेनें तात्यासाहेबांनीं तपश्चर्येस प्रारंभ केला. त्या तपश्चर्येचा हेतु इष्टदेवतेपासून अस्त्रविद्या संपादन करण्याचा होता. अस्त्रें संपादन केल्यावर उत्तर हिंदुस्तानांत जावें, व तेथील लोकांच्या मदतीनें इंग्रजांशीं दोन हात करावे, अशी महत्त्वाकांक्षा या धीरोदात्त पुरुषानें बाळगिली होती. अनुष्ठानाच्या समाप्तीनंतर त्यांस दर्शन होऊन प्रासादिक शस्त्र मिळालें, परंतु त्याच्या उपयोगाची वेळ टळून गेली, असें त्यांच्या उपास्य देवतेनेंच सांगितलें. त्यावरून निराश न होतां तात्यासाहेब हे उत्तरेस जावयास निघाले. पुणें सोडल्यावर त्यांस लागलीच बातमी समजली कीं उत्तर हिंदुस्तानांतील बंडाचा मोड झाला असून पुढें जाण्यांत कांहींही अर्थ नाहीं. तरीपण ते नेटानें तसेच पुढें जात असतां, इंग्रजांनीं त्यांस पंढरपूर येथें पकडून पुन्हा परत आणलें. तात्यासाहेबांचा इतिहास पुढें थोडासा स्वतंत्रच द्यावयाचा असल्यामुळें हा विषय सोडून आपण मुद्याकडे वळूं. हा इतिहास द्यावयाचें कारण देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरतां दैवी उपायावर विश्वास असणारे आणि दैवी प्रयत्नांची

कमाल करणारे लोक त्यावेळीं होते, हें लक्षांत यावें. अण्णासाहेबांच्या सांगण्याप्रमाणें त्यांचा स्वभाव पहिल्यापासूनच देवधर्म आणि शास्त्र यांच्याविषयीं निवळ पूज्यबुद्धी नव्हे, तर अढळ श्रद्धा असलेला असा होता. तरी पण दैवी उपायांच्या जोडीस सर्व प्रकारचे मानवी प्रयत्न झालेच पाहिजेत, असें वाटत असल्यामुळें त्यांनीं आपल्या आयुष्याची दिशा, सर्व प्रकारचे अनुभव प्रत्यक्ष घेऊन ठरवावी, असा निश्चय केला. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अतिशय तेजस्विता, स्वदेश आणि स्वधर्म यांच्याबद्दल प्रखर जळजळीत स्वाभिमान या गुणांस श्री. तात्यासाहेबांसारख्या बाणेदार तपोमूर्तीची जोड मिळाल्यामुळें, राजकारणाचा जो अभ्यास सहज घडला, इंग्रजी राजनीतीचें जें सहज परीक्षण झालें, आणि एकंदरींत राजनीतिशास्त्राचीं जीं तत्त्वें त्यांच्या अंतःकरणांत बिंबलीं, त्यामुळें एक प्रकारें तयार होऊनच ते कॉलेजांत शिरले. अशा प्रकारच्या पूर्व तयारीमुळें नवीन विचारांच्या अथवा नवीन संस्कृतीच्या झगझगाटानें दिपून न जातां स्वतःजवळील संस्काराच्या तागडींत त्यांना तोलण्याइतकी क्षमता त्यांच्या बुद्धींत राहिली. त्यामुळेंच आज पन्नास पाऊणशें वर्षांच्या प्रयोगानंतर इंग्रेजी शिक्षण, इंग्रेजी नीति, पाश्चात्य संस्कृति, यांच्या फोलपणाची जी आज खात्री पटली आहे, ती त्या वेळींच त्यांस पटली होती. परंतु ती तशी स्वतःस पटली तरी, इतरांस सप्रयोग पटवून देतां येईल, तरच तिचा उपयोग होईल, हें त्यांनीं ओळखिलें होतें. केवळ स्वाभिमानानें आपलें तेंच उत्तम, असें म्हणणारा वर्ग देशांत केव्हांही असतोच; आणि त्याची योग्यताही कांहीं कमी नसते. अशाच लोकांपैकीं अण्णासाहेब हे जास्त योग्यतेचे पुरुष होते, अशी सामान्यतः समजूत आहे. परंतु त्यांनीं आपल्या आयुष्यांत ज्या अनेक प्रकारच्या चळवळी केल्या, त्यांच्या विविधतेकडे आणि व्यापकतेकडे पाहतां असें म्हणावें लागतें कीं, अंतःप्रेरणेनें तर त्यांनीं हें ओळखलें होतेंच, परंतु तें अनुभवासह स्वजनांच्या गळीं उतरून घ्यावें, हाच त्यांचा त्या वेळचा आयुष्यांतील हेतु होता; आणि म्हणूनच त्यावेळीं देखील फोल वाटणारें इंग्रेजी शिक्षण घ्यावयास ते कॉलेजांत गेले. कॉलेजांत जाऊन मिळवितां येण्याजोग्या सर्व पदव्या मिळवाव्या, व विलायतेस जाऊन I. C. S; I M. S वगैरेसारख्या पदव्या मिळवून मग ही संस्कृति किती कुचकामाची आहे, असें अधिकारवाणीनें लोकांस सांगावें, ही त्या वेळची आपली महत्त्वाकांक्षा अस-

त्याचें ते प्रसंगोपात्त बोलून दाखवीत. अशा प्रकारचें विद्यार्जन करीत असतां ज्या ज्या कांहीं प्रयत्नांचें साहाय्य देशाच्या उद्धारास होईल, ते ते सर्व जातीनिशी सुरू करावे असा त्यांचा इरादा होता. आणि हीच त्यांच्या सर्वांगीणतेची साक्ष आहे. " अमुक एक गोष्ट उपयोगी पडेल म्हणतात ना, मग ती सुरू करा, तेथें पसंतीनापसंतीचा प्रश्न नाहीं, " असा त्यांचा धारा होता. म्हणून एकाद्या सामान्य व्रतापासून अगर देवतेला नवस करण्यापासून तों वासुदेव बळवंतांच्या खटपटींस मान देण्यापर्यंत, आणि विधवांच्या पुनर्विवाहापासून तों पतित–परावर्तनापर्यंत, किंवा सभा, संस्था, वृत्तपत्रें, व्याख्यानें, प्रदर्शनें, कारखाने आणि परराष्ट्रगमनच तर काय परराष्ट्रीय चळवळीपर्यंतच्या सर्व व्यापांची कल्पना आधींच उभारून, यथाक्रम त्यांनीं त्या सर्वांसच हात घातला. असें करावयास कोणाही मनुष्यास, जीं चार चतुर्बळें ( शरीर, द्रव्य, बुद्धि, मनुष्य. ) लागतात, त्यांचीही अण्णासाहेबांजवळ कोणत्याही तऱ्हेची कमतरता नव्हती. भाऊसाहेबांच्या श्रीमंतीमुळें द्रव्यबळाची त्यांस कमतरता नव्हती; शरीरबळही त्यांनीं उत्तमच कमाविलें होतें, त्यांचा पिंड मुळचाच सुदृढ आणि भव्य होता. त्यांच्या हूड स्वभावाला अनुरूप असे सर्व तऱ्हेचे खेळ व व्यायाम यांच्या योगानें त्यांनीं तो अधिकच बळवान् केला होता. या काळांतील आपल्या हूडपणाच्या कित्येक गोष्टी ते सांगत असत. त्यांतील एकदोन सांगण्याजोगत्या आहेत.

वापूसाहेब मेहेंदळे हे त्यावेळचे प्रसिद्ध वैद्य होते. कांहीं कारणावरून त्यांची चेष्टा करावी असें वाटून अण्णासाहेब त्यांचेकडे गेले, व आपली प्रकृति नीट नाहीं असें सांगून औषध मागूं लागले. त्यावर बापूसाहेबांनीं विचारलें " तुला काय होत आहे ? " तेव्हां ते म्हणाले कीं, जठराग्नी प्रदीप्त होऊन भूक वाढावी असें कांहीं औषध द्या. बापूंनीं आहाराची चौकशी केली असतां ' आपण फक्त चौदा पोळ्या व अदपाव तूप खातों,' म्हणून त्यांनीं सांगितलें ! तेव्हां हा चेष्टा करतो असें वाटून आपल्या जवळील एक अतीशय जलाल भस्म देऊन बापूंनीं तें जपून, थोड्या प्रमाणांत सात दिवस घेण्यास सांगितलें. घरीं गेल्यावर अण्णासाहेबांनीं विचार केला कीं सात दिवस गुंज गुंज कोण घेत बसतो ? असा विचार करून एकदमच त्यांनीं तें सर्व गट्ट करून टाकलें, व सात दिवसांनंतर बापूंच्याकडे जाऊन 'भूक वाढली नाहीं,' म्हणून तक्रार करूं लागले ! त्यावर

बापूंनीं 'तूं प्रमाण तरी किती घेतलेंस,' म्हणून चौकशी केली. खरा प्रकार कळून आल्यावर बापूंना इतका विस्मय वाटला कीं, 'तुझ्यापाशीं आपल्या वैद्यकीचा कांहीं उपयोग नाहीं,' म्हणून त्यांनीं यांची पाठ थोपटली. कारण तें भस्म अत्यंत जलाल असून चांगल्या सशक्त माणसास देखील थोड्या प्रमाणांतच कांहीं अनुपानाबरोबर पचण्याजोगें होतें. त्या भस्माचा एकदमच स्वाहा करून तें सबंध जिरवून टाकणाऱ्या माणसाबद्दल 'हा आहे तरी कोण ?' असें वाटून बापूंनीं स्तंभित होणें साहजिक होतें. आपल्या अंगांत एका घोड्याचें बळ असल्याबद्दल ते नेहमीं सांगत असत. जाडा दोरखंड हिसक्यासरशीं तट्कन् तोडणें, पाण्यानें भरलेल्या घागरी दोन्ही हातांत दोन आणि दातांत एक अशा धरून डेक्कन कॉलेजपासून घरीं येणें, वानवडीपासून स्वाराच्या गेटापर्यंत पैज लावून, लष्करी सोजिरांबरोबर धांवण्याच्या शर्यती जिंकणें, वगैरे त्यांचे त्यावेळचे अनेक करमणुकीचे प्रकार असत. पुण्यांत डेक्कन जिमखान्याची २७ मैलांची शर्यत झाली, त्या वेळेला ते स्वतः मला म्हणाले कीं, "लहानपणीं ही शर्यत मी थोड्याशा अभ्यासानें सहज जिंकली असती !"

शाळेंतील हूडपणाची एक गोष्ट सांगूं. एका इंग्रजी शिक्षकास टोपी उपडी करून ठेवण्याची संवय असे. एक दिवस यांनीं, अतीशय वस्त्रगाळ राख घेऊन, त्या टोपींत बेमालूमपणानें भरून ठेवली. बोलण्याच्या भरांत, साहेब मजकुरांनीं टोपी जेव्हां चटकन् डोक्यावर ठेवली, त्यावेळीं वर्गांत काय हंशा पिकला असेल याची कल्पना करावी !

यांच्या बुद्धीबळाविषयीं तर कोठेंच वाद नाहीं. एकपाठी स्मरणशक्ति, लहानपणीं वाचलेलें देखील ७० व्या वर्षी जसेंचें तसें म्हणून दाखविण्याजोगी अद्भुत धारणाशक्ति, कुशाग्रतेनें कोणत्याही विषयांत शिरून मुद्दा हातीं घेणारी मर्मग्राही बुद्धि, उन्मेषशाली कल्पकता, कोटीबाजपणा, आणि न्यायपांडित्यास आवश्यक असणारा समतोलपणा, या सर्व अंगांनीं तेथें बुद्धी विलास करीत होती. शाळेंत असतांना अमुक एक अभ्यास म्हणजे यांनीं कधीं पद्धतशीर केला आहे, असें कधीं झालेंच नाहीं. नित्य पाठ करावयाचे विषय शाळेंत जातांना रस्त्यावरच बहुतकरून होत असत ! त्यांच्या लहानपणीं एकदां सर्व मुंबई इलाख्यांतील शाळांतील मुलांची स्मरणशक्तीबद्दल परीक्षा घेतली होती, तींत अण्णासाहेब व त्यांचे स्नेही भाजेकर म्हणून कोणी होते ते, असे दोघे सर्वांत वर आले !

अण्णासाहेबांचें उच्च शिक्षण डेक्कन कॉलेजांत झालें, व स. १८६८ त बी. ए. ची परीक्षा पास होऊन पुढील शिक्षणाकरितां व आपल्या सर्व आकांक्षांना प्रत्यक्ष स्वरूप देण्याकरितां ते मुंबईस गेले. डेक्कन कॉलेजमध्यें असतांना यांचा प्रसिद्ध केरूनाना छत्रे यांच्याबरोबर शिष्य या नात्यानें संबंध जडला, आणि तो पुढें तसाच कायम होता. नानांचा त्यांचेवर अत्यंत लोभ असे. त्यांचें वर्णन अण्णासाहेब फार प्रेमानें करीत असत. त्या वेळच्या डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या व प्रोफेसरसाहेबांच्या हकीगती देखील अशाच प्रेमानें ते सांगत असत. वर्ड्स्वर्थ वगैरेचें सौजन्य व योग्यता सांगतांना त्यांना पोटांतून संतोष होत असे, पण त्यामुळें त्यांच्या स्वाभिमानासही कधीं धक्का बसला नाहीं. कीलहॉर्नसाहेब संस्कृतचे प्रोफेसर म्हणून नुकतेच आले होते. एकदां कांहीं एका शब्दावरून प्रश्न निघून तो Obsolete म्हणजे अप्रयोजक असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यावरून तेथल्या तेथेंच उठून अण्णासाहेबांनीं सांगितलें कीं, 'आपण चुकत आहां, There is no such thing as obsolete in Sanskrit,' यामुळें चिडून जाऊन कीलहॉर्नसाहेबांनीं मोठाच वाद घातला, व 'आम्ही पद्धतशीर इंग्रजी शिकलेले असल्यामुळें इंग्रजी व संस्कृत या दोन्हीही भाषांत तुम्हीं आमच्या मानानें अजाण आहां,' असें कीलहॉर्नसाहेबांस स्पष्ट सांगण्यापर्यंत वेळ आली. याच वेळीं वर्ड्स्वर्थसाहेब खोलीवरून चालूलेले होते, तेही गडबड ऐकून आंत आले व त्यांनीं आपल्या अधिकाराचा उपयोग करून अण्णासाहेबांस गप्प बसविलें व कीलहॉर्न यांस क्लास संपवून भेटण्यास सांगितलें. मागाहून त्यांनीं अण्णासाहेबांची समजूत घातली कीं तुझें म्हणणें बरोबर आहे, परंतु कांहीं झालें तरी कीलहॉर्न प्रोफेसर आहेत, त्यांचा मान ठेवला पाहिजे; व कीलहॉर्न यांस स्पष्ट सांगितलें कीं 'हीं मुलें म्हणजे केवळ बृहस्पति होत, यांच्याशीं वाद घेत जाऊं नकोस.'

डेक्कनमध्यें असतांना प्रसिद्ध आबाजी विष्णु काथवटे हे यांचे सहाध्यायी होते. उभयतां एकाच खोलींत राहत असत, व हूडपणाच्या सर्व प्रकारांत सामील होत असत. एकदां नानांनीं स्वतःच्या उपयोगाकरितां म्हणून ३५–४० लाडवांचा एक डबा आणून कोठें तरी भिंतीवर ठेवला होता. त्यावर नजर जाऊन अण्णासाहेबांनीं तो खालीं काढला, व आंतील माल फस्त करून आंत धोंडे भरून ठेवले ! नानांना ही चोरी उघडकीस आल्यावर त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांस

एकत्र केलें, आणि पाणी ओढावयाचा जाड दोरखंड देऊन ‘ हा झटक्यासरशी कोण तोडतो?’ म्हणून विचारलें. इतर कांहीं विद्यार्थ्यांनीं झटापटी केल्यावर अण्णासाहेबांनीं एकाच झटक्यासरशीं त्याचे दोन तुकडे करून पुढें ठेवले! त्याबरोबर अतिशय प्रेमानें व कौतुकानें ‘ डब्यांतील लाडू तूंच उडविलेस कीं नाहीं, सांग, ’ म्हणून नानांनीं यांचा हात धरला! अशा तऱ्हेच्या गमती त्यावेळीं अनेक चालत.

या वेळेपासूनच पुढें I. C. S. ला उपयोगी पडाव्या म्हणून वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास यांनीं सुरू केला होता. I. C. S. करितां सरकारनें ठेवलेली स्कॉलर्शिप वाटून घेऊन इंग्लंडला जावयाचें, म्हणून हे व याचे एक मुसलमान स्नेही यांचा करार ठरला होता. ह्या मुसलमान स्नेह्यावर यांचें, व त्याचें व त्याच्या कुटुंबाचें यांचेवर, फार प्रेम असे. त्याच्या दिलदारपणाची व त्याच्या आईच्या सौजन्याची आणि खानदानीची आठवण अण्णासाहेब अखेरपर्यंत काढीत असत. अरबी भाषा, मुसलमानी शास्त्र व कुराण आणि मुसलमानी रीतिरिवाज यांची माहिती अण्णासाहेबांनीं या मुसलमानी गृहस्थापासूनच मिळविली असावी, असें दिसतें. ती स्कॉलर्शिप पुढें एका ख्रिश्चन मनुष्यास मिळाली, आणि तेवढ्यापुरता तरी यांचा विचार रहित करावा लागला. तरीही स्वतःच्या खर्चानेंच इंग्लंडला जावें, असें पुढें कित्येक वर्षे यांच्या डोक्यांत घोळत होतें.

कॉलेजमध्यें असतांनाच कायद्याचा थोडाबहुत अभ्यास करण्यास व लिहिण्यास यांनी सुरुवात केली होती. वाईचे शेख मिरा यांच्या प्रकरणांतील खटल्यास तेव्हांपासूनच सुरुवात झाली होती, व त्यासंबंधीं कांहीं काम १८६८ त आपण लिहिलें होतें, म्हणून त्यांनीं मला एकदां सांगितलें होतें. कांहीं दिवस अष्टावधानीपणाचा अभ्यास आपण त्यावेळीं केला असल्याचें ते सांगत असत. इंग्रजी काव्याविषयीं यांना बरीच गोडी असावी, असें त्यांनीं मजजवळ वेळोवेळीं काढलेल्या उद्गारावरून वाटतें. त्यांतल्या त्यांत शेक्सपिअरच्या नाटकाची प्रशंसा ते बरीच करीत असत. वर्ड्स्वर्थ तर प्रत्यक्ष त्या कवीच्या नातवाजवळच ते शिकले होते. एकंदरींत त्या वेळचे इंग्रजी प्रोफेसर व शिक्षक व शाळाखात्यांतील इतर अधिकारी यांच्याविषयीं अण्णासाहेबांच्या मनांत मोठा आदर असे. त्यांच्या मायाळूपणाची व विद्यादानाच्या कळकळीची आणि व्यासंगाची ते प्रांजळपणानें स्तुति करीत असत. केरूनानांचे ज्योतिःशास्त्राचे गुरु प्रो. आर्लिबार

म्हणून कोणी फ्रेंच होते, त्याची तर अशी गोष्ट सांगत कीं रोज सकाळीं नाना व इतर दहाबारा विद्यार्थी उठून स्नान करून सूर्योदयास संध्या वगैरे केल्याखेरीज त्यांस शिकवावयाचें नाहीं असा त्याचा नेम असे, व तेवढ्याकरितां या गोष्टी त्यांनीं केल्या आहेत कीं नाहीं, हें तो जातीनिशीं स्वत पहात असे! ते लोक खरे विद्याव्यासंगी होते, व विद्यार्जनाची व दानाची त्यांना इतकी खरी कळकळ होती कीं, राष्ट्रीय अथवा धार्मिक भेद देखील त्यांच्या उत्कंठेस शिवत नसत, व त्यामुळेंच ते इतके निष्कपट आणि निःपक्षपाती बनले होते. डॉ. हौ यांच्या विद्वत्तेची तर ते फारच तारीफ करीत. कांहीं तरी असल्या विचारांत डोकें गढून गेल्यामुळें त्याची स्थिति एकाद्या भ्रमिष्ट माणसाप्रमाणें बनली होती. मेण्यांत बसून थोडा वेळ झाला कीं, लगेच आपण कोठें जात आहों ही गोष्ट तो विसरून जाई, व वारंवार त्याला हालवून लोकांना 'आतां उतरा,' असें त्याला सांगावें लागत असे!

या वेळची अण्णासाहेबांची राहणी मोठी श्रीमंती थाटाची व झोंकदार असे. सर्व प्रकारचा हौशीपणा पुरवून घ्यावयाचा, परंतु गुलाम तर कशाचेंच होऊन राहावयाचें नाहीं, असा त्यांचा तेव्हांपासूनच बाणा होता. "धर्मास व नीतीस विरुद्ध असलेल्या गोष्टी सोडून बाकी सर्व तऱ्हेच्या हौशी व व्यसनें मी पराकाष्ठेचीं केलीं," असें ते सांगत. भव्य मूर्ति, बांधेसूद अवयव, गौर वर्ण, तेजस्विता, रुबाबदारपणा, यांच्या जोडीस मोतिया रंगाचें उंची पागोटें, छडीदार अंगरखा, पायांत लालभडक जोडा आणि तोंडांत लालभडक विडा, यांची भर पडून कानांतील डुलणारी भिकबाळी आणि हातांतील मोतियांचे गजरे यांच्या झोकांत, पेलेदार छाती पुढें काढून तालीमबाजी ऐटीनें या मनोहर मूर्तीस चालतांना पाहून सर्वच विस्मित होत असत, यांत नवल तें काय? त्यांच्या त्या मोतियांच्या गजऱ्यांची आठवण काढणारे लोक अजूनही तुरळक कोठें कोठें आहेत. अशा रीतीनें व्यक्तीविषयक व राष्ट्रीय सर्व सिद्धांताचा सांठा कमावून, त्याचा उपयोग स्वजनांस देतां यावा म्हणून १८६८ सालीं ते मुंबईस आले; व त्यांच्या आयुष्याचीं यापुढील १२ वर्षे सर्व तऱ्हेचे उपद्व्याप करण्यांत आणि स्वार्थत्यागाचे अनेक धडे शिकण्यांत गेलीं.

# मुंबईंतील बारा वर्षें.

**नरोऽपि परतंत्रो यः तस्य कीदृङ्मनुष्यता ।**

—श्रीमार्कंडेयपुराण.

अण्णासाहेब मुंबईस आले, त्या वेळीं आपणास वैद्यकीचा अभ्यास करावा लागेल, अशी त्यांच्या डोक्यांत कल्पना देखील नव्हती. L. L. B. चा अभ्यास करावा, व डोक्यांत असलेल्या अनेक कल्पनांना मूर्त स्वरूप द्यावें, अशा दुहेरी इच्छेनें ते मुंबईस आले. त्याच वेळीं त्यांच्या मतांची दिशा, अगदीं ठाम ठरून गेली होती, असें अर्थातच म्हणतां येणार नाहीं. परंतु जरी ती तितकी पक्की ठाम ठरली नसली, अथवा महादेव गोविंद, विष्णुशास्त्री पंडीत, अशांच्या सहवासानें, आणि चळवळींतील अनेक अनुभवांनीं तिच्यावर पुढें संस्कार झाले असले, तरी कोणच्या दिशेनें काम करावयाचें, या विषयीं त्यांचा निर्धार झालेला होता.

देशांत त्या वेळेला देशोद्धाराचा प्रश्न आपापल्या मतानें सोडविणारीं चार प्रकारचीं मंडळी होतीं. कांहीं लोक श्री. तात्यासाहेब रायरीकर यांच्यासारखे तपस्येच्या मार्गानें आपलें उद्दिष्ट साधेल, अशी श्रद्धा असणारे होते. दुसऱ्या एका प्रकारचे लोक, जर व्यवस्थित रीतीनें प्रयत्न केला तर, इंग्रज सरकारशीं लढाई खेळून देखील, स्वातंत्र्य परत मिळवितां येईल,अशी हिंमत बाळगून होते. सात आठ वर्षांनंतर प्रसिद्धीला आलेले वासुदेव बळवंत फडके हे ह्या वर्गाचें उदाहरण होत. या दोनही वर्गांचा इंग्रजी शिक्षण व इंग्रजी संस्कृती यांच्याशीं संबंध मुळींच नव्हता, अगर अगदींच बेताचा होता. गेलेलें स्वातंत्र्य परत तर मिळवावें, परंतु तसें होण्यास इंग्रजांच्या संस्कृतीइतकी आपली भौतिक संस्कृती वाढल्याखेरीज गत्यंतर नाहीं, म्हणून ती वाढविण्याचा प्रयत्न करणें हाच उद्धाराचा मार्ग आहे, असें म्हणणाराही एक वर्ग होता.या लोकांस आपली संस्कृती राजकर्त्यांच्या संस्कृतीहून, एक तर सर्वतोपरी कमदर्जाची, अथवा पूर्वी जरी चांगली असली, तरी हल्लींच्या काळीं निरुपयोगी अशी वाटत होती. या लोकांनीं समाजसुधारणा, धार्मिकसुधारणा, वाङ्मयप्रसार वगैरे दिशांनीं प्रयत्न चालू केले

होते. या शिवाय चौथा एक वर्ग होता. या लोकांस आपली संस्कृति हीन वाटत नसे, अथवा यांचा स्वाभिमानही जबर होता. परंतु इंग्रजांसारखीं भौतिक साधनें व संपत्ति हीं स्वतःच्या प्रयत्नांवर करतां येतील, व स्वतःच्या वज्रदेहानें इंद्रजिताचें ब्रह्मास्त्र मारुतीनें ज्याप्रमाणें लटकें पाडलें, तसें आपल्या सुसंघटितपणानें व स्वार्थत्यागानें, इंग्रजांचा दाब लटका पाडण्याची उमेद त्यांस होती. म्हणून त्यांनीं सर्व प्रकारच्या आर्थिक चळवळी, स्वदेशी, बहिष्कार, व नाना प्रकारचे उद्योग यांजवर भर दिला होता. वासुदेवराव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे या वर्गाचे द्योतक होत. अशा या निरनिराळ्या तऱ्हेनें प्रयत्न करणाऱ्या लोकांत त्या वेळेस एक सुशिक्षित गृहस्थ असा निघाला कीं, या सर्वच तऱ्हेनें प्रयत्न झाले पाहिजेत, असें त्यास वाटत होतें; आणि या सर्व तऱ्हेच्या प्रयत्नांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीतीनें उचलून धरण्याइतकी विशाल बुद्धी त्याचे ठिकाणीं होती; म्हणून या सर्व तऱ्हेच्या प्रयत्नांना थोडीबहुत सुरुवात करून, अथवा कोणी केलेल्या प्रयत्नांना सहाय्य करून महादेव गोविंदांनी राष्ट्रजनकत्वाचा मान संपादितां आला. परंतु यांच्या प्रयत्नांत आणि व्यासंगांत दोन मोठीं व्यंगें होतीं. एकतर यांचें सर्व शिक्षण परकीय वातावरणांत झाल्यानें, आणि हें शिक्षण घेतांना आपल्या संस्कृतीविषयींचे निश्चित संस्कार कोणतेच नसल्यामुळें, आमचें राष्ट्रियत्व म्हणजे काय, व तें जर नष्ट झालें असेल तर, पुन्हा कशा रीतींनीं त्याची उभारणी केली पाहिजे, या कल्पनाच त्यांच्या ठिकाणीं सिद्ध नव्हत्या. देश पारतंत्र्यांत पडला आहे, आणि सामाजिक, नैतिक, औद्योगिक, धार्मिक असल्या अनेक बाबींत कांहीं भ्रामकपणानें व कांहीं खऱ्या रीतीनें, तो इंग्रजांच्यापेक्षां मागें आहे, ती स्थिति जाऊन दोघांची समान स्थिति व्हावी, म्हणजे अर्थातच राजकर्त्यांस भेद ठेवतां येणार नाहीं, एवढीच त्यांची कल्पना होती. यापलीकडे देशाच्या स्वातंत्र्याविषयीं कांहीं विशेष आशा त्यांस होती, असें त्यांच्या चरित्रावरून दिसून येत नाहीं. इंग्रजी शिक्षणानें, अजिबात दिपून गेलेल्या वर्गांत व यांच्यांत फरक फारच थोडा होता. इंग्रजांपेक्षां आपण हीन स्थितींत आहों, परंतु प्रयत्न केले असतां इंग्रजांच्या बरोबरीची उन्नति संपादण्याची आपली योग्यता आहे, एवढेंच त्यांस जास्त वाटत असे. इंग्रजी राज्यकर्ते राजनीतिशास्त्रास अनुसरून आमची वाढ होण्याची खरी संधी आम्हांस केव्हांच

देणार नाहींत, तिच्याकरितां आमच्या आम्हींच झटापटी केल्या पाहिजेत, एवढें त्यांस वाटत असे, आणि जरी त्यांनीं निव्वळ स्वातंत्र्याची आकांक्षा धरणाऱ्या कित्येक चळवळीस थोडीफार मदत केल्याच्या आख्यायिका असल्या, तरी तें केवळ त्यांच्या सर्व प्रयत्नांना उत्तेजन देण्याच्या व्यापक धोरणामुळेंच होय. मनुष्याचा स्वभाव व त्याच्या कल्पना या नेहमींच परस्परास धरून असतात असें नाहीं. तरीपण त्याच्या स्वभावाची छाया त्याच्या कल्पनांवर व प्रयत्नांवर पडते. यामुळेंच रानड्यांच्या सर्व प्रयत्नांत आणि कल्पनांत हा एक मोठाच दोष आढळून येतोः—रानड्यांची बुद्धि अतीशय विशाल आणि स्वभावांत सौजन्य तर पुष्कळच होतें. परंतु या अतिसौजन्यामुळेंच अथवा एक प्रकारच्या भित्रेपणामुळें त्यांच्या कोणत्याही चळवळीचा चळवळ करणाऱ्याच्या मनांत नवीन राष्ट्रीय जोम उत्पन्न होईल, असा उपयोग होण्याजोगा नव्हता. उलट, त्या सर्वांची उभारणी एक प्रकारच्या हीनतेच्या जाणिवेवर झाली असल्यामुळें त्यांच्या सर्व चळवळी व संस्था दुसऱ्या कोणीतरी उचलून न धरल्यामुळें निस्तेज झाल्या; व स्वतः त्यांच्या आचरणांत देखील कौटुंबिक गुणांचा उत्कर्ष असल्यामुळें, त्यांचें सर्व चरित्र कितीही मोठें असें वाटलें, तरी त्यांच्या खऱ्या योग्यतेच्या मानानें एक प्रकारें वांया गेलेलें दिसतें. मुंबईस आल्याबरोबरच रानड्यांची व अण्णासाहेबांची जूट झाली, व दोघांनीं मिळून पुढें कित्येक गोष्टी बरोबरच केल्या, म्हणून त्यांच्या स्वभावाचा एवढा प्रपंच करणें भाग पडतें. वयानें रानड्यांपेक्षां अण्णासाहेब चार पांच वर्षांनीं लहान होते, परंतु बुद्धिमत्ता, व्यासंग, कर्तृत्व, धडाडी, देशहिताची कळकळ, उपद्यापीपणा आणि वजन यामुळें लौकरच दोघेही एकाच कार्यांतील जोडीदार झाले. राष्ट्रकार्यांतील उमेदवार म्हणून ज्याप्रमाणें टिळक वगैरे मंडळी रानड्यां-पाशीं आली, असा संबंध त्यांचा व अण्णासाहेबांचा कधींच आलेला नाहीं. दोन कार्यकर्ते एकत्र व्हावे, त्याचप्रमाणें त्यांचा संबंध आला. दोघांनीं मिळून कांहीं कार्य केलें; आणि दोघांचें पटेनासें होतांच, एकमेकांस सोडून ते आपापल्या मार्गास लागले.

रानड्यांच्या प्रमाणेंच, सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नती झाली पाहिजे, असें अण्णासाहेबांस वाटत होतें; परंतु आमच्या राष्ट्रीयत्वाच्या कांहीं कल्पना

त्यांचेजवळ सिद्ध होत्या, व त्याबरोबरच इंग्रजी संस्कृती ही शेणाच्या चित्रा-प्रमाणें कुचकामाची व टाकाऊ आहे, असें त्यांनीं ओळखिलें होतें. यामुळें, त्यांचा मुख्य भर देशांत तेजस्विता उत्पन्न व्हावी, इंग्रेजी शिक्षण व संस्कृती यांतील प्रसंगोचित गोष्टी आपल्या लोकांनीं संपादाव्या, व त्यांविषयीं फाजील भ्रम न बाळगितां एक उन्नतीचें साधन ह्मणून त्यांचा उपयोग करावा, आमचें राष्ट्रीयत्व सुटणार नाहीं, अशा रीतीनें आमच्या सर्व सुधारणा व्हाव्या, व जरी कदाचित् इंग्रज लोक राज्यकर्ते झाले असले, तरी त्यांचीं साधनें मिळाली असतां आह्मीं सर्व तऱ्हेनें त्यांच्याहून श्रेष्ठ होऊं शकतों, हें सिद्ध करून दाखवावें, असें त्यांस वाटत असे. जित राष्ट्राच्या मनावर जी एक प्रकारची विक्लवता उत्पन्न होते, ती काढून टाकली असतां, हिंदुस्थानचा अधिकार हिंदु लोकांनींच केला पाहिजे, हें आमच्या लोकांस जेणेंकरून पटेल, तो तो देशोन्नतीचा मार्ग, असें त्यांस वाटत होतें. त्यामुळें, रानडे प्रभृति मंडळी यांच्यांत, व अण्णासाहेब यांच्यांत मोठा फरक होता; तो हा कीं. सर्व तऱ्हेनें उन्नती झाली असतां राजकीय स्वातंत्र्य मिळेल असें रानडे वगैरेंस वाटत असे, आणि राजकीय स्वातंत्र्य जर मिळेल तर सर्व तऱ्हेची उन्नति सहज घडवून आणतां येईल, अशी अण्णासाहेबांची ठाम समजूत होती. तरीपण दोघांमध्यें एक गोष्ट सारखी होती, तीं ही कीं, आहे ही स्थिति अवनतीची असून कालाला अनुसरून तिची नवी घडी बसविली पाहिजे, असें दोघांसही वाटत होतें. हाच वासुदेव बळवंत वगैरे निव्वळ बंडखोर ठरलेल्या लोकांशीं अण्णासाहेबांचा विरोध होता. अशा तऱ्हेनें एका बाबतींत साम्य असल्या-मुळें महादेव गोविंद रानड्यांशीं त्यांनीं सहकार्य केलें.

मुंबईस आल्यावर अण्णासाहेब व आबाजीपंत हे सुप्रसिद्ध अण्णा मोरेश्वर कुंटे ( हे त्या वेळीं मेडिकल कॉ० मध्यें शिकत होते ) त्यांचेकडे उतरले; आणि त्यांनीं लॉक्लास मध्यें नांव दाखल केलें. ब्राह्मण लोकांपैकीं मेडिकल कॉलेजमध्यें त्यावेळेस अण्णा मोरेश्वरच होते. मेडिकल कॉलेज हें बहुतकरून पारशी लोकांनीं भरलेलें असे, आणि तात्या लोकांच्यानीं हें काम होणें शक्य नाहीं, अशा समजुतीनें अण्णासारख्या एकट्या दुकट्याचा कमालीचा उप-हास होत असे, व त्यांना त्रासही बराच दिला जाई. त्यामुळें विद्यार्थीही सहसा टिकत नसत. अशा स्थितींत कुंट्यांना अशी ईर्ष्या वाटे कीं, चांगल्या चांगल्या

विद्यार्थ्यांनीं मुद्दाम मेडिकल कॉलेजमध्यें यावें, व पारश्यांची ही ऐट जिरवून दाखवावी. एक दिवस सहज मेडिकल कॉलेज दाखविण्यासाठीं म्हणून ते अण्णासाहेब व आबाजीपंत यांस घेऊन गेले, आणि कॉलेज पाहणें झाल्यावर त्यावेळचे प्रिन्सिपाल डॉ० हंटर यांची व या तरुण ग्राज्युएटांची त्यांनीं ओळख करून दिली. साहेब बहादुरांनीं औपचारिक चौकशी केल्यावर, ' हे आतां येथें कोणच्या इराद्यानें आले आहेत ? ' म्हणून अण्णांस विचारलें. तेव्हां ' मेडिकल कॉलेजमध्येंच दाखल होण्याकरितां हे आपल्याकडे आले आहेत, ' म्हणून कुंट्यांनीं चापून ठोकून दिलें! आणि एकदां त्यांनीं असें सांगितल्यावर पाय मागें घेणें हें अण्णासाहेबांस शक्य नव्हतें. तेव्हां त्यांनींही मान हलवून रुकार दिला! अशा रीतीनें ध्यानीं मनींही नसलेलें वैद्यशास्त्र त्यांच्या गळीं पडलें!

कोणतीही गोष्ट एकदां करावयास घेतली म्हणजे ती अपुरी करणें त्यांस माहितच नव्हतें. इंग्रजी वैद्यकाचा अभ्यास सुरू केल्याबरोबरच आर्य वैद्यकाचा अभ्यास करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली, आणि पेशवाईतील पिढीजाद वैद्य लागवणकर यांच्या घराण्यांतील त्यावेळचे प्रसिद्ध महादेवशास्त्री लागवणकर वगैरे दोघांतिघांपाशीं आर्य वैद्यकाचें शिक्षण घेण्यास त्यांनीं सुरुवात केली. शिक्षणाची दुधारी तलवार पडदळास लटकाविल्यावर इतर विषयांकडे लक्ष देण्यास हळूंहळूं सुरुवात झाली. वेगवेगळ्या मतांच्या व वेगवेगळ्या दर्जाच्या सर्व समाजांत यांचा निरनिराळ्या संबंधानें प्रवेश होता. कोठें विद्यार्थी या नात्यानें, कोठें श्रीमंत गृहस्थ म्हणून, कोठें सहकार्यकर्ता, अशा अनेक प्रकारांनीं अनेक चळवळींस त्यांना हात घालतां आला.

मुंबईस आल्यावर मुरारजी गोकुळदास यांचे चाळींत त्यांनीं आपलें ठाणें दिलें, आणि पुढील १२ वर्षे हेंच त्याचें मुख्य स्थान होतें. चाळीचा वरचा मजला सबंधचा सबंध भाड्यानें घेतलेला होता. श्रीअण्णासाहेब हे तेथें मोठ्या श्रीमंती थाटानें राहात असत. स्वयंपाकी, पाणके, नोकरचाकर मोलकरणी वगैरे सर्व सरंजाम उत्तम असून राहणी फार खर्चाची होती. नाना प्रकारचे लोक अखंड यांचे येथें पडलेले असत, आणि पानतंबाखु वगैरेंचा सपाटून चूर होत असे. मुरारजी शेट हे त्यावेळीं J. P. होते. लवकरच त्यांचा अण्णासाहेबांवर फार लोभ जडला, व लौकरच त्यांच्याविषयीं मुरारजींच्या मनांत

मोठा आदर उत्पन्न झाला. सावकार लोकांत आणि व्यापारी मंडळींत अण्णासाहेबांचें जें पुढें वजन बसलें, त्याला मुरारजी शेटजींचीच मदत झाली असावी. सकाळीं व दुपारीं मेडिकल कॉलेजमध्यें जावें, संध्याकाळीं Law Class मध्यें हजर व्हावें, व उरलेल्या वेळांत आणि रात्रीं सर्व तऱ्हेच्या उठाठेवी कराव्या, असा यांचा कार्यक्रम असे. इतक्या थाटानें रहात असले तरी खाणेंपिणें वगैरे सर्व शारीरिक बाबींसंबंधानें तेव्हांपासून हे अतिशय उदास असल्यामुळें इतर लोकांनीं कितीही चैन केली तरी स्वतः यांची अशी स्थिति असे कीं, कित्येक वेळां पद्धतशीर जेवण्यास देखील वेळ सांपडूं नये! थोडासा उपहार करून सकाळींच बाहेर पडावें, तों रात्रीं २—२, ४—४ वाजेपर्यंत कांहीं तरी व्यवसायांत गुंतून गेलेलें असावें; जेवण पदरांत पडेल तेव्हां पडेल! कित्येक वेळां चार चार दिवसांत मुळींच झोंप नसे! आंथरुणाची व याची गांठ कधींच पडली नाहीं! तास दोन सांपडल्यास तेथल्या तेथेंच बैठकीवर लुडकावें, अशी स्थिति तेव्हांपासूनच होती. मुंबईस येतांना जो बिछाना बांधून आणावयाचा, तो परत पुण्यास जातांना झटकून पुन्हा बांधावयाचा, असेंच बहुतेक होत असे! एकदां सहा महिन्यानंतर तो असा झटकीत असतां त्यांत दोन मोठाले विंचू व एकदोन गोमा निघाल्याचें अण्णासाहेब सांगत असत! पूर्वी सांगितल्याप्रमाणें हे हौशी असल्यामुळें व धर्मास विरुद्ध नसलेली कोणती गोष्ट करण्यास यांची सदैव तयारी असल्यामुळें, यांच्या बैठकींत अखंड रंग भरलेला असे. पानतंबाखूचें तर इतकें विलक्षण वेड होतें कीं, रोज यांस एकट्यांस अदपाव तंबाखू लागत असे! त्याच मानानें पानांचाही खप असे. चांदीच्या मोठ्या संचांत त्रयोदशगुणी विड्याचें साहित्य पडलेलें असे, त्याचा रोज किती खप होत असेल, याचा पत्ताच नव्हता. चिलीम, हुक्का, इंग्रजी तऱ्हेचे चिरूट, गांजा, भांग, कुसुंबा वगैरेंचाही आदर येथें प्रेमपूर्वक होत असे. या सर्व गोष्टींत श्रीअण्णासाहेब यांची बहुतकरून सर्वांवर ताण असे. परंतु त्यांत अशी खुबी होती कीं, कुसुंब्यासारख्या व्यसनाच्या देखील ते कधीं आधीन झाले नाहींत. समोर असतांना वाटेल तितकी चैन करावी, परंतु मागें त्याची आठवण देखील होऊं नये, अशी निःसंगता त्यांचे ठिकाणीं स्वभावसिद्धच होती. गाण्याचा व वाजविण्याचाही उत्कृष्ट तऱ्हेचा शोक तेथें चाले. स्वतःच्या श्रीमंतीमुळें व औदार्यामुळें, मुरारजींच्या सहवासानें व आंगच्याच

सर्वव्यापी योग्यतेमुळें, लौकरच मुंबईंतील उच्च दर्जाच्या सर्व वर्गांत यांचें वजन बसलें. खारेपिस्ते विकणाऱ्या एकाद्या फेरीवाल्यापासून तों मुंबईच्या अतीशय श्रीमान् गृहस्थापर्यंत सर्व तऱ्हेच्या गुणांचे व विद्यांचे लोक येथें वेळोवेळीं जमत असत. विद्वत्तेचा तर अर्थातच येथें पूर वाहत असे. वादविवाद, कोटिक्रम, थट्टामस्करी, टारगेपणा वगैरेंचा तर पाऊस पडत असे. या इतक्या सर्व गोष्टींस पुरे पडून ज्याच्या त्याच्या परी त्याला जिव्हाळा लावून, निरनिराळ्या तऱ्हेचीं कामें लोकांकडून करून घ्यावीं, व पुन्हा एकमेकांचा एकमेकांस सुगावाही नसावा, एवढी प्रचंड साक्षेप शक्ति आणि गांभीर्य यांचे ठिकाणीं सहजच होतें. त्यामुळें अमुक एक प्रकारची माहिती त्यांना कधीं आगाऊच मिळाली नाहीं, अथवा अमुक एक काम करण्यास लायक मनुष्य जवळ नाहीं, अशी अडचण त्यांस कधींच भासली नाहीं. अर्थात् या सर्व मंडळींत बाजारबुणगेही असावयाचेच; परंतु त्यांतूनच माणसें काढून कामास लावावीं अशी त्यांची रीत होती. प्रत्येक रविवारीं मेडिकल कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांस मोठी मेजवानी होत असे, आणि त्या वेळीं कांहींतरी नवें पक्वान्न करण्यांत येई; असा क्रम मुंबईस असेपर्यंत होता. या सर्व गोष्टींस अर्थातच पुष्कळ पैसा लागत असे, आणि जरी भाऊसाहेबांची श्रीमंती बरीच होती व श्रीअण्णासाहेबांच्या भावी उत्कर्षाची अतिशय मोठी कल्पना व खात्री त्यांना असल्यामुळें त्यांनीं अगर त्यांच्यामागें नानासाहेबांनीं कधीं नाहीं म्हटलें नाहीं, तरी देखील घरून येणारा पैसा पुरा पडत नव्हता, आणि त्यामुळें थोरल्या बाजीरावसाहेबांप्रमाणें कर्जाच्या भानगडींत हे तेव्हांपासूनच पडलेले होते. विद्यार्थी असतांच अपिलें लिहिणें वगैरे धंदे करून आपण पैसा मिळवीत असूं, असें त्यांनीं एकदां स्वतः सांगितलें.

सामाजिक चळवळीपैकीं विष्णुशास्त्री पंडितांनीं नुकत्याच काढलेल्या विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीकडे त्यांचें बरेंच लक्ष वेधलें, आणि विष्णुशास्त्र्यांबरोबरच विधवापुनर्विवाह शास्त्रोक्त आहे, अथवा निषिद्ध आहे, हें ठरविण्याकरितां प्राचीन वाङ्मयाचा त्यांनीं अभ्यास केला. त्यावरून विधवांचा पुनर्विवाह करणें, अर्थात अविद्धयोनि विधवांचा पुनर्विवाह करणें, शास्त्रास सोडून नाहीं, अशी त्यांची खात्री झाली. त्यावरून कांहीं काळ विधवापुनर्विवाहाचे पुरस्कर्ते म्हणून पंडितांच्या जोडीनें त्यांनीं काम केलें. पतितपरावर्तना-

चाही प्रश्न त्यांच्या डोक्यांत घोळत होता. असें कांहीं तरी घडवून आणून हिंदु व मुसलमान या दोन समाजाचें एकीकरण व्हावें, असें त्यांस अतीशय वाटत असे. स्वभावतःच हे समाज परस्परांस इतके विरुद्ध आहेत कीं, अशा कांहीं तडजोडीशिवाय केवळ राजकीय अथवा सामाजिक वगैरे तत्त्वाकरितां दोघांचें एकीकरण होणें केवळ अशक्य आहे, असें त्यांनीं ठरविलें होतें. याच्याच जोडीला, दुसऱ्याही किरकोळ सुधारणांस त्यांचा पाठिंबा होता. या सर्व गोष्टींमुळें व्हावयाचा तोच परिणाम झाला, आणि पुष्कळ बाबतींत बापलेकांचें पटेनासें होऊन, एक प्रकारचा बहिष्कार त्यांचेवर घरांतून घालण्यांत आला. परंतु कौटुंबिक गुणांपेक्षां सामाजिक व राष्ट्रीय गुणांचेंच उत्तरोत्तर महत्व त्यांचेजवळ असल्यामुळें, त्यांनीं आपलीं मतें व उद्योगही सोडून दिले नाहींत, अथवा बेपर्वाईनें वडिलांचा अपमान करून घरही टाकून दिलें नाहीं. मुकाट्यानें यावें, व बाजूस मांडलेल्या पानावर जेवून आपल्या कामास निघून जावें, असें घरीं असतां त्यांस कित्येक दिवस करावें लागलें. या सर्वांचा असा अर्थ नाहीं, कीं सुधारक ह्मणून जो एक वर्ग त्यावेळीं जोरांत येऊं पहात होता, त्यांच्याचपैकीं अण्णासाहेब हे एक होते. त्या वर्गाच्या स्वाभिमानशून्यतेबद्दल, आर्यराष्ट्र आर्यसंस्कृति व आर्यपरंपरा यांविषयींच्या पूर्ण अज्ञानाबद्दल, व अशाच प्रकारच्या अनेक अर्धवट कल्पना आणि चमत्कारिक तऱ्हा, यांचा त्यांस मनापासून तिटकारा होता; व पुढें पुढें तर सुधारणा म्हणजे सर्व इंद्रियसुखाचा अनिर्बंध मार्ग, अशी जेव्हां सुधारकांची स्थिति त्यांस दिसूं लागली, तेव्हां तर यांस त्यांचा इतका कंटाळा आला व नाना प्रकारच्या अनुभवांनीं त्यांचीं कित्येक बाबतींत मतेंही इतकीं पालटलीं कीं, अण्णासाहेबांनीं रानडे व विष्णुशास्त्री पंडित यांच्या जोडीनें काम केलें आहे, असें कोणास सांगितल्यास तें त्याला खरें देखील वाटावयाचें नाहीं, इतका त्यांनीं तो विषय सोडून दिला. सुधारकांशीं यांचा पहिल्यापासूनच अतिशय विरोध म्हणजे, सुधारणेच्या नांवाखालीं आचारास वळण न देतां अजीबात फाटा देण्याचा उपक्रम आणि अबलोन्नति ह्या दोन विषयांत होता. स्वधर्माच्या सर्वोत्कृष्टतेबद्दल त्याची अढळ श्रद्धा होती, व त्याच्या पायावर उभारलेल्या सर्व तऱ्हेच्या परंपरांच्या उपयुक्ततेबद्दल कमालीचा अभिमान होता. कांहीं गैरसोय झाली तरी देखील ती सोसून त्या राखल्या पाहिजेत, आणि त्या सोडून

अथवा आमचें राष्ट्रीयत्वच पालटून, स्वातंत्र्य अथवा खाण्यापिण्याचें व कपड्यालत्त्यांचें मुर्दाड वैभव केवढेंही मिळालें तरी त्याची किंमत नाहीं, अशी त्यांची समजूत होती. काळाला उचित असे फारच थोडे फरक त्यांत केले पाहिजेत, एवढेंच त्यांस वाटत असे.

स्त्रियांस शिक्षण असलें पाहिजे, असें त्यांचेंही मत होतें, परंतु शिक्षण ह्मणजे एकाद्या भाषेंत अगर कांहीं कलांत प्राविण्य संपादणें व व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखालीं मोकाट वागणें, हा सुधारकीं चळवळीचा निष्कर्ष त्यांस पटणें केव्हांहीं शक्य नव्हतें. जें इंग्रेजी शिक्षण व जी इंग्रेजी संस्कृति कांहीं ऐहिक गोष्टी सोडून जिवाच्या खऱ्या कर्तव्याच्या दृष्टीनें टाकाऊ आहे असें त्यांस वाटत होतें, व ज्याचा फोलपणा सिद्ध करून दाखविण्याचा त्यांचा उद्देश होता, तेंच शिक्षण स्त्रियांच्या माथीं मारावें हें त्यांस अत्यंत आत्मघातकीपणाचें वाटत असे. अण्णासाहेबांच्या व त्या वेळच्या इतर लोकांमध्यें हा एक मोठाच फरक होता कीं इंग्रज मनुष्य कोणचेंही काम करो, अथवा कसल्याही विषयास हात घालो, तो वरून कांहींहीं बोलला अगर कसाही वागला तरी पोटांतून हिंदुस्थानशीं असलेला त्याचा राजकीय संबंध, त्या संबंधाची त्यास व त्याच्या समाजास असलेली उपयुक्तता, आणि त्यामुळें तो दीर्घायु व दृढ होण्याची आवश्यकता व या सर्वांसंबंधीं त्याचें कर्तव्य, या गोष्टी अजीबाद विसरूं शकत नाहीं, व त्याला धरूनच तो सर्व करतो, हें त्यांच्या राजनीतिशास्त्राचें पहिलें तत्त्व होतें. त्यामुळें सुधारणांच्या नांवाखालीं ज्या कित्येक चळवळींना इंग्रज अधिकारी व इंग्रज लोक उचलून धरीत, त्यांच्यांत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष असें कांहीं तरी राजकीय धोरण त्यांना दिसून येई.

विधवापुनर्विवाहाच्या चळवळीबरोबरच इंदुप्रकाशच्या लेखकाचेंही काम पंडितांच्याबरोबर अण्णासाहेब करूं लागले. या पूर्वींही लेखनकलेचा उपयोग त्यांनीं थोडाबहुत केला असावा. स्वातंत्र्यावरील त्यांचा "The tree of liberty is watered by the blood of patriot's heart" या वाक्यानें सुरू होणारा निबंध वाचून महादेव गोविंद रानड्यांची लेखकास छातीशीं कवटाळून धरावें अशी स्थिति होऊन गेल्याचें सांगतात. पुण्याच्याही कांहीं पत्रांतून मधून मधून ते लिहित असत, परंतु जास्त संबंध असा इंदुप्रकाशाशींच होता. याच्याच जोडीस औद्योगिक चळवळ म्हणून कांहीं लोकांच्या

सहाय्यानें कांचेचा कारखानाही त्यांनीं सुरू केला होता. रानड्यांच्या प्रार्थनासमाजाशीं त्यांचा संबंध कधींच नव्हता; परंतु कर्नल ऑल्कॉट व मॅडेम ब्लॅव्हाट्स्की यांचीं नवी टूम काय आहे हें पाहण्याकरितां ते थिऑसफींत शिरले होते, व दाईच्या विनंतीवरून सोसायटीच्या वतीनें कांहीं लिहिण्याचें कामही त्यांनीं केलें. याशिवाय अनेक लहान मोठीं कामें सुरू केल्याचा नुसता उल्लेख त्यांच्या भाषणांत येई; परंतु त्यांविषयीं सविस्तर माहिती अशी त्यांनीं केव्हांही दिली नाहीं. अशा रीतीनें जडलेला रानड्यांचा व त्यांचा संबंध जर टिकला असता तर त्यापासून देशाला केवढा फायदा झाला असता, हें कांहीं सांगतां येत नाहीं; परंतु रानड्यांचा भिक्षेपणा त्यांस आवडत नसे. तरीही रानड्यांची विद्वान् या दृष्टीनें योग्यता अण्णासाहेब जाणून होते, म्हणून सरकारी नोकरीचा अडथळा मध्यें येईपर्यंत दोघांत कधीं फाटलें नाहीं.

विष्णुशास्त्री पंडितांशीं फाटण्यासही असेंच कारण झालें पंडितांचें पहिलें कुटुंब वारल्यावर व कोणत्याही कारणानें कां असेना, आपण एका गतभर्तृकेशीं पुनर्विवाह करावा, असें त्यांच्या मनानें घेतलें. या गोष्टीस अण्णासाहेब अतिशय विरुद्ध होते. त्यांचें स्पष्ट असें मत होतें कीं, हा विवाह पंडीत हे तत्त्वाकरितां करीत नसून इंद्रियसुखाकरितां करीत आहेत. स्वतः विधुरावस्थेंतच राहून त्या गतभर्तृकेचा विवाह दुसऱ्या एकाद्या तरुणाशीं अथवा काम पडल्यास स्वतःच्या चिरंजीवाशीं लावून तत्वदृष्ट्या पंडितांस खरें कर्तव्य करितां येईल, असें त्याचें मत होतें; 'मुलाचा पुनर्विवाह लावून स्वतः संन्यास घ्या व पुनर्विवाहप्रचारक व्हा;' असें त्याचें सांगणें होतें. या विषयावर प्रचंड भवति न भवति झाली, सबंध एक रात्र आपण पंडितांचें डोकें धरून बसलों, व त्यांस परोपरीनें विनविलें, आणि तरी ही जेव्हां ते ऐकेनात, तेव्हां सुधारक लोक आणि त्यांची इंद्रियपरायणता यांचा तिटकारा येऊन आपण पंडितांस रामराम ठोकला, असें अण्णासाहेब सांगत. पंडितांस त्यांनीं पुनर्विवाहाच्या कामीं चांगलीच मदत केली होती; आणि ज्यावेळीं पुण्यास शंकराचार्यांच्या समोर या प्रकरणीं वाद झाला, त्यावेळीं पंडितांचे साथीदार म्हणून उघड उघड बसून त्यांस ग्रंथांतून आधार काढून देण्याचें काम अण्णासाहेब करीत होते. त्यामुळें पंडितांचें वर्तन त्यांस लागणें साहजिक होतें; आणि पुढें तर जास्त विचाराअंतीं

व अवलोकनानें शास्त्रविरुद्ध नसला तरी पुनर्विवाह करूं नये, असेंच त्यांचें मत झालें. असो.

मेडिकल कॉलेजमध्यें असतांना एक दिवस एका प्रोफेसरानें एडिनबर्गच्या मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीं चालविलेलें मेडिकल जर्नल दाखवून अशी टीका केली कीं, " See, how students at home work." या टीकेचा अण्णासाहेब यांस अतिशय विषाद वाटला, आणि प्रोफेसरास फजींत करावयाचें असा त्यांनीं तेथल्या तेथेंच निश्चय केला. त्या दिवशीं इ. स. १८७४ च्या मार्च महिन्याची ४ तारीख होती. कोणासही न सांगतां मुकाट्यानें तयारी करून, त्याच मासिकाच्या आकाराचा, जाहिराती नसलेला परंतु तसलाच भरपूर मजकूर आंत असलेला Grant Medical College Journal चा पहिला अंक त्यांनीं स्वतः लिहून काढला, व छापवून एप्रिल महिन्याच्या चवथ्या तारखेस, ह्मणजे प्रोफेसर साहेबांनीं टीका केली तेथून नक्की एक महिन्यानेंच, त्यांच्या हातांत ठेवला! आणि वर त्यांस बजावलें कीं, " See how students here work, if help is given to them" तें पाहून प्रो. मजकूर तर थक्कच झाले, व इतर प्रोफेसरांची यांच्यावर मर्जी बसली. त्यांतीलच डॉ. स्मिथ यांचा व अण्णासाहेबांचा अतिशय लोभ जडून महत्त्वाच्या गोष्टी पुढें घडून आल्या. Grant Medical College Journal चे २।३ अंक निघाल्यावर त्यास जाहिरातीही चांगल्या मिळूं लागल्या, आणि खर्चाच्या दृष्टीनें तें काम झेंपेसें झालें. या पुस्तकांत मन घालून तें त्यांनीं चांगल्या स्वरूपास आणलें, आणि पुढें पुढें तर निरनिराळ्या भाषांतील वैद्यकविषयक ग्रंथ, पत्रें आणि मासिकें यांचें सदर काढल्यामुळें, मासिकास फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, वगैरे देशांतील पत्रें आणि मासिकें भेट देऊं लागलीं, व परीक्षणाकरितां ग्रंथ येऊं लागले, आणि त्याचें महत्व फारच वाढलें. निरनिराळ्या भाषेंतील मजकुरांचें परीक्षण करतांना एक दोन युरोपिअन स्नेह्यांची मदत फार झाली, म्हणून ते सांगत असत. अण्णासाहेबांस स्वतःस १०–१२ भाषांचा–त्यांच्या शब्दांत बोलावयाचें ह्मणजे " कामापुरता "–अभ्यास होता; व त्या भाषांतील उपयोगी पडणारे सरासरी ९–१० शें शब्द आपण प्रत्येकीं पाठ केले होते, असें ते सांगत. अशी कांहीं स्वतःची तयारी व कांहीं स्नेह्यांची मदत, यांनीं तें काम त्यांनीं यशस्वी करून

दाखविलें. मासिकास आलेली सर्वांत मोठी भेट ह्मणजे व्हिक्टोरिया राणी साहेबांचे खासगी सर्जन यांनीं लिहिलेलें सर्पशास्त्रावरील ( Ophiology ) मोठें प्रचंड पुस्तक होय. हें पुस्तक जवळ जवळ ६०० रु. किंमतीचें होतें! मासिकाच्या लौकिकावरून तें परीक्षणाकरितां ह्मणून आलें होतें. जर ग्रंथकर्त्यास मासिक चालविणारे केवळ Medical College चे विद्यार्थी आहेत, असें ठाऊक झालें असेल तर त्यांस केवढा आचंबा वाटला असेल, त्याची कल्पनाच केली पाहिजे.

मासिकाकरितां जाहिराती मिळवाव्या असें ठरल्यावर अशी गोष्ट झाली कीं, अण्णासाहेब हे Kemp & Co च्या एजंटास भेटावयास गेले. त्यावेळीं दुपारचे बारा वाजले असून तो साहेब खाना खावयास बसत होता. तेथेंच त्यानें यांना बोलाविलें. परंतु अण्णासाहेब जवळ जातात तोंच, या काळ्या मनुष्यानें आपल्या खान्याच्या टेबलास शिवणें ठीक नाहीं असें वाटून, त्यानें मगरूरीनें त्यांस दूर उभें राहावयास सांगितलें. त्या वेळीं तळपायाची आग मस्तकास जाऊन " All right, good day " असें म्हणून अण्णासाहेबांनीं पाठ फिरविली. चार सहा महिन्यांनीं असा प्रसंग आला कीं तोच एजंट अण्णासाहेबांकडे येऊन, त्यानें आपल्या वर्तनाबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली, आणि 'कंपनीच्या जाहिराती तुम्हा घ्या,' म्हणून अर्जाजी करूं लागला!

याच्यानंतर पुढें लौकरच. या सर्वांचें मूळ जे अण्णा मोरेश्वर त्यांचें व अण्णासाहेबांचें एका प्रोफेसरला मानपत्र देण्याच्या संबंधांत वितुष्ट आलें, आणि तेव्हांपासून ते उभयतांही एकमेकांचे पक्के हाडवैरी बनले. असें सांगतात कीं, पुढें पुण्यास असतां अण्णा मोरेश्वर यांस एक अतीशय जिवावरचा आजार झाला, व त्यांतून ते निभावतील, अशी आशा आप्तेष्टांस वाटेना. अशा स्थितींत कोणी एकानें अण्णासाहेबांस आणावें म्हणून सुचविलें. स्वतः अण्णा मोरेश्वर हे बेशुद्ध असल्यामुळें त्यांस विचारण्याची सोय नव्हती; आणि त्यांचें अण्णासाहेबांशीं असलेलें हाडवैर तर प्रसिद्ध होतें. परंतु अण्णासाहेबांच्या औदार्याची माहिती असल्यामुळें कांहीं लोकांनीं त्यांस तेथें नेण्याचा हिय्या केला. परीक्षा केल्यावर अण्णासाहेबांनीं प्रिस्क्रिप्शन लिहून दिलें, व औषध दिल्यावर होणारीं कांहीं लक्षणें सांगून २ तास पहारा करायास सांगितलें. २ तासांनंतर जेव्हां मंडळींनीं रिपोर्ट दिला तेव्हां 'आतां कुंटे

वांचले, काळजी करूं नका' असें म्हणून अण्णासाहेब स्वतः झोपीं गेले. कांहीं वेळानंतर कुंटे सावध झाले, व आपल्या स्थितींत पडलेला फरक पाहून त्यांस राग आला, व 'मी मेलों असतों तरी हरकत नव्हती, पण विनायक रामचंद्रास कां आणलें? त्याच्याशिवाय दुसरा कोणी असें औषध देणें शक्यच नाहीं. तुम्हीं पटवर्धनास आणलें खास,' असें म्हणूं लागले! यावरून अण्णासाहेबांचें वैद्यक कौशल्य तर दिसून येतेंच, पण त्यांच्याविषयीं कुंट्यांच्या मनांत असलेला तीव्र द्वेष आणि त्यांच्या खऱ्या योग्यतेची पूर्ण जाणीव, हींहीं दिसून येतात.

वर डॉक्तर स्मिथ याचें नांव आलें आहे. अण्णासाहेबांच्या वैद्यकीय नैपुण्यावर त्याचा अतिशय भरंवसा असे. त्याची स्वतःची खाजगी Practice पुष्कळच म्हणजे २।३ हजारपर्यंत असे, व त्याचा लौकी-कही चांगला होता. त्यास स्वतःस कोणत्याही प्रसंगीं जरा अडलें अगर शंका आली, तर तो अण्णासाहेबांस बरोबर घेऊन जात असे, आणि हा विद्यार्थी व आपण गुरु वगैरे भाव न धरितां त्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागत असे. अशाच एका प्रसंगीं आर्यवैद्यकाचें श्रेष्ठत्व साहेबांचे नजरेस आणून देतांना, दोन्ही वैद्यकांचा तुलनात्मक अभ्यास करावा, अशी त्यांच्या डोक्यांत कल्पना आली. वाघानें केलेल्या जखमांचे विषावर, आंग्लवैद्यकांत कसलीच चिकित्सा नाहीं, परंतु त्या विषावर आपलेकडे औषधें असून त्यांच्या योगानें डॉ० स्मिथ यांस एक रोगी अण्णासाहेबांनीं बरा करून दाखविला. यावरूनच या दोन्ही पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करीत असतांना, आंग्ल वैद्यकाच्या कित्येक उणीवा त्यांच्या लक्षांत आल्या; व तें सिद्ध करून दाखविण्याकरितां म्हणून त्यांनीं मोठीच खटपट केली. इंग्रजी मासिक त्यांच्या हातींच होतें; त्याच्या जोडीस 'वैद्यसुधा' म्हणून आर्यवैद्यकाची माहिती देणारें मासिक त्यांनीं सुरू केलें, आणि त्यांच्या जोडीस प्रत्यक्ष प्रयोग करून पाहण्याकरितां एक इंग्रजी दवाखाना आणि एक देशी दवाखाना सुरूं केला, व त्यांवर स्वतः देख-रेख ठेवून काम चालविलें. यांतील मुख्य खुबी अशी होती कीं, एकाच रो-गाच्या कांहीं रोग्यांस आंग्ल पद्धतीनें व कांहींना देशी पद्धतीनें औषध देऊन त्यांचें बरें होण्याचें व बरें होण्याच्या वेळांचें शेंकडा प्रमाण पहावयाचें. देशी दवाखाना पुण्याचे लागवणकरशास्त्री चालवीत असत, व इंग्रजी दवाखान्यावर डॉ० भाऊ गोपाळ मंत्री म्हणून एक सारस्वत गृहस्थ काम करीत होते.

दोन्हीही दवाखान्यांनीं कांहीं काळ उत्तम काम केलें, व पुढें जर सालरजंग प्रकरण उपस्थित झालें नसतें, तर मोठ्या संस्थांच्या स्वरूपास ते आले असते. हा तुलनात्मक अभ्यास पुरा व्हावा म्हणून २।४ लाख रुपये उभारून एक मोठी संस्था स्थापन करावी, आणि मिळतील तेथून आर्यवैद्यकावरील ग्रंथ धुंडून आणून प्रसिद्ध करावे, व अशा रीतीनें तुलनात्मक दृष्टानें आर्यवैद्यकाचें श्रेष्ठत्व दाखवून, त्यांतील व्यंगें दूर करावीं, असा त्यांनीं उपक्रम केला, परंतु त्यांच्या इतर सर्व उद्योगांबरोबरच त्यांच्या मद्रासेस जाण्यामुळें, त्याची इतिश्री झाली.

अण्णासाहेब मुंबईस आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं फ्रँको–जर्मन युद्ध होऊन जर्मनी सर्व तऱ्हेनें पुढें सरसावला. या युद्धाकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें होतें, व त्याचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास केला होता. देशांतील सर्व तऱ्हेच्या चळवळींबरोबरच परदेशांतही चळवळ झाली पाहिजे, व पराराष्ट्रांत संधानें असल्याखेरीज असल्या चळवळी निभत नाहींत, असें त्यांनीं पाहून ठेवलें होतें. याच वेळीं इटली स्वातंत्र्याकरितां धडपडत होता, अमेरिकेंत गुलामांच्या वादावरून भयंकर यादवी झाली होती, आणि शोगनगिरींतून मोळका होऊन जपान उन्नतीच्या मार्गास लागला होता. हिंदी राजकारणाचा विचार केवळ हिंदु लोकांवरूनच न करतां, राजकर्त्यांची एकंदर राजनीति आणि जगांत सर्वत्र होत असलेल्या या उलाढाल्या यांवरूनही केला पाहिजे, असें त्यांचें मत होतें. कांच कारखान्यांत त्यांना अपयश आलें, त्यावरून व त्यांच्या इतर अनुभवांवरून त्यांनीं असें लौकरच ओळखिलें कीं, सत्ताधाऱ्यांशीं टक्कर खेळतांना कशाही स्वरूपाची कां होईना, पण सत्ताच जवळ असली पाहिजे. आणि त्यावरूनच एकादा स्वतंत्र प्रांतच आपल्या ताब्यांत असण्याची त्यांना गरज भासूं लागली. तेव्हां अर्थातच पहिली कल्पना एकाद्या संस्थानिकाशीं धोरण बांधून तें हातीं घ्यावयाचें; व या कल्पनेप्रमाणें हैद्राबाद, इंदूर, बडोदा यांच्यासारख्या मोठ्या, व वढवाण लिमडी वगैरेसारख्या छोट्या संस्थानांत आपलें वजन बसविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, व तो किती उत्तम साधला, हें हैद्राबादचें प्रकरण, वकिलीची परीक्षा पास झाल्यावर त्यांना सांगून आलेली बडोद्याची दिवाणगिरी, तुकोजीराव होळकर यांच्या मुलाखती वगैरे प्रसंगा-वरून दिसून येतें. या अंतर्गत प्रयत्नांबरोबरच निरनिराळ्या देशांतील कॉन्स-

त्यांच्या ओळखी करणें, त्यांच्याशीं हिंदी राजकारणाविषयीं चर्चा करणें, व जरूर पडल्यास सहाय्य मिळविण्याची संधानें बांधणें, वगैरे कामेंही सुरूंच होतीं. या सर्व प्रकरणांचा अर्थातच रानडे प्रभृति मंडळीस गंधही नसे. इतकेंच तर काय, परंतु त्यांचे बैठकींत अखंड असणाऱ्या लोकांनाही त्यांच्या एकंदर व्यापाची कल्पना नव्हती. परंतु अशा प्रकारचीं संधानें बांधीत असतांही, त्या परकी लोकांवर विश्वास ठेवून उगीच कांहीं तरी मात्र त्यांनीं कधीं केलें नाहीं. मुंबईस रशियन प्रिन्स आला होता, त्यावेळेस अण्णासाहेब यांस त्यांच्या रशियन भाषेच्या तात्पुरत्याच कां होईना पण जाणतेपणामुळें पुढें केलें होतें, असें सांगतात. या गोष्टीचा फायदा घेऊन आपण लष्करी जहाज कसें असतें तें स्वतः जहाजावर जाऊन पाहिल्याचें तें सांगत असत. टारपेडो व बांबशेल्स यांच्या प्राथमिक अवस्था आपण तेथें पाहिल्या, म्हणून ते सांगत. अशाच प्रकारें समुद्रांत तार टाकण्याकरितां आलेल्या इंग्रजी लढाऊ जहाजावर आपण अमेरिकन कॉन्सलशीं संधान बांधून गेल्याचें, व येतांना तेथून तारेचा एक तुकडा घेऊन आल्याचें तें सांगत असत. या सर्व गोष्टींमुळें त्यांची एक मात्र खात्री झाली कीं, झाडाखालीं झाड वाढणें केव्हांही शक्य नाहीं; आणि प्रजेच्या प्रकृतीचें अत्यंत सूक्ष्म ज्ञान असणाऱ्या, व स्वतःचीं नीतितत्त्वें किंचित् देखील हयगय न करतां, अथवा कसल्याही विकारांना वश न होतां पाळण्याविषयीं डोळ्यांत तेल घालून जपणाऱ्या इंग्रज सरकारास, राज्यक्रांतीचे डाव खेळून फसविणें शक्य नाहीं. जर हिंदुस्थानचा कांहीं तरणोपाय असेल तर, जगाच्या एकंदर राष्ट्रीय उलाढालींत ज्या वेळेस हिंदुस्थान व इंग्लिश राष्ट्र हीं दोन्हीही सांपडतील, त्यावेळी तो निघणें शक्य आहे. तोंपर्यंत औद्योगिक, सामाजिक, धार्मिक, वगैरे कित्येक चळवळीं परंपरा बुडून जाऊं नयेत म्हणून, व त्या कसाबसा तरी जीव धरून रहाव्या म्हणूनच करावयाच्या. म्हणून पुढें पुढें या सर्व गोष्टींवरच भर टाकून देऊन, जेणेंकरून अशा रीतीनें असा कांहीं तरी परराष्ट्रीय गोंधळ हिंदी राजकारणांत घालतां येईल, व जेणेंकरून एकाद्या परकी राष्ट्राला हिंदुस्थानच्या अंतर्गत व्यवस्थेंत हात शिरकवितां येईल,परंतु त्याचा फायदा आपणा स्वतःला करून घेतां येईल,असें कांहींतरी करण्याकडे त्यांचें लक्ष लागलें. हिंदुस्थानसरकार व त्यांचीं एतद्देशीय दोस्त आणि मांडलिक संस्थानें यांच्या परस्परसंबंधाचे व राजकारणाच्या इतिहासाचें जें सूक्ष्म व गाढ ज्ञान त्यांनीं

संपादिलें, तें एवढ्याचकरितां. जंजिरा, सांगली, इफळापूर वगैरे संस्थानांच्या अपिलाचीं कामें त्यांच्या हातून इतक्या उत्कृष्ट रीतीनें त्याचमुळें झालीं. या दिशेनें काम करण्याविषयीं त्यांच्या कल्पना हळूं हळू निश्चित झाल्या. काठेवाडांतील बारीकसारीक संस्थानांतील राजकारण हातीं घ्यावें, व त्यांचा एक संघ बनवून कांहींतरी करून दाखवावें, अशी त्यांची पहिली कल्पना होती. यांच्या बैठकींत कुसुंब्याचा प्रवेश अशाच निमित्तानें म्हणून झाला, असें ते सांगत. वढवाण, लिमडी वगैरे ठिकाणचे एजंट नेहमीं तेथें येत, त्यांच्या आवडीची चीज म्हणून कुसुंबा तयार ठेवावा लागे. त्यानंतर वकील झाल्यावर, त्यांना बडोदे संस्थानची दिवाणगिरी सांगून आली तेव्हां देखील, आपले वरील उद्देश पूर्ण करावयास सांपडावे म्हणून, दिवाणगिरीचा मान व पैसा न पत्करतां बडोद्याची परराष्ट्रीय मंत्र्याची जागा मिळण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पगार घेऊन बडोदें सरकारचे आपण नोकर होणार नाहीं, फक्त ऑफिसच्या सरंजामापुरता तीनशें रु० दरमहा घेऊन मुंबईतच राहूं, अशा त्यांच्या अटी होत्या, कारण इंग्रज सरकारचे ताबेदार असलेल्या संस्थानांची नोकरी करणें देखील त्यांना अशक्य होतें. या अटी इतक्या साध्या, होत्या कीं, केव्हांच हा सौदा ठरून गेला असता. परंतु यांची दुसरी अट अशी होती कीं, अत्यंत बारीकसारीक गोष्टीपासून तो वाटेल तितक्या महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत, प्रत्येक प्रकरण आपल्या नज़रेंतून व संमतीनें गेलें आलें पाहिजे; जर त्या वेळेस बडोद्यास कोणी संस्थानिक असता, तर कदाचित् हीहि गोष्ट ठरली असती. परंतु मल्हाररावाचें प्रकरण नुकतेंच होऊन गेलें होतें, आणि बडोद्यास रीजन्सी होती. मल्हाररावाच्या प्रकरणांत अण्णासाहेबांनी काय भाग घेतला होता हेंही सरकारास माहीत असावें. त्यामुळें या शेवटच्या अटीवर न जुळल्यामुळें हा प्रयत्न त्यांनीं सोडून दिला, व त्या जागेवर सर टी. माधवराव यांची नेमणूक झाली.

त्यानंतर मोठी मानाची जागा देऊन गिब्ज् कां असाच कोणी ॲक्टिंग गव्हर्नर होता, त्यानें त्यांना सरकारी नोकरींत अडकविण्याचा प्रयत्न केला. या गिब्ज्चें व अण्णासाहेबांचें बरेंच चांगलें असून गव्हर्नरसारखे अधिकारी कितीही पालटले तरी, त्यांच्याजवळील अतिशय गुप्त व खासगी ब्लयू बुकाच्या साहाय्यानें राजशासन एकसूत्री कसें राखलें जातें, व मागील गव्हर्नराच्या कार-

कीर्दीतील कारवायांचीं तत्त्वें व धोरणें नीट ओळखून नवा गव्हर्नर तें लोण बिनचुक पुढें कसें नेतो, हें आपण या गिब्जच्या जवळील पुस्तकावरूनच शिकलों, असें ते सांगत.

इतर अनेक उद्योगांतच, देशी कारखान्यांचे उत्तेजनार्थ प्रदर्शन भरविण्याची कल्पना काढून त्यांनीं ती प्रत्यक्षांतही आणली. अर्थातच ही कल्पना केवळ त्यांची एकट्याची नसेल; परंतु ज्यांनीं ती काढली व घडवून आणली, त्यांपैकीं ते एक प्रमुख होते. त्यांनीं स्वतः पुढाकार घेतलेला कांचकारखाना हा एका स्वीडिश माणसाच्या देखरेखेखालीं चालला होता, व त्याच्या कुशलतेमुळें आणि इमानीपणामुळें तो लौकरच अतिशय भरभराटीस येईल, असें वाटूं लागलें होतें. कांचेचा कारखाना चालू असतांच त्यांतल्याच द्रव्यांवर सल्फ्युरिक ॲसिड व क्रमाक्रमानें इतरही रासायनिक पदार्थ अत्यंत अल्प श्रमांत व खर्चांत काढावे, अशी योजना केली होती. सल्फ्युरिक ॲसिडचा प्रयोग तर इतका उत्तम झाला कीं, कँपसारख्या कंपनीकडून चौदा आण्यास मिळणारी बाटली अवघ्या दोन आण्यांत येऊं लागली! तेव्हां इंग्रेजी व्यापारी मंडळांत मोठीच खळबळ उडून गेली. कांचेच्या कारखान्यास मीठ, सोडा वगैरे पदार्थ लागतात, व त्यावेळीं मिठावरचा कर नसल्यामुळें समुद्राच्या मुबलक पाण्यावर हा कारखाना हवा तेवढा यशस्वी होण्याचा भरंवसा होता. परंतु इंग्रेजी व्यापारी मंडळाच्या कलकलाटाचा व पूर्वीपासूनच सरकारच्या धोरणांत असलेल्या मिठावरील कराच्या कल्पनेचा मेळ पडून, लागलीच त्या कल्पनेला कायद्याचें स्वरूप आलें; त्यामुळें पूर्वींची घडी विघडून जाऊन सल्फ्युरिक ॲसिड वगैरे पदार्थांची जोड नाहींशी झाली, व कांच माफक किंमतींत देणें परवडेना; तरीही तो त्यांनीं नेटानें पुढें चालविला असता; पण कांहीं कारणानें त्या स्वीडिश मनुष्यास परत जावें लागलें, आणि त्यामुळें कारखाना बंद ठेवावा लागला.

मुंबईंत सूत काढण्याच्या व कापड तयार करण्याच्या गिरण्या घालण्याची त्यावेळीं व्यापारी मंडळांत एक लाट उठली होती. अशा तऱ्हेच्या धंद्यासंबंधानें अण्णासाहेबांचें अनुकूल मत कधींच नव्हतें. स्वीडिश मनुष्यावर अवलंबून असणारा कारखाना केव्हां बुडेल याचा जसा नेम नाहीं, तसेंच, परदेशांतून येणाऱ्या यंत्रांवर अवलंबून राहणारे कारखाने केव्हां बुडतील अथवा टाकाऊ ठरतील याचा नेम नाहीं; म्हणून मोठमोठ्या लोकांनीं, मोठ्या प्रमाणांत कारखाना न

निघाला तरी चालेल, पण कारखान्याबरोबरच त्यांची यंत्रसामुग्रीही येथेंच तयार करण्याचा उद्योग केला पाहिजे, असें त्याचें ठाम मत होतें. एवढ्यासाठीं यंत्रसामुग्रीच तयार करण्याचे कारखाने काढावे, असा त्यांनीं प्रयत्न केला. परंतु थोड्या खर्चांत यंत्रसामुग्री पदरांत पडून कापसाच्या वाढत्या व्यापारावर गबर होण्याच्या लालसेमुळें इतक्या खोलांत जाण्याची व्यापारी वर्गास गरज वाटली नाहीं, आणि त्यामुळें ही उत्कृष्ट कल्पना मागें पडली. या सर्व गोष्टींमुळेंच एकादा प्रांत आपल्या हातीं असावा, असेंच त्यांना जास्त वाटूं लागलें. निवळ संस्थानिकांस हातीं धरून काम रेटणार नाहीं, अशी समजून झाली, व त्यामुळेंच हैद्राबादच्या प्रकरणावर त्यांचा अतिशय भर पडला. या प्रकरणाची मनोरंजक हकीकत पुढें स्वतंत्र प्रकरणांत द्यावयाची आहे, म्हणून तो भाग सोडून दुसऱ्या कित्येक ठळक गोष्ट येथें सांगूं.

मेडिकल कॉलेजांतील अभ्यासक्रमापेक्षां L. L. B. चा अभ्यासक्रम थोड्या वर्षांचा असल्यामुळें हे ताबडतोब वकील व्हावयाचे. परंतु तसें होण्यास त्यांस ८ वर्षें लागलीं. मात्र इतक्या खटाटोपांनीं पास होण्यापुरता अभ्यास करतां आला नाहीं म्हणून नव्हे, तर उलट त्यांनीं L. M. & S. व L. L. B. प्रमाणेंच L. C. E. ची टर्म भरावी असा त्या कॉलेजचे प्रिन्सिपाल ग्रँट साहेब यांचा आग्रह पडल्यावरून, व तसें केल्यास कांहीं विषयांची सूट देऊं म्हणून त्यांनीं कबूल केल्यावरून, ते कॉलेजही त्यांनीं धरलें होतें. अभ्यासाची त्यांस मोठीशी प्रतिष्ठा होती असें नाहीं, पण सबंध मुंबईच्या उठाठेवी करतां करतां नेमानें अभ्यास करणें शक्य नव्हतें हें तर उघडच आहे. परंतु त्यांतल्यात्यांत कांहीं वेळ काढून, कोठें रस्त्यांनीं जातांना, कोठें दुसऱ्यांशीं बोलत असतां, कोठें दुसऱ्यानें वाचलेलें ऐकून व केव्हां त्याच्याच मागें नेटानें बसून, ते आपलें काम भागवून घेत होते. बहुतकरून अभ्यास करण्याचा प्रसंग रात्रीस यावयाचा; आणि अभ्यास सारा उभ्या उभ्या व्हावयाचा! खोलींतील सर्व भिंतींस भरपूर उजेडाचे दिवे लावून हातांत पुस्तक घेऊन पिंजऱ्यांतील सिंहाप्रमाणें फेऱ्या करीत अभ्यास करावयाचा, असा बहुतेक क्रम असे! त्यावेळीं यांस करमणुकीकरितां कांहीं तरी खावयास लागे, म्हणून भिंतीच्या कोनाड्यांतून चांदीच्या बशांतून यांचे आवडते पदार्थ,—म्हणजे पाकाच्या चिरोट्या, श्रीखंड वगैरे गोड व कांहीं तिखट पदार्थ भरून ठेवलेले असत. हिंडतां हिंडतां मधेंच

एकादा तुकडा तोंडांत टाकावा, अगर चमचा घ्यावा, व पुढें वाचूं लागावें, असा खेळत खेळत अभ्यास व्हावयाचा. परंतु कित्येक वेळां असें होई कीं, काम फार शिल्लक राहिलें म्हणजे जेठा मारून तासचे तास बसावें, व पाणी पिण्या-सही मान वर न करतां काम संपवून उठावें! चार चार दिवसांत जमीनीस पाठ लावली नसल्यामुळें व कमालीच्या दगदर्गीमुळें, अशा वेळीं पाठ दुखूं लागे, व मंडळींनीं ऊन पाण्याच्या बोळ्यांनीं एकीकडे पाठ शेकावी, व एकीकडे यांनीं आपला पाठ वाचावा असें पुष्कळ वेळां होई! एकदां तर पुरे बहात्तर तास आपण चाळीच्या खिडकीशीं वाचीत बसलों होतों, म्हणून त्यांनीं सांगितलें!! त्या वेळचा अनुभव सांगतांनाही त्यांना मोठी मौज वाटली. ते म्हणत, "दिवस उजाडला म्हणजे हळूं हळूं खुट खुट सुरू होऊन क्रमाक्रमानें अनेक तऱ्हेच्या ध्वनींचा मोठा कलकलाट दिवसभर चाले, व सायंकाळ झाली म्हणजे त्याच क्रमानें ध्वनी शांत होऊन कांहीं तासपर्यंत अगदीं निस्तब्धता होऊन जात असे. रोज ठराविक वेळेस समोर सूर्याचा उदय व्हावा, व क्रमाक्रमानें त्याला वाढतांना पाहून, व नानातऱ्हेच्या कलकलाटांची अभ्यासांत लक्ष गुंतल्यामुळें अस्फुट संवेदना होऊन त्या तंद्रींतही मौज वाटे, आणि जणूं कांहीं सर्व विश्वाच्या बाहेर बसून कौतुकानें त्याकडे पहावें असें होऊन, मनुष्यांचे नित्य व्यवहार आपल्या खुराड्यांत राहणाऱ्या पक्षांदिकांप्रमाणें भासत." असो. अभ्यासाची जरी तक्रार नव्हती, तरी यांचा जन्मगुणच असा होता कीं प्रत्येक बाबतींत कांहींतरी कटकट व्हावी, आणि दांडगाई करून पार पडावें. तसेंच परीक्षेच्या बाबतींतही झालें. विश्वनाथ नारायण मंडलीक ह्मणजे त्यावेळचें फारच जाडें प्रस्थ होतें. परंतु कितीही मोठा मनुष्य असला तरी एखादे वेळेस तरी विकारवश होणारच. त्यावेळच्या एका प्रकरणांतील सरकारी धोरणावर कडक टीका असलेला एक लेख अण्णासाहेबांनीं लिहिला. तो मंडलिक यांच्या नेटिव्ह ओपिनियन मध्यें प्रसिद्ध व्हावयाचा होता. मंडलीक हे अतिशय सरळ व बाणेदार असल्यामुळें त्या लेखास हरकत करणार नाहींत असें यास वाटलें. परंतु कोणच्याही कारणानें कां असेना तो प्रसिद्ध करा-वयाचें मंडलीक यांनीं नाकारलें, व त्यावरून त्यांचा व अण्णासाहेबांचा मोठाच वाद झाला. "लेखांतील विधानांची जबाबदारी पूर्णपणें माझ्याच शिरावर राहील, आपण भिऊं नका," असें परोपरीनें सांगूनही ज्या वेळेस

निराशा झाली, तेव्हां अण्णासाहेबांस त्वेष आला व उभयतांची कांहींतरी कमीजास्त भाषा होऊन, मंडलिकांनीं आपण L. L. B. च्या परीक्षेंत एका विषयांत परीक्षक असल्याची त्यांना आठवण दिली, व तुमच्या अधिकपणाचें उद्दे काढूं म्हणून धाक घातला. त्यावर अण्णासाहेबांनींही तेथल्या तेथेंच त्यांस बजाविलें कीं, "कांहीं हरकत नाहीं, आपण मात्र सत्यास स्मरून पेपर तपासा, मग वाटेल तितका कडकपणा केला तरी हरकत नाहीं; मीं आपल्याच हातून L. L. B पास होईन, नाहीं तर मुळीं वकील होणारच नाहीं." आणि हा दंश मनांत ठेवून मंडलिकांनीं काम केल्यामुळें यांस ६ वर्षें लागलीं. प्रत्येक वर्षी त्यांच्या विषयांत नापास झाल्यावर मंडलिकांनीं यांस आठवण द्यावी, व यांनींही 'मी तुमच्याच हातून पास होईन, तरच नांवाचा ब्राह्मण,' असें पुनः पुन्हा बजावावें, असें पांच वेळां झालें! सरतेशेवटीं मंडलिकांस काम सोडण्याची वेळ आली व त्यांचें एकच वर्ष राहिलें. यावर्षी अण्णासाहेबांनीं तयारीही चांगलीच केली होती, व पुण्यास श्रीमहाराजांनीं त्यांस "या वेळीं हातावर हात मारून पास व्हावयाचें, बरें कां दादा!" म्हणून सांगितलें होतें. त्याचप्रमाणें अखेरीस झालें. मोठ्याचें सगळेंच मोठें, त्याप्रमाणें जसा द्वेष, तसा मनाचा थोरपणाही मंडलिकांचा मोठा होता, व कितीही कडकपणा केला तरी पेपरांत एकही चूक आढळून न आल्यामुळें, त्यांस हा विद्यार्थी पास करणें भाग पडलें. या गोष्टीचा त्यांच्याही मनावर परिणाम झाला, व त्यांनीं 'This time I could not but pass you,' असें अण्णासाहेबांस उघड बोलूनही दाखविलें. अशा रीतीनें हा सहा वर्षांचा बाणेदार झगडा संपला; व मंडलीकही रिटायर झाले. वादाचा मूळ विषय जो अण्णासाहेबांचा लेख, तो पुढें लागलीच एका अँग्लो इंडियन पत्रानें प्रसिद्ध केला, व त्यामुळें तर मंडलिकांस जास्तच राग आला, असें अण्णासाहेब सांगत.

याच सुमारास L. M. S. चीही परीक्षा पास झाले, व दोन्ही पदव्या त्यांच्या गळ्यांत पडावयाच्या, परंतु येथेंही पुन्हां एक कटकट उत्पन्न झाली. व त्यामुळें L. M. S. ची पदवी अशी त्यांना मिळवितां आली नाहीं. मेडिकल कॉलेजचे प्रि. डॉ. हंटरसाहेब हे विलायतेस गेले असतांना ग्रॅंट मेडिकल जर्नल मधून त्यांनीं लिहिलेल्या एका लेखावर 'त्यांतील विधानें असंबद्ध आहेत,' म्हणून अण्णासाहेबांनीं टीका केली. हा लेख

इंटरसाहेबांच्या वाचण्यांत येऊन त्यांच्या नाकास मिरच्या लागल्या; व हिंदुस्थानांत परत आल्यावर " माझाच विद्यार्थी असून मलाच फजीत करतोस काय ? आपली विधानें परत घे, " म्हणून त्यांनीं अण्णासाहेबांच्या मागें लकडा लावला. " हीं विधानें आपलीं आहेत हें माहीत नव्हतें, म्हणून आपण टीका केली, परंतु कांहीं झालें तरी ती टीका खरी आहे, म्हणून आपण परत घेणार नाहीं, होत असल्यास खोडून काढावीं, " असें या शिष्यानें गुरूंस बजावलें ! तेव्हां यांचें नुकसान करण्याकरितां, एकाच वेळीं एक मनुष्य दोन परीक्षांस बसणें योग्य नाहीं, असा त्यांनीं सिंडिकेटमध्यें वाद काढला, व तशाच अर्थाचा कांहीं ठराव सिंडिकेटनें पास केला. त्यामुळें अण्णासाहेब यांस कोणती तरी एक डिग्री घ्यावी व दुसरीकरितां पुन्हा प्रयत्न करावा, अशी स्थिति प्राप्त झाली. त्यावर अण्णासाहेबांनीं कोणची डिग्री घ्यावी असा प्रश्न आपल्या वडिलांस केला असतां, भाऊसाहेबांनीं वकील होण्यास सांगितलें. कारण वैद्यकीवर पैसा मिळविणें, अयोग्य आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. वकीलीवर पैसा मिळवावा, वैद्यकीचा पैसा घेऊं नये, ही त्यांची आज्ञा अण्णासाहेबांनीं पुढें इतक्या कडकपणानें पाळली कीं, वैद्यकीच्या सल्याकरितां आलेल्या इसमांनीं आणलेलें एकादें साधें फळ देखील ते कधीं घेत नसत, इतकेंच नव्हे तर आपल्या घरांत देखील तें न राहूं देतां ओंकारेश्वरीं वाटण्याकरितां पाठवून देत असत !

हायकोर्ट वकील झाल्यावर अण्णासाहेबांचा थाट तर विशेषच असे. इंग्रजी पोषाकाचा त्यांना तिटकारा असल्यामुळें त्यांनीं अत्यंत नाखुषीनें हायकोर्टांत जाण्यापुरताच त्याचा उपयोग करावा. चांदीचे पेलेदार बिल्ले असलेले दोन पट्टेवाले व कारकून वगैरे बरोबर घेऊन ते थाटानें कोर्टांत जात, व त्यांच्या एकंदर धोरणाला तें आवश्यकही होतें. परंतु एकदां घरीं आले म्हणजे पुन्हां नेहमीची राहणी सुरूं होई. उत्तम पुरुष म्हणून यांचा लौकिक दूरवर असल्यामुळें संग्रहास अनेक लोक येत, व अनेक तऱ्हेच्या सल्लामसलती करून जात. कॉलेजांत त्यावेळेला शिकत असलेल्या टिळक वगैरे तरुण मंडळींना अण्णासाहेबांचीं राजकीय धोरणें गळीं उतरणें, त्यावेळीं शक्य नव्हतें, आणि तीं गळीं उतरण्यास जवळ जवळ ३०।४० वर्षांचा अनुभव त्यास घ्यावयाचा होता, म्हणून रानडे यांचेंच उदाहरण त्यांना त्यावेळीं जास्त अनुकरणीय वाटणें साहजिकच होतें. तरीपण अण्णासाहेबांविषयीं एकप्रकारचा मोठा आदर व

त्यांच्या पुरुषोत्तमत्वाची निर्विवाद जाणीव प्रत्येकास होती, आणि ते त्यांच्याकडे मधून मधून येत असत. श्री. दादासाहेब खापर्डे यांनीं आपला त्यावेळचा अनुभव असाच सांगितला. ज्याच्या त्याच्या तोंडून अण्णासाहेब पटवर्धन हें नांव निघालेलें ऐकून हे आहेत तरी कोण, एकदां पहावें अशी त्यांना इच्छा झाली, व ते एकदां सकाळीं एकटेच अण्णासाहेबांच्या बिऱ्हाडी गेले. श्री. दादासाहेब हे स्वतःही श्रीमंतीत रुळलेले असून अंगापिंडानें सुदृढ, गोरेगोमटे व बुद्धिमान् असून, त्यांसही आपल्या श्रीमंतीची व बुद्धिमत्तेची थोडीबहुत जाणीव होतीच. कर्मधर्मसंयोगानें बैठक त्यावेळेस रिकामीच होती, व लोडाशीं टेंकून साधी मांडी घालूनच दोन्ही हात स्वस्तिकाकार काखेंत दाबून डोळे मिटून कसल्यातरी विचारांत अण्णासाहेब गढून गेलेले त्यांना दिसले. तेथला तो श्रीमंती थाट आणि अण्णासाहेबांची ती धीरोदात्त शांत, व गंभीर अशी कांतिमान् मूर्ति पाहून त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला, व आपण खरोखरच एका महापुरुषाच्या सान्निध्यामध्यें आहों असें वाटलें. थोड्यावेळानें अण्णासाहेबांनीं डोळे उघडून त्यांच्याकडे पाहिलें, व कोणीकडे आलांत म्हणून चौकशी केली. त्यावरून आपण अण्णासाहेब पटवर्धन यांस भेटावयास आलों आहों, म्हणून त्यांनीं सांगितलें. तेव्हां अण्णासाहेब म्हणाले, 'मीच तो आहे,' यावर, 'डोळे मिटून आपण काय करीत होतां?' म्हणून मी चौकशी केली, तेव्हां आपण ईश्वर चिंतन करीत असल्याचें त्यांनीं सांगितलें,' असें दादासाहेब सांगतात. एथून पुढें दोघांचा चांगलाच परिचय झाला. दादासाहेब यांच्यावर अण्णासाहेबांचा अखेरपर्यंत मोठा लोभ होता.

या बारा वर्षांत अण्णासाहेब नेहमीं मुंबईस होते, असेंच केवळ नाहीं. मधून मधून ते पुण्यास येत असत, व महाराजांची गांठ पडल्यावर आळंदीसही जात. आपली मंडळी अशी यांनीं मुंबईस केव्हांच नेली नाहींत. अण्णासाहेबांच्या सर्वसंग्राहकतेंत दैवी साधनांचाही समावेश असल्यामुळें तसल्याही खटाटोपांत ते असतच. त्यांच्या तेव्हांच्या परिस्थितींत जास्त कर्मठपणा करणें त्यांना शक्य नव्हतें, तरी तोंडानें बडबड करण्याची माझी संवय लहानपणापासूनच आहे, म्हणून ते सांगत. पुण्यास त्यावेळीं दोन व्यक्तींचा संबंध त्यांस घडून आला, व त्या दोघांपासूनही त्यांना मदत झाली. त्यांपैकीं एक श्रीनरसिंहसरस्वती हे होत व दुसरे तात्यासाहेब कर्वे हे होत. पेश-

त्यांचे कुलोपाध्याय जे कर्वे त्यांच्या वंशांतच तात्यासाहेब कर्वे हे झाले. ब्राह्मण आचारानें मोठा कडकडीत व तेजस्वी होता. असें सांगतात कीं, मंत्रशास्त्रांत तो अतिशय निपुण असून अनेक मंत्रांची त्यांस सिद्धि असे. यांच्याशीं परिचय झाल्यावर तेथून कार्याच्या दृष्टीनें काय फायदा झाला असेल, हें कळण्यास साधन नाहीं, परंतु पटवर्धनांचें कुलदैवत जें श्रीगजानन त्याची उपासना मात्र श्रीअण्णासाहेबांनीं यांच्यापासूनच घेतली. अण्णासाहेब त्यांस नेहमीं गुरूसाहेब म्हणून संबोधीत असत, व त्यांच्या संबंधानें मोठ्या आदरानेंच बोलत. त्यांच्या मंत्रसिद्धीच्या कांहीं गोष्टीही ते सांगत, परंतु त्यांचा या चरित्राशीं संबंध नसल्यामुळें त्यांचा उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

श्रीनृसिंहसरस्वती हे प्रथमतः १८७३ सालीं आळंदीस रहावयास आले. त्यापूर्वी ते एकदां आळंदीस येऊन गेले होते, अशी माहिती मिळते. अशीही एक आख्यायिका आहे कीं, अण्णासाहेब लहान असतां डोक्यांवर जटाभार व हातांत दंडकमंडलु अशा वेशानें ते वाड्यांत आले होते, व आंत शिरतांच डाव्या अंगास बसण्याकरितां बाक ठेवलेला असे, तेथे बसले. श्रीअण्णासाहेब यांस ही कोणी गोसावी आला असें वाटून ते बाहेर आले. त्यांची व महाराजांची थोडा वेळ दृष्टादृष्ट झाली, व महाराज उठून गेले. ही आख्यायिका कशीही असो, पण अण्णासाहेबांचा व महाराजांचा उघड संबंध तात्यासाहेब रायरीकरांमुळें आला. महाराजांची साधारण माहिती स्वतंत्र प्रकरणांत द्यावयाची आहे, तेव्हां येथेंच तिचा प्रपंच करण्याचें कारण नाहीं, परंतु या बारा वर्षांतच त्यांचा संबंध जडला, व त्यांच्या सहवासानें पुढें अण्णासाहेब यांच्या एकंदर आयुष्यांत मोठीच क्रांति घडून आलेली दिसते, म्हणून येथें उल्लेख केला. अण्णासाहेबांस पाहिल्यावेळेपासूनच महाराजांस मोठा आनंद झाला, व ते त्यांस ‘ दादा ’ म्हणून हांक मारूं लागले. ‘ इकडचा डोंगर तिकडे उचलून ठेवावा, हें याचें काम आहे ’ असें ते म्हणत, व ‘ हें आमचें लष्करी खातें, ’ असें म्हणून त्यांची पाठ थोपटीत. अगदीं प्रथमपासूनच श्रीमहाराज म्हणजे कर्तुमकर्तुं, सर्वव्यापक, सर्वज्ञ सर्वशक्तिमान परमेश्वरच अशी त्यांची महाराजांविषयीं भावना नव्हती. हे कोणीतरी मोठे विद्वान् व चांगले सिद्ध पुरुष आहेत असे त्यांस वाटे, व महाराजांचा आणि त्यांचा संबंध

जरी प्रेमाचा होता, तरी प्रत्येक गोष्टीत तंटा झाल्याखेरीज अण्णासाहेबांची समजूत पटली नाहीं.

अण्णासाहेबांच्या स्वभावपरिपोषास व समजुतीस महाराजांची मदत कसकशी होत गेली, आणि ती किती झाली याचा इतिहास कळणें कठीण आहे. परंतु एवढें खरें कीं, वैदिक संस्कृति म्हणजे काय, व वैदिक आचारविचार याच्या मुळाशीं कोणचीं खोल तत्त्वें आहेत, वगैरे गोष्टींचीं हृद्गतें अवगत होण्यास महाराजांचीच मदत झाली. विश्वाच्या या दृश्य पसाऱ्यामागें अदृश्य असें अनंत विश्व आहे, व त्याचा आणि या विश्वाचा परस्पराश्रय आहे, या गोष्टींचें नुसतें बौद्धिक आकलनच नव्हे, तर सानुभव खात्री महाराजांमुळेंच अण्णासाहेबांची झाली; आणि म्हणून याच सिद्धांताच्या पायावर उत्पन्न झालेल्या आर्य संस्कृतीच्या सर्व प्रकारच्या रूपांची उपपत्ती त्यांस लावतां येत होती. परंतु या विषयाचे वेगळेंच सदर चालवयाचें आहे, म्हणून येथें नुसता त्रोटक उल्लेख केला. त्या वेळीं यांचे व महाराजांचे संबंध कोणत्याही स्वरूपाचे असोत, परंतु एवढें खरें कीं वारंवार पुण्यास येऊन एकवार आळंदास जावें, आणि आपल्या सर्व खटाटोपांचा पाढा महाराजांकडून मुकाट्यानें ऐकवून घ्यावा, असें नेहमीं घडत असे; व तेव्हांही यांच्या मनांत महाराजांच्याविषयीं एवढा आदर होता कीं, आळंदीस गेल्यावर आपला श्रीमंती पोषाख आणि ऐटबाज रेशीमकाठी धोतर सोडून ठेवून, साधें धोतर नेसल्याखेरीज महाराजांच्या समोर अण्णासाहेब केव्हांही गेले नाहींत. तेथें त्यांच्या ज्या कांहीं गोष्टी होत, त्या कधीं दुसऱ्यासमोर होत नसत. सारी निजानीज झाल्यावर रात्रीं २ वाजतां सारी मसलत चालवयाची; व लोकांसमोर उगीच कसलें तरी भांडण चालवयाचें. त्याच्या पुष्कळ गंमती ते सांगत असत. एकदां, महाराज पुराण सांगत असतां कांहीं वेदांतांचा भाग त्यांनीं समजून सांगितला. तेव्हां सर्व श्रोत्यांनीं आनंदानें माना डोलविल्या, परंतु अण्णासाहेब तसेच बसून होते. त्यावर 'कायरे दादा, समजलें का?' म्हणून त्यांनीं विचारलें. तेव्हां अण्णासाहेबांनीं उत्तर दिलें, "ही सारी लबाडी आहे. मला तर समजलें नाहींच, परंतु माना डोलविणाऱ्या या सर्वांनाही कांहीं समजलें नाहीं, व समजणें शक्य नाहीं, हें आपणास ठाऊक आहे, असें असून प्रश्न कां विचारतां?" अशा तऱ्हेचे कांहीं तरी बोलणें निघे, व मग

महाराज रागावल्याचें सोंग करून ' तुला समजत नाहीं, पुराणांत मध्यें बोलत जाऊं नकोस, ' ह्मणून बसण्याची बंदी करीत, व अण्णासाहेबही २।४ दिवस त्याप्रमाणें वागत. परंतु तें त्यांस बरें वाटत नसे, आणि मग ' दादा आतां मध्यें बोलणार नाहीं,' अशा प्रकारच्या तात्यासाहेबांच्या मध्यस्थीनें पुन्हा पुराणास येत. परंतु एकदोन दिवस गेले कीं महाराजांनाही ठीक वाटत नसे, आणि त्यांनीं स्वतःच कांहीं तरी भांडण उकरून काढावें, अशी मौज नेहमींच चाले. एकदां पुराणांत शरीराचा विषय निघाला असतां, शरीराच्या Dissection चा प्रश्न निघाला, आणि " आम्ही चिरफाड करून हे सर्व अवयव पाहतों ' असें अण्णासाहेब म्हणाले. त्यावर " मढ्याचें Dissection करून काय उपयोग ? जिवंत शरीराच्या आंत पाहिलें पाहिजे, " असें त्यांनीं अण्णासाहेबास सांगितलें. त्याच वेळीं हा अनुभव त्यांनीं अण्णासाहेबांस दिला किंवा नाहीं, हें सांगवत नाहीं, परंतु पुढें एकदां याच विषयावर बोलत असतां " जो आंत पाहील त्यास निरनिराळ्या प्रकारचें काम करणाऱ्या भिन्न भिन्न शक्तींचा मोठाच लखलखाट दिसेल," असें अण्णासाहेब ह्मणाले होते. असेंच डोळ्यांच्या रचनेविषयीं व दृष्टीविषयीं विषय निघाला असतां, ' डोळ्यावांचून पाहणें तें खरें पाहणें,' असें महाराज ह्मणाले. अण्णासाहेब ह्मणाले, ' हें कसें घडेल ? ' जवळच पडलेला कागदाचा एक तुकडा घेऊन महाराजांनीं त्यास भोंक पाडलें व " काय तुला पहावयाचें आहे, पहा, " ह्मणून सांगितलें. त्यावेळीं काबूल येथें लढाई सुरू होती, तीच आपण पहावी असें अण्णासाहेबांस वाटलें. तोंच त्यांस तो सर्व देखावा प्रत्यक्ष डोळ्यांपुढें दिसूं लागला, व तसेंच पुढें वर्तमानपत्रांत लिहून आलें. थोड्या वेळानें महाराजांनीं कागद परत घेतला आणि फाडून टाकला. अशाच एका प्रसंगीं, तात्यासाहेब रायरीकरांच्या येथें योगी लोक आंतडीं काढून धुतात कशीं, याचा थोडा प्रयोग महाराजांनीं करून दाखविला. त्या प्रसंगीं हल्लीं विद्यमान असलेले महाराजांचे भक्त रा. विश्वनाथ निळकंठ बापट हे स्वतः हजर होते, व परातींत आतडीं धुतल्यावर परत आंत खेंचतांना मंडळींच्या हलगर्जीपणामुळें धक्का बसून महाराजांस बरेच दिवस कांहीं व्यथा सोसावी लागली, असें ते सांगत. येथेंच हेंहीं सांगावेसें वाटतें कीं, संपूर्ण आंतडीं बाहेर काढून आंत खेचण्याचा प्रयोग संगमावरील ' बोडखा ' नांवाच्या एका उदासी साधूंनीं त्यांस पुढें करून दाखविला.

'शरीराचें सर्व कातडें एकसंधी आहे हें तुह्मांस माहीत आहे, व तुह्मीं स्वतः डॉक्टर आहां, असें असतां असल्या प्रकारावर तुमचा विश्वास कसा बसतो? डॉक्टरलोक याच प्रकारास मूर्खपणांत व लफंगेगिरींत काढतात' असें मीं विचारलें असतां, अण्णासाहेब यांनीं 'ते मूर्ख आहेत, मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें आहे,' म्हणून 'बोडस्यांची' (एक साधु) हकीगत सांगितली, आणि हें कसें घडतें तें सुलभ रीतीनें समजावून दिलें. ढेंकूण वगैरे पाहण्याकरितां बाहीं आपण उलटी करतों त्याप्रमाणें अपानवायूनें आंतडीं बाहेर फेंकावयाचीं असतात, व क्रिया झाल्यावर प्राणवायूनें पुन्हा तीं आकर्षण करावयाचीं असतात. मात्र असें करण्यास अविकृत ब्रह्मचर्य आणि विलक्षण तंतुबल (Nervous Strength) लागतें. आंतडीं बाहेर काढणें म्हणजे शरीरापासून अलग करून घ्यावयाचीं, असल्या अडाणी कल्पनेमुळें अर्वाचीन लोकांस ही गोष्ट खरी वाटत नाहीं. असो.

तात्यासाहेब कर्वे हेही असेच सामर्थ्यसंपन्न होते, व त्यांच्याही गोष्टी अण्णासाहेब सांगत. गणपतराव सोहनी हे तात्यासाहेबांचे शिष्य होते, व त्यांच्या विनंतीवरून तात्यासाहेबांनीं गणपतरावांना कांहीं साधन सांगितलें होतें, त्यामुळें आपलें शरीर सुषुप्त ठेवून गणपतरावांस लिंगदेहानें विहार करतां येई, आणि वाटेल तेथील खबर आणतां येई; मात्र स्थूलशरीराहून लिंगदेह वेगळा होतो कसा, व पुन्हा आंत शिरतो कसा, हें त्यास समजत नसे, व आपण हें लिंगदेहानें करतों असें भान नसे; परंतु आपला देह झोंपीं गेलेला ते पहात, व त्या जवळून स्वेच्छेनें दूर जात. त्यांच्या या सिद्धीचे पडताळे पाहून आपण पुष्कळ प्रयोग केले, म्हणून अण्णासाहेब सांगत. एका प्रसंगीं तर असें झालें कीं, काबूलास त्यांस पाठविण्यांत आलें. त्या वेळेस एका झाडापाशीं उभे राहून आपण लढाई पहात आहों, असें त्यांस वाटत होतें. पाहण्याच्या भरांत दुरून सुटलेली गोळी आपणास लागते अशी भावना होऊन त्यांनीं घाईनें डोकें फिरविलें. त्याबरोबर झाडाच्या फांदीवर आपटून त्यांस टेंगूळ आलें. पुढें देहस्थितीवर आल्यावर पाहतात तों खरोखरच टेंगूळ आलेलें! हा प्रकार कसा घडला असेल, हें सांगतां येत नाहीं. तो विषय सूक्ष्मेंद्रियशास्त्र जाणणाऱ्यांचा आहे. परंतु असें घडलें, एवढें मात्र अण्णासाहेब सांगत असत. यावरून

आपणही ह्या अनुभव घ्यावा असें वाटून, गुरुसाहेबांस त्यांनीं ती विद्या मागितली. परंतु हें क्षुद्र साधन तुझ्या योग्यतेचें नाहीं म्हणून त्यांनीं सांगितलें. अशा तऱ्हेच्या अतींद्रियत्वाचा प्रत्यक्ष दाखला देणाऱ्या दोन महापुरुषांच्या सहवासांत अण्णासाहेब यांच्या मनाची चलबिचल होऊन, केव्हां इकडे तर केव्हां तिकडे असें त्यांचें मन ओढत असे किंवा नाहीं, हें सांगतां येत नाहीं. तरीपण महाराजांचा याहीपेक्षां मोठा चमत्कार पाहून आणि लोभ संपादूनही त्यांनीं श० १७९९ वैशाख वा॥ ४ या दिवशीं, पटवर्धनाचें कुलदैवत व त्यांच्या मातुश्रीचें उपास्य जें श्रीगजानन याची उपासना तात्यासाहेबांपासूनच घेतली. यावरून मनांत बरेच तर्क येतात व कांहींच निर्णय होत नाहीं. मी स्वतः एकदां त्यांस, महाराजांची एवढी प्रचीति घेतल्यावरही तात्यासाहेबांकडून उपासना कशी घेतली, असा प्रश्न केला होता. त्यावर ' त्यांत काय झालें ! ' एवढेंच उत्तर मिळालें. मी पुन्हा प्रश्न केला, 'श्रीनींच तसें करावयास सांगितलें होतें काय?' त्यावर ते 'नाहीं' म्हणून म्हणाले. वर सांगितलेला चमत्कार असा- इ. स. १८७७ च्या फेब्रुवारींत अण्णासाहेब चासेस गेले होते. तेथें नानासाहेबांचें कुटुंब गंगाबाई या अतीशय आजारी होत्या. त्यांना पाहून अण्णासाहेब पुण्यास परत जावयास निघाले, परंतु ते तितक्यांतच जातां जातां महाराजांची गांठ घेऊन जावें असें वाटून, मुद्दाम आडवाट करून ते आळंदीस आले. ते दिवशीं रविवार असून वसंतपंचमी होती, व फेब्रुवारीची १९ ता. होती. अण्णासाहेब आले तेव्हां २॥-३ वाजण्याचा सुमार होता. त्यावेळीं खंडोबाचें देऊळ बांधणें चाललें होतें. तेथें छोटासा मांडव पडला असून खूप समाज जमला होता, आणि जेवणाचा सपाटा चालला होता. जवळच थोड्याशा अंतरावर, जरीची टोपी डोक्यास घालून महाराजांची स्वारी विटांच्या ढिगावर बसली होती. अण्णासाहेब यांनीं नमस्कार करतांच, ' दादा कपडे काढून जेवून घे, आज आपल्या त्रिंबकाची मुंज झाली, ' म्हणून आज्ञा झाली. त्या दिवशीं पंचांगांत मुंजीचा मुहूर्त नव्हता. परंतु उगाच वेळ न लावतां अण्णासाहेब जेवावयास बसले. जवळच समोरच्या अंगास एक दुधाचें मोठें भांडें खांबाशीं टेंकून कलतें ठेवलें होतें. त्यांत लहान भांडी बुचकळून वाढावयास नेत. भांडें फारतर दहा बारा शेर दूध मावण्यापुरतें होतें. भोजन करतां करतांच आदल्या दिवशीं संध्याकाळीं मुंजीचा बेत श्रीनीं एकाएकीं

३०५८

कसा ठरवला, व पंचांगांत मुहूर्त नव्हता तरी जास्त पाहिल्यावर अर्ध्या घटकेचा मुहूर्त कसा सांपडला, व रात्रीं गडबड होऊन सकाळींच मुंज कशी लागली, आणि तेव्हांपासून सारख्या पंक्ती कशा सुरू आहेत, वगैरे हकीकत त्यांस समजली. त्यावरून अण्णासाहेबांचें लक्ष दुधाच्या भांड्याकडे गेलें, आणि एवढ्या दहावीस हजारांच्या समाजास इतकेंसें दूध कसें पुरत आहे, याचा त्यांस विस्मय वाटला. याविषयीं ते कांहीं उद्गार तोंडांतून काढणार, तोंच विटांच्या ढिगावरून महाराज ओरडले कीं, ' दादा, पुढें पाहून जेव मुकाट्यानें. इकडे तिकडे पाहण्याचें काम नाहीं!' त्या दिवशीं रात्रीं सर्व निजानीज झाल्यावर अण्णासाहेबांस हाक मारून श्रींनीं सांगितलें कीं, 'दादा तीं माणसेंही येथलीं नव्हतीं, आणि ती सामुग्रीही येथली नव्हे!' यावरून अण्णासाहेबांस काय वाटलें असेल हें कोणीं सांगावें ? असें असतांही यानंतर अगदीं थोड्या दिवसांनीं म्हणजे ३ महिन्यांचे आंतच त्यांनीं तात्यासाहेबांपासून उपासना कां घेतली, हें एक मोठें गूढच आहे; असो.

पुण्यास आले म्हणजे महाराजांचा सहवास करावा, व मुंबईस बाकीच्या खटाटोपी कराव्या, असें या काळांत अण्णासाहेबांचें चालू होतें. त्या खटाटोपीच्या प्रसंगानेंच इंदूरचे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांनीं त्यांची मुलाखत घेतली. कित्येक प्रकारच्या राजकारणाकरितां मुंबईच्या आसपास मोठी जमीन घेऊन ठेवावी, व तेथें आपला एक माणूस नेमावा, अशी त्यांची इच्छा होती. या कामांतील त्यांचे सल्लागार कोणी कुंटे म्हणून होते. त्यांचा व अण्णासाहेबांचा परिचय असल्यामुळें, त्यांनीं योग्य माणूस म्हणून अण्णासाहेब यांचें नांव सुचविलें. तेव्हां हा माणूस एकदां पाहिला पाहिजे, अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली. मात्र त्यांची अट अशी होती कीं, प्रत्यक्ष तुकोजीराव आपणास भेटत आहेत, हें अण्णासाहेबांस कळतां कामा नये. महाराजांच्या खासगी कारभाऱ्याची प्रथम भेट करवितों, असें सांगून कुंट्यांनीं अण्णासाहेबांस नेलें. स्वतः तुकोजीराव हे अगदीं साधा पांढरा शुभ्र पोषाख करून, व पांढराच कोशा डोक्यास गुंडाळून त्यांस भेटले, व दोघांचें बरेंच संभाषण झालें. प्रथम दर्शनींच अण्णासाहेबांनीं हा बनाव ओळखिला, परंतु तसें न दाखवितां भाषण करून त्यांनीं तुकोजीरावांस गार केलें. विशेषतः जमीन घ्यावयाची ती, दीव वगैरे बाजूस पोर्तुगीज वगैरे इतरांच्या प्रदेशांतील घ्यावी, इंग्रज मुलखांतील नसावी, ही त्यांची सूचना तर

राजे यांस फारच पसंत पडलों, आणि अण्णासाहेबां विषयीं त्यांचा ग्रहही फार अनुकूल झाला; परंतु दुसऱ्याच कांहीं एका कारणानें दोघांनाही हा बेत सोडून द्यावा लागला. यानंतर त्यांची उघड उघड भेट पुढें एकदांच झाली होती. कांहीं प्रसंगानिमित्त मुंबईस तुकोजीराव आले होते. त्यांना इंदुप्रकाशतर्फे झालेल्या पानसुपारीच्या वेळीं अण्णासाहेब हजर होते. रीतीप्रमाणें इतर मंडळी-मिळतीं, त्यांचीही ओळख करून दिली गेली. त्यावेळेस अण्णासाहेब यांनीं पूर्वींचा कांहींच संबंध न दाखवितां नुसतेंच हस्तांदोलन केलें. तेव्हां तुकोजीराव यांनीं थोडें तोंडांतल्या तोंडांत हांसून पूर्व परिचयाची खूण दिली. गर्दी कमी झाल्यावर त्यांनीं अण्णासाहेब यांस एकीकडे बोलावलें, व मग त्यांचें पुष्कळच भाषण झालें.

मुंबईत असतांना अशाच दुसऱ्या एका बड्या गृहस्थाशीं त्यांचा परिचय झाला, व त्याला निमित्तही जरा गमतीचें घडलें.हे बडे गृहस्थ म्हणजे बंडाच्या वेळीं जयाजीराव शिंद्यास मेजर लॉरेन्सच्या स्वाधीन करणारे आणि If shindya joins, I shall have to pack off अशी कॅनिंग साहेबांची भीति कायमचीच दूर करविणारे राजे दिनकरराव राजवाडे होते. यांचा मुक्काम एकदां आंग्र्यांच्या वाडींत असतां अण्णासाहेबांस अशी इच्छा झाली कीं याही पुरुषास एकदां पाहून घ्यावें. तेव्हां एकदां दुपारीं जेवणखाण झाल्यावर हातांत नेहमीचा सोटा, अंगांत नुसता सद्रा आणि डोक्यास बदामी रंगाचा रेशमी फेटा, अशा तालिमबाजी थाटानें अण्णासाहेब त्यांच्या बिऱ्हाडीं गेले. त्यावेळीं दिनकरराव माडीवर एकटेच बसले होते, व खालीं एक ब्राह्मण धुणें वाळत घालीत होता, त्यास वर्दी पोहोंचविण्यास अण्णासाहेबांनीं सांगितलें. स्वतः दिनकरराव यांस स्वरशास्त्राचा उत्तम अभ्यास होता, व त्यांचीं सारीं कामें त्या शास्त्राच्या तंत्रानें ठराविक दिशेस बसून, ठराविक दिशेकडे तोंड करून ठराविक वेळेला होत. त्या वेळेस ते वामकुक्षी न करतां दिवाणखान्याचे एका कोपऱ्यांत बसले होते. शागीर्दानें वर्दी पोहोंचवितांच त्यांचा सूर प्रतिकूल पडल्यामुळें 'निजले आहेत, यावेळीं भेट होणार नाहीं, पुन्हा या,' म्हणून सांगावयास त्यांनीं सांगितलें. परंतु हा कोंपरा जिन्याच्या भिंतीचाच व दाराजवळ असल्यामुळें जिन्याच्या तोंडाशीं असलेल्या अण्णासाहेबांस तें स्पष्ट ऐकूं आलें. निरोप ऐकून 'बरें आहे,' असें म्हणून थकल्यासारखें करून जवळच बाक पडला होता, त्यावर

अण्णासाहेब बसले, व संशयाचें कांहींच कारण नसल्यामुळें शागीर्दही आपलें काम करूं लागला. तेवढ्यांत यांनीं वर जाऊन दिनकरराव यांस गांठलें व त्यांचेसमोर आपला दंडा आडवा ठेवून जवळच ठाण मांडून बसले! तेव्हां नाइलाज होऊन राजे यांनीं 'कोण व कोणीकडे आलांत.' म्हणून चौकशी केली. त्यावर 'मी एक कायद्याचा अभ्यास करणारा विद्यार्थी आहे, व आपल्या-सारख्या महापुरुषास पहावें म्हणून आलों,' असें अण्णासाहेबांनीं सांगितलें. त्यावरून पुढें पुष्कळच बोलणें झालें, व 'आपण हें काय केलेंत? हिंदुस्थानचा सर्वस्वीं घात करून पुण्य तरी कोणतें संपादलेंत? अथवा इंग्रजांची जोड करून ऐहिक लाभ तरी काय मिळविलांत? उलट वेदधर्म आणि वैदिक संस्कृति यांचा नायनाट झाला, व सुखांत लोळत असलेल्या एका राष्ट्राची विपन्न स्थिति होऊन अनंत पिढ्यांचा तळतळाट मात्र घेतलांत. तेव्हां आपली योग्यता फारच मोठी आहे, आपल्याच हातानें आपल्या माणसांचे गळे कापणारा महा-पुरुष कसा असतो, तें पहावें म्हणूनच मीं आलों,' म्हणून अण्णासाहेबांनीं खडखडीत सांगितलें. कोणाही माणसाकडून उपमर्द करून घेण्याची संवय नसलेल्या सरदारसाहेबांची मिजास. हें भाषण ऐकून जाग्यावर राहणें शक्य नव्हतें. परंतु अण्णासाहेबांची आकृति, त्यांची मुद्रा, अंतःकरण तुटून निघणारे तरवारीच्या धारेसारखे शब्द, आणि त्याहीपेक्षां त्या भाषणांतील सत्य, यामुळें दिनकरराव विरून गेले, आणि त्यांच्या डोळ्यांस पाणी आलें. एवढ्या अमोल कामगिरीबद्दल त्यांच्या कल्पनेप्रमाणें एकादें मोठें संस्थान न देतां कोंकणांत ५ हजारांची किरकोळ जहागीर देऊन सरकारनें त्यांची संभावना केलीं होतीं. जयाजीरावांकडून मात्र बरीच मोठी जहागीर देवविली होती. ही गोष्ट त्यांच्या अंतःकरणास लागून राहिली होती, आणि 'आपला मूर्खपणा झाला खरा,' असें त्यांचें मन त्यांना खात होतें. नेमका तोच पाढा निर्भीडपणानें व कळकळीनें त्यांच्यापुढें मांडल्यामुळें, त्यांस अतिशय दुःख झालें, व त्यांनीं उघडपणें 'आपण मूर्खपणा केला, अशा थराला गोष्टी येतील असें तेव्हां वाटलें नाहीं, काय बुद्धि तेव्हां झाली कांहीं कळत नाहीं,' असें कबूल केलें. त्यावर 'झालें तें झालें, अजूनही आपलें सरकारांत चांगलें वजन आहे, तेव्हां कधीं कुठें प्रसंग पडल्यास आपल्या इमानास जागा,' असें अण्णासाहेबांनी त्यांना सहज बजावलें. या सहज केलेल्या सूचनेचा पुढें किती चांगला फायदा व्हाव-

याचा होता, याची तेव्हां अण्णासाहेबांसही कल्पना नव्हती. दिनकररावांनींही मनापासून ती गोष्ट कबूल केली, तेव्हां आपली आठवण असूं द्यावी, असें सांगून अण्णासाहेब उठूं लागले. त्यावर त्यांस पुनः बसवून घेऊन राजेरावांनीं पानसुपारी घेण्याचा आग्रह केला. परंतु 'स्वदेशाच्या रक्तानें कलंकित झालेल्या सुपारीचें खांडही खाणें महापाप आहे, आणि आपल्या येथें पाण्याचा एक घोटही घेणें योग्य नाहीं,' असें उघड उघड त्यांस उत्तर मिळालें. त्यामुळें जास्तच दिपून जाऊन 'कोण, कुठले,' म्हणून त्यांनीं चौकशी केली; व जेव्हां भाऊसाहेबांचे चिरंजीव म्हणून त्यांस कळलें, तेव्हां त्यांस कसेंसेंच होऊन 'तुम्ही मला फसविलें; मी हें भाऊसाहेबांस सांगेन; आधींच मला नांव कां सांगितलें नाहीं,' असें म्हणून त्यांनीं थोड्याशा संतोषानें अण्णासाहेबांस दारापर्यंत पोहोंचविलें व त्यांस निरोप दिला. मल्हारराव प्रकरणांत अण्णासाहेबांस दिनकररावांच्या ओळखीचा फार फायदा झाला, असें म्हणतात.

मुंबईस असतांनाच अण्णासाहेबांच्या आयुष्यांतील एक चमत्कारिक प्रसंग घडून आला. तीन गोष्टींचा संपर्क संबंध आयुष्यांत आपल्यास कधींच झाला नाहीं, ह्मणून ते सांगत असत. अभक्ष्यादिकांचा त्यांस संपर्क होणें शक्यच नव्हतें, परंतु कोणत्याही तऱ्हेची भीति आणि स्त्रीविषयक वासना अथवा मोह हीं आपणास केव्हांही शिवलीं नाहींत, असें त्यांनीं एकदां सांगितलें. त्यांचें सुंदर शरीर व एकंदर राहणी अशी होती कीं, साधारणतः कोणाही स्त्रीची नजर खिळून जावी; परंतु त्याजबरोबर त्यांचें वागणें अशा तऱ्हेचें होतें कीं, भोवतालच्या मंडळींच्या मनांत त्यांचेविषयीं एक प्रकारचा विलक्षण दरारा असे, आणि त्यांच्याशीं कांहीं इतकाही अतिप्रसंग करण्याची कोणाची छाति नसे. मेडिकल कॉलेजमधें असतां एका पार्शी सुंदरीनें मोह पाडण्याचा कसा प्रयत्न केला, व 'तात्या' 'तात्या' ह्मणून लाडानें जवळ येत असतां, आपल्या कठोर नजरेनें तिची कशी लेधा उडून गेली, व ती पळून गेली, त्याची हकीगत त्यांच्या तोंडून वामनानें (याची थोडीशी हकीगत पुढें येईल) ऐकली होती. असाच दुसराही एक प्रसंग झाला. यांच्याच बैठकींतील कांहीं मंडळींनीं यांना जाळ्यांत गुंतवावें ह्मणून एक कट केला. एका सुंदर व प्रख्यात गाणारणीची बैठक करवून अण्णासाहेबांस आमंत्रण करण्यांत आलें. पूर्वी ठरल्याप्रमाणें विश्रांतीकरितां ती स्वस्थ बसली असतां, चहा कॉफी पिण्याच्या, कोणी विड्या ओढण्याच्या अशा

कांहींतरी निमित्तानें एकेक जण तेथून निघून गेला, आणि अण्णासाहेब व ती वेश्या हीं दोघेंच तेथें राहिलीं. हें पाहून अण्णासाहेब जावयास निघाले, आणि पहातात तों दारास बाहेरून कडी लावलेली! मोहास बळी पडण्याची त्यांस भीतीच नव्हती. परंतु एक तर विनाकारण अब्रूची नुकसानी, आणि दुसरें, सर्व तऱ्हेनें पवित्र राखलेल्या शरीरास एका घाणेरड्या स्त्रीचा स्पर्श होऊन तें विटाळणार, यामुळें त्यांस थोडा विचार पडला. परंतु आपला बेत दिसूं दिल्यास गळ्यांत मिठी पडून शरीर विटाळेल, तरी तसें न व्हावें ह्मणून गडबड करण्याचा बेत टाकून दिल्यासारखें त्यांनीं दर्शविलें, व डोईचें फेंकून देऊन, उपरणें डोक्यास गुंडाळून, सहजगत्या ह्मणून गच्चीवर उभे राहिले. आपण काय करावें, ह्मणून ती वेश्याही विचारांच पडली होती. यांच्या वर्तनानें फसून जाऊन, हे आतां आपल्या ताब्यांत येतील अशा आशेनें ती त्यांच्याकडे पाहूं लागली. तोंच श्रीअण्णासाहेबांनीं कठड्यावर पाय ठेवून खालीं उडी टाकली! माडी पुष्कळच उंचीवर होती, व इतक्या उंचीवरून उडी टाकल्यामुळें मोठा अपघातच व्हावयाचा; परंतु सुदैवानें तसें झालें नाहीं. तेव्हांपासून मंडळी मात्र आपापले ठिकाणीं चपापून गेली; व पुढें कोणीही कधीं त्यांच्या वाटेस गेला नाहीं.

मुंबईच्या यांच्या रहिवासांतील सांगण्यासारख्या किरकोळ गोष्टी ह्मणजे एकदां यांस साठ दिवसांचा झालेला विषम, आणि हाताचा अपघात. याविषयीं ते असें सांगत कीं, बाजूची मंडळी औषधोपचार करण्याची फार खटपट करी, परंतु विषम आहे असें लक्षांत येतांच त्यानीं असा क्रम ठेविला कीं, आणलेलीं औषधें जशींच्या तशींच मोरींत फेंकून द्यावीं, आणि एक लहानशी ठरावीक वाटी भरून भात व तेवढेंच पाणी नेमानें घेऊन मुकाट्यानें पडून रहावें. यांच्या प्रकृतीचा हा विशेष गुण होता कीं, त्यांस पाणी प्यावयास अतीशयच थोडें लागे. यांच्याइतकें कमी पाणी पिणारा माणूस पाहण्यांत येतच नाहीं. उन्हाळ्याचे दिवस नसतांना, स्नानसंध्येंत पोटांत जाणाऱ्या पाण्यापलीकडे यांस पाणी पिण्याची आवश्यकता कधीं वाटली नाहीं, व उन्हाळ्याचे जरी दिवस असले, आणि नीटनेटकें खाणेंही झालें असलें, तरी देखील एकाद्या प्याल्यापलीकडे, ह्मणजे सुमारें ५।१० तोळे पाण्यापलीकडे जास्त पाणी पितांना त्यांस कोणी पाहिलें नाहीं! असो. अशा रीतीनें साठ दिवस काढल्या-

वर ताप उतरला, व मंडळी औषधोपचाराची तारीफ करूं लागली. तेव्हां त्यांचीं सारीं औषधें कोठें गेलीं तें अण्णासाहेबांनीं दाखविल्यावर सर्वांस मोठी मौज वाटली. तसेंच, एकदां ते विहिरीच्या काठावर बसले असतां एकाएकीं खालीं पडून यांचा हात मोडला होता, परंतु योग्य ते उपाय करण्यांत आल्यामुळें तो चांगलाच सुधारला, आणि पुढें कोणासही तें व्यंग दिसून आलें नाहीं. मूळव्याधीची उपाधी यांना लहानपणापासूनच होती, व तिचा त्रास मुंबईस असतांही होत असे. याशिवाय इतर कांहीं त्रास या बारावर्षांत झाल्याची माहिती नाहीं. यांना मोठी खोड ह्मणजे पोटांत पडल्यावर थोडावेळ तरी निजलें पाहिजे, अशी होती, व ती शेवटपर्यंत तशीच होती. असें थोडें तरी पडावयास न सांपडल्यास त्यांच्या प्रकृतीची घडी थोडी तरी बिघडत असे, व तेवढ्याकरितां सवड नसल्यास ते खाण्यापिण्यासच फांटा देत ! 'ही संवय आपणास बाळपणापासूनच होती, व कॉलेजमध्यें वगैरे देखील एका बाजूस बसून, दुसऱ्या विद्यार्थ्याचे आड आपण झोंप काढीत असूं,' ह्मणून ते सांगत. त्यावेळीं पान तमाखूचें यांस विलक्षणच वेड होतें, परंतु एका प्रसंगानें त्यांनीं तें झटकून टाकलें, व पुढें देखील कोणी आग्रहानें दिल्याखेरीज, स्वतः होऊन कधीं त्यांचें सेवन केलें नाहीं. तो प्रकार असाः— यांचा असा प्रघात असे कीं, सुमारें अदपाव तमाखू व त्यामानानेंच शेंदीडशें पानें रोज फस्त करावयाची, परंतु कधीं पीक बाहेर टाकणें ठाऊक नव्हतें! आणि पुढें देखील तमाखू खाऊन थुंकणाऱ्या माणसाची ते अतीशय चेष्टा करीत. एक वेळ असा योगायोग झाला कीं, बोलण्याचे भरांत भान न राहून तमाखूची थुंकी यांनीं बाहेर टाकली. कर्मधर्मसंयोगानें यांच्या कॉलेजांतील एक प्रोफेसर त्याच वेळीं खालून चालले होते, त्यांनाच हा प्रसाद मिळाला ! प्रोफेसर साहेबांनीं मोठ्या त्वेषानें मान वर केली, परंतु अण्णासाहेबांस पाहतांच थोडेसें हंसून त्यांनीं रस्ता सुधारला. या गोष्टीची स्वतः अण्णासाहेबास एवढी लाज वाटली कीं, त्यांनीं लागलीच एका ब्राह्मणास बोलाविलें, आणि चांदीच्या सर्व उंची संचासह ती पानतमाखू त्याच्या पदरांत टाकली, आणि तेव्हांपासून आमरणांत तिला आपण होऊन हात लावला नाहीं ! कोणत्याही प्रकारचा अशा तऱ्हेचा त्याग हा त्यांचा स्वभावधर्मच होता. यांच्या घराण्यांत एक फार मोलाची हिऱ्याची आंगठी होती, व त्या आंगठीस तिच्याशीं संबंध असलेल्या कांहीं इतिहासा-

मुळें विशेष महत्व होतें. ती अंगठी बोटांत न घालतां अण्णासाहेब जानव्यास लावून ठेवीत; कारण कसलाही अलंकार घालणें यांस कधींही आवडलें नाहीं. एकदां स्नान करीत असतां, कोणी विशेष माहिती नसलेला गृहस्थ यांच्याकडे आला, व 'द्रव्याची कांहीं तरीं मदत द्या, मी फार पेंचांत आहे,' ह्मणून त्यानें याचना केली. त्यावेळच्या मानानें ५।५ शें रुपये दरमहा यांच्या राहणी-वर खर्च होत होता, आणि थोडीबहुत अवांतर मिळकत असे, तरी यांना पैसा कधींच पुरा पडला नाहीं, आणि हात नेहमींचाच अडचणींत असे. त्या-वेळींही अण्णासाहेबांजवळ पैसा नव्हता, व तो गृहस्थ तर फार निकड करूं लागला. तेव्हां यांनीं कमरेची आंगठी काढून चटकन् त्याच्या हातांत टाकली, व 'मुकाट्यानें वाटेस लाग,' ह्मणून सांगितलें! नुसती 'कोण, कोठला,' वगैरे चौकशी देखील केली नाहीं! परंतु लागवणकर वैद्यांनीं त्यास जातांना व येतांना पाहिलें होतें; पुढें अण्णासाहेब पुण्यास आल्यावर सहजगत्या आंगठी नाहिंशी झाल्याचें घरच्या मंडळीस समजून आलें. त्यामुळें त्यांस फार वाईट वाटलें, व हळू हळूं आंगठीची गोष्ट अण्णासाहेबांस विचारून घेऊन, लागवणकरांच्या साह्यानें त्या माणसाचा पत्ता नानासाहेबांनीं काढला. त्यानें ती कल्याणास कोणीकडे गहाण टाकली होती. तेथपर्यंत पत्ता लावून व रक्कम देऊन, गहाण नानासाहेबांनीं सोडून आणलें!

या सर्व काळांत १८७४ व ७५ हीं सालें फार महत्त्वाचीं होतीं; कारण या सालीं मल्हारराव गायकवाडांचें प्रकरण झालें. या प्रकरणांत रानडे व अण्णा-साहेब यांनीं फार उत्साहानें भाग घेतला होता. महाराजांस द्रव्यसहाय्य करण्याविषयीं पुण्याहून तार पाठविण्यांत आली होती, हें प्रसिद्धच आहे. स्वतः अण्णासाहेब इंदुप्रकाशचे बातमीदार या नात्यानें बडोद्यास गेले होते, व महाराजांवरील आरोप नाशाबीत ठरण्याजोगा पुरावा पुढें करण्यांत त्यांनीं फारच मेहनत घेतली. त्यांनी या प्रकरणांत केवढी कामगिरी केली, व काय खटपटी केल्या, वगैरेंचा सर्व इतिहास खरोखरच फार मनोरम असला पाहिजे. त्यांच्या सर्व प्रयत्नांमुळें खटल्याचें स्वरूप असें कांहीं झालें कीं, अखेरीस ज्यूरीमध्यें मतभिन्नता झाली, व मल्हारराव जरी दोषी ठरविले गेले, तरी त्यांच्या शिक्षेचें स्वरूप सौम्य होऊन, बडोदा संस्थान जिवंत राहिलें. या

प्रकरणांतील अण्णासाहेबांच्या कामगिरीचा इतिहास बाहेर येण्यास आतां कांहींच मार्ग नाहीं, ही फार दिलगिरीची गोष्ट आहे.

मुंबईस यांच्या संग्रहास जीं माणसें होतीं, त्यांमध्यें माधवराव नामजोशी या कारवाई गृहस्थाचा यांना बराच उपयोग झाला. अनेक तऱ्हेचे उद्योग करण्याची उरकशक्ति यांच्या अंगीं किती होती, हें यांच्या न्यूस्कुलांतील वगैरे कामगिरीवरून दिसून आलेंच आहे. यांची सोय करण्याकरितां म्हणून पुढें 'किरण' नांवाचें मराठी, आणि 'डेक्कन स्टार' नांवाचें इंग्रजी पत्र अण्णासाहेबांनीं पुण्यास काढलें होतें. परंतु अनेक उद्योगांमुळें नामजोशांच्या हातून स्वतंत्र रीतीनें काम रेटेना. म्हणून मद्रासेस जाण्यापूर्वी या पत्राचें रूपांतर करून, केसरी व मराठा यांचा अवतार करण्यांत आला. 'केसरी व मराठा, यांचें डिक्लेरेशन माझ्या हातचें आहे,' असें ते त्या पत्रांविरुद्ध बोलणारांस मोठ्या अभिमानानें सांगत असत. यासंबंधींच्या व्यवहारावर सही करून, आणि तो कायदेशीर रीतीनें पक्का करून लागलीच ते इ. स. १८८० आक्टोबर १२, मंगळवार या दिवशीं मद्रासेस जाण्याकरितां गाडींत बसले. १९१६ सालीं आक्टोबरच्या नऊ तारखेस रात्रीं बोलत असतां, आज या गोष्टीस बरोबर ३६ वर्षें झालीं, म्हणून त्यांना आठवण झाली, व त्यामुळें भाषण निघून मद्रास प्रकरणांतील पुष्कळ गोष्टी त्यांनीं मोकळ्या मनानें सांगितल्या. तारखा आणि दिवस हे बारकाईनें लक्षांत ठेवण्याची त्यांची हातोटी कांहीं विलक्षण होती.

त्यावेळच्या संग्रहांतील उल्लेख करण्याजोगतीं माणसें म्हणजे गणपतराव सहस्रबुद्धे, पेरुअय्या, भिकाजीपंत देशपांडे, भाऊ निरुळकर वगैरे होत. भाऊ-निरुळकर हा मनुष्य मोठ्या मुत्सद्दी डोक्याचा व खोल विचारांचा होता. त्यास इंग्रजीचें ज्ञान मुळींच नसल्यामुळें भिकाजीपंत देशपांडे या इंग्रजी फर्डें जाणणाऱ्या गृहस्थास बरोबर देऊन. ही जोडी त्यांनीं सालरजंगाकडे पाठविली होती, व तेथें यांनीं चांगलीच कामगिरी केली. गणपतराव सहस्रबुद्धे हा गृहस्थ ब्रह्मवर्तास पेशव्यांच्या परिवारांत होता; व कानपूर ग्वालेर वगैरे ठिकाणच्या युद्धांत त्यानें स्वतः तरवार गाजविली होती. बंडाचा मोड झाल्यावर कांहीं दिवस अज्ञातवासांत काढून हा अण्णासाहेबांच्या सहवासांत आला. अण्णासाहेबांजवळ दोन स्वयंपाकी व वाढपे स्वतंत्र असत, त्यांतील मुख्य काम गणपत-

रावाचें होतें. स्वयंपाकी म्हणून राहिलेला हा गृहस्थ कांहीं औरच आहे, असें अण्णासाहेबांनीं तेव्हांच ओळखिलें, व पुढें यानेंही आपली सर्व हकीगत सांगितली. तेव्हां त्यास नांवास स्वयंपाकी म्हणून अण्णासाहेबांनीं जवळ ठेवून घेतला, व दुसऱ्या स्वयंपाक्याची योजना केली. हा सर्व व्यवस्था पहात असे, व त्याची बायकोही मोलकरीण म्हणून राहिली होती. परंतु, झाडसारव करणें, निसणें-टुपणें यांपलीकडे हलकीं कामें तिला त्यांनीं कधींच सांगितलीं नाहींत. खालच्या मजल्यावरील एक खोली स्वतंत्र त्यांना दिली होती, व तेथें ते रहात. असे कैक लोक त्यावेळेस सर्वत्र हिंडत होते; आणि त्यांना एकत्र करून पुन्हा जंग करण्याची हिंमत वासुदेव बळवंतानें धरली असल्यास अगदींच आश्चर्य नाहीं. या गणपतरावाच्या म्हणण्याप्रमाणें, नानासाहेबांवर बंड उपस्थित केल्याचा नुसता आळ आहे, ते प्रथमपासूनच विरुद्ध होते, परंतु नाइलाज म्हणून त्यांस बंडांत सामील होणें भाग पडलें, मात्र भाग घेतल्यावर मोठ्या शौर्यानें त्यांनीं काम केलें, असेंच दिसतें.

या भटकणाऱ्या लोकांची कल्पना येणारी एक गोष्ट अण्णासाहेब सांगत असत. वर्तमानपत्र वाचीत, आंतल्या अंगास अण्णासाहेब बसले होते, व पुढील खोलींत गणपतराव भाजी चिरीत होते. इतक्यांत ' खारे पिस्ते, ' असा आवाज करीत एक फेरीवाला दाराशीं आला. तेव्हां जरा गडबडून गणपतरावानें मुद्दाम पुढें वांकून त्यास पाहिलें, आणि दोघांची दृष्टादृष्ट होतांच किंचित् हास्य करून तो पिस्तेवाला पुढें निघून गेला. अण्णासाहेबांचें लक्ष आपल्याकडे होतें कीं काय हें पाहण्याकरितां एक दृष्टी त्यांच्याकडे टाकून गणपतराव कामांत गढून गेला. थोड्या वेळानें अण्णासाहेबांनीं 'फेरीवाला कोण होता, व तुमची काय खूण पटली,' म्हणून उघडच विचारलें. त्यावरून त्यांनीं सर्व हकीकत सांगितली. तो इसम मुसलमान असून मोठ्या घराण्यांतला होता; व बंडाच्या उत्पादकांपैकीं एक प्रमुख होता. त्यानंतर त्याची फेरी आली म्हणजे, मुद्दाम त्यास बोलावून पुष्कळ किंमतीचे पिस्ते विकत घ्यावे, असा क्रम पडला. अण्णासाहेब मद्रासेस गेल्यावर या माणसांचें पुढें काय झालें, तें कांहींच कळलें नाहीं.

पेरुअय्या हा तेलंगा ब्राह्मण अशाच रीतीनें आश्रयास आला. तो स्वभावानें साधाभोळा परंतु बाणेदार होता. कमरेला एक पंचा, अंगावर उपरणें, आणि डोकीस फडकें गुंडाळलेलें असें हें काळेंकुट्ट ध्यान पाहून, येथें कांहीं

विशेष असेल, अशी कोणास कल्पनाही व्हावयाची नाहीं. परंतु गायनकलेंतील ती एक अपूर्व वस्तु होऊन गेली, म्हणून अण्णासाहेब सांगत, व त्याचें गाणें कानांत असल्यामुळें, रहिमतखां-सुद्धां कोणाचेहि सूर आपल्या कानांत भरत नाहींत, म्हणून ते सांगत. गुरुवरअय्या म्हणून एका गृहस्थापाशीं बारा वर्षें अध्ययन केल्यावर पोटाच्या मागें लागून आपण बाहेर पडलों, म्हणून तो सांगत असे. त्याची वृत्ति अत्यंत निस्पृह, आणि नम्र होती. गुणाचें प्रदर्शन करण्याचा कल त्यास ओकारीसारखा वाटे. त्याची मोठी खोड म्हणजे, त्याला नित्य कांहीं तरी पक्वान्न पानांत लागे. अशी सोय असली म्हणजे स्वारीची कळी खुलत असे. त्याच्याकरितां श्रीखंड वगैरे कांहीं तरी पदार्थ रोज करण्याची सोय अण्णासाहेबांनीं लावून दिल्यावर, अण्णासाहेब यांचेजवळ तो पुष्कळ दिवस मोठ्या आनंदांत राहिला. बारा वर्षांत फक्त सूर काढण्याचाच अभ्यास त्यानें केला होता! परंतु ते सूर कसे असत, हें दोन तीन उदाहरणां-वरून समजून येईल. आर्यवैद्यकांत ज्याला सन्निपात म्हणतात, त्या तापाचें असें लक्षण आहे कीं, रोग्यास झोंप मुळींच येत नाहीं; आणि जर कांहीं उपा-यानें झोंप आली, तर ताप उतरून रोगी बरा होतो. अशा दोन तीन रोग्यांस अय्याची सुरावट ऐकवून औषधाशिवाय बरें केल्याचें ते सांगत. गाणें ऐकतां ऐकतांच रोग्यास झोंप लागे, व जागे झाल्यावर ते बरे होंण्याच्या मार्गास लागत! सारंग हा राग त्याचा विशेष असून, माध्यान्हीस भोजनापूर्वी त्यांत तो भ्रामरी सूर काढीत असे. तो तर ऐकण्यास अतिशय अद्भुत होता. शेजारच्या खोलींतील माणसास असें वाटावें कीं, हजारों भुंगे एका ठिकाणीं जमून मोठा गोंगाट करीत आहेत! परंतु तो इतका मधुर असे कीं, कांहीं झालें तरी तेथून हालण्याचें मनांत येत नसे. स्वतः गुरुवरअय्या यांचा मल्हार रागांत हातखंडा असे, असें पेरुअय्या सांगत असे.

मुंबईंतील धनिक गृहस्थांकडून सहाय्य मिळवावें म्हणून, पेरुअय्या राव-साहेब मंडलिक यांचेकडे गेले. मंडलिकांनीं ‘ आपणांस या कलेंतील कांहींच गम्य नाहीं, व फुरसत नाहीं, ’ म्हणून सांगितलें, व कांहीं दक्षिणा द्यावयास काढली; परंतु ती नाकारून ‘ जेव्हां केव्हां थोडी फुरसत आपणांस असेल, तेव्हां तितक्याच वेळांत मी गाऊन दाखवीन, आपण माझा गुण पहावा, पैशाची प्रतिष्ठा नाहीं, ’ अशी त्यानें विनंति केली. मंडलिकांचा उद्योग व वक्त-

शारिपणा हे आदर्शभूतच होते. 'संध्याकाळीं संध्या करीत असतां फार तर १५ मिनिटें आपणांस देतां येतील,' म्हणून त्यांनीं सांगितलें. तेव्हां कबूल करून पेरुअय्या ह्या वेळेस हजर झाले. त्यावेळीं थोडक्यांत कांहीं म्हणून, 'इतकीं मिनिटें झालीं महाराज!' म्हणून त्यांनीं सांगितलें. पाहतात तों खरेंच! त्यानंतर तेच सूर त्याच्या अर्ध्या वेळांत म्हणून, 'पांच मिनिटें झालीं, पहा.' म्हणून अय्यानें सांगितलें. त्यावरून कौतुक वाटून, मंडलिकांनी आणखी कांहीं वेळ गावयास सांगितलें. सरतेशेवटीं या कालज्ञानाचें, आणि त्याला अनुसरून वाटेल त्या साचांत सूर बसविणें व तसे प्रत्यक्ष गळ्यांतून काढून दाखविणें, या स्वरावरील प्रभुत्वाचें, त्यांना इतकें आश्चर्य वाटलें कीं, लागलीच उठून त्यांनीं शंभर रुपये अय्याच्या पुढें ठेवले!

तसेंच एकदां ग्वाल्हेरचे प्रसिद्ध महमदखां यांच्या गाण्याचा जलसा झाला होता, त्यावेळीं देखील अय्याच्या गाण्यानें त्यांस स्वतःसच चकीत केलें. खांसाहेबांची मिजास व ऐट खूपच होती, व त्यावेळेस अनायासें कोणी पंजाबांतले प्रसिद्ध तबलजीखांही साथ करावयास होते. तेहि मोठे श्रीमान् व पिढीजाद धंदेवाले होते. त्यांच्या तबल्यास रेशमाच्या काढण्या आणि चांदीची हातोडी असा थाट असे. थोडा वेळ गायन झाल्यावर अण्णासाहेब यांनीं पेरुअय्यास पुढें व्हावयास सांगितलें. त्यावरून त्यानें खांसाहेबांस, म्हटलेली चीज पुन्हा कांहीं मिनिटांत, म्हणण्यास सांगितलें. अय्याचें हें असलें ध्यान आणि एवढ्या समाजांत टाकलेला प्रश्न, यामुळें खांसाहेब अर्थातच अतिशय चिडून गेले, आणि बरीच बाचाबाची झाली. सरतेशेवटीं तीच सुरावट खांसाहेबांनी सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या वेळांत अय्यानें स्वतः म्हणून दाखविली! तेव्हां दोन्हीहि 'खां'चा पुरा रेच उतरला. पेरुअय्या हें नांव चमत्कारिक असल्यामुळें त्यांस अण्णासाहेबांनीं 'शंकरअय्या' असें नांव दिलें होतें, व त्याच नावानें मंडळी त्यास हांक मारीत. पुढें याचें काय झालें वगैरे गोष्टीची कांहीच माहिती त्यांनीं दिली नाहीं. बहुतकरून तो आकस्मिक कालवश झाला असावा, नाहीतर हें रत्न कोठें तरी खास चमकलें असतें.

मुंबईस असतांना घडलेली एक गोष्ट त्यांच्या सांगण्यांत कोणापाशींही वारंवार येत असे. एकदां केरूनाना छत्रे हे मुंबईस आले होते. पुण्याहून मनुष्य आला म्हणजे तो यांचेच बिऱ्हाडीं यावयाचा; आणि नानासाहेबांचा व

व यांचा आतिशय लोभ, म्हणून केरूनाना अण्णासाहेबांचेकडे उतरले होते. रात्रीं जेवणें खाणें झाल्यावर बैठक उठून गेली, आणि अण्णासाहेब यांनींहि आराम खुर्चीवर आंग टाकलें. परंतु नाना हे आडवे झालेले उठून कांहीं तरी पुटपुटत फेऱ्या घालूं लागले. त्यावर " नाना तुम्हीं काय म्हणतां ? " म्हणून अण्णासाहेबांनीं प्रश्न केला. तेव्हां " मी विष्णु-सहस्रनाम म्हणतों. " म्हणून नानांनीं सांगितलें. तें ऐकून अण्णासाहेबांस आश्चर्य वाटलें. कारण नाना हे नास्तिक म्हणून प्रसिद्ध होते. आतिशय आश्चर्यानें अण्णासाहेबांनीं विचारलें, ' तर मग देव आहे असें मानतां तुम्हीं ? ' त्यावर गंभीरपणानें नानांनीं सांगितलें, " खरें सांगूं तुला ? देव आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा विचार करावयास मला कधीं वेळच सांपडला नाहीं; आणि सारें बाजूला ठेवून, केवळ त्याच प्रश्नाच्या मागें लागण्याची गरजही पण कधीं भासली नाही. परंतु मी स्वभावतः गणिती मनुष्य आहे, तेव्हां मीं असा हिशेब केला कीं, जर देव नसला, तर आपणावर कसलीही जबाबदारी नसल्यामुळें, आपल्या वेळेचे आपणच मालक आहों. तेव्हां चोवीस तासांतून पंधरावीस मिनिटें जर आपण गटारींत पैसा फेंकल्याप्रमाणें अगदीं वांया घालविलीं, तरी आपल्याला कोण विचारणारा आहे ? परंतु जर देव असला, आणि आयुष्याबद्दल मनुष्य त्याला जबाबदार असला, तर मात्र मेल्यावर तो ' आयुष्यांत माझ्याकरितां काय केलेंस ?' म्हणून मला विचारील; व त्यावेळेस जर कांहीं उत्तर देतां आलें नाहीं, तर माझी दशा कशी होईल ? त्यापेक्षां त्याच्या प्रीत्यर्थ म्हणून दहापंधरा मिनिटें रोज घालवावींत, म्हणजे जर तो असला, आणि त्यानें विचारलें, तर एवढें ठांसून सांगतां येईल कीं, ' दुसरें तर मीं कांहीं केलें नाहीं, परंतु रोज पंधरा मिनिटें तुमच्या प्रीत्यर्थ खर्च केल्याखेरीज मी कधीं अन्नग्रहण केलें नाहीं ! ' आजीनें लहानपणीं मला तीन नियम सांगून ठेवले होते. विष्णुसहस्रनाम म्हणणें, शाळिग्रामास तुलसीदल वाहणें, आणि गंध लावणें; हे तीन नियम मी जसेच्या तसेच अजूनही पाळतों. जर देव नसेल, तर रोज पंधरा मिनिटें मी फुकट घालविलीं एवढाच अर्थ होईल, परंतु माझें नुकसान मात्र होणार नाहीं ! " त्यावर, ' गंध लावणें व शालिग्रामास तुलसी वाहणें, हें प्रवास वगैरे अडचणींत कसें साधतें ? ' म्हणून विचारतां, नानांनीं सांगितलें कीं, ' अडचणीच्या प्रसंगीं त्यांची प्रत्यक्ष सोय नसेल, तर मी निदान कपाळावरून बोट तरी फिरवितों; आणि

तुळशी वाहिल्याची भावना करून, ‘ मी तुला तुळशी वाहिल्या, ’ असें तोंडानें तरी म्हणतों; म्हणजे माझ्याकडे वंचकता येत नाहीं ! ” या गोष्टीचें तात्पर्य प्रत्येकानें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इतक्या मोठ्या प्रश्नाचा इतक्या थोडक्यांत सुंदर निकाल लावणारी अशी शहाणपणाची विचारसरणी दुसऱ्या कोठेंही सांपडावयाची नाहीं. सुशिक्षित म्हणविणाऱ्या मोठमोठ्या विद्वानांनीं, विश्वाचीं कोडीं उकलण्याचा अट्टाहास करीत असतांही, नानांचें अनुकरण करणें योग्य आहे, म्हणून ही गोष्ट अण्णासाहेब कोणालाही वारंवार सांगत असत.

यावेळीं घडलेल्या मुंबईतील इतरही पुष्कळ गोष्टी, म्हणजे लीवॉर्नर साहेब यांस एका पार्शी पोरानें कसें ठोकलें होतें, आणि नानामोरू या प्रसिद्ध कडक न्यायमूर्तीनें लीवॉर्नर यांस आरोपीच्या पिंजऱ्यांत घालून दहा रुपये दंड कसा केला होता, अथवा शंकर पांडुरंग पंडित यांच्या पोरकटपणामुळें ऐन दिवाळीच्या दिवशीं त्यांची कशी फजिती झाली, वगैरे शेंकडों मनोरंजक हकीगती ऐकावयास येत; परंतु अण्णासाहेबांच्या चरित्राशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळें, त्या येथें सांगत न बसतां, सालरजंगप्रकरणाच्या मनोरंजक हकीगतीकडे वळूं.

# सालरजंग प्रकरण व मद्रास.

सुराज्यं स्वातंत्र्ये किमपि न तु शक्यं सति परे
सुराज्ये जीवानां सकलपुरुषार्थो ननु सुखम् ।
सुखं सर्वेषां तत् सदसदिति वैयक्तिकमहो
कथं तभ्दूत्यर्थं प्रभवति विना तस्य यजनम् ॥

एकादा प्रांत हातीं असल्याशिवाय आपल्या मनाजोगें काम करितां येणार नाहीं, अशी त्यांची लवकरच खात्री झाली, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्या दिशेनें विचार करितां, त्यांच्या पसंतीस निजामानें नुकताच इंग्रजांचे ताब्यांत दिलेला वऱ्हाड प्रांत उतरला. साचलेल्या कर्जाच्या फेडीकरतां ह्मणून हा प्रांत इंग्रजांस देण्यांत आला होता; परंतु ही गोष्ट त्यावेळचे निजामसाहेब आणि खुद्द मुख्य दिवाण सर सालरजंग, यांच्या मनास फार लागून राहिली होती. सालरजंगांची योग्यता मुत्सद्दी या नात्यानें किती मोठी होती, व बिस्मार्क, गॉर्ड्सचेकॉफ वगैरे इतिहासप्रसिद्ध मुत्सद्यांत बसण्यास ते कसे लायक होते, हीं गोष्ट सर्वमान्य आहे. स्वतः त्यांनीं विलायतचा प्रवास केला होता, त्यामुळें इंग्रजी राज्याचा आणि राजनीतीच्या अंतःस्थितीचें त्यांस चांगलेंच ज्ञान होतें. वऱ्हाड प्रांत इंग्रजांपासून सोडवावा, अशी त्यांस रात्रंदिवस तळमळ होती. अशा स्थितींत सालरजंगास हाताशीं घेऊन, आणि ज्या कर्जाच्या बदल्यांत वऱ्हाड घेण्यांत आलें होतें, त्या कर्जाची फेड करून, जर वऱ्हाड मोकळें करतां आलें, तर आपले मनोरथ सिद्धीस नेण्यास तें कार्यक्षेत्र उत्तम आहे, असें अण्णासाहेबांनीं ठरविलें, व त्याप्रमाणें सालरजंगाशीं बोलणें सुरू केलें, आणि सालरजंगासही हा विचार पटून त्यांनींही आपली अनुकूलता दाखविली.

इतकें होण्यास अण्णासाहेबांना किती खटाटोप करावा लागला असेल, कोणकोणतीं धोरणें ठेवावीं लागलीं असतील, कोठें कोठें संधानें बांधावीं लागलीं असतील, वगैरे इतिहास मनोरंजक असला तरी सदैव अज्ञातच राहणार. त्यावेळच्या काम करण्याच्या दिशेसंबंधानें ते सांगत असत कीं, कांहीं

मंडळींना हैद्राबादेस ठाणें देऊन वसविलें होतें. तेथील सर्व कारवाई भाऊ निरुळकर यानें करावी, आणि सालरजंगाच्या भेटींचीं वगैरे दरबारी कामें भिकाजीपंत देशपांड्यानें आटोपावीं, अशी योजना केली होती. कोणच्याही तऱ्हेची बातमी ही पोष्टानें न पाठवितां स्वतंत्र माणसांचीच डाक ठेवली होती. पत्राची पोंच अथवा कार्डांत लिहिण्याजोगता किरकोळ मजकूर असला, तरी तो कार्डांतून अगर पत्रांतून न जातां, रजिष्टर पत्रानें पाठवीत असत. या कामाकरितां उत्तरहिंदुस्तानांतील संस्थानांतील कांहीं श्रीमंत गृहस्थही हातीं घेतले होते. बरेच दिवस प्रयत्न केल्यावर प्रकरण रंगास आलें, आणि सालरजंगही त्यांस सामील झाला. असें ठरलें कीं, हैद्राबादेस एक भली थोरली बँक काढून दहा बारा कोटींचें कर्ज तिच्यामार्फत निजामसरकारास द्यावें, आणि त्याच्या बदल्यांत, वऱ्हाडचा कारभार अण्णासाहेबांनीं आपल्याकडे घ्यावा. अर्थात जरी राजकीय धोरणें गुप्त असलीं तरी, निजाम सरकार कांहीं तरी मोठें कर्ज काढण्याचा विचार करीत आहे, ही गोष्ट चोंहीकडे झाल्याखेरीज राहिली नाहीं; व एवढें कर्ज पुरविण्यास तयार असलेलीं कांहीं माणसेंही पुढें आलीं. सालरजंगाची मुख्य अट अशी होती कीं, या कर्जास ब्रिटिश सिक्युरिटी अथवा कोणत्याच तऱ्हेची ब्रिटिश मध्यस्थी नको. ही अट पुरी करणें, इतर पोटभरूंना शक्य नसल्यामुळें अण्णासाहेबांचाच हेतु सिद्धीस गेला, आणि त्याप्रमाणें बँक काढण्याची खटपट सुरू झाली. तेवढ्याकरितां इमारत घेऊन रंग वगैरेही नीट केणें चाललें होतें, असें त्यांनीं सांगितलें. परंतु अण्णासाहेब हे कोणी सरदार अगर संस्थानिक नसल्यानें, एका तरुण हायकोर्ट वकीलावर कितपत भरंवसा ठेवावा, आणि त्याच्या नादीं लागावें, याचा उमज सालरजंगास पडेना. तेव्हां हा मनुष्य उगीच थापा देतो, अथवा त्याची पतच तेवढा आहे, याची परीक्षा करण्याकरतां सालरजंगानें एक दिवस निरनिराळ्या खटाटोप्यांच्या कारकुनांना बोलाविलें, आणि सवाल टाकला कीं, 'बँकेचें व्हावयाचें तें होईल, परंतु कांहीं निकडीच्या कामाकरितां सरकारला आतांच्या आतां २ कोट रुपये हवे आहेत; तेव्हां ब्रिटिश सिक्युरिटीवांचून, हे तुम्ही कोणी देऊं शकाल काय?" त्यावर लोकांना मोठाच विचार पडला, व कोणी 'आम्ही आमच्या मालकांस विचारतों' म्हणून, कोणी 'ब्रिटिश

सिक्युरिटी असेल तर, लागल्यास २ काय पण तीन कोटी देतों, पण ब्रिटिश सिक्युरिटीशिवाय देतां येणार नाहीं, ' म्हणून मोकळे झाले. भिकाजीपंत देशपांडे आणि भाऊराव यांस विचारतां त्यांनीं ती गोष्ट तत्काळ कबूल केली; त्यावर ' आपल्या मालकास विचारून पहा, उगीच कांहीं तरी सांगूं नका, ' म्हणून सालरजंगनें सांगितलें. परंतु या हस्तकांची स्वतःच्या मालकाच्या कर्तबगारीवर एवढी जबर श्रद्धा होती कीं, त्यांनीं ठांसून उत्तर दिलें ' त्यांत काय विचारावयाचें आहे ? आपण सांगाल तेव्हां पैसे पावते करतों ! ' तेव्हां आश्चर्य वाटून सालरजंगानें सांगितलें कीं, 'मुंबईस तार करून बसल्या बैठकीस पैसे मागवावे. ' त्याप्रमाणें तार करून उत्तर येईपर्यंत उभयतांसही त्यांनीं कचेरींतच बसवून ठेवलें.

इकडे अण्णासाहेब नुकतेच मेडिकल कॉलेजमधून घरीं येऊन बसले होते, तोंच तार येऊन पोहोंचली. तेव्हां ' काय करावें ? ' असा त्यांनाही क्षणभर विचार पडला. कांहीं वेळ शांतपणें विचार करून लागलीच ते उठले, आणि प्रो० डॉ० स्मिथ यांची गांठ घेऊन, त्यांना ' अमुक तऱ्हेचें कर्ज पाहिजे ' म्हणून त्यांनीं सांगितलें. स्मिथनें, शिष्यावर कितीहि लोभ असला तरी, इंग्लिश लोकांच्या व्यावहारिकपणास अनुसरून मध्यस्थी करण्याचें कबूल केलें, आणि त्याची दलाली नीट ठरल्यावर, त्याच्या मध्यस्थीनें फ्रेंच बँकेंतून '२ कोटी रु. तयार आहेत, कोठें व कसे पाठवावयाचे, तें कळवा, ' म्हणून सालरजंगास तार करविली ! अण्णासाहेबांचे कारकून या अधिकपणानें फजीत होणार म्हणून सालरजंगाला खात्री वाटत होती. तेव्हां तार वाचतांच तो अगदीं चकित होऊन गेला ! त्यानें ' तूर्त असूं द्या, मागाहून कळवितों, ' अशी तार केली. मग मात्र त्यास विश्वास पटून त्यानें या कामास हात घातला, आणि फ्रेंच बँकेच्या मार्फतच १२ कोटींचें कर्ज काढावयाचें ठरविलें. परंतु हा त्याचा खेळ अण्णासाहेबांस चांगलाच भोंवला. स्मिथची दलाली, आणि २ कोटींवरील व्याज-थोड्याच वेळाचें कां होईना-यांची रक्कम अशीच कांहीं तरी २-४ लाख रु. होती, व हें कर्ज अखेरपर्यंत अण्णासाहेबांस फेडावें लागलें !! पुढचा व्यवहार सिद्धीस गेला असता तर हें बोकांडीं बसलें नसतें, परंतु सालरजंगाच्या मृत्यूनें सर्वच घोंटाळा करून टाकला.

इतकें झालें तरीही सालरजंगास पुरती खात्री वाटेना. म्हणून त्यानें आपल्या हातानें एक फारशी पत्र लिहून, त्याचा सेक्रेटरी भिकाजी रुस्तुम यास मुंबईस अनपेक्षित पाठविलें, आणि त्यास बजावून ठेवलें कीं, ‘ जर सर्व तऱ्हेनें अण्णासाहेब पसंतीस उतरतील, तरच हें पत्र अण्णासाहेबांस द्या, नाहीं तर देऊं नका. ’ अण्णासाहेबांस या गोष्टीची वार्ताही नव्हती. सकाळीं दहा वाजण्याच्या सुमारास ते आरामखुर्चीवर वर्तमानपत्र वाचीत पडले होते. कर्मधर्मसंयोगानें, हैद्राबादेस कामाकरतां गेलेला यांचा एक इसम त्याचवेळीं बोरीबंदरवर गेला होता. भिकाजी रुस्तुम याचा स्पेशल डबा पाहून त्यास सालरजंगच आला असें वाटलें, व तसाच व्हिक्टोरिया करून अण्णासाहेबांकडे येऊन त्यानें त्यांस ही बातमी सांगितली. तेव्हां ज्याअर्थी हा अनपेक्षित आला आहे, त्याअर्थी घरीं भेटावयास येईल, असा तर्क करून अण्णासाहेब त्याच्या स्वागताच्या तयारास लागले. मुरारजींकडून त्यांचा दिवाणखाना त्यांनीं मागून घेतला, व त्यांसही कचेरींत न जातां घरीं राहण्यास सांगितलें. त्यांची गाडी दारासमोर उभीच होती; आणि दुसऱ्याही दोन अशाच उभ्या करून ठेवल्या. जवळ तर नेहमींप्रमाणें कांहींच शिल्लक नव्हतें, म्हणून शेजारच्या पानवाल्याकडून ३०० रु. घेतले, आणि अत्तर गुलाब वगैरे पानसुपारीच्या तयारीस माणसें पिटाळलीं. इतकें होत आहे तों, भिकाजी रुस्तुम याजकडून निरोप आला कीं, “ मी भेटावयास आलों आहे, केव्हां येऊं, तें कळवावें ” तेव्हां-‘आतांच या, मी घरींच राहतों, ’ असा यांनीं निरोप पाठविला, आणि कांहीं बड्या मंडळींसही बोलावलें. थोड्याच वेळानें भिकाजी रुस्तुम येऊन पोहोंचले. त्यांस समोरील बाजूनेंच दिवाणखान्यांत नेऊन मुरारजी शेट J. P. वगैरेंचा परिचय करून दिला. भिकाजींस असें वाटलें होतें कीं, आपला निरोप आल्यावर लागलीच अण्णासाहेब भेटण्यास तयार होणार नाहींत, परंतु त्यांनीं लागलीच बोलाविलें, तेव्हां हा सर्व त्यांचा नेहमींचाच इतमाम असेल असें वाटून, व J. P. सारखीं बडीं माणसें तेथें पाहून तो तर गारच होऊन गेला ! नंतर दोघांचें एकीकडे जाऊन बरेंच भाषण झालें. त्याच्या योगानें तर स्वारी चारी मुंड्या चीत होऊन गारेगार होऊन गेली; व तो एवढा भाळून गेला कीं, त्यानें तें पत्र अण्णासाहेबांस दिलें; इतकेंच नाहीं, तर अण्णासाहेबांच्या विनंतीवरून स्वतः आपल्या हातानें त्याचें इंग्रजी भाषांतर लिहून दिलें ! त्यानंतर सर्व

मंडळींना दरबारी थाटाची पानसुपारी होऊन, अतिशय प्रसन्न चित्तानें हे प्रतिनिधि हैद्राबादेस परतले.

या सर्व गोष्टींमुळें अण्णासाहेबांचा मोठाच लौकिक होऊन इतरही मोठमोठीं कामें त्यांच्याकडे येऊं लागलीं होतीं. मद्रास इलाख्यांत करवट म्हणून एक शहर आहे, तेथील व्यंकट परमाळ नांवाच्या राजानेंही अशाच कांहीं कामाकरितां अण्णासाहेबांकडे संधान लावलें. हें संस्थान सुमारें ६० लक्षांचें असून राजाही मोठा चांगला आणि धर्मात्मा होता. हैद्राबादेस बँक उघडली म्हणजे सर्व करार मदार होऊन, बरोबरीच्या नात्यानें अण्णासाहेब व सालरजंग यांनीं भेटावें असें ठरलें होतें. त्या पूर्वी हें मद्रासचें काम आणि दुसरीं कांहीं किरकोळ कामें पक्की करावीं, आणि सर्व मिळून एकदमच कामास सुरुवात करावी, अशा इराद्यानें त्यांनीं स्वतः मद्रासेस जावयाचें ठरविलें. आपणास मद्रासला जास्त वेळ लागेल, अशी कल्पना नसल्यामुळें त्यांनीं अर्थातच मागील अनेक कारभारांची व्यवस्था लावून ठेवली नाहीं. एकाद्या कामाकरितां सहज गांवीं जावें, त्याचप्रमाणें ते याही कामास निघाले. त्यांना भेटण्याची सालरजंगास उत्कंठा असल्यामुळें, आणि यांनीं आधीं भेटीस जाण्याचें नाकारल्यामुळें, 'मद्रासेस जातांना गाणगापूर स्टेशनवर आपण भेटतों,' म्हणून सालरजंगानें कळविलें होतें. तेव्हां दिवस व गाडी नक्की करून वाटेंत पुण्यास एकदोन कामें करावीं, आणि आळंदीस स्वामींचें दर्शन घेऊन पुढें जावें, अशा इराद्यानें ता. ९ आक्टोबर १८८० शनिवार, या दिवशीं संध्याकाळीं अण्णासाहेब मुंबईहून निघाले, ते रात्रीं ९ वाजतां पुण्यास येऊन पोहोंचले. बरोबरीच्या मंडळीची जेवणाखाणाची व्यवस्था लावून स्वतः थोडेंसें दूध घेऊन त्यांनीं आंग टाकलें. मोठ्या पहाटें उठून *गणपतरावांना बरोबर घेऊन आळंदीस जावें, असा त्यांचा

---

*गणपतरावः — गणपतराव आठवलेः—फार पूर्वी, अण्णासाहेब कोठेंही बाहेर निघाले, म्हणजे हे त्यांच्याबरोबर शरीररक्षकासारखे असत. महाराजांच्याकडे आळंदीस जावयाचें म्हणजे तर यांनाच बरोबर घेऊन जावयाचें, असा अण्णासाहेबांचा नेम असे. ९७ च्या प्लेगांत हे वारले. यांचे नातू नरहरपंत आठवले पदवीधर असून समर्थ विद्यालयांत काम करीत आहेत.

विचार होता. सकाळीं त्याप्रमाणें करावें म्हणून मुखमार्जन करतात, तों +गणेश-भट्टांनीं येऊन सांगितलें कीं, कृष्णाजीपंत रानडे पहाटें चार वाजतां नदीवरून येतांना आले होते, व त्यांनी आळंदीचे स्वामी येथें आले आहेत, असें सांगितलें. तेव्हां आयतेंच काम झालें, असें वाटून अण्णासाहेबांस बरें वाटलें, परंतु जास्त कांहीं कल्पना डोक्यांत आली नाहीं. गणेशभट्टांस कांहीं मोत्यांचा व्यवहार करावयाचा होता, व त्यासंबंधानें, कृष्णाजीपंत रानडे यांच्याशी त्यांचें भाषण झालें होतें. भट्ट हे पहाटें चार वाजतां नानाच्या हौदावर नेहमींप्रमाणें आंघोळ करून आले, आणि धोतरें वगैरे वाळत घालीत होते. वाळत घालतां घालतां त्यांनीं मागें पाहिलें, तों कृष्णाजीपंत उभे. तेव्हां ‘ अरे कृष्णाजीपंत, या वेळेस तूं कोणीकडे ? ’ म्हणून ते उद्गारले. त्यावर ‘ मी नदीवर गेलों होतों, परंतु येतांना मोत्यांची आठवण मला झाली, व तुम्हांस घ्यावयाचीं असतील तर सकाळीं मजकडे या, म्हणून सांगावें, एवढ्याकरितां मी इकडे वळलों, ’ एवढें म्हणून कृष्णाजीपंत जावयास निघाले, परंतु तितक्यांत सहज आठवण झाल्यासारखें करून म्हणाले, ‘ हो, आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे; आळंदीचे स्वामी येथें आले आहेत, बरें कां, ’ इतकें बोलून व सकाळीं यावयास सांगून कृष्णाजीपंत परत गेले. उजाडल्यावर गणेशभट्ट कृष्णाजीपंता-कडे जाऊन म्हणूं लागले कीं, ‘पहाटें तूं मोत्यांचें काय म्हणत होतास ?’ तेव्हां आश्चर्य वाटून कृष्णाजीपंत म्हणाले, ‘ हें काय ? मी केव्हां काय म्हणालों ? तुम्हांस घ्यावयाचीं असतील तर आपण जाऊं, ’ त्यावर भट्टांनीं सारा पाढा वाचला. तेव्हां अधिकच विस्मित होऊन कृष्णाजीपंतांनीं सांगितलें कीं, आपण केव्हांही नदीवर स्नानास जात नाहीं, व आजही गेलों नव्हतों, इतकेंच तर काय, पण आळंदीच्या स्वामीची व आपली मुळींच ओळख नसून, त्यांना काळेंगोरें पाहिलेंही नाहीं! शेवटीं बरीच बोलाचाली होऊन, मोत्यांचा विषय तितकाच राहिला,

---

\+ गणेश भट्ट:—एक भिक्षुकब्राह्मणाचें कुटुंब अण्णासाहेब यांच्या मातो-श्रींनी सांभाळिलें होतें. अखेरपर्यंत त्यांतील हे भटजी अण्णासाहेबांवरच अवलंबून होते. यांच्या दुसऱ्याच्या कामास धांवून जाण्याची वगैरे अण्णासाहेब नेहमीं तारीफ करीत, व जटायूची त्यांना उपमा देत. यांना पोरबाळ कांहीं नसल्याकारणानें यांची उत्तरक्रिया देखील अण्णासाहेब यांचे हातूनच झाली.

व भट्टांनीं घरीं येऊन अण्णासाहेबांस ही सारी हकीगत सांगितली. तेव्हां 'काय असेल कोण जाणें,' असें म्हणून अण्णासाहेब उगाच राहिले. परंतु तेव्हांच त्यांच्या मनास खूण पटली कीं, ही स्वामींची कांहींतरी लीला आहे.

त्यानंतर पुढें ते स्वामींस भेटावयास गेले. या प्रसंगीं स्वामींची व अण्णासाहेबांची भेट आळंदीस झाली, आणि स्वामींनीं अण्णासाहेबांना मद्रासेस जाऊं नये, ह्मणून सांगितल्यावरून दोघांचें एक रात्र बरेंच भांडण झालें, असें कित्येक मंडळी 'खात्रीलायक' सांगतात, परंतु तें अगदीं चुकीचें आहे. कारण वरील हकीगत व कृष्णाजीपंत रानड्यांचा चमत्कार, हीं दोनही खुद्द अण्णासाहेबांच्या तोंडून कमींत कमी ५।६ वेळ तरी मी व आणखी इतरांनीं ऐकिलीं आहेत, असें अतिशयोक्ती न करतां ह्मणतां येईल. या प्रसंगीं महाराजांनीं अण्णासाहेबांस फक्त एकच गोष्ट सांगितली कीं, 'उद्यां जाऊं नकोस.' यावर 'आपण जाणारच,' असें अण्णासाहेबांनीं आग्रहानें सांगितल्यावरून 'बरं तर, जाशील तसा येशील,' एवढेंच ह्मणून 'दादा, मद्रासहून येतांना कंचीस जाऊन ये,' असें महाराजांनीं त्यांना सांगितलें. यापरतें दोन्ही दिवसांत या विषयासंबंधीं कांहीं जास्त झालें नाहीं. ता. ११ आक्टोबर सोमवार रोजीं मराठा व केसरी, यांचें डिक्लेरेशन करून, दुसरे दिवशीं, मंगळवारीं, मद्रास मेलनें अण्णासाहेब मद्रासेस जावयास निघाले. कांहीं आकस्मिक सरकारी कामामुळें, ठरल्याप्रमाणें सालरजंगास गाणगापुरास येतां आलें नाहीं, व त्यानंतर, लागलीच ते परलोकास गेल्यामुळें दोघांची भेट होण्याचा संभव राहिला नाहीं.

मद्रास येथें असतांना, मद्रासेजवळ तिरुपूर म्हणून छोटेसें गांव आहे, तेथील सुब्रावअय्या म्हणून कोणा गृहस्थांच्या घरीं यांचा मुक्काम होता. बरोबर आचारी, गडी, वगैरे स्वतंत्र सरंजाम होता. त्यापैकीं यांचा गडी रामा धायरीकर हा अजूनही धायरीस हयात आहे. ज्या कामाकरितां अण्णासाहेब मद्रासला गेले होते, तेंही जवळ जवळ वऱ्हाडच्या मसलतीसारखेंच होतें. परंतु ते तेथें गेल्यावर नेहमींप्रमाणें एक कटकट उत्पन्न झाली, आणि तें काम रेंगाळलें. हातीं घेतलेलें काम मध्येंच सोडणें यांस ठाऊक नसल्यामुळें, यानंतर ते मद्रासेसच ठाणें देऊन बसून राहिले. त्यामुळें तेथें जवळ जवळ ३॥ वर्षें मुक्काम पडला ! हा वेळ त्यांनीं पुरश्चरणें व इतर तऱ्हेचे

अभ्यास यांत घालविला, असें मानण्यास जागा आहे. काम रेंगाळण्याचें कारण असें कीं, दरबारांत या कारस्थानाच्या विरुद्ध असलेली एक बाजू होती, आणि तिच्यांतच राजपुत्राचा इंग्रजी शिक्षक (Tutor) होता. या कामावर राजपुत्राची सही असल्याशिवाय तें पुरें होत नव्हतें, आणि राजपुत्र तर शिक्षकाच्या हातामध्यें होता, त्याला तो सही करूं देईना. यावर तें काम अडून राहिलें. दोनही पक्षांची कांहीं काळ मोठी झटापट झाली असावी. प्रतिपक्षानें यांच्या कामांत अडथळा आणण्याकरितां अनेक खटपटी केल्या, त्यांतच एकदां यांस एका खटल्यांत गुंतवून कोर्टापुढें ओढण्याचा, व एकदां गोळी घालून मारण्याचा केलेला प्रयत्न, हे प्रमुख होत. एकदां हे शौचास गेले असतां दुरून त्यांच्यावर गोळी घालण्यांत आली; परंतु सुदैवानें ती डोक्यास न लागतां केसांस चाटून गेली. तसेंच एकदां संध्याकाळीं रेल्वेच्या बाजूनें फिरत असतां एक वासरूं रूळावर उभें होतें; आणि समोरून मोठ्या वेगानें गाडी येत होती. आवाजासरशी तें दूर व्हावयाचें, परंतु तितक्यांत पाय अडखळून खडीवरच तें वासरूं पडलें, आणि पुन्हा धडपडून उभें राहणार, तोंच गाडी जवळ येऊन पोहोंचली. आतां हें वासरूं खास मरणार असा विचार येऊन, त्यासरशीच अण्णासाहेब यांनीं तारेवरून ताड्दिशीं उडी मारली, आणि त्या वासरास उचलून पलीकडे उडी मारतात, तोंच धाड् धाड् करीत त्या जागेवरून एंजिन निघून गेलें. डोळ्याचें पातें लवण्याइतकाही उशीर झाला असता, तर दोघांचाही चूर होऊन गेला असता. त्या गाडीचा गार्ड हा प्रतिपक्षाचा असल्यामुळें अण्णासाहेबांस अडकाविण्यास या संधीचा चांगला उपयोग होईल असें डोक्यांत येऊन, या कृत्याचें कौतुक न करतां उलट त्यांच्यावर ट्रेसपासची फिर्याद करण्यांत आली! त्यावरून पुढें बराच खटला चालून शेवटीं त्यांतून अण्णासाहेब निर्दोष बाहेर पडले. अशा तऱ्हेच्या अनेक कटकटी झाल्यावर अखेरीस यांचें काम साधण्याची संधी आली. त्या इंग्रजी शिक्षकाचा मुलगा कांहीं रोगानें आजारी पडला, व आतां वाचत नाहीं, असें दिसूं लागलें. डॉक्टर या नात्यानें अण्णासाहेब यांची अतिशय प्रसिद्धी असल्यामुळें, नाक मुठींत धरून त्याला यांच्याकडे यावें लागलें. तेव्हां 'आपण औषध देतों, व मुलगाही वांचेल; परंतु सही झाली पाहिजे,' असें अण्णासाहेबांनीं सांगितलें, व त्याप्रमाणें सर्व घडून आलें. आतां हीं सर्व प्रकरणें थर्डास लागलीं असें वाटूं लागलें, तोंच एकाएकीं हैद्राबादेहून

सालरजंगाच्या आकस्मिक मृत्यूची तार येऊन पोहोंचली ! सालरजंग कॉलऱ्याच्या विकारानें मृत्युमुखीं पडला असो, अथवा कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें विषप्रयोगास बळी पडला असो, त्याच्या मृत्यूनें एवढ्या मोठ्या खटाटोपाचा पाया, नाहींसा होऊन सारीच इमारत ढांसळून पडली ! तरीपण हिंमत न सोडतां, मद्रासचें काम उरकण्याच्या मागें ते लागले, व त्यांतून त्यांनीं पुन्हा कांहीं तरी उभारणी केली असती, परंतु यांचा हा प्रयत्न रंगास येतो न येतो तोंच, व्यंकट परमाळही तसाच मृत्युमुखीं पडला, व त्यामुळें तेंही कारस्थान मोडून पडलें !

अशा स्थितींत, कांहीं काळ, कांहींच न करितां मद्रासेंतच त्यांनीं एकांतपणें घालविला असल्यास नवल नाहीं. देवधर्मावर यांची आधींपासून श्रद्धा होतीच, आणि इंग्रेजी विद्येच्या संस्कारानें जो चौकसपणा उत्पन्न व्हावयाचा तोही यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाला होता. कोणत्याही गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन खात्री करावयाची, हा तर यांचा स्वभावच होता; आणि बुद्धि अतिशय सूक्ष्म व सर्वगामी असल्यामुळें, विचाराच्या योगानें याविषयीं जें कांहीं समाधान माणसास यावयाचें, तें त्यांस आलें असलें पाहिजे. त्याच्या जोडीस योगशास्त्र, वेदमार्ग, अतींद्रिय अस्तित्व, वगैरे गोष्टींची प्रत्यक्षता श्रीमहाराज, तात्यासाहेब, यांच्या सहवासानें आणि दुसऱ्याही अनेक लोकांच्या प्रसंगानें यांस झाली होती. परंतु त्यायोगानें आपला उद्योग सोडून एकांतिक सुखांत पडून राहण्याची त्यांना कधींही इच्छा झाली नाहीं. उलट, सर्वांची साधेल तितकी जोड आपल्या प्रयत्नांस देऊन तो अधिक यशस्वी करूं, अशी त्यांची उमेद होती; आणि केवळ मानवी कर्तृत्वाची रग जास्त असल्यामुळें, प्रयत्नवाद कितीही खरा असला तरी मनुष्याच्या जीवनाची आणि यच्च यावत् विश्वाच्या व्यापाराची सर्व सूत्रें हातांत ठेवून, त्यांच्यावर स्वतःच्या तंत्रानें हुकमत चालविणारा कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुं कोणी तरी ईश्वर आहे, असें त्यांना जिवंतपणें वाटत नव्हतें. मनुष्यप्रयत्नांच्या सर्व अभिमानास लाजविणारी मृत्यु ही एक जगांत बिनतोड गोष्ट आहे, व त्यानें अशा रीतीनें ऐनवेळीं हात दाखविल्यामुळें, मनुष्यप्रयत्नाचा पंगूपणा, आणि हजारों युक्तिवादांस हार न जाणारें विश्वनियामकाचें अस्तित्व यांचा कांहीं विलक्षण बोध त्यांच्या अंतःकरणांत झाला असावा. तेव्हां अर्थातच, त्यांच्या पद्धतीप्रमाणें, हें कोडें सोडविणें हेंच अधिक महत्वाचें होऊन बसलें. परंतु

विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट हीच कीं, कोणत्याही तऱ्हेच्या मनोदुर्बलतेमुळें अथवा व्यक्तिविषयक कारणामुळें, या कोड्याचें महत्त्व त्यांस वाटलें नाहीं. देश आणि देशबांधव यांच्यापुढें व्यक्तीचें--स्वतःचें--महत्त्व त्यांस कधीं वाटलेंच नाहीं.

येथून पुढें, मद्रासेस आणि इकडे आल्यानंतरही, त्यांचें जें आयुष्य गेलें, त्याच्या परिवर्तनाचें असें कारण आहे. प्रयत्नांत अपयश आल्यामुळें त्यांची जी भयंकर निराशा झाली, त्या योगानें हिंदुस्तानच्या भवितव्यतेविषयीं निराश होऊन, त्यांनीं ' हरि हरि ' करीत देहसार्थक केलें, अशी सामान्य समजूत आहे. परंतु त्यांचें स्वतःचे सर्व प्रसंगांतले उद्गार आणि उपदेशांची सरणी यांचा समन्वय केला, तर ही समजूत अतीशय अज्ञाणीपणाची, व आंधळेपणाची आहे असें स्पष्ट दिसतें. नंतरही ह्मणजे सर्व चळवळी सोडून देऊन ते गेंड्याप्रमाणें एकटेच रमत होते, असें नाहीं; इतकेंच कीं, मुद्दाम होऊन त्यांनीं कधीं कांहीं केलें, अथवा कोणास करावयास सांगितलें, असें झालें नाहीं. शिशुपाल-वक्रदंतांस मारल्यावर धनुष्याची प्रत्यंचा कायमचीच उतरून ठेवणाऱ्या श्रीकृष्णांनीं पुढें भारतांत जें काम केलें, तेंच यापुढील आयुष्यांत अण्णासाहेबांनीं केलेंसें दिसलें, परंतु ह्याच्या जोडीस खरोखर जें काम केलें, तें दिसत नसल्यामुळें, अगर त्याच्या उपयुक्ततेची व आवश्यकतेची कल्पनाच नसल्यामुळें, त्यांनीं प्रत्यंचा उतरून ठेवली एवढें मात्र दिसतें, व त्यामुळें त्याविषयीं अनेक तर्क उत्पन्न होतात. एवढ्या मोठ्या विद्वान् माणसानें एकाद्या देवळस्या म्हातारीप्रमाणें आपल्या कार्याची प्रत्यक्ष दिशा वदलून, तपश्चर्येवर भर द्यावा, हें कोणासही कसेंसेंच वाटतें. परंतु यांतच अण्णासाहेबांचें खरें मोठेपण आणि अलौकिकत्व आहे. परंतु जेथें देवावरच विश्वास नाहीं; व त्याचें अस्तित्व ह्मणजे एक केवळ औपचारिक अथवा पुस्तकी बाब होऊन बसली आहे, तेथें असें व्हावयाचेंच, व याविषयीं आणि त्यांच्या पुढील कार्याविषयीं केव्हांही दुमत रहावयाचेंच. त्या कार्याच्या स्वरूपाविषयीं कितीही वाद असला, अथवा तें व्यर्थ ह्मणून वाटत असलें, तरी देखील एक गोष्ट सर्वांसच कबूल करणें भाग आहे. ती ही कीं, निराशेमुळें प्रयत्न-हत होण्याचा कमीपणा, अथवा स्वतःच्या पारमार्थिक कल्याणास लागण्याचा स्वार्थीपणा, हे दोष त्यांच्या अंगीं लागत नसल्यामुळें, वाटेल त्या तावांतूनही जसेंच्या तसें बाहेर निघणाऱ्या सोन्याप्रमाणें

जगाच्या इतिहासांत ही एक अद्भुत विभूती होऊन गेली. पुढील ३६ वर्षांचा कार्यक्रम हाही साधनस्वरूपच असून, त्यांच्या मूळच्या ध्येयाचेंच तें एक साधन होतें, हें लक्षांत ठेवलें ह्मणजे त्यांच्या आयुष्याचें कोडें आपल्यापुरतें तरी उकलून, स्वतःपुरती तरी आपल्या आयुष्याची दिशा ठरविण्यास त्याचा उपयोग होतो. ध्येय जरी तेंच राहिलें, तरी ध्येयसाधनांत हा असा विलक्षण फरक कसा झाला, याचा संगतवार इतिहास तर काय, परंतु त्रोटक माहितीहि मिळणें अशक्य आहे.

मी स्वतः दोन चार वेळां हा विषय काढला होता, व खुद्द त्यांनाच 'वारंवार अडथळे आल्यामुळें तुम्हांस वाईट वाटलें नाहीं कां ?' म्हणून विचारलें होतें. त्यावर "छे, मुळींच नाहीं, कारण त्या वेळीं हिंमत मोठी होती, या उद्योगांत नाहीं, तर त्या उद्योगांत यश मिळेल, हा नाहीं साधला तर दुसरा कोणता तरी साधेल, असें वाटत असे." "तर मग तुमच्या साधनांची दिशा कां बदलली ?" असें विचारल्यावरून, 'तशा रीतीनें हें काम होणार नाहीं, असें वाटल्यावरून,' असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. त्याचप्रमाणें, 'मी पुढें यत्न केला असता, तर कदाचित् यश आलेंही असतें, परंतु झालें हें ठीक झालें. आतां जो देशाचा भाग्योदय होईल, तो खरा व चिरकालिक होईल; तें केवळ व्यक्तीच्या महत्त्वापुरतें झालें असतें,' असे उद्गार त्यांनीं कैक वेळां काढलेले पुष्कळांच्या ऐकण्यांत आहेत. ही खात्री त्यांची कशी झाली असावी, हें कळण्यास मोठेंसें साधन नाहीं, तरीपण ती मद्रासेसच झाली असावी, एवढें खास. मी स्वतः त्यांना निरनिराळ्या वेळीं वेगवेगळ्या रीतीनें प्रश्न केले होते, त्यांतील तीन चार वेळांचीं उत्तरें माझ्या चांगलीं लक्षांत आहेत. एकदां कांहीं कारणावरून ते जरा रागावले होते. त्यांच्या शांत स्वभावाची घडी बिघडून, ते मनापासून रागावलेले फक्त एक दोन ठराविक प्रसंगींच दिसत. पंतांनीं म्हटल्याप्रमाणें, 'गतसद्वृत्त' मुलांना पाहून, त्यांचें 'हितरत गुरुमन' कळकळे, तेव्हां ते फार रागावल्यासारखे दिसत. तसेंच कोणी त्यांचीं सर्व कामें आटोपल्याखेरीज खाण्याची गोष्ट काढली, म्हणजे त्यांस मनापासून राग येई; व 'खाण्याकरतांच माझा जन्म आहे कां ?' असें ते विचारीत ! अशाच कारणानें एकदां मजवर रागावून 'फराळ करीत नाहीं,' म्हणून सांगत असतां ते म्हणाले कीं 'माझ्यापाशीं गोडवें गोडवें काम नाहीं;...अशा रीतीनें हें

काम ( देशाचें ) होणार नाहीं, अशी खात्री एकदां माझी झाली, तेव्हांपासून मी स्वतः कोणासही तसें करावयास सांगितलें नाहीं, ' असें ते म्हणाले; व जें त्यांस करावेसें वाटलें, तो ' कारखाना आज ३६ वर्षे सुरू आहे, ' असें त्यांनी सांगितलें. त्याचप्रमाणें एकदां पूजेकरितां महाराजांच्या तसबिरीपाशी * उभे असतां त्यांच्या आयुष्यांतील या स्थित्यंतराचाच विषय निघाला होता. तेव्हां ते चटकन् बोलून गेले–' अरे, सर्व मांडणी दाखविली ना महाराजांनीं!' इतकेंच बोलून भानावर आल्यासारखे होऊन त्यांनीं तितक्यांतच दुसरा विषय सुरू केला.

प्रसंगानें याच ठिकाणीं त्यांच्याविषयीं एक गैरसमज दूर करावासा वाटतो. कधींहि कोणास हताश करावयाचें नाहीं,. नाउमेदीचे किंवा असलेच अमंगल शब्द स्वतःच्या तोंडून काढावयाचे नाहींत, कोणी कसाही मनुष्य आला, तरी त्याला न सोडतां, भरपूर उमेद देऊन, असेल तेथूनच इष्ट दिशेकडे वळवावयाचा, व स्वतः आपण कोणी विशेष आहों, अशा अधिकारपणाचा वास देखील येणार नाहीं, इतक्या सहज तें करावयाचें, असा त्यांचा धारा असे. किंबहुना निवळ अकल्याणकारक अशा गोष्टी खेरीजकरून, इतर केव्हांही कोणाच्याही बाबतींत, स्वतःसंबंधानें अथवा दुसऱ्या संबंधानेंहि 'न'कार उच्चारण्याचा त्यांच्या वाणीस विटाळच होता. त्यामुळें त्यांच्याकडे देशाच्या भवितव्यतेची कित्येक लोक चर्चाही करीत, व त्यांस भविष्यज्ञान असेल, अशा आशयानें कांहीं तरी त्यांच्या तोंडून काढून घेण्याचा प्रयत्न करीत. परंतु अशा प्रकारें प्रकट होणें हें त्यांच्या अनुपमेय निरहंकारतेस असाध्य असल्यामुळें, अशा मंड-

---

* श्रीमंत बाबासाहेब सांगलीकर यांनीं श्री. महाराजांचे फोटो काढविले होते. ती हकीकत परिशिष्टांत आहे. त्यांतील एक लहान फोटो दिवाणखान्यांत खुर्च्यांचे खोलीचे दाराशीं कोपऱ्यांत टांगलेला असे. अण्णासाहेब यांचें मुख्य दैवत काय तें हें. पुढें महाराजांच्या लहान मोठ्या पुष्कळ तसबिरी त्यांचेकडे आल्या, तरी अखेरपर्यंत त्यांची पूजेची हीच मुख्य तसबीर असे. घरच्या देवांची पूजा स्वतः ते कधीच करीत नसत. फक्त, स्नान झाल्यावर त्यांस भस्म व बेल वहात. यांचें पूजेचें अवडंबर असें कधीच नसे. थोडेसें भस्म व बेल येवढें असलें म्हणजे त्यांस पुरे. हीं पूजासामग्री घेऊन वर सांगितलेल्या तसबिरीजवळ ते उभे रहात, व पठणद्वारा तासतास पूजा करीत.

ळींत भविष्यवाणी तर त्यांनीं कधींच काढली नाहीं, उलट त्यांच्या ज्या कल्पना असत, त्यांच्याच अनुरोधानें त्यांस हिंमत देऊन, " हो हो, खास असेंच महाराज करतील, " अशा आश्वासनानें " त्यांतल्यात्यांत योग्य त्या दिशेनें काम करा," म्हणून सुचवीत.त्यामुळें देशाच्या भवितव्यतेविषयीं अण्णासाहेबांनीं " अमुक भविष्य केलें आहे, " " तमुक भविष्य केलें आहे, " अशा पुष्कळ आख्याइका ऐकूं येत. परंतु त्यांत खरोखर तथ्य काय आहे, हें त्यांच्या वरील स्वभाववर्णनावरून लक्षांत येईल. अशाच एका आख्यायिकेवरून, म्हणजे १९०७ सालीं " अजून १३ वर्षें अवकाश आहे, " अशा त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून, १९१८ किंवा १९१९ सालाच्या सुमारास हिंदुस्तान स्वतंत्र होणार, असा कित्येक लोकांस भ्रम होता. मी एकदां हाच प्रश्न त्यांना केला होता. त्यावेळीं लढाई सुरू असून तिच्याविषयीं अण्णासाहेबांस फार कळकळ आहे, व आतां हिंदुस्तान स्वतंत्र होईल, असें कित्येकांस वाटे. तेव्हां "लढाईत तुमचा जीव खरोखरीच गुंतला आहे कां ? व या लढाईनें आम्हीं खरेंच स्वतंत्र होणार कां?' म्हणून मीं स्पष्ट विचारलें.तेव्हां ते असें म्हणाले, 'मला त्यांत कांहींच महत्त्व नाहीं, काय व्हावयाचें आहे, हें मला ठाऊक आहे; तरी पण एक गोष्ट खरी कीं, हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां हें युद्ध सुरू झालें आहे, व हळूं हळूं सर्व राष्ट्रांचीं डोकीं या चरकास लागतील; व कांहींही झालें तरी, इंग्रज लोकांच्या इभ्रतीस यामुळें कमीपणा येईल.' तेव्हां, 'तुम्ही लोकांशीं या बाबतींत अशा तऱ्हेनें कां बोलतां ?' असा मुद्दा पुढें आला. त्यावर, 'तुम्ही लोक इतके गचाळ आहां कीं, दुसऱ्या तऱ्हेनें वागावयाची सोयच नाहीं; 'उद्यां होईल,' असें जर म्हटलें तर हातपाय ताणून पडाल, आणि 'परवां होईल,' म्हणून सांगितलें, तर छाती फुटून मरून जाल, अगर बेताल व्हाल, एकूण कर्माच्या नांवानें बोंब, आणि व्हावयास तर पाहिजे कोणीकडून तरी कर्म,' असें त्यांनीं सांगितलें. त्यावर मीं त्यांस विचारलें कीं "सांगावयाचें नसेल तर सांगूं नका; पण असें चक्रांत टाकूं नका महाराजांनीं तुह्मांस तर हें दाखविलें आहे ना ?" ते म्हणाले, " हो. " पुन्हा मीं विचारलें " तर मग केव्हां होणार आहे ? " त्यावर " मी सांगत नाहीं, " असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. मी १९२० सालाच्या कल्पनेचा उल्लेख केल्यावरून ते इतकेंच म्हणाले कीं, "चक्रगति पालटली, एवढें मात्र खरें; परंतु तेवढ्यावरून एकदम

संध्याकाळची सकाळ होईल, असें मानण्याचें कारण नाहीं. रात्र जावयाची आहे. पण चक्र फिरलें एवढें खास. कांहीं तरी फायदा होईल." इतक्या स्पष्ट-पणें या विषयावर पुन्हा केव्हांही ते बोलले नाहींत; असो.

इतकें खरें कीं, मद्रास येथें असतांनाच, अर्जुनास ज्याप्रमाणें युद्धाचें भवितव्य श्रीकृष्णांनीं दाखविलें, त्याचप्रमाणें कशाही रीतीनें असो, पुढची मांडणी दिसून आल्यामुळें म्हणा, अथवा इतर कोणच्याही रीतीनें म्हणा, या देशाच्या उद्धारास ईश्वरीकृपा व ईश्वरीसामर्थ्य यांची आवश्यकता आहे, अशी अण्णा-साहेबांची खात्री झाली; व स्वतःच प्रत्येक गोष्टीस लागण्याच्या त्यांच्या स्वभावास अनुसरून, कोणचीही गोष्ट घडवून आणण्याचें त्या बाजूचें साधन जें तप, त्या उग्र तपास ते स्वतःच बसले; आणि तें त्यांनीं किती अवंचकतेनें व कठोरपणानें ३६ वर्षें अव्याहत केलें, तें पुण्यांतील सर्व दर्जांच्या बायकां-पोरांपासून सर्वांसच ठाऊक आहे. त्यांचा स्वतःचा शहाणपणाचा आणि विद्वत्तेचा अतिशय मोठा लौकिक होता. त्यांच्या ऐहिक उत्कर्षाकडे सर्व आप्त-इष्ट व परिचित यांचे डोळे लागून राहिले होते; व तो उत्कर्षही इतका प्रचंड होणारा होता कीं, संपत्तीच्या दृष्टीनें त्यांना सारा वाडा सोन्यानें भरून टाकतां आला असता, व कॅलिफोर्नियापासून तों टोकिओपर्यंत सर्व जगाला हालवून सोडणारी त्रिखंड कीर्ति मिळवितां आली असती. संबंध हिंदुस्तानचें निर्विवाद नायकत्व अथवा अनाभिषिक्त भूपतित्व तर त्यांच्या हातचा मळ होता. पुढें देखील, त्यांनीं साधु या नात्यानें तोंडांतून एक शब्द काढला असता, तर कोणी कधीं ऐकलेंही नाहीं असे त्यांचे देव्हारे माजले असते ! येवढें वैभव, व असामान्य कीर्ति आणि सत्ता, हीं नुसतीं पायाखालीं तुडवून टाकावयाचींच नव्हे, तर सकल स्वजनांचीं अंतःकरणें करपून टाकून इरसाल मूर्खपणा अथवा भ्रांतिष्टपणा पदरांत घेऊन, एकाद्या सामान्य माणसाप्रमाणें रोजच्या फिकीरी डोक्यावर घ्यावयाच्या, व वर पुन्हा अयाचितपणें आयुष्य काढण्यास तयार व्हावयाचें, या विक्षिप्तपणास केवढी छाती पाहिजे, केवढा दृढविश्वास, व किती कळकळ पाहिजे, यांची अंशतः तरी कल्पना करून पहावी; व या मोठेपणास कोठें तोड आहे कां, म्हणून सांगावें.

याप्रमाणें दिशा पालटल्याबरोबरच त्यांना वेड लागल्याच्या, दाढी वाढवून ते जोगी बनल्याच्या, वगैरे अनेक अफवा पुण्यास येऊन थडकल्या. ते आतां

पुण्यास येतच नाहींत, असेंही मंडळीस वाटलें. परंतु ‘ घावरण्याचें कारण नाहीं, ’ असें महाराजांनीं सांगितल्यावरून नानासाहेब थोडे स्वस्थ होते. इकडे येण्याचा विषय खेरीज करून उभयतांचा पत्रव्यवहारही होता, व अण्णासाहेबांचें पत्र आलें ह्मणजे आळंदीस जाऊन महाराजास दाखवावें, असा नानासाहेबांचा परिपाठ होता. यावेळीं अण्णासाहेबांस एक थोरली मुलगी, व एक मुलगा अशी दोन अपत्यें होतीं. त्या काळच्या रिवाजाप्रमाणें मुलीचें लग्न लांबणीवर टाकणें शक्य नसल्यामुळें, नानासाहेबांनी तें उरकून घेतलें. मुलाच्या मुंजीकरितां तरी अण्णासाहेबांनीं यावें, अशी त्यांची इच्छा होती, परंतु अण्णासाहेब तर अनेक प्रकारचीं साधनें करीत मद्रासेस तळ देऊन बसले. त्यांचा येथून हालण्याचा कांहींच रंग दिसेना.

मद्रासेस असतांना घडलेल्या पुष्कळ गोष्टी ते सांगत. मंत्रशास्त्राच्या प्रतीतीची, किमयेच्या प्रयोगाची, दूरदर्शनाची, कालीय सर्पाची,–वगैरे त्यांतील प्रमुख होत. मद्रास जवळ मैलापूर ह्मणून एक लहानसें गांव आहे. तेथें एक मिशनरी आपलें पांडित्य प्रगट करीत असतां, एका हलक्या जातीच्या मनुष्यास राग येऊन त्यांचा वाद झाला. अण्णासाहेबही त्यावेळीं तेथेंच उभे होते. शेवटीं ‘ अरे साहेब, तुला मंत्रतंत्राची प्रतीती पहावयाची आहे काय ? ’ असें ह्मणून त्या इसमानें, जवळच कोळसा पडला होता तो घेऊन, समोरच्या दगडावर एक मोठा सनाटा विंचु काढला, व साहेबांस त्याच्या नांगीस हात लावण्यास सांगितलें. केवळ त्याची टर उडवावी ह्मणून, पाद्री भटानें नांगीवर जोरानें बोट ठेवलें. तोंडानें कांहीं तरी बडबड चालूंच होती. बोट ठेवलें मात्र, तोंच मोठी किंकाळी फोडून त्यानें जमिनीवर लोळण घेतली ! व त्याची आग शांत करावी ह्मणूनच कीं काय, त्याची इमानी टोपी जवळच्या गटारांत पाणी भरण्यास गेली !! हा प्रकार पाहून सर्वांची अक्कल गुंग होऊन गेली. पोलिस जमादार तेथेंच उभा होता, परंतु त्यासही कांहीं करतां येईना; कारण तो इसम तर दुसरे कांहींही न करतां शांतपणानें उभा होता. अशा स्थितींत काय करावें तें सुचेना, व साहेब तर ‘ मेलों ! ’ ह्मणून आरडत पडला होता. सरते शेवटीं जमादार साहेबांनीं त्या इसमाचीच पायधरणी केली, व ‘ पाद्री साहेबांस वांचव, ’ ह्मणून सांगितलें. तेव्हां ‘ बरें आहे ’ ह्मणून, त्यानें तोंडाकडून हात फिरवून तें चित्र पुसून टाकलें. त्यासरशी पाद्र्याच्या सर्वांगांतील

कळा बंद होऊन, टोपी हातांत घेऊन एकवारही मान वर न करतां त्यानें धूम ठोकली! त्या प्रसंगाचें स्मरण होऊन ही गोष्ट सांगतांना केव्हांही अण्णासाहेबांना हसूं येत असे.

अशाच प्रकारची दूरदर्शनाचीही एक गोष्ट ते सांगत. पंचपक्षी विद्या म्हणून एक क्षुद्र विद्या आहे. तिच्या योगानें ही सिद्धि येते. ती विद्या साध्य असलेला एक मनुष्य यांच्या पाहण्यांत आला. तेव्हां त्यास आपले समोर बसवून घेऊन त्यांनीं रामास शेजारच्या गांवीं एका इसमाकडे पाठविलें; व तो काय करतो आहे, म्हणून या माणसास विचारलें. तेव्हां जसजसा रामा गेला, व त्यानें वाटेंत, लघ्वीस बसणें, कोणाशीं भाषण करणें, चिलीम ओढणें वगैरे ज्या ज्या क्रिया केल्या, त्या त्या सर्व त्यानें क्रमानें तशाच सांगितल्या, व शेवटीं ते दोघेही गृहस्थ येत आहेत म्हणून सांगितलें!

अशाच प्रकारें किमयेचाही अनुभव त्यांनीं मद्रासेस घेतला. पूर्वीं तात्यासाहेब रायरीकर यांच्या येथें एका मनुष्यानें, ओंकारेश्वराच्या बाजूनें केवळ कांहीं वनस्पती आणून, पैशाचें सोनें चिलमींतल्या चिलमींत करून दाखविल्याचें यांनीं स्वतः पाहिलें होतें, व त्यावरून किमयेची विद्या खरी आहे, अशी यांची खात्री झाली होती. तसाच गोसाव्यांच्या एका महंतानें मद्रासेस यांना कथलाची चांदी करून दाखविण्याचा प्रयोग करून दाखविला. भट्टींत कथील आपल्या हातानें ठेवणें, वनस्पतींचा रस तिच्यावर आपल्या हातानें ओतणें, व त्याच्याजवळील पान्याच्या विशेष प्रकारच्या भस्माची त्यास भावना देणे, वगैरे सर्व गोष्टी यांनीं आपल्या हातांनीं केल्या, व स्वतःच्या हातानें भट्टींतून चांदी बाहेर काढली! हा गोसावी असें सांगत असे कीं, मेळ्याच्या पोषणाकरितां गुरूंनीं ही विद्या त्यास दिली होती, व कोणास सांगूं नको म्हणून बजावून, वर पुन्हा जरी यदाकदाचित् कोणास कळलें तरी त्यास फलद्रूप होणार नाहीं म्हणून सांगितलें. अण्णासाहेबांनीं स्वतः वनस्पती आणून व त्याच्या जवळील भस्म घालून चांदी करण्याचा प्रयत्न केला, परंतु काय कमी पडलें असेल तें असो, त्यांचा स्वतंत्र प्रयत्न कधींही साधला नाहीं. कथलाची चांदी तर होत असे, परंतु मुशींतच ती फुटून तिचे राईएवढाले तुकडे होत. एक गट असा कधीं काढतांच आला नाहीं, व त्यामुळें ती वांया जात असे. मग हें गुरूचें वाक्सामर्थ्य असो, किंवा त्या गोसाव्यानें मुद्दाम कांहीं गोष्ट चोरून

ठेवल्यामुळें असो, पण चांदीची कांब कधींही बनली नाहीं, व तो नाद त्यांनीं सोडून दिला.

पूर्वीचे लोक कमरेभोंवतीं गुंडाळून ठेवलेल्या लढाऊ पट्ट्याचा उपयोग करीत असत. हा पट्टा कसा असतो, तें मद्रासेस पहावयास मिळालें, असें त्यांनीं सांगितलें. एकवेळ एक पांथस्थ ब्राह्मण जेवावयास आला. तो मराठा आहे, हें अण्णासाहेबांनीं तेव्हांच ओळखिलें. त्यानें जेवणाकरितां काढून ठेवलेली वंडी ओटी झाडण्याकरितां उचलीत असतां, तिच्या खिशांतून एक जड व जाड गुंडाळी बाहेर पडली. ती तशीच गड्यानें आणून अण्णासाहेबांना दाखविली. पाहतात तों, तीव्र धार असलेला तो एक लांब पट्टा होता. त्यावरून चौकशी केल्यावर त्या माणसानेंही यांच्यावर विश्वास टाकून आपली हकीगत सांगितली. हा मनुष्य वासुदेव बळवंताचा एक उत्तम साथीदार असून, स्वतः वासुदेव बळवंत पकडला गेल्यामुळें देशोधडीस लागला होता. पट्टा वापरण्याच्या कलेंत ते दोघेही फार निष्णात होते. एक दिवस तेथें राहून, तो मनुष्य कोठें गेला, कांहींच कळलें नाहीं.

मद्रासेस असतां एका अद्‌भुत नागाचें यांना दर्शन झालें. एकदां कंचीचे रामचंद्र अय्या व अण्णासाहेब फिरावयास म्हणून निघाले. कांहीं अंतरावर गेल्यावर मोटारच्या आवाजासारखा आवाज लहान प्रमाणावर ऐकूं येऊं लागला. तेव्हां रामचंद्र अय्यांनीं हातीं धरून यांस जागच्या जागींच उभें केलें. सुमारें अर्धमिनिट झालें नसेल तोंच, एक प्रचंड नाग यांच्यासमोरून आडवा गेला. त्याचाच तो आवाज होता, व त्याच्या वेगानें बारीक खडे आणि धूळ उडत होती. या नागाचे डोळे सरासरी अधेली एवढे होते! व फड़ा जवळ जवळ १॥-१॥। हात रुंद होती! त्याचे मानानें त्याची जाडी असून, लांबी कमींत कमी ४०।५० फूट असावी असें त्यांस वाटलें! नाग माल अत्यंत चपळ असून तेजस्वी होता. हें प्रचंड धूड पाहिल्यावर कोणीही बेशुद्ध होऊनच पडावयाचा; परंतु यत्किंचितही भीति न वाटतां त्याच रस्त्यावरून दोघेही फिरावयास गेले!

अशाच प्रकारें याच्या उलट, एका सूक्ष्म कालीय मूर्तीची गांठ पडल्याचीही हकीगत ते सांगत. त्यांना बहिर्दिशेस जावयाचें होतें, म्हणून शेतांतील एका मोठ्या झाडाजवळ रामानें तांब्या भरून ठेवला, व तो स्वतः शेंपन्नास हातांवर एका

बांधावर बसला. अण्णासाहेब बहिर्दिशेस बसले असतां सहज त्यांचें लक्ष झाडाच्या खोडाकडे गेलें. तों तेथें जेमतेम हातभर लांब असलेला सुमारें बोट-भर जाडीचा एक काळाकभिन्न नाग वेटोळें घालून इवलीशी फणा मिरवीत असलेला दिसला. हा साप इतका काळा होता कीं डोळे व दहाचा आंकडा खेरीज करून पोट व टाळू वगैरे जागा देखील त्याच्या काजळाप्रमाणें काळ्या होत्या. डोळे तांबडे लाल होते, व आंकडा मात्र पांढरा होता. याशिवाय एक अणुभरही जागा दुसऱ्या रंगाची नव्हती. त्यास पाहून अण्णासाहेबास मोठी मौज वाटली, परंतु त्याबरोबरच ही फार विषारी जात असावी, असा तर्क करून एकदम गडबड केल्यास तो आंगावर उडी टाकील, म्हणून ते त्याच्या डोळ्याशीं डोळा देऊन पाहूं लागले, व एकीकडे हळूं हळूं शरीर शुद्धि करून कांहीं वेळ तसेंच टक लावून बसले. सापास मारावें, असा विचार त्यांच्या डोक्यांत कधींच नव्हता. उलट त्यानें अंगावर उडी टाकल्यास शुचि-र्भूत अवस्थेंत मृत्यु यावा, म्हणून हळूंच शरीर शुद्धी करून ते त्याच्या उडीची वाट पहात बसले ! तोंच तें वेटोळें जें उडालें तें ज्या बाजूला रामा बसला होता तिकडेच फेंकलें गेलें. त्या सरशीं ' रामा, अरे साप रे साप, ' म्हणून अण्णासाहेब ओरडले. परंतु वेटोळें ५।२५ हातांवर पडून बांधांत कोठेंतरी नाहींसें झालें. अण्णासाहेब घरीं आले व रामानेंही तांब्या आणून ठेवला. थोड्याशा वेळानें अण्णासाहेबांस बरें न वाटून लाळ सुटूं लागली, व तेथपासून म्हणजे दुपारचे २।२॥ वाजल्यापासून तों सरासरी ८।९ वाजेपर्यंत गंगाळ पुढें घेऊन ते सारखी लाळ गाळीत होते ! दुसरा कोणीही मनुष्य एवढ्या शक्ति-पातांतून वाचणें कठीण होतें. परंतु त्यांची ताकदच मोठी, व धैर्य अप्रतिम म्हणूनच रक्ताचें सारखें पाणी होत असतांही त्यांनीं टिकाव धरला. ऐकणारास अतिशयोक्तीचें वाटेल, परंतु या प्रसंगीं गंगाळ दीड गंगाळ पाणी गेल्याचें तें सांगत ! पुढेंही कांहीं दिवस याचा परिणाम त्यांना जाणवला. मनुष्याच्या रक्ताचें पाणी व्हावें असा त्या कालीयमूर्तीच्या विषारी नजरेचा प्रभाव होता !

मद्रासेस गेल्यावर सुमारे ५।६ महिने गेल्यावर चैत्र शुद्ध १० मी पासून यांस रक्त पडूं लागलें. रामनवमीचे दिवशीं उपवास होता, व आपणास चालणारे उपवासाचे पदार्थ तेथें कांहींच मिळत नसल्यामुळें नुसत्या कलिंगडा-

वरच तें दिवशीं भागविण्यांत आलें. तेवढेंच निमित्त झालें. मधून मधून मूळव्याधीमुळें रक्त पडण्याची संवय यांना लहानपणापासूनच होती. परंतु या वेळीं तें सारखे २८ महिने पडतच होतें, व त्याचें प्रमाणही पुष्कळच चांगलें एक दोन ओंजळी असे! असें होतां होतां एक दिवस सहज चक्कर आल्यासारखें होऊन आतां पडतों असें वाटूं लागलें. परंतु सावरून तेवढ्यांतल्या तेवढ्यांत खालीं बसले. तरीही भागेना. म्हणून आंथरूण पसरून त्यांनीं आंग टाकलें. व ताप भरून आला. घशाजवळ दुखतें असें वाटूं लागल. व घशांतलें दुखणें वाढत जाऊन एकदोन दिवसांतच पोटांत कोणचाही पदार्थ न जाण्याचा बंदोबस्त झाला. त्याचवेळीं आपणास काय झालें आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें, परंतु जवळच्या माणसांनीं घाबरूं नये म्हणून ते बाहेर कांहींच न दाखवितां पडल्या पडल्याच सर्व कारभार सुरळीत करीत. पोटांत पाण्याचा घोंटही जात नव्हता, तरी कोणी कांहीं दिलें असतां त्याच्यासमोर तें घेऊन मुकाट्यानें तस्तांत थुंकून टाकीत. इतर पदार्थ तर असोत, पण विडा देखील दिलेला घेऊन पुष्कळ वेळां तोंडांत ठेवीत व कोणी नाहीं असें पाहून थुंकून टाकीत. त्यामुळें व दुखण्याच्या जोरामुळें क्षीणता येऊन ९ व्या दिवशीं फार कठीण अवस्था झाली. तिचें वर्णन ते स्वतःच सांगत. ‘ दोन्ही हात टेंकून बाजेवर मांडी घालून अखेरची वाट पहात बसलों होतों. शरिरांत अनेक प्रकारच्या घडामोडी होत होत्या, व नाड्या तुटत होत्या. त्यांचा टाइपराइटरच्या खडखडीप्रमाणें आवाज ऐकूं येत होता.° प्रत्येक श्वास व उच्छ्वास यास भयंकर क्लेश होत होते, व घशाची सूज वाढत होती. पांच दहा मिनिटांत घसा बंद होऊन श्वास थांबेल व प्राणोत्क्रमण होईल असें वाटत होतें. तरी बाजूच्या माणसांनी घाबरूं नये म्हणून डोळे उघडून त्यांच्याकडे पहात होतों व मनांत नामस्मरण चाललें होतें. ५।२५ मिनिटेंच बाकी होती, कीं सर्व कारभार जागच्या जागींच आटोपला असतां; परंतु महाराजांची योजना तशी नव्हती. त्याच सुमारास नित्याची पाळी नसतांही रामचंद्र अय्या हे त्या ठिकाणीं अकस्मात् येऊन पोहोंचले, व पाहतात तों अण्णासाहेबांची अशी स्थिति! शरिरांत त्राण नसल्यामुळें मान वांकवूनच अण्णासाहेबांनीं त्यांना नमस्कार केला. क्षणमात्र स्तब्ध उभे राहून ‘ घाबरूं नकोस, मी आलों आहे, ’ म्हणून गोड शब्दांनीं त्यांनीं अण्णासाहेबांस धीर

दिला. अण्णासाहेब असें सांगत कीं, हे बोलत असतांना त्यांचा चेहरा तापलेल्या लोखंडाप्रमाणें लाल झाला, व डोक्यावरील केस कांट्यासारखे उभे राहिले. बाहेर आंगणांत जाऊन 'वरदडा' ('अरे वरद्या,') म्हणून त्यांनीं देवास एक शिवी हांसडली, व ' याच्या केंसास धक्का लागला तर मी जीभ हांसडून प्राण देईन, लक्षांत ठेव ' म्हणून आरोळी ठोकली ! अण्णासाहेब असें सांगत कीं, हे शद्ब ऐकतां क्षणींच सारी खडखड एकदम बंद झाली, यंत्रांत यंत्रें बसविल्याप्रमाणें शरिरांत सर्व व्यवस्था ठीक झाली, व श्वासही सुरळीत चालून एकदम मोठा आराम वाटला ! स्वामी आंत आले, तेव्हां त्यांचा राग नाहींसा झाला असून मुद्रा पुन्हा शांत व गंभीर झाली. जणूं काय कांहीं विशेष झालेंच नाहीं अशा रीतीनें कांहीं इकडे तिकडे बोलून स्वामी निघून गेले; व अण्णासाहेबांची प्रकृति सुधारून ते बरे झाले. परंतु या दुखण्यानें त्यांना इतकी अशक्तता आली कीं, तिचा परिणाम पुढें ६।७ वर्षें सारखा राहिला होता. " पुण्यास आल्यावर तुम्ही आपले पहिले उद्योग कां सुरू ठेवले नाहींत ? " म्हणून मी त्यांना विचारलें तेव्हां त्याचें कारण त्यांनीं हेंच सांगितलें. " कामचलाऊ व्यवहार जरी मी करीत होतों, तरी खरें काम हातून होणें शक्यच नव्हतें. अशक्तता इतकी भयंकर होती कीं, पाण्याचा तांब्याही बेसावधपणानें डोक्यावर एकदम ओतला गेला, तर साऱ्या शरीरांतील प्राण एकत्र गोळा होऊन येत, व बराच वेळ कठीण अवस्था होत असे. अशी स्थिति ६।७ वर्षें होती व पुढें हळूं हळूं मी पुन्हां समाजांत वावरूं लागलों. परंतु मधल्या काळांत साराच मनु पालटून गेला होता. " यावरूनही बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो. त्यानंतर पुण्यास बाबाची मुंज नानासाहेबांनीं ठरविली, आणि अण्णासाहेबांस परत येण्याबद्दल महाराजांकडून आज्ञा करविली. तेव्हां ती प्रमाण मानून अण्णासाहेब परत यावयास निघाले. " येतांना कंचीस जाऊन ये " अशी महाराजांची पूर्वींची आज्ञा होती, त्याप्रमाणें पूर्वीं पांच चार वेळां प्रयत्न केले असतांही त्यांचें कंचीस जाणें झालें नाहीं. तो योग येतांनाच जावें असा होता असें दिसतें. त्या प्रमाणें कंचीस जाऊन श्रीवरदराजांचें दर्शन घ्यावें आणि तेथूनच पुण्याचे गाडींत बसावें असें ठरलें.

मद्रासच्या या मुक्कामांतच त्यांनीं कार्तिकस्वामी, पक्षीक्षेत्र, गिरीचे बालाजी वगैरे स्थळें पाहून घेतलीं. मद्रास इलाख्यांत एक लहान व एक मोठें अशीं

दोन कार्तिकस्वामींचीं स्थानें आहेत. पैकीं लहान तर तिरुतणीस यांच्या घरासमोरच अर्ध्या पाऊण मैलावर होतें. या दोन्ही स्थळीं स्त्रियांचा यत्किंचितही प्रवेश नसून, पर्वदिवशीं वगैरे व एरवी सुद्धां तेथें खंडोगणती कापूर जळत असे. या स्थानाबरोबरच पलिपट येथेंही ते जाऊन आले होते. तेथें जवळच भद्रंचल म्हणून डोंगर आहे, त्यावर एक स्वामी रहात असत. हे ठेंगण्या बांध्याचे असून दिगंबरवृत्तीनें अखंड मौन धारण करून असत. यांच्याही दर्शनाचा योग अण्णासाहेबांस अनायासेंच आला. डोंगरावरून धांवत खालीं उतरत असतां लोकांनीं यांना ते स्वामी दाखविले. तेव्हां आपण धांवत जाऊन एकदम त्यांचे पाय धरून त्यांस उभे केले म्हणून अण्णासाहेब सांगत. परंतु त्यामुळें रागावून न जातां वायव्येकडे पाहून स्वामींनीं थोडेसें हास्य केलें, एवढेंच अण्णासाहेब सांगत. पलिपट येथील ज्या शिवानंदतीर्थांशीं तात्यासाहेब कर्वे यांच्या गुरुपरंपरेचा संबंध आहे, ते शिवानंद आणि हे महाराज हे एकच असावे असा संशय येतो. परंतु त्याचें निराकरण करण्यास कांहींच मार्ग नाहीं. कदाचित दोघेही वेगवेगळे असूं शकतील. असो.

मद्रासमधें अण्णासाहिब यांचा मुक्काम ४३ महिने १२ दिवस होता, व हा सर्वच काळ त्यांच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचा होय. त्याचा ठसा त्यांच्यावर अखेरपर्यंत दिसत होता. या ठिकाणीं त्यांनीं अनेक गोष्टी करून पाहिल्या, आणि अनेक विचित्र अनुभव घेतले, आणि कधीं कोणाच्या स्वप्नींही यावयाचें नाहीं, असे अनुभव अकल्पित योगायोगानें त्यांना मिळाले. त्यांच्या व तेथील लोकांच्या राहणीच्या वगैरे अनेक गोष्टी ते सांगत. तिकडील विंचवांच्या दंपत्यप्रेमाची, ताडपांबू ( झाडावरील साप ) नांवाच्या सापाच्या खुनशीपणाची, त्यांनीं स्वतः दोन फणाचा नाग पाहिला होता त्याची व मद्रासी लोकांचे आहारविहार, चालीरीति, त्यांच्या भाषा, व त्या भाषांवरून निघणारीं अनेक ऐतिहासिक अनुमानें, वगैरेंची सविस्तर हकीगत त्यांच्या तोंडून पुष्कळांस ऐकावयास मिळाली असेल. दोन तोंडी नागाविषयीं ' तें जुळें असेल, ' अशी मी शंका काढली; तेव्हां ' तो हातभर लांब असून मी स्वतःच पकडला होता ' असें त्यांनीं सांगितलें. त्याच्या चिमुकल्या दोन्ही फणा इकडे तिकडे तो कसा हालवी, याचें त्यांनीं बोटाच्या पेऱ्यांनीं मोठें सुंदर अनुकरण करून दाखविलें,

सूर्यसंक्रांतीवरून मेषमास वगैरे महिने ओळखणें, ‘ कार्पासकटिनिर्युक्त ’ वगैरे शास्त्र हें सर्व त्यांच्या मद्रासेंतील रहिवासाच्या खुणा होत.

इकडे यावयाचें ठरल्यावर सर्व तयारी करून ते कंचीस गेले, आणि प्रथम शिवकांचीस जाऊन तेथून श्रीवरदराजाचे दर्शनास विष्णुकांचीस जाऊन श्रीरामचंद्र अय्या यांचें त्यांनीं दर्शन घेतलें. आणि तेथून मद्रास मेलनें पहिल्या वर्गानें पुण्यास येण्याकरितां स्टेशनवर गेले. त्यांस पोहोंचविण्याकरतां, कंचीचे महाराज स्वतः स्टेशनवर आले होते. गाडीची वेळ झाली, अण्णासाहेब डब्यांतही जाऊन बसले, तरी देखील डब्याच्या फळीवर एक पाय देऊन प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या रामचंद्रस्वामींचा दांड्याचा हात सुटेना. तेव्हां ‘ आतां आपण थांबा, गाडीनें शिटी दिली ’ असें अण्णासाहेबांनीं विनविलें. तेव्हां कुठें ‘ मी तुझ्याबरोबर येतों ’ असे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले ! त्यासरशी मोठ्या संतोषानें अण्णासाहेबांनीं बाहेर उडी टाकली आणि स्वतः तिकीट काढून आणलें, व सारीच मंडळी गाडींत बसून गाडी सुरू झाली, आणि त्या प्रांतास त्यांनीं अखेरचा रामराम ठोकला.

वाटेंत घडलेली एक रामचंद्र अय्यांची मौजेची गोष्ट त्यांनीं सांगितली. कृष्णास्टेशनवर त्यांनीं अय्यांच्या स्नानसंध्येकरितां म्हणून मुक्काम केला होता. आचाऱ्यास स्वयंपाकास लावून ते स्वतःही पुष्कळ दिवसाच्या वाढलेल्या दाढी जटांना फांटा देऊन, स्नान वगैरे करण्यांत गुंतले. ‘ त्यासालीं कन्यागत असून कृष्णेच्या स्नानाकरितां तेथें उतरलों, ’ असें सांगितल्याचें थोडेंसें आठवतें; परंतु नक्की नाहीं. तें कांहींही असो, स्वामींचें आह्निक आटोपल्याबर दोघेही पानावर जाऊन बसले, आणि रामचंद्र अय्या श्रीवरदराजांस नैवेद्य समर्पण करण्यांत गढून गेले. थोड्या वेळानें ध्यान विसर्जन करून स्वामींनीं मोठ्या सचिंत मुद्रेनें ताटांतील कोशिंबिरीकडे बोट करून विचारलें–‘ हा काय पदार्थ आहे ? ’ अण्णासाहेबांचेंही तिकडे लक्ष नसल्यामुळें, आचाऱ्याजवळ चौकशी करून ‘ पलांडु, ’ म्हणून त्यांनीं सांगितलें. तेथें दुसरी भाजी कोणचीच मिळाली नाहीं, म्हणून त्या ब्राह्मणानें मूर्खपणानें कांद्याचीच कोशिंबीर केली होती, हें अण्णासाहेबांच्याही लक्षांत आलें नव्हतें. ‘ पलांडू ’ म्हणून ऐकतांच, स्वामी म्हणाले–“ तरीच बरें, स्वामी ( वरदराज ) खातांना तोंड वेडेंवांकडें करीत होता ! आतां काय करावें ? मी तर आजन्मांत पलांडूला शिवलों नाहीं. ’

त्यावर 'आपण तें ताट राहूं द्यावें, मी दुसरें सिद्ध करवितों' म्हणून अण्णासाहेबांनीं विनंती केली. तेव्हां—'छे, छे, स्वामीचा प्रसाद तो! त्यानें खाल्लेलें कसें टाकावयाचें?' असें म्हणून ते त्याच ताटावर बसले, व त्या कोशिंबिरीसुद्धां सर्व प्रसाद ग्रहण केला! मात्र कोशिंबीर पुन्हा घेतली नाहीं.

यथाक्रम पुण्यास येऊन पोहोंचल्यावर अण्णासाहेब हे स्वामींस घेऊन आळंदीस गेले. परंतु त्यापूर्वी त्यांच्या परिपाठाप्रमाणें ओंकारेश्वरास गेल्यावेळीं श्रीकाळबोवा यांचे दर्शनास गेले होते. काळबोवा यांची दिगंबर व अखंड मौनवृत्ति प्रसिद्धच आहे. अण्णासाहेबांनीं नमस्कार करतांच आळंदीकडे तोंड करून 'स्वामी दादा आला,' असें ते मोठ्यानें ओरडले! पुढें आळंदीस जाऊन महाराजांचें दर्शन घेतांच, महाराजांनीं नेहमीच्या हास्यमुद्रेनें 'येण्यापूर्वी कुठें गेला होतास रे?' म्हणून नुसती खूण दिली; व कांहीं न बोलतां मनांत समजून अण्णासाहेब हेही बाजूस बसले. महाराजांनीं कंचीच्या स्वामींचा मोठा गौरव करून 'हा कोहिनूर आहे, दक्षिणेंतला साक्षात् अगस्ति,' असें सांगितलें. रामचंद्र अय्यांनींही अण्णासाहेबांकडे पाहून 'याला तुमच्या कडे आणून पोहोंचविला, आतां आमची कामगिरी संपली,' म्हणून सांगितलें. थोड्याच दिवसांनीं रामचंद्रअय्या परत गेले. त्यानंतर पुन्हां एकदां लहर लागून ते असेच अण्णासाहेब यांचेकडे आले होते. तेव्हां मात्र त्यांचा मुक्काम ३।४ महिने पुण्यास होता. "बाहेर तुळशी वृंदावनापाशीं बसलेले असत. तिखटाचा मोठा थोरला गोळा घातलेली दाण्याची चटणी त्यांना लागे, व तेलगू येत नसल्यामुळें त्यांच्याशीं बोलतांना 'आमच्या हिर्ची' मोठी तिरपीट उडे," म्हणून अण्णासाहेब गमतीनें सांगत. ३।४ महिन्यांनंतर ते परत देशीं गेले, व पुन्हा मात्र केव्हांही इकडे आले नाहींत. कंचीस त्यांची समाधी आहे, असें समजतें.

# स्थित्यंतर.

****" सुप्रतिष्ठित स्वानंदसहित स्वानुभव सुप्रतिष्ठा सिध्यर्थे "***

येथपासून अण्णासाहेब यांच्या आयुष्यांतील दुसऱ्या अर्धास सुरुवात होते. या भागांतील पहिलीं ७।८ वर्षे म्हणजे जवळ जवळ गणपतिउत्सवास सुरुवात होईपर्यंतचा काळ यांनीं कशा रीतीनें घालविला, त्याचा इतिहास कांहींच मिळत नाहीं. स्वतः ते यासंबंधानें एक अक्षरही काढीत नसत. तरी एवढें मात्र खास कळतें कीं या काळांत त्यांचे सर्व व्याप थांबले असून त्यांनीं बहुतेक मौनवृत्ति धारण केली होती. मग ती दुखण्याच्या अशक्ततेमुळें असो, अथवा एखाद्या चिंतनांत अखंड गढून गेल्यामुळें असो. त्यावेळीं या विषयाचें शाब्दिक कां होईना, परंतु ज्ञान असलेला, आणि या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहणारा असा त्या वेळचा कोणीही मनुष्य उपलब्ध नसल्यामुळें, आणि स्वतः त्यांच्या स्वभावाच्या अचलप्रतिष्ठेमुळें, या तऱ्हेची त्यांच्याविषयीं माहिती मिळणेंही अशक्य आहे. 'अण्णासाहेब अमुक साधनें करीत होते,' 'त्यांनीं आपलें हृद्गत मलाच तेवढें सांगितलें,' अथवा 'मी त्यांचा अभ्यास ओळखला,' 'मीं त्यांना पकडलें,' आणि "त्यांनींही हंसून पकडलों गेलों' म्हणून कबूल केलें," अशा प्रकारच्या गोष्टी सांगणारे आणि प्रामाणिक समजूत बाळगणारे कांहीं कमी आढळत नाहींत; आणि त्यांपैकीं कोणालाही मूर्खांतच काढण्याचें कारण नाहीं. कारण व्यक्तीप्रत त्याला अनुसरून इतक्या साऱ्या रंगानें ते बोलत असत, व त्यामुळें असे तर्क दुसऱ्यांनीं केले असल्यास नवल नाहीं. मात्र त्यांत इतकीच खुबी असे कीं, 'मी स्वतः अमुक केलें' असें तें अगदींच २।४ प्रसंग टाकलें तर उभ्या आयुष्यांत बोलल्याचें कोणीच सांगत नाहीं. 'आपण काय केलें नाहीं,' हें मात्र तेथल्या तेथेंच सांगत. आणि व्यवहारिक गोष्टींत मात्र, एकाद्या सामान्य माणसाप्रमाणें आपल्या मागच्या हकीगती केव्हां केव्हां सांगत. त्यांच्या बोलण्यांत वैद्यक किंवा कायदा हे दोन विषय सोडले तर या बाजूचे ग्रंथ वगैरे वाचल्याचा कधींही उल्लेख नसावयाचा. परंतु माहिती मात्र अमुक प्रकारची त्यांस नव्हती असें कधीच अनुभवास

आलें नाहीं. उलट ती माहिती सांगण्याची तऱ्हा अशी होती कीं, ऐकणारास "कांहीं आपण विशेष ऐकत आहों," असें भासूं नये. यामुळें, आपल्या पारंब्यांचे वृक्ष बनवून दुर्गम असा छायामंडप घालणाऱ्या कबीर वडाप्रमाणें यांच्याही स्थितिमंडपाचा मूळबुंधा कोणता, हें सांगणें आटोक्याबाहेर आहे; आणि तशा तऱ्हेचा प्रयत्न करणेंही एक प्रकारें पापच आहे; कारण त्याच्यायोगानें या मूर्तीच्या गौरवाचें वर्णन न होतां या साक्षात् विनायकाचें वानर होण्याचाच जास्त संभव आहे. परंतु त्याजबरोबर हीही गोष्ट उघड आहे कीं, एकदां चरित्रकार म्हणून लिहावयास बसल्यावर अशा प्रकारचा प्रयत्न करणें हेंही प्राप्तच आहे.

अण्णासाहेब हा शब्द उच्चारला कीं, ज्या कांहीं शेंकडों जिज्ञासा कोणाही माणसाच्या मनांत उभ्या रहातात आणि त्या पुरण्याच्या अपेक्षेनेंच तो चरित्र हातीं घेतो, त्या सर्व जिज्ञासांत परमार्थ या दृष्टीनें अण्णासाहेब हें प्रकरण होतें तरी काय, त्यांचा अभ्यास काय होता, त्यांचें साध्यसाधन आणि त्याकरितां त्यांनीं केलेले प्रयत्न तरी काय होते, ते कोणी प्राप्त पुरुष होते, किंवा केवळ भाविक भगत होते, इत्यादि जिज्ञासाच बलवत्तर होत. आणि चरित्रकारानें जर याच प्रश्नांकडे दुर्लक्ष करावयाचें तर चरित्रलेखनाचा उपयोग तरी काय, असें वाटून अवांतर सर्व गोष्टी वाचकांच्या मनांतून उतरणें साहजिक आहे. तेव्हां आपणही त्यांनीं काय केलें होतें, किंवा काय केलें नव्हतें, याचा विचार न करतां, काय दिसत होतें, आणि त्यावरून काय असण्याचा जास्त संभव आहे, एवढेंच फक्त पाहूं. त्यांतील काय दिसत होतें, म्हणजे वेळोवेळां त्यांनीं जे उद्गार स्वतः काढले तो प्रत्यक्ष पुरावा असल्यामुळें तेवढाच मात्र निःशंकपणें खरा समजला पाहिजे. त्यावरून जीं अनुमानें काढावींशीं वाटतात, त्याविषयीं समर्थांच्या म्हणण्याप्रमाणें--' मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणी येकें । ' दास.-- एवढेंच म्हणतां येईल

संबंधी जनांकडे पाहिलें तर, "अण्णासाहेब यांच्या सर्व कृतींत भरून राहिलेले श्रीनृसिंह सरस्वती हा देखील एक खंदकच असून त्याच्या आड काम करणारे अण्णासाहेब हे स्वतःच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं अशा परमात्म्याचा गुप्त अवतार होते," असें मानण्यापासून, तों "देशाच्या कल्याणाची सदिच्छा मनांत बाळगून--' बापा पोराबाळांचें कल्याण कर ' म्हणून देवापुढें नाकदुऱ्या

काढणाऱ्या भोळवट म्हातारीप्रमाणें नृसिंहसरस्वतींनीं भारून टाकल्यामुळें वायां गेलेले सज्जन पुरुष होते " येथपर्यंत सर्व प्रकारच्या श्रद्धा बाळगणारे लोक सांपडतात. परंतु सामान्य समजूत जर त्यांच्याविषयीं पाहिली, तर अण्णासाहेब हें एक मोठें कोडें असून तें उकलणें कठीण आहे, अशीच आहे; आणि हें कोडें उकलण्याचा प्रयत्न निरनिराळ्या श्रद्धावान् लोकांना आपापल्या दृष्टीप्रमाणें मूर्खपणाचा वाटतो. ' हे एक वायां गेलेले वेडपुरुष होते, ' असें समजणाऱ्या लोकांस इतकेंच सांगतां येईल कीं, ही तुमची समजूत प्रत्यक्ष अनुभवास धरून नाहीं. कारण त्यांचा प्रत्यक्ष सहवास आणि भाषणादिकांचा अनुभव घेणारांना जरी ते काय होते हें ठरवितां आलें नाहीं, तरी ते वायां गेलेले पुरुष आहेत, असें वाटणेंही शक्य नव्हतें. कारण ग्रंथलेखनाची अगर अलीकडच्या पद्धतीनें एकादी संस्था काढण्याची बाब जर सोडून दिली, तर व्यावहारिक रितीनें कां होईना, दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याकरितां दिवसाचे जवळ जवळ २४ ही तास खर्चल्याचें त्यांच्यासारखें दुसरें उदाहरण सांपडणार नाहीं; आणि हा मोठेपणा कांहीं कमी नाहीं. बरें, या लोकांस पारलौकिक दृष्टीच नसल्यामुळें यांच्या दृष्टीनें इतर कशांत मोठेपणाही असणें शक्य नाहीं; आणि तशा लोकांकरितां हा पुढील भाग नाहीं. ज्यांना ते केवळ ज्ञानविग्रह अवतार असून त्यांची सारीच लीला मायिक आहे, असें वाटत असेल, त्यांना हा प्रयत्न पाहून, ' काय हा मूर्खपणा ? मोठे आले लिहिणारे ! ' असें वाटेल आणि तेंहि साहजिकच आहे; कारण ईश्वराचें खरें वर्णन म्हणजे वाचा बसणें हेंच होय. जें सर्वांच्याच अतीत आहे, त्याचा विचार मनुष्यानें आपल्या अणुमात्र अकलेनें काय करावयाचा, आणि त्याचा कार्यकारणभाव अथवा संगति तरी काय बसवावयाची ? यावर आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, वस्तुतः हें जरी खरें असलें तरी ईश्वर जी लीला करतो, ती त्याला स्वतःला कांहीं प्राप्य आहे. म्हणून नव्हे तर ती आमच्या उपयोगाकरितांच करतो. आणि म्हणूनच तो आपली लीला कार्यकारणादि सृष्ट परंपरेस धरूनच करतो. आणि ती आपणास शिकविण्याकरितां असल्यामुळें त्यांतील अतिमानुषभाव पोटांत ठेवून, जर आपण तिचा अभ्यास केला, तरच त्याचा हेतु यथाशक्ति तडीस नेण्याचें आपलें कर्तव्य आपण केलें असें होईल; याच दृष्टीनें केवळ हा भाग लिहावयास घेतला आहे; आणि हें प्रत्यक्ष प्रमाणास धरूनच आहे. स्वतां अण्णा-

साहेबच ' माझें स्वतःचें काय व्हावयाचें आहे ? हें सारें तुमच्याकरितां करतों' म्हणून * वामनास म्हणाले होते.

आतां मुख्य प्रश्नाचा विचार करूं. ज्याला थोडी तरी पारमार्थिक दृष्टी आहे, असा कोणीही मनुष्य अण्णासाहेबांच्या सहवासांत राहून सूक्ष्म दृष्टीनें त्यांच्याकडे पाहूं लागला, तर त्यास एक गोष्ट निश्चित वाटत असे. ' असा पुरुष परमार्थसोपानाच्या मधें असणें शक्यच नाहीं. एक तर वर जाऊन स्वस्थ बसलेला असेल, अथवा त्यानें मुळीं पाहिरीच ओलांडली नसेल, ' असें त्याच्या मनांत आल्यावांचून रहात नसे. त्यांच्यासारखा प्रामाणिक, वैराग्य-संपन्न आणि साक्षेपी पुरुष साधक–दशेंत असतां जसा वागावयास पाहिजे, असें त्यांच्या वागण्यांत कधींच कांहीं नसे.–म्हणजे संशय, व्याकुळता, अट्टहास वगैरे साधकांच्या वृत्तींत अवश्य अपरिहार्य असलेलें तुफान कधींही त्यांच्या ठिकाणीं आढळलें नाहीं. मोठमोठे खडक फोडून आपणास कोणीकडे जावयाचें आहे, हें ठाऊक नसल्यामुळेंच जणूं काय, वाटेल तशा वेड्यावांकड्या उड्या टाकीत, अडखळत, धडपडत, आणि इकडे तिकडे भटकत जाऊन, शेवटीं कसा तरी एकदां समुद्र गांठणाऱ्या एकाद्या नर्मदेप्रमाणें त्यांचें पुढील आयुष्य नसून, आपली दिशा आणि विश्रांतिस्थल ठाऊक असलेल्या आणि शांतपणानें कोणत्याही तऱ्हेची खळखळ न करितां, अगाध जल-समूह घेऊन उभयक्षेत्रें पावन करीत संथपणानें अव्याहत वाहणाऱ्या पुण्यसलिला भागीरथीप्रमाणें त्यांच्या आयुष्याचा ओघ एकजात आणि एकतंत्री दिसतो. त्यांच्या वर्तनाकडे पहावें तर, सर्व प्रकारच्या विरोधांचें बेमालूम

---

*वामन दातीर हा अण्णासाहेब यांच्या भाचीचा मुलगा. हा सेकंड क्लास इंजिनिअरची परीक्षा पास होऊन पुणें येथें शिवाजी मेटल वर्क्समध्यें एंजिनिअर होता. अण्णासाहेब यांचे येथेंच राहात असे. भुईमुगाचे दाणे खाऊन रहावें, व नित्य श्रीगुरुचरित्राचा सप्ताह करावा असा याचा नेम होता. अण्णासाहेब यांचा याच्यावर मोठा लोभ होता. त्याचीही त्यांचे ठिकाणीं एकनिष्ठ भक्ति होती. तो १९१४ चे डिसेंबरांत न्युमोनियानें वारला. याच्या इतका सरळ स्वभावाचा भडभड्या मनुष्य सांपडणें कठीण. अण्णासाहेब तर याला श्रीमहाराजांचें बालरूपच समजत.

एकीकरण असल्याचें असें दुसरें उदाहरण सांपडणें कठीण. अतिशय अनियमितता व कठोर नेमनिष्ठता ही त्यांच्याइतकी उत्कृष्ट कोठेंच पहावयास सांपडावयाची नाहीं. निरंतर योग स्थितींत असलेली तनु, भक्तीचा जिव्हाळा, ज्ञानाचें वैभव, आणि तपश्चर्येचें भाग्य यांचा अपूर्व संगम तेथें होता. निरहंकारतेच्या पराकाष्ठेमुळें स्वाभिमानतेचा आविर्भाव त्यांच्या सर्व कृतींत इतका होता कीं डोळ्यांत तेल घालून पाहणाऱ्याचीही दिशाभूल होऊन जावी. याच्या उलट पहावें तर कधीं एकादी गोष्ट मी केली, अथवा मी करीन असें त्यांच्या मनास शिवत असल्याचीही कल्पना कधीं कोणास व्हावयाची नाहीं. हिंदुस्थान देश स्वतंत्र व्हावा. वैदिक धर्माचें क्लैब्य नाहींसें होऊन त्याचें वीर्य पूर्ण प्रगट व्हावें, म्हणून रात्रंदिवस तळमळत असल्यामुळें त्याला अनुसरून क्लेश द्वेष, तिटकारा, शोकसंताप, मीं तूं पणा, यांच्या जोडीस दुसऱ्या बाजूनें पहावें, तों 'अद्वेष्टा सर्व भूतानां' वगैरे प्राप्त पुरुषाचीं लक्षणें जशींच्या तशींच लावून घ्या—असा सर्व तऱ्हेनें विचार केला असतां इतक्या सहज स्थितींत साधकावस्था अथवा खरें बोलावयाचें म्हणजे साधकावस्थेंत अशी सहज स्थिति असणें अशक्य आहे. मग सामान्य अज्ञदशा तर दूरच राहिली. केवळ अज्ञ मनुष्य देखील सज्जनपणा वगैरे साधुगुणांत उच्च कोटीचें वर्तन करूं शकेल आणि तशीं औदार्य, परोपकार वगैरे गुणांनीं युक्त सज्जन माणसें असतातही. परंतु सर्व प्रकारच्या तीव्र विरोधांत अवीट सहज स्थिति असणें ही गोष्ट असाध्य आहे; आणि या दृष्टीनें पाहिलें तर हे प्राप्त पुरुष होते, अशीच खात्री होते. इतकेंच नव्हे तर चमत्काराच्या वगैरे सपाट्यांत न सांपडलेला आणि स्वतःचें सामर्थ्य व अनुभव यांचे प्रदर्शन, वात्सल्य, करुणा, इत्यादि सद्विकारांच्यामुळेंच कां होईना, करण्याच्या मोहांत थोडे देखील न सांपडणारा असा दुसरा प्राप्त पुरुष सांपडणें कठीण. स्वतःच्या स्थितीविषयीं त्यांच्या तोंडून जर कधीं कांहीं बाहेर येत असेल, तर तें इतकेंच कीं 'बावांनो, मी अंधश्रद्धावान् कधींच नव्हतों. तावून सुलाखून, सर्व गोष्टींचे प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावर मी या स्थितीस आलों.' याशिवाय स्वतःच्या स्थितिविषयीं उद्गार त्यांच्या तोंडून निघाल्याची फार तर दोन चारच उदाहरणें त्यांच्या सर्व आयुष्यांत सांपडतील. एकदां त्यांस असा प्रश्न केला होता कीं—'पारलौकिक अस्तित्व व तत्संबंधी सर्व गोष्टी यांवर तुमचा विश्वास कसा बसला? असा विश्वास बसणें चार गोष्टींनीं

शक्य आहे. एक तर—उत्कृष्ट बुद्धीमुळें; सर्व प्रकारचा साधकबाधक विचार करून मनुष्य तुमच्यासारखा वागू शकेल; अथवा श्रद्धाळूपणानें; केवळ एकाद्या वडील माणसानें सांगितलें म्हणून आपण मुकाट्यानें करावें, अशा रितीनें असा वागूं शकेल; अथवा, एकाद्या बारीक गोष्टींत कांहींतरी सत्य दिसून आल्यामुळें बाकीच्याही अशाच खऱ्या कशावरून नसतील, असें समजून प्रयोग पाहण्या-करितां वागूं शकेल; किंवा भयंकर निराशेनें आयुष्यांतील चव निघून गेल्यामुळें, कांहीं तरी सन्मार्गानें तें घालवावयाचें तर आपल्या वाडवडिलांच्या मार्गानेंच तें कां घालवूं नये, अशा समजूतीनेंही तो असा वागेल. असें तुमचें काय झालें ? " पांचवा प्रत्यक्ष प्रतीतीचा मार्ग मात्र बोलून दाखविला नाहीं. यावेळीं रात्रींचे दोन वाजले असून नक्षत्र दर्शनाकरितां गच्चीवर जावयास ते निघाले होते, व त्यांचें शांत गंभीर अंतःकरणही त्यावेळीं अधिक प्रसन्न होतें, अशा तऱ्हेचे कांहीं प्रश्न आले असतां चिडून गेल्याचा आविर्भाव करून अथवा विचारणाराची कांहीं तरी चेष्टा करून, प्रश्न टाळून नेण्याची त्यांची नेहमींची संवय होती. परंतु यावेळीं तसें कांहीं न होतां, प्रश्न ऐकतांच ताड्दिशीं, " अरे, सर्व प्रत्यक्ष पाहिलें ना, महाराजांच्या कृपेनें ? " असे शब्द एकदम बाहेर पडले. परंतु तेवढ्यांतच झटक्यासरशीं ते गच्चीवर निघून गेले. परत आल्यानंतर मोठें धैर्य धरून पुन्हा विषय उकरून काढला. परंतु नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ' अरे, सर्वांचें सार इतकेंच कीं किती अज्ञान आहे, आणि केवढें अफाट काम करावयाचें असतें, एवढें कळलें ! अशा तऱ्हेचीं उत्तरें येऊन तो विषय सोडून द्यावा लागला. महाराज हा शब्द त्यांच्या भाषेंत मायागुण नियामक परमात्म्याचा वाचकच होता. तसेंच एक वेळां स्वतःच्या छातीस हात लावून ' येथेंही महाराजच आहेत, फक्त प्रकार निराळा इतकेंच. ' त्याच-प्रमाणें एकदां एका गृहस्थास ' हें शरीर ( स्वतःचें ) महाराज रूप कसें झालें,' तें थोडक्यांत सांगण्याचा उपक्रम त्यांनीं केला होता, परंतु नेहमीप्रमाणें तो तेवढाच राहून गेला. त्यांना केव्हां केव्हां रोजनिशी लिहावयाची हुक्की येत असे, व त्या वेळेला, कांहीं तरी लिहावें, असा त्यांचा परिपाठ होता. ही रोज-निशी म्हणजे एक मोठें गौडबंगालच आहे. हरिपाठाच्या एका पुस्तकांत जिथें कुठें लहर लागेल, तेथें कांहीं तरी एकदोन वाक्यें लिहून ठेवावीं, अनुक्रम अथवा संगतीचें नांव ही नको, एकाद्या ठिकाणीं, १९१२ सालचा उगीच

कांहीं तरी 'अमुक मनुष्य येऊन भेटला' असा उल्लेख सांपडेल, तर त्याच्याच पुढें लगेच, १८९३ मधल्या एकाद्या गोष्टीविषयीं कांहीं वाक्यें लिहिलेलीं सांपडतील, त्यांतच एका ठिकाणीं 'ममच मामकानां इत्यादिनांच सर्वेषां देवताघटित जीव व त्याचें शरीर यांचें महाराजांशीं ऐक्य झालें' असा स्वतन्त्र उल्लेख आहे! या सबंध आयुष्यांतील तुटपुंज्या गोष्टी सोडून दिल्या, तर स्वतःच्या स्थितिनिदर्शक उद्गार त्यांनीं काढल्याचें कोणास सांगतां येणार नाहीं; तरी पण त्यांचा सर्व आयुष्यक्रम या उद्गारांच्या जोडीस ठेवून पाहिलें असतां काय प्रकाश पडतो, तें ज्याचें त्यानें पहावें. त्यांतही लक्षात ठेवण्याजोगती गोष्ट ही आहे कीं, असेंच त्यांचें राहणें त्यांना ३६ वर्षें पाहिलेले सर्व लोक सांगतात. साधारणतः मद्रासहून आल्यावर जी त्यांच्या राहण्याची घडी बसली, तीच अखेरपर्यंत होती; फरक काय तो बाह्य व्यापारांचा. त्यावरूनही असेंच वाटतें कीं स्वतःस कांहीं मिळवावयाचें उरलें होतें म्हणून त्यांनीं तपश्चर्या केली, अथवा कांहीं साधन केलें, असें नसून खरोखरच तें आमच्याकरितां केलें.

अशीच त्यांच्या साधनांचीही स्थिति आहे. सर्व प्रकारच्या उद्योगांत गढून गेलेल्या त्यांनीं स्नानसंध्या वगैरे नित्यकर्मांपलीकडे व महाराजांची पूजा आरती वगैरे करण्यापलीकडे कांहीं केल्याचें कोणीही कधीं पाहिल्याचें सांगत नाहीं. नाहीं म्हणावयास महाराजांचें नांव व त्यांचा स्वतःचा कांहीं उपासनामंत्र एवढें मात्र जोराजोरानें म्हणतांना त्यांना कित्येकांनीं ऐकलें असेल. सारांश, साधक म्हटला म्हणजे चित्तैकाग्रय ध्यानधारणा, योगसाधनें, भजनकीर्तन, वगैरे ज्या कांहीं कल्पना डोक्यांत उभ्या राहतात, त्यांतील एकही गोष्ट करतांना कधीं ते दिसले नाहींत. आणि त्यावरून ईश्वरभक्तीस लागलेल्या व त्याचा पाया म्हणून देवदर्शन घेणें, देवास प्रदक्षिणा घालणें, साधूसंतांस नमस्कार करणें, दानधर्म करणें, पारायणें, पूजाअर्चा करणें, वगैरे केवळ प्राथमिक अवस्थेंतील माणसाप्रमाणें ते हुबेहुब दिसत. अशा स्थितींत कल्पना तरी काय करावयाची? स्वतः त्यांच्या विषयीं या बाबतींत तर ते अवाक्षरही काढीत नसत. गायत्रीचें पुरश्चरण अथवा पुरश्चरणें केल्याचा आणि बारा वर्षें निंबाचा पाला खाल्ल्याचा असे दोनच उल्लेख त्यांच्या बोलण्यांत आले होते; परंतु त्यावरून कांहीं विशेष बोध होत नाहीं. आणि दुसरीकडून तर 'आपण सर्व अनुभव घेतले,' असें ते म्हणत; यांची संगति कशी बसवावयाची? परंतु

संगति लागत नाहीं, म्हणून प्राथमिक कोटींत त्यांस टाकूनही मनाचें समाधान होत नाहीं. अण्णासाहेब पूर्वी प्राणायाम करीत असत, असें सांगणारीं माणसें भेटतात. आणि त्यांच्या मांडी घालण्याच्या पद्धतीवरूनही सिद्धासनाचा अभ्यास केव्हां तरी त्यांनीं पुष्कळ केला असावा असें वाटतें. तशीच दुसरी त्यांच्याविषयींची आश्चर्यकारक गोष्ट अशी होती कीं, अगदीं अखेरचीं दोन-तीन वर्षें टाकलीं तर ते कधींही पाय ताणून निजले नाहीत! आधीं झोंपच मुळीं दोनचार दिवसांनीं घ्यावयास सांपडावयाची, व तेव्हां देखील एकाद्या तासापलीकडे जास्त निजलेले कधीं कोणीं पाहिले नाहींत. परंतु त्यावेळीं देखील गुडघे वर करून पोटरी व टांच मांडीशीं जुळवून उभे ठेवावयाची त्यांस संवय असे. असल्या थोड्याशा गोष्टी सोडल्या तर, एकांत, चित्ताची एकाग्रता करण्याचा प्रयत्न, अगर एकाग्रता, प्राणायाम—वगैरे कांहींही त्यांनीं कधीं केलें नाहीं. उलट त्यांचें सर्व आयुष्य उघड्यावर, चार माणसांच्या मध्यें गेलें. त्यामुळें तर आणखीच घोंटाळा होतो. परंतु थोडेंसें विचारपूर्वक पाहिलें तर असें आढळून येईल की, घोंटाळ्याचें कांहीं कारण नाहीं. हें कसें तें आपण थोडक्यांत पाहूं.

अण्णासाहेब हे वैदिक संस्कृति आणि वेदमार्ग यांचे अभिमानी होते, आणि त्या मार्गानें वागावयाचें, असा त्यांचा कटाक्ष असे. वेदांवर त्यांची अढळ निष्ठा असून वेदाच्या पायावर उभारलेला वर्णाश्रमधर्म हाच सर्वोत्कृष्ट धर्म होय, असें ते म्हणत असत. हा वर्णाश्रमधर्म म्हणजे काय हें आपण थोडक्यांत पाहूं. वैदिक तत्त्वज्ञानाचा सारांश काढून पाहिलें, तर त्याचा अर्थ इतकाच आहे कीं, अनिर्वाच्य ' अनिर्देश्य, निर्गुण, निर्विकार असें जें कांहीं ओतप्रोत भरलेलें आहे तेंच या सर्व विश्वाचें त्रिकालाबाधित अनाद्यंत मूळ रूप होय. आणि त्याच्यावर हें गोचर विश्व मायावादाप्रमाणें केवळ मिथ्या भासून अथवा इतरणवादाप्रमाणें अनध्यस्तविवर्तरूप भासतें. आणि त्यांतच पुढें पर्याय होऊन नानाकार रूपच सत्यत्वानें भासतें. अर्थातच हें नानाकारत्व जाऊन आणि त्यांतील विवर्तरूपता अथवा मिथ्यात्व जाऊन केवल एकरूपता होणें हेंच जीवाचें अंतिम पर्यवसान आहे. हें जरी खरें असलें तरी तशी स्थिति प्राप्त व्हावी म्हणून त्याला जें हें विवर्तरूप आलेलें आहे तें सत्य मानूनच प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न कशा रीतीनें करावा, याचा शोध करीत असतां

( अगर दिव्य स्फूर्तीनें म्हणा ) ऋषींस असें आढळून आलें कीं, या इंद्रियगोचर विश्वाच्या पलीकडे अतींद्रिय असें अनंत विश्व असून, त्या विश्वांतूनच या विश्वाचे उत्पत्ति स्थिति लय होतात, आणि या जड विश्वाची चालना करण्यास लागणाऱ्या सर्व शक्तीचा पुरवठा तेथून होतो. अशा रीतीनें हें दिसणारें विश्व परतंत्र असल्यामुळें यांत अनित्यत्व व सुखदुःखादि विषमत्व आहे. यास व्यापून राहणारें तें इंद्रियादिकांस अगोचर असलेलें अस्तित्व याच्या मानानें नित्य एकरस अखंडसच्चिदानंदरूप आहे लाट ज्या मार्गानें येते त्याच मार्गानें जशी ती परत जाते, तसा जीवदशेला आलेला हा ब्रह्मपरमाणु पुन्हा त्याच मार्गानें मागें जाणें शक्य आहे.

म्हणून जेणें करून हें अत्यंत सुलभरीतीनें साधेल, असा मार्ग शोधून काढणें त्यांस अवश्य वाटलें; व तसा शोधावयास त्यांस लांवही जावें लागलें नाहीं. कारण तें सच्चिदानंदरूप शरीराच्या कणांकणांतून व्यापून आहे, म्हणूनच शरीर व्यापार करितें. यंत्र चालविणारी शक्ति जशी त्या यंत्राच्या प्रतिपरमाणूस व्यापून असते, तसेंच हेंहि असलें पाहिजे. जर यंत्राचा एकादाही परमाणू त्या शक्तीनें व्याप्त नसेल, तर तें यंत्रच चालणें शक्य नाहीं; त्याचप्रमाणें या सबंध विश्वांत अथवा त्याची सूक्ष्म प्रतिमा जें मनुष्य शरीर, त्यांत एकादाही परमाणु या चैतन्यशक्तीनें व्याप्त नसेल, तर हें विश्व अथवा शरीर क्षणमात्रही चालणार नाहीं. मात्र इतकेंच कीं, तो शक्तीचा ओघ हातीं घेतां येत नाहीं. जर हा शक्तीचा ओघ हातीं आला तर मनुष्यही स्वतः नित्य शुद्ध बुद्ध असा अखंडसच्चिदानंदरूप व त्याची सर्वव्याप्तृत्व सर्वकर्तृत्व आणि सर्वज्ञातृत्वरूप कार्ये करण्यास समर्थ असा होईल.

हा शक्तीचा ओघ कसा हातीं घेतां येईल, व ही गोष्ट वाटेल त्या जीवास अत्यंत सुलभ आणि अल्पकालसाध्य कशी करून देतां येईल, याचा विचार करीत असतां त्यांनीं असें पाहिलें कीं, शरीरास वागविणारी ही शक्ति शरीराच्या *अतीत राहून, स्थूल रूपानें शरीरांत चार प्रकारांनीं काम करते; व

---

*शरीराच्या अतीत राहून:—' अनंत अनादि आणि अखंड आत्मा कांहीं अंशानें प्राण होतो, किंवा जीव होतो इत्यादि. त्या प्राणाच्या कांहीं अंशानें खनिज म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश इत्यादि पंचतत्वात्मक होतात.

या तिच्या चार रूपांपैकीं कोणत्याही एका स्थूळ स्वरूपांत तिला हातीं घेतल्यास, ‘ नदीमुखेनैव समुद्रमाविशत् ’ या न्यायानें तिच्यासह आपण विरळ

---

या पंचतत्त्वांचा कांहीं अंशान अंडज, स्वेदज, जारज उद्भिज (झाडें) असों होतो. आतां या पैकीं पाहिल्या तिहींत अंतःकरण रूपाची स्फूर्तीरूप शक्ति कांहीं अंशानें प्रकट करतो. अर्थात पंचतत्त्वें निर्माण करण्याचे व्यापार किंवा अंडजादि उत्पत्तिलयाचे व्यापार अंतःकरणावांचून चालतात. तेव्हां हें व्यापार कसे चालतात, हें समजण्याकरितां अंतःकरण सोडून हा अभ्यास केला पाहिजे. . . . . .अंतःकरण जागृति व स्वप्नावस्थेंत असतें. जागृतींत पूर्णपणें व स्वप्नावस्थेंत अंशेकरून म्हणजे अहंकार व चित्त यांस सोडून असतें. आणि सुषुप्ति अवस्थेंत सर्वांशीं अंतःकरणाचा लय असतो. म्हणून उत्पत्ति, स्थिति आणि लय हे व्यापार समजण्याकरितां सुषुप्तीच्या पलीकडे गेलें पाहिजे. कारण निद्रावस्थेंत उत्पत्ति, स्थिति आणि लय यांचे व्यापार चाललेले असतात. म्हणजे उदाहरणार्थ, केसांचें वाढणे, रक्ताचें फिरणें, अन्नाचें रक्त होणें, व नर्क होणें, म्हणजे सारांश जागृति स्वप्न सुषुप्ति या अवस्था टाकून देऊन पलीकडे गेले पाहिजे. ती पलीकडची अवस्था तुर्या या नांवानें प्रसिद्ध आहे. या तुर्येला अंतकरणाचे काम क्रोध लोभादिक विकार नसतात. म्हणून तुर्यावस्था ही आत्म्याची शुद्ध अवस्था आहे. म्हणून तिच्या पासून उत्पत्ति, स्थिति व लय हे व्यापार निघतात. अर्थात कालाच्या संबंधानें व व्याप्तीच्या संबंधानें उत्पत्ति, स्थिति व लय या क्रियांपेक्षां मोठी असते. म्हणजे त्या क्रियांना व्यापून असते, व त्या क्रिया करण्याचें सामर्थ्य असते. म्हणून तुर्येच्या असंख्य क्रिया आणि त्या उत्पत्ति, स्थिति आणि लय यांना सोडून देऊन पलीकडच्या राहातात. उदाहरणार्थ, मनुष्य बोलूं लागल्यापासून मरेपर्यंत अनंत शब्द उच्चारतो. जर या शब्दांचे अती सूक्ष्म ठसे बनविले आणि त्याच्या आयुष्यांतल्या शब्दांच्या ठशांचा गठ्ठा केला अशी कल्पना केली तर एकेकाचा गठ्ठा पृथ्वीपेक्षां मोठा होईल; अर्थात ज्या शक्तीपासून हे शब्द निघतात, ती शक्ति देहाला व्यापून देहाच्या बाहेर आहे, म्हणून पंचतत्त्वांना सोडून आहे. अर्थात प्राणाला सोडून आहे. ती जरा प्राणापेक्षां मोठी असते, म्हणून अमृत संज्ञा दिली आहे. . . . . . ”

—श्री अण्णासाहेब.

होऊन मूळ संवित्स्वरूपांत मिळून जाऊं. याच तत्त्वावर मूळ चार साधन-प्रकार उत्पन्न झाले, व त्यांचें मिश्रण होऊन पुढें लक्षावधि साधनें झालीं. प्राणशक्ति हातीं घेऊन तिच्यायोगानें बाकीच्या शक्ति ताब्यांत आणावयाच्या आणि शक्तिमय होऊन जावयाचें, हा हठयोग म्हणून म्हणविला. मनाची शक्ति प्रथमतः ताब्यांत घेऊन एका बाजूनें शरीरासह प्राण व दुसऱ्या बाजूनें बुद्धि आणि वाक् या इंद्रियातीत शक्ति जिंकावयाच्या, आणि त्यानें शक्तिरूप होऊन जावयाचें, हा राजयोग होय. या दोन्हींचाही क्रम शरीर आणि मन या दोन जडदृश्यांस सुरुवात करून त्यांचें चैतन्यांत रूपांतर करण्याचा आहे. परंतु वाक् आणि बुद्धि या ज्या दोन अतींद्रियशक्ति त्यांचा क्रम अर्थातच उलटा,—म्हणजे शरीरांतील एकेक तत्त्व चैतन्यरूप करीत करीत शेवटीं या जड शरीरापर्यंत येऊन तेंही चैतन्यमय करावयाचें. यांतील वाक्शक्तीच्या साह्यानें हें सर्व घडवून आणावयाचें. हा मुख्य वेदमार्ग आहे. कारण, वेद हा वाग्रूपच आहे. बुद्धीचा मार्ग यासच ज्ञानयोग अथवा आत्मार्पणरूप गीताशास्त्रोक्त भक्तिमार्ग म्हटलें. बुद्धि हीं निश्चयरूपिणी आहे. आणि चित्परमाणुरूपजीव स्वतःच्या निश्चयानेंच जीवरूप आहे, म्हणूनच त्याच्या सर्व शरीरास आधार निश्चयाचाच आहे. त्यामुळें एका अत्यंत दृढ आणि बलवत्तर अशा निश्चयानें सर्व शरीर क्रमशः चैतन्यरूप करून टाकणें शक्य आहे. चतुर्विध मार्गानें वर गेलेला जीवच या निश्चयशक्तीनें आपलें सच्चिदानंद शक्तिरूपत्व टाकून मूळच्या कैवल्य स्थितींत पोहोंचू शकतो. परंतु निश्चयाचा मार्ग कोट्यवधि लोकांतून एकाद्या-सच आक्रमण करितां येईल. असेंच राजयोग व कर्मयोग हेहि अनेक प्रकारांनीं परिस्थितीवर अवलंबून असल्यामुळें सर्व जीवांस त्यांचा सामान्य उपयोग होणें कठीण. म्हणून ऋषींनीं वेदांच्या आधारावर जो मार्ग काढून दिला तोच हा वर्णाश्रम धर्म होय. याला सामुग्री फारच थोडी, म्हणजे केवळ वर्णविहित असा आचार आणि वेदपठण एवढीच पुरते. या वेदमार्गाचें आद्यतत्त्व ‘एक-मेवाद्वितीयम्’ हें असल्यामुळें साहजीकच त्याचा प्रतिसिद्धांत असा निघतो कीं, जीव हा विश्वांत एकटा नसून विश्वाचा एक अविभाज्य, नित्यसंबद्ध असा अंगरूप अवयवच आहे. म्हणून जीव आणि विश्व,—मग तें इंद्रियगोचर स्थूल विश्व असो, अथवा सूक्ष्म विश्व असो,—हे परस्पराश्रयी आहेत. आणि त्यांना

एकमेकांना सोडून कांहीं करतां यावयाचें नाहीं, आणि व्हावयाचेंही पण नाहीं. एवढ्या करितां या उभयतांनींही आपल्या आचारांत परस्परांचा विचार ठेवूनच सर्व कांहीं केलें पाहिजे. म्हणजे एकमेकांचें एकमेकांना साह्य होऊन सर्वांसच सच्चिदानंदरूपत्व येणें अशी ब्रह्मलोक स्थिति होईल. याकरितां मनुष्य शरीराची जडपणाची जी आडकाठी आहे ती जर काढून टाकली, आणि उभयतांचा संबंध जुळवून दिला, तर हें काम अधिक सुलभ होईल. वाक्शक्ति ही आकाशतत्वरूप असल्यामुळें चतुर्भूतातीत आहे, आणि असें असूनही, सामान्यतः सर्व माणसांस प्राप्त आहे. यामुळें तिच्याच आधारावर अशारीरांचा मार्ग वसविला. वेद हे नित्यसिद्ध, अपौरुषेय, आणि शक्तित्रयांनी युक्त आहेत. किंबहुना सर्व सृष्टीपसारा हें वेदांचें व्यक्त रूपच होय. वेदांचा उच्चार ब्रह्मदेवानें केल्याबरोबर जर स्थूल सूक्ष्म विश्वाची उभारणी होते, तर तोच उच्चार ब्रह्मपरमाणुरूप जीवानें केला असतां कां होऊं नये? असा विचार मनांत येतो. याचें कारण असें कीं, ब्रह्मदेवाचा वेदध्वनि हा अप्रतिहतरीतीनें व्यक्त स्वरूपास येतो. परंतु स्वतःच्या संकल्पानेंच कां होईना, संकोच पावलेल्या ब्रह्मपरमाणूचा ध्वनि शक्तिदुर्बल असून त्यास या स्थूल सूक्ष्म शरीराच्या गहन यंत्रांतून आपला मार्ग काढीत व्यक्त व्हावें लागतें. एवढ्या भानगडींत त्याची सत्यसंकल्पता जिरून जाते. जर हीं शरीरयंत्रें अगदीं प्रकृतिस्थ राहतील, तर वेदोच्चारानें ब्रह्मशक्तिप्रमाणेंच सृष्टिकार्य केलें पाहिजे. असें पाहून तशा प्रकारचीं प्रकृतिस्थ शरीरें निवडून काढलीं, आणि त्यामुळेंच चातुर्वण्याची उत्पत्ति झाली. चातुर्वर्ण्याच्या उत्पत्तीस आमच्या इकडील सर्व ज्ञानपरंपरा सोडून केवळ सामाजिक तत्वांवर बसवूं पाहणाऱ्या पाश्चात्य लोकांचें व त्यांच्या हिंदी मानसपुत्रांचें धाडस खरोखरच विलक्षण आहे. असो. चातुर्वर्ण्य विचार हा स्वतंत्र विषयच एका भागांत यावयाचा आहे, म्हणून विस्तार न करतांना एवढेंच लिहिणें भाग आहे कीं, अशा प्रकारें ब्राह्मणवर्ग हा प्रकृतिस्थ शरीरांचा म्हणून वेगळा काढून तो नित्यप्रकृतिस्थ कसा राहील, अशी आचार व विचार यांची रहाटी आणि संस्कार परंपरा त्याला निर्माण करून दिल्या. बीजतः उत्तम संस्कारयुक्त शरीर असावें आणि ब्राह्मणांनीं आचार सांभाळून वेद पठण करावें, व्यक्तिविषयक विचारही कधीं मनांत आणूं नये, हें त्याचें कर्तव्य ठरलें. त्यानें जें काय करावयाचें, तें सर्व विश्वाकारितां; त्या

विश्वामध्येंच तोही आला, स्वतःच्या उन्नतिकरितां म्हणून देखील त्यानें कांहीं करावयाचें नाहीं. ब्राह्मण म्हणजे विश्वोपयोगी शक्तीचा कारखाना. म्हणूनच 'ब्राह्मणो लोकपालकः' असें म्हटलें आहे. त्याला योग वगैरे देखील करण्याची सवड नाहीं, आणि गरजही पण नाही. हठयोगानें जो षट्चक्रभेद व्हावयाचा अथवा राजयोगानें, जी ध्यानविस्मृतिरूप समाधी लागावयाची, त्यांचें कार्य त्याच्या संस्कारित शरीरांत आणि विहिताचारांत सहजच होऊन कोणचीही निरोध अवस्था न होतां त्याचें सर्व शरीरच नित्यसमाधिस्थ असतें. आणि म्हणूनच ब्रह्मशरीराची योग्यता केवळ ब्रह्मरूप आहे. कारण त्याच्या शरीराचा प्रत्येक परमाणु शक्तिरूपच असून विश्वांतील त्या त्या परमाणूशीं शक्तीची अखंड देवघेव करीत असल्यामुळें सर्व देवतामयच आहे. हा खरा वेदमार्ग आहे. याच्यापासून क्रमशः झालेल्या भ्रष्टतेमुळें पुढें ब्राह्मणांस योगादिक इतर मार्गांची गरज भासली. असो.

सांगावयाची मुख्य गोष्ट अशी; अशी कल्पना करतां येते कीं अण्णासाहेब यांनीं या वेदमूलक आणि निश्चयात्मक अशा मार्गाचा अवलंब केल्यामुळें त्यांना कोणत्याही तऱ्हेच्या ताटस्थ्यची गरज न पडतां, इतर मार्गांनीं मिळणाऱ्या उच्च स्थितींचा अनुभव आला. योगयाग करणाऱ्या सर्व सांप्रदायांहून त्यांचा मार्गच मुळीं उलटा होता; म्हणजे कांहीं निराळाच होता, असें मात्र नाहीं. कारण योगादिक क्रियांनीं तरी काय होतें असें पाहिलें तर असें दिसून येतें कीं, मुख्यतः तीन गोष्टी त्यांनीं साधतात. शरीरांतील सर्व नाड्या खुल्या करून (*शक्तिप्रवाह उत्तम रीतीनें वाहतील असें शरीर ठेवणें) शरीरशुद्धि साधणें, ही त्यांतील पहिली गोष्ट होय. दुसरी गोष्ट पिंड आणि ब्रह्मांड यांचा सांधा उघडून शक्तीचा प्रवाह आंत घेणें, म्हणजे दोघांमध्यें दळणवळण स्थापित करणें, ही होय; आणि यानंतर शरीरांतील विशिष्ट बिंदूवर शक्तीचें एकीकरण करून इष्ट क्रिया करणें, अगर शरीरास सोडून ब्रह्मांडांतील इष्ट स्थळीं व्यापार करणें. या तीन गोष्टी साधणें हेंच योगाचें उद्दिष्ट आहे. हें योगानें साध्य झाल्यावर मग सर्वांचाच ग्रास करून केवल स्थितींत राहणें अगर तिचा मोह

---

* नाडी म्हणजे शक्ति प्रवाह 'स्थानानि स्थानिभ्यो यच्छति नाडी तेषां निबंधनम्'।

टाकून विश्वव्यापारास मदत करीत सगुण स्थितींत राहणें, हा ज्याच्या त्याच्या संकल्पाचा प्रश्न आहे. चित्तवृत्तीचा निरोध म्हणजे योग, हें लक्षण योगाच्या पूर्णतेचें नसून योगस्थितीस कोठून खरोखर सुरुवात होते, त्याचें द्योतक आहे; व या लक्षणापर्यंतचे सारे प्रयत्न म्हणजे योग नसून योगाची पूर्वतयारी होय.

आतां अशी एक शंका येणें साहजिक आहे कीं जरी प्राणाशिवाय इतर मार्गानें जाणारा मनुष्य असला, आणि त्यानें नाडीशुद्धी वगैरे सर्व गोष्टी दुसऱ्या एकाद्या मार्गानें केल्या, तरी क्रमशः सर्व शरीर जेव्हां तो ताब्यांत घेईल तेव्हां प्राण देखील त्याच्या ताब्यांत येईल; आणि विशिष्ट कोणच्याही बिंदूवर स्थिरता झाली असतां मनासह प्राणही स्थिर होणारच. म्हणजे अनपेक्षित रीतीनें कां होईना मार्गस्थ असतां, निरोध परिणाम सहज घडून येईल. म्हणजे मार्गांत केव्हां ना केव्हां तरी ताटस्थ्य येईलच. असली स्थिति साधकांना केव्हां ना केव्हां तरी कदाचित् कोणच्याही मार्गांत येतच असेल. परंतु तिच्या आहारीं पडून राहणें, अथवा निजनिर्धारानें ती क्षणमात्रांत जिरवून टाकणें हें ज्याच्या त्याच्या विमलज्ञानावर, निश्चयशक्तीवर, भाग्यावर, आणि ईश्वरी कृपेवर अवलंबून राहील. पांच सात वर्षें जेव्हां अगदीं मौनच स्थितींत अण्णासाहेब हे असत, आणि डोक्यावर पाणी पडलें तरी देखील सर्व शरीरांतील प्राण गोळा होऊन येत, अशी त्यांची स्थिती असे, त्या वेळेला, वस्तुतः असाच प्रसंग वारंवार येत असून, आपल्या कार्याकरितां निर्विकल्पक अत्यानंदाचा मोह देखील निर्धारानें दाबून टाकून, ही दशा कोणाच्याही लक्षांत न येऊं देतां, त्यांनीं जिरवून टाकली, अशी जर एकाद्यानें कल्पना केली, तर त्यालाही कांहीं खुळ्यांतच काढतां येणार नाहीं. असो.

या सर्वांस धरूनच अशी जिज्ञासा होते कीं जरी अण्णासाहेब यांचा उलट मार्ग असला, तरी त्या मार्गाच्या पद्धतीप्रमाणें कां होईना, त्यांनीं काय केलें असावें ? हा प्रश्न तर अधिकच बिकट आहे. एकदां ते असें म्हणाले होते कीं, ‘ मार्गही पुष्कळ झाले, आणि पुष्कळ पुढेंही होतील, परंतु महाराज आहेत आणि यच्चयावत् प्रत्येक गोष्ट त्यांच्या इच्छेनेंच होते, असें मला जसें पटलें, तसें दुसऱ्या कोणासही पटलें नसेल. परंतु तें उगाच पटलें नाहीं,

पाठीं कां सालटीं निघालीं त्या करितां !' हें ऐकून मी तर विचारांत पडलों. कारण साधुसंत नुसते नामधारी कां होईनात, अण्णासाहेबांस अतिशय पूज्य. मग खरोखरच जे अधिकारी पुरुष होऊन गेले, त्यांच्याविषयीं तर बोलावयासच नको. श्रीनरसिंह सरस्वती यांचे पट्टशिष्य धुळ्याचे नारायणबुवा ऊर्फ पद्मनाभ स्वामी यांच्याविषयीं ने नेहमीं म्हणत कीं, " असा संत मला अर्ध्या हिंदुस्थानांत दिसत नाहीं; कारण मी आणि माझें हें कधीं त्यांच्या तोंडून चुकून देखील निघालें नाही. यच्चयावत् सर्व गोष्टी महाराज करतात, असें त्यांस वाटे ?' या बुवासाहेबांस ते महाराजस्वरूप समजून तसाच मान देत. तेव्हां त्यांच्या पेक्षां देखील आपला अनुभव आणि श्रद्धा अधिक आहे, असें अण्णासाहेब यांनीं म्हणणें, मला शक्यच वाटेना. बरें, ' सालटीं निघालीं ' म्हणावें, तर वातांवुपर्णाशन करून हाडाचीं काडें करणारे आणि " देवाच्या पायाकरितां ' श्रीतुकोबासारखें ' सर्वस्वाची होळी ' करणारेही कांहीं सांपडतात; तेव्हां यांचींच अशीं काय ' सालटीं निघालीं ? ' असें इतरांस कमीपणा आणणारे प्राकृत जनासच शोभणारे शब्द अण्णासाहेब खास बोलणार नाहींत. अशा शंकेनें विचार करीत असतां बरेच दिवस गेले. पुन्हा त्यांनाच विचारावयाची तर सोयच नव्हती. परंतु असें वाटे कीं, या शब्दांचा अर्थ आपणास नीट लागत नाहीं. असें होतां होतां त्यांच्याच कांहीं बोलण्यावरून एकदम त्याचा अर्थ उलगडला. ' मला जसें पटलें ' म्हणजे ' मला ज्या रीतीनें पटलें, ' असा या स्थितप्रज्ञतेच्या मार्गावर जोर होता.

एकदां महाराजांनीं कोणास काय अभ्यास सांगितले अशा विषयीं बोलणें चाललें असतां ' अमक्यास ध्यानयोग सांगितला, ' ' तमक्यास अक्षरसाक्षित्व सांगितलें, ' ' बुवासाहेबांस हठयोगाच्या पद्धतीनें पूर्णतेस नेलें, ' ' अमक्याची अभ्यासपद्धती अशी होती, ' असा विषय निघाला. तेव्हां मधेंच ' महाराजांनीं कोणास कांहीं, कोणास कांहीं, असें सर्वांस सांगितलें, परंतु तुम्हाला मात्र कांहींच सांगितलें नाहीं ? असा प्रश्न त्यांना करण्यांत आला. त्या वेळीं कांहीं एक न बोलतां ते उगाच राहिले. असा प्रश्न निघाला असतां ते नेहमींच स्तब्ध रहात. परंतु एरवीं कित्येक वेळां ' पाहिला गे माय, तो मी देवाचाही देव । फिटला संदेह निमालें दुजेपण, ' असें मात्र अतिशय आनंदानें म्हणत. याच ठिकाणीं दुसरीही गोष्ट उघड सांगावीशी वाटते. सांप्रदायिक

पद्धतींत अमनस्कास साधनीभूत असा महाराजांनीं सांगितलेला योगाभ्यासाचीं रहस्यें असलेला एक ग्रंथ आहे. या ग्रंथांतील अभ्यास आपण करतों, असें सांगणारे कांहीं सांप्रदायिक आहेत; व त्यांतीलच एक अभ्यास अण्णासाहेब यांचा होता. तो आपणास ठाऊक आहे, असें बोलून, ते गूढपणाच्या मंडपांत दुसऱ्याची वाढती जिज्ञासा झांकून टाकतात. परंतु हा ग्रंथ माहीत असणाऱ्या सांप्रदायिकांना हें माहीत आहेच कीं, यांतील सर्व अभ्यासक्रम हे शरीरास ताटस्थ्य अथवा सुषुप्ती आणणारे आहेत. त्याचप्रमाणें त्या मार्गांनीं पुढें पाऊल खरोखर पडण्यास कमींत कमी चार घटका तरी अभ्यासाची स्थिरता झाली पाहिजे, आणि अशा रीतीनें अभ्यास करणारास, बाकीच्या व्यवसायांची अनुकूलता आणि आहारविहार यांची नियमितता पाहिजे. राजयोग अथवा हठयोग या पद्धतीनें जाणाऱ्यास प्रथमतः तरी कालनियमांचें परिपालन करणें अवश्य आहे, आणि कालनियम व अण्णासाहेब यांचा तर उभा दावा! अण्णासाहेब यांच्या सबंध जीवनक्रमांत काल म्हणून कांहीं खंडशः ओळखली जाणारी वस्तु आहे, याची त्यांस जाणीव असावी असेंही दिसत नाहीं. त्यांचा सर्व काल त्यांच्या कर्मांच्या अखंडतेंत होता. त्याचप्रमाणें वर सांगितलेंच आहे कीं दोनदोन चारचार दिवसांतही त्यांना कधीं कोणी निजलेले पाहिलें नाहीं, आणि त्यानंतरही जेव्हां निजावयास सांपडे, तेव्हां कधीं तास दीड तासाच्या वर ते निजले नाहींत. यावरून हे अभ्यास अण्णासाहेब यांनीं कसें केले असतील, हें या माहितगार लोकांनींच सांगावें. तसेंच, हीच त्यांची तऱ्हा पूर्वीपासून देखील अशीच होती. उलट पूर्वीं देवास जाणें, प्रदक्षिणा घालणें वगैरे शारीरिक मेहनतीचीं कामें जास्त जोरानें चालत. यावरूनही अण्णासाहेब यांचा अभ्यास या पैकींच असून ' आम्हांस ठाऊक आहे ' असें म्हणणाऱ्या लोकांस, काय म्हणावें, हें कळत नाहीं. असो. हें विषयांतर टाकून त्यांचा जीवनक्रम आणि केव्हां केव्हां निघालेले उद्गार यांवरून सरळ अनुमान काय निघतें तें पाहूं. असें स्पष्टपणें लिहिण्यांत कोणाचाही उपमर्द करण्याची, अथवा ते विश्वास पात्र नाहींत असें म्हणण्याची इच्छा नाहीं. उलट व्यक्तीप्रत तसा तसा रंग करण्याची त्यांची हातोटी अपूर्व असल्यामुळें, त्यांना तसें वाटलेंही असेल. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, त्या वाटण्यास इतर सर्व गोष्टींची संगती जुळते किंवा नाहीं, हें त्यांनीं पाहिलें नाहीं.

हा प्रश्न उपस्थित करून त्याची चर्चा करण्याचें मुद्दाम कारण एवढेंच की, वस्तुतः याविषयीं अण्णासाहेबांची माहिती त्यांच्या तोंडून कोणास कळली आहे, असें खात्रीपूर्वक मानतां येत नाहीं. अशा स्थितींत अभ्यास वगैरेंचें बंड माजविणारे लोक त्यांच्या प्रतिष्ठित तर्कांनीं वस्तुतः अण्णासाहेब यांनीं उघड उघड जें केलें, त्याचेंही महत्त्व घालवून टाकतात. 'नुसत्या नामस्मरणादिकांनीं काय व्हावयाचें आहे '? " गायत्रीच्या योगानें फार तर सामर्थ्य येईल. पण योगदशा थोडीच मिळणार आहे ? " गुरुचरित्रांत भाविक भजनापलीकडे, अथवा कोणास पैसा दे, कोणास पोर दे, अशा पलीकडे कांहींच नाहीं. त्याच्या नुसत्या वाचनानें काय व्हावयाचें आहे ? " वो नाम तो कुछ्‌ और है' अशा प्रकारच्या वादविवादांनीं बुद्धिभेद करणारे, आणि वस्तुतः कोणत्याही तऱ्हेचा प्रत्यक्ष अनुभव न घेतां, एकदम पूर्णावस्थेंतील माणसाप्रमाणें सर्व मार्गांचें आणि गोष्टींचें रहस्य आपणास समजतें, अशा आत्मसंभावनेनें वाटेल त्या विषयावर निःसंकोचपणें जीभ टाळूस लावणारे वेडे लोक " अण्णासाहेबाचा खरोखर मार्ग वेगळा होता, कोणीही आला तर त्यास ' महाराजांवर विश्वास ठेव, गायत्रीचा जप कर, महाराजांचें नांव घे, गुरुचरित्र वाच ' म्हणून सांगत ती केवळ उडवाउडवी होय, खरा मार्ग तर कांहीं वेगळाच आहे, " असें म्हणतांना सर्वत्र आढळतात. त्यामुळें 'परमार्थ म्हणजे लांकूड होऊन पडणें नव्हे, परमार्थ म्हणजे चमत्कार पाहणें अथवा दाखविणें नव्हे, परमार्थ म्हणजे चित्तशुद्धि, आणि चित्तशुद्धि म्हणजे अवंचकता, निःस्वार्थता आणि निरहंमति' हें जें त्यांनीं आपल्या कृतीनें आणि वाणीनें रात्रंदिवस कंठशोष करून सांगितलें, त्याच्यावर पाणी पडण्याची वेळ येते. ' ज्याचा मला अनुभव नाहीं, तें मी कधीं कोणास सांगत नाहीं, ' असें तें नेहमी म्हणत आणि त्याप्रमाणें तशा गोष्टीं सांगतांना ' अमका अमका असें म्हणत होता, ' अशा तऱ्हेनें सांगण्याचा त्यांचा परिपाठ होता. वरें, ते स्वतः महाजन होते. भारतांत धर्मराजांनीं ' मार्ग कोणता ? ' या प्रश्नास ' महाजनो येन गतः स पंथा ' असें उत्तर दिलें आहे. त्यावरून ' महाजन कोणास समजावें, आणि कोणाच्या मागून गेलें असतां निदान घात तरी होणार नाहीं, ' असा प्रश्न केल्यावरून त्यांनीं सांगितलें होतें कीं ' जो स्वतः बोलल्याप्रमाणें तंतोतंत वागतो, ज्याला आपल्यापासून यत्किंचितही म्हणजे नुसतें बरें म्हणवून घेण्याचीसुद्धां इच्छा नसतें,

आणि असें असून ही आपल्या कल्याणाची खरोखर कळकळ असते, ( नुसती औपचारिक नव्हे ! ) त्याला महाजन असें म्हणून त्याच्या मागून जावे. या त्यांच्या म्हणण्याप्रमाणें पाहिलें असतां, ते स्वतःच महाजन होते आणि लोकांच्या कल्याणाच्या कळकळीनें त्यांचें अंतःकरण अक्षरशः तुटत असें; अशा कारुणिकतेनें सांगितलेल्या शब्दांना उडवाउडवींत काढणाऱ्या महात्म्यांच्या साहसाची कमाल होय ! जणुं काय, ' बघ अखेरीस मीं तुला कितीं सोळा आणे फसविलें ! ' असें देहावसान समयीं पाठीवर थाप मारून जगास सांगतां यावें, एवढेंच त्यांचें ध्येय होतें । एका *गृहस्थास श्रीगुरुचरित्र वाचावयास सांगितलें असतां तें त्याच्या मनांत भरत नाहीं असें पाहून अण्णासाहेब त्यास अत्यंत कळकळीनें म्हणाले—' माझ्या मनांतून तुमचें काम करावयाचें नाहीं, म्हणून मी काहीं तरी टाळाटाळी करतों, असें समजूं नका. तुमच्या कल्याणाची गोष्ट सांगतों, श्रीगुरुचरित्राचीं पारायणें प्रथम करा, त्यांत तुमचें हित आहे. ' योग असो अथवा कोणचाही मार्ग असो, जरीं एवढा तेवढा चटका कित्येक कारणामुळें, कोणास लागतो, अथवा कांहीं अनुभव येऊन जातात, तरी कोणच्याही मार्गानें खरोखर पुढें पाऊल पडण्यास, आणि त्या मार्गाचा कांहीं फायदा अढळ स्थितीनें मिळण्यास चित्तशुद्धिच आड येते, असा आजपर्यंतचा सर्व प्राप्त पुरुषांचा आणि शास्त्राचा अनुभव आहे. आणि कोणचाही अभ्यास करीत असतां त्याच्या जोडीस अथवा केव्हां तरी एकदां चित्तशुद्धीचा स्वतंत्र प्रयत्न करावाच लागतो, असें दिसून येतें. मग तो प्रयत्न जाणून बुजून केलेला असो, अथवा परिस्थितीची कानस लागल्यामुळें नकळत घडलेला असो. अशा स्थितींत गायत्री वगैरेच्या मार्गांत तर त्याची अत्यंतच आवश्यकता आहे, आणि ही गोष्ट लक्षांत न घेतां नामस्मरणानें आणि गायत्रीनें अथवा श्री गुरुचरित्रानें कांहीं होत नाहीं म्हणून त्यांच्यावर तोंडसुख घेणारा मनुष्य म्हणजे पूर्वांगाच्या तयारीशिवाय, योगाच्या उत्तरांगाची सिद्धि मिळविण्याचा वृथा हट्ट करणारा दुरभिमानी होय. श्रीगुरुचरित्रादिक ग्रंथांत ' भाविकांस प्राप्ती होईल ' म्हणून सर्वत्र लिहिलेलें आढळतें, आणि त्यावरून अशी शंका येते कीं भाविकपणा असल्यावर तर वाटेल तसें काम होईल भाविकपणा

---

* हे गृहस्थ म्हणजे मननामोदकार रा. माधव गोविंद भिडे हे होत.

आणावयाचा कोठून ? परंतु ही शंका व्यर्थ आहे. भाविकपणा म्हणजे या ग्रंथानें काम खास होईल अथवा त्या ग्रंथांतील विशिष्ट देवतेचें माहात्म्य असा जर अर्थ घेतला तर कांहींच होणार नाहीं. कारण अनुभवाशिवाय तसा भाविकपणा येणार नाहीं, आणि अनुभव हें तर साध्य आहे. तेव्हां हें कसें जुळणा ? त्याचा अर्थ असा आहे कीं भाविक मनुष्याची ज्या तऱ्हेची चित्ताची धारणा असते, त्या तऱ्हेची धारणा तें कर्म करतांना तरी अखंड ठेवली पाहिजे. परंतु चित्तशुद्धीची गोष्ट काढली कीं, या मोठ्या लोकांच्या कपाळास तिडीक उठते. कारण एक तर यांचीं चित्तें नेहमीं शुद्धच असतात ! आणि दुसरें, तिच्या प्रयत्नाकरितां रात्रंदिवस वाटेल तसे क्लेश आणि झीज सोसून संग्राम करावा लागतो. त्यापेक्षां योगाभ्यासाचा सर्वच गूढ प्रकार बरा ! आतां यावर असेंही वाटण्याचा संभव आहे कीं, नामस्मरण अथवा योगादिअभ्यास यांनींच चित्तशुद्धि कां होऊं नये ! तर कदाचित् त्यांनींही होणें शक्य आहे, परंतु 'पुष्कळच काळ सतत नांव घ्यावें, तेव्हां कुठें कांहीं होतें,' असें अण्णासाहेब सांगत असत. 'छंद या नामाचा' घेणारे श्रीतुकाराम महाराजच त्या बरोबरच 'काय करूं मन अनावर' अशा तळमळीनें प्रत्यक्ष कांद्याची माळ गळ्यांत घालून शामकर्णावरून मिरवून घेण्यापर्यंत कृति चित्तशुद्धीकरितां करित होते. अनेक प्रकारच्या योगयुक्त्या सांगितल्यावरही श्रीमहाराजांनीं शेवटीं 'सत्य, क्षमा, दया, शांति' हींच 'योगयुक्ति' आहे, 'परिसावी' म्हणून सांगितलें आहे.

सारांश काय, कित्येक लोक योगाभ्यासाच्या गोड आणि विचित्र कल्पनांमुळें आणि कित्येक अशा कांहीं शाळेंत स्वतःस न घालून घेतां, नुसत्या नामाचा अथवा ग्रंथाचा थोडे दिवस अट्टाहास करून, 'यांत काय आहे ? दगडाचें पेंव,' असें म्हणून त्याची निंदा करण्यास प्रवृत्त होतात. परंतु जर या साधनांच्या योगानें अध्यात्मिक अवस्था मिळविणें असेल, तर त्यांना सातत्य आणि चित्तशुद्धि यांची जोड असलीच पाहिजे. असें असलें तर जें कांहीं दुसऱ्या कोणच्याही अभ्यासानें होतें, तें सर्व यानें होतें, असें ते ठांसून सांगत असत आणि अनुभवाशिवाय कोणचीही गोष्ट कोणास करावयास सांगावयाची नाहीं, असा त्यांचा धारा होता. यावरून काय अनुमान निघतें, तें ज्याचें त्यानें काढावें. असल्या कांहीं समजुतीमुळें त्यांनीं कोणास कांहीं करावयास सांगितलेलें, अथवा

इतरही या मार्गांतले लोक आळसून गेलेले दिसतात, त्यांना यावरून पुष्कळ शिकतां येईल.

स्वतः अण्णासाहेब यांच्याकडे पाहिलें तर अभय, सत्वसंशुद्धि दान, वगैरे दैवी गुणसंपत्ति तेथें ओतप्रोत होती, आणि बाहेरील आयुष्य परोपकार, वैद्यकी, सार्वजनिक कामें, पोटाचा उद्योग, व स्नानसंध्या, देवदर्शन, प्रदक्षिणा घालणें, पोथी वाचणें वगैरे क्रियाकरण्यांत जात असे. उत्तर आयुष्यांत प्रापंचिक अडचणी त्यांच्यावर पुष्कळच आल्या, आणि मृत्युसारखे घालेही बरेच पडले. परंतु त्यासर्वांना न जुमानण्याइतकी निःसंगता त्यांचेजवळ उपजतच होती. आणि हैद्राबाद वगैरे प्रकरणांतील फसगतीमुळेंही आपण डगमगलों नाहीं, असें त्यांनींच स्पष्ट सांगितलें होतें. तेव्हां 'अंगाची सालटीं निघाली' या शब्दांचा अर्थ काय असावा, हें लक्षांत येत नाहीं. महाराज हा शब्द त्यांच्या भाषेंत 'दयाज्ञानगुणसागर' सर्वकर्ता, सर्वव्यापी, आणि सर्वज्ञ अशा परमात्म्याचा वाचकच होऊन बसला होता, व श्रीनृसिंहसरस्वती महाराज आणि तो परमात्मा एकच, अशी त्यांच्या मनाची स्थिति होती. 'अशी खात्री तुमची कशी झाली?' असा प्रश्न केल्यावरून त्यांनीं सांगितलें कीं,–' ती हळू हळू झाली, आणि तो परमात्मा सर्व कांहीं करतो, आणि तो दयाळू आहे, असें समजलें.' 'वासनेचा उत्पादक तोच आहे. आपण त्याची निरिच्छपणें सेवा करावी, आपल्या वासना सुवासना करून त्या सिद्धीस नेणें, त्याचेकडेच आहे' अशा प्रकारच्या भावावर ते आले; आणि असें होतांना त्यांस कांहीं कमी क्लेश पडले असतील असें नाहीं. मुरल्यावर लीनतेचा इतका मधुर रस आंत असलेल्या या अमृतफलांत, प्रथमतः कर्तृत्वाची ऊर्मी अतीशयच टणक असली पाहिजे. ही ऊर्मी जिरवावयासच त्यांना सर्वांमध्यें अधिक क्लेश पडले असतील. या अहंकृतीची जाणीव देखील, आणि तीहि पुन्हा, सामान्य माणसाप्रमाणें सर्वक्रिया अतीशय अभिनिवेशानें करीत असतां पुसून टाकण्याच्या या खटाटोपासच 'सालटी' असें नांव दिलें असावें असें वाटतें. साधारणतः दुसरें प्रयत्न करीत असतां, त्यांत जी गोडी उत्पन्न होते तिच्याच जोरावर उत्पन्न झालेल्या समाधान वृत्तीमुळें, हळू हळू 'सर्व देव करतो' असें वाटणें, हें साहजिक आहे; आणि अभ्यासकाळीं तरीं असें व्हावयास देवाच्या कर्तृत्वाचे गोडच अनुभव येतात, म्हणजे त्याची आपल्यावर कृपा आहे, आणि सर्व भार

त्यानें घेतला आहे, असेंच अनुभव येऊन मनुष्याची शरणागति घडते. ही सर्वसाधारण रीत दिसते. परंतु जेथें अत्युच्च प्रकारचें कर्तृत्व रोमरोमांतून उसळत असतां, आणि ज्यांत स्वार्थाचा लेश नाही अशा अत्युदात्त ध्येयानें अंतःकरण सारखें तळमळत असतां, आपलें सर्वस्व ईश्वरास वाहून आपण केवळ यंत्र बनून रहावयाचें, याच भावनेनें मार्ग चालण्यास सुरुवात होते, तेथें तें किती तापदायक होत असेल याचा अल्पस्वल्प तरी अनुभव असल्या-खेरीज त्याची कल्पनाही येणें शक्य नाहीं. योगाच्या उन्नत स्थितीमध्यें जस-जसा मनुष्य जास्त जाईल, तसतशी त्याचीं इंद्रियें अतिशय सूक्ष्म आणि तिखट होत जातात, आणि मनोवृत्ती व संस्कारही असेच सूक्ष्मतर, परंतु कल्पनातीत प्रबळ होतात. सुखाची संवेदना जितकी तीव्र तितकीच दुःखाची संवेदनाही जबर; आणि अंतःशुद्धी वगैरे गोष्टींची व्याख्याही कडक असते. तुकाराममहाराज घ्या, किंवा कोणी त्या कोटीचे दुसरें घ्या, यांचीं अंतःकरणें मानवी शास्त्रापुरतीं पाहिलीं तर अतिशय शुद्धच होतीं, आणि निग्रह-शक्ति दांडगी असल्यामुळें आपल्या ध्येयास विरुद्ध असलेल्या मनःप्रवृत्ति त्यांस दाबून टाकणेंहि कठीण नव्हतें. परंतु या दाबून टाक-ण्यानेंही त्यांचें काम भागत नाहीं. नुसत्या दाबण्यानें त्यांचें संस्कार कांहीं जात नाहींत, ते तसेच असतात, आणि त्यांना तर त्या संस्कारांचें नुसतें अस्तित्वही दुःसह होतें; आणि तेवढेंदेखील नाहींसें करण्याकरितां जी त्यांची तडफड होते, तिलाच आपण त्यांचे चित्तशुद्धीचे प्रयत्न म्हणून म्हणतो. कीर्ति अथवा लोकेषणा यांचा पगडा श्री तुकाराम महाराज यांच्या चित्तावर केव्हांही नसेल, परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान होत नव्हतें. त्यांना ‘ मान दंभ चेष्टा । हे तो सूकराची विष्ठा ॥ ’ असें व्हावयास पाहिजे होतें. अण्णासाहेब यांसदेखील पार्थिव वैभवाची किंमत केव्हांही वाटली नाहीं. “ इंद्राचें जरी वैभव कोणी देऊं म्हणेल, तर मी त्यास सांगेन कीं, ‘ बाबारे, तुझें काय काम असेल तें मी करतों, तें वैभव मात्र मला नको, तें तूंच उपभोग ’ असें सांगेन, ” असें ते म्हणत. एकदां म्युनिसिपालिटींत काम करीत असतां एका गृहस्थाच्या कामासंबंधानें मत द्यावयाचें होतें. त्या गृहस्थास यांनीं मत देण्याचें कबूल केलें होतें आणि त्याचा प्रतिपक्ष अन्यायी आहे अशी यांची खात्री होती. परंतु म्युनिसिपालिटी कडून त्या प्रतिपक्षाच्या लोकांना तें काम गफलतीनें करून घ्यावयाचें होतें.

त्यामुळें सभेंत कांहीं विषयावर हे दुसऱ्याची समजूत घालीत असतां गडबडीनें तें प्रकरण काढून ' सर्वांची अनुमति आहे ना ? ' असें त्या पक्षाच्या एका गृहस्थानें विचारलें. अत्यंत सावधानता असलेल्या अण्णासाहेबांनींही बोलण्याच्या गडबडींत कांहीं तरी गैरसमज होऊन ' हो ' म्हणून मान डोलविली, आणि बाकीच्यांच्या अनुमोदनानें त्याचा निकालही लागला. अण्णासाहेब आपलें काम करणार म्हणून तो गृहस्थही हजर नव्हता. अण्णासाहेब यांच्याही ती गोष्ट लक्षांत न येतांना ते तसेच घरीं आले. पुढें जेव्हां तो गृहस्थ येऊन त्यानें आठवण दिली, तेव्हां सर्व प्रकार लक्षांत येऊन या कामांत जितकें सावध राहावयास पाहिजे होतें, तितकें न राहिल्यामुळें आपल्या हातून दोष घडला खरा, असें वाटून त्यांच्या मनास दुःख झालें. आपल्याकडून आपण दोष करूं नये, मग दुसऱ्यास त्याचें कांहींही वाटो, असें त्यांचें वागणें असे. येथें आपल्याकडूनच दोष घडला, असें वाटून त्यांस खेद होऊं लागला. रात्रीं श्रीगजाननाचे दर्शनास जात असतां पायाखालची वाट असतांही, रस्त्यावरील खडीस अडखळून ते पडले, आणि गुडघ्यास वगैरेही लागलें. रस्त्यावरील एका माणसानें—' कोण अण्णासाहेब कां ? ' असें म्हणून त्यांना उठविलें, आणि पागोटें वगैरे आणून झटकून दिलें, व लागल्याबद्दल खेद प्रदर्शित केला. परंतु अण्णासाहेब सांगत ' माझ्या मात्र अंतःकरणांतील सारा खेद नाहींसा होऊन उलट मोठा आनंद झाला. ' आपल्या हलगर्जीपणाचें प्रायश्चित्त लागच्या लगेच महाराजांनीं दिलें, ही त्यांची केवढी कृपा ! ' असें मनांत येऊन त्यांना मोठा आनंद झाला. तसेंच एकदां कोठलेंसें कवठ पडलेलें मालकास न विचारतां उचलून आणून त्यांच्या बरोबरील मुलांनीं ओंकारेश्वरावर खाण्याचा विचार केला. ' कसली गडबड आहे रे ? ' म्हणून रस्त्यांत त्यांनीं विचारलेंही, परंतु कवठाची हकीगत कळल्यावर त्यांचें तिकडे विशेष लक्ष गेलें नाहीं. ओंकारेश्वरावर आल्यावर त्यांना असें वाटलें कीं पाठीस कांहीं तरी बोंचतें आहे. म्हणून त्यांनीं पहावयास सांगितलें. पहातात तों एक गांधिलमाशी तेथें बसून दंश करीत आहे ! त्या वेळीं रात्रीचे दोन वाजले होते. अशा वेळीं अंगरखा आणि सद्रा यांच्या आंत माशी गेली तरी कशी ? याचेंच सर्वांस नवल वाटलें.

अण्णासाहेब यांनीं मात्र *भानूस हांक मारून तें कवठ 'आत्तांच्या आत्तां परत नेऊन टाक ' म्हणून सांगितलें; आणि जेव्हां त्यानें तसें केलें, तेव्हांच अण्णासाहेब यांस बरें वाटलें. 'आपण तुमच्याबरोबर असून दुसऱ्याची वस्तु विचारल्याशिवाय घेऊं देत होतों, म्हणजे तुमच्या चोरीस अनुमोदन देत होतों, म्हणून महाराजांनीं मला सावध केलें ' असें त्यांनीं सांगितलें! यावरून अशा लोकांच्या अंतःकरणाच्या नाजुकपणाची कांहीं कल्पना येईल. विवेकानंद यांच्याविषयीं त्यांच्या प्रिय शिष्यिणीनें असें लिहिलें आहे कीं, 'देशहिताची उकळी, आणि आत्यंतिक आत्मनिवेदनाची लहर यांच्या झगड्यांत सांपडून त्यांचें अखेरपर्यंत मोठे हाल झाले.' अशाच तऱ्हेचा परंतु याहीपेक्षां अतीशय तीव्र असा ताप अण्णासाहेबास झाला असावा. अनेक साधनांच्या नंतर गोडीगोडीनें ज्या स्थितीस प्रारंभ व्हावयाचा, त्या स्थितीस आत्मनिवेदनानेंच अण्णासाहेबांनीं प्रारंभ केला. मांडणी दिसून म्हणा अगर इतर कांहीं रीतीनें म्हणा, देशाच्या भवितव्यतेविषयीं आणि मार्गाविषयीं जें त्यांना समजलें, त्याच ज्ञानामिळतां त्यांस एकप्रकारचें विशेष ज्ञानही झालें. भगवंताच्या लोकक्षयकृत् कराल दंष्ट्रांत अठरा अक्षौहिणी गडप होऊन जाणार, हें ज्ञान देणारें विश्वरूप पाहण्याबरोबरच अर्जुनास एक विशेष ज्ञानही झालें, आणि त्यानेंच खरोखर तो युद्धास प्रवृत्त झाला. एरवीं नुसत्या श्रीकृष्णाच्या कुशल पांडित्यानेंहीं त्याचें मन वळलें नाहीं. तें जें विशेष ज्ञान त्याला झालें, तेंच 'ईश्वरः सर्व भूतानां ' आणि 'मामेक शरणं व्रज ' वगैरे उपदेशरूपानें भगवान् वेदव्यासांनीं मांडून ठेवलें. म्हणजे त्यांच्या लक्षांत असें आलें कीं, 'म्हणोनी ईश्वरू गोसावी। तेणें प्रकृती हीं नेमावी।' असें आहे. असे विशेष ज्ञान होऊन त्याच्या कर्तृत्वभावनेची कंबर मोडली गेली आणि त्याचबरोबर 'मनबुद्धीवाचा अंग। देऊनिया शरण रीघ।' अशी शरणागति सुरू झाली. असाच प्रकार श्रीअण्णासाहेब यांचा कांहीं झाला असावा; आणि याच निश्चयानें बुद्धीस आकळून ते आपल्या मार्गास लागले, व हळूं हळूं या निश्चयाची भावना सर्व शरीरास बसून त्यांचें शरीर म्हणजे 'मनबुद्धी वाचा अंग ' हें महाराजरूप झालें. याच्या जोडीस गायत्री, महाराजांचें नांव, आणि उपासनामंत्र, यांची त्यांनीं जोड दिली. इतर

---

*हाही एक अण्णासाहेबाबरोबर देवदर्शनास जाणारा मुलगा होता.

अभ्यासांतली गोडपणाची जोड प्रथमतः यांत मुळींच नसल्यामुळें, आणि कृपा आणि अवकृपा या दोन्हींही सारख्याच मानणें भाग असल्यामुळें, त्याचप्रमाणें या शरणागतीस विरुद्ध असलेल्या कर्तृत्वादिक भावना आणि त्यांचें संस्कार घालविण्याची एका बाजूनें अतीशय तीव्र इच्छा, आणि दुसऱ्या बाजूनें हा सारा महाराजांचाच खेळ आहे, म्हणून त्यांचा आदर करण्याची आवश्यकता, आणि ज्या कर्मांत कर्तव्याच्या जाणीवे पलीकडे प्रथमतः कोणतीही रसोत्पत्ति नाहीं आणि रसोत्पत्तीस जिरवूनच टाकावयाचें आहे, असल्या तऱ्हेची कर्मनिरतता वगैरे भयंकर युद्ध रात्रंदिवस चालल्यावर, त्या रणभूमीची ' सालटीं निघतील' नाहीं तर काय होईल ? इतर प्रयत्नांनीं ज्या स्थितीवर दुसरे येतात, तीच स्थिति अभ्यासण्यापासूनच आणि हळूं हळूं त्यामुळेंच सर्व तऱ्हेचें अनुभव येऊन यांचें मार्गक्रमण झालें असल्यामुळें, ' जसें कोणास पटलें नाहीं तसें मला पटलें, ' हें त्यांचें म्हणणेंही सरळच होतें. अशा रीतीनें ' मनबुद्धीवाचा अंग ' हें महाराजांचें आहे. असें धरून त्यांनीं प्रारंभ केला, आणि ' देवता घटित जीव व त्याचें शरीर महाराज रूपच झालें ' अशी प्रत्यक्ष प्रतीति येण्यांत त्याचें पर्यवसान झालें. हें होत असतां 'परमेश्वरच वस्तुतः मनुष्याकडून साऱ्या क्रिया करवितो, परंतु तें त्यास कळत नाहीं, ' वगैरे अनुभव, ' इतरांच्या देहाप्रमाणेंच स्वतःचा देह सदैव भिन्नपणानें पाहण्याची साक्षित्वरूप ज्ञानदशा, आणि ' मनबुद्धी वाचा अंग ' यांचें कणशः साक्षित्व, आणि शेवटीं स्वतःचेच तर काय, परंतु इतरांचेही ' मनबुद्धीवाचा अंग, ' महाराजरूपच आहेत, अशी ' कणशः ' प्रतीति वगैरे अनुभव त्यांस सहजच आले, असें त्यांच्या कित्येक उल्लेखावरून स्पष्ट दिसतें. आणि म्हणूनच ते इतरांसही उधारीचा मार्ग न सांगतां, अथवा ' गोडवी ' ' गोडवी ' कामें न सांगतां, गायत्री, महाराजांचें नांव श्रीगुरुचरित्र आणि याच्या जोडीस शरणागति असाच मार्ग सांगत असत. श्रीनृसिंहसरस्वती म्हणजेच परमात्मा असेंच धरून चाललें पाहिजे, असाही त्यांचा आग्रह नव्हता. ' आम्हीं महाराजांच्या पासून प्रारंभ केला, वाटेल तर तुम्ही दुसऱ्या कोठून करा, पण कोणीकडून तरी एतद्गुण विशिष्ट देव आहे, अशी भावना जागृत करून असें कर्म करा, ' एवढेंच त्यांचें कळकळीनें सांगणें असे. या सर्व गोष्टी लक्षांत ठेवून त्यांच्या पुढील आयुष्याकडे पाहिलें पाहिजे.

# श्रीमहाराजांचें निर्याण.

कृत्वा मानुषविग्रहं द्विजकुले लीलांश्चकाराद्भुताः
स्थित्वा गाणगमंडले पुनरगात् श्रीपर्वतस्याटवीम् ।
त्रातुं स्वीय जनान् अनेकतनुधृक् योऽभूत् क्षितौ पर्यटन्
सोऽयं श्रीनरसिंव्हसद्गुरुवरो नित्योस्त्यलंकापुरे ॥

मद्रासहून आल्यावर यांच्या आयुष्यांतील मोठी गोष्ट म्हटली म्हणजे श्रीनृसिंहसरस्वती यांचें निर्याण ( शके १८०७ पौष शु॥ पौर्णिमा ) ही होय. बारा वर्षांपूर्वी महाराजांचा व यांचा संबंध जडल्यापासून त्यांच्यावरील यांची भक्ति वाढतच गेली, आणि त्यांचेंही अण्णासाहेब यांजवर विलक्षण प्रेम होतें. महाराज हे कोण कोठील, वगैरे संबंधीं प्रत्यक्ष माहिती अशी कोणासच नाहीं. यांचा मूळबांधा मजबूत, धिप्पाड, आणि उंचा पुरा असून, हे आजानुबाहू होते. यांचे लांब हात आणि चेहेऱ्याची ठेवण, व विशेषतः कान, यांवरून पुष्कळ लोक असा वाद घालतात कीं, हे मूळ महाराष्ट्रीय ब्राह्मण नसून द्राविडी ब्राह्मण असावेत. स्वतः महाराजांच्याविषयीं असली माहिती देणारा कोणीही केव्हांच पुढें आला नाहीं. सबंध हिंदुस्थानभर त्यांनीं निरनिराळ्या वेषानें प्रवास केला असल्यामुळें फक्त अमुक ठिकाणीं हे होते, आणि अमुक ठिकाणीं यांनीं असें केलें, एवढींच सांगणारीं माणसें मात्र वाटेल तितकीं आढळतात. विद्वत्ता, योगसामर्थ्य, भजनप्रेम, इत्यादि सर्व प्रकारांनीं जसा प्रसंग पडेल तसें लोकांपुढें यावयाचें, परंतु आपण त्यांचें काम केलें असें मात्र कळूं द्यावयाचें नाहीं, या बाबतींत या गुरुशिष्यांचा सारखाच हातखंडा होता. यांची वृत्ति पराकाष्ठेची लीन, आणि स्वभाव विनोदी परंतु, पराकाष्ठेचा गंभीर असल्यामुळें, एकाद्याचें काम करावयाचें, अथवा त्यावर कृपा करावयाची, म्हणजे गुरु, गुरुबंधु, अथवा काम पडल्यास शिष्यत्वाचे देखील नात्यानें त्याच्याशीं वागून यांनीं त्यास शिकवावें. अशा यांच्या वागणुकीमुळें, हे आपल्याच संप्रदायांतले आहेत असें समजणारे, आणि आपणच त्यांच्यावर

कृपा केली, येथपर्यंत त्यांच्याविषयी भिन्न भिन्न माहिती सांगणारे लोक सर्वत्र आढळतात.

स्वतः अण्णासाहेब यांची श्रद्धा अशी होती कीं, श्रीगुरुचरित्रांत परमेश्वराचा नरसिंहसरस्वती म्हणून जो पूर्णावतार झाला, तो अवतार श्रीदत्तात्रेयांनीं त्या वेळीं समाप्त केला नाहीं; श्रीशैल्यपर्वतावर गुप्त होऊन महाराज तेथून हिमालयांत प्रगट झाले, आणि तेथें कांहीं वर्षे राहून यदृच्छेनें स्वैरसंचार करीत, नानासोंगांनीं आणि नाना रूपांनीं जगदुद्धार करीत, कोठें अल्पकाळ तर कोठें बहुत वेळ असें वास्तव्य करून वऱ्हाड, खानदेश, मालेगांव, पिंपळगांव वगैरे ठिकाणांहून पुण्यास आले. या सर्व कालांत कधीं जटामंडित, तर कधीं शुद्ध मुंडीदंडी वेशानें, आणि केव्हां केव्हां तर फकिरी बाण्यानें हिंडत असल्यामुळें, त्या सर्व माहितीवरून यांचा पूर्व इतिहास कळणें शक्य नाहीं. परंतु तेच हे प्रत्यक्ष होत, अवतार नव्हेत, अशी त्यांची श्रद्धा होती, आणि यांस कोणी नरसिंहसरस्वतीचे अवतार म्हटलेलेंही त्यांस रुचत नसे. मात्र इतकेंच कीं याविषयीं त्यांनीं कधींही कोणाशीं वाद घातला नाहीं. क्वचित एखादे वेळीं थोडेसें उघड बोलत.

महाराज हे अक्कलकोट येथील स्वामींचे शिष्य असून महाराजांच्या योगाची पूर्तता अक्कलकोटच्या स्वामींनीं केली, असें त्या स्वामींवर भक्ति असणाऱ्या लोकांच्या नेहमीं सांगण्यांत येतें; आणि 'रंडी छोड देव,' असें म्हणून सिद्धांच्या तडाक्यांतून महाराजांना स्वामींनीं वाचविल्याचें त्यांच्या चरित्रांत आहे. 'हें खरें आहे काय?' म्हणून एकदां अण्णासाहेबांस प्रश्न केला असतां, त्यांनीं 'महाराज अक्कलकोटास राहिले होते, आणि तेथें असतां दोन्हींही स्वामी एकमेकांशीं मोठ्या सलोख्यानें वागत असत, आणि एकमेकाविषयीं अत्यंत आदर प्रदर्शित करीत असत; त्याच प्रमाणें इतर लोकांचा संपर्क टाळावा म्हणून निवडुंगाच्या फडांवरून उडी मारून निघून जात, आणि तासचे तास परत येत नसत,' वगैरे गोष्टी खऱ्या असल्याचें सांगितलें. त्यावर "'रंडी छोड देव,' हें काय आहे?" म्हणून विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, 'तो लोकांनीं बसविलेला वेडगळ तर्क आहे. महाराज हे त्यापूर्वी कित्येक वर्षे फक्त संस्कृतच बोलत असत; संस्कृताशिवाय शब्दही न काढण्याच्या या लहरीमुळें लोकांचा फार तोटा होतो, तेव्हां 'संस्कृत भाषा

सोडून द्या, ' म्हणून अक्कलकोटच्या स्वामींनीं महाराजांना विनंति केली, आणि तेव्हांपासून महाराज ही मराठी भाषा बोलूं लागले. अक्कलकोटाहून पंढरपुरास जाऊन, तेथें ते एक वर्षभर राहिले होते. त्या ठिकाणीं आणि पुढें आळंदीस आल्यावरही, वारकरी म्हणूनच ते राहत असत; आणि श्रीज्ञानेश्वरी, नाथभागवत, वगैरे प्राकृत ग्रंथांचेंच विवरण करीत. केवळ मौज करण्यापलीकडे संस्कृतचा उपयोग पुढें त्यांनीं केंव्हांही केला नाही.

अशी एक गोष्ट ऐकिवांत आहे कीं, पंढरपुराहून पुनर्विवाहाच्या वादाकरितां महाराज पुण्यास आले, परंतु ते येऊन पोहोंचण्यापूर्वीच वाद होऊन गेला होता म्हणून ते आळंदीस गेले, आणि तेथेंच राहिले. या गोष्टींत तथ्य काय असेल, तें सांगतां येत नाहीं; परंतु कांहीं गोष्टींवरून हा कांहींतरी समज असावा असें वाटतें. महाराज आळंदीस आले, त्यावेळीं ते जटामंडित असून, आळंदीस वास्तव्य केल्यावर, पुन्हा त्यांनीं जटा काढविल्या, असें अण्णासाहिब यांच्या सांगण्यांत आलें. पंढरपुरास असनांना ते यतिवेषानें होते, हें उघड आहे. कारण पंढरपुरास त्यांनीं एक लक्ष भोजन घातलें होतें, व त्या सपाट्यांत त्यांच्या सांगण्यावरून सहस्रभोजन घातलेले लोक परवांपर्यंत प्रत्यक्ष होते. त्यांच्या सांगण्यांत महाराजांचा यतिवेश असल्याचेंच येत होते. त्यावरून पंढरपुराहून ते कोठें तरी हिंडत हिंडत आळंदीस आले, हेंच बरोबर दिसतें.

महाराजांच्याविषयीं इतक्या गोष्टी त्यांच्या सांगण्यांत येत, कीं तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं, बारावर्षांतील निकट संबंधामुळें महाराज हेंच काय तें जिव्हाळ्याचें स्थान अण्णासाहेबांस झालें होतें. अशा स्थितींत त्यांच्या प्रयाणानें अण्णासाहेबयांस अर्थातच फार दुःख झालें असेल. यांच्या प्रयाणाची हकीगत अशी आहे:—इंद्रायणीचें तीरीं श्रीविठ्ठलमंदिर बांधावयास महाराजांनीं सुरुवात केली होती. त्याच्या कामाकरितां म्हणून दत्तोपंत आठवले बाहेर गेले होते. महाराजांच्या मनांतून काय असेल तें कोणी सांगावें ? परंतु माडीवरील खोलींत स्वतःस कोंडवून घेऊन, खोलीचें कुलूप कितीही दिवस झालें तरी, आंतून हांक मारल्याखेरीज उघडावयाचें नाहीं, असें त्यांनीं बाळाबुवा, लक्ष्मणबुवा वगैरेंना कडकपणानें बजावून ठेवलें

होतें. अशा स्थितींत आठ दहा दिवस गेल्यावर दत्तोबुवा परत येऊन पहातात तों महाराजांनीं स्वतःस कोंडून घेतलें असून, अन्नपानादि सर्व व्यवहार आठ दहा दिवस अगदीं बंद आहेत. तेव्हां 'तुम्हीं असें कसें केलें ? महाराजांनीं म्हटलें म्हणून काय झालें ?' अशा प्रकारचा मंडळीस ठपका देऊन, सर्वजण 'नको' 'नको,' म्हणत असतां त्यांनीं हट्टानें खोलीचें कुलूप काढलें. आंत महाराज आसनस्थ होऊन कांहीं क्रिया करीत होते; आणि त्यांनीं आंतडीं वगैरे बाहेर काढलीं होतीं, असें म्हणतात. असें सांगतात कीं, एक महिना अशा रीतीनें राहून, साप कात टाकून देतो त्याप्रमाणें शरीराचें वार्धक्य काढून टाकण्याचा त्यांचा हेतु होता. तें काय असेल तें कोणी सांगावें ? परंतु दत्तोबुवांनीं दार उघडताच महाराजांनीं डोळे लाल केले, आणि 'तुला हा कारभार कोणी सांगितला ? असो, झालें तें झालें, आतां आम्हांस रहावयाचें नाहीं, विठ्ठल मंदिरांत नेऊन खालीं ठेवून द्या,' म्हणून सांगितलें; आणि शरीर पूर्ववत् करून तसेच आसनस्थ मौनवृत्तीनें टकमक पहात बसले. या वेळीं श्वासदेखील बंद होता. त्यामुळें मंडळीस वाईटही वाटलें, आणि काय समजावें तेंही कळेना; म्हणजे आहेत कीं देहावसान झालें, हेंच ठरविण्याची पंचाइत पडली. तेव्हां त्यांच्या म्हणण्याप्रमाणें पालखींत बसवून त्यांना विठ्ठल मंदिराच्या म्हणजे हल्लींच्या संस्थानाच्या सोप्यांत ठेवलें, आणि अण्णासाहेब यांस निरोप धाडला. लागवणकर वैद्यांस बरोबर घेऊन अण्णासाहेब आळंदीस गेले त्यांना पाहिल्याबरोबर, हास्यमुद्रा करून कुस्तीच्या आविर्भावानें दंड थोपटून महाराज उगाच राहिले. परंतु त्यास न जुमानतां अण्णासाहेबांनीं जवळ जाऊन पाय धरले, आणि 'हें काय मांडलें आहे ? चला हें सोडून द्या,' असें म्हणून चांदीच्या वाटींत दूध आणलें होतें, तें तोंडास लावून, 'प्यालें पाहिजे,' म्हणून सांगितलें. तेव्हां मुकाट्यानें महाराजांनीं दूध पिऊन टाकलें. श्वास वगैरे पुन्हा पूर्ववत् चालू झाला. कांहीं वेळानें लघ्वीही झाली, परंतु मौन कायमच होतें, आणि अंगास हात लावून पाहतां, ताप आहे, असें दिसलें. त्यानंतर त्यांना तसेंच ठेवलें. दुसऱ्या दिवशीं अण्णासाहेबांच्या मुलीच्या मुलीचें बारसें असल्यामुळें, 'मी जाऊन येतो,' असें सांगून त्या दिवशीं सकाळीं ते परत पुण्यास गेले. त्यानंतर मागें काय प्रकार झाला, हें कांहीं नक्की कळण्यास साधन नाहीं. परंतु ऐकिवांत असें

आहे कीं, महाराजांनीं डोळे लाल करून मोठ्या रागाचा अविर्भाव आणून स्वतःस समाधींत ठेवण्यास सांगितलें, आणि असें न केल्यास आपण सर्वांसच शापून टाकूं, म्हणून धाक घातला. भोंवतालीं असलेली मंडळीही त्याच बेताची असल्यामुळें, त्यांनीं घाबरून जाऊन महाराजांस चटकन् समाधीत ठेवलें, आणि वर दगड बसविला. इकडे बारशाचें जेवण वगैरे आटोपल्यावर अण्णासाहेब हे श्रीगुंडाचे गणपतीचे दर्शनास गेले. तेथें त्यांस असें दिसलें कीं, आळंदीच्या बाजूनें तेजाचा मोठा लोळ येऊन तो श्रीगजाननाचे हृदयांत शिरला! त्याच वेळीं आळंदीस कांहीं तरी घोंटाळा झाला, असें ते समजून चुकले. पुढें आळंदीस आल्यावर सर्व प्रकार त्यांस समजून आला; परंतु पुढें कांहीं न करितां ते शांतपणानें परत आले. ज्याप्रमाणें अण्णासाहेब यांस बोलावूं धाडलें, त्याप्रमाणेंच महाराजांचे सांप्रदायांतील त्या वेळचे अधिकारी सत्पुरुष यशवंतराव महाराज यांस विचारण्याकरितांही बाळाबुवा नाशकास गेले होते. त्यांनीं देखील ‘ सर्व व्यवस्था होऊन गेली, आतां काय त्याचें ? ’ असेंच सांगितलें.

अण्णासाहेब यांच्या चरित्रांतील पुष्कळशा गूढांप्रमाणेंच हेंही आहे. त्यांस स्पष्ट विचारलें होतें कीं, ‘ महाराजांना अशा स्थितींत टाकून केवळ बारशाकरतां म्हणून जाणें, तुमच्या स्वभावास धरून नाहीं. असें असतां तुम्ही कसे गेलांत ? ’ ‘ महाराज त्यांची स्वतःची इच्छा असल्याखेरीज कालवश होणें शक्य नाहीं, अशी तुमची श्रद्धा असतांना, तुह्मीं परत आल्यावर कांहींच कसें केलें नाहींत ?’ असें विचारतां ते म्हणाले ‘ महाराजांस आंत ठेवून मंडळींनीं तोंड देखील बंद करून घेतलें; तेव्हां मग काय करावयाचें ? त्यांच्या इच्छेपुढें कोणाचा हट्ट चालणार ? म्हणून स्वस्थ बसलों. ’ ‘ तुम्हांस दुःख झालें किंवा नाहीं ? ’ ते म्हणाले—‘ छे, त्यांत दुःखाचें काय कारण होतें ? तरीपण भाषण, लठ्ठालठ्ठी, वगैरेची मौज गेली, एवढें खरें. ’ त्यावर मी म्हणालों, ‘ आतां नाहीं कां भाषण ?’ तेव्हां ते म्हणाले—‘ आतांही आहे, पण ती मौज कांहीं वेगळी होती. ’ त्यावर ‘ हें तुमचें सांगणें पटत नाहीं, बारशाचें उगीच निमित्त आहे, त्या दिवशीं महाराजांची व तुमची कांहीं तरी कानगोष्ट होऊन तुम्हास त्यांनीं परत लावलें, आणि बारशाच्या निमित्तानें तुह्मी परतला, हेंच खरें. म्हणूनच त्याचें कांहीं वाटलेंही नाहीं, आणि पुढें कांहीं यत्नही तुह्मीं केला नाहीं, असें-

चना ? ' त्यावर थोडेसें हंसून ते स्तब्ध राहिले. यावरून पुष्कळ कल्पना मनांत येतात, परंतु त्यांचा विस्तार करावयाचें कारण नाहीं. पुढें भक्त मंडळींनीं एकत्र होऊन महाराजांचें संस्थान करण्याचा ठराव केला, आणि बापूसाहेब गाडगीळ, बाबासाहेब सांगलीकर, वगैरे बऱ्या पंचांच्या अनुमतीनें दत्तोपंत आठवले, यांस मागें गादीवर बसवून, हळू हळू मंदिर वगैरे बांधलें गेलें. संस्थानची आजची उत्कृष्ट स्थिति सर्वांस माहीतच आहे.

अण्णासाहेब हेही, अगदीं प्रारंभीं नसलें तरी कांहीं काळानें, त्यांत पंच झाले होते, आणि दत्तोबुवांच्या मागून शंकरबुवांच्या वेळीं तर संस्थानची व्यवस्था सारी त्यांच्याच साह्यानें चालत असे; परंतु स्वतः यांनीं त्या बाबतींत मोठा पुढाकार घेऊन कधीं फार भक्ति दाखविली आहे, असें झालें नाहीं. चार भाविक भक्त जमतात त्यांतीलच एक आपण, त्यांच्याचप्रमाणें दर्शनास येऊन प्रसाद घ्यावा, आणि जावें, असा त्यांचा क्रम होता. स्वतःदेखील त्यांनीं महाराजांच्यापुढें कधीं मोठी रकम ठेविली आहे, असें कधीं झालें नाहीं. काय जें दहा पांच रुपये ठेवावयाचें तेच इतर लोकांप्रमाणें ठेवावयाचें. महाराजांस मोठ्या भक्तीनें पूजा बिजा बांधण्याच्याही खटाटोपांत ते कधीं पडले नाहींत; परंतु प्रतिवर्षी आपल्या उत्पन्नांतून कमींत कमी १०१ रु. या कामाकडे खर्च करण्याचा त्यांचा संकेत असल्याचा स्पष्ट उल्लेख सांपडतो; आणि त्याप्रमाणें ते करीतही. परंतु ते महाराजांकडे देण्याच्या रीती मात्र अशा होत्या कीं, कोणासही अखेरपर्यंत तें उमगून आलें नाहीं. स्वतः ठराविक रक्कम दरसाल ठेवून बाकीचें इतरांच्या हातांनीं, आणि आणखीही कांहीं मार्गांनीं तें खर्चीत. संस्थानसंबंधीं सर्व गोष्टींवर यांचें लक्ष असे, आणि कोणीही यांच्याकडे आला असतां ते त्यास महाराजांचें दर्शन घेऊन येण्यास सांगत.

## श्री. अप्पासाहेब यांचा मृत्यु.

' हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार '।

या नंतरच्या काळांत म्हणण्यासारखी एकादी मोठी गोष्ट ५।७ वर्षांत कांहीं झाली नाहीं. पुण्यांत त्या वेळेला क्रॉफर्ड प्रकरण, संमतिवयाचें बिल वगैरे पुष्कळ भानगडी चालू होत्या, आणि त्यांतील कित्येक सूत्रें यांच्याच सल्ल्यानें चालत असत, ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु पुढें पडून असा भाग यांनीं केव्हांही घेतला नाहीं. मुंबईच्या एकंदर भानगडींत ज्या बड्या बड्या लोकांशीं यांचा ऋणानुबंध जुळून आला, त्यांतच सांगलीच्या हल्लीच्या चीफांचे आजे श्री. बाबासाहेब सांगलीकर आणि वडील अप्पासाहेब यांचा ऋणानुबंध जडला. यांपैकीं अप्पासाहेबांची तर अण्णासाहेब वर अतीशयच भक्ति होती. अप्पासाहेब स्वरूपानें अतीशय सुंदर, आणि शरीरानें बलवान् असें असून त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा विनीत होता. वाटेल तें करून हिंदुस्तानास लागलेलें ग्रहण सोडवावें, अशा इच्छेनें रात्रंदिवस तळमळणाऱ्यांपैकींच हाही थोर पुरुष होता; आणि कदाचित् अप्पासाहेब राहिले असते, तर त्यांना हातीं घेऊन त्यांच्या द्वारें आपल्या पूर्वींच्या खटपटी अण्णासाहेबांनीं पुन्हा सुरू केल्या असत्या, असा तर्क करण्यास जागा आहे. तशा तऱ्हेचे कांहीं प्रयत्नही अप्पासाहेब यांचे सुरू असल्याचा त्यांच्या बोलण्यांत उल्लेख आला होता. या महत्कार्य करण्यास लागणारी पात्रता पुरेपूर अंगीं असलेला, ' मनुष्याणां सहस्रेषु ' असा हा एकच महापुरुष आहे, असें अप्पासाहेबांनीं अण्णासाहेबांस पाहतांच ओळखिलें होतें; आणि म्हणून अतिशय शुद्ध अंतःकरणानें आणि नम्रतेनें त्यांचा अनुचर होऊन राहण्यांत, अप्पासाहेब यांस धन्यता वाटे. अशा स्थितीत अप्पासाहेबांसारख्या सच्छील, कर्तृत्ववान्, श्रीमान् गृहस्थाच्या साह्यानें पुन्हा काय झालें असतें हें कांहींच सांगवत नाहीं. परंतु अण्णासाहेब यांच्या ठराविक दैवयोगाप्रमाणें, येथेंही काळानें हात दाखविला.

अप्पासाहेब हे जितके शूर, तितकेंच अतिशय मानी आणि कोंवळ्या अंतःकरणाचे होते. त्यांचें नांव निघालें कीं, अण्णासाहेब नेहमीं अतिशय प्रेमानें— ' तो एक देवमाणुस होता, ' असें म्हणत असत. काय कारण झालें असेल तें सांगतां येत नाहीं. पण या मानी पुरुषाच्या हृदयास लागून राहणारी अशी कांहीं तरी गोष्ट घडून आली; आणि त्यांच्या अंतःकरणास भयंकर धक्का

बसला. तशाच स्थितींत ते धुळ्यास गेले असतां, श्रीनारायणबुवासाहेब यांनीं निरोप देतांना, 'तुम्ही आळंदी, पुणें अगर धुळें या तीन ठिकाणाशिवाय इतर कुठें कांहीं दिवस राहूं नका,' अशी त्यांस स्पष्ट आज्ञा केली. त्यावरून पुण्यास रहावयाचें ठरवून ते पुण्यास आले. त्यांचें नेहमीचें वास्तव्य बारामतीस असे. पुण्यास राहण्याकरितां अण्णासाहेब यांच्या सल्ल्यानें मळेकरांचा वाडाही त्यांनीं भाड्यानें ठरविला. आतां तेथें रहावयास जावयाचें एवढेंच राहिलें. असें असतां एक दिवस अप्पासाहेब हे अण्णासाहेबाकडे आले आणि उभ्या उभ्या बारामतीस जाऊन येतों म्हणून परवानगी मागूं लागले. त्यांचें कुटुंबही पुण्यासच होतें. हल्लींचे सांगलीचे चीफ हे त्या वेळेस दोन अडीच वर्षांचे असून दुसरें चिरंजीव तर तान्हेच होतें. त्या प्रसंगाचें अण्णासाहेब यांनीं स्वतःच वर्णन एकवेळ केलें:—

"खुर्च्यांच्या खोलींत मी बसलों होतों. अप्पासाहेब येऊन उभ्या उभ्या बारामतीस जाऊन येतों म्हणून म्हणूं लागले. त्यांचा गळा दाटून आला होता आणि डोळे पाण्यानें भरले होते. तें पाहून, 'अप्पासाहेब, तुम्ही या स्थितींत तरी येथून जाऊं नका,' म्हणून मीं त्यांस सांगितलें, आणि त्यांच्या शोकाचेंही कारण विचारलें; परंतु 'उभ्या उभ्या जाऊन माझें खाजगी सामान घेऊन येतों,' असें सांगून ते बारामतीस गेलेच. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं तेथून तार आल्यावरून त्यांच्या कुटुंबास घेऊन मी गेलों. एक मूल माईसाहेबांजवळ होतें, आणि या पिलूस (हल्लींचे चीफ) तर मीच हातांत घेतलें आणि जाऊन पोहोंचलों. पाहतों तों अप्पासाहेब यांस गोळीची भयंकर जखम झाली असून ते माझीच वाट पहात होते. मला पाहिल्यावर ते म्हणाले कीं, 'महाराजांच्या कृपेनें सर्व कांहीं आराम आहे, आणि महाराज दिसतही आहेत. लवकरच मी त्यांचेपाशीं जाऊन पोहोंचेन.' नंतर (बायकोकडे वळून ते म्हणाले) 'आतां माझ्यासमोर येण्याचें कोणासही कारण नाहीं. देवाच्या दयेनें तुम्हांस अन्नवस्त्रास वाण नाहीं; काळजीचें कांहीं कारण नाहीं.' त्यानंतर महाराजांचें नांव घेत त्यांनीं शांतपणानें देह सोडला." अप्पासाहेबांच्या मृत्यूनें, अण्णासाहेबांच्या डोक्यांत पुन्हा कांहीं करून पाहण्याची कधीं मधीं जर उसळी येत असेल तर, तीही येण्याचा संभवच नाहींसा झाला आणि त्यांनीं आपणांस तपश्चर्येच्या मार्गास सर्वस्वीं वाहून घेतलें.



श्री अण्णासाहेब पटवर्धन.

नालोद्यान प्रेस, पुणें.

# पुढील आयुष्य.

परहितकरणाय प्राणविच्छेदसूत्कम्
नतनयननियुक्तं नीलकंठं नमामि ।
जाणोनि पुण्यग्रामीं । महाराष्ट्र पुण्यभूमी ।
ब्राम्हण्य मूर्तिमंत । दावियेलें आचरोनीं ॥

यांच्या उत्तरार्धांतील आयुष्याचे ठोकळ मानानें दोन भाग पडतात. मद्रास-हून परत आल्य नंतर १८९३ पर्यंतचा एक आणि तेथपासून पुढील २४ वर्षांचा एक. पहिल्या भागांत जरी हे क्वचित् कांहीं कामें करीत तरी बहुतेक यांचा काळ मौनास्थितींत व तसल्याच कांहीं उद्योगांत जात असे. पुढील भागांत परेच्छाप्रारब्ध कां होईना बलवत्तर होऊन हळू हळू बाहेरचे व्याप वाढत गेले आणि यांचा बहुतेक सर्व वेळ सार्वजनिक कामें करण्यांत जाऊं लागला. या काळांत पंचहौद प्रकरण, गणपती उत्सव, पुण्याची कॉंग्रेस, प्लेग, जंजिरा व सांगलीं संस्थानांचीं अपिलें, धुळ्याच्या बुवासाहेबांचें निर्याण, राष्ट्रीय चळवळ, वगैरे वगैरे ठळक गोष्टी लिहिण्याजोगत्या आहेत. या दोन कालांच्या संधीस प्रज्ञावर्धनस्तोत्राची चमत्कारिक गोष्ट घडून आली. अण्णासाहेब हे बुधवारांतून जात असतां एक दिवस सहजगत्या एका पुस्तकाचें दुकानीं बसले, व तेथें पुस्तकें चाळीत असतां प्रातःस्मरण हरीपाठ वगैरे असलेलीं लहान लहान पुस्तकें पुण्याचे नारो आप्पाजी गोडबोले अथवा मुंबईचें पाठक, वगैरेनीं छापलीं आहेत. तसलेंच एक पुस्तक जवळ पडलेलें यांनीं सहज उचललें. उघडून पाहतां त्यांत स्कंद पुराणांतील प्रज्ञावर्धन स्तोत्र लिहिलेलें दिसलें. सहजगत्या यांच्या मनांत आलें कीं आपण हें स्तोत्र म्हणत जावें. सहजच गोष्ट घडली पण तिला महत्त्व मात्र मोठें विलक्षण आलें. चार दोन पैशांचें पुस्तक, आणि त्याचीं चारसहा पानें, त्यांत व्यवस्थेशीरपणा तो कितीसा असावयाचा ! साहजी-कच त्यांत कांहीं चुका होत्या. परंतु त्याची यांना कल्पना नव्हती; कारण त्या व्याकरणाच्या चुका नव्हत्या. त्यामुळें डोक्यांत कल्पना न येतां शके १८१३ फाल्गुन वद्य ५ मी या दिवसापासून तें म्हणावें, असें त्यांनीं ठरविलें.

त्या दिवशीं मंगळवार असून फा० व० प्रतिपदा होती. त्यानंतर ती गोष्ट तितकीच राहिली.

फा० व० ५ शनवार यादिवशीं दुपारीं अण्णासाहेब यांनीं सहज दाराबाहेर डोकावलें, तों त्यांस त्यांचें गुरुबंधु माधवराव दांडेकर ऊर्फ दादा दांडेकर, हे नुकत्याच आलेल्या मुंबईच्या गाडीनें येतांना दिसले. औपचारिक गोष्टी झाल्या वर ' कोणीकडे आलांत ? ' म्हणून त्यांनीं दादांना विचारलें. तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं, " एकदोन दिवसांपूर्वी, आपण दाभोळ येथें वे० शा० सं० केशव भटजी केळकर यांचें येथें निजलों असतांना आपणांस कोणीतरी जागें करीत आहे असें वाटलें. परंतु जागें होऊन पाहतों तों कोणी दिसलें नाहीं. महाराज जागें करीत आहेत असेंच वाटलें, परंतु प्रत्यक्ष दिसलें नाहींत. मात्र त्यांचे शब्द अतिशय स्पष्टपणें ऐकूं आले. दिसत कोणीच नव्हतें, परंतु महाराजांची वाणी होती यांत तिळमात्र शंका नव्हती." महाराजांनीं त्यांस ' ऊठ, मी सांगतों हें लिहून घे, आणि पुण्यास जाऊन शनवारीं दादाला ( आण्णासाहेबांना ) दे, ' म्हणून सांगितलें. विचारास विशेषशी फुरसतच नसल्यामुळें व महाराजांचें शब्द बिनतक्रार पाळावयाची संवय असल्यामुळें मिणमिण जळणाऱ्या दिव्याच्या उजेडांत शिसपेन्सलीनें दादांनीं लिहून घेतलें. त्यांस लिहिणें वाचणें बेताचेंच असल्यामुळें काय लिहून घेतलें वगैरेही समजलें नाहीं. दुसरें दिवशीं केशवभट केळकर यांच्या भावाकडून त्याची प्रत करवून पुण्यास जाण्याच्या विचारास दादा लागले परंतु जावें कसें याची मोठीच पंचाईत पडली. कारण श्रीमहाराजांनीं त्यांच्यावर प्रसन्न होऊन स्वतःच त्यांचे हातांत नारळाची आई दिलेली होती. असो. महाराजांचे शब्द पाळण्याची खटपट करणें आपलें काम आहे. पुढें त्यांचें त्यांना ठाऊक असा विचार करून पडशी खांद्यावर टाकून दादा बंदरावर येऊन पोहोंचले. जवळ भाड्यापुरतेही पैसे नव्हते, आतां पुढें काय करावें अशा विचारांत ते होते, तोंच त्यांच्या परिचयाचे एक गृहस्थ तेथें आले, व दादांस पाहून मोठ्या आनंदानें, ' दादा, तुम्ही मुंबईस कां जातां आहां ? बरेंच झालें 'माझें आयतेंच मोठें काम झालें, ' असें म्हणालें. त्यावर दादांनीं जावयाचें तर आहे पण कसें जावें हाच विचार करतों आहे, ' असें सांगितलें. तो गृहस्थ म्हणाला, 'त्याची कशाला चिंता करतां ? मला मुंबईस एका गृहस्थाकडे मोतीं पोहोंचवावयास

जावयाचें होतें व त्याकरतां मी हें बोटींचें तिकीटही काढलें आहे; परंतु इतक्यांतच एक अतिशय महत्त्वाचें काम निघाल्यामुळें मला येथें राहणें जरूर आहे. तेव्हां काय करावें, याच फिकिरींत मी पडलों होतों; आतां तुम्हीच भेटलांत बरें झालें; माझेंच तिकिट घेऊन जा, व मोती पोहोंचवून तुम्हास कोठें जावयाचें असेल तेथें जा." दादांनाही श्रीमहाराजांच्या योजनेचें कौतुक वाटून तत्काळ ती गोष्ट कबूल करून ते मुंबईस येऊन पोहोंचले. मुंबईस मोत्याचे काम केल्यावर, तसेंच पूर्वीसारखें निर्धारानें बोरीबंदरवर येऊन थड-कले. त्यांना कोणीही मज्जाव केला नाहीं; व ते सरळ गाडींत जाऊन बसले. वाटेंतही कोणीं त्यांस कांहीं विचारलें नाहीं. त्याचप्रमाणें पुण्यासही कोणी कांहींही विचारल्याशिवाय गाडींतून उतरले, ते सरळ तिकिट कलेक्टरच्या अंगांवरून बाहेर येऊन थट घरीं येऊन पोहोंचले.

याप्रमाणे हकीगत कळल्यावर दादांनीं लिहून आणलेलें काय आहे, हें अण्णासाहेब पाहतात, तों प्रज्ञावर्धन स्तोत्र !! स्वतःच्या जवळचा पाठ त्यांच्याशीं जुळवून पाहतांच सर्व प्रकार आण्णासाहेब यांच्या ध्यानांत आला, व मग त्यांस काय वाटलें असेल तें त्यांचें त्यांनाच ठाऊक. याविषयींची हकी-गत त्यांनीं स्वतःच लिहिली आहेः—

" फाल्गुन वद्य प्रतिपदा शके १८४३ चें दिवशीं, पंचमीपासून छापील प्रतीवरून स्तोत्र म्हणावें, असें मनांत आलें. हा हेतु व छापील प्रतीची अशुद्धता, ही श्रींनीं अप्रार्थित व अचिंतितपणें जाणली व स्तोत्राचा शुद्ध पाठ अशरीर वाणीनें दांडेकर यांस सांगितला. हें श्रींचें ईश्वरत्वाचें प्रमाण...."

"... श्रीसद्गुरु नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या प्रत्यक्षतेचें प्रमाण व कृपेचेंही हेंच. वे. शा सं. केशव भटजी केळकर हे दाभोळास राहत होते. त्यांचे घरी दांडेकर निजलें असतां, महाराजांनीं त्यांस जागें करून त्यांस स्तोत्र सांगितलें. शिसपेन्सलीनें लिहिलें. फक्त शब्द कांनीं पडले. दिव्याचा उजेड होता. मला दिलेली प्रत केशव भट केळकर यांच्या भावाच्या हातची आहे. केशवभटजीस पूर्वी श्रींचें दर्शन झालें होतें. या स्तोत्राची प्रत दांडेकर यांनीं यथाश्रुत लिहून, मजकडे प्रथम फा० व० ५ मी शनिवार दिवशीं आणून ठेवली. गुडघे गांवाहून कोंकणांतून आणली. या स्तोत्राची प्रत स्व-हस्तानें करून दांडेकर यांस फा० व० ८ मी मंगळवार शके १८१३ या

दिवशीं दिली व त्यांनीं मला दिली. या स्तोत्राची दुसरी प्रत वैशाख व० ८ शके १८१४ शुक्रवारच्या रात्रीं पहांटेस करून शनवार वद्य १० मी रोजीं दांडेकर यांस दिली. पहिल्या प्रतींत 'धी' अक्षर चुकून राहिलें होतें तें घातलें. नामें २८ च ३० नाहींत हें सिद्ध. तीस नांवांच्या छापील प्रतीवरून नित्य स्तोत्र म्हणावें, असें माझ्या मनांत पुणें येथें सुमारें तीन दिवसांपूर्वीं आलें, व शनवार फा० व० ५ मीस आरंभ करण्याचें माझें ठरलें. हें दांडेकर यांस मुळींच कोंकणांत माहीत पडण्याचें कारण नाहीं. असें असून त्यांनीं शनवारीं ही प्रत आणून दिली. यावरून श्रींचें ईश्वरत्व म्हणजे सर्वज्ञत्व, सर्वसाक्षित्व, सर्वव्यापकत्व, इत्यादि, व दांडेकर यांची योग्यता व श्रींचें ठिकाणीं भक्ति, हीं सर्व दिसून येतात." दोन तीन दिवसांनीं दांडेकर यांस भाडें देऊन, अण्णासाहेबांनीं रवाना करून दिलें. पुढें एक दिवस महाराजांनीं त्यांना सांगितलें कीं, 'रेल्वे कंपनीचें कर्ज ठेऊं नको. उगीच अनेकपट द्यावें लागेल.' त्यावरून अण्णासाहेबांनीं बुधवारांत जाऊन एक मुंबईचें तिकिट काढून आणलें, व अशा रीतीनें मुंबईहून दादांना महाराजांनीं फुकट आणलें, तें कर्ज देऊन टाकलें. हें तिकिट अखेरपर्यंत त्यांच्याजवळ होतें, व ही हकीगत सांगतांना क्वचित् प्रसंगीं. तें ते काढूनही दाखवीत असत. असो. या लहानशा दिसणाऱ्या गोष्टीचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर बराच झाला असावा असें दिसतें. कारण केव्हांही त्यांच्या बोलण्यांत या गोष्टीचा फार उल्लेख येत असे.

यानंतर पुढें लौकरच श्रीगणपती उत्सवाची कल्पना निघाली. गणपतीचे उत्सव तर पुण्यांत ठिकठिकाणीं मोठ्या प्रमाणांत पूर्वींपासूनच होत असत, परंतु या उत्सवास सार्वजनिक स्वरूप देऊन त्याचा उपयोग राष्ट्रीय दृष्ट्या ( राजकीय नव्हें ) करून घेण्याची कल्पना पूर्वीं कोणाच्या डोक्यांत आली नव्हती. यासंबंधानें प्रत्यक्ष त्यांनीं सांगितलें नसलें तरी आमच्या ऐकिवांत असें आहे कीं, ही कल्पना मुख्यत्वेंकरून अण्णासाहेब यांचीच होती, व तिची सर्व तऱ्हेची उठावणी, सुप्रसिद्ध भाऊसाहेब रंगारी वगैरे खटपटी गृहस्थांना हातीं धरून अण्णासाहेब यांनीं केली, व तिला मूर्त स्वरूप दिलें. प्रत्यक्ष आपला संबंध त्यांत असल्याचें जरी ते बोलत नसत, तरी या पहिल्या पहिल्या उत्सवांची हकीकत त्यास चांगल्या चांगल्या लोकांनींही

पहिल्यांदा विरोध कसा केला, व पुढें हळूं हळूं त्याची उपयुक्तता लोकांस पटून तो उत्सव सर्वमान्य कसा झाला, हें सर्वांस माहीतच आहे. प्रथमतः लोकमान्य टिळक यांचेंही मन या उत्सवाच्या उपयुक्ततेविषयीं साशंक होतें. परंतु "त्याला एथें आणून जेव्हां बराच काथ्याकूट केला, तेव्हां कुठें त्याची समजूत पटली व त्यानंतर केसरींतून अनुकूल लेखही येऊं लागले." वगैरे हकीकत ते सांगत. त्यानंतर टिळकांनीं या चळवळीचा त्यांच्या स्वभावास अनुसरून इतका पुरस्कार केला कीं पुढें पुढें तर टिळक आणि गणपतिउत्सव हे दोन्हीही एकजीव होऊन गेले. आणि आज तर एका काळीं या उत्सवास ते अनुकूल नव्हते ही गोष्टही लोक विसरून गेले असून त्यांच्याकडेच या उत्सवाचें उत्पादकत्व देण्यांत येतें इतकी त्यांनीं या उत्सवांत कामगिरी केली.

गणपतीचा उत्सव पुण्यास पेशव्यांनीं सुरू केला असें म्हणतात. गणपतिमहालांत असलेल्या सोन्याच्या गणपतीपुढें तो अत्यंत थाटानें साजरा करण्यांत येत असे. अण्णासाहेब असें सांगत असत कीं ज्याप्रमाणें श्रीगजाननाच्या उपासनेनें पटवर्धनास वैभव प्राप्त झालें, त्याचप्रमाणें पेशव्यांनाही वैभव येण्याचें कारण श्रीगजाननाचा वरप्रसाद हेंच होय. याविषयीं ते एक मनोरंजक दंतकथाही सांगत असत.

प्रसिद्ध गणेश दैवज्ञ घोटवडेकर हे पूर्वी जंजिऱ्याचे सिद्द्यांचे पदरीं होते. वृद्धापकाळामुळें गणेश दैवज्ञ यांचे ऐवजीं त्यांचे चिरंजीव केशवशास्त्री हे पुढें पुढें दरबारांत जात असत. एक वेळ अशी मौज झाली कीं, 'चंद्रदर्शन अमुक दिवशीं आहे,' असें दरबारांत चट्दिशीं केशवशास्त्र्यांनीं सांगून दिलें. मुसलमानी शास्त्रांत चंद्रदर्शनाचें माहात्म्य मोठें व त्यावर त्यांचें धार्मिक आचार अवलंबून असतात आणि तेवढ्याकरितां चांगले ज्योतिषी मुसलमानी राजांच्या पदरीं ठेवलेले असत. केशवशास्त्री दरबारांतून आल्यावर त्यांची चूक त्यांच्या लक्षांत आली; कारण त्या दिवशीं अगदीं पूर्ण अमावास्या होती. तेव्हां आतां काय करावें, असा विचार पडून त्यांस कांहीं सुचेनासें झालें. एक तर लौकिकास धक्का आणि दुसरें मुसलमानांशीं गांठ. नुसते जहागीर जाण्यावर भागलें तर नशीब नाहीं तर प्राणाशींही गांठ पडावयाची. अखेर त्यांनीं ही गोष्ट वडिलांस सांगितली. तेव्हां तेही चिंताक्रांत झाले, परंतु त्या कालास

अनुसरून त्यांचा देवावर विश्वास चांगलाच होता. तेव्हां आतां बुद्धिदाता श्रीगजानन काय करील तें खरें, असें म्हणून त्यांनीं देवघरांत जाऊन धरणें घेतलें. शेवटीं वद्य चतुर्दशीस त्यांना असा दृष्टांत झाला कीं, " घाबरूं नकोस, उद्यां पहांटेस उठून तळ्यावर जा, व तेथें अमुक अमुक ठिकाणीं मी आहे, मला बाहेर काढ, व माझ्या हातांतील एक कडें पाण्यांत टाकून मला घरीं घेऊन ये. " त्याप्रमाणें सुप्रभातीं मोठ्या आनंदानें गणेश दैवज्ञांनीं पाण्यांत उतरून पाहिलें तों गजाननाची अष्टधातूंची, परंतु विशेषतः सुवर्णाची एक फार सुंदर मूर्ति त्यांस सांपडली. तिच्या अंगावर सर्व तऱ्हेचे अलंकार असून, हातांत सोन्याचीं रत्नजडित वलयें होतीं. आज्ञेप्रमाणें एक कडें पाण्यांत टाकून ती मूर्ति गणेश दैवज्ञांनीं घरीं आणली, व पुढें श्रीगजाननाच्या आश्वासनाप्रमाणें सिद्दीच्या २० मैलांच्या टापूंत त्या दिवशीं अमावास्या असतांनाही लोकांस चंद्रदर्शन झालें ! ही मूर्ति परंपरेनें पुण्यांतील घोटवडेकर यांचें हातीं आली, व ती आपण डोळ्यानें प्रत्यक्ष पाहिली आहे असें अण्णासाहेब सांगत असत, असो.

यानंतर इतर गांवच्या लोकांचा आणि सिद्दीच्या टापूंतील लोकांचा वाद होऊन, उभयतां बापलेकांच्या विद्वत्तेची फारच वाखाणणी झाली, आणि अशा ज्योतिषाचा चांगला फायदा घ्यावा म्हणून, शिद्दयांनीं त्यास अशी आज्ञा दिली कीं, " ज्या मुहुर्तावर काम सुरूं केलें असतां किल्ला अजिंक्य होऊन, दुसऱ्याच्या ताब्यांत कधींही जाणार नाहीं, असा मुहूर्त काढून द्यावा. " त्याप्रमाणें पुष्कळ दिवस गणित करून, गणेश दैवज्ञांनीं एक मुहूर्त काढून दिला, आणि त्या मुहूर्तावर सुप्रसिद्ध जंजिऱ्याचा किल्ला बांधण्यास सुरुवात करावयाची असें ठरलें. परंतु कांहीं योगायोगामुळें असें झालें कीं तो मुहूर्त बिनचूक न साधतां थोडासा घोंटाळा झाला. त्यावरून गणेशदैवज्ञांनीं सांगितलें कीं, हा किल्ला जवळ जवळ अजिंक्यच राहून, कित्येक वर्षांनीं, रविवारीं तिसऱ्या प्रहरीं कोणीतरी ब्राह्मण शत्रु पाडाव करील. त्यावेळीं अशा कोणा ब्राह्मणशत्रूची कल्पनाच नव्हती; तरीपण, या भावी संकटाचा प्रतिकार करावा म्हणून, असा हा शत्रु तरी कोठें उत्पन्न होणार, म्हणून शिद्दयानें गणेशदैवज्ञांस विचारलें. तेव्हां उपासनेच्या जोरावर गणेश दैवज्ञांनींही असें सांगितलें कीं, याच राज्यांत असलेल्या भट कुळांतील कोणी पुरुष हें काम करील. तेव्हां मुळावरच कुठार

टाकण्याकरितां, शिद्दयानें आपल्या हद्दींतील सर्व भट लोकांचें बिजन करावयाचा हुकूम दिला. असें सांगतात कीं, या अनर्थांतून एक लहान मुलगा मात्र वांचला व त्याचें त्याच्या उपाध्यायांनीं पालन पोषण केलें; आणि शेवटीं मौंज करून देऊन त्यास श्री गजाननाची उपासना दिली तेव्हां आपल्या कुळाचें निसंतान करणाऱ्या मुसलमानांचा उच्छेद आपल्या हातून व्हावा, असा उद्देश मनांत धरून त्यानें फार उग्र तपस्या केली. त्याप्रमाणें, पुढें श्रीगजाननाचें दर्शन होऊन वरप्रसाद झाला कीं, " हें काम तुझ्याच हातून पुढें होईल. व याच कुळांत तूं जन्म घेशील, परंतु आतां तपश्चर्या थांबवून वंशवृद्धि करावी.' व तेवढ्याकरितां, राज्य-प्राप्ती झाली म्हणजे श्रीगजाननास एक कोटी दुर्वा अथर्वशीर्षांच्यासह वाहाव्या, असा संकल्प झाला होता. ही गोष्ट परंपरेनें बाळाजी विश्वनाथ यांस माहीत होती. पुढें भटांनी सिद्दीच्या राज्यांत पुन्हां देशमुखी मिळविली, व शिद्दयाच्या इतराजीनें आणि ब्रह्मेंद्रस्वामींच्या प्रोत्साहनानें बाळाजींपंत घाटावर आला, वगैरे गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत. राज्य-प्राप्ती झाल्यावर, हा संकल्प पुरा करावयाचा म्हणून बाळाजी विश्वनाथानें तें काम कायगांवकर सुप्रसिद्ध पाटणकरदीक्षित यांचेकडे दिलें. त्याप्रमाणें, नानासाहेब यांच्या कारकीर्दीपर्यंत सत्तावीस लक्ष दुर्वा वाहिल्याचा उल्लेख दीक्षितांचे पत्रांत सांपडतो. त्यानंतर राज्यवैभवाच्या गर्दींत, या कामाकडे पेशव्यांचें दुर्लक्ष झालें, व पुढें तें बंद पडून, बोलाफुलास गांठ म्हणतात त्याप्रमाणें, पानिपतचा प्रसंग होऊन त्यांच्या वैभवास उतरती कळाही लागली. असो. पटवर्धनांचेंही कुलदैवत श्रीगजाननच आहे. आणि तेंच अण्णासाहेबांचें उपास्य असल्यामुळें या उत्सवावर त्यांचें अतीशय प्रेम होतें, आणि पुढील राजकीय वातावरणाच्या बिकट परिस्थितींतही त्यांच्या प्रोत्साहनानें आणि वजनानें या उत्सवाचें रक्षण झालें हें प्रसिद्धच आहे.

श्रीगजाननाच्या उत्सवानंतर पुण्यांत उपस्थित झालेली अनेक प्रकरणें, म्हणजे, हिंदुमुसलमानांचा दंगा, पंचहौद प्रकरण पुण्याची कॉंग्रेस, वगैरे सर्व गोष्टी प्रसिद्धच आहेत. जरी त्यांच्याशीं अण्णासाहेबांचा अत्यंत निकट संबंध असला, किंबहुना त्यांतील कोणच्याना कोणच्या बाजूचें तरी सूत्रचालकच ते असले, तरीही ' न धरीं शस्त्र करीं ' असली त्यांची बाह्य स्थिति असलेमुळें, त्याविषयीं जास्त लिहिणें योग्य होणार नाहीं. एवढें मात्र खास सांगतां येईल

कीं, या सर्व प्रकरणांत अतीशय महत्त्वाची अशी योजना अण्णासाहेब यांनीं सांगितलेली असे, हें पुण्यांतील लोकांस तरी निर्विवाद ठाऊक आहे.

पुण्यांतील कॉंग्रेसनंतर पुढें लौकरच प्लेगची धामधूम सुरूं झाली, व तेथून पुण्यामध्यें दुसरेंच मन्वंतर सुरूं झालें. प्लेगचे दिवस पुण्यांतील लोकांस कसे गेले, सॅनिटेशनच्या नांवाखालीं सोजरांनींपुण्यास काय काय प्रकार केले, वगैरे सर्व मनोरंजक हकीगती प्रसिद्धच आहेत. अण्णासाहेब यांसही हे दिवस अतिशय वाईट गेले असावेत. प्लेगच्या दिवसांत पुण्यांतील लोक बाहेर जाऊन रहावयास लागले, तेव्हां प्रथमतः लोकाचाराप्रमाणें अण्णासाहेब यांनींही झोंपडीची व्यवस्था करून, एक दिवस आपली मंडळी रवाना करून दिली, व आपण स्वतः घरींच राहिले; कारण देव घरीं होते. देवांस हलवावें अगर तेथेंच ठेवून जावें, हीं गोष्ट त्यांच्या हातून घडणारी नव्हती, म्हणून अखेरीस मंडळी परत घरीं आली, व तेथपासून पुढें केवढाही प्लेग असला तरी हे आपली मंडळी हालवीत नसत.

प्लेगच्या दिवसांत तपासणीचा वगैरे त्रास इतर लोकांप्रमाणें यांनाही व्हावयाचाच, परंतु याच्या वजनानुळें व युक्तीमुळें तो शक्य तेवढा कमी झाला. घर तपासावयास सोल्जर लोक आले, म्हणजे, यांनीं त्यांच्याशीं त्यांच्याच सारखें गांवढळ इंग्रजींत बोलावें; म्हणजे ते फारसा त्रास न देतां निघून जात. 'प्लेगच्या तपासणीच्या वेळीं देखील महाराजांच्या कृपेनें देवघरांत सोल्जरांनीं कधीं पाऊल घातलें नाहीं, बाहेरूनच डोंकावीत असत,' असें ते मोठ्या समाधानानें सांगत असत. प्लेगच्या तपासणीच्या नांवाखालीं सोल्जरांनीं लोकांचीं घरें धुवून काढलीं, व चुलीखालीं उकरून पाहण्यापर्यंत नासधूस केली, याचें कारण त्या लोकांशीं झालेल्या कांहीं बोलण्यावरूनच असो, किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं असो, ते असें सांगत कीं, 'सरकारास पुष्कळ दिवसांचा भ्रम होता कीं, पुण्यांतील लोकांपाशीं शस्त्रांचा गुप्त संग्रह आहे; पुण्यांतील लोक जणूं कांहीं सदैव बंडाच्याच तयारींत असतात, असा हास्यास्पद भाव सरकार मनांत बाळगतें, हें प्रसिद्धच आहे. असल्या भयंकर लोकांविषयींचा भ्रम फेडून घेण्याची संधी प्लेगच्या निमित्तानें त्यांनीं साधली त्यांत त्यांना काय मिळालें, हें सांगणें कठीण आहे, पण सोल्जर लोकांचा चिरिमिरीचा फायदा मात्र बराच झाला असेल'!

पुण्याचा पहिला प्लेग ही नुसत्या पुण्यावरच नव्हे, तर सर्व महाराष्ट्रावर आलेली राष्ट्रीय आपत्ति होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण या प्लेगनें अतिशय नुकसान असें केलें कीं, त्या वेळच्या उगवत्या पिढींतील अतिशय जोमदार आणि होतकरू तरूण पुरुष खड्यासारखे उचलून नेले, आणि त्यामुळें प्लेगच्या मागून पुढें येणारी पिढी आणि पूर्वीची पिढी यांतील दुवा नाहींसा होऊन या दोन काळांतील पुणें म्हणजे, ' हें चित्र पहा, ' आणि ' हें चित्र पहा, ' असें नमुनेदार होऊन गेलें.

प्लेगनें घातलेल्या या गदारोळांत अण्णासाहेब यांस त्यावेळीं तरी कांहीं तडाखा बसला नाहीं. मात्र त्यांना स्वतःला आणि कुटुंबालाही थोडीशीं खंडणी द्यावी लागली. कुटुंबास प्लेग झाला, त्या वेळेंस तपासणीचा धुमधडाका चालू होता. ' मी बागेंतून आलों तों आमची ही(कुटुंब) सोप्यांत होती, तिचा चेहरा तांबडालाल झालेला पाहून चौकशी केली, तों ताप आलेला आहे. म्हणून कळून आलें. तपासणीची तर वेळ झालेली, काय करावें, असा विचार पडला. परंतु तिच्या तें गांवींही नव्हतें. तशाच स्थितींत ती तांदूळ घेऊन सडावयास बसली, तोंच डॉक्टरीण आली; परंतु हिला कांडतांना पाहून तिला कांहींच शंका आली नाहीं. ती अंगास हातहीं न लावतां मुकाट्यानें निघून गेली. पुढें दोन तीन दिवस याच युक्तीनें वेळ निभून गेली, ' असें त्यानीं एकदां सांगितलें.

स्वतः यांनाहीं केव्हां तरी त्याच सुमारास प्लेग झाला. गवत्या मारुतीसमोर कांहीं काम होतें, तें करून " टांग्यांत बसतो तोंच पाठींतून जोराचा रेप आला. त्याबरोबरच मीं समजलों कीं, महाराजांची स्वारी आली आहे. दुसरीं आणखी एक दोन कामें होतीं तीं करून घरीं येऊन पोहोंचतों तों अंगांत सडकून ताप भरला, व जांघेंत गांठ येऊन सपाटून दुखूं लागलें. अशा स्थितींत एक दिवस काढला शेवटीं संध्याकाळीं, जें काय होईल तें होवो, असा विचार करून नेहमींप्रमाणें डोक्यांस उपरणें गुंडाळलें, आणि तसाच लंगडत लंगडत गणपतीस गेलों. अतीशय कष्टानें तेथें जाऊन पोहोंचल्यावर तशाच प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. नेहमींप्रमाणें त्या पुऱ्याही केल्या, व तसाच घरीं येऊन पडलों. कांहीं वेळानें म्हणजे सुमारें दोन अडींच वाजतां रात्रीं लघवीस झालें, आणि जवळजवळ लहानशीं घागरभर

लघ्वी होऊन जीव गळून गेला. तेव्हां आमच्या हिला उठवून थोडेंसें लाहीपांठ खाल्लें व पडून राहिलो, तोंच घाम येऊन ताप उतरला व गांठही जिरून गेली. " असें या प्रसंगाचें त्यांनीं एकदां वर्णन केलें. यानंतरही त्यांना एकदां प्लेग झाला होता, व त्या वेळेलाही कांहीं उपचार न करितां तीन दिवस नुसतें निजून राहूनच त्यांनी त्याला हाकलून लाविला. नारायणराव छत्रे, सुंदरलाल, वगैरे लोभांतली मंडळी औषधोपचाराचा आग्रह करीत असतां, रागावून ते त्यांना म्हणाले,—" औषधांनीं मी वांचेन असें तुम्हीं लिहून देतां कां? नाहीं तर मी मरणार नाहीं, असें मी तरी सांगतों!" अशी त्यावेळची हकीगत ऐकिवांत आहे.

प्लेगच्या धामधुमीनंतर लागलीच धुळ्याच्या बुवासाहेबांचें निर्याण झालें; व तेथून यांच्या आयुष्यांतील एका भागास सुरवात झाली. धुळ्याचे नारायणबुवा यांचें त्रोटक चरित्र प्रसिद्ध झालेलें आहे, पण त्यांतील माहिती अगदींच अपुरी आहे, असें अण्णासाहेब सांगत असत. महाराज श्रीनृसिंहसरस्वती यांच्या या वेळच्या खेळांतील नारायणबोवा हे त्यांचे पट्टशिष्य होत. 'नारायण माझें हृदय आहे,' असें महाराज म्हणाल्याचें सांगतात. बुवासाहेबांचा अधिकार फारच मोठा असून महाराजांच्या कृपेनें अध्यात्मिक पूर्णता त्यांची झाली होती असें अण्णासाहेब सांगत असत. लौकिक दृष्ट्या त्यांची समाधी वगैरे होऊन संस्थान उत्सव वगैरे लीला व्हावयाची आहे, हें आपणास महाराजांनीं त्यांच्या निर्याणापूर्वींच सात वर्षें दाखविलें होतें, असें ते सांगत; व जरी त्यांच्या समाधीच्या वेळीं, अण्णासाहेब धुळ्यास नव्हते, तरी महाराजांनीं दाखविलेल्या ठिकाणींच त्यांना समाधी दिली गेली. बुवासाहेब श्रीदत्तजयंतीच्या उत्सवास अण्णासाहेब यांना नेहमींच पाचारण करीत. परंतु कांहींना कांहींतरी कारणानें त्यांचें जाणें होत नसे. परंतु शके १८२१ सालीं मात्र दत्तजयंतीच्या उत्सवास जावें. असें अण्णासाहेबांनीं ठरविलें. बुवासाहेबांच्या प्रत्यक्ष हांतून असा हा शेवटचा उत्सव आहे, असें त्यांस माहीत असावेंसें दिसतें. त्यांनीं यावें म्हणून बुवासाहेबांनींही निमित्ताला, त्यांचे गळ्यांत, उत्सवाकरितां सांगलीचें तूप घेऊन येण्याचें टाकलें होतें. " धुळ्यास गेलों तों टांगा पुलावर नेऊन आधीं मुकाट्यानें समाधीचीं जागा पाहून घेतली, व मग घरीं गेलों," म्हणून ते

सांगत असत. राममंदिरांत जातांच त्यांना ते सर्व पूर्वी पाहिल्याच्या खुणा तंतोतंत पटल्या.

त्यानंतर नित्याप्रमाणें फाल्गुनांत देहू आळंदी करून बुवासाहेब परत पुण्यास आले व मामुली प्रसाद होऊन धुळ्यास गेले. आळंदीसच आपण रहावें असा त्यांचा मनोदय होता परंतु महाराजांची आज्ञा नसल्यानें त्यांना धुळ्यास जावें लागलें. जाण्यापूर्वी आदल्या दिवशीं रात्रीं सर्व निजानीज झाल्यावर त्यांनीं अण्णासाहेब यांस " दादा, थोडा इकडे ये, " असें म्हणून हांक मारली, व त्यानंतर दोन अडीच तास त्यांचें भाषण झालें.

या प्रसंगीं बुवासाहेबांनीं मोकळ्या मनानें आपला स्वतःचा इतिहास सांगून महाराजांनीं त्यांना हठयोगास कसें लाविलें, त्याच मार्गानें त्यांची पूर्णता कशी केली, वगैरे हकीगत व स्वतःच्या खासगी गोष्टीही सांगितल्या, म्हणून अण्णासाहेब सांगत. याच प्रसंगीं 'आपण आतां जाणार, सांप्रदाय तुम्हीं चालवावा,' असें म्हणून बुवासाहेबांनीं तें काम अण्णासाहेब यांचे गळ्यांत टाकलें व त्यासंबंधीं कांहीं सूचनाही देऊन ठेवल्या. स्वतः अण्णासाहेब एवढी गोष्ट सांगत नसत. परंतु ज्या वेळेला या गोष्टी झाल्या, त्याच वेळीं मधल्या माडींत नानासाहेब जागे होते, त्यांनीं बहुतेक भाषण ऐकलें. जरी अण्णासाहेब ही गोष्ट सांगत नसत, तरी पुढील पंधरा वर्षांत त्यांचें एकंदर वर्तन पाहिलें म्हणजे सर्व सांप्रदायिकांची ते एक " सामान्यधात्रीच " होते, असेंच कोणासही वाटेल. बुवासाहेबांनीं दिलेल्या सूचनांतील एक विशेष सूचना अशी होती म्हणतात कीं, " सर्व सांप्रदायिकांना उपासना व ध्यानादिक साम्य मार्गानींच न्यावें, कारण लोक अनेक प्रकारांनीं क्षीण झालेले असून हठयोगासारखे मार्ग आक्रमिण्याची, अथवा मार्गास लावल्यास तडीस लावण्याची पात्रता कोठेंही आढळत नाहीं. " स्वतः बुवासाहेब हे हठयोग पद्धतीनेंच जाणारे होते, व त्याच मार्गानें महाराजांनीं त्यांच्या योगाची पूर्णता केली, असें सांगतात. महाराजांच्या सध्यां माहीत असलेल्या शिष्यांत हठयोगमार्गानें गेलेले फक्त बुवासाहेबच होते, असें म्हणतात. मात्र हठयोग म्हणजे सामान्यतः लोक समजतात त्याप्रमाणें धूर्तीपूर्तीचा अगर हट्टानें देवाच्या दारीं धरणें घेण्याचा नव्हे; तर श्रीज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत श्रीज्ञानेश्वर

महाराजांनीं कुंडलिनीच्या ज्या ' सप्रभव वैभवाचें ' वर्णन केलें आहे, तो षट्-चक्रभेदरूपी हठयोग होय. असो.

यावरून एक गोष्ट मनांत येते कीं, कोणच्याही मार्गानें कां होईना, ज्या स्थळीं मनुष्य पोहोंचला असतां तेथून सर्व मार्गांचें हृद्गत समजतें आणि सर्व साधनमार्ग करतलामलकवत् होतात, अशा एका स्थळीं तरी निदान अण्णासाहेब उभे होते. स्वतः त्यांच्या भाषणांत उपासनेखेरीज इतर मार्गांचे व त्यांतील अवस्था, अनुभव आणि पद्धति यांचे उल्लेख दोनतीन वेळां, अगदीं त्यांचा अनुभव असल्याप्रमाणें आलेले ऐकण्याचा प्रसंग सुदैवानें लेखकासच आला आहे; त्यावरूनही असेंच वाटतें. अण्णासाहेब हेही त्यांचें ' म्हणणें ' ( नित्यपठण ) म्हणत असतां प्रत्येक उच्चाराबरोबर मस्तकावर विशेष तऱ्हेनें न्यास करीत, आणि त्यांच्या " म्हणण्यांत " सहस्रदल पंकजस्थ परमात्म्याचाच उल्लेख होता, यावरूनही मागें एका प्रकरणांत ( स्थित्यंतर ) केलेल्या अनुमानांनाच बळकटी येते. असो. दुसऱ्या दिवशीं रीतिप्रमाणें प्रसाद होऊन बुवासाहेब धुळ्यास गेले, व तेथेंच त्यांचें शके १८२२ वैशाख शु॥ द्वादशी या दिवशीं देहावसान झालें. पुढें मंडळींच्या विचारानें अण्णासाहेब यांना पूर्वी दाखविलेली जागाच कायम होऊन तेथेंच त्यांना समाधी दिली गेली, व हळूं हळूं काम सुरू होऊन, केवळ अण्णासाहेब यांच्या प्रयत्नांनींच संस्थानास आजचें स्वरूप आलें. समाधीच्या जागेस जोडून असलेली बाग धर्मशाळा वगैरेची जागा कर्टीससारखा अधिकारी असल्यामुळें मिळेल अशी कोणासच आशा नव्हती. फक्त अण्णासाहेबच सांगत असत कीं, ' ती जागा मिळावी अशी महाराजांची इच्छा आहे, तुम्हीं प्रयत्न करा. ' त्याप्रमाणें बरीचशी खटपट झाल्यावर अखेरीस ती जागा मिळून संस्थानला आजचें स्वरूप आलें. प्रतिवर्षी पुण्यतिथीकरितां धुळ्यास जावयाचा अण्णासाहेबांचा नेम होता, व त्यांच्याकरितां अनेक निमित्तांनीं विद्वान्, औषधार्थी आणि भाविक असे चांगले चांगले लोक जमून तेथें मोठा आनंद उडत असे. स्वतः अण्णासाहेब हे बुवा साहेबांस केवळ महाराजस्वरूपच समजत असत. ' महाराजांनीं त्यांना अगदीं आपल्यासारखेंच केलें, त्यांत एवढें देखील ठेवलें नाहीं रे , ' असें १९१३ सालीं त्यांनीं मला सांगितल्याचें आठवतें. एकादशीच्या दिवशीं धुळ्यास पोहोंचावयाचें आणि पौर्णिमा झाल्यावर तेथून निघावयाचें, असा सामान्य शिरस्ता

असे. सर्व प्रवास वहुतकरून प्यासेंजरच्या तिसऱ्या वर्गानेंच होत असे. सेकंड क्लासमध्यें बसावयाचा त्यांना पुष्कळ आग्रह केला, कारण थर्ड क्लासच्या गर्दींत त्यांना अतिशय त्रास होत असे, व अतिशय अडचणींनीं एका आसनावर दहा दहा तास सारखे बसून काढावे लागत, पण त्यांचें एकच उत्तर ठरलेलें असे. 'सेकंड क्लासमध्यें बसावयास हरकत नाहीं, परंतु मी एकटा बसणार नाहीं, वसूं तर आपण सारेच बसूं, नाहीं तर आपला थर्ड क्लासच बरा.' त्यांच्याबरोबर नेहमीं ५।१० माणसें असत. इतक्यांसुद्धां सेकंड क्लासमध्यें बसणें त्यांच्या सांपत्तिक स्थितीला शक्य नव्हतें, आणि दुसऱ्या कोणी तिकीट काढून देण्याची तर गोष्ट बोलायचीही सोय नव्हती; यामुळें अखेरपर्यंत असाच प्रवास त्यांना करावा लागे. मात्र या प्रवासामुळें व धुळ्याच्या यात्रेमुळें लोकांची एक अशी उत्तम सोय झाली कीं, साधारणतः आपल्या व्यवसायांत राहणारे अण्णासाहेब या प्रसंगीं पुष्कळसे मोकळे सांपडून त्यांचें बोलणें रगड ऐकावयास सांपडे, व त्यांची वृत्तिही अत्यंत प्रसन्न असल्यामुळें विनोद, थट्टा, वगैरे सर्व प्रकार घडून आनंदाचा मोठा पूर येई. या ठिकाणीं ते उपस्थित होणाऱ्या सर्व विषयांवर मोठ्या प्रसन्नतेनें तासचे तास बोलत असत, आणि 'बोलविता धनी' महाराजच असल्यामुळें त्या ठिकाणीं जें जें होई तें तें सर्व हरिकीर्तनच आहे असें प्रत्यक्ष शिकविण्याकरितां बहुतकरून शेवटीं 'पुंडलीक वरदे हरिविठ्ठल' करून जयजयकार करीत. या अमृतधारेंत दिवसभर राहिल्यामुळें धुळ्याच्या कडक उन्हाळ्याचा भासही होत नसे, आणि बहुतेक वेळ त्यांच्या आनंदमय सहवासांत जादूनें भारल्याप्रमाणें काढून कलिंगड्यांची व आंब्यांची सारखी झोड उडविल्यावर, रात्रीं थोडा वेळ शीतळ चांदण्यांत बगीच्यांत शांतपणें पडलें असतां, दिवसांच्या सर्व आठवणी होऊन आणि त्या पुण्यमूर्तीचे वारंवार स्मरण होऊन, जो भाव अंतःकरणांत उत्पन्न होई, व ज्या कांहीं अपूर्व सुखाचा लाभ क्षणमात्र अंतःकरणास होई, त्याचें वर्णन कोणी करावें ? व कांहीं केलें तरी तसा अनुभव आतां येणें दैवीं नाहीं, म्हणून त्याच जागीं आतां कित्येकांस जो खेद होत असेल तो तरी कोणीं सांगावा ? जवळ जवळ अशीच किंबहुना थोडीशी जास्त स्थिति आळंदीसही होत असे. स्वतः अण्णासाहेब यांचा मात्र हा सर्व व्यवहार चार यात्रेकरूंप्रमाणेंच आपणही, अशा रीतीनें त्यांच्यांत मिळून मिसळून व हंसून खेळून होत असे. असो.

बुवासाहेबांच्या निर्याणानंतर दुसऱ्याच वर्षी श्रीपादस्वामीही समाधिस्थ झाले. यांची समाधी पुण्यास ओंकारेश्वरावर आहे. तेथेंच ते कांहीं दिवस राहत असत. त्या पूर्वी ते सदाशिव पेठेंत अण्णासाहेब यांच्या सासुरवाडीस दामले यांचे येथें राहत असत. तेथून त्यांचा व अण्णासाहेब यांचा चांगलाच लोभ जडला. यांची हकीगत अण्णासाहिब अशी सांगत कीं अगदीं लहानपणीं एका जिवावरील दुखण्यांत त्या काळच्या समजुतीप्रमाणें यांना संन्यास दिला गेला; व त्या तोडग्यानें हे बरेही पण झाले. त्यावेळीं त्यांचें वय सुमारें १८ वर्षांचें होतें. त्यानंतर त्यांनींही भानगडींत न पडतां आश्रमधर्म संभाळून कड-कडीत रीतीनें आयुष्य काढलें, परंतु नुसत्या आचारधर्मांतील शुष्कपणानें त्यांचें समाधान होईना, आणि ईश्वरानुग्रहाचा ओलावाही प्रगट होईना. अशी स्थिति दुःसह होऊन एकदोन वेळां त्यांनीं आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला. यांचें शरीर व रूप चांगलें असल्याकारणानें त्यांच्यावर एकदोन वेळां विषप्रयोगही केले गेले. परंतु इतक्या सर्वांतून कांहींना कांहीं चमत्कारिक रीतीनें ते वांचले, व पुढें त्यांची आणि महाराजांची गांठ पडली. चांगलें पात्र पाहिलें कीं सदैव भावाचा भुकेला असलेल्याच्या तोंडास पाणी सुटावयाचेंच. तसेंच येथेंही झालें, व महाराजांनीं त्यांना मार्गाला लाविलें. महाराजांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं स्वतःची विशेष माहिती अशी श्रीपादस्वामींना केव्हांही दिली नाहीं. दोन संन्याशांचा स्नेह असावा, त्याचप्रमाणें सहज भाषणाच्या ओघांत श्रीपादस्वामींना ‘ तुमची इच्छा काय आहे ’ म्हणून विचारलें. आपण कोणा विशेष विभूतीशीं बोलतों आहों याची श्रीपादस्वामींना कल्पनाही नसल्यामुळें एकाद्या जिव्हा-ळ्याच्या वडील माणसाजवळ हृद्गत सांगावें, त्याप्रमाणें त्यांनीं सांगि-तलें कीं “ ज्याप्रमाणें नामदेवास श्रीपांडुरंगाचें सान्निध्य असें, त्याप्रमाणें श्रीदत्तप्रभूंचा प्रत्यक्ष सहवास असावा असें वाटतें, परंतु तें कोठून नशीबीं असणार ? ” असें म्हणून ते थोडेसे कष्टी झाले. तेव्हां स्वामींनीं त्यांना सांगितलें कीं “ आम्ही हिमालयावर गुरूचे आश्रमांत असतां सहज कित्येक गोष्टींनीं कान वाटत होते, परंतु आमचा स्वभाव हा असा, छंदीफंदी पडल्या-मुळें आमच्या हातून कांहीं घडणें शक्य नव्हतें. त्यावेळीं जेणें करून श्रीदत्ता-त्रयांचा साक्षात् सहवास होईल, असा मंत्र गुरूंनीं सांगून ठेवला होता. आमच्या हातून तर झालें नाहीं, परंतु तुम्ही कराल असें वाटतें. तुमचा

आचार वगैरे मोठा संतोषकारक आहे. तुमच्या हातून तें होईल. " पुढें त्यांनीं सांगितल्याप्रमाणें श्रीपादस्वामींनीं अनुष्ठान केलें आणि त्याप्रमाणें त्यांची इच्छाही पूर्ण झाली, व श्रीदत्तात्रयांचा सहवास होऊन भाषणादिक व्यवहारही होत असत. परंतु या गोष्टीची कल्पनादेखील कोणास नव्हती. श्रीपादस्वामींनी पुढील आयुष्य एकाद्या सामान्य संन्याशाप्रमाणें शांतपणानें घालविलें. धुळ्याच्या उत्सवास जावयाचें म्हणून अण्णासाहेब त्यांना भेटावयास गेले असतां, ' आतां तुमची आमची भेट पुन्हा होणार नाहीं, ' म्हणून श्रीपादस्वामींनीं त्यांना सांगितलें. अण्णासाहेबांनीं विचारलें, असें कां ? ' तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं " शरीराचा अतिशय कंटाळा आला, दोन चार वेळां जावें असें वाटलें, परंतु श्रींची परवानगी नव्हती. आतां या खेपेस आज्ञा झाली आहे, येत्या शुक्रवारीं आम्हीं देह ठेवूं. " त्यानंतर आपलें सर्व चरित्र त्यांनीं अण्णासाहेबांस सांगितलें, व वरील हकीकत सांगून महाराजांचे उपकार आठवून डोळ्यांस पाणी आणलें. पुढें अण्णासाहेब धुळ्यास गेले, व मागें श्रीपादस्वामी समाधिस्थ झालें. ही गोष्ट वैशाख शु॥ ९ शुक्रवार शके १८२४ रोजीं झालीं.

बुवासाहेबांच्या निर्याणानंतर थोडे दिवसांनीं म्हणजे शके १८२२ माघ शु॥ १० गुरुवार या दिवशीं अण्णासाहेबांनीं " श्रीसद्गुरूंच्या आज्ञेनें ' मी कोण ?' याचा अनुभवसहित शोध करण्याचा प्रारंभ " केला, व पुढें लौकरच म्हणजे १८२३ सालीं केव्हांतरी त्यांना "अंतर्बहिश्च व्याप्य नारायणः स्थितः। इति श्रुतिवाक्यस्य साक्षात्परिचयोऽभूत् " असा अनुभव येऊन, " नारायणः श्रीनृसिंहसद्गुरु देव एव इति निश्चयो जातः " अशी त्यांची स्थिति झाली.

श्रीपादस्वामींच्या समाधीनंतर लौकरच, म्हणजे शके १८२४ आषाढ व॥ ९ मंगळवार या दिवशीं त्यांचें कुटुंब स्वानंदवासी झालें. प्रथमपासूनच त्यांची स्थिति एकाद्या कुटीचकासारखी होती, व संसार म्हणजे निमित्तालाच होता. परंतु त्यांचें कांहींही असलें तरी घरांत सौ. मातुश्री रमाबाईसारखा थोर जीव सहधर्मिणी म्हणून होता, त्यामुळें त्यांना कुटुंब व्यवस्थेकडे किंचितही पाहण्याचें कारण कधीं पडलें नाहीं. यांचीं अनेक धोरणें संभाळून खाण्यापिण्याची व्यवस्था त्यांनीं ठेवावी, व बाहेरील व्यवहार नानासाहेब यांनीं पहावा, अशी सहज स्थिति होती. १९०२ सालीं सौ. रमाबाई व त्यानंतर पुढें थोडक्याच काळांत नानासाहेब आणि जिच्यावर त्यांचा जीव होता अशी त्यांची थोरली

मुलगी ही एकामागून एक वारल्यामुळें तर त्यांच्या घराला यथार्थपणें एकाद्या आश्रमाचें स्वरूप आलें.

पत्नीच्या मृत्युसंबंधानें त्यांनीं स्वतःच दोन ठिकाणीं लिहून ठेविलें आहे. " माझ्या बायकोला ( दामले कुलोत्पन्न रमा इला ) आषाढ शु॥ १० मंगळवार रोजीं ज्वर फार आला ( १५ । ७ । १९०२ कर्के ४ दिने ) व अतिसार झाला. शुक्रवारीं अतिसार व वांति फार झाली, परंतु पहाटेस म्ह० उजाडता शनिवार सर्व कमी झाली व घायाळ होऊन गेली, व मोठ्यानें पहाटेस एकवार उसासा येऊन ओरडून उठली, व निश्चेष्ट पडली. दुसरे दिवशीं सावध झाल्यावर तिनें सांगितलें कीं नेण्याकरतां मंगळवारपासून चार दिवस मंडळी आली, व खालीं झोंपाळ्यावर बसत होते. परंतु श्रीस्वामी हातांत सोटा घेऊन मजजवळ बसत असल्यामुळें ते लोक अंगास हात लावीत नसत. शुक्रवारीं जेव्हां ते लोक मान धरून ओढूं लागले, तेव्हां स्वामींनीं सोटा त्यांना मारला, व ते पळून गेले, व पुन्हा आले नाहींत. श्रीस्वामी दिवाणखान्याचे सज्ज्यांत हिंडताहेतसें दिसलें. आषाढ शु॥ पौर्णिमा रविवार ता० २० । ७ । १९०२, रोजीं मी **सुंदरलाल, बागल** इत्यादि श्रीआळंदीस गेलों. कर्के भौमे व॥ ९ दिने ( २९ । ७ । १९०२ ) प्रातः सुमारें ८ । ३० वाजतां बायको श्रीचरणीं स्वानंदीं गेली. घराबाहेर नेण्यापूर्वीं सुंदरलाल व विनायक आठवले यांनीं फोटो काढले, व बागलूनें गोठ्याकडे बोलावून नेऊन सांगितलें कीं चार आण्यांचा हार आणवून श्रीमहाराजांची पूजा करा. त्यावरून लक्ष्मण आपट्याकडून पूजा केली, प्रेत नंतर नेलें. "

याच प्रसंगाला जोडून एक चमत्कारिक योगायोग झालेला त्यांनीं लिहिला आहे. " रा. माधवराव दांडेकर हे जुन्नरास जूनचे आरंभापासून कमळाकर हरी साठे बी. ए. यांचे येथें जाऊन राहिले होते. तेथें त्यांनीं ता० २५ । ७ १९०२चे सुमारास स्वप्नांत पाहिलें कीं स्वामीमहाराज आमचे ओट्यावर उभे आहेत, व खालीं रस्त्यावर एक ब्राह्मण दर्भ हातांत घेऊन उभा आहे. त्यास महाराज बोलले कीं " येथें तुमचें काम नाही, हें मनुष्य आमचें आहे, याची क्रिया सांगणें वगैरे सर्व आमचेकडे आहे. " तरी तो उभा राहिलेला मनुष्य जाईना. तेव्हां महाराजांनीं त्यास धक्के मारून घालविला, व आंत येऊन झोंपाळ्यावर बसले. ही गोष्ट त्यांनीं कमळाकराचे आई वगैरेपाशीं दुसरे

दिवशीं सांगितली, व कोणावर गदा येत आहे, या विचारांत पडले. इतक्यांत आमची बायको आजारी असल्याचें त्यांस माहीत नव्हतें, त्यांस तिला देवाज्ञा झाल्याचें कळलें. या स्वप्नांत व बायकोस श्रींचें झालेल्या दर्शनाच्या प्रकारांत फार साम्य आहे......२९।९१९०२"

अण्णासाहेब सांगत असत कीं, "आपण तीस महाराजांचें नांव घेण्यास सांगावें, परंतु तें नांव मोठें व कठीण म्हणून तिला घेतां येऊं नये. तेव्हां तिनें म्हणावें कीं, "तुमच्या महाराजांचें नांव मोठें लांबच लांब, माझ्या तोंडाला नाहीं येत." त्यावरून अण्णासाहेबांच्या सांगण्याप्रमाणें त्या शिवपंचाक्षरीचा जप नेहमी करीत असत. अंतकाळीं त्यांना महाराज जवळ बसले आहेत असें वाटे, व त्यामुळें बाहेरच्या कोणत्याही पदार्थाकडे न पाहतां डोळें मिटून त्या दर्शनाच्या आनंदांत पडून रहावें, असें त्यांना वाटे. अण्णासाहेब सांगत, "ती सांगे 'डोळे उघडले म्हणजे इतर माणसें कशीं माकडासारखीं वाटतात. डोळे मिटले म्हणजे महाराज जवळ बसलेले दिसतात व जिकडे तिकडे मोठी प्रभा भरून गेलेली दिसते.' त्यावरून 'माझ्या महाराजांचें नांव मोठें कठीण म्हणून घेत नव्हतीस ना? पण अखेरीस तेच तुझ्याजवळ आले कीं नाहीं?" अशी आपण त्या प्रसंगींही थट्टा केल्याचें ते सांगत.

बागलु हा अण्णासाहेब यांचा नातु म्हणजे त्यांच्या मुलीचा (सौ. मथुताईचा) मुलगा. त्याच्यावर अण्णासाहेबाचा अत्यंत जीव होता, आणि या 'वज्रादपि कठोर' कातळांत हा मधुर पाण्याचा झरा मध्येंच कोठून आला, याचें अण्णासाहेबाचा चांगलाच परिचय असणाऱ्यांना नवल वाटे. लहानपणापासून त्यांनीं त्यांनला वागविलें. एक क्षणभरही त्याला कधीं विसंबिलें नाहीं. कौटुंबिक माया अण्णासाहेब यांच्या अंतःकरणास कधीं शिवली असेल असें वाटत नाहीं. मग इतका जीव असण्याचें काय कारण असेल तें असो. एक गोष्ट मात्र खरी कीं, "बागलूचे मुखानें महाराज बोलतात" अशी त्यांची खात्री होती, व त्या विषयींचें २।३ अनुभवही ते एकादे वेळेस सांगत. त्यांतीलच हा वर सांगितलेला एक होय. यावेळीं त्या मुलाचें वय फार झालें तर ७।८ वर्षांचें असावें. अशा वेळीं इतर शुभ प्रसंगीं ज्याप्रमाणें महाराजांचें अदृश्य रीतीनें प्रत्यक्ष अस्तित्व असतें त्याचप्रमाणें असल्या महत्त्वाच्या प्रसंगींही महाराज हजर असलेच पाहिजेत, आणि त्यांची पूजा झाली पाहिजे, एवढी कल्पना त्याच्या डोक्यांत यावी

असें खरोखर त्याचें वय नव्हतें. परंतु अण्णासाहेब यांना मुद्दाम एकीकडे बोलावून नेऊन त्यानें सांगितलें कीं, " चार आण्यांचा हार आणून आधीं महाराजांची पूजा करा, आणि मग इतर गोष्टी करा " हें खरोखरच चमत्कारिक आहे.

अशाच त्याच्या एक दोन गोष्टी आण्णासाहेब सांगत. एकदां चौकांतील झोंपाळ्यावर आण्णासाहेब व इतर कांहीं मंडळीं बसली होती, "आणि श्रीगुरुचरित्र या ग्रंथाची सायंदेवाच्या घराण्यांतून अस्सल प्रत मिळवावी व तो ग्रंथ शुद्ध करावा, कारण त्याच्यामध्यें अशुद्धें वरींच झालेलीं आहेत, " अशी वाटाघाट चालली होती. जवळच चौकाचें दाराशीं असलेल्या घडवंचीवर बागलू ऊर्फ दग्या बसलेला होता. त्यावेळेस त्याची मुंजही झालेली नव्हती. दोन पाय हालवीत कांहीं तरी नादांत बसलेल्या त्या नागव्या पोरास या विषयांत लक्ष लागावें असें कांहींच नव्हतें, व त्याचें महत्त्वही कळणें शक्य नव्हतें. त्यानें तें भाषण नीट लक्ष देऊन ऐकलें किंवा नाहीं तें सांगतां येत नाहीं, परंतु मंडळींच्या भाषणांत या कामाकरितां अण्णासाहेब यांनीं गाणगापुरास जावें असें ठरून, जेव्हां अण्णासाहेबानीं ते कबूल केलें, तेव्हां या बावळट मूर्तीच्या तोंडून असे शब्द निघाले कीं, " दारू आणि माती एका ठिकाणीं करून पेटविली, तर दारू जळून जाते, आणि माती खालीं रहाते. " आपण ग्रंथ वाचावा, महाराजांचे शब्द असतील ते काम करतील, बाकीचे नुसते वाचले गेले म्हणून काय नुकसान झालें ? असा त्यांचा आशय होता. इतके शब्द उच्चारून स्वारी तेथून पळून गेली. मात्र अण्णासाहेब यांच्या लक्षांत तो प्रकार आला, व त्या सूचनेप्रमाणें त्यांनीं पुढें तो बेत सोडून दिला. प्रासादिक ग्रंथासंबंधीं तसा विचार फिरून केव्हांही त्यांच्या डोक्यांत आला नाहीं.

अशीच गोष्ट धुळ्यास घडली. बुवासाहेबांच्या पहिल्या पुण्यतिथीस अण्णासाहेब गेले तेव्हां बागलूही बरोबर होताच. रीतीप्रमाणें प्रसाद घेण्यापूर्वीं अण्णासाहेब यांनीं समाधीपुढें कांहीं रक्कम ठेविली. परंतु आळंदीस महाराजांपुढें ठेवीत त्यापेक्षां ती रक्कम कमी होती. बुवासाहेबांचा आधिकार मोठा असून वस्तुतः आळंदी, धुळें आणि पुणें, या तीनही स्थळीं एकच दैवत नांदतें, असा लोकांस धडा शिकवावा, म्हणून म्हणा किंवा इतर कांहीं कारणानें म्हणा, दुसऱ्या दिवशीं पहाटेस जागे झाल्यावर अण्णासाहेबांकडे येऊन बागलू सांगू

लागला कीं, 'आतां बुवासाहेब माझ्याजवळ आले होते, व म्हणूं लागले कीं, आळंदीस अमूक रक्कम ठेवतां, येथेंही तीच ठेवीत जा.' या वेळीं देखील त्याचें वय ५।६ वर्षांचेंच होतें, आणि अण्णासाहेबांच्या व्यवहाराकडे लक्ष जाण्याचेंही कारण नव्हतें.

असेंच एकदां रा. माधवराव मोडक आणि अण्णासाहेब टांग्यांत बसून आळंदीस जात असतां मोडकांनीं अण्णासाहेबास विचारलें कीं, "काय केलें म्हणजे महाराज बोलूं लागतील ?" तेव्हां यानेंच एकदम उत्तर दिलें कीं 'सकाळीं जेवून राम नारायण किंवा महाराज असलें कांहीं नांव मुखानें घ्यावें, म्हणजे महाराज बोलूं लागतील. मात्र नांव मनांत घ्यावें म्हणजे बरें." यावरून मोडकांनाही अतिशय आश्चर्य वाटलें, आणि 'त्यावरून आपण त्यांना प्रज्ञावर्धन स्तोत्राची हकीकत सांगून महाराजांच्या अस्तित्वाची खात्री करून दिली, व दुसरे दिवशीं स्वतःच्या हातानें त्याची एक प्रतही करून दिली," म्हणून त्यांनीं लिहून ठेवलें आहे. असो.

मद्रासेस जाण्यापूर्वींपासूनच पत्नीशीं यांचा संसारसंबंध जवळजवळ तुटल्यासारखाच झाला होता. तेव्हां सौ. रमाबाईच्या जाण्यानें यांच्या आयुष्यक्रमांत कांहीं विशेष फरक झाला, असें मुळींच नाहीं. मात्र कुटुंबाचा सर्व गाडा हांकण्याचें काम यांच्या मुलीवरच येऊन पडलें. सुमारें सात वर्षें तें शक्य तितक्या उत्तमरीतीनें करून ती थोर आणि उदार अंतःकरणाची स्त्रीही यांना सोडून गेली. मात्र एक झालें कीं, त्यापूर्वीं थोडे दिवसच बाबासाहेब यांचें लग्न होऊन सून घरांत आली होती. बाबासाहेब यांचें त्यावेळच्या रीतीप्रमाणें व पटवर्धनांच्या घराण्यास साजेलशा रीतीनें पूर्वींच लग्न होऊन जावयाचें, व त्याप्रमाणें नानासाहेबांनीं पुष्कळ अट्टाहासही केला; परंतु काय कारण असेल तें असो, अण्णासाहेब यांनीं ही गोष्ट केव्हांही मनावर घेतली नाहीं. बाबांची आई तर त्याच्या लग्नाविषयीं तडफड करतांकरतांच मरून गेली. 'याचें लग्न तुमच्या हातून होणार नाहीं' असें अण्णासाहेबास उद्वेगानें म्हणण्यापलीकडे तिच्या हातांत कांहींच नव्हतें. परंतु नानासाहेब घरांत कर्तेसवर्ते होते, आणि त्यांचा बाबासाहेबांवर जीवही होता. किंबहुना बाबासाहेबास जन्म मात्र अण्णासाहेबांनीं दिला, परंतु त्यांचें सर्वप्रकारें संवर्धन नानासाहेब यांनींच केलें. त्यामुळें अर्थातच मुलगा एवढा वाढून एल्. एल्. बी. झाला, तरी त्याच्या लग्नास

ठिकाण नाहीं, म्हणून तेही फार चडफडत. अखेरीस अण्णासाहेब यांस न सांगतांच त्याचें लग्न उरकून घ्यावें, असाहि विचार करूं लागले. परंतु रागाच्या आवेशांत कांहींही बोलले तरी अण्णासाहेब यांची अवज्ञा करण्याची त्यांची हिंमत नव्हती, म्हणून तेही अखेरीस तसेच चालते झाले.

नानासाहेब यांच्या जाण्यानें मात्र अण्णासाहेबांस कुटुंबांत खरे एकटे पडल्यासारखे झाले. कारण नानासाहेब यांचा अण्णासाहेबावर तसाच जीव होता. असें कांहीं म्हणावयास हरकत नाहीं कीं नानासाहेब होते, म्हणून अण्णासाहेब हे संसारी माणसाप्रमाणें थोडेंसे नीट रहात असत. अण्णासाहेबांस काय आवडतें, व काय लागतें, याचें धोरण ठेवून मुकाट्यानें तसें करणें, ही नानासाहेबांच्या सुखाची एक मोठीच गोष्ट होती. प्रापंचिक अडचणींनीं त्रासून गेल्यामुळें ते अण्णासाहेब यांस वाटेल तसे बोलत. परंतु तुकाराममहाराजांच्या उक्तीचा आधार घेऊन अण्णासाहेबांवर अनेक प्रकारचीं ओझीं लोक ठेवूं लागले कीं त्यांचा जीव थोडथोडा होत असे. या लोकांतील आर्त असें खरोखर थोडेंच असावयाचे, व पुष्कळसे स्वार्थसाधुच असत. "या लोकांमुळें अण्णासाहेबांस फार त्रास होऊन त्याचे हाल होतात," म्हणून त्यांना अशा लोकांचा मनापासून तिटकारा येई, व त्यामुळें अशा लोकांवर कोश धुंडूनही सांपडणार नाहीं, असल्या शिव्यांची लाखोली वाहाण्याचें त्यांचेकडे एक कामच होतें. त्या लोकांमिळतीं अण्णासाहेब आपला वेळ फुकट घालवितात, व संसाराकडे एकादा तासही न देतां कुटुंबांतील माणसांचे हाल करतात, म्हणून अण्णासाहेबांचीही हजरी घेण्यास ते कमी करीत नसत. परंतु दुसरीकडे पहावें तों, अण्णासाहेब यांचा शौचकूप धुवून काढण्याचाही त्यांचा नित्य नेम होता. अशा स्थितींत बाबाच्या लग्नासारख्या सामान्य गोष्टींत अण्णासाहेबांनीं त्यांना नाराज केलें याविषयीं अशी समजूत आहे की, बाबास मोठें थोरलें गंडांतर असल्याचें अण्णासाहेब यांस कळलें होतें, व तें टळून जाईपर्यंत त्यांनीं मुद्दामच लग्नाची गोष्ट लांबणीवर टाकली. या समजुतींत किती तथ्य असेल कोण जाणें, परंतु एक गोष्ट मात्र खरी की १९०५ सालीं बाबासाहेब यांस फार मोठें दुखणें होऊन त्यांची सर्वांनीं आशा सोडून दिली होती, अशा स्थितींत त्यांचा पुनर्जन्म झाला. त्यानंतर पुढें लाग-

लींच सांगून आलेल्या एका मुलीस अण्णसाहेब यांनीं रुकार दिला, यामुळें ही समजूत दृढ होते.

त्यांच्या वर्तनांत अशा प्रकारचे कांहीं योग दिसून येत हें खरें. त्यावरून मंडळींनीं अंदाज बांधावयाचा इतकेंच. खरें काय असेल तें कोणास कळणार ? शास्त्राप्रमाणें होतां होईल तों वागण्याचा त्यांचा कटाक्ष असल्यामुळें त्यांची दाढी व केंस नेहमींच वाढलेले असत. श्मश्रूचा प्रसंग सटीसामासी कधीं तरी यावयाचा, आणि कित्येक वेळेस तर, दिव्याच्या उजेडांत श्मश्रूचा समारंभ होई ! परंतु तो असा केव्हां तरी होत असे. १९०८ सालीं जेव्हां लोकमान्यांना शिक्षा झाली, तेव्हांपासून मात्र हा प्रसंग पुन्हा केव्हांही घडला नाहीं. यावरूनही पुष्कळ लोकांनीं असा अंदाज केला कीं, लोकमान्यांनीं सुखरूप परत यावें, म्हणून हें व्रतपालन अण्णासाहेब यांनीं केलें. आणि तो तरी चुकीचा आहे, असें कसें म्हणावें ? कारण दुसराही एक असाच योग पाहण्यांत आला. श्रीमहाराजांच्या स्वात्मसौख्य या ग्रंथावर अण्णासाहेब यांची फार श्रद्धा होती. ते त्याची योग्यता वेदवाणीप्रमाणें समजत असत. श्रीगुरुचरित्राप्रमाणें या ग्रंथाचींहीं पारायणें करणाऱ्याच्या कामना पूर्ण होतात, असा त्यांचा विश्वास होता. हा ग्रंथ त्यांच्या नित्यक्रमामध्यें होता. परंतु त्यांचा नियम असा रोज केवळ " एका ओवी वाचनीया " इतका बारीक होता. आणि त्याप्रमाणें ते थोड्याशा ओव्या रोज वाचीत. सन १९१४ सालीं लोकमान्यांना बुधवारीं मध्यान्ह रात्रीं सरकारनें पुण्यांत आणून घातलें. व लागलींच ती बातमी सर्व गांवभर पसरली. त्याप्रमाणें डॉ० हरीभाऊ साठेही अण्णासाहेबांस वर्दी द्यावयास आले. परंतु अण्णासाहेबांना ही खबर लोकमान्यांची मोटार घरीं पोहोंचण्यापूर्वींच मिळून गेली होती ! त्यामुळें लहान पोराप्रमाणें त्यांना मोठा हर्ष होऊन निजलेल्या माणसांना जागे करून, 'अरे, बळवंतराव आले !,' म्हणून ते सांगत सुटले ! 'महाराजांनीं मोठी कृपा केली,' असें समाधानपूर्वक म्हणून त्यांनीं मंडळींना " वाड्यांत जाऊन त्याला पाहून या " म्हणून सांगितलें आणि आपण स्वतः श्रीस्वात्मसौख्याची पोथी सोडून पाठ करीत बसले. यानंतर कित्येक दिवसपर्यंत तो ग्रंथ सबंध वाचावयाचा त्यांचा नेम होता. त्यावरून लोकमान्यांच्या क्षेमकल्याणाकरितांच तें अनुष्ठान होतें, असें कोणी अनुमान केल्यास तें चूक होणार नाहीं, असो.

कोणच्याही कां निमित्तानें होईना आईस व चुलत्यास पोराच्या लग्नाची हौस न पुरतांच जावें लागलें, व स्वतः बाबाही लग्नाचे विचार सोडून इराण किंवा खाल्डियासारख्या एकाद्या ठिकाणीं, पुराणवस्तुसंशोधनासारख्या आपल्या आवडत्या विषयाचा अभ्यास करण्याकरितां जावयाचा विचार करूं लागले. तेव्हां कुठें लग्नाचा विचार यांचे डोक्यांत आला, व त्याप्रमाणें सांगून आलेल्या एका मुलीला त्यांनीं रुकारही दिला. 'तुझें लग्न ठरवीत आहे,' असें त्यांनीं बाबाला स्वतःच सांगितलें. परंतु कांहीं कारणानें तें लांबून त्यावेळीं न होतां एका वर्षानें झालें.

मध्यंतरीच्या काळांत स्वदेशी चळवळीला ऊत येऊन सुरत कॉंग्रेस वगैरे प्रकरणें झालीं व त्यामुळें व्याख्यानें व सभा यांनाही ऊत आला. त्यांतील मोठमोठ्या गोष्टींशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें यांचाही संबंध येऊन व्यापही वाढत गेला. त्यामुळें दोन दोन चार चार दिवसांत खाण्यासही फुरसत मिळूं नये, अशी स्थिति झाली! याच सुमारास कांहींतरी राजकीय मसलती उभारण्याच्या त्यांच्या जन्मजात स्वभावानें पुन्हा थोडी उचल खाऊन, परदेशगमनाचाही एक योग आला होता. परंतु दयाळु सरकारच्या धोरणानें तोही वांया गेला. त्याची साद्यंत हकीकत कळणें अशक्य आहे; परंतु लोकमान्यांनीं व यांनीं अफगाणिस्तानांत जावें, आणि शिक्षणविषयक कांहींतरी प्रोपगांडा तेथें सुरूं करावा, असें त्याचें दृश्य स्वरूप होतें. या वर्षीं अफगाणिस्थानच्या माजी अमीरांची स्वारी हिंदुस्तानच्या प्रवासास आली होती. मुंबईस येऊन अशा रीतीनें कां होईना, या अवदालीच्या वंशजानें पुण्यास आपले पाय लावले. कालाच्या अघटित घटनेनुसार पुण्याच्या लोकांनींही त्याला मानपत्र द्यावयाचें ठरविलें होतें. सार्वजनिकसभेच्या मार्फतच तें दिलें जावयाचें होतें आणि तें काम अण्णासाहेब व लो० टिळक यांच्याचकडे होतें. मानपत्र अर्पण केल्यावर अमीराशीं कांहीं खाजगी भाषण करावें, आणि त्यांत जर आंकडे पटले, तर पुढील कार्यक्रमाकरितां स्वतः अण्णासाहेबांनीं व लो० टिळकांनीं काबुलास जावें अशी एकंदर योजना होती. त्याप्रमाणें, हिंदुस्तानच्या या दोस्ताचें स्वागत करण्याकरितां लो० टिळक, अण्णासाहेब व इतर नागरिकही हारतुऱ्यांचा पाट्या घेऊन मारे स्टेशनवर गोळा झाले. परंतु पुण्याच्या लोकांची आणि अमीराची अशी प्रत्यक्ष गांठ घालून देणें सरकारला कोठून आवडणार?

पुण्याच्या स्टेशनवर अमीरास उतरविण्याची सारी तयारी असून खडकीवरच त्यास उतरून घेण्यांत आलें. आणि मोटारींतून परभारें छावणीकडे त्याची रवानगी झाली ! त्याच्यानंतर सार्वजनिक सभेचें मानपत्र पोष्टानें त्यास पाठविण्यांत आलें, व त्याचा साभार स्वीकार केल्याचें अमीराकडूनही रीतसर पत्र आलें. त्यानंतरही, 'यांना भेटण्याची इच्छा आहे' म्हणून अमीराकडून एक तार आली. परंतु योगायोगानें असो, अथवा कांहीं कारवाईनें असो, तार पोहोंचविणाऱ्या सोजीराचा घोंटाळा झाला, व पटवर्धनांची पुण्यांतील इतर घरें धुंडून रात्रीच्या अडनाडया वेळीं त्यानें ती अण्णासाहेबांस आणून दिली. त्यावेळीं कितीही त्वरा केली तरी ठराविक वेळीं भेट घेणें शक्य नव्हतें. म्हणून सरते शेवटीं ती कल्पना वांया गेली. ही कल्पना काय असावी हें सांगणे कठीण आहे. तरी एवढें मात्र खास कीं एवढया मोठया प्रस्थांनीं उपस्थित केलेली कल्पनाही तशीच कांहींतरी जबरदस्त असली पाहिजे. ही केवळ लोकवार्ता अथवा दंतकथाही नाहीं. खुद्द अण्णासाहेबांनीं स्वतःच ही गोष्ट सांगितली, व त्यावर "त्यावेळीं काबुलांत गेलों असतों तर महाराजांच्या उत्सवांचें कसें केलें असतें ?" असा प्रश्नही त्यांना विचारला होता. असो.

यानंतर पुढें लागलीच सुरतची प्रसिद्ध कॉंग्रेस झाली. या कॉंग्रेसमध्यें कांहींतरी तंटा होणारच, असा अंदाज असल्यामुळे अण्णासाहेबांचेंही तिच्याकडे थोडें जास्त लक्ष लागलें होतें, व जरी ते स्वतः कॉंग्रेसला गेले नाहींत, तरी आपल्याकडे येणाऱ्या लोकांत तिच्यासंबंधानें उत्साह उत्पन्न करून आणि कित्येकांना तर जाण्याचाही अगदीं आग्रह करून, त्यांनीं बरीच मदत केली.

सुरतच्या कॉंग्रेसनंतर सुप्रसिद्ध अरविंद बाबूंची स्वारी पुण्यास आली होती. त्यावेळीं गायकवाडवाड्यांत त्यांची व यांचीं गांठही पडली होती. बंगाली लोकांची बुद्धिमत्ता व कर्तृत्व वगैरेंच्याविषयीं जरी आण्णासाहेब यांचें मत चांगलें होतें तरी देखील त्यांच्यांत दिखाऊपणा फार असून पाश्चात्य पगडा त्यांच्यावर ज्यास्त असल्याकारणानें त्यांच्या सर्व गोष्टींत मूळ वैदिक कल्पनांचे भाव उमटत नाहींत असें त्यांचें मत होतें. महाराष्ट्रांच्या बाहेरील प्रसिद्ध लोकांपैकीं स्वामी विवेकानंद, अरविंद घोष, आणि महात्मा गांधीं या तिघांसही आण्णासाहेब यांनीं पाहिलें होतें, व थोडेबहुत भाप्प

प्रसंगही झाले होते. पैकीं म० गांधी यांस " चांगला, परंतु अखेरीस शामळोच, " म्हणुन त्यांनीं शेरा देऊन ठेवला होता. विवेकानंद यांची कामगिरी व मर्दपणा ही त्यांना आवडत, परंतु हिंदुस्थानची राष्ट्रीय उन्नति अमेरिकेंतील पैशावर घडवून आणावी, ही त्याची कल्पना त्यांना इतकी मूर्खपणाची वाटे की सौम्यपणानें तें त्याला नेहमी 'खुळा' म्हणुन म्हणत असत; आणि त्याचें कारण एवढेंच असावें कीं, पाश्चात्य संस्कृतीचा झगझगाट डोक्यांत थोडा तरी शिल्लक असल्यामुळें त्यांना त्या लोकांची खरी 'प्रकृति' केव्हांच समजली नाहीं. सन १९१२ सालीं Myron Felps या अमेरिकन गृहस्थाबरोबर झालेल्या भाषणांत अखेरीस त्याच्याच तोंडून अण्णासाहेब यांनीं या गोष्टी वदवून घतल्या. खुद्द विवेकानंद यांची कल्पना फोल ठरून अमेरिकेंतून त्यांना हवा तो पैसा मिळाला नाहीं, व त्यांनीं उत्पन्न केलेल्या संस्था या 'मिलिटंट हिंदुइझम्' ची उपज करणारे कारखाने होण्याऐंवजी सोशल सर्व्हिस आणि पुस्तकप्रकाशन यांच्या मर्यादित क्षेत्रांतच पडून राहिल्या, हें पाहिलें, व त्यांच्या खुद्द *पट्ट शिष्यिणीनेंच "स्वामींची कल्पनाच चुकीची होती, कां तें काम त्यांच्याकडे नव्हते ?" असा प्रश्न उपस्थित केलेला पाहिला, म्हणजे हा शेरा किती सार्थ होता, हें दिसून येईल.* अरविंदबाबूविषयीं असें स्पष्ट मत त्यांचेकडून ऐकण्याचा कधीं प्रसंग आला नाहीं. परंतु एकंदरींत या दोघांच्या मानानें अरविंदाविषयीं त्यांचें मत ज्यास्त अनुकूळ असावेसें वाटतें.

---

* Was his life indeed a failure, as he was sometimes tempted to feel it, since there never came to his hands that " twenty million pounds " with which, as he used to say, he could have set India on her feet ? Or were there higher laws at work, that would eventually make a far greater success than any that could have been gathered within a single lifetime ?

' *Master as I saw him.* ' *P. 57*,

सुरत काँग्रेस नांतरचे ५।७ महिने महाराष्ट्रास बरेच गडबडीचे गेले. त्या धामधुमींतच जून महिन्यांत बाबासाहेब यांचें लग्न झालें. त्या वेळेस दे. भ. शिवरामपंत परांजपे यांच्यावरचा खटला सुरू होता, व त्या कामाकरितां लोकमान्यांस मुंबईस जावयाचें होतें. आण्णासाहेबांच्या येथें लग्नाची मेजवानी जेवून रात्रीच्या गाडीनें मंडळी मुंबईस गेलीं. राजकीय व सामाजिक वगैरे बाबींसंबंधानें अण्णासाहेबांविषयीं कोणाचें कांहींही मत असो, त्यांच्याविषयीं आदर आणि पूज्यबुद्धि हीं पुण्यांतील सर्व पक्षांच्या आणि सर्व दर्जांच्या लोकांत सारखीच असल्यामुळें, ही लग्नाची मेजवानी म्हणजे एक विशेष प्रसंग होता. पुण्यांतील सर्व पक्षांचीं आणि सर्व दर्जांचीं निमंत्रित मंडळी व इतर प्रांतांतील रा. दादासाहेब खापर्डे, वगैरे पुढारीही या मेजवानीस आले होते. मवाळ, जहाल, वगैरे पक्षांतील पुढारी एका ठिकाणीं बसून थोडासा काळ आनंदानें घालविल्याचा असा प्रसंग पुण्यांत पुन्हा केव्हांही आला नाहीं, व रा० हरि नारायण आपटे, आणि लो० टिळक यांची एक पंगत पुन्हा कोणी पाहिली नाहीं. पुण्यांतील त्या वेळेचे बल्लवश्रेष्ठ भिकोबा यांच्या कुशलतेमुळें डाळवांगेंही फारच सुंदर जमलें होतें, व सर्व लोकांनीं संकोच सोडून त्यावर यथेच्छ ताव मारल्यामुळें पंक्तीस रंगही पुष्कळ आला होता. या प्रसंगाची आठवण अण्णासाहेब यांस नेहमींच होत असे, व "पुण्यांतील निरनिराळ्या लोकांची ती एक कॉन्फरन्स होती" असें म्हणून ते त्याचें मोठ्या विनोदानें वर्णन करीत असत. पुण्यांतील सामान्य–लोकांचाही अण्णासाहेबांच्याविषयींचा आदर व त्यांच्यावरील विश्वास दिसून येण्याचा पुढें लौकरच प्रसंग आला.

लोकमान्यांच्या खटल्याचा निकाल होऊन त्यांची मंडालेस रवानगी झाल्याची बातमी चोंहीकडे पसरतांच लोकांचीं मनें अतीशय क्षुब्ध झालीं, व मुंबईस तर बराच मोठा दंगा होऊन गोळीबारापर्यंत मजल गेली. अशा वेळीं लो०च्या पुण्यानें खुद्द मूग गिळून बसावें ही गोष्ट कांहीं कमी विलक्षण नाहीं. कारण त्या वेळेला, बायकांप्रमाणें रुसून परकीय सत्ताधिकाऱ्यांस वठणीवर आणतां येतें, हें अद्भुत गीतारहस्य कोणी महात्म्यानें त्यांना ऐकविलें नव्हतें; अथवा कोणी ऐकविलें असल्यास तें पचनीं पडण्याइतके त्यांचे मेंदूही थंड नव्हते. ही बातमी पुण्यास येतांच जिकडे तिकडे मोठाच क्षोभ झाला, व लोकांचे

थवेच्या थवे जमून, या सरकारी अविचाराचा प्रतिकार करण्याकरितां वाटेल त्या कल्पना निघूं लागल्या. परंतु त्या प्रक्षुब्ध स्थितींतही ज्याचा सल्ला आपणास विचारला पाहिजे, व जो आपल्या कल्याणाची निरंतर चिंता करीत असल्यामुळें त्याच्या सल्ल्याप्रमाणें वागण्यांत आपलें हित आहे, असा एक वडील माणुस घरांत आहे, याची त्यांना आठवण झाल्याखेरीज राहिली नाहीं. हां हां म्हणतां अण्णासाहेब यांच्या घराभोंवतालची जागा व चौक वगैरे जनसमूहानें भरून गेले, व त्यांतील शिष्ट शिष्टांचा दिवाणखान्यांत शिरकाव होऊन जो तो अण्णासाहिब यांस "आतां आम्हीं काय करावें ?" म्हणून विचारूं लागला. एक शद्ब जर त्या वेळेस अण्णासाहिब यांनीं अधिक उणा काढला असता अथवा दोन समाधानाचे शद्ब अधिकारवाणीनें सांगितले नसते, तर साऱ्या पुण्यास आग लागून गेली असती, व त्याच्या ज्वाळा आणखीही किती पसरल्या असत्या, कोणीं सांगावें ? परंतु या सर्वही गोष्टींच्या ते विरुद्ध असल्यामुळें यापैकीं कांहींही न करतां त्यांनीं बाहेर येऊन चार साध्या शद्बांनीं लोकांचीं अंतःकरणें थोडीं शांत केलीं, व त्या कालीं उचित असें त्यांचें कर्तव्य करण्यास त्यांस घरीं धाडून दिलें. त्यामुळें पुण्यांतील एक मोठा अनर्थ टळला. या गोष्टीची लोकांस नसली तरी सरकारी अधिकाऱ्यांस खास जाणीव असेल. पुढें लौकरच अनंत चतुर्दशीच्या गणपतीविसर्जनास ज्या वेळेला अत्याचार होण्याच्या भीतीमुळें कलेक्टरकडून परवानगी मिळेना, तेव्हांही पुण्यांतील सर्व लोकांची हमी आपल्याकडे घेऊन अण्णासाहेब यांनीं त्या उत्सवाची वाट चालू केली. असो.

या वर्षांतील विशेष गोष्ट म्हणजे रावबहादूर गणेश व्यंकटेश जोशी, आणि अण्णासाहेब यांचा जडलेला स्नेह. रा. ब. जोशी हे त्यांच्या जबर व्यासंगामुळें व लेखनव्यवसायामुळें सुप्रसिद्धच आहेत. केर हार्डी यांनीं Living Statestical Encyclopaedia म्हणुन त्यांचा मोठा गौरव केला होता, व ज्या ज्ञानाच्या जोरावर नामदार गोखल्यांनीं आपला लौकिक संपादन केला, तें त्यांनीं जोशीबुवांच्या पायापाशीं बसूनच मिळविलें होतें, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. यांचा जन्म सरकारी नौकरींत गेला, परंतु पाण्यामधुन कमळाचें पान बाहेर काढावें, तसें सरकारी नौकरीच्या दुष्परिणामांचा लेप न होतां तें बाहेर पडलें. यांचा स्वभाव शांत, सरळ, निर्भीड, एकमार्गी, आणि मोठा कडक व करारी होता. सारीं

कामें ठरलेल्या शिस्तींत चालवयाचीं, त्यांत गव्हर्नरच्या एकाद्या विनंतिपासून तों घरचीच्या आग्रहापर्यंत कांहींही असो, खंड म्हणून पडावयाचा नाहीं. व्यासंगाकरितांच व्यासंग करावयाचा, अशी विद्येची खरी गोडी आणि लौकिकाचा तिटकारा, हीं स्वभावतःच यांचे ठिकाणीं असल्यामुळें, सतत इतका दीर्घोद्योग करूनही, जवळ जवळ अखेरपर्यंत यांची योग्यता कोणासही उमगली नाहीं. जें शुद्ध बुद्धीला पटेल तेंच करावयाचें असा यांचा धारा होता. एकदां पटलेली गोष्ट धरून ठेवण्याची चिकाटी जितकी जबरदस्त, तितकीच एकादी गोष्ट बुद्धीला पटणेंही कठीण होतें. असा हा नामदार गोखल्यांचा गुरु त्या वेळच्या मवाळ पक्षांचा एक मोठा जोर होता. नुकतेंच यांनीं पेन्शन घेतलें होतें, व उरलेलें आयुष्य मोकळ्या हातानें देशकार्याला देऊन टाकण्याचा त्यांचा विचार होता. जर हे त्याच वेळीं मवाळ पक्षास मिळते, तर कदाचित् तो पक्ष इतका लेमळा बनला नसता, कारण मवाळच तर काय पण जहाल पक्षांतीलही ज्वलत्जहालांनीं मान खालीं घालावी, एवढें सत्कर्म धैर्य जोशीबुवांच्या अंगीं होतें. मवाळ पक्षाविषयीं लोकांत जो अनादर होता, तो पुष्कळसा त्यांच्या मताच्या युक्तायुक्ततेमुळें नसून मवाळ लोकांच्या ठिकाणीं जो कर्मधैर्याचा अभाव दिसून येई, त्यामुळेंच होता. अशा स्थितींत तीं मतें उचलून धरणारा व कोणासही खोडतां येणार नाहीं असाच शद्ब नेहमीं तोंडांतून काढणारा, जोशीबुवांसारखा पुढारी त्यांना मिळता, तर त्या पक्षाला चांगले दिवस आले असते, असें वाटतें. जोशीबुवा जहाल पक्षाकडे आल्यावर कलेक्टरकडून त्यांना ते पेन्शनदार असल्याची जाणीव करून देण्यांत आली होती. त्यावेळीं जोशीबुवांनीं असा ठोक जवाब दिला होता कीं, " ज्या दिवशीं सरकारी नौकरींतून मोकळा झालों, त्या दिवशींच कुटुंबासही एक प्रकारें राजीनामा दिला आहे. एकट्याचा माझा कांहींच प्रश्न नाहीं. पेन्शनची यत्किंचितही प्रतिष्ठा नाहीं. त्याची आठवण देऊन मला वळविण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे. सरकारास वाटेल तर तें खुशाल बंद करण्यांत यावें ! " असो.

यांचा व अण्णासाहेब यांचा तसा लौकिक परिचय पूर्वीपासूनच होता, व अण्णासाहेब हे जरी सर्व तऱ्हेनें त्यांना विचित्र वाटत असले, तरीही त्यांच्या मनांत अण्णासाहेब यांच्याविषयीं आदरही होता. यापलीकडे

दोघांत विशेष संबंध असणें शक्य नव्हतें. परंत एका लहानशा गोष्टीमुळें असा विशेष संबंध पडून जोशीबोवा यांची अण्णासाहेबांवर भक्ति बसली, व उरलेल्या थोड्याशा आयुष्यांत ते अण्णासाहेबांचे एकनिष्ठ भक्त होते. हा प्रसंग असा झाला:—सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत एका बैठकींत कांहीं वाद निघाला होता. जोशीबुवा यांस, अर्थशास्त्र वगैरे दृष्टीनें राज्यपद्धतिंत अन्याय वाटत होतेच. 'तरी ब्रिटिश राजा व राज्यकर्ते यांच्या ठिकाणीं इतका चांगुलपणा असूनही ब्रिटिश राज्यपद्धति व राजनीतिचें अंतरंग अगदीं निराळें आहे' अशी दृष्टि आलेली नव्हती. कारण त्यांच्या निर्मळ मनाला मनुष्याचा वाईट हेतु दिसत नसे. त्यामुळें वादाच्या भरांत कांहीं विधानें ते करूं लागले. तशीं तीं पुढें येणें, ज्या कामाकरितां तो वाद चालला होता, त्याच्या दृष्टीनें पथ्य नसल्याकारणानें त्यांचें तोंड बंद करणें जरूर होतें. जोशीबुवांसारखा मनुष्य दोन शब्दांत उमजणारा नव्हता. व दोनचार तास त्यांच्याशीं बोलून त्यांची खात्री पटवून देण्यास तर तेथें सवड नव्हती; अशा वेळीं यांना गप्प कसें बसवावें, असा विचार पडला. तेव्हां अण्णासाहेब यांनीं एका साध्या युक्तीचा उपयोग केला. दुसरें तिसरें कांहीं न करितां "गप्प बसाहो जोशीबुवा. तुम्हाला कांहीं समजत नाहीं." असें अण्णासाहेबांनीं धडकून सांगितलें! त्यासरशीं जोशीबुवांस तर धक्का बसलाच, पण इतर मंडळीही थिजून गेली. त्यांच्या ऐवजीं दुसरा कोणी असता, तर त्याचें तेथल्यातेथेंच वाभाडे निघाले असते. परंतु अण्णासाहेबांचें वजनच इतकें जबरदस्त होतें, कीं कोणासही जास्त कांहीं बोलण्याची हिम्मत झाली नाहीं. परंतु अण्णासाहेब यांनीं हें काय केलें, असें सर्वांसच वाटल्यावांचून राहिलें नाहीं. स्वतः जोशीबुवा तर अतीशयच तापून गेले, परंतु पुढें एक अक्षरही न बोलतां ते घरीं गेले. या गोष्टीस २ । ४ दिवस गेल्यावर एक दिवस जोशीबुवा आपल्या घरीं एकटेच बसले असतां अण्णासाहेब भेटावयास आले आहेत म्हणून त्यांना कळलें. त्यासरशीं पहिला विचार 'भेट घेत नाहीं' असें चक्क सांगून त्यांस वाटेस लावावें, असा आला. परंतु कांहीं झालें तरी एवढा मोठा मनुष्य, व आजपर्यंत कधीं घरीं न आलेला आपल्या पायानें घरीं आला आहे, त्यास हांकून लावणें

योग्य नाहीं, अशा सद्बुद्धीनें त्यांनीं 'वर येऊं दे' म्हणून सांगितलें. इतकें ते सांगत आहेत तोंच अण्णासाहेबही वर येऊन पोहोंचले, व त्यांनीं 'कां जोशीबुवा, कसें काय आहे?' म्हणून विचारलें. त्यावर त्यांनीं 'तुम्हीं आलांतच, नाहींतर मीं तुमचें तोंडही न पाहण्याचा निश्चय केला होता,' म्हणून स्पष्टपणें सांगितलें. 'म्हणूनच तर मीं आलों आहे' असें सांगून अण्णासाहेबही बसले, व त्यांनीं आपल्या त्या दिवशींच्या वर्तनाचा खुलासा करून जोशीबुवांचीं विधानें कशीं चुकीचीं होतीं, तीं त्यांनीं त्यावेळीं करणें कसें इष्ट नव्हतें, व दुसरा मार्ग नसल्यामुळें आपणास त्यांचा अपमान कसा करावा लागला, वगैरे समजून सांगून ब्रिटिश राज्य पद्धति व राजनीति आणि ब्रिटिश राष्ट्र यांचें अंतरंग सप्रमाण उघडें करून दाखविलें. दोघांचेंही पुष्कळ तासपर्यंत भाषण झालें, व त्या वेळेपासून जोशीबुवांनीं मवाळ पक्षास सोडचिठ्ठी दिली. एकदां समजूत पटल्यावर त्यांच्या मनांतील सारा राग नाहींसा झाला व अण्णासाहेब यांच्याशीं ते अशा स्नेहानें वागूं लागले कीं, त्या दिवशींच्या प्रकारानंतर "हें असें काय झालें" म्हणून सर्वांसच आश्चर्य वाटलें. सहवासानें अण्णासाहेब यांचें खरें स्वरूप हळुं हळुं जोशीबुवांस समजून आलें, व पुढें पुढें तर त्यांचा आदर इतका वाढला कीं लहानसान गोष्टींत देखील एकाद्या लहान मुलासारखें सरळपणानें 'नुसतें तुम्हीं एकदां हें पहा तरी,' असें म्हणून त्यांना दाखविल्याखेरीज त्यांनीं एकही गोष्ट केली नाहीं. एकादी साधी चार शब्दांची तार लिहून त्यांनीं यांना दाखविण्यास आणावी, व कित्येक वेळां असें देखील व्हावें कीं, अण्णासाहेब वर कामांत असल्यामुळें त्यांनीं खालीं झोंपाळ्यावर मुकाट्यानें बसून रहावें. दुसरें कोणी वर्दी द्यावयास जाऊं लागलें तरी देखील, 'छे, छे, त्यांना त्रास देऊं नका, मी आपला बसतों,' म्हणून त्यास जाऊं देऊं नये. अण्णासाहेब यांनीं म्हणावें 'अहो जोशीबुवा, तुम्हींच ना लिहिली तार ती? मग मीं तें काय पाहणार आणखी? द्या पाठवून तशीच.' त्यावर 'पाठवतों मीं, पण तुम्हीं आपलें पहा एकदां नुसतें,' असा एकाद्या लहान पोरासारखा त्यांनीं हट्ट धरावा, व अण्णासाहेब यांनीं एकदां ती वाचून 'ठीक आहे' असें म्हटलें, म्हणजे त्यांचें समाधान व्हावें, व मग त्यांनीं ती पाठवून द्यावी. जोशीबुवांची उपास्य देवताही श्रीगजाननच होती, व

चतुर्थीव्रत श्रीगजाननास दुर्वा वाहणें वगैरे नियमही ते मोठ्या आदरानें पाळीत असत. जवळजवळ तितकाच आदर अण्णासाहेब यांच्याविषयीं त्यांना वाटत असे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. जोशीबुवा राष्ट्रीयपक्षास येऊन मिळाल्यामुळें त्या पक्षास एक मोठाच लाभ झाला, व त्यानंतर झालेल्या म्युनिसिपल निवडणुकींत अण्णासाहेब व जोशी हे दोघेही बरोबरच उभे राहिले होते.

पुष्कळ वर्षांपासून अण्णासाहेब हे उभे राहत असत, व सर्वांत अधिक मतें पडून नियमानें निवडूनही येत असत; त्यांना कधीं खटपट करावी लागली नाहीं, किंवा कधीं कोणास मत द्या, म्हणून त्यांनीं एका शब्दानेंही म्हटलें नाहीं. त्यांच्या नांवाची सुपारी काढूनच ठेवावी लागे म्हणून रा. केळकरांनीं लिहिलेंच आहे. हा क्रम बारा सालच्या निवडणुकीपर्यंत चालू होता. पुढें मात्र मत देण्याच्या अधिकाराचें क्षेत्र वाढविण्यांत आल्यावरून म्युनिसिपालिटी-मध्यें काम करण्य त राम नाहीं, असें पाहून त्यांनी उभें राहण्याचें सोडलें. निवडून आल्यावरही शिक्षण खातें आपल्याकडे घ्यावयाचें, असें त्यांचें ठरलेलें असे, व तें काम ते नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अतिशय नियमानें करीत असत. ठरा-विक दिवशीं ठरलेल्या शाळा तपासावयास जावयाचें वगैरे त्यांचे नियम ठरलेले होते. या कामाकरितां म्युनिसिपालिटींतून त्यांना टांगा असे. परंतु त्याचा उप-योग ते फक्त म्युनिसिपालिटीच्या कामाकडेच करीत. त्या टांग्यांतून एकादें खाजगी काम करण्याकरितां ते कधींही गेले नाहींत. त्यांस देवदर्शनास वगैरे जावें लागे, व कित्येक वेळां असें होई कीं, जी शाळा तपासावयाची, तिच्या-जवळ त्यांचें नित्य दर्शनाचें एकादें देवमंदिर असे, अथवा ज्यास जरूर भेटा-वयाचें आहे, असा कोणी तरी गृहस्थ राहात असे; अशा वेळीं कामांत काम म्हणून तपासणें व देवदर्शन अगर त्या गृहस्थास भेटणें, अशीं कामें त्यांनीं बरोबर कधींच करूं नयेत. अशा वेळीं ते घरीं परत येत व पुन्हा देवदर्शना-करितां मुद्दाम जात! यांच्या कारकीर्दीत पगार, रजा व इतरही कित्येक सोई या दृष्टीनें गरीब मास्तर लोकांस फार सुख झालें, यांत संशय नाहीं. विशेषतः प्लेगच्या दिवसांत काम नसतां भर पगार मिळूं नये अशा कल्पना निघाल्या असतां त्या खोडून टाकून अण्णासाहेब यांनीं मास्तर लोकांची

पाठ राखिली. म्युनिसिपालिटींत काम करीत असतांनाच्या गमतीदार गोष्टी ते केव्हां केव्हां सांगत असत.

एकदां एक मास्तर यांच्याकडे आला, व दोनतीन दिवसांची किरकोळ रजा मागूं लागला. त्यानें नुकतीच रजा घेतली असल्यामुळें 'तुला पुन्हा कशाकरितां रजा पाहिजे?' म्हणून यांनीं विचारलें. तेव्हां 'कांहीं घरगुतीबाबींसंबंधानें मी अतिशय अडचणींत आहे, म्हणून त्यानें सांगितलें. अण्णासाहेब यांची गोष्ट अशी होती कीं, कोणी दुःखी, कष्टी, त्रासलेला मनुष्य पाहिला म्हणजे, कांहीं तरी निमित्तानें ते त्याच्याशीं बोलत बसत, व तेवढ्यापुरतें तरी तो आपणास विसरून जाऊन आनंदित होत असे. यांच्या भाषणाची अशी खुबी असे कीं, यांच्यासमोर अधिक उणा शब्द बोलण्याची तर कधींच कुणाची हिम्मत झाली नाहीं, इतकेंच नव्हे, तर एक प्रकारची मोठी भीति वाटत असे. परंतु ५।१० मिनिटें भाषणाचा प्रसंग घडला कीं, लागलींच मर्यादा न सुटतां दुसऱ्या मनुष्याच्या मनावरचा ताण निघून जाई, व एखाद्या जिव्हाळ्याच्या वडील माणसाजवळ आपल्या मनांतील गोष्टी ओकाव्या, त्याप्रमाणें अतिशय मोकळ्या मनानें व आपलेपणानें आपलें हृद्गत तो सांगत असे. अशा वेळीं आपण एकाद्या थोर विभूतीच्या पुढें बसलों आहों हेंहि तो विसरून जाई, व केवळ मनाचा मोकळेपणा मात्र राही. त्याचप्रमाणें थोड्याच वेळांत त्या मास्तरचीही वृत्ति खुलली व डोळ्यांत पाणी आणून तो सांगूं लागला कीं, "काय करावें? माझ्या मागें संसारांत एक मोठाच त्रास आहे. मी स्वतः मास्तर आहें, व बायकोही एका शाळेंत मास्तरीण आहे. ती चार इयत्ता शिकलेली. एरव्हीं चांगली आहे, पण तिची मिजास मोठी. एरव्हीं तर निभून जातें, पण चार दिवस पाळीचे आले, म्हणजे फार त्रास पडतो. तिला तर वेळेवर शाळेला जावें लागतें, व स्वयंपाकाचें काम माझेवर पडतें. मी स्वतः अलीकडे दुखणाईत असल्यामुळें अतिशय त्रास होतो; परंतु त्याला काय करावयाचें? आम्हीं गरीब माणसें पडलों; हें असेंच चालावयाचें!"

त्यावरून अण्णासाहेब यांनीं त्याच्या कुटुंब स्थितीची बारीक चौकशी केली व त्याची बायको ज्या शाळेत होती तिचा नंबर विचारून घेतला आणि त्याला औषध सांगून रवाना केलें. त्या दिवशीं शुक्रवार होता. तो

दिवस अण्णासाहेब यांचा शाळा तपासावयाचा असे. अण्णासाहेब त्या शाळेंत गेले व शाळा तपासल्यावर मुलींना सुट्टी देऊन त्या मास्तरणीशी 'तिला पगार काय मिळतो,' 'घरीं माणसें कोण कोण,' वगैरे गोष्टी बोलत बसले; तेव्हां तिलाही जरा नवलच वाटलें. नंतर 'तुमचें वय काय'? म्हणून अण्णासाहेब यांनीं विचारलें ब तें कळल्यावर 'तर मग तुम्ही अजून बाहेर बसतां?' असा प्रश्न विचारला. याचा संदर्भ कळणें शक्य नसल्या-मुळे तिनेंही मोठा अविर्भाव आणून ' मी याचें उत्तर देत नाहीं. आपण असले अयोग्य प्रश्न विचारतां म्हणून मी तक्रार करीन' असें सांगितलें, व भाषाही थोडी उर्मटच वापरली. त्यांवर अण्णासाहेब यांनींही शांतपणें सांगि-तलें कीं 'हा प्रश्न मी खाजगी रीतीनें विचारीत नसून म्युनिसिपालिटीचा अधिकारी या नात्यानें विचारीत आहे. तुम्ही सरळ जबाब न दिलांत तर मला लेखी घ्यावा लागेल इतकेंच.' तेव्हां तिनेंही नरम होऊन 'असें या प्रश्नाचें काय काम पडलें' म्हणून विचारलें. अण्णासाहेब यांनीं सांगितलें कीं "शहरांतील पुष्कळ ब्राह्मणांकडून अशी तक्रार आली आहे कीं, 'शाळेंत मास्तरिणी अस्पर्श असतांच शिकवितात. त्यामुळें घरीं दारीं विटाळ कालवून मोठी पंचाईत होते. मुलींना शाळेंत कसें पाठवावें? या प्रश्नाचा विचार कर-ण्याकरितां मी ही चौकशी करीत आहे. तुम्ही अस्पर्श असतां लपवूं नका. तुम्हांस तीन, दिवस रजा मिळण्याची सोय केली जाईल. असो.

म्युनिसिपालिटींत असतांना लेव्हीचीं वगैरे आमंत्रणें त्यांना नेहमीं येत, व फार क्वचित ते एखादे वेळीं जातही. या लेव्हीच्या आमंत्रणाची एक मोठी मौजेची *गोष्ट ते सांगत.

---

*एकदां दुपारीं सुमारें एक वाजतां श्रीविष्णूला जाण्याकरितां ते दारांत उभे होते. ऊन कडक पडलें होतें, व ऐन माध्यान्ह असलेमुळें जिकडे तिकडे साम-सूम होतें. इतक्यांत एक गृहस्थ मोठ्या घाईनें त्या ठिकाणीं आला. त्याच्या पोषाखावरून तो सुस्थितींतला असावा असें दिसत होते. उन्हांत हिंडल्यानें त्याचा चेहरा सुकून गेला होता, व त्याची मुद्रा मोठ्या फिकिरींत पडल्यासारखी दिसत होती. अण्णासाहेब यांना दारांत पाहिल्याबरोबर त्यानें नमस्कार केला, व तो तसाच पुढें निघाला. पण तितक्यांत त्याच्या मनांत काय आलें कोण जाणें.

यानंतर लवकरच श्री० अण्णासाहेब यांची प्रिय कन्या सौ० मथुबाई या निवर्तल्या. लग्न झाल्यानंतर कांहीं थोडे दिवस सोडले तर यांचा सर्व काळ पितृगृहीच गेला. नवऱ्यास मिलिटरी सरव्हेमध्यें नोकरी असल्याकारणानें नेहमीं फिरावें लागे व तेंहि सरहद्दीकडील डोंगराळ प्रदेशांत असल्यानें बरोबर कुटुं-

---

त्याला थोडें समाधान वाटल्यासारखें होऊन तो परत फिरला. अशा ऐन वेळीं अण्णासाहेब भेटले हें बरेंच झालें, आपल्या अडचणींत कांहींतरी उपाय ते खास सांगतील असेंच, त्याला वाटलें असावें. जवळ येऊन तो अण्णासाहेबांशीं बोलूं लागला, व 'सकाळपासून हिंडतां हिंडतां नाकीं नव आले, काय करावें, कांहीं समजत नाहीं, काम झाल्याखेरीज घरीं तरी कसें जावें ? " म्हणून सांगू लागला. अण्णासाहेबांस त्याच्या भाषणाचा रोख कांहींच कळेना, म्हणून त्यांनी ' काय काम आहे,?' म्हणून विचारलें. तेव्हां तो म्हणाला " उद्यां गव्हर्नर-साहेबाची लेव्ही आहे. तुम्हीं जातां कां कधीं लेव्हीला ? " अण्णासाहेब म्हणाले ' होय, मी म्युनिसिपालिटीचा कौन्सिलर आहे म्हणून मला आमंत्रण येतें. एखादे वेळेस जातों देखील. ' त्यावर तो गृहस्थ म्हणाला, ' लेव्हीला बायकांना देखील आमंत्रणें असतात कां हो ? ' अण्णासाहेब ' होय; कोणा-कोणाला असतात. ' ' तुमच्याही कुटुंबाला आमंत्रण आहे काय? " अण्णासाहेब म्हणाले 'होय.'

**गृहस्थः**—मग आपण त्यांना नेणार असाल ?" यावर अण्णासाहेब म्हणाले, 'छे, छे, आमची ही अशी अर्धवट, तिला एक अक्षर देखील वाचतां येत नाहीं व घराबाहेर तोंड काढायाची देखील भीति वाटते; ती कधींच जात नाहीं. ' तेव्हां त्याला मोठा हर्ष होऊन तो म्हणाला तर मग ' माझें काम आपण खास कराल. " तेव्हां आचंबा वाटून ' कसलें काम ' म्हणून त्यांनीं विचारलें. त्यावरून त्यानें सर्व हकीगत सांगितली. हा गृहस्थ मध्यम स्थितींतला असून कँट्राक्टरचा धंदा करीत असे. त्यामुळें जवळ दोन पैसे बाळगून होता. त्याच्या घराच्याजवळच मुदलियार किंवा अशाच कांहीं नांवाचे एक बडे मद्रासी गृहस्थ रहात होते. साहजीकच दोघांचा थोडासा स्नेह होऊन घरांत बायकाबायकां-चाही घरोबा बराच वाढला होता. आदल्या दिवशीं या गृहस्थांचें कुटुंब साहे-बाच्या घरीं बसावयास गेलें असतां सहज गोष्टीवरून गोष्टी निघून, ' परवांच्या

बास नेण्याचीहि सवड नव्हती. त्यामुळे सौ० मथुबाई या माहेरींच असत व काम संपून अगर रजा घेऊन परत आले म्हणजे जांवईहि तेथेंच रहात. त्यामुळें श्री०अण्णासाहेब यांस कन्येचा वियोग असा कधींहि झाला नाहीं. स्त्रीजातींत देखील विरळाच आढळणाऱ्या सद्गुणांच्या योगानें सौ० मथुताई

---

दिवशीं लेव्ही असून लेव्हीला आपल्याला आमंत्रण आहे, व तेवढ्याकरितां नवा पोलका करावयास टाकला आहे, ' वगैरे हकीगत मालकिणीकडून त्या बाईस कळली. लेव्ही हें काय प्रकरण आहे, व तें कशाशीं खातात याची बाईस कांहींच कल्पना नव्हती. लेव्ही हा शब्दही बिचारीनें पूर्वी कधीं ऐकला नव्हता. परंतु स्त्रीजातीला अनुसरून आपल्या ' इथल्या ' मोठेपणाचा ी तिला मोठा अभिमान असल्यामुळें ही कांहींतरी मोठी मानाची बाब आहे, तेव्हां आपल्या येथें आमंत्रण असलेंच पाहिजे, व ज्याअर्थी मुदलियारीण बाई जाणार, त्याअर्थी आपणही तिच्याबरोबर तेवढ्या ऐटीनें गेलें पाहिजे, असा तर्क करून, तिनें ठांसून सांगितलें कीं " आमच्या ' इथल्यां'ना पण आमंत्रण आहे, व आम्हीही जाणार आहों. त्यावर ' कशा तऱ्हेनें जावयाचें ' वगैरे खल होऊन दोघींचेंही बरोबरच जाण्याचें ठरलें. घरीं आल्यावर तिनें यजमानास मोठ्या आनंदानें सांगितलें कीं ' परवां लेव्हीला मुदलियारीणबाईचें व आमचें बरोबरच जावयाचें ठरलें आहे. ' तेव्हां त्याला नवल वाटून तो म्हणाला ' कुठली लेव्ही ! आणि कसलें आमंत्रण घेऊन बसलीस ? आपल्याला कोठून लेव्हीला आमंत्रण येणार ? ' लेव्हीस नवऱ्याला आमंत्रण नाहीं हें ऐकून त्या बाईस खरेंही वाटेना. ती म्हणाली, " उगीच कांहीं तरी सांगायचें झालें. नेहमीं तर सांगायचें कीं, ' आपलें लोकांत असें वजन आहे, अमूक साहेबानें आपल्याला असें भेटावयास बोलाविलें होतें. ' आणि एवढी मोठी लेव्ही गांवांत असून आमंत्रण नाहीं म्हणतां ? कांहीं तरीच, झालें. " त्यावर पुन्हा पुन्हा शपथपूर्वक सांगून गृहस्थानें तिची खात्री करून दिली कीं, ' लेव्ही हें एक बडें प्रकरण असून तिला आमंत्रण व्हावें, असें सरकारांत आपलें कांहींही वजन नाहीं. ' तेव्हां तिनें सांगितलें ' तें तुमचें कांहींही असो लेव्हीला तर आपल्याला गेलेंच पाहिजे. आम्हांला आमंत्रण आहे, म्हणून मी बाईंना सांगितलें आहे, आणि आतां आमंत्रण नाहीं, म्हणून मी येत नाहीं,

यांच्यावर श्री० अण्णासाहेब यांचें लहानपणापासूनच अतिशय प्रेम होतें व कुटुंबाच्यामागें तर पोटांतील कळवळ्यानें श्री० अण्णासाहेब यांचीं धोरणें ठेवून खाण्यापिण्याची व्यवस्था करणें सौ० मथुताईच करीत असे. त्यांच्या धीरोदात्त आणि एकाद्या लहान पोराप्रमाणें निर्मळ निष्कपट स्वभावाची आठ-

---

असें कसें म्हणूं ? तेव्हां तुम्ही कांहींही करा, पण लेव्हीला घेऊन चला. परवां जर लेव्हीला जातां आलें नाहीं, तर आपण कांहीं पाण्याच्या घोंटालाही स्पर्श करणार नाहीं.' एवढी निक्षून ताकीद दिलेली, आणि तीही पुन्हा प्रत्यक्ष बायकोनें! तेव्हां उपेक्षा करून चालणें शक्य नव्हतें. परंतु बायकोनें सांगितलें म्हणून थोडेंच लेव्हीला आमंत्रण येतें.? आणि एकादी महाचंडी चार दिवस हरताळ पाडून बसली, तरी त्याचे गव्हर्नर साहेबांस काय होय ? दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाईनें नवऱ्यास पुन्हा ताकीद दिली, व घराबाहेर हाकलला. तेव्हांपासून विचारा सारखा याला विचार, त्याला विचार, असें करीत फिरत होता. उपाय तर कांहीं सांपडेना, आणि लेव्हीची सोय केल्याखेरीज बायकोस तोंड तरी कसें दाखवावें ? अशा आपत्तींत पडून विचाऱ्याची त्रेधा उडून गेली होती. अण्णासाहेब यांस पाहतांच जणुं कांहीं आपल्या अंतःकरणांतला विलाप स्वर्गस्थ पितरांनीं ऐकलाच, असें वाटून त्याला मोठा हर्ष झाला व त्यानें एकंदर हकीगत अण्णासाहेबांस सांगितली. त्यावर 'मग आतां मीं यांत काय करणार ? ' म्हणून अण्णासाहेबांनीं विचारलें. तेव्हां तो म्हणाला 'तुमच्या कुटुंबाचा पास मला द्या.' या विनंतीची स्वतः आण्णसाहेबांसच एवढी मौज वाटली कीं, ही गोष्ट सांगतांनादेखील त्यांना पोटांतून हंसू आलें; व त्यावेळेला मंडळींचा फराळ चालला होता, तो थांबून ५।१० मिनिटें मोठा हंशा पिकला. परंतु त्यावेळीं अण्णासाहेबांनीं त्याचा उपहास केला नाहीं. मात्र थोडेंसें हंसून त्याचा वेडगळपणा त्याच्या लक्षांत आणून दिला, व असा एकाचा पास दुसऱ्यास कसा चालेल ? म्हणून सांगितलें. त्यावर पुन्हा कमर खचून तो म्हणूं लागला, 'तर मग मी आतां घरीं जाणार कसा ? ' तेव्हां अण्णासाहेबास त्याची दया आली, व त्यांनीं त्याला उपाय दाखवून दिला. लेव्हीच्या यादींत एकाद्या संभावीत माणसाचें नांव घालण्यांत कोणच्याही तऱ्हेचा अन्याय नव्हता व ज्या गृहस्थाकडे यादी करण्याचें

वण श्री० अण्णासाहेब पुष्कळ वेळा काढीत. दुखणें जडून विकोपासही गेलें तरी देखील श्री० अण्णासाहेब यांस त्य चा पत्ताही नव्हता. व ज्या वेळेस त्यांच्या लक्षांत आलें त्यावेळीं तर त्या अत्यवस्थ होऊन अंथरुणास खिळल्या. त्यामुळें औषधोपचार न चालून झिजत जाऊन हळूहळू इ. स. १९०९च्या आषाढांत त्यांचें देहावसान झालें. त्यांस दोन अपत्यें होतीं. पैकीं वडील माई ही त्यानंतर तीनच वर्षानें म्हणजे १९१२ सालीं व लहान बागलु ऊर्फ टग्या हा १९१३ सालीं अशीं थोड्या थोड्या अंतरानें निवर्तलीं. बागलूच्या मृत्यु-नंतर सुमारें वर्षा सव्वा वर्षानेंच त्यांच्यावर एकनिष्ठेनें प्रेम करणारा त्यांच्या बहिणीचा नातू म्हणजे वामन दातार हाहि निवर्तला.

या सर्व काळांत श्री अण्णासाहेब यांचीं ठळक ठळक कामें आटोपत येऊन औषधें सांगणें व अनेक प्रकारच्या निमित्तांनी त्यांच्याकडे येणाऱ्या शेकडों व्यक्तींशीं तितक्या तऱ्हानीं बोलणें यांतच त्यांचा वेळ अधिक जाऊं लागला. यामुळेंच त्यांना २४ तासांतून एकाद्या तासाचीही फुरसत मिळणें अगदीं अशक्य झालें. १९१४ सालापासून तर ते जास्त थकल्यासारखे व रोड दिसूं लागले. मात्र मनाचा उत्साह आणि शरीरेंद्रियांची तरतरी ही तर उलट अशी वाढलेली दिसे कीं, जसा कांहीं त्यांना अंतच नव्हता. एवढाच फरक झाला होता कीं, त्यांचें स्वतःचें म्हणणें वगैरे जीं कामें होतीं तीं मात्र ते पूर्वी-सारखे तक्याशीं बसून न करितां बहुतेक सर्व वेळ बिछान्यावर पडूनच उर-कीत असत. उभें राहून एकदां सुरुवात झाली म्हणजे त्यांच्या अंगांत विल-

---

व पास देण्याचें काम होतें त्यानें स्वतःच्या इच्छेनेंही एकादें नांव त्यांत अधिक घातलें असतां कांहीं वावगें नव्हतें. त्यावेळीं हें काम एका मुसलमान गृहस्थाकडे होतें; आणि तो संगमावर कोठें राहतो हें श्रीअण्णासाहेब यांस माहीत होतें. त्या गृहस्थाचा पत्ता सांगून त्याच्याकडे जावयास सुचविलें व "तुम्ही श्रीमंत आहां, कोणाचाही स्नेह संपादणें तुम्हास कठीण नाहीं, तेव्हां त्या गृहस्थाकडून काम करून घ्या." असें सांगून त्याची रवानगी श्रीअण्णा-साहेबांनीं करून दिली. तेव्हां त्या गृहस्थालाही स्वर्ग हातीं आल्यासारखें झालें व हर्षानें श्रीअण्णासाहेबांचें पायांवर डोकें ठेवून तो आपले उद्योगांस निघून गेला.

क्षण जोम व तरतरी येई व त्यांच्याबरोबर चालणें चांगल्या धनधाकट माणसासहि थकवा आणीत असे. परंतु एकदां तो अवतार संपवून ते गादीवर आले म्हणजे मात्र थकून गेल्यासारखें दिसत आणि ही गोष्ट लक्षांत येऊन त्यांच्या निकट संबंधांत असलेल्या कित्येकांस मात्र आतां हें चरित्र बहुतेक संपत आलें असावें अशी धास्ती वाटत होती. परंतु त्यांच्या विलक्षण निग्रही-पणामुळें इतर कोणाच्या हें फारसें लक्षांत आलें नाहीं, आणि त्यामुळें त्यांचें जाणें अगदीं आकस्मिक भासून त्या संबंधानें ज्याला त्याला आपापल्या परीनें तर्क करण्यास सवड झाली. त्यांतीलच वस्तुतः त्यांना जावयाचें नव्हतें, परंतु लंघनानें शरीर क्षीण होऊन आटोक्यांत राहिलें नाहीं व नाइलाज म्हणून त्यांस जावें लागलें हा होय. या तर्काची प्रतिष्ठितता त्यांच्या नियाणाची हकीकत पुढें स्वतंत्रच द्यावयाची आहे त्यावरून दिसून येईल.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नं.
ता.

# निर्याण.

इति ज्ञात्वा तत्त्वं रहसि कृतवानद्भुतमिमम्
क्रतुं स्वस्वं हुत्वा प्रखरतपसां हव्यवहने ।
भवत्वैश्वर्यं तत् पुनरिति यथापूर्वमचलं
पृथग्देहं त्यक्त्वा स्वजनमविशत् यक्षपुरुषः ॥

श्री० अण्णासाहेबांसारख्या सुदृढ शरीराच्या, निकोप प्रकृतीच्या व कडकडीत तपाचरणाच्या मानानें पाहिलें तर सत्तर वर्षे म्हणजे कांहीं फार नव्हेत. त्यांच्याहि मानानें अधिक जगलेले सुरेंद्रनाथासारखे त्यांच्या साधारण बरोबरीचे कैक लोक आहेत हें खरें आहे. तरी पण श्री० अण्णासाहेब यांचें अवसान अगदींच लवकर झालें असें म्हणतां येत नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें अतिश्रमानें वगैरे त्यांचें शरीर हळूं हळूं थकतच आलें होतें. त्यांनीं प्रायोपवेशन करून हट्टानें देह ठेविला अथवा प्रायोपवेशन करीत असतां आवांक्याबाहेर क्षीणता येऊन त्यास जावें लागलें अथवा कांहीं लोकांच्या कल्पनेप्रमाणें त्यांस प्लेग होऊन आकस्मिक मृत्यु आला, परंतु संबंधीं लोकांनीं प्लेगची गोष्ट दाबून टाकून कोणाचे नजरेस येऊं दिली नाहीं किंवा अशाच तऱ्हेच्या आणखीहि ज्या कित्येक कल्पना आमच्या ऐकण्यांत आल्या आहेत त्यांत यत्किंचित देखील सत्यांश नाहीं. नैसर्गिक क्रमानें अथवा परमात्म्याचे इच्छेनुरूप त्यांची आयुमर्यादाच ती ठरलेली होती हें त्यांस पूर्वीपासूनच ठाऊक असावें असें अनुमान करण्यास पुष्कळ कारणें आहेत.

पूर्वी महाराजांनीं शरीर ठेविलें त्या वेळेस लोकांस त्याची कल्पना आल्यामुळें त्यांना विलक्षण त्रास झाला. यावरून धडा घेऊन स्वतः पुरता हा त्रास टाळण्याची खबरदारी घेण्यास तें चुकलें नाहींत शरीर ठेवण्यापूर्वी अत्यंत निर्मळ व शुद्ध स्थितींत तें ठेवावें म्हणून त्यांनीं प्रायोपवेशन केलें. एरव्हीं देखील चार चार दिवस ते तसेंच रहात असत; त्यामुळें त्यांचा हा हेतु कोणाच्या लक्षांत येणें शक्य नव्हतें. लोकमान्यांनीं “ हें प्रायोपवेशन आहे ”



श्री अण्णासाहेब पटवर्धन--अंत्यदर्शन-

बालोद्यान प्रेस, पुणे.

असें म्हटल्यामुळें त्यांनीं प्रायोपवेशन करून देह ठेविला अशी कल्पना निघाली; परंतु तिच्यांत तथ्य नाहीं. प्रायोपवेशन करून देह ठेविला नाहीं. देह ठेवावयाची वेळ आली होती म्हणून प्रायोपवेशन केलें. त्यांनीं उघड कोणास बोलून दाखविलें नाहीं तरी देहावसानाची वेळ त्यांना माहित असावी. वामनच्या मृत्यूनंतर ते जरा जास्त थकल्यासारखें दिसत होतें तेव्हां त्यांना असा उघड प्रश्न करण्यांत आला कीं, 'असा कांहीं योग आहे कीं काय' त्यावर त्यांनीं थोडेसें हंसून 'अरे महाराजांना काय केव्हांतरी अन्नपाणी द्यावयाचें, तें आतांच देतील' असें त्यांनीं उत्तर दिलें. परंतु त्या वेळेपासून ते आपल्या बोलण्यांत व कृतींत थोडे दिवस राहिले असल्याचें केव्हां केव्हां दर्शवीत.

१९१५ सालच्या गणेशचतुर्थीच्या आधल्या दिवशीं त्यांनीं अगदीं स्पष्टपणें असें सूचित केलें होतें कीं महाराजांचा चोपदार बापू पैठणकर याच्या मागून आपण लवकरच जाऊं. त्याचप्रमाणें पुढें फाल्गुन वद्य प्रतिपदेस बोलतां बोलतां श्रीबुवासाहेबांच्या जाण्याचा उल्लेख करून "महाराजांनीं १५।१५ वर्षांचे बरोबर तुकडे तोडले" असें म्हणाले होते. प्रस्तुत लेखकाबरोबर बोलतांना तर आतां थोडे दिवस असल्याचें अनेक प्रकारानें त्यांच्या बोलण्यांत येई आणि शेवटच्या एकदोन वर्षांतील त्यांचें एकंदर वर्तनही "चारी दोन्ही कामें। सारूनिया भ्रमें। आपुलिया वर्मे! राहूं आतां ॥ १ ॥" अथवा "आतां दिवस चारी। खेळीं मेळीं ॥" अशाच तऱ्हेचें असून त्यांत कमालीची सौम्यता आलेली होती. सन १९१६ सालीं गणेशखिंडीचे पुजारी गाणपत्य उर्फ सांवळ्या हे काशीयात्रेस जावयास निघाले असतां निरोप घ्यावयास आले. पुनः पुनः जातों म्हणून नमस्कार करावा व जावयास निघावें तों श्री० अण्णासाहेब यांनीं कांहींतरी भाषण काढावें आणि तें लांबून उभें राहण्याचा कंटाळा आला म्हणजे त्यांनीं खालीं बसावें असें २।४ वेळां झालें. शेवटीं आतां जावयाचेंच असा निर्धार करून त्यांनीं पायांवर डोकें ठेविलें व झट्कन उठून वाटेस लागणार तोंच श्री० अण्णासाहेब यांनीं जमिनीस हात लावून नमस्कार केला. तेव्हां अतिशय विस्मित होऊन गाणपत्यांनीं "आज असें कां" म्हणून प्रश्न केला. त्यावर "आतां असेंच" म्हणून श्री० अण्णासाहेबांनीं ये म्हणून त्यांना सांगितलें. त्या-

वेळीं व आतां दोघांची पुन्हा गांठ पडणार नाहीं असें वाटलें; पण जाणार कोण हाच प्रश्न होता. असो.

घरांत सून लहान, कुटुंबांतले असे वडिलधारे माणुस कोणी नाहीं, असें पाहून कुळधर्म कुळाचाराची नीट माहिती व्हावी एवढ्याकरितां देवदिपवाळीस नैवेद्य वगैरे किती कोणाच्या नांवाचे करावयाचें याचें त्यांनीं एक टांचणच या-वर्षीं करविलें, हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. या यादींत धुळ्याच्या गणपतीचेंहि नांव त्यांनीं मुद्दाम घातलें होतें. हा गणपती कोणास फारसा माहित नसून झाडाखालतीं शेंदूर लाविलेले दगड ठिकठिकाणीं असतात त्याप्रमाणें कलेक्टरचे आवारांत एकीकडे पडला होता. धुळ्यास पुण्यतिथीस गेले असतां नदीवरून परत येतांना त्याला पाणी घालून त्याची पूजा करण्याचा श्री० अण्णासाहेब यांचा नेम होता. त्याची पूजा आतां आपल्या हांतून होणें नाहीं असें पाहूनच त्यांनीं ही व्यवस्था केली कीं काय कोण जाणें! यांतील सांगण्यासारखी गोष्ट इतकीच आहे कीं श्री० अण्णासाहेब यांच्यामागून लवकरच हे गजाननमहाराज आपल्या अज्ञातवासांतून बाहेर आले. आतां त्यांचें एक मोठें देऊळ झालें असून पूजेअर्चेची स्वतंत्र सोय झाली आहे व सायंकाळीं दर्शनास स्त्रीपुरुषांचा समाजही बराच येतो. सारांश इतकाच कीं कोणच्याही तऱ्हेच्या दुर्बलतेमुळें नव्हे तर नैसर्गिक क्रमाक्रमानेंच आपलीं प्रयाणाची वेळ आली आहे असें जाणून तो सोहाळा नीटपणें पार पाडण्याची त्यांनीं आधींपासूनच पद्धतशीर व्यवस्था केली होती.

कार्तिकांत नित्याप्रमाणें महाराजांच्या पादुका पंढरीस गेल्या त्यांबरोबर रा० बापू पैठणकर हेहि होते; परंतु पादुकांबरोबर ते परत न येतां मागें राहिले व तेथेंच त्यांस प्लेग होऊन त्यांचा अंत झाला. त्याच वेळेस कांहीं लोकांच्या अंतःकरणास धक्का बसला. त्यांतच एक दिवस ‘ इमामच्या जूतीची ’ प्रसिद्ध *गोष्ट सांगून भावाच्या आश्रयानें देव असतो, वस्तूचें नुसतें निमित्त असतें असें

---

* इमामची जूतीः --

‘ भाव तोचि देव ’ ही गोष्ट बादशहास पटवून देण्याकरितां बिरवलानें एका जोड्यावर एक कबर बांधिली व हें माझें दैवत यानें मला भ य्य आलें म्हणून सर्वांस सांगूं लागला. त्यामुळें लोकांचीही श्रद्धा बसून ते तिला नवस

सांगून भावी प्रसंग उघड उघड त्यांनीं सूचित केला. असें होतां होतां आळंदीस जावयाची वेळ आली. या वेळेला आळंदीस प्लेग असून विरूपाक्षमठाचे शंकराचार्य स्वामी बोधानंद भारती यांचा मुक्काम उत्सवात आळंदीस व्हावयाचा होता म्हणून श्री० अण्णासाहेबांस थोडें लवकर जावयाचें होते. बोधानंद भारती व श्री० अण्णासाहेब यांचा चांगलाच पूर्वपरिचय होता. हे स्वामी केरू नानांचे विद्यार्थी असून गणित व ज्योतिःशास्त्र यांचा अभ्यास त्यांनीं नानांजवळ केला होता. त्यांच्या मनांतून महाराष्ट्रांत एक संस्था काढून कांहीं देश कल्याणाच्या गोष्टी करावयाच्या होत्या व तेवढ्याकरितां ते श्री० अण्णासाहेबांकडे आले होते. गणितशास्त्राच्या साह्यानें वेदांतसिद्ध करून दाखवावा व पुराणातलीं व आमच्या शास्त्रांतलीं कित्येक स्थळें गणितशास्त्रदृष्ट्य उलगडून दाखवावीं असाही या संस्थेचा एक हेतु होता. या सर्व गोष्टींचें महत्त्व श्री० अण्णासाहेब यांचेपाशीं केव्हढें होतें हें कोणी सांगावें? एव्हढें मात्र खरें कीं आपल्याकडे आलेला इसम ह्या नात्यानें स्वामींची जी व्यवस्था ठेवावयास पाहिजे होती ती कशी ठेवली जाईल याचीं ते थोडीशीशी काळजी करीत व तें पाहून नवलही वाटे. कारण त्यांना चिंता अशी कोणत्याच प्रकारची करतांना कोणी कधीं पाहिलें नव्हतें. ५।६ महिन्यापूर्वी श्रावणांत पोटांत शूळ होऊन ते दोन तीन दिवस अत्यवस्थ झाले होतें. त्या वेळीं एका गृहस्थांचे अपीलाचें काम त्यांनीं घेतलें होते व त्याची मुदतही अगदींच भरली असल्यामुळें तें ताबडतोब रवाना होणें अगदीं अवश्य होतें. हें अपील सांगतांनाहि ते आपल्या हातून मुदतीच्या आंत कसें जाईल अशी तें जरा चिंता दाखवीत. अपील रवाना केलें तेव्हां त्यास मोठें समाधान वाटलें व दुसरेच दिवशी ते आजारी पडले. तशींच चिंता ते यावेळींहि दाखवीत. परंतु ती वरवरच असे. आंत तर त्यांची आनंदवृत्ति अधिकच उत्कट झाली असावी.

आळंदीस जावयापूर्वी एक दिवस घरखर्चासंबंधीं वगैरे गोष्टी काढून मी

---

वगैरे करूं लागले. त्यांच्या विश्वासामुळें त्यांना फलही मिळूं लागलें. होतां होतां खुद्द बादशहाचीही स्वारी स्वतःचा कांहीं नवस फेडावयास तेथें आली. तेव्हां बिरबलानें कबरी खालचें खरें दैवत काढून दाखविलें व वस्तूंत देव नाहीं भावांत आहे ही गोष्ट पटवून दिली.

त्यांना विचारलें होतें कीं ' हें असें चालणार तरी किती दिवस.' त्यावर हंसून त्यांनीं सांगितलें कीं, ' काय मूर्ख आहेस आतां कसले किती दिवस। झालें आतां.' आळंदीस जावयापूर्वीं दोन दिवस आधीं सोमवारीं रात्रीं आपण होऊन ते मोकळेपणानें रात्रभर बोलत बसले व त्यावेळेसही 'याचें कारण पुढें कळेल' म्हणून त्यांनीं बोलून ठेविलें. नंतर ते आळंदीस गेले व रीतिप्रमाणें उत्सवहि पार पडला. प्रक्षाळपूजा झाली म्हणजे परतावयाचें परंतु उत्सवास आलेल्या मंडळींतून एकदोघांवर प्लेग महाराजांची कृपा झाल्यामुळें त्यांच्या प्रकृतीस आराम पडेपर्यंत तेथें राहणें भाग होतें. श्रीअण्णासाहेब यांचा आळंदीचा मुक्काम म्हणजे खरोखरच आनंदाची दिवाळी होती. भोंवतालचे लोकांस सूर्य कोणीकडे उगवला व कोणीकडे मावळला याचेंही भान नसे. श्रीअण्णासाहेब यांस तर तर प्रसाद घ्यावयास बहुतकरून उजाडत असे. हास्यविनोद, मिऱ्याचा काढा, महाराजांच्या गोष्टी आणि नानाप्रकारची चर्चा यांच्याखालीं दिवसचे दिवस निघून जात. या वेळीं तर बहुतकरून उजाडल्यावरही प्रसादस बसावयाची वेळ येई. त्यामुळें पौष वा ४ स काय करावें असा थोडा प्रश्न पडला. कारण उजाडल्यावर आतां चतुर्थी आहे म्हणून ते प्रसादास न बसण्याचा संभव होता. तेव्हां श्रीभक्त माधवराव यांनीं नित्याप्रमाणें प्रसादाचें भात व दाळवांगें आणि वऱ्याचे तांदूळ व शेंगदाण्याची आमटी असे दोनही तयार ठेवून पानें मांडलीं. श्री० अण्णासाहेब यांस संकष्ट चतुर्थीचें व्रत जन्माचेंच म्हटलें तरी चालेल. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, " तुमची कालची चतुर्थी खोटी आमची आज खरी " अशी रा. नारायणशास्त्री यांची नेहमींप्रमाणचें थट्टा करीत त्यांनीं दाळवांग्याचाच प्रसाद घेतला.

श्री० अण्णासाहेब यांचा भरंवसा पटवर्धनी पंचांगावर जास्त होता. याचें एक कारण आपल्या गुरुविषयीं आदर हें तर होतेंच. परंतु त्या वेळेस तरी इतर पंचांगाच्या मानानें पटवर्धनी पंचगांतील तिथी व नक्षत्रें जास्त बिनचूक आहेत असा महाराजांनीं त्यांना दाखला दिला होता. याविषयीं त्यांनीं स्वतःच असें लिहून ठेविलें आहे. ' मूळ ज्योतिषविद्या निघून नक्षत्रांचीं नांवें प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्या वेळीं ज्या नक्षत्रांत सूर्य असून उत्तरायणही लागलें होतें, त्याचें नांव मूल ( आरंभ ) असें प्रसिद्ध करण्यांत आलें व त्या नक्षत्राशीं संबंध असणाऱ्या राशीचें नांव आकृतीवरून धनुर असें पडलें. सूर्यामुळें अदृश्य

असणाऱ्या राशीचा व नक्षत्राचा बोध त्या आरंभाच्या दिवशीं असणाऱ्या पौर्णिमेच्या मध्यरात्रीस आकाशांत चंद्रसहित असणाऱ्या मृगनक्षत्रावरून झाला. म्हणून धनुर्मासाचें नांव मार्गशीर्ष असें झालें. या दिवसापासून धनुर्मास किंवा मार्गशीर्षमास व उदगयनाचा उत्सव म्हणजे देवदिपाळी करण्याचें शास्त्र झालें व जरी उदगयन धनुराशींत नसते तथापि मूळाचें स्मरण राहण्याकरितां तो उत्सव दरवर्षी करतात व नैवेद्यास खिचडी करितात. काल रात्रीं म्हणजे ता. ११–१२–१९०४ रविवासरीं श्रींनीं स्वप्नांत दांडेकर यांस उत्तरायण म्हणजे धनुर्मास लागला म्हणून खिचडीचा नैवेद्य करीत जा आतां म्हणून सांगितलें व आज आम्ही सारभात खाऊं कारण तुझा पाठ चालला असतां परान्न नको असें बोलले. केरोपंती पंचांगांत धनुर्संक्रांत शनिवारीं ता. १० परवां घटि ५७।२० वेळेस लागली व धोंडूच्या बापाचें श्राद्ध आज सोमवारीं ता. १२–१२–१९०४ आमचे येथें होतें. म्हणून श्राद्धान्न किंवा परान्न नको. यावरून केरोपंती पंचांग खरें व स्वप्नही खरें. कारण श्राद्धाची माहिती मला व दांडेकर यांस नव्हती. म्हणून केरोपंती पंचांग व नक्षत्रघटी खरें."

केरोपंती पंचांगाच्या खरेपणाविषयीं असाच एक गमतीदार दाखला आणखीहि पहावयास सांपडला. धुळें येथील श्रीसंस्थानचे अधिकारी श्रीभक्त वासुदेवबुवा रुद्र यांच्या चिरंजीवांचें लग्न १९११ सालीं झालें. त्या वेळीं तिथि निश्चयाच्यासंबंधीं विचारतां श्री० अण्णासाहेब यांनीं सांगितलें कीं, महाराजांस चिठ्ठया टाका व त्यांच्या आज्ञेप्रमाणें करा. त्या वेळीं कांहीं सोयीवार दिवस पाहून चिठ्ठया टाकल्या. त्यांत काय चूक झाली असेल ती असो. परंतु चिठ्ठीमध्यें जो दिवस निघाला, त्या दिवशीं पंचांगांत पहात असतां मुहूर्तच नाहीं असें आढळून आलें. तेव्हां आतां काय करावें अशी वासुदेवबुवास पंचाईत येऊन पडली. शेवटीं तें प्रकरण श्री० अण्णासाहेब यांचेकडे आलें तेव्हां त्यांनाही विचार पडला. महाराजांची चिठ्ठी आली आहे तेव्हां त्या दिवशीं मुहूर्त असला पाहिजे खास. तेव्हां लग्न त्याच दिवशीं लावावयाचें असें. त्यांचें ठाम मत होतें. महाराजांची आज्ञा शास्त्राला सोडून कधीं येणार नाहीं हेंहि उघड होतें, परंतु पंचांगांत त्या दिवशीं मुहूर्त नव्हता हेंही खरें. तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं, हा पंचांगांचा घोंटाळा आहे. म्हणून त्यांनीं

पुण्यांस पत्र लिहून पटवर्धनी पंचांग बोलाविलें. तें आल्यावर त्यांत पहातात तों केरोपंती नक्षत्रतिथीप्रमाणें त्या दिवशीं उत्तम योग होता, तेव्हां सर्वांसच आनंद झाला आणि त्याच सुमुहूर्तावर अखेरीस तें लग्न लाविलें. तेव्हांपासून नारायणशास्त्री वगैरे जुन्या लोकांशीं बोलतांना ते नेहमीं विनोदानें ‘ पटवर्धनी उर्फ खरें पंचांग व दुसरें खोटें पंचांग ’ असें म्हणत असत. त्यांचीं स्वतःचीं कामें केरोपंती पंचांगाप्रमाणेंच ते करीत असत. आळंदीस ते आले म्हणजे हा वाद व विनोद नेहमींच चालत असे. तसाच याही वेळेस चालला होता. या पंचांगांतील वादासंबंधीं त्यांनीं कधीं विशेष आग्रह धरला नाहीं. परंतु अलीकडील सररास सर्व पंचांगांतील एका घोंटाळयासंबंधीं मात्र ते केव्हांही प्रसंग निघाला असतां मोठ्या आग्रहपूर्वक सांगत असत. हा घोंटाळा दोन एकादशाच्या निर्णयाचा होय.

सामान्यतः भागवत व स्मार्त अशा दोन एकादशा असतात अशी लोकांची समजूत आहे. परंतु जुन्या काळीं कांहीं पंचांगांत माध्व एकादशीहि लिहिलेली असे. मध्यंतरीं कांहीं तरी घोंटाळा होऊन माध्व व भागवत या दोनही एकादशा एकच समजण्यांत आल्या व त्यांतील भेद नाहींसा होऊन एक मोठा घोंटाळा उत्पन्न झाला. स्मार्त एकादशीसंबंधीं त्यांचें असें म्हणणें होतें कीं आम्ही जे स्मृतिप्रमाण लोक त्या एकादशी करणाऱ्या सर्वांना ती करणें अवश्यच आहे. परंतु जे भागवत असतील त्यांनीं खरोखर पहातां दोन्ही एकादशा केल्या पाहिजेत. केवळ सूर्यदृष्ट तिथि घ्यावयाची एवढ्याच आग्रहानें असा प्रकार होतो कीं आधल्या दिवशीं फक्त केवळ सूर्यदृष्ट नसून सबंध दिवस जरी एकादशी असली तरी त्यादिवशीं यथास्थित खाणेंपिणें होतें आणि दुसऱ्या दिवशीं केवळ सूर्यदृष्ट आहे म्हणून उपास केला जातो व त्रयोदशीस पारणा करण्याचा प्रसंग येतो. जे माध्व आहेत त्यांची गोष्ट वेगळी. त्यांचें मुळीं शास्त्रच ‘ उपोष्यात् द्वादशी शुद्धा त्रयोदश्याम् तु पारणा ’ असें आहे व त्याचा उद्देश धडधडीत प्रदोष हें शिवव्रत बुडवावें असा आहे. त्यांचा प्रश्न नाहीं. परंतु आपण जे शांकर मतानुयायी पंचोपासक त्यांना शिव व विष्णु हीं दोन्ही दैवतें सारखींच पूज्य असल्यामुळें अशा रीतीनें प्रदोषास फांटा देणें हें बरोबर नाहीं. म्हणून ते नेहमीं, भागवती व माध्व व असा भेद न ठेवतां उपोष्यात् द्वादशी शुद्धा अशाच प्रकारची भागवती एकादशी लिहि-

लेली असेल, तेथें पहिलीच एकादशी केली पाहिजे, असा उपदेश करीत. यावरूनहि खऱ्या खोट्याचा वाद नेहमींच चाले. तशाच प्रकारची हीहि थट्टा असेल असें पहिल्यांदा वाटलें परंतु प्रत्यक्ष त्यांना दाळवांगें खातांना पाहून मात्र सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. तथापि त्यांत कांहीं विशेष आहे असें कांहीं वाटलें नाहीं. आतां मागाहून मात्र त्यादिवशीं महाराजांच्या येथें त्यांनीं चतुर्थीव्रत मुद्दाम उजवून घेतलें अशी कल्पना मनांत येते. खरें काय असेल कोणी सांगावें ?

यानंतर पुनः त्यांनीं आळंदीस भोजनच तर काय पण फराळही केला नाहीं आणि खरोखर खाणें त्याच दिवसापासून बंद झालें. प्लेगच्या रोग्यांस थोडेसें वरें वाटतांच गाडींत घालून स्वतः त्यांनीं पुण्यास आणिले व आपल्या घरींच ठेविले. उत्सवानंतर श्री० अण्णासाहेब यांचेकडे व्हावयाचा प्रसादही अर्थातच लांबून धुळेकर मंडळींचाहि मुक्काम लांबला होता. त्यांतच प्लेगचे रोगी, त्यांची नातेवाईक मंडळी, यांची भर पडून घरीं एकच गर्दी उडून गेली होती व स्वतः श्री० अण्णासाहेब आपल्या शरपंजर स्थितींतही अखेरपर्यंत जातीनिशी त्यांची व्यवस्था करीत होते. त्यांतच बोधानंद भारती यांचेंही काम त्यांच्यामागें होतेंच.

पौष वद्य ११ स रात्रीं त्यांनीं श्रीभक्त माधवराव गडबोले, सितारामपंत दांडेकर इत्यादिकांच्या बरोबर फराळ केला. तेथपावेतों त्याची प्रकृति नादुरुस्त असल्याची शंका त्यांनीं कोणास येऊं दिली नाहीं; परंतु दुसरे दिवशीं शौच्याहून आल्यावर लापशी पुढें नेतांच ‘आतां देऊं नकोस. माझी प्रकृति अतिशय वाईट आहे. मी थोडासा पडतों.’ असें म्हणून त्यांनीं आंग टाकिलें व तेथपासून दोन तीन दिवस सारे व्यवहार बहुतेक पडूनच करीत होते. सुंदरलाल डॉक्टरवर त्यांचा मोठा लोभ होता. त्यांनींहि येऊन बराच आग्रह केला तेव्हां त्यांचें औषध घेतों म्हणून कबूल केलें. श्री० अण्णासाहेब यांच्या सहवासानें सुंदरलालहि देशी औषधें वापरूं लागले होते. त्यांनीं अशी कल्पना काढिली कीं पोटांत जंत असावेत व जंताचें औषध देतों म्हणून आग्रह धरिला; परंतु औषध घेतल्यानें जंत मरतील म्हणून औषध घेण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. परंतु एरंडेलाचा जुलाब घेण्याचें कबूल करून गुरुवारीं घेतों म्हणून सांगितलें. हात पहाणें, कोणाशीं कांहीं

बोलणें वगैरे व्यवहार तर चालूच होता. माधवराव, गोविंदबुवा वगैरेंच्या समजुतीकरितां मिऱ्याचा काढाहि घेणें सुरूंच होतें परंतु थकवा मात्र जास्त आलेला दिसत होता. गुरुवारीं सकाळीं एरंडेल घेतलें व त्या दिवशींहि चौकांत नेहमींप्रमाणें हात दाखविणारांची गर्दी जमली. एकवेळ जुलाब होतांच इतका थकवा आला कीं दुसऱ्या वेळेस हातीं धरून बागेंत न्यावें लागलें. परंतु आल्यावर त्यांच्याच्यानें उभें राहवेना तेव्हां सर्व लोकांस जावयास सांगितलें. तेव्हांपासून महाराजांना भस्म लावणें वगैरे कृत्येंही दुसऱ्या माणसांनीं तोल संभाळून धरावें व धोडक्यांत उभ्या उभ्या उरकावीं अशीं होऊं लागलीं तेव्हां मात्र मंडळीस काळजी उत्पन्न झाली व त्यांनीं कांहीं तरी खावें अशाविषयीं आग्रह सुरूं झाला. येथून पुढें त्यांना मंडळींचा त्रास फार झाला असता हें उघड आहे. परंतु तेही पक्केच होते. त्यांनीं मुळीं माधवराव व गोविंदबुवा यांच्याशीं कामापुरतें होना करण्यापलीकडे कोणाशींहि भाषणच करावयाचें सोडून दिलें.

शनिवारीं दुपारीं त्यांना विचारिलें कीं तुम्ही कांहींच घेत नाहीं व मंडळी उगीच आग्रह करितात. तुम्हास कांहीं दिवस घ्यावयाचें नसल्यास तसें कां नाहीं सांगत ? म्हणजे ते विनाकारण त्रास तरी देणार नाहींत. त्यावर ते कांहींच बोलले नाहींत. परंतु रात्रीं मात्र गोविंदबुवास म्हणाले कीं ' Ten days fasting ' याला हाच उपाय आहे. असें आपण होऊन म्हणाले. इंग्रजी शद्व कधीं तोंडांत यावयाचा नाहीं पण यावेळीं काय लहर लागली कोण जाणे. सबंध वाक्यच इंग्रजींत उच्चारिलें. त्यावर ' दहा दिवसानंतर तर कांहीं घेण्यास हरकत नाहीं ना ' असें गोविंदबुवांनीं विचारल्यावरून ' हो ' असें म्हणाले. तेव्हां गोविंदबुवा वगैरे मंडळी स्वस्थ बसली. परंतु तेवढ्यावरून कांहीं लोकांस स्वस्थ बसवेना. त्यांनीं राजश्री बाबासाहेब मुंबईस होते त्यांना येण्याकरितां पत्र धाडलें. लोकमान्यांस खबर पोहोंचून तेही राजश्री वासुकाका, दत्तोपंत बेहेरे वगैरे गणांसह समाचारास आले.

थोडा वेळ औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर काहीं खात कां नाहीं ? औषध वगैरे घ्या म्हणून त्यांनीं विनंती केली. त्यावर ' का तंटा करावयाचा आहे वाटतें ? ' असें उत्तर आलें. तितक्यावर उमजून ते गप्प बसले. परंतु दत्तोपंतांचें समाधान तेवढ्यानें न होऊन ' औषध न घेण्याचा तरी आग्रह कां हें

देहप्रारब्ध आहे. औषध घेण्याची तरी महाराजांचीच इच्छा नाहीं कां ' असा वेदांत ऐकविण्यास त्यांनीं सुरुवात केली. त्यासरशीं नेहमींच्या तापटपणास अनुसरून त्यांना सपाटून झाडून टाकावें अशी वृत्ति उठल्याचें स्पष्ट दिसलें. परंतु तितक्यांत ती वृत्ति जिरवून टाकून अंतःकरणास वेदना व्हावी तशा स्वरानें नुसतें ' काय म्हणतां हो तुम्ही हें ' असें म्हणून त्यांनीं तोंड फिरविलें आणि टिळकांशीं चिरोल खटल्यासंबंधानें बोलणें काढलें. तितक्यांतच ' कां अलिकडे बँक बरी चालली आहे वाटतं ' अशी कोणी बेहेऱ्यांची चेष्टाहि केली. नंतर थोडा-वेळ भाषण होऊन मंडळी उठली. माधवराव, डॉ० छत्रे वगैरेंना पलीकडच्या खोलींत गेल्यावर ' हें प्रायोपवेशन आहे. त्यांना कोणी त्रास देऊं नका ' असें टिळकांनीं स्पष्ट सांगितलें व तेथपासून प्रायोपवेशनाची कल्पना प्रचलित झाली.

अशा रीतीनें दहा दिवस निघून गेले. या दहा दिवसांत क्षीणता इतकी वाढली की धरून उभें केलें तरीहि नुसता भस्माचा हात फिरविण्यापलकिडे अथवा नमस्कार करण्यापलीकडे उभेंदेखील राहवत नव्हतें. अंथरुणावरदेखील धरून बसवावें लागे. परंतु वाड्यांत पाहुणेरावळे दोन आजारी माणसें त्यांचे संबंधी लोक अशी सर्व तऱ्हेची एकच धूम उडाली असल्यामुळें काय होत आहे हें लक्षांत येण्यालाहि कोणाच्या अंतःकरणास फुरसत नव्हती. तरीहि दुखणें जास्त लांबलें. तेव्हां तसाच प्रसाद उरकून घेऊन धुळेकरांस जाऊं द्यावें. असें कोणी म्हणाले त्यावर ' छे, छे, सर्व कांहीं ठीक होईल व प्रसाद होऊन सारेजण आनंदानें जातील' असें त्यांनीं सांगितलें. पुण्यास असा मुक्काम असतां दिवाण-खान्यांत रात्रीं अष्टपदीस बसण्याचा धुळेकरांचा नेम होता. त्याप्रमाणें शेवटचे ५।७ दिवसखेरीज करून रोज बसत असत. अशाच एका प्रसंगीं आंगांत ताप आहे तेव्हां अष्टपद्यास बसणें सध्यां बंद करा म्हणूल विनंति केली असतां "वेडा आहेस, ताप होईल कां ताप जाईल? अरे बाबा ' कलिकलुषज्वरखंडने' " असें अतिशय संतोषानें त्यांनीं उत्तर दिलें. नेहमींप्रमाणें मारुतीराव घाटगे, पाषाणकर, बापुराव पोरे वगैरे माळी मंडळी महाराजांचें दर्शनास आली असतां "सांभाळा रे बुवा श्रीतुकाराम महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें ' कलियुगीं नर। पोटाचे**चे चाकर।' असें आहे " असें म्हणून महाराजांची आठवण ठेवण्याचा अखेरचा उपदेश केला व तेथून मात्र अजीबातच भाषण बंद केलें. सुंदरलाल डॉक्टर देशास जातों म्हणून निरोप घ्यावयास आले तेव्हां ' जाशील पुढें

उद्यांच कशाला जातोस' म्हणून त्यांच्याशीं मात्र बोलले. मध्यंतरीं कै. ति॰गं॰ भा॰ गयाताईनीं स्वतःहि बोलण्याची खटपट करून पाहिली तरीदेखील कांहीं उपयोग झाला नाहीं. अशा स्थितींत १० दिवस गेले.

यांना बरेच दिवसापासून थोडासा कफाचा विकार होता व त्यांच्या खान-पानादि एकंदर शरीरधर्मांच्या मानानें लघवीसहि थोडें जास्तच जावें लागे. उभें राहण्याची शक्ती नसल्यामुळें पाटावर बसवून उचलून गच्चीवर न्यावें लागे. कारण दिवाणखान्यांत कांहीं तरी घेऊन लघवीस बसणें त्यांना संमत नव्हतें. इतकेंच तर काय पण कफामुळें वरचेवर थुंकावें लागे तें देखील त्यांनीं शक्ती होती तोंपर्यंत उठून बसून खिडकींतून थुंकावें. जेव्हां वारंवार उठण्याची शक्ती राहिली नाहीं तेव्हां त्यांनीं अजीबात थुंकणेंच टाकून दिलें. गच्चीवर नेलें असतां काय होईल तेवढेंच. एरव्हीं कितीहि आग्रह केला तरी नुसतं तस्तांत थुंक-ण्याचेंहि कबूल करीनात. महाराजांचें नांव घेणें मात्र अखंड चालूंच होतें.

शेवटीं मंगळवारचा दिवस उजाडला व 'आज आतां दूध प्यावयास हर-कत नाहीं, १० दिवस झालें;' अशी गोविंदबुवांनीं आठवण दिली. तेव्हां मात्र चिडून त्यांच्यावर रागावले व 'हो कबूल केलें आहे, मी घेतों', असें म्हणून त्यांनीं एक मेझर ग्लास आणविला व मोजून एक औंसभर दूध घेतलें. त्याच रात्रीं त्यांना अतिशय घामहि सुटला तेव्हां भस्म आणि सुंठीची पूड एकत्र करून अंगास चोळावयास सांगितलें. परंतु चोळणाऱ्याच्या हलगर्जीपणामुळें ती अव्यवस्थित रितीनें वाटेल तशी चोळली जाऊन उलट त्यांच्या अंगाची फार आग झाली व त्यांना बराच त्रासहि झाला. बुधवारचे दिवशीं त्यांनीं मेझर ग्लासनें मोजून २ औंस दूध घेतलें व कडुनिंबाचा पाला काढून आंगावर टाकण्यास सांगितलें; आणि गुरुवारीं तर त्याचप्रमाणें ३ औंस दूध घेऊन दिवसभर निंबाचे पाल्यांतपडून राहिले. तेव्हां भयंकर क्षीणता दिसत असतांही आतां हे उठण्याच्या मार्गास लागले असा भ्रम मंडळींत उत्पन्न झाला.

गुरुवारीं संध्याकाळीं सुंदरलाल आहे कीं गेला म्हणून मुद्दाम चौकशी केली व त्यांनीं दिलेला काढा औषधें आणून 'आतांचें आतां तयार कर' म्हणून सांगितलें आणि थोड्या वेळानें औषधें आणिली कां म्हणून चौकशी करून 'काढा कोळशावर कर, नाहीं तर स्टोव्हवर करशील' असें बजाविलें. त्यावरून तर सर्वांना इतकी आशा उत्पन्न झाली कीं, आतां चारदोन दिवसां-

तच ते हिंडूं फिरूं लागतील अशी खात्री वाटून जरा निसुर वाटूं लागलें. श्री० अण्णासाहेब यांचे भक्त रा. माधवराव बापट यांनाहि त्याच दिवशीं सवड होऊन त्या रात्रीं ते आले होते, त्यामुळें त्या दिवशीं जागण्याचें काम त्यांचेवर टाकून नेहमीं शुश्रूषा करणारे श्रीभक्त भाउराव लंबे, गोविंदबुवा, माधवराव वगैरे मंडळींनीं त्या दिवशीं निजावयाचें ठरविलें व राजश्री बापट हे जवळ जागत बसले. रात्रीं १॥ वाजण्याचे सुमारास किती वाजले म्हणून त्यांनीं एकदां चौकशी केली. त्यानंतर पुढें कांहींच चळवळ केली नाहीं.

सकाळीं सुमारें ५॥ वाजतां मंडळी उठून पहातात तों श्वास नेहमींपेक्षां जोरानें चाललेला होता व हातांच्या अंजलीनें नेहमींप्रमाणें न्यास करण्याचा व नमस्काराचाहि सपाटा सुरू होता. त्यावरून घाबरून जाऊन मंडळी भोंवतीं येऊन बसली व कोणी महाराजांचें नांव घेऊं लागले कोणी कांहीं बोलण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु फार तर मान वळवून त्यांच्याकडे शांत व स्थिर दृष्टीनें पाहण्यापलीकडे त्याचा उपयोग झाला नाहीं. तेवढें मात्र करीत होते. त्यांचें पादोदक घ्यावें अशी इच्छा होऊन तेवढ्यांतल्या तेवढ्यांत त्यांच्या पायावर अभिषेक सुरू केला. परंतु तशा स्थितींतही त्यांनीं झटकन् पाय ओढून घेतला. असें होतां होतां ८॥ वाजले व 'लाभ' संज्ञक उत्तम वेळ सुरू झाली. तितक्यांत श्रीभक्त सितारामपंत दांडेकर हे देवपूजा उरकून नित्याप्रमाणें नमस्कारास आले व त्यांनीं पायांवर डोकें ठेविलें, तोंच श्वासाचा भाता एकदम बंद झाला.

शांत मुद्रा आणि स्थिर गंभीर दृष्टि यांच्यामुळें ही गोष्ट चट्कन कोणाचे लक्षांतहि आली नाहीं; परंतु लवकरच सर्व लक्षांत आलें. हां हां म्हणतां ती बातमी चहूंकडे पसरली व सारें शहर एकदम एकाद्यास धक्का बसावा तसें झालें; परंतु त्यांतल्या त्यांत एक लक्षांत ठेवण्याजोगती गोष्ट अशी होती कीं खुद्द श्री० अण्णासाहेब यांचे घरीं काय अथवा इतरत्रही काय आपली कांहीं तरी प्रचंड हानि झाली याची प्रत्येक अंतःकरणास जाणीव असूनहि उदासीनता आणि दुःख यांच्याऐवजीं जिकडे तिकडे एक प्रकारचा उत्साह भरल्यासारखें झालें होतें. देवाच्या उत्सवासारखा एकादा समारंभ असला म्हणजे जशी माणसांची स्थिती होते तशीच सर्वांची स्थिति होऊन शहरांतील इतर कामें बंद पडून श्री० अण्णासाहेब यांचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां लोकांच्या

झुंडीच्या झुंडी वाड्यापाशीं जमूं लागल्या. लोकमान्यांस वर्दी पोंचून रा० भाऊसाहेब गोखले व इतर मंडळी यांच्या सल्ल्यांनीं पुढील कार्यक्रम आंखून त्याप्रमाणें लागलीच छापील पत्रकें वाटण्याची त्यांनीं व्यवस्था केली.

इतक्या वेळांत प्रसिद्ध फोटोग्राफर रा० गोखले यांचेकडून श्री० अण्णासाहेबांचे दोन फोटो काढविण्यांत आले. फोटोच्या वेळीं श्वास थांबून २।४ तास होऊन गेले होते, तरी देखील खुर्चीवर शरीर हवें तसें ठेवण्यास व त्याची हवी तशी मांडणी करण्यास मुळींच त्रास पडला नाहीं. इतकेंच तर काय पण अगदीं अखेरपर्यंत त्यांचे सर्व अवयव एकाद्या चालत्या बोलत्या माणसाप्रमाणें पूर्ण मोकळे असून मुद्रा प्रसन्न व टवटवीत होती. डोळे उघडे असल्यामुळें त्यांना स्नान घालून धोतर नेसवून दर्शनाकरितां चौकांत खुर्चीवर बसविलें, तेव्हां तर सर्वांसच हे आहेत कीं गेले अशी भ्रांति उत्पन्न झाली. दर्शनास हिंदु अहिंदु अशा सर्व जातींचीं आणि सर्व दर्जाचीं स्त्रीपुरुषें सारखीं येत होतीं. शेवटीं ठरल्याप्रमाणें २॥ वाजतां त्यांना पालखींत बसविण्यांत आलें व भजनी दिंड्या-पुष्पें, गुलाल, हारतुरे, पैसे, बतासे वगैरेंचा वर्षाव इत्यादि प्रसंगोचित सर्व समारंभानें शनवारवाड्यास वळसा घालून रामेश्वराहून चित्रशाळेचा कोंपरा व तेथून मोदीचा गणपती गायकवाड वाडा. वर्तकाचा हौद, शनवारचा मारुती आणि श्री ओंकारेश्वर या मार्गानें हल्लीं समाधी असलेल्या जागीं मिरवीत नेऊन ठेवण्यांत आलें. तेथें तुलसीचंदनादि पुण्यकाष्टें वगैरे सर्व व्यवस्था होतीच. प्रसंगास उचित असें लोकमान्यांचें थोडेंसें भाषण व विरुपाक्ष मठाचे आचार्य बोधानंद भारती यांचेंहि थोडें भाषण होऊन त्या दिव्य शरीराचा सर्वांनीं निरोप घेतला. अमूर्त रूपानें ते पुण्यांत अखंडच वास्तव्य करीत असतील यांत शंका नाहीं!

# खंड २ रा.

## ‘ साक्षात्परिचय ’

सा केतकीपत्रसुगौरमूर्तिः ।
साकेतकेशस्य यशःप्रपूर्तिः ॥
संकेतरेखा नवभारतस्य ।
दृशां नराणां कृतकृत्यतेव ॥

श्रीअण्णासाहेब यांच्या चारित्रांतील सामान्य गोष्टींचें आतांपर्यंत निरूपण झालें. त्यामुळें अण्णासाहेब यांच्याविषयीं त्यांच्या प्रत्यक्ष व्यक्तीची अशी सर्व माहिती मिळावी, अशी इच्छा वाचकांस होणें साहाजिकच आहे; म्हणजे अण्णासाहेब यांचा खाजगी आयुष्यक्रम कसा होता, कुटुंबसुख अथवा सांसारिक इतर सुखें यांची अनुकूलता त्यांस कशी होती, त्यांचा त्यांनीं उपभोग कितपत घेतला, व कसा घेतला, ते कसे राहत, कसे वागत, कसे बोलत, इतकेंच नाहीं, तर काय खात, काय पांघरीत, कोणाशीं कसे वागत, इत्यादि बारीकसारीक गोष्टी देखील मोठ्या मनोवेधक व बोधप्रद असतील, असें वाचकांस वाटणें, व त्या माहितीकरितां त्यांची जिज्ञासा जागृत होणें, साहजिकच आहे. आणि त्याप्रमाणें त्या गोष्टी तशाच आहेतही. थोर पुरुषांच्या चरित्रांतील विशेष हाच असतो कीं, त्यांच्या आयुष्यांतील मोठमोठ्या गोष्टीपेक्षांही लहानसहान प्रसंग व असल्या बारीकसारीक गोष्टीच अधिक मनोरंजक व बोधप्रद असतात. श्रीअण्णासाहेब यांच्या संबंधींही अशीच गोष्ट आहे. त्यांच्या संबंधींचें सर्वच कांहीं विलक्षण, परंतु कांहींतरी विशेष शिक्षण देणारें असें; परंतु बॉस्वेलचें शहाणपण अंगीं नसल्यामुळें या संबंधाची जिज्ञासा फारच अल्पप्रमाणानें पुरी करितां येईल, याचेंच वाईट वाटतें. असो.

अगदीं प्रारंभींच सांगितलें आहे कीं, यांचा वर्ण कागदी निंबासारखा सुगौर असून पिंड भव्य व बळकट होता. आधींच कांतिमान् शरीर, त्यांत गर्भश्रीमंतींत रुळलेले, त्यांत सर्व तऱ्हेच्या अव्याहतप्रभुत्वाचें विलक्षण राजतेज त्याच्यावर खेळून राहिलेलें, व त्यांतच दया’ ज्ञान आणि शांति यांची

प्रभा मिळून गेलेली,—अशी ती विलक्षण मूर्ति पाहिली म्हणजे पाहणारास क्षणमात्र एक विलक्षण प्रकारचा आदर, पूज्यभाव व भीति उत्पन्न होत असे. परंतु त्यांतल्या त्यांतच, प्रखर तेजाच्या जोडीलाच सौम्यपणाचा भास होऊन आप्तपणा उत्पन्न होई, व मोठा संतोष वाटे. एकादा विजेचा लोळ आपली प्रखरता कायम ठेवून, फक्त दाहकता मात्र टाकून देईल तर तो जसा दिसेल, तशीच पुष्कळ अंशीं, यांच्यासंबंधानें स्थिति होती. रावापासून रंकापर्यंत, आणि लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकासच, यांच्या ठिकाणीं, असलेल्या प्रखर तेजाचा भास होत असे. परंतु त्यांतील दाहकता अजीबात निघून गेली असल्यामुळें, मोठा आल्हाद होऊन ‘ तत्त्वालोकनिरस्तमोहतमसां अध्यात्मविद्याजुषाम् । अत्रब्रह्मविदां निसर्गमधुरं जागर्ति सौम्यं महः ’ असें त्याच्या तोंडून बाहेर पडे. अलीकडे वृद्धापकाळामुळें ते किंचित् ठेंगणें दिसत असत, परंतु त्यांच्या पूर्व वयांत पाहिलेले लोक असें सांगतात कीं त्यांची उंची भरपूर म्हणजे जवळ जवळ पावणे सहा फूट होती, व त्या मानानेंच त्यांचे इतर सर्व अवयवही पुष्ट व रेखीव होते.

त्यांच्या सर्व इंद्रियशक्ति मुळापासूनच अतिशय प्रखर होत्या, व शेवटपर्यंत त्या तशाच राहिल्या होत्या. डोळे विस्तृत व मोठे नव्हते; परंतु अतिशय पाणीदार व शरद् ऋतूंतील चंद्राच्या कोरेप्रमाणें लकलक करीत असत. आणि नजर मोठी तीव्र, भेदक, परंतु स्थिर व गंभीर अशी होती. कोणीही मनुष्य त्यांच्याकडे आला असतां, त्याच्याकडे आपल्या भेदक दृष्टीनें सारखे दोन दोन मिनिटें टक लावून पाहण्याची त्यांना संवय होती; आणि त्या एकसारख्या दृष्टीपुढें, कसाही मनुष्य असला, तरी तो विरून जात असे, व त्याच्या अंतःकरणाचा सहजभाव जो कांहीं असेल, तो अखेरीस त्याच्या चेहऱ्यावर त्याची इच्छा नसतांही प्रतिबिंबित झाल्याखेरीज राहत नसे ! एकाद्या विशाल समुद्राच्या तळाशीं हट्टानें दडून बसलेल्या मगराला ढोसून जसें वर काढावें, त्याप्रमाणें अनेक कृत्रिम भावांच्या अगदीं तळाशीं लपून बसलेल्या मनुष्याच्या खऱ्या स्वभावाला अशा रीतीनें उघडा पाडून, ते त्याची परीक्षा करून टाकीत, व त्या धोरणानेंच पुढें त्याच्याशीं वागत; आणि एक किंवा दोन मिनिटांच्या अशा रीतीनें झालेल्या मतांत पुढें जन्मभरही कधीं त्यांना फरक करावा लागल्याचें उदाहरण नाहीं. उलट पांच पांच

दहा दहा वर्षांच्या अवधीनंतरही अण्णासाहेब यांनीं भाकीत केल्याप्रमाणेंच त्या माणसाचा स्वभाव व्यक्त होऊन अण्णासाहेब यांच्या परीक्षेची मौज वाटे. अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

यांची दृष्टीही फार बारीक व दूरचें पाहणारी होती. क्राफर्ड मार्केटचें मधलें घड्याळ, तेथून सुमारें मैल सवा मैल अंतरावरून पाहून त्यांत किती वाजले आहेत हें ते सांगत असत ! या अशा दृष्टीचा रोग्यांची परीक्षा करतांना त्यांना फार उपयोग होत असे. कित्येक वेळेला एकही प्रश्न विचारल्यावांचून पुढें वर्षावर्षांनीं देखील प्रगट होणारे महारोगासारखे रोगही आधींच सांगितलेले पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटे. परंतु अशा गोष्टी ते कांहीं अतिमानसतेनें करीत असें मात्र नाहीं. केवळ सूक्ष्म अवलोकनानेंच त्या त्यांना अवगत होत. एकदां एक गृहस्थ अण्णासाहेब यांच्याकडे येऊन कांहीं विचारूं लागला. नेहमींप्रमाणें त्याच्या-कडे उगीच वेड्यासारखें कांहीं वेळ पाहिल्यावर अण्णासाहेब यांनीं त्याला सांगितलें कीं "तुला महारोग होणार आहे, आतांपासून काळजी घे ! " हें ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलें; कारण तसा कांहीं प्रकार असल्याचा नुसता संशय येण्याचेंही कारण नव्हतें त्यावर " हें कशावरून सांगतां ? " असें कोणी विचारल्यावरून त्यांनीं त्या सर्वांना त्या गृहस्थाचा चेहरा नीट पहावयास सांगितलें. तरीही कोणाच्या लक्षांत येईना: तो गृहस्थ नुकताच उन्हामधून आला होता, व त्याचा चेहरा घामानें डबडबलेला होता. अशा स्थितींत कांहीं सूक्ष्म जागा मात्र अशा होत्या कीं तेथें मुळींच घाम येत नसून उलट त्या कोरड्या होत्या. ही गोष्ट लक्षांत आणून देऊन अण्णासाहेब यांनीं आपलें निदान सर्वांस समजावून दिलें. अशा अनेक गोष्टी घडत.

एकदां एका गृहस्थाच्या कांहीं कामांत अतिशय विश्वासू माणूस म्हणून त्याच्या एका स्नेह्यास कोठें पत्र देऊन पाठवावयाचें होतें. हा स्नेही त्याच्या मंडळींत मोठा देशाभिमानी, व शूर समजला जात असे. अण्णासाहेब यांनीं त्यास पूर्वीं कधीं पाहिलेंही नव्हतें. अण्णासाहेब यांच्याकडून पत्र घेण्याकरितां ज्यावेळेस तो पुढें आला, त्यावेळीं अण्णासाहेब यांनीं त्याच्याकडे फक्त एकवार नीट पाहिलें, व लागलेंच, आपला बेत फिरवून हातांतील पत्र फाडून टाकलें ! या त्यांच्या करण्याचें त्यावेळीं सर्वांसच नवल वाटलें. परंतु १५ वर्षांनंतर एका

कुऱ्हाडीच्या भोकांत मोठ्या ऐटीनें वसलेल्या या दांड्यास पाहून अण्णासाहेब यांच्या परीक्षेचें प्रत्येकासच आश्चर्य वाटलें.

त्यांचीं इतर इंद्रियेंही अशाच प्रकारचीं तिखट आणि अखेरपर्यंत बळकट होतीं. फक्त दांत मात्र लौकर पडले. शेवटच्या १०।१२ वर्षांमध्यें एकही दांत उरलेला नव्हता. परंतु त्यामुळें शब्दाच्या उच्चारांत यत्किंचितही व्यंग उत्पन्न न झाल्यामुळें, आणि त्यांच्या ठिकाणीं असलेल्या एका विशेष प्रकारच्या कर्मकौशल्यामुळें खानापानादि व्यवहारही अशा रीतीनें होत कीं, त्यांना दांत नाहींत, हें सांगूनही खरें वाटत नसे! दांत लौकर पडण्याचें कारण ते असें सांगत कीं मद्रासेस असतां, त्यांना अठ्ठावीस महिने रोज सारखें रक्त पडत असे, त्यामुळें जी क्षीणता आली तिचा परिणाम दातांवर होऊन दांत गेले.

यांचें भव्य कपाळ, व एकंदर मस्तकाचा आकार, यांत कांहीं विशेषपणा होता. तशा प्रकारची ठेवण रोमन लोकांच्या कांहीं पुतळ्यांत सांपडते. सामुद्रिक शास्त्रास अभिप्रेत असलेल्या साडेतीन वळ्या, यांच्या कपाळावर पूर्ण होत्या, आणि नाक तर हुबेहुब शिवाजी महाराजांच्या नाकासारखें होतें. अलीकडच्या काळांत शीतोष्णांच्या माऱ्यानें त्यांचा चेहरा किंचित् काळवंडला होता, व अनशन, परिश्रम आणि झोपेचा अभाव इत्यादिकांमुळें शरीर आटून त्वगस्थिमात्रच राहिलें होतें; परंतु एकंदर शरीरावर असलेलें तेज मात्र विलक्षण होतें, व शरीराची तरतरी तर जास्तच वाढली होती.

कांहीं क्वचित् थोडे प्रसंग टाकले तर, त्यांची मुद्रा नुसती प्रसन्नच नव्हे, तर आनंदित दिसे. विषय प्रतिपादन करतांना कोटिक्रम, विनोद, वगैरे करून, स्वतः यथास्थित हंसण्याची, व त्यामुळें बाजूच्या मंडळींच्या मनावरील सर्व तऱ्हेचा ताण निघून जाऊन त्यांनींही हंसण्याची, त्यांना संवय होती. अशा वेळीं त्यांच्या मुखावरील एकाद्या लहान पोरासारखा सरलभाव पाहून फार आश्चर्य वाटे. क्वचित् कांहीं प्रसंगीं मात्र त्यांचा चेहरा उदास व चिंतामग्न असा दिसे. त्यांच्या मूळ तापट स्वभावामुळें निरहंकारपणानें बोलतांना लहान पोरांप्रमाणेंच मधून मधून थोडेसें चिडण्याची त्यांना संवय होती. आणि भोंवतालचीं मंडळी जर अधिक तरुण असलीं, अगर आम्हीं मुलेंच जवळ असलों, तर ते अधिकच चिडल्यासारखें करून एकाद्या लहान मुलासारखाच वाद घालीत. परंतु त्यामुळें सहवासाची गोडी उलट अधि-



श्री अण्णासाहेब आणि लोकमान्य.

कच वाढत असे. आपल्या प्रत्येक क्रियेमध्यें कांहीं उपयुक्तता असावी असें त्यांचें नेहमींचें धोरण असल्यामुळें, अशी उपयुक्तता त्यांच्या दृष्टीनें ज्या बोलण्यांत व वागण्यांत नसे, तसें बोलणें व वागणें, अथवा तशीं माणसें यांचा प्रसंग उपस्थित झाला असतां चिडखोरपणानें अथवा तिरसटपणानें एकदम तटका तोडून टाकण्याची त्यांना संवय होती; आणि जरी ते अत्यंत प्रेमळपणानें व कनवाळूपणानें वागत असत, तरी उगीच कोणचीही गोष्ट चिकटून घेणें अगर वाढूं देणें, त्यांना केव्हांही आवडत नसे. त्यामुळें प्रथमतः माणसांस त्यांचा स्वभाव उग्र व कठोर भासत असे व त्यामुळें तीं बिचकून जात. परंतु थोडासा कालावधि गेला, म्हणजे या फणसाच्या आंतील गऱ्यांची गोडी माणसांस लागूं लागे.

लोकसमाजांत वावरत असतां कितीही मोठा मनुष्य असला तरी त्याच्या अंतःकरणांतील कित्येक मानवी प्रवृत्तींना पोषक अशी परिस्थिति थोडीबहुत त्याला हवी तशी मिळते, व अशा प्रसंगीं तो थोडा तरी स्वतःस विसरून जातो. या दुर्बलतेचा फायदा घेऊन सामान्य माणसांना थोर पुरुषांस चिकटतां येतें, व उलट पक्षीं या थोर पुरुषांच्या चरित्रांत त्या चिकटण्याचा परिणाम, अर्थातच वाईट परिणाम, थोडा तरी आढळून येतो. अशा प्रकारें आत्मविस्मृति होऊन दुर्बलतेच्या आहारी निमिषभरच कां होईना, पडल्याचें एकही उदाहरण अण्णासाहेब यांच्या आयुष्यांत आढळेल किंवा नाहीं, कोण जाणे. त्यामुळें त्यांना आपण होऊन, अगर सहजासहजीं चिकटणें कोणासही शक्य नव्हतें. जे कांहीं दोन चार जीव त्यांना चिकटल्याचे भासतात, अगर कोणाचा कांहीं थोडा फार लळा दिसतो, तो त्यांनीं स्वतःच लावून घेतल्यामुळेंच आहे. यामुळें माणसांच्या अखंड सहवासांत राहूनही, आपणच उठविलेल्या कल्लोळांत, स्वतःच्या इच्छेनें विहार करणाऱ्या समुद्रांतील गजराजाप्रमाणें त्यांची एकाकिता अथवा स्वातंत्र्य हें नेहमीं अभंग असे; व अशा प्रकारच्या जललीलेकडे ज्या एका प्रकारच्या संतुष्ट व कौतुकाच्या नजरेनें तो गजराज पाहील, तशाच तऱ्हेचें कौतुकपूर्ण अतिशय कोमल, व दयार्द्र असें स्मित, व त्याला अनुरूप अशी दृष्टि, त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीं दिसत असत त्यांचीं उपलब्ध असलेलीं निरनिराळ्या काळचीं छायाचित्रें पाहिलीं असतां, त्यांच्या स्वभावांतील वरील सर्व छटांची साक्ष दिसून येते; असाच कांहीं

विलक्षण योगायोग तीं चित्रें उतरतांना सहज घडून आला आहे. डेक्कन कॉलेजांतील जरीच्या टोपीचा व ऐटबाज पोषाकाचा फोटो, १९०१ सालीं रा. माधवराव बापटांनीं घेतलेला लेव्ही नंतरचा फोटो, श्री. भ. दादा दांडेकर यांचे बरोबर घेतलेला माळेसारख्या उपरण्याचा फोटो, रा. ओकांनीं घेतलेला तिरसट मुद्रेचा उभा फोटो, व त्याप्रमाणें हातानें उतरलेली तसबीर, गायकवाडवाड्यांतील लोकमान्यांच्या भाषणाचे अध्यक्ष असतांना घेतलेला फोटो, चित्रमयजगत्चें पेन्सिल स्केच, व शेवटीं आळंदीस घेतलेला रा. कवड्यांचा फोटो, हे सर्व पाहिले असतां त्यांच्या स्वभावांतील या निरनिराळ्या छटा, व कमलपत्राप्रमाणें त्यांत अलिप्तता दाखविणारा 'दृष्टी माजीं दृष्टी नाहीं,' अशा प्रकारचा कांहींसा भाव, हीं स्पष्टपणें दिसून येतात. कदाचित् त्यांच्या आंतरवृद्धीचा क्रमही त्यांत सांपडूं शकेल.

अशा तऱ्हेची वस्तुस्थिति असतांही ते व्यवहारांत पुष्कळ प्रसंगीं दुसऱ्याच्या तंत्रानें वागत असल्याचें दिसत, आणि विशेषतः देवधर्माच्या व महाराजांच्या गोष्टी आल्या म्हणजे तर त्यांना स्वतःची बुद्धि अगदींच नसल्यासारखें होऊन, ते कोणाही माणसाच्या आहारीं जात, अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु त्यांच्या चरित्राचें बारीक निरीक्षण केलें तर ती अगदीं चुकीची आहे असें आढळून येतें. भूतमात्रांवरील त्यांच्या प्रेमामुळें माणसागणीक त्याचे लाड पुरवावयाचें त्यांना जणूं काय एकाद्या एकुलत्या मुलाच्या आईपेक्षांही जास्त वेड होतें. कोणाच्या अंतःकरणास धक्का बसूं नये, आणि अगदींच अपायकारक गोष्ट नसेल, तर होतां होईल तों त्या माणसाच्या पद्धतीनें, त्याच्या अंतरात्म्यास तृप्ति व्हावी, असें त्यांस वाटत असे; व त्यामुळें ते माणसाच्या थोडेसे आहारीं गेल्याचे भासत. परंतु अशा रीतीनें कितीही वागत असतां, स्वतःच्या वर्तनाच्या कोणत्याही तऱ्हेच्या मर्यादा त्यांनीं कधींच पालटल्या आहेत अगर त्यामुळें त्यांच्या वर्तनांत कांहीं अपवाद उत्पन्न झाला आहे, असें कधींच झालें नाहीं. नाना प्रकारचे शौक ज्याप्रमानें त्यांनीं अमर्यादपणानें पुरवून घेतले, त्याचप्रमाणें स्वतःच्या स्वाधीनतेनेंच हेंही वेड त्यांनीं सांभाळलें होतें.

अशीच गोष्ट महाराजांच्या संबंधींही आहे. अण्णासाहेबांना काय, कोणीही येऊन महाराजांच्या नांवावर कांहींही सांगावें, व महाराजांच्या आणि देव-

धर्माच्या नांवाखालीं त्यांच्याकडून वाटेल तसा मतलब साधून घ्यावा असे उद्गार काढतांना प्रत्यक्ष त्यांच्या चिरंजीवांसारखी निकट परिचयाचीही मंडळी आढळतात. ही एक त्यांच्या स्वभावांतील मोठीच दुर्बळता होती, ( Weak point ) असें, त्यांच्यावर निःसीम भक्ति आहे, असें समजणारे भक्तही म्हणतात. परंतु एक गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. महाराजांनीं प्रत्यक्ष जें कांहीं सांगितलें असेल, मग तें भोजनानंतर लघुशंका करण्यासारखा एकादा आरोग्याचा नियम असो, अथवा श्रीतुकोबारायांच्या अभंगांतील ' कामकर्द ' शब्दासारखा साधा शब्दपाठ असो, तो त्यांना केव्हांही शिरसावंद्यच असे; आणि तें ठीकच होतें. कारण सर्व तऱ्हेनें होतां होईल तों धर्ममर्यादा सांभाळण्याचा त्यांचा कटाक्ष होता. श्रीमहाराजांना ते नुसते गुरूच नव्हे, तर ' देवांचाही देव ' असे म्हणत असत, व त्यांच्यापासूनच त्यांनीं स्वतःच्या अनन्य शरणागतीस आणि अहंकारत्यागास सुरुवात केली होती. हा शिष्य-धर्म त्यांनीं आमरणांत कडकडीतपणें आचरिला, व त्यामुळें महाराजांचें कोणी नुसतें नांवही काढलें तरी, त्यांच्यांत भक्तिभाव जागृत होत असे व तो प्रसंग, ती वस्तु अगर तो माणूस यांच्याविषयीं त्यांना साहजिकच मोठा लोभ वाटे. असें जरी होतें, तरी देखील उगीच महाराजांनीं सांगितलें म्हणून कोणी कांहीं सांगितलें, म्हणून ते आपल्या स्वतःच्या ठराविक क्रमांत बदल करून त्याच्यामागें लागत असें कधीं घडलें नाहीं, अथवा असा माणूस व त्याच्या गोष्टी जरी त्यांना आवडत तरी त्याचे गुणावगुण त्यांच्या नजरेंतून कधीं सुटले आहेत, व त्यामुळें त्यांची न कळत कधीं फसगत झाली आहे, असें कधींही घडलें नाहीं.

त्यांचा स्वभाव कमालीचा सर्वसंग्राहक असे, त्याप्रमाणेंच महाराज व देव-धर्म यांच्या नांवाखालींही कोणी कांहीं सांगितलें अगर केलें, तर तें ते आपल्या संग्रहीं ठेवीत, परंतु अशा परोक्ष माहितीवर त्यांनीं स्वतः कांहीं केलें नाहीं, अगर दुसऱ्यास करावयासही सांगितलें नाहीं. देवभोळेपणाच्या असंभाव्य वाट-णाऱ्या कित्येक गोष्टी त्यांच्या सांगण्यांत नेहमीं येत, व त्यामुळें कांहीं " सत्य-मार्गी " लोकांस येवढा प्रचंड बुद्धिमान् थोर पुरुषही अशा बाबतींत केवळ निर्बुद्ध व्हावा, याची मनापासून कींव येई. परंतु अण्णासाहेब यांच्या भाषणांत व वर्तनांत एक ठराविक नियम असा होता कीं ते आपल्या कोणत्याही वर्त-

नाचा खुलासा कधींही करीत नसत. त्यामुळें त्याची कार्यकारण-संगति ज्यानें त्यानें आपापल्या परीनें वाटेल तशी लावून घ्यावी, असें होई. त्याला कधीं त्यांनीं खोडूनही काढलें नाहीं. परंतु भाषणाच्या बाबतींत मात्र असें नव्हतें. उलट अत्यंत क्षुल्लक व लहानसान गोष्टीपासूनही ' हा माझा स्वतःचा अनुभव, व हें मला अमक्या अमक्या वेळीं असें सांगितलें. ' असें नुसतें तारीखवारच नव्हे तर जवळ जवळ तास घटकांसह देखील सांगत. कोणाही मनुष्याला उगीच वाईट समजावयाचें नाहीं, व प्रत्यक्ष पुरावा असल्याखेरीज म्हणावयाचें नाहीं, असा त्यांचा नियम असल्यामुळें कोणी कांहीं सांगितल्यास त्याचें ऐकून ठेवावें, व प्रसंग आला असतां, त्याच्या नांवानेंच जसेंच्या तसें सांगावें, एवढेंच ते करीत. त्याची शहानिशा करीत बसण्याची त्यांना कधीं आवश्यकता भासलीच नाहीं, आणि तितका वेळही पण त्यांना नव्हता. बरें, पुन्हा त्या गोष्टी अशा होत्या, कीं त्यांपासून जें सारभूत तत्त्व निघे, तें आचरण्यापासून कधीं कोणाचें अकल्याण होणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत इतिहाससंशोधनाचें फाजील महत्त्व त्यांनीं बाळगिलें नाहीं, यांत विपरीत तें काय झालें ?

त्याचप्रमाणें देवधर्माच्या व महाराजांच्या नांवाखालीं, लोक त्यांना वागण्यास लावीत, अगर त्यांच्यापासून वाटेल तो मतलब साधून घेत, हाही आरोप वृथा आहे. देण्याजोगतें जें कांहीं जवळ असेल, तें त्यानीं कधींच कोणास नाहीं म्हटलें नाहीं, अगर स्वतःच्या चारित्र्यास धक्का बसणार नाहीं, असें जें कांहीं करितां येण्याजोगतें असेल, तें कोणाकरितां करण्यास त्यांनीं कधींही मागें घेतलें नाहीं; मग तो एकदा घोडेशास्त्र्यासारखा अतिरुद्री ब्राह्मण असो,अगर निळकंठराव* सहस्रबुद्ध्यासारखा एकादा शिखासूत्रत्यागी पीर असो. तेव्हां हा त्यांच्या स्वभावांतला Weak point आहे असें म्हणण्यांत काय जीव आहे ? श्रीभक्त तीर्थस्वरूप गं. भा. गयाताई यांच्याविषयीं त्यांच्या

---

* हे परोपकारी गृहस्थ पुण्यास सुप्रसिद्धच आहेत. वेदमार्गातील आचार धर्माशीं यांचा कितीहि विरोध असला तरी हे कट्टे शंकरमतानुयायी व आचार्य भक्त आहेत. परोपकार परायणता आणि मनःपूतं समाचरेत् असा यथार्थ स्वभाव यामुळें अण्णासाहेबांचा यांच्यावर लोभ होता.

मनांत अतिशय आदर होता, व त्यांना ते फार मानही देत, आणि होतां होईल तों त्यांचा शब्द त्यांनीं कधीं खालीं पडूं दिला नाहीं असें जरी होतें, तरीदेखील त्यांचे हाल होऊं नयेत म्हणूनही रोजचें म्हणणें आटोपल्याखेरीज तोंडांत कांहींही न घालण्याचा नियम त्यांनीं कधीं मोडला नाहीं, अथवा अखेरच्या प्रत्यक्ष त्यांच्या विनंतिनेंही आपल्या मौनाचा त्याग केला नाहीं. ही एकच गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगती आहे. त्यांच्या भोंवतीं अशा खऱ्या खोट्या देवऋ्यांचें एक कडें पडलेलें दिसे, व त्यांच्या सर्व चरित्रांत त्यांची गुंतागुंत झालेली दिसे, हें खरें. परंतु तो एक सहज घडून आलेला योग होता. अण्णासाहेब हे परमार्थाच्या मागें लागले, अशी समजूत असल्यामुळें इतर लोकांनीं त्यांच्याशीं बेतापुरतेंच वागणें, व अशा खऱ्या खोट्या देवऋ्यांनीं त्यांना घेरून टाकणें साहजिकच होतें. परंतु लक्षांत ठेवण्याजोगती गोष्ट हीच आहे कीं त्यांनीं आपण होऊन कधीं कोणास ‘ ये ’ असेंही म्हटलें नाहीं; व ‘ जा ’ असेंही सांगितलें नाहीं. साक्षित्वानें अखंड स्थिर राहणाऱ्या सूर्यावर अभ्रें यावींत व जावींत तसा हा प्रकार अगदीं शब्दशः घडला. वेदांतांतील दृष्टांत इतक्या तंतोतंत रीतीनें खरा झालेला इतरत्र कोठेंही आढळण्यांत येणें दुर्लभ आहे.

जी गोष्ट माणसांविषयीं तीच गोष्ट मनोविकाराविषयीं. कोणच्याही मनोविकाराला बळी पडणें त्यांना कधींच ठाऊक नव्हतें; त्यामुळें त्यांच्या सर्व क्रिया प्रसंगास जशा हव्या तशा सहज रीतीनें घडत, व त्यांच्या शक्तीचाही फाजील व्यय न होता, त्यांच्या धोरणाप्रमाणें सारीं कामें घडत. यामुळेंच वर सांगितल्याप्रमाणें विशेष प्रकारचें कर्मकौशल्य त्यांच्या वागण्यांत सर्वत्र आढळून येतें. प्रकृतीनें नियोजिल्याप्रमाणें स्वकर्मबद्ध जीवास प्रारब्धभोग भोगीत असतां हरएक प्रकारच्या क्रिया करणेंच भाग पडतें. तेव्हां त्या क्रिया मुकाट्यानें परंतु अशा कांहीं युक्तीनें करावयाच्या कीं त्यांचा शक्य तितका अधीक उपयोग आपल्या ध्येयाकडे करून घ्यावयाचा. या शहाणपणालाच भगवान् श्रीकृष्णांनीं ‘ योग ’ अथवा ‘ कर्मकौशल्य ’ असें म्हटलें आहे, आणि ही गोष्ट मनोविकार ज्याच्या स्वाधीन आहेत, व जो त्यांच्या आहारीं कधींही जात नाहीं त्यासच शक्य आहे. प्रत्येक गोष्टींतील असें वागण्याच्या हातोटीलाच त्यांनीं ‘ युक्तता ’ असें म्हटलें आहे, व त्याला अनुसरूनच श्रीमहा-

राजांनीं आपल्या एका पत्रांत ‘ परमार्थ हा कष्टसाध्य नसून युक्तिसाध्य आहे ’ असें म्हटलें आहे. पाणी पिण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीपासून तों शरीरत्याग करण्यासारख्या अत्यंत मोठ्या गोष्टीपर्यंतही त्यांच्या वागण्यांत अशी ‘ युक्ति ’ असे. अंगीं इतका मोठेपणा असतांही व त्यांचा निग्रह दुर्दम्य असतांही एकाद्या प्राकृत माणसाप्रमाणें कोणचीही गोष्ट मोठ्या बेतानें व हळू हळू शरीरास मानवून ते करीत; आणि असें करतांना त्यांस कधींही कमीपणा वाटला नाहीं. एखादी गोष्ट करावयाचें अथवा टाकावयाचें त्यांच्या मनांत आलें तर, त्यापूर्वी वर्ष वर्ष देखील तसा उपक्रम ते करीत, व लक्षांत न येण्याजोगत्या साहजिक रीतीनेंच ती घडवून आणीत. त्यांच्या एवढ्या प्रचंड व्यापांतून स्नानसंध्या इत्याहि त्यांचीं आह्निकें त्यांच्या बरोबर अखंड टिकलीं, याचेंही कारण हेंच आहे. त्या सर्वांची आपल्या खान-पान इत्यादि शरीर•धर्माशीं व स्थलकालाशीं अशी कांहीं अनुपूर्वी त्यांनीं गांठून दिली होती कीं, त्यामुळें तीं विनहरकत होत असत. असें करतांना अर्थातच त्यांना एक गोष्ट सोडून देणें जरूर होतें, आणि ती गोष्ट म्हणजे आमचे रात्रंदिनघटित कालमान ही होय.

सामान्य माणसाला जगांत त्याच्याशीं संबंध ठेवून वागावयाचें असतें आणि म्हणून त्याच्या कालमानाला सूर्याच्या उदयास्ताचें बाह्य परिमाण असणें ठीकच आहे. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें सर्व जगाला हे परिमाण देऊन स्वतः एकाकितेनें त्याच्या पलीकडे गगनविहार करणाऱ्या सूर्याप्रमाणेंच यांची स्थिति असल्यामुळें यांचें कालमानही ‘ पर’तंत्र नसून ‘ स्व’तंत्र असणें जरूर होतें, व हें दिनमान त्यांनीं आपल्या नित्यकर्मावर बसविलें होतें. महाराजांची चाकरी करून आनंदानें भाकरी खावी, तिच्यांत कुचराई झाली, तर रोजमुऱ्यास उजागरी नाहीं, अशी त्यांची शिस्त होती. त्यामुळें नित्यकर्माचें एक मंडल संपून पोटांत पडलें, म्हणजे त्यांचा दिवस होत असे. व हें प्रमाण अखंड चालावें म्हणून आह्निक चक्र पुरें झाल्याखेरीज वैश्वानराला मुळीं आहुतीच द्यावयाची नाहीं, असा नियम त्यांनीं बांधून टाकला होता. परंतु हीहि गोष्ट ते युक्तीनेंच करीत. आणि एवढ्याकरितां खाण्याच्या पदार्थांपासून त्यांचे संकेत ठरलेले असत. चारी ठाव जेवण, कालवण, दशमी, शेंगदाण्याचा लाडू, वऱ्याचे तांदूळ, बटाट्यासारखी कांहीं भाजी, अशा क्रमानें त्यांचा आहार उतरत उतरत,

शेवटीं मुख्यत्वें भुइमुगावरच आला होता. स्थित्यंतर होत असतां प्रत्येक वेळीं त्या त्या मानानें कांहीं तरी मुख्य आहार असून बाकीचे उप-आहार ठरत. सर्व आह्निकचक्र संपूर्ण झाल्याखेरीज मुख्य आहार तर करावयाचाच नाहीं, हें नक्की ठरलेलें असे. परंतु परिश्रम, प्रकृतिमान, ऋतुमान वगैरेंच्यामुळें जर कधीं शरीरांत किंचित् आवश्यकता वाटली, तर तेवढ्यापुरता थोडासा उप-आहाराचा आश्रय करून ते काम चालू ठेवीत. परंतु त्यांतदेखील आह्निकांतील निदान अमुक अमुक गोष्टी तरी साध्य झाल्या पाहिजेत, असें ठरलेलें असे.

लोकांना वाटते त्याप्रमाणें खरोखर पाहिलें तर भोजनास आवश्यक असें त्यांचें आह्निक कांहीं मोठें नव्हतें; परंतु जनीजनार्दनाच्या सेवेस वाहिलेल्या शरीरावर त्या जनार्दनाचा पूर्ण हक्क आहे, असें तें मानीत, व त्या हक्काच्या उपभोगास कधींही अडथळा करीत नसत. त्यामुळें अगदींच नाइलाजाची गोष्ट सोडली तर, ‘ कसें काय आहे ? ’ इतक्या कोणीही विचारलेल्या सामान्य प्रश्नास उत्तर देण्यापासून तों अठ्ठेचाळीस अठ्ठेचाळीस तासांची बैठक करून काम करण्यापर्यंत त्यांनीं कधीं कोणास ‘ नाहीं ’ म्हटलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर केवळ कुटुंबीय अशा तऱ्हेचीं कांहीं माणसें सोडलीं तर, ‘ आपलें आह्निक व्हावयाचें आहे, थोडेसें थांबा, ’ असें नुसतें सांगणेंही त्यांना आवडलें नाहीं. त्यामुळें झालेलें आह्निक तितकेंच ठेवून केवळ फालतूपणानें बोलावयास आलेल्या एकाद्या फालतू माणसाशींही ते सरलपणानें तास तास बोलत बसत, व नंतर त्यांना पुन्हां पहिल्यापासून सुरुवात करावी लागे. अशा रीतीनेंच खंड पडूनच त्यांचा एक दिवस भरण्यास आमचे कित्येक दिवस लागत ! ब्रह्मा-विष्णु-महेश इत्यादि देवतांचे दिवस त्या त्या प्रमाणांत वाढते आहेत, या पौराणिक कल्पनेचें जणूं काय हें एक स्पष्टीकरणच होतें !

आपलें शरीर निरोगी स्थितींत राहून कार्यक्षम असावें, म्हणून आवश्यक ती गोष्ट ते स्वतःच करीत, अथवा दुसऱ्याकडूनही करवून घेत. मोठेपणाच्या व कर्तृत्वाच्या फुकट ऐटीच्या वळीं तें कधींच पडले नाहींत. असे विशेष प्रसंग त्यांच्या आयुष्यांत फारच कमी येत, परंतु त्या प्रसंगीं आपणास काय पाहिजे व कसें पाहिजे, हें नीट सांगून जवळच्या माणसाकडून शांतपणानें ते करून घेत.

त्याचप्रमाणें कोणच्याही गोष्टींत त्यांना वंचकता अथवा कातरता कधीं आलीच नाहीं. श्रीमन्महाराजांचें स्मरण करण्यासारख्या गोष्टीपासून तों एकाद्या भिक्षेकऱ्यास कांहीं घालण्यासारख्या गोष्टीपर्यंत सर्व कामें सारख्याच आस्थेनें व प्रामाणिकपणानें करावयाची त्यांची रीत होती. त्यांच्या अनशंनाबद्दल येवढी प्रसिद्धी होती व सामान्य माणसाप्रमाणें कोणच्याही खाद्यपेयांत त्यांचें खरें चित्त नाहीं, केवळ दुसऱ्याच्या संतोषाकरितांच ते ठाव मांडून जेवावयास बसत; असें जरी होतें तरी, एकदां बसल्यावर उगीच कांहीं तरी थोडेसें खावयाचें व उठून जावयाचें, असें करणें देखील त्यांना आवडलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, महाराजांच्या इतर सेवेप्रमाणेंच हा वैश्वानर यज्ञही ते मोठ्या आवडीनें व मनापासून करीत. एकदां पानावर बसले, म्हणजे स्वसंतोषानुरूप लागेल तेवढें खावें, लागल्यास निःसंकोचतेनें मागून घ्यावें, असा त्यांचा स्वभाव होता. ही गोष्ट सामान्य वाटली तरी अत्यंत निरभिमानता व सरलता यांच्या खेरीज साधणें किती कठीण आहे, याची साक्ष मोठे म्हणविणाऱ्या लोकांच्याच अंतःकरणास पटेल.

यांच्या भाषणाचीही अशीच तऱ्हा होती. एकाद्या विशेष प्रकारच्या धारणेंत गढून गेलेल्या माणसाप्रमाणें यांचाही आवाज अतिशय लहान होता; परंतु उच्चार स्पष्ट व भाषण संथ असे, आणि त्यांच्या सर्व महात्म्याला साजेल अशीच त्यांची वाणी कोमल व निरुपद्रवी होती. कोणाला लागेल अथवा कोणाचें नुकसान होईल, अशी वाणी त्यांच्या मुखांतून कधींच आली नाहीं. ' बोलविता धनी वेगळाची, ' अशी त्यांची नित्य धारणा असल्यानें त्यांचें भाषण नेहमीं स्फूर्तिरूपच असे, व अशा भाषणांत निघालेले विचार ' हें पहा, आज असें असें महाराजांनीं सुचविलें ' असें म्हणून जणूं कांहीं एकाद्याला एकादी गोष्ट दुसऱ्यास सांगण्यास सांगावें, त्याप्रमाणें ते पुन्हां पुन्हां जसेच्या तसेच सांगत. एकादे वेळेस ' बघ महाराजांनीं कसें सुचविलें ? ' असें अगदीं लहान पोरासारखा त्यांना हर्ष झाल्याचेंही दिसे. श्रीमहाराजांनीं आपल्या ग्रंथांत भगवत्स्फूर्तीचें ' सज्जनाची स्फूर्ति ऐसी । बाधक नव्हेचि कवणासी । परमार्थ वसिजे मानसीं । एकत्वासी साधक ' असें वर्णन केलें आहे. तें जणूं काय आपल्या या शिष्योत्तमालाच पुढें ठेवून केलें आहे, असें वाटतें.

" अगदींच विपरित अगर घातुक समजूत सोडून दिली तर कोणाची

कशीही समजूत त्यांनीं कधीं खोडून न काढतां, ती कितीही चुकीची असली तरी त्याची पाठ थोंपटूनच कांहीं तरी खुबीनें तिला योग्य त्या वळणावर आणून सोडावें. बिरबल बादशहाच्या गोष्टींतील बिरबलाप्रमाणें, दुसऱ्याच्या समजुतीची रेषा न खोडतांच स्वल्प करून टाकण्याची त्यांची हातोटी अवर्णनीय होता. त्यांचा बुद्धिभेद तर होणार नाहीं. आपलें महत्त्व तर कांहीं विशेष रीतीनें त्यांच्यापाशीं वाढणार नाहीं, आणि सहजरीतीनें फार मोठी गोष्ट त्याला साधावी, अशा रीतीनें ते बोलत. ज्यांना जग जोड्यापाशींही उभे करणार नाहीं असला अनन्वितपणा करणारेही त्यांच्यापाशीं अगदीं आप्तभावानें आपला पोटउकला करीत, व तें ऐकून, जरी ते अंतःकरणांत अगदीं दुःखी झालेले दिसत, तरी देखील त्यांनीं कधीं तिरस्कार अथवा क्रोध दाखवून त्याचा पाणउतारा केला नाहीं; ‘ उलट झालें तें झालें, महाराज फार दयाळु आहेत, त्यांची प्रार्थना करा,’ असें आश्वासन देऊन त्यांना मार्गाला लावण्याचा प्रयत्न करीत. त्यांचा मूळ स्वभाव बराचसा थट्टेखोर असल्यामुळें संबंधांतल्या लोकांची व सामान्यत्वें इतरांचीही कित्येक गोष्टींबद्दल पुष्कळ चेष्टा करीत; परंतु त्यांतही त्यांचें एक धोरण असे. कोणाही व्यक्तीच्या व्यक्तिविषयक अवगुणाबद्दल त्यांच्या तोंडून कधीं अवाक्षरही निघालें नाहीं. ज्या सामाजिक व राष्ट्रीय अवगुणांनीं देशाचा अधःपात होत असलेला पाहून त्यांचें अंतःकरण तुटे, अशा सामान्य गुणापुरताच ते व्यक्तिविषयक टीका करीत. त्या टीकेच्या योगानें त्या अवगुणाविषयीं तिटकारा उत्पन्न व्हावा, परंतु ती व्यक्ति मात्र निंद्य ठरूं नये, इतक्या नाजूक धोरणानें ते उपहास करीत, अथवा क्रोध, नापसंती वगैरे दाखवीत; आणि यामुळेंच सर्व दर्जाच्या आणि सर्व तऱ्हेच्या लोकांचा यांच्यापाशीं विचित्र संग्रह होता.

एकाद्या विषयावर आपल्यास कांहीं विशेष माहिती आहे, असें ते कधींच दाखवीत नसत, व अगदीं साध्या रीतीनें सहज कांहीं समजलेलें दुसऱ्यास सांगावें, अशा रीतीनें सांगत. त्यामुळें त्यांच्या भाषणांत मोठेमोठे पारिभाषिक शब्द व इतर ग्रंथांचा उल्लेख कधींही येत नसे. मुद्दाम एकाद्या ग्रंथाचा, लेखकाचा, अगर पारिभाषिक शब्दाचाच विषय असेल, तर गोष्ट वेगळी; एरवीं ग्रंथांच्या आधारानें अगर पारिभाषिक शब्दांच्या गर्दीनें आपलें विद्वत्त्व त्यांनीं कधीं दाखविलें नाहीं. पारिभाषिक शद्बांनीं द्योतित होणाऱ्या कल्पना ऐकणा-

राऱ्या मनांत जशा रीतीनें सहज उत्पन्न होतील, अशाच रीतीनें फोडून सांगत. सांगतांना विषयाशीं तादात्म्य होऊन तदनुरूप अंगविक्षेप करण्याची त्यांना संवय होती. या सर्व गोष्टींमुळें तासच्या तास भाषण ऐकत असतांही ऐकणाऱ्यास तहान भूक आठवत नसे. ऐकणाराला शक्य तेवढें त्याविषयींचें कळावें अशा विषयींच्या त्यांच्या कळकळीमुळें शिक्षक अथवा व्याख्याते यांना त्यानें मात्र त्यांची स्थिति चमत्कारिक होती.

एखादी गोष्ट निघाली म्हणजे ती तिच्या मूलतत्त्वांसह त्यांनीं शिकवावयास जावें, व त्यांच्या बहुविध व्यापांमुळें विचारणाऱ्याला अभिप्रेत असलेल्या मुद्द्याला हात लागतो न लागतो तोंच मधें कांहींतरी निघून तें भाषण तसेंच राहून जावें, असेंच बहुतेक होई, व त्यामुळें त्या विषयाची समग्र माहिती तर राहूनच जाई परंतु तात्पुरती जी काय हवी असे, तीहि मिळत नसे. परंतु त्यांत एक लाभही मोठाच होत असे; असल्या प्रसंगीं इतर कित्येक विषयांचा संबंध आनुषंगानें येई, व त्याविषयीं जातां जातां, जे कांहीं मोठेमोठे सिद्धांत अगदींच साध्या भाषेंत परंतु थोडक्यांत ते चटचट बोलून जात, त्यामुळें विचारशक्तीला अनेक अंकुर फुटत, व अनेक प्रश्नांवर नवीन उजेड पडत असे. एकाच ऐकण्यांत बहुश्रुततेचा फायदा मिळून विस्तृतता व व्यापकता यांची ज्ञानास जोड मिळे. एकदां त्यांना रा. देवल यांनीं उपस्थित केलेल्या गायन शास्त्रांतील श्रुतींच्या संख्येच्या वादाविषयीं प्रश्न केला होता. त्याच्या वरून आर्यशास्त्राप्रमाणें श्रुति बावीसच, व त्या बावीस असणेंच कां अवश्य आहे, असें सांगताना त्यांनीं मनुष्याच्या शरीराची रचना, ध्वनीचा व पाठीच्या कण्याचा संबंध, वगैरे सांगण्याकरितां Anatomy चें पुस्तक काढून उपक्रम केला. सुमारें अर्धा पाऊण तासांतच कांहीं तरी अडथळा येऊन तो विषय तितकाच राहिला; परंतु एक मात्र त्यामुळें फायदा झाला, कीं, श्रीगुरुचरित्रांतील रावणाचा गानयोग व त्यांतील रागरसांचें उत्पत्तिस्थान व रंगरूप, हें कांहींतरी थोतांड नसून विशेष परिभाषेंत सांगितलेलें शास्त्रीय सत्य आहे, एवढा मात्र बोध झाला. असें नेहमींच होई.

यावरून एका गोष्टीचा सहज उलगडा होतो. वैद्य शास्त्रांतील त्यांचें अपूर्व ज्ञान त्यांनीं जवळच्या लोकांस शिकविलें नाहीं, असा त्यांचेवर एक आक्षेप येतो. तो किती वृथा आहे, हें यावरून समजून येईल. आपलें ज्ञान

दुसऱ्यास द्यावें, याची तर त्यांना अशी कळकळ होती कीं तशा तऱ्हेचा प्रसंग आला असतां, ते तो कधींही वाया जाऊं देत नसत. इतकेंच नाहीं, तर ऐकणारा कंटाळा करून टाळाटाळ करीत असतांही पाठीमागें लागून त्याला सांगत. परंतु त्याचा उपयोग न होण्याचे कारण इतकेंच कीं अशा गुरूपाशीं विद्या शिकण्यास जी कांहीं पूर्व तयारी लागते, ती जवळ असलेलीं माणसें त्यांच्याभोंवतीं कोणीच नव्हतीं. प्राथमिक शिक्षणांत आणि एम्. ए. सारख्या उच्च शिक्षणामधें जो फरक आहे, तोच याही प्रसंगीं अवश्य होता. प्राथमिक शिक्षण घेणाराला शाळेंत जातांना पाटीपेन्सिली पलीकडे बरोबर कांहींच न्यावें लागत नाहीं. तेथील शिक्षकाचें कार्यक्षेत्र छोटेसें असल्यामुळें विद्यार्थ्यांची सर्व तयारी तो स्वतः करून घेऊं शकतो. परंतु उच्च शिक्षणाचा व्याप फार मोठा असल्यामुळें तेथील शिक्षक प्राथमिक क्षिक्षण या नात्यानेंही जरी कितीही उत्तम असला तरी मुळापासून विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यास त्याला सवडच नसते. म्हणून तेथें विषयाची सारी तयारी विद्यार्थ्यानेंच करावयाची असते, आणि अशा त्यांच्या चेतलेल्या बुद्धीत शिक्षकानें फक्त पूर्णाहूति द्यावयाची असते. त्याचप्रमाणें येथेंही होतें. अण्णासाहेब यांच्याजवळून वैद्यशास्त्राचा फायदा मिळण्यास त्यांच्याजवळ येणारा मनुष्य, आर्यवैद्यक आणि आंग्लवैद्यक या दोघांचेंही चांगलेंच ज्ञान असलेला, व त्यामुळें त्या शास्त्रांसंबंधीचीं मार्मिक स्थळें ओळखून, आपण होऊन शंका विचारणारा असा हवा होता; म्हणजे त्याचा फायदा झाला असता.

त्यांना थोडक्यांत कोणचा विषय सांगतांच येत नव्हता, असें कांहीं नाहीं; उलट अति थोडक्या शब्दांत वेदांत व अध्यात्मविद्या यांचीं रहस्यें देखील सुबोध रीतीनें सांगण्याची त्यांच्यासारखी हातोटी कोठेंच आढळत नाहीं. परंतु तें ऐकणारावर अवलंबून असे. ' एकदां वैराग्य म्हणजे काय ? ' असा प्रश्न निघाला असतां, फार थोडक्यांत त्यांनीं असें चट्‌कन सांगितलें, कीं " वैराग्य" म्हणजे " आग्रह नसणें " वैराग्याची इतकी स्वल्प व संपूर्ण व्याख्या कोठेंही आढळावयाची नाहीं. त्याचप्रमाणें ध्यानाविषयीं एकदां विषय निघाला असतां त्यांनीं असेंच सांगितलें कीं " ध्यान म्हणजे खरोखर काय, तर 'शरीराच्या कणाकणांत फांकून गेलेलें चैतन्य गोळा करून स्थिर करणें.' " या थोड्याशा शब्दांत सांगितलेल्या लक्षणांनीं ध्यानपद्धती विषयींचा साराच

वाद मिटून निद्रा व समाधीं यांत काय फरक आहे, व ध्यान म्हणजे तरी काय, एक प्रकारची झोंपच आहे, वगैरे आक्षेपांचें उत्तम निरसन होतें. पुढें सहज एकदां मंडलब्राह्मणांतही ' सर्वशरीरेषु चैतन्यैकताध्यानम् ' असें ध्यान-लक्षण आढळून मोठी मौज वाटली.

तात्पर्य इतकेंच कीं आपण सांगितलेलें दुसऱ्यास चटकन् समजूं शकेल अशी त्यांची खात्री असलेलीं माणसें जवळ पाहिजे होतीं, म्हणजे त्यांच्या वैद्यशास्त्रांतील अपूर्व ज्ञानाची व अपरिमित अनुभवाची परंपरा टिकून फायदा झाला असता. अशीं माणसें तर कोणी जवळ आलींच नाहींत, पण उलट एवढ्या धांदलींतही, एकादा विशेष प्रकारचा रोगी आला असतां अथवा एकाद्या विशेष चिकित्सेची गरज पडली असतां ते मुद्दाम समजून सांगावें म्हणून प्रयत्न करीत. ऐकणारा हजर नसल्यास त्या रोग्यास पुन्हां यावयास सांगत. परंतु नुसतें तिकडे लक्ष द्यावयासही कोणास फुरसत नव्हती ! कारण एक तर शास्त्रीय ज्ञानाची त्यांच्यापासून कोणी* खरोखर अपेक्षाच केली नाहीं आणि दुसरें असें कीं आम्हांस कांहीं जास्त शिकलें पाहिजे, असें तरी कोठें वाटत होतें ? आमच्यासारख्या स्वयंसिद्धाच्या तेजांत आणखी भर ती कोणच्या तेजाची पडावयाची होती ? त्यामुळें ते पाठीस लागले असतांही एकाद्या नादिष्ट म्हाताऱ्याच्या बडबडी पलीकडे कधीं कोणी तिकडे लक्ष दिलें नाहीं, व अखेरीस ' काय करावें बुवा यांना ? अगदींच रद्दी. ' अशा तऱ्हेचें कांहींतरी स्वतःशींच पुटपुटत, मुकाट्यानें बसण्याचा त्यांना वारंवार प्रसंग येई. परंतु त्यांची कळकळ व लोभ असा होता कीं, इतकें होऊनही त्यांनीं कधीं

---

* टीपः—नाहीं म्हणावयास भिषग्रत्न गंगाधर वासुदेव जोशी यांस मात्र सद्बुद्धि उत्पन्न होऊन ते शास्त्रजिज्ञासेनें श्रीअण्णा यांचे सहवासांत आले. त्यामुळें त्यांचाही फायदा होऊन लोकांनाही औषधें आयतीं लिहून मिळूं लागलीं. अशा रीतीनें प्रत्यक्ष श्रीअण्णासाहेब यांच्या सहवासांत मिळविलेल्या आपल्या एक तपाच्या अनुभवाचा उपयोग हल्लीं ते निरपेक्षपणानें लोकांस देत आहेत. त्याचप्रमाणें पुणें येथें त्यांनीं श्रीअण्णासाहेबांचे नांवाची एक वैद्यक पाठशाळाही चालविली आहे. हा स्तुत्य अपवाद सोडला तर बहुतकरून आमचें म्हणणें सर्वतोपरि खरें ठरेल असें वाटतें.

रागाऊं नये; उलट, प्रसंग आला कीं आपला सांगण्याचाच प्रयत्न करावा. त्यामुळें शास्त्रीय ज्ञान दुसऱ्यास देण्याची इच्छा असूनही तसें घडणें शक्य नव्हतें, कारण त्यांना तेवढाच उद्योग नव्हता.

अण्णासाहेबांनीं ग्रंथलेखन वगैरे कां केलें नाहीं, म्हणून विचारणाऱ्या लोकांनींही त्यांच्या अनंत व्यापाचा, व ज्यांत झोंपेसारख्या अपरिहार्य विश्रांतीसही वेळ मिळत नसे, असल्या परिश्रमांचा विचार केला असतां, त्यांचें त्यांनाच कळून येईल. " संस्था वगैरे स्थापण्यासारखें काम तुकारामासारख्या उच्च अवस्थेंतील विभूतीचें नसतें, तें त्याच्या भोंवतालच्या दुसऱ्या माणसांनीं करावयाचें असतें, " असें एके * ठिकाणीं लोकमान्य टिळकांनीं म्हटलें आहे. तीच गोष्ट अण्णासाहेब यांसही लागू आहे. आणि वस्तुतः त्यांनीं भाषणद्वारें वगैरे इतकें शिकविलें आहे कीं, त्यांच्या भोंवतीं जर कोणी साक्षेपी माणूस असता, तर दोन तीनच तर काय पण अनेक विषयांवर अनेक ग्रंथ लिहितां आले असते. असा मनुष्य त्यांचेजवळ नव्हता, त्याला त्यांनीं काय करावें ? इतर सर्व गोष्टींप्रमाणें हेंहि एक ' देशाचें दुर्दैव ' आहे. मनुष्याचा सार्वजनिक व्याप वाढला म्हणजे लिहिण्यासारखीं कामें करणें त्यास अशक्य होतें, ही गोष्ट गीतारहस्यासारख्या अमोल ग्रंथ लिहिला जावा, म्हणूनच मंडालेस लोकमान्यांना विश्रांति देण्याची देवानें योजना केली कीं काय, असें म्हणणाऱ्या लोकांस तरी सांगणें नको.

हीच गोष्ट इतर विषयांतील त्यांच्या ज्ञानासही लागू आहे. होतां होईल तों शास्त्राज्ञा जशीच्या तशी पाळण्याचा त्यांचा नेहमींच कटाक्ष होता, व ' नापृष्टः कस्यचित् ब्रूयात्, नचान्यायेन पृच्छतः । जानन्नपि हि मेधावी जडवल्लोकमाचरेत् ' या श्रुतिवचनास धरून त्यांचे सर्व व्यवहार होत असत. आणि तें ठीकच होतें. हा श्लोक दिसावयास जरी कसासाच दिसतो, व त्यामधें लोककल्याणाविषयींच्या कळकळीचा अभाव दिसतो, तरी वस्तुतः तो फार महत्त्वाचा असून लोकसंग्रह करणाऱ्यांना अवश्य अशा पुष्कळ गोष्टींचा त्यांत संग्रह आहे. वैदिक संस्कृतींतील आर्यशिक्षापद्धतीचीं रहस्यें यांत भरलेलीं आहेत. तीं कशीं, तें फोड करून दाखवावयाचें हें स्थळ नव्हे. तरी पण एव-

---

* गेलीं आठ वर्षें भाग ३.

ढेंच म्हणतां येईल कीं, श्रीसमर्थांच्या ' वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ॥' , अथवा ' मुलांच्या चालीनें चालावें । मुलांच्या चालीनें शिकवावें ॥ " वगैरे, म्हणजे एक तऱ्हेनें या सूत्राचें विवरणच होय. विषयाचें खरें ज्ञान व सात्म्य होण्यास शिकणाऱ्याच्या अंतःकरणांत त्याची खरी हांव उत्पन्न होणें अवश्य आहे. त्या विषयींचा प्रश्न आपण होऊन विद्यार्थ्यानें करणें हें, स्त्रियांच्या रजोदर्शनाप्रमाणें, विषयरूप गर्भ धारण करण्यास बुद्धीची तयारी झाली असल्याचें द्योतक आहे. अशी तिची तयारी असल्याखेरीज केलेला ज्ञानदानाचा प्रयत्न, रजोहीन समागमाप्रमाणें सुखकारक वाटला तरी व्यर्थ आहे; आणि म्हणूनच " नापृष्टः कस्यचित् ब्रूयात् " असा श्रुतिनिर्बंध झाला. याचा अर्थ असा नाहीं कीं कोणी विचारीतच नाहीं, या सबबीवर ज्ञानदानाच्या जबाबदारींतून ज्ञात्यानें मोकळें व्हावें. तर उलट आपलें कर्तव्य अधिक कौशल्यानें करण्याची त्याचेवर जबाबदारी येते. अशा खुबीनें लोकांशीं वागावयाचें कीं, जें त्यांस सांगावयाचें आहे, त्याविषयीं आपण कांहींही न बोलतां त्यालाच प्रश्न करण्याची बुद्धि व्हावी. म्हणजे अर्थात् त्याची तयारी व्हावी; व मग त्याच्याकडून प्रश्न आला म्हणजे त्याला शिकवावयाचें. हें खऱ्या शिक्षणाचें इंगित आहे. अशा पद्धतीनें शिक्षणकार्य घडून येण्यास बीजक्षेत्रन्यायानें गुरु व विद्यार्थी यांची स्वभावतःच क्षमता लागते. तसा योग न घडून आल्यास उत्तम बीज असूनही वांया गेल्यास शेतकऱ्याकडे काय दोष आहे ? अण्णासाहेबांसारख्यांजवळ शिकण्यास अवश्य असलेली पूर्व तयारी झालेली असून, निवळ ज्ञानार्जनाच्या लालसेनेंच त्यांच्याजवळ आलेले, असे साक्षेपी गृहस्थ कितीसे होते ? हेंहि एक वर सांगितल्याप्रमाणें ' देशाचें दुर्दैव ' च आहे. त्यांना तर सांगण्याची इतकी हौस होती कीं, त्यामुळेंच व्याख्याते या नात्यानें त्यांची मोठी चमत्कारिक स्थिति होत असे.

पूर्वीचें काय असेल तें असो, पण अलीकडच्या काळांत तर अण्णासाहेबांचें व्याख्यान म्हणजे पुण्यातल्या लोकांना ' सदर्न मराठी'चा प्रवासच वाटे. सहज १५।२० मिनिटांकरितां बोलावयास उभे राहिले तर, तास दीडतास निघून जाई. वेळेचें भान, विषयाची संगतवार जुळणी व नीटसपणा, यांचा तर पत्ताच नसायचा ! पुण्यांतील लोकांवर असलेल्या त्यांच्या वजनाची खरोखरच कमाल आहे. पुण्याचा श्रोतृसमाज म्हणजे नंबर एकचा टारगट.

त्यांच्या प्रसादांतून सुटलेला एक तरी वक्ता आढळेल कीं नाहीं, कोण जाणे ! परंतु अण्णासाहेबांचें भाषण–आणि हें भाषण बहुधा अध्यक्ष या नात्यानें केलेलें असावयाचें–तीन तीन तासपर्यंत निमूटपणानें ऐकून घेत. मारुतीच्या शेंपटाप्रमाणें तें एकदां वाढूं लागलें कीं धीर निघून जावयाची वेळ येई. तरी एका शद्बानेंही त्यांनीं कधीं अवहेलना केली नाहीं, अथवा आसनांस कितीही मुंगळे लागले तरी आसन सोडून गेले नाहींत. जागच्याजागींच एकमेकांत कुजबुजावें, व लहान मुलांनीं घरच्या म्हाताऱ्याची थट्टा करावी त्याप्रमाणें ' काय करावें बुवा, अण्णासाहेब आहेत, ' असें म्हणून थट्टेच्या शब्दांनीं आपसांत त्यांच्या अनेक गोष्टींचें कौतुकच करावें. असेंच नेहमीं घडून येई.

लिहिण्यांत देखील त्यांची तऱ्हा अशीच होती—म्हणजे व्याख्यानासारखें तें विस्कळित असे, असें नाहीं; उलट त्यांच्याइतका मुद्देसूद लिहिणारा क्वचित्. तरी पण आपलें म्हणणें वाटेल त्याला अगदीं निःसंदेहपणें समजावें, समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें ' गरज केलीं लेखकापासुनी ' असें घडूं नये, म्हणून विस्तृत व पाल्हाळिक झालें तरी हरकत नाहीं, पण अगदीं स्पष्ट मांडलें गेलें पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. चटकन् दोन शब्दांमध्यें मोठा भाव आणावयाचा, असें त्यांनीं कधीं केलें नाहीं. एकादें काम करावयाचें म्हटलें म्हणजे तें यथासांग करण्यास जशी तिथें कोणच्याही तऱ्हेच्या खर्चाची मनाई नव्हती, तसाच प्रकार लिहिण्यांतही होता. त्यांचा खजिना इतका विपुल होता कीं, हवे त्या प्रसंगास लागणाऱ्या अनेक प्रकारच्या शब्दांच्या नाण्याची त्यांना कधींच तूट पडली नाहीं. त्यामुळें शद्बसौष्ठव हा गुण त्यांच्या भाषेइतका क्वचितच आढळून येतो. मनांतील भाव व्यक्त करतांना अगदीं हवा तोच शब्द वापरल्यामुळें, आणि अगदीं साध्या लिहिण्यापासूनही न्याय, कायदा स्थलकालमान, आणि तारतम्य यांचा खोल विचार असल्यामुळें, यांची अलीकडील भाषा चटकदार, अथवा आल्हादकारक असणें शक्यच नव्हतें; उलट त्यांच्या स्वभावाप्रमाणेंच ती थोडीशी कठोर, परंतु खंजिराप्रमाणें लखलखणारी व समजुतीचे पडदे फोडून आंत घुसणारी होती. ' आपण योजिलेला शब्द काढून, बरोबर तोच भाव व्यक्त करणारा दुसरा कोणचाही शब्द कोणी योजून दाखवावा, ' असें ते मोठ्या अभिमानानें म्हणत.

इंग्रजी लिहिण्याचा व बोलण्याचा त्यांना मनापासून कंटाळा होता, व

मराठींत वावरत असतां भाषाशुद्धीकडे त्यांचें अगदीं सावरकरीच नसलें तरी कमालीचें लक्ष असे. प्रचारांत अगदींच रूढ होऊन बसलेलें व पारिभाषिक शब्द सोडले तर, त्यांच्या बोलण्यांत सहसा परकी शब्द नसावयाचा. लिहिण्यांत देखील केवळ पारिभाषिक शब्द सोडले तर, एक देखील परकी शब्द आढळेल कीं नाहीं कोण जाणे. अशा रीतीनें भाषाशुद्धि सांभाळण्यास जवळील लोकां-सही ते सांगत. प्रचारांतला अगदीं साधा ' कायम ' असा शब्द काढून तेथें ' स्थिर ' शब्दाची योजना करण्यास तर त्यांनीं दहा पंधरा वेळां शिकविल्याचें आठवतें.

यांच्या लिहिण्याचें व शब्दयोजनेचें एक उदाहरण पाहण्यांत आलें. १९१५ सालच्या पुण्यास भरलेल्या प्रांतिक सभेचे ते स्वागताध्यक्ष होते. या सभेची सर्व व्यवस्था लोकमान्यांच्या कडेच होती, व त्यामुळेंच या प्रसंगाला अनुसरून अशी एक आठवण रा. सदाशिवराव बापट यांनीं आपल्या लोकमान्यांच्या आठवणींत घातली आहे. येथें हेंहि सांगणें अवश्य वाटतें कीं रा. बापट यांनीं ही आठवण थोडीशी नीट आठवण न करतां दिली आहे. एकदां एकाद्या माणसास मान द्यावयाचा म्हटला म्हणजे त्याच्यामुळें कितीही गैरसोय झाली तरी ती लोकमान्य किती आनंदानें करून घेत, हें सांगण्याचा, ही गोष्ट देण्यांत हेतु आहे. लोकमान्यांच्या गुणांविषयीं आमचें कांहींच म्हणणें नाहीं. पुण्यांतील कोणाही शिष्टापेक्षां अण्णासाहेबाविषयीं अधिक पूज्यभाव व त्यांच्या योग्यतेची जाणीव लोकमान्यांच्या मनांत होती, आणि अण्णासाहेबांचाही त्यांच्यावर तसाच लोभ असून त्यांचें ऊर्जित व्हावें म्हणून ते परमेश्वराजवळ नित्य प्रार्थना करीत, याविषयीं पुण्यांतील लोकांस तर शंका नाहीं. परंतु ही आठवण पुरती न दिल्यामुळें अण्णासाहेब यांच्याविषयीं आपण मोठा विपरीत समज उत्पन्न करीत आहों, हें बापटांच्या लक्षांत आलें नाहीं. अण्णासाहेब यांस खाजगी व्याप कितीही असला, व त्यामुळें त्यांची कामें उरकण्यांत धांदल, अनियमित श्रम वगैरे कितीही असले, व अगदीं गळ्याशीं येऊन भिडेपर्यंत कामास हात न घालण्याचा त्यांचा केवढाही हट्ट असला, तरी देखील एकादें सार्वजनिक काम त्यांनीं अंगा-वर घेतलें, आणि तें ठराविक वेळेंत कधीं केलें नाहीं, असें घडल्याचें एक तरी उदाहरण कोणी दाखवून द्यावें. त्यांच्या सर्व बाबतींप्रमाणें, असल्या कामांतही

त्यांचें कांहीं धोरण असे, व पन्नास तगादेदारांनीं कितीही सतावून सोडलें तरी खरोखर त्यांनीं कधीं घाई केली नाही, अथवा कोणी पुन्हा आठवणही दिली नाहीं, तरी स्वतः आठवण ठेवून तें करण्यास कमी केलें नाहीं. परंतु त्यांच्या या वरकरणी धांदरट आणि दीर्घसूत्री परंतु वस्तुत स्थिरगंभीर अशा स्वभावाची कल्पना नसल्यामुळें, क्रियाशक्तीच्या घमेंडीत असलेल्या आम्हांस स्वतःच्या अधीरपणामुळें त्यांची खात्री वाटत नसे, व उगीच अण्णासाहेबास सतावून सोडावें, आणि वर पुन्हां " मी होतों म्हणून तर येवढें झालें, नाहींतर अण्णासाहेब म्हणजे काय, 'वाघाची जांभई ! " अशी फुशारकी मारावी, असेंच नेहमीं होई.

रा. केळकरांनी लोकमान्यांना कांहींही म्हटलें असलें तरी, एक गोष्ट खरी आहे कीं, तें भाषण अण्णासाहेबांनीच लिहिलें, व तें आपल्या धोरणाप्रमाणें ठराविक वेळेच्या थोडेसें आधीं लिहून दिलें. रा. बापट यांच्या कामगिरीनें त्यावर कांहींही परिणाम झाला नाहीं. परंतु त्या भाषणावरील नरसोपंताचा शेरा व टिळकांचे अण्णासाहेबविषयींचे उद्गार एवढेच नुसते देऊन तें भाषण अण्णासाहेबांनींच तयार केलें होतें, हें न सांगितल्यामुळें असा समज होतो की परमार्थाच्या मागें लागून अंगावर घेतलेलीं सार्वजनिक कामेंही अण्णासाहेब बिघडून टाकीत, व केवळ त्यांच्याविषयींच्या आदरामुळें लोकमान्य तें कसेंबसें निस्तरीत. रा. बापट यांचा आणि अण्णासाहेब यांचा निकट संबंध पुष्कळच आला असल्यामुळें जेथें अण्णासाहेबचा संबंध आहे. तेथें तरी त्यांनीं ज्यास्त काळजी घ्यावयास पाहिजे होती. असो. मूळ सांगावयाची गोष्ट अशी कीं, अण्णासाहेबांनीं तयार केलेलें भाषण साधारणतः ३०।४० मिनिटें पुरावें इतक्या बेताचें होतें; परंतु दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमांत त्या भाषणाला इतका देखील वेळ देण्याची सवड नव्हती. जेमतेम २० मिनिटेंपर्यंत तें चालावें असें ठरलें. इतर कोणाचें भाषण असतें, तर तें तेव्हांच कमी करून टाकण्यांत आलें असतें, परंतु यांच्या बाबतींत तसें करतां येईना. म्हणून लोकमान्य स्वतः अण्णासाहेबाकडे येऊन विनंति करूं लागले, कीं भाषण तर आपलेंच आहे, परंतु आह्मांस जेमतेम २० मिनिटापेक्षां अधिक वेळ नाहीं, तेव्हां याची कांहीं तरी तोड काढून द्या. त्यावर अण्णासाहेबांनीं 'तूंच सांग यांत मी काय कमी करूं तें' म्हणून भाषण त्यांच्यापुढें ठेवलें.

तेव्हां अशी मौज पहावयास सांपडली कीं लोकमान्यांनीं ' हा अमुक भाग अथवा हें वाक्य किंवा शब्द काढलें तर काय हरकत आहे ? म्हणून म्हणावें व ' अरे, तो मी अशा अशा करितां घातला आहे,' म्हणून त्यांतली खुबी अण्णासाहेबांनीं सांगावी. तेव्हां लोकमान्यांनींच म्हणावें कीं ' हो हें तर खरेंच!' अशा रीतीनें कांहीं वेळ गेल्यावर लोकमान्यांनीं अण्णासाहेबांस सांगितलें कीं ' हें तर सर्व खरें आहे. परंतु कसेंही करून हें संक्षिप्त करून द्या.' तेव्हां ' माझी कांहीं हरकत नाहीं, तुझ्या सोईला येईल तसें करून घे ' असें अण्णासाहेबांनीं सांगितलें, व त्याप्रमाणें पुढें लोकमान्यांनींच त्यांत फेरफार करून, अण्णासाहेबांचा आवाज लहान असल्यामुळें, अण्णासाहेबांच्या चिरंजीवांनीं तें परिषदेपुढें वाचलें.

अण्णासाहेब यांच्या दीर्घसूत्रीपणामध्यें विशेष लक्षांत ठेवण्याजोगती एक गोष्ट चटकन् दिसून येई. ती ही कीं इतर लोकांप्रमाणें हलगर्जीपणा, आळस, अथवा कमकुवतपणा असल्या कोणत्याही कारणानें तो घडत नसून त्यांच्या सर्व गोष्टींप्रमाणें त्यांतही एक प्रकारचा पद्धतशीरपणा होता. कोणचीही गोष्ट करण्यामध्यें यत्किंचित् देखील चालढकलपणा करावयाचा नाहीं, प्रयत्नाची कसूर करावयाची नाहीं, अगर कितीही क्षुल्लक बाब दिसली तरी जास्त हुशारीनें उगीच घाई करावयाची नाहीं, उलट थोडा वेळ लागला व किहीही श्रम गैरसोय अथवा खर्च झाला, तरी एकाद्या नवाशिक्या माणसाप्रमाणें ती अगदीं यथाक्रमच करावयाची असा त्यांचा स्वभावच असल्यामुळें, त्यांचें सर्व करणें पहिल्यापासूनच मोठें अघळपघळ असे. शरीरसुखाखेरीज इतर कोणत्याही बाबतींत संकोच म्हणून त्यांना ठाऊकच नव्हता, हें जरी खरें आहे, तरी त्यांचा स्वभाव कांहीं चिकट नव्हता; उलट चालण्यासारख्या साध्या गोष्टीपासून तों मोठयोठ्या राजव्यवहारापर्यंत त्यांच्या अंगीं सर्वकार्यांत विलक्षण तडफ दिसून येई. त्यांना एकदां विचारलें होतें कीं ' हा दीर्घसूत्रीपणा तुमचा पूर्वीपासूनच आहे काय ? ' तेव्हां ते म्हणाले ' छे, छे, तेव्हां असें करून कसें भागतें, रे, बाबा ? एकाच वेळीं पन्नास कामें एकदम उरकण्याची शक्ति माणसास कां नाहीं, असें तेव्हां होऊन जाई ! ' यावरून दीर्घसूत्रीपणा हा त्यांचा कांहीं मूळ स्वभाव नव्हे, हें दिसून येईल. आपलें एक मुख्य धोरण सांभाळावयाचें, व इतरही कोणच्या गोष्टीस ' नाहीं ' म्हणावयाचें नाहीं,

अशा स्वभावामुळें हा दीर्घसूत्रीपणा उत्पन्न झाला. व त्यांतच यथाशास्त्र वागण्याच्या आवडीमुळें ज्योतिषशास्त्राची भर पडून अण्णासाहेब यांचें सर्व करणें म्हणजे पुण्याच्या लोकांस एक कौतुकाचा व थट्टेचाच विषय होऊन बसला. परंतु त्यांतही असें पाहण्यांत येई कीं, एकादी गोष्ट अमुक वेळीं अगर अमुक वेळांत करावयाची, असें त्यांनीं ठरविलें, आणि तशी ती घडली नाहीं, असें कधींच झालें नाहीं. ती घडण्याच्या आड कधीं कांहीं आलें नाहीं. एरवीं मात्र दक्षिणायन, मृत्युयोग, राहुकाळ, वगैरे आड येत, आणि ' गंगाधरशास्त्री हजर नाहींत, ' अगर ' अमुक माणसाला निरोप पाठविला आहे, ' अथवा ' एकाद्या पुस्तकाची अमुक सालचीच प्रत नाहीं, ' असल्या बारीकसारीक गोष्टींवरही दोन दोन वर्षें काम अडून राही ! पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, कोणच्याही गोष्टीसंबंधीं ते आपल्या मनाशीं चटदिशीं कांहीं तरी धोरण ठरवून टाकीत, व कोणी कांहींही केलें तरी, त्यांत कधीं फरक करीत नसत. मात्र इतकेंच कीं, केवळ धर्मविरुद्ध असली गोष्ट खेरीज करून कसल्याही गोष्टीस ' नाहीं ' म्हणण्याचा त्यांच्या वाणीला सरावच नव्हता. त्यामुळें नेहमीं ' हो हो, आत्तां करावयाचें, ' असें घोंकीत व माणसाला निरुत्साह न करतां त्याची जिज्ञासा व जोर हीं वाढतीं ठेवून ते सर्व कामें करीत, व त्यांतच आपलीं मुख्य धोरणेंही अबाधितपणें पाळीत. करावयाची म्हणून कबूल केलेली गोष्ट करावयास कधीं चुकले नाहींत, परंतु त्यांच्याविषयीं इतका विचार करण्यास कोणाला सवड नसल्यामुळें ' हें काम करणार नाहींत, ' असें वाटे, व अधीरपणानें आम्हीं त्यांच्या मागें लकडा लावावा. त्यामुळेंच त्यांना विनाकारण अतिशय त्रास होई, व त्यांचें वर्तन अधिक तऱ्हेवाईक भासे. परंतु त्यांच्या सोशिकपणाची खरोखरच धन्य आहे. इतकेंही करून जानूच्या मुलांना पाठीवर खुशाल धिंगाणा घालूं देणाऱ्या तीन राक्षसांच्या गोष्टींतील जलौघाप्रमाणें त्यांच्या वृत्तीची प्रशांतवाहिता क्षणमात्रही चळली नाहीं. एवढें मात्र खरें कीं, या अलीकडील दीर्घसूत्रीपणाबद्दल ज्योतिषशास्त्र हें बरेंचसें जबाबदार आहे, व एका वक्त्यानें संभावित टवाळीनें म्हटल्याप्रमाणें राहूकाळ आणि मृत्युयोग यांच्या कचाट्यांत सांपडून महिनेचे महिने निघून जात, तरी त्यांना नुसता श्मश्रु करावयास वेळ नसे

ही गोष्ट खरी आहे. खरोखरच त्यांना श्मश्रू करण्यास मुहूर्त आणि वेळ वर्षांतून एकादा दिवस मिळत असे, त्यामुळें त्यांची दाढी नेहमींच वाढलेली असे. अखेरचीं आठ नऊ वर्षें तर त्यांनीं श्मश्रूच टाकून दिला असल्यामुळें. त्यांची दाढी चांगलीच वाढून त्यांच्या कांतिमान् गौर शरीरास शोभा देत असे. कामाच्या धांदलींत अस्ताव्यस्त झालेलें पांढरें शुभ्र धोतर, चोळवटलेल्या कोंवळ्या केळीच्या पानाप्रमाणें घड्या पडलेलें व खपाटीं गेलेलें पातळ पोट, एकाच मानस सरोवरापासून निघालेल्या हिंदुस्तानच्या दोन बाजूच्या सिंधु ब्रम्हपुत्रांप्रमाणें हनुवटीवरील जाळ्यांतून निघालेल्या पांढऱ्या शुभ्र दाढीच्या दोन लांबच लांब सटा, दंडास बांधलेला अनंत, आणि गळ्यांतील रेशमी सूत्र, मधुर हास्य आणि सकौतुक दृष्टि, ज्ञान, दया, औदार्य इत्यादि गुणांचा प्रभाव, शांति क्षमा दया यांनीं युक्त असे तपाचें तेज, आणि बलवीर्यतेची ऐट—इत्यादि लक्षणयुक्त अशी ती मूर्ति, लांब सडक बोटें लववून साभिनय भाषण करीत उभी असलेली पाहिली म्हणजे आयुर्वेदादि उपांगसंपन्न असा मूर्तिमंत ऋग्वेदच पुढें उभा आहे कीं काय, असें वाटे ! असो. ज्योतिष शास्त्रावर अण्णासाहेब यांचा विश्वास असल्याबद्दल वर सांगितल्याप्रमाणें संभावित रीतीनें त्यांची टवाळी अथवा जास्त बोचकपणानें त्यांची कींव केलेली पुष्कळ वेळां ऐकूं येते. परंतु यांतही विचार करण्यासारखी एक गोष्ट आहे. ज्योतिषशास्त्र—म्हणजे, फलज्योतिष—याविषयीं अण्णासाहेब यांचा दृढविश्वास कितपत होता, हें सांगणें कठीण नाहीं. अनेक आर्यशास्त्रांप्रमाणें ज्योतिषशास्त्र हें एक शास्त्र आहे, अशी त्यांची समजूत होती. परंतु, त्याबरोबरच कांहीं झालें तरी तें जडशास्त्रच आहे, आणि इतर सर्व जडशास्त्रांप्रमाणेंच त्याची कितीही वाढ झाली तरी, तें अपूर्णच राहणार, असें ते सांगत. एकदां त्यांना त्यांच्या स्वतःच्या कुंडली विषयींच प्रश्न केला होता. तेव्हां त्यांनीं चटकन्, ‘ ज्यांच्या लाभांत गोविंद आला, त्यांची कुंडली कोण सांगणार ? ’ असें उत्तर दिलें. त्याचप्रमाणें चेहऱ्यावरून, आंगठ्यावरून इतकेंच तर काय, पण नुसत्या आवाजावरून कुंडली मांडण्याची प्रतिज्ञा करणारे एक गर्गाचार्य त्यांचेकडे आले होते. त्यावेळच्या झालेल्या भाषणांतही त्यांनीं असेंच सांगितलें कीं “ फलज्योतिष हें शास्त्र तसें ठीक आहे, परंतु तें पूर्ण शास्त्र होऊन तंतोतंत उतरणें शक्य नाहीं. नदीच्या प्रवाहाबरोबर वाहणाऱ्या लांकडाप्रमाणें नियतीच्या ओघांत वाहणाऱ्या जीवांसंबंधानें त्याचा उत्तम

उपयोग होतो, तरीपण भगवत्कृपेनें नियतीच्या प्रवाहांत उलट पोंहत असलेले क्वचित् जीव आढळतात, त्यांच्यासंबंधीं हें शास्त्र आमच्या कल्पनेप्रमाणें तंतोतंत जुळणार नाहीं." आणि ज्योतिषशास्त्राचा ज्यांनीं खरोखर अभ्यास केला आहे, अशा विद्वानास सर्व शास्त्राभिमान टाकून शेवटीं एक गोष्ट कबूल करावीच लागते. प्रत्येक जीव म्हणजे हरतऱ्हेचें कर्म निर्माण करण्याचा कारखानाच आहे. या टांकसाळींत सर्व प्रकारचीं नाणीं अखंड पडतच असतात, व विश्वांतून सुखदुःखात्मक भोगरूपी कच्चा माल त्याला अखंड पुरविला जाऊन त्याची उत्पादक शक्ति अखंडित राहते. अशा स्थितींत अमुक प्रकारचें नाणें या टांकसाळींत तयार होईल एवढेंच फार झालें तर कोणीही सांगूं शकेल; परंतु पुढें त्या नाण्याची दुनियेच्या बाजारांत कशी किंमत ठरेल, आणि त्याच्या मोबदल्यांत तो काय परत घेऊन येईल, हें सांगणें कठीण आहे. कारण तें एका विषयाचें काम नसून दुनियेच्या बहुविध व्यवहारांच्या ज्ञानावर अवलंबून आहे. म्हणजे, एका कुंडलीच्या मानानें त्या जीवास सुखदुःखात्मक भोग विश्वांतून किती मिळावयाचा आहे, हें ज्योतिषी सांगूं शकेल; परंतु तो तेवढा भोग मिळावयास, केवढ्या प्रमाणाचें कर्म त्याच्या हातून घडावें लागेल, हें सांगणें ज्योतिष या जडशास्त्राच्या पलीकडे आहे. उदाहरणार्थः–एकाद्याला द्रव्यप्राप्तीचा आनंद द्यावयाचा आहे. अशा वेळीं असें होईल, कीं त्या व्यक्तीला अनुसरून अथवा त्या व्यक्तीच्या विशिष्ट परिस्थितीला अनुसरून वेळेस एक पैसा दिला असतांही त्याला मोठी धन्यता वाटेल, व हातीं चिंतामणी आल्यासारखें होऊन जाईल; अथवा, एक लाख रुपये देऊन देखील त्याचा संतोष न होतां उलट खेद व निराशा वाढतील. अशा वेळीं दिलेलें दान व तें घेणाऱ्याची संतुष्टी यांचें ज्याला प्रमाण ठाऊक असेल, तोच त्याची बरोबर सांगड घालूं शकेल. अथवा, व्यवहारांतील सोपा दृष्टांत द्यावयाचा म्हणजे, एकाद्या शेतकऱ्यापुढें जर आंब्याच्या चार कोयी नेऊन ठेवल्या तर तो चटकन् असे सांगेल कीं, या कोयींपासून अमुकअमुक प्रकारचा वृक्ष निर्माण होईल, त्याला अमुक तऱ्हेचीं फळें येतील, साधारण अमुक काळ फळें यावयास लागेल, त्याचीं पानें अशीं असतील, फुलें तशीं असतील इ० इ० आणि तें सर्व जरी खरें झालें; म्हणजे वृक्षफुलफलांची जाति जरी तीच ठरली तरी देखील तो वृक्ष कां ४० फूट उंच होईल, कां २५ फूट वाढूनच त्याची वाढ खुंटून जाईल, त्याचें फळ निंबासारखें लहान होईल, कां पपनसासारखें

मोठें होईल, इत्याहि सांगणें हें नुसत्या वनस्पतीशास्त्रावर अवलंबून नसून त्या जमिनींत पेरणी केली जाते, त्या जमिनीवर, तेथील, हवामान, पाऊस पाणी, मनुष्यप्रयत्न, वगैरे गोष्टींवर अवलंबून राहील; म्हणजे ज्योतिष शास्त्राचें ज्ञान विश्वांतील क्रिया व सुखदु:खात्मक भोग यांचें प्रमाण ठरल्याखेरीज, प्रत्येक जीवाच्या बाबतींत लंगडेंच पडणार. जेथें कोठें तें खरें ठरतें, तेथें तें एक तर काकतालीय न्यायानें, अथवा त्या जीवाच्या केवळ प्रवाहपतिततेनें. आणि म्हणून तें शास्त्र केव्हांही अपूर्णच राहणार येथें ही शंका घेण्याचें कारण नाही. कीं, ज्या ग्रहगुणांनीं कर्म-भोगाची जात निश्चित करतां येते, त्या ग्रहपरिस्थितीनेंच त्यांचें प्रमाणही कां निश्चित करतां येऊं नये ? कारण, एक जीव अथवा पारिभाषिकतेनें बोलावयाचें म्हणजे विशिष्ट ग्रहस्थित हेंच मुळीं एक बीज आहे; आणि अनंत विश्वांत तें उबून त्यांतून वृक्ष बाहेर यावयाचा आहे,तेव्हां नुसत्या नवग्रहात्मक परिस्थितीच्या ज्ञानानें कसें भागेल ? त्याला अनंत विश्वाच्या परिस्थितीचें ज्ञान पाहिजे. आणि म्हणूनच पूर्वकालीन ज्योतिषी आपल्या ज्योतिर्ज्ञानास स्वरोदय, योगाभ्यास, उपासना, अथवा तप इत्यादिकांची जोड देत असत. अण्णासाहेब हेही त्यांनीं पाहिलेल्या सोमाचार्य सिद्धांती या पंडिताचें उदाहरण देत असत. हा गृहस्थ पहाटेस उठून स्वरोदयाप्रमाणें आपले कांहीं आडाखे निश्चित करून घेत असे, व मग त्याला कोणी कांहींही विचारा, फुटाणे उडाल्यासारखे फाड फाड उत्तरें देत असे. परंतु हा मूळ आडाखा चुकला, कीं, त्याच्या ज्योतिषानेंही गोता दिलाच म्हणून समजावें. हा आडाखा जमल्याची अशी खूण होती कीं, निरनिराळ्या रंगाच्या गोट्या अण्णासाहेबांनीं खिशांत घालावयाच्या, व त्यानें सांगावयाचें कीं ' अमुक रंगाची गोटी हातीं येईल,' व नेमकी तीच हातीं येत असे. परंतु जेव्हां केव्हां यांत चूक पडत असे, तेव्हां मात्र आचार्यांचें ज्योतिष म्हणजे मोठाच गोंधळ होऊन जाई. असो. सारांश इतकाच कीं अनेक जड शास्त्रांपैकीं ज्योतिष हेंही जडशास्त्रच आहे, आणि म्हणून त्या इतर शास्त्रांप्रमाणें तेंही अपूर्णच राहणार. व हें लक्षांत ठेवूनच बेताल न होतां तें उपयोगांत आणलें पाहिजे. स्वतः अण्णासाहेब यांचा भविष्यज्ञानाचें एक साधन म्हणून त्या शास्त्रावर भर असणें अशक्य होतें, आणि त्या रीतीनें ज्योतिषाचें त्यांनीं यत्किंचितही स्तोम माजविल्याचें आढळण्यांत नाहीं. जेथें कोठें धर्मशास्त्राची आणि ज्योतिषशास्त्राची सांगड आहे,—मग ती विधिनिषे-

धात्मक कशीही असो—तेथें मात्र ज्योतिषशास्त्राला त्यांच्या वागणुकींत महत्त्व येई, आणि ज्या मळसूत्र(Fulcrum) वर त्यांच्या वागणुकीचे एकंदर नियम बसलेले होते, त्याच्या दृष्टीनें पाहतां, कोणाही विचारवान् प्राण्यास त्याबद्दल उपहास किंवा कीव करण्याचा एकदम धीर होणार नाहीं. मनुष्य आणि त्याची क्रिया अशी एक तुटक वस्तूच या भरल्या विश्वांत त्यांच्यापाशीं नव्हती. विश्व आणि त्याचा एक घटक परमाणु मानव प्राणी यांचा युतावयव संबंध त्यांच्या दृष्टीला सूर्यप्रकाशासारखा धडधडीत दिसत होता. अर्थातच मानवी क्रिया सभोंवतालच्या दृश्यव्यवहाराच्या निमित्तानेंच उत्पन्न होते, आणि कांहींतरी दृश्य परिणामांतच तिचें पर्यवसान आहे अशी त्यांना कल्पनाही करवत नसे. त्यामुळें त्यांचा गोतावळा सर्व विश्वरूपच होता. म्हणून मानवी क्रियेचे परिणाम कमीजास्त प्रमाणानें, व थोड्या बहुत कालावधीनें इतर विश्वघटकांसही सोसावेच लागतात, व त्याचप्रमाणें, शाकुंतलांतील विदूषकानें म्हटल्याप्रमाणें—'यद्वेतसः कुब्जलीलां विडंबयति तत् किं आत्मनः वेगेन ? ननु नदीवेगेन' याप्रमाणेंच मानवी क्रियेसंबंधींही त्यांची धारणा होती. आज जरी अनेक खऱ्या खोट्या कारणांनीं धर्मशास्त्र म्हणजे एक सांवळा गोंधळ झालेला आहे, तरी वैदिक धर्मांतील एकूणएक आचारपरंपरा आणि विचारसरणी यांची मांडणी याच महातत्त्वाला धरून केली असल्यामुळें पुष्कळ वेळां असें होण्याचा संभव आहे कीं, विधि म्हणून सांगितलेल्या कित्येक गोष्टींचा इष्ट परिणाम झालेला मुळींच दिसत नाहीं. अथवा बहुतकरून इष्ट परिणामांत तरी झालेला दिसत नाहीं. हीच गोष्ट सर्व प्रकारच्या निषेधांविषयींही आहे.म्हणजे नित्य मृत्युयोगावर आणि घातवारावरच श्मश्रु करणारा भरपूर शंभर वर्षें निरामय राहिलेला दिसून येतो, व त्यामुळें धर्मशास्त्राविषयीं उपहास उत्पन्न होतो. परंतु विश्वपरमाणु आणि विश्व यांचा हा आघातप्रत्याघातसंबंध लक्षांत ठेवला तर धर्मशास्त्रांतली ज्योतिषशास्त्राची भानगड केवळ खुळसटपणाची अथवा मतलबाची होती, असें म्हणतां येत नाहीं, व हा सिद्धांत ज्याला पटला आहे, त्याला तिला अनुसरून वागणेंच भाग आहे. आतां एवढें मात्र खरें, कीं असें वागणाराला व्यवहारामध्यें कमालीच्या अडचणी उपस्थित होतील, व त्याला केवळ प्रो. विक्षप्तमूर्ति म्हणूनच रहावें लागेल. पण त्याला इलाज काय ? सत्यापुढें तडजोड नाहीं, सत्य तें सत्य; एक तर सगळें धरा, नाहींतर सगळें टाका; पण तेथें तडजोड कशी

होऊं शकेल ? ’ असें ते नेहमीं म्हणत असत, ते अशाच अर्थानें. धर्मशास्त्रां-मध्यें आपद्धर्माचा एक भाग ठेवला असून एकंदर धर्मशास्त्राची आणि मनुष्यव्यवहाराची सांगड घालतांना सारें तडजोडीचेंच धोरण ठेवलें आहे, त्यावरून असा ग्रह होतो कीं, मनुष्यानें आपल्या समजुतीनें व सोयीनें तडजोड करून आचरावयाचाच हा भाग आहे. परंतु अशी तडजोड आणि सोय तेथें असणें वास्तविक नाहीं. सांगितली आहे, ती नाइलाज म्हणून सांगितली आहे. म्हणजे एवींतेवीं मनुष्याची ताकद चालतच नाहीं, तर निदान परंपरा मोडून अजिबात तत्त्वलोप होऊं नये, अथवा ‘ अकरणान्मंदकरणं श्रेयः ’ याच न्यायानें सांगितली आहे. परंतु त्या त्या मानानें परिणामांतही समव्यस्तता आलीच पाहिजे, असेंच त्यांच्या सांगण्याचें धोरण आहे. अथवा तशाच इतर कांहीं खोल कारणांनीं सांगितली आहे. केवळ आपद्धर्म म्हणूच मांसभक्षणास प्रवृत्त झालेला विश्वा-मित्रही आपणास आपद्धर्मांत केलें म्हणून त्याचा अनिष्ठ परिणाम भोगावा लागणार नाहीं, असें म्हणत नाहीं; तर यानें जो दोष लागेल त्याचें परिमार्जन शरीर राहिलें असतां तपानें करून इतरही पुण्य संपादीन, तेव्हां शरीर टाक-ण्यापेक्षां मांस खाऊनही जगविणें जास्त फायदेशीर आहे, असें म्हणतो. धर्म, विष्णु, ब्रह्मदेव इत्यादिकांनाही आपत्तींत केलेल्या दोषाचारांचें प्रायश्चित्त सोसावें लागलें, असें ग्रंथांत जागजागीं वर्णन आहे. सारांश इतकाच कीं सत्य म्हटलें म्हणजे तेथें तडजोड नाहीं. जेथें कोठें अशी तडजोड आहे, अथवा आणावी लागते, तेथें ती अर्थातच फलप्राप्तीचा कांहीं तरी प्रमाणांत उणेपणा स्वीका-रूनच करावी लागते. आणि म्हणूनच आपद्धर्म हा तात्पुरता आहे, हें लक्षांत ठेवून आपत्ति निवारण्याचा प्रयत्न करण्याची व निवारण होतांच पुन्हा मूल-पदावर येण्याची माणसावर जबाबदारी आहे. हें तत्व विसरून जाऊन कंचु-कीच्या हातांतील आचारयष्टीप्रमाणें आपद्धर्मच ज्या वेळेला प्रस्थानसाधनच होऊन बसतो, तेव्हां अर्थातच संस्कृतीचा ऱ्हास होऊन कांहीं तरी निरनिराळ्या चिजा उत्पन्न होतात. आणि म्हणूनच त्यांनीं कोणचेंच निश्चित साध्य पदरांत न पडतां ‘ यस्य कस्य तरोर्मूलं येनकेनापि मिश्रितम् ’ या न्यायानें कांहीं तरी घडून येतें. सारांश काय, कोणचाही धर्म म्हटला म्हणजे त्याचें आचरण, सुख आणि सोय यांची प्रतिष्ठा ठेवून नेहमींच करतां यावयाचें नाहीं आणि केवळ

याच दृष्टीनें धर्माची घडी बसविण्याची खटपट करणारे लोक कितीही विद्वान् असले, आणि परमेश्वराच्या अस्तित्वाची बडबड त्यांनीं तोंडांनीं कितीही केली, तरी ते इरसाल नास्तिक असतात, व त्यांचे सर्व प्रयत्न इतर कित्येक शास्त्रांप्रमाणेंच धर्मशास्त्राचेंही प्रवर्तन सामाजिक कारणानेंच झालें आहे, अशाच समजुतीवर चाललेले असतात. वरील महा सिद्धांत ज्यांच्या पचनीं पडणें शक्य नसेल, त्यांनीं पाहिजे तर वाटेल त्या समजुतीवर चालावें. परंतु जों-पर्यंत हा सिद्धांत खरा असणें शक्यच नाहीं, असें सिद्ध करतां येत नाहीं, तोंपर्यंत धर्मशास्त्राची व त्याच्यावर विश्वास ठेवून अत्यंत प्रामाणिकपणानें, कर्मठतेनें कष्ट करणाऱ्यांची कींव करण्याचें कारण नाहीं. असो, सांगावयाची गोष्ट हीच कीं धर्मशास्त्राशीं जेथें ज्योतिषाची सांगड आहे, तेथेंच फक्त त्यांच्या जवळ ज्योतिषाची प्रतिष्ठा होती. एरवीं लोक ज्या रीतीनें त्या शास्त्राचें महत्व समजतात, तशा रीतीनें त्यांना त्याचें महत्व वाटणें शक्यच नव्हतें आणि दुसऱ्याच्या बाबतींतही कधीं त्यांनीं तें दाखविलें नाहीं. उलट ' जरी ज्योतिष-शास्त्र कितीही खरें असलें तरी त्याचा काय उपयोग ? त्याप्रमाणें होणें न होणें हें तर अखेरीस महाराजांच्यांच स्वाधीन, ' असेंच ते सांगत असत.

त्यांच्या दीर्घसूत्रीपणांत या शिवाय दुसरींही कित्येक तंत्रें असत. एकदां एक रोगी अत्यवस्थ होता. आणि अण्णासाहेबांना पाहण्याविषयीं त्याचा अट्टा-हास चालला होता. त्याला पाहून येणें म्हणजे सरासरी पंधरा मिनिटांचेंच काम होतें. परंतु कितीही तगादे आले तरी, दोन तीन दिवसपर्यंत यांनीं सवडच केली नाहीं. ' आत्तां येतों,' ' मग येतों,' ' विष्णूला जाऊन तसाच येतों,' असें म्हणून तीन दिवस तसेच लोटून दिले. त्याच्या येथील मंडळी तर फारच खट्टू होऊन गेली. अखेरास कुठें यांना जावयास फावलें. त्यावर ' हें काय तुमचें करणें ? ' म्हणून प्रश्न विचारला असतां त्यांनीं सांगितलें कीं, " पंधरा मिनिटांची सवड करणें कांहीं कठीण नव्हतें, परंतु पूर्वी जाणें रोग्या-च्या दृष्टीनें हितावह नव्हतें. रोगी अत्यवस्थ असतां त्याला जर एकादा ध्यास असला तर, अथवा अमुक मनुष्य येईल, व त्यानें मी बरा होईन ' अशी कांहीं आशा असली तर, त्याचा त्याच्या रक्ताला जोर असतो अशा वेळेला, जर त्याच्या मनाप्रमाणें घडून आलें, तर रक्तांतील जोर नाहींसा होऊन, एकदम दगा होण्याचा संभव असतो. अशा अवस्थांतून असें घडतें कीं, मधूनमधून

आतां ज्योत मालवते कीं काय, असे कठीण प्रसंग येतात. व तेवढा तो काळ निघून गेला, कीं, पुनः प्रकृति सुधारण्याच्या मार्गास लागते. अशा बिकट प्रसंगीं हा रक्ताचा जोरच त्यांतून पार पडण्यास उपयोगी पडतो. म्हणून असा विशेष काल टळून जाईपर्यंत त्याच्यापुढें जाऊन उभें राहूं नये." याप्रमाणें त्यांच्या सर्वच वर्तनामध्यें दिसावयाला एक प्रकारचा नादिष्टपणा, परंतु वस्तुतः असें कांहींतरी धोरण असे.

सर्व कामांत जरी याप्रमाणें त्यांचा संथपणा असला तरी एका कामांत मात्र त्यांची तरतरी विशेष दिसून येई. आजपर्यंत जगांत झालेल्या सर्व महापुरुषांच्या गुणदोषांची जर सरासरी काढली, तर असें आढळून येईल कीं, त्यांच्या अंगीं एक गुण बहुत करून सामान्य होता. सर्व साधारण माणसांच्या मानानें हे लोक चालणारे फारच जलद असतात. त्यांच्या रोमरोमांतून सळसळणाऱ्या क्रियाशक्तीमुळेंच असें होत असावें. श्रीसमर्थांच्याविषयीं तर गिरिधरांनीं ' सोडलेला तीर ' पुढें होऊन मागच्या हातीं धरतात ' असें त्यांच्या चालण्याचें काव्यमय वर्णन केलें आहे. स्वामी रामतीर्थ वगैरे लोकप्रसिद्ध व्यक्तीही अशाच जलद चालणाऱ्या होत्या. लोकमान्यांची चालण्याची तडफ तर सर्वांच्या परिचयाचीच आहे. अण्णासाहेबांचेंही सहज चालणें अतिशय वेगाचें असून हाच त्यांचा वेग अगदीं अखेरपर्यंत तसाच टिकला. एकदां चालूं लागले म्हणजे चांगल्या चालणाऱ्यालाही त्यांची साथ करणें कठीण जाई, व चांगला सशक्त मनुष्यही त्यांच्यावरोबर फार थोड्या वेळांत थकून जाई. १९१५ सालीं आषाढांत आळंदीस जात असतां नाक्यापाशीं सहज गाडींतून उतरले, व चालूं लागले. श्रीगणपतिअथर्वशीर्षाचा अर्थ जवळच्या माणसास सांगत होते. बोलतां बोलतां **दिघी** उलटून जाऊन मोठ्या पादुका केव्हां आल्या, हेंहि लक्षांत आलें नाहीं. परंतु त्यांच्या चेहऱ्यावर थकव्याचें यत्किंचितही चिन्ह नव्हतें. अशाच तऱ्हेनें एकादेवेळीं बोलत उभे राहिले म्हणजे वेळेस पांच पांच तास निघून जात, तरी त्यांना कधीं बसावयाची आठवण होत नसे. अशा वेळीं श्रोत्यांची तर त्रेधाच उडून जाई. कोठें भिंतीचा आधार घे, कोठें खुर्ची टेबल, कांहीं उंच असेल त्याच्यावर रेलल्यासारखें कर असें करून अखेरीस मर्यादेची कल्पना सोडून देऊन खुशाल खालीं बसावें, व त्यांनीं मात्र समोर उभें राहून चार चार तास मोठ्या आनंदानें बोलावें,

असेंच नेहमीं घडून येई. होमरूल लीगच्या वेळेला श्री० दादासाहेब खापर्डे नागपूरचे बॅ. अभ्यंकर, डॉ० परांजपे वगैरे मंडळीही आळंदीस आली होती. त्यांनीं प्रसाद घेतल्यावर जावयाची तयारी केली. 'आत्तां इतक्यांत कशाला जातोस, संध्याकाळीं आरती करून कां जात नाहीं!' असें अण्णासाहेब म्हणत होते, व 'छे, मला गेलेंच पाहिजे,' असा दादासाहेबांचा आग्रह होता. अशा रीतीनें बोलत बोलत सारी मंडळी रस्त्यावर आली, व मोटार सुटण्याची तयारी होत होती म्हणून सहज तेथें उभी राहिली. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें त्या मोटारीचें कांहींतरी तंत्र बिघडलें. मंडळींना वाटलें इतक्यांत मोटार दुरुस्त होईल, मठांत जाऊन काय करावयाचें? परंतु बराच वेळ होऊन गेला तरी मोटारीचें तंत्र जुळेना. इकडे अण्णासाहेब जे बोलत उभे राहिले, ते रात्रीं ९ वाजेपर्यंत आरती होऊन मंडळी जाईपर्यंत तसेच उभे होते! श्री० दादासाहेब वगैरे मंडळींनीं भिडेभिडेनें पराकाष्ठा तासदीड तास कशीबशीं कळ काढली. अखेरीस नाइलाज होऊन समोरच्या जोत्यावर सर्वांनीं तळ दिला व अण्णासाहेब मात्र मंडळींनीं बसावयाचा कितीही आग्रह केला तरी 'आतां बसतों, थोड्या वेळानें बसतों,' असें करीत पुरे सात तास तसेच्या तसेच उभे होते. त्यांच्याशीं बोलतांना नेहमीं असे प्रसंग येत. पुष्कळ वेळां असें होई कीं, विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर त्यांना दिलें म्हणजे ऐकणाऱ्याला 'आतां झालें' असें वाटून तो निघून जाण्यास पाही, अशा वेळीं यांनीं उगीच कांहींतरी बोलणें काढावें, व त्याला दोन दोन तास अटकवून ठेवावें. खुद्द त्या ऐकणाराला असें होऊन जाई कीं आतां हे पुरे कां करीत नाहींत? परंतु अशा रीतीनें कांहींतरी फालतू गोष्टींत स्वतःचा वेळ खर्चण्यांत त्यांचाही कांहीं हेतु असेल, असें कोणाच्या लक्षांत येऊं नये. आणि अगदीं क्वचित् प्रसंग टाकले तर, त्यांनीही कधीं कोणाच्या लक्षांत येऊं देऊं नये. परंतु त्याच्या मुळाशीं अगदीं सूक्ष्म कां होईना, दुसऱ्याचें कांहीं तरी हित करण्याची बुद्धि असे. परंतु, त्याबरोबरच त्यांच्या आंगच्या अलौकिक लीनतेमुळें तसें त्याला उघड तरी कसें बोलून दाखवावें, असा त्यांच्या वृत्तींत संकोच होई. तेवढ्याकरितां स्वत;च्या कामाचा वेळ मोडून, व तें काम मागून करावें लागल्यामुळें झोंप, खाणेंपिणें, वगैरे बाबतींत हाल सोसून आणि वर पुन्हां पदरांत भ्रांतिष्टपणा घेऊनही तसें पर्या-

यानें घडवून आणण्याची ते खटपट करीत. अशा तऱ्हेचें एक लहानसें उदाहरण आठवतें, त्यावरून निरभिमानता आणि कारुणिकता यांचा थोर पुरुषांच्या ठिकाणीं कसा मधुर संगम असतो, तें दिसून येईल.

त्यांच्या जवळील एका मुलाला श्मश्रु करावयाची होती. त्या दिवशीं शनिवार असून संकष्टी चतुर्थी होती. त्यालाही संकष्टी चतुर्थीचें व्रत होतें, परंतु ध्यानांत नसल्यामुळें न्हावी आल्याबरोबर त्यानें श्मश्रूचा बेत केला. त्यावेळीं कांहीं विषयावर अण्णासाहेब बोलत असल्यामुळें त्यानें दुसऱ्या एका गृहस्थास ‘ तुम्हीं बसा, मी आतांच येतों ’ म्हणून सांगितलें पोटांतला भाव असा कीं अण्णासाहेब यांनीं आपण होऊन भाषण थांबवावें. परंतु कांहीं केल्या तें भाषण तर थांबलेंच नाहीं, पण उलट मारुतीच्या शेंपटाप्रमाणें लांबतच चाललें. शेवटीं हळूंच पळता पाय काढावा म्हणून तो उठून उभा राहिला. परंतु त्यानेंही भाषण न थांबतां उलट तेही उठून उभे राहिले, व तशा उभ्या-उभ्याच तास दीड तास निघून गेला. शेवटीं खालचें काम सर्व आटोपून बराच वेळ कंटाळल्यावर न्हाव्यानें हांक मारली. तेव्हां मात्र भीड तोडून ‘ आतां मी श्मश्रु करावयास जातों ’ म्हणून त्यानें विनंति केली. तेव्हां ‘ बरें आहे ’ म्हणून तेही आपल्या उद्योगास लागले. इकडे श्मश्रु वगैरे आटोपल्यावर स्नान करून दिवाणखान्यांत येत असतांना त्या दिवशीं चतुर्थी असल्याचें त्यास समजलें. तेव्हां ‘ आज चतुर्थी आहे आणि मी तर हजामत करविली,’ असें त्यानें म्हटल्यावरून अण्णासाहेब म्हणाले ‘ माझ्या होतें ध्यानांत, आणि म्हणूनच मी बोलत उभा राहिलों. ’ त्यानें विचारलें, ‘ मग तुम्ही तसें सांगितलें कां नाहीं ? ’ ते म्हणाले, ‘ तुझा जरा विशेषच आग्रह दिसला करण्याचा, म्हणून मी बोललों नाहीं. ’ तेव्हां आपली चूक लक्षांत येऊन त्या इसमालाही खेद झाला, व ‘ आम्हांला कुठलें येवढें धोरण असणार ? उघड उघड जर सांगितलें नाहीं, तर आम्हांला कधींही कळावयाचें नाहीं, असें आम्ही अडाणी आहों ’ म्हणून त्यानें सांगितलें. तेव्हां त्याला वाईट वाटलेलें पाहूनही त्यांचें अंतःकरणही थोडेंसें कळवळलें व त्यांनीं मृदुवाणीनें त्याचें समाधान केलें. ही गोष्ट दिसावयास क्षुल्लक आहे, तरी पण तिच्यावरून त्यांच्या वर्तनांतील कित्येक खुब्या समजून येतात. ‘ लोकोत्तर पुरुषांचा स्वभाव वज्रापेक्षांही कठोर असून फुलापेक्षांही नाजूक असतो, ’ असें भवभूतीनें म्हटलें

आहे, परंतु कठोरपणा आणि मृदुताच तर काय पण अशा सर्व विरोधांचा पुण्य-संगम त्यांच्या स्वभावांत कसा असतो, हें तिच्यावरून दिसून येईल. त्यांच्या धर्मश्रद्धेप्रमाणें त्या दिवशीं श्मश्रु करविणें श्रेयस्कर नाहीं असें तर त्यांस वाटत होतें; परंतु 'मी सांगतों, करूं नको' अशी अधिकारवाणी त्यांना तोंडांतून काढवेना. त्यांतच त्याची विशेष इच्छा दिसून आल्यामुळें त्याचा हिरमोड करावा, हेंही त्यांच्या मनास येईना. अशा चमत्कारिक स्थितींत स्वतःकडे नादिष्टपणा घेऊन, त्यांनीं आपला हेतु साधण्याची खटपट केली. ही गोष्ट फारच क्षुल्लक होती, आणि तिच्यामुळें फार झालें तर 'काय करावें बुवा, अण्णासाहेबांनीं सोडलेंच नाहीं. न्हावी निघून गेला' एवढाच टपका त्यांच्यावर आला असता हा भाग वेगळा. परंतु इतक्या बारीक गोष्टीपासून तो डफळापूर प्रकरणासारख्या मोठमोठ्या गोष्टींपर्यंतही त्यांचें वागण्याचें असेंच धोरण असे, व त्यांतच ('Thy will be done') अशी त्यांना सर्वत्र अखंड प्रतीत होणाऱ्या ईश्वरेच्छेपुढें लीन होण्याची तयारी दिसून येई. काम म्हटलें म्हणजे, तेथें मोठें आणि धाकटें, हा भेदच त्यांच्या दृष्टींत नव्हता. आणि 'येन केन प्रकारेण यस्य कस्यापि देहिनः । संतोषं जनयेत् प्राज्ञः तदेवेश्वरपूजनम्' ॥ ही भावना त्यांच्या कृतींत पदोपदीं दिसून येई. स्वामी विवेकानंदांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'अशी वेळ येईल कीं ज्यावेळीं प्रत्येकाला, दोन दोन तास ध्यानधारणा करण्यापेक्षांही एकाद्या भंग्याला चिलीम भरून देण्यांतही जास्त परमार्थ आहे, असें कळून येईल.' याची सत्यता अण्णासाहेबइतकी इतरत्र क्वचितच आढळण्यांत येईल. मात्र इतकेंच कीं त्यांनीं "देवपूजा संध्या वगैरे काय करतां? त्याच्यापेक्षां दुसऱ्याची सेवा करण्यांतच जास्त परमार्थ आहे" असा एकदेशी उपदेश कधीं केला नाहीं. उलट 'तेंही पाहिजे, आणि हेंहि पाहिजे, सर्व तऱ्हांनीं आणि सर्व प्रकारांनीं, कोणीकडून तरी ममत्वभाव टाकून महाराजांच्या इथें लीन होऊन गेलें पाहिजे' असेंच शिकविलें.

चरित्रास जोडलेल्या अण्णासाहेब यांच्या स्तोत्रांत स्तोत्रकारांनीं 'संकेत-रेखा नवभारतस्य' असें त्यांचें थोडक्यांत संपूर्ण वर्णन केलें आहे. वैदिक-धर्माची व भारतवर्षाची उन्नति होऊन त्यानें वैभवसंपन्न व्हावें असें वाटणाऱ्या वैदिक संस्कृतीच्या प्रत्येक पुत्रास त्या वैभवास योग्य असे भारतपुत्र कसे असावे, असें जें वाटत असेल त्या सर्वांचा जर निष्कर्ष काढला, आणि तत्त्वतः जुनें-

सर्व कायम ठेवून, नव्याच्या सर्व इष्ट मिश्रणानें तयार होणारी पिढी कशी असावी, याची जर कांहीं कल्पना केली तर, त्यांचें उदाहरण म्हणून अण्णासाहेब यां चेकडे खुशाल बोट दाखवितां येईल. किंबहुना सर्व कलिकाला–करितां भगवंतांनीं विशेष रीतीनें प्रशंसिलेल्या कर्मयोगाचें ते प्रत्यक्ष उदाहरण होतें. आमच्या-कडची युगकल्पना व त्या युगांची कालसंख्या यांचा वाद सोडून दिला, तरी एवढें दिसून येतें कीं, प्रत्येक देशांत व प्रत्येक कालांत व सामान्यतः सर्व पृथ्वीवरच उच्चनीच दशेचे फेरे कांहीं विशेष क्रमानें फिरत असतात. मग त्यांचें व्यक्त स्वरूप धार्मिक,सामाजिक राजकीय कसेंही असो या स्थित्यंतराचें कारण शोधूं जातां असें आढळून येतें कीं, त्या त्या स्थलीं जेव्हां अनुकूल काल येतो, तेव्हां गुणकर्मांनीं समान असे जीव जन्मास येतात, व त्यांच्या अंतः-प्रवृत्ति आणि बाह्य परिस्थिति यांच्यांतहि एक प्रकारचा मेळ असतो. परंतु प्रतिकूल कालांत याच्या अगदीं उलट घडतें. म्हणजे प्रभावशाली जीव, त्यांचें गुणकर्म, ( कर्म=कर्मसामर्थ्य ) आणि परिस्थिति यांच्यातील ही व्यवस्था नाहींशी होऊन त्यांत एक प्रकारची कलना ( Heterogenity ) उत्पन्न होतें. म्हणजे परस्परविरुद्ध अशा भिन्न भिन्न सत्त्वांचा सांवळागोंधळ होऊन जातो. अशा स्थितींत ज्याला केवळ आत्मकल्याणच करावयाचें आहे, त्याला गीतेंतील आत्मार्पणरूप कर्मयोगानें अथवा पतंजलीच्या भाषेंत म्हणावयाचें म्हणजे ' ईश्वरप्रणिधानानें ' तें करून घेणें फारच सुलभ आहे. परंतु ज्याला आपला मार्ग असा एकलकोंडेपणानें काढावयाचा नाहीं, व आपणाकरितां विश्व आणि विश्वामिळतीं आपण या महावैदिक सूत्रास धरून काढावयाचा आहे, त्याचें काम इतर कोणत्याही कालापेक्षां फार कठीण असतें. कारण भोंवतालच्या सर्व विरोधांचा परिहार करून, त्याला स्वतःचाच विरोधाभास करावयाचा असतो. त्यामुळें जितके ढंग बाहेर, तितके रंग याच्याही जवळ लागतात. तरच त्याचा स्वतःस दुसऱ्यासही उपयोग होऊन कल्याण होतें. हल्लींच्या अनंत विरोधमय परिस्थितींत तर हें काम फारच कठीण आहे. सर्व प्रकारच्या आधुनिक संस्कृतींच्या उत्कृष्ट फळांचा उपयोग करून घ्यावयाचा, हें तर केलेंच पाहिजे. कारण* Survival of the fittest चें तत्व जडजीवनासंबंधीं

*परिस्थितीला जें उत्तम वाटतें तेंच ठिकतें.

तरी अबाधित आहे, यांत शंका नाहीं. तेव्हां तें करणें तर अवश्यच आहे. परंतु त्या संस्कृतीला जोडून जी कांहीं मनोरचना लागटपणानें येते, अथवा ज्या मनोरचनेमुळेंच या संस्कृतीचा अहर्निर्विशेष आदर होतो, ती व वैदिक संस्कृतींत बीजभूत असलेली मनोरचना, या परस्पर स्वभावतःच भिन्न आहेत. तेव्हां बाहेरची परिस्थिति दुसऱ्या संस्कृतीस धरून, आणि आंतली संस्कृति मात्र वैदिक संस्कृतीस धरून व्हावयाची, असली अभूतपूर्व आपत्ति येऊन पडली आहे. अशा स्थितींत, विरोधी बाह्य परिस्थितीनें अंतःसंस्कृतीला धक्का न बसतां तिची अबाधित वाढ कशी व्हावी, आणि बाह्य संस्कृतीला तिच्या लगामीं ठेवून, तिच्याकडून हुकमी काम कसें करून घ्यावें, हें अण्णासाहेब यांच्या चरित्राचें सार आहे.

त्यांच्या सर्व आयुष्याचा विचार केला तर सर्व तऱ्हेच्या विरोधांचें इतकें बेमालूम मिश्रण कोठेंच सांपडावयाचें नाहीं. दृष्टांत देऊन सांगावयाचें म्हणजे योगेश्वर कृष्ण आणि देवव्रत भीष्म या भारतीय दोन व्यक्तींच्या प्रकृतीचें जर मिश्रण करतां आलें, तर कसें काय साधेल, याचाच जणूं काय हा ब्रह्मदेवानें प्रयोग करून पाहिला. त्यांचा खाजगी आयुष्यक्रम पाहिला तर केवळ भीष्मच, दुसरी उपमाच नाहीं. परंतु सार्वजनिक चारित्र्य पाहिलें म्हणजे त्यांच्या बहुरंगीपणाची तोड श्रीकृष्णाशिवाय कोणीच करूं शकत नाहीं. भीष्मांनीं ज्याप्रमाणें आमरण कौरवकुलाचा सेवक म्हणून आयुष्य घालविलें व तीन पिढ्यापर्यंत वस्तुतः सर्व कौरवसाम्राज्य स्वतःच्या कर्तृत्वानें चालविलें, त्याप्रमाणेंच आमरणांत आपणास श्रीनृसिंहसरस्वतीचे पदरज म्हणवून घेऊनच, काय, वाटेल तें झालें तरी ती पायरी न सोडतां त्यांनीं सांप्रदायाचा योगक्षेम वाहिला. आंगीं एवढा अधिकार असतांही स्वतः त्यांनीं कधीं वडील माणूस या नात्याखेरीज इतर रीतीनें नुसतें कोणास पायांही पडूं दिलें नाहीं; अथवा एक तुळसीचें पानही डोक्यावर ठेवूं दिलें नाहीं. मग, फुलाची माळ घालणें, वगैरे पूजेचा प्रकार तर दूरच राहिला. सभेचे अध्यक्ष किंवा असलेच कांहीं लौकिक प्रकार सोडले तर, त्यांना फुलाची माळ घालावयाची म्हणजे महाराजांच्या पूजेंतील माळ देवाचा प्रसाद म्हणून घालावी लागे. त्यांच्या अलीकडील अवताराला फुलाची माळ फारच खुलून दिसत असे. जोडा ते फार क्वचित् प्रसंगीं घालीत असत, परंतु तशा वेळीं पायांत जोडा, त्यावर नेसलेलें रेशीमकाठी

धोतर, पांढरा शुभ्र आंगरखा, व जरीचें उपरणें, आणि त्यावर लोळणारी पांढरी शुभ्र दाढी, कोमल हास्य, दयार्द्र दृष्टि, विवेकपूर्ण भालपटल, आणि वृद्धापकाळामुळें उमटूत दिसणारीं गंडस्थळें, आणि सर्वांच्यावर आटोपसर असें लाल रंगी पागोटें, हातांत काठी, चेहऱ्यावरील तेजःपुंजता व सरलता, आणि त्यांनीं ‘नको’ ‘नको’ म्हटलें असतांही त्यांच्या शरीराच्या सर्व ऐटींत अट्टहासानें प्रगट होणारें त्यांचें लोकेश्वरत्व,–या सर्वांत महाराजांच्या पुष्प-हारांची भर पडली म्हणजे पहाणाऱ्याच्या नेत्रांस क्षणभर टक पडत असे. अलीकडे पांढरा शुभ्र आंगरखा रेशीमकाठी धोतर व जरीचे उपरणें हा त्यांचा बाहेर वागावयाचा पोशाख ठरून गेला होता. या त्यांच्या रेशीमकाठी धोतराचें आजपर्यंत त्यांच्याविषयीं बोलणाऱ्या बहुतेक सर्व वक्त्यांनीं मोठें कौतुक केलेलें आढळतें;आणि अंतःस्थिति कांहींही असली तरी बाहेरच्या पोशाखांत ऐटदारपणा सांभाळला पाहिजे, म्हणून आम्ही‘वस्त्रांभूषणांचे’ लोक त्यांचें उदाहरण देतों. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, वस्त्रांभूषणांत नीटनेटकेपणा ठेवला पाहिजे म्हणून तो त्यांनीं कधींही ठेवला नाहीं. तो सहज ठेवला जात होता, हें त्यांचें विशिष्ट प्रारब्ध. आणि ज्या गर्भश्रीमंतींत ते वाढले तिच्या मानानें पाहिलें असतां रेशीमकाठी धोतर म्हणजे कांहीं त्यांच्या दृष्टींत मुद्दाम वापरावयाची विशेष वस्तु नव्हती. नेसावयाचें धोतर म्हणजे तें रेशीमकाठीच असलें पाहिजे, इतकी ती अगदीं त्यांच्या ठिकाणीं सरळ गोष्ट होती. घरीं नित्य वापरावयाचें साधेकाठी धोतर यास त्यांनीं ‘ धोतर ’ म्हटल्याचें कधीं कोणाच्या ऐकण्यांत नाहीं. ‘ अरे, पंचा कोठें आहे ? ’ असें म्हणूनच ते त्याचा उल्लेख करीत. घरांत माणसानें पंचे वापरावयाचे, मग तो कितीही श्रीमंत असो, व बाहेर जातांना धोतर नेसावयाचें, हें जुनें वळण त्यांना लागलेलें होतें, त्याला अनुसरूनच त्यांचें वागणें होतें. बाहेर जावयाचें, म्हणून मुद्दाम धोतर नेसावयाचें, एवढा हव्यास तेथें उरलेला नव्हता. बाहेर जावयाची वेळ झाली म्हणजे, खुंटीवर पहावयाचें, व तेथें जो काय त्यांचा पंचा अगर धोतर असेल तें नेसून, आणि आंगरखा अथवा कोट घालून बाहेर पडावयाचें एवढेंच त्यांना ठाऊक. एरवीं घरांतला सर्व वेळ त्यांचा उघड्यानेंच जात असे. फारच थंडी पडली असली तर उगीच थोडा वेळ सद्रा अंगास लागला तर लागला. त्यांचा विवाह झाला होता, व मनूच्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं यथाशास्त्र पितृ–ऋण फेडलें

होतें, ही गोष्ट वेगळी. परंतु स्त्री म्हणून कांहीं उपभोग्य वस्तु आहे, असा त्यांच्या चित्तावर आजन्म कधीं संस्कारच नव्हता. असें सांगतात कीं, भाऊसाहेब हे स्वतः अतिशय रंगेल आणि विलासी असल्यामुळें आपल्या चिरंजीवांनांही आदिरसाचा सर्वोत्कृष्ट उपभोग घ्यावा, अशी त्यांना मनापासून हौस वाटे; आणि तेवढ्यासाठीं आपला वडीलपणाही बाजूस ठेवून, भाऊसाहेब पुष्कळ प्रयत्न करीत असत. मग काय त्यांना आपला मुलगा संसारांतून उठून जाईल, अशी भीति वाटत होती कीं, काय कोण जाणे. अण्णासाहेब मुंबईहून यावयाचे, म्हणजे त्यांची खोली झाडविण्यापासून सारीं कामें ते जातीनिशीं करीत. परंतु इतकेंही करून अण्णासाहेबांची सुखोपभोगाविषयींची उदासीनता पाहिली म्हणजे, त्यांना मोठें वाईट वाटे. पूर्वींच्या काळाप्रमाणें पतिपत्नींची गांठ घालून देण्यांत घरच्या मंडळींना अतीशय घाई होत असे, आणि यांचें तर पडलें सर्व सशास्त्र काम. त्यामुळें ऋतु प्राप्त झाला तरीही, पूर्ण षोडषवर्षा स्त्री झाल्याखेरीज संबंध करूं नये, अशा तऱ्हेचें यांचें धोरण होतें. आणि त्यांच्या सर्व इतर गोष्टीप्रमाणें हीही गोष्ट त्यांनीं सुकाट्यानें घडवून आणली. कुटुंबसुखाच्या बाबतींतही एकीकडे पाहिलें तर त्यांची स्थिति एकाद्या धर्मशाळेंत घटकाभर टेंकल्यासारखी होती. मुलीवर एवढा जीव आहेसें दिसत होतें, परंतु रोगानें जर्जर होऊन बिचारी मरणोन्मुख झाली तरी तिला काय होतें, याचा यांना पत्ताच नव्हता. स्वतःच्या मुलाला देखील कधीं मायेनें जवळ घेतलें असेल कीं नाहीं कोण जाणे. मद्रासहून आल्यानंतर, संसार तर अजीबाद थांबलाच होता, कुटुंबांतील माणसांनीं दुःखीकष्टी नसावें, ज्यानें त्यानें कुलगौरव सांभाळून आपापल्या तऱ्हेनें आपल्या सुखाची सोय लावून घ्यावी, त्यास जें काय द्रव्यादिक सहाय्य लागेल, तेवढें आपण करावें, एवढाच काय तो त्यांचा कुटुंबाशीं लळा दिसत होता. परंतु दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर कुल व जाति, यांचा ते पराकाष्ठेचा अभिमान दाखवीत, आणि त्यांची प्रतिष्ठा जेणेंकरून राहील अशा तऱ्हेनें अगदीं क्षुल्लक गोष्टींपासून देखील त्यांचें वर्तन असे. पक्षाच्या दिवशीं अण्णासाहेबांचे येथें मोठाच समारंभ असे. सौ० भागीरथीबाई बापट यांनीं आपल्या 'पुष्पमालें'त म्हटल्याप्रमाणें 'असतां पितृतिथी । चाळीस क्षण देती । कोणी नाहीं त्याचें श्राद्ध करिती । भोजनें होतीं सायंकाळीं ॥' अशा रीतीनें पक्ष म्हणजे एकाद्या गरीबाच्या

येथल्या लग्न मुंजीसारखे पार पडत असे. व सहज दोनचारशें पान होत असे! परंतु, याविषयीं त्यांच्याशीं एकदां बोलत असतां थोडेसें खिन्न झाल्यासारखें करून ते म्हणाले, ‘अरे काय सांगतोस? मला तर मोठा लाज वाटते. भाऊसाहेबांच्या वेळीं पक्ष म्हणजे जवळजवळ नऊशें पान होत असे! त्या मानानें मला तर वाईट वाटतें. परंतु तशीच महाराजांची इच्छा.’ चिरंजीवाचें लग्न त्यांनीं लांबविलें, आणि त्या काळाच्या मानानें त्याच्या मर्यादेची सीमा होऊन गेली, म्हणून त्यांचे स्नेही एकदां बाबासाहेब यांची तारीफ करून म्हणाले कीं ‘तुमच्या मुलाची तरी धन्यच आहे. दुसऱ्या श्रीमंताचा मुलगा असता, तर कधींच परभारें लग्न करून घेतलें असतें!’ त्यावर मोठ्या झटक्यानें त्यांनीं उत्तर दिलें, “बाळासाहेब, तीं मुलेंही तशींच असतात!” चैत्रांतल्या हळदीकुंकवासारख्या साध्या गोष्टीपासूनही त्यांचा कटाक्ष, सारें पूर्वीसारखें, कांहीं कमी न पडतां झालें पाहिजे, असा असे. एकदां हळदीकुंकवाचे प्रसंगीं बाजारांतील दुर्मिळतेमुळें टरकांकडी मिळाली नाहीं. आणि तिचें कांहीं कोणाला महत्त्वही वाटलें नाहीं. टरकांकडी ती काय? क्षुल्लक वस्तु. तिच्यांवांचून हळदीकुंकु थोडेंच अडून राहतें? परंतु कांहीं कारणानें अण्णासाहेब यांचें गौरीकडे सहज लक्ष गेलें, आणि त्यांनीं विचारलें, ‘अरे यांत कांकडी कशी दिसत नाहीं?’ त्यावर मंडळींनीं ‘कांकड्या मिळत नसल्यामुळें आणल्या नाहींत,’ म्हणून सांगितलें. परंतु यांची कांहीं केल्या समजूत पटेना. वा! कांकडी नाहीं; असे कसें? ‘हळदीकुंकवाला कांकडी पाहिजेच’ असें म्हणून त्यांनीं कांकडीच्या शोधास माणसें पाठविलीं. आणि जरी त्यांची वृत्ति, त्यामुळें अस्थिर होणें शक्य नव्हतें, तरी देखील ‘फॉंटेन्ब्लू’च्या पूर्वी तडजोड करण्याकरतां झारकडे पाठविलेला कॉलिंकूर परत येण्यास उशीर लागला म्हणून नेपोलियननें अस्थिर होऊन जशी त्याची वाट पाहिली, व माणसांवर माणसें पाठविलीं, तसेंच त्यांनीं केलें. अखेरीस कोठें एक कांकडी मिळाली तेव्हां त्यांना संतोष झाला, व हळदीकुंकवाचा समारंभ नीट झालासें वाटलें. कोणाही माणसासंबंधानें एरवीं त्यांच्या ठिकाणीं अतिशय विलीन भाव असे. एखाद्या भणंग भिकाऱ्याच्या पायावर डोकें ठेवतांनाही त्यांना कसेंसें कधींच झालें नाहीं; परंतु सणावाराचे पोस्त द्यावयाचे म्हणजे मात्र ते सरदारी थाटानें दुरुनच त्याचे अंगावर झोंकावयाचें! अशी त्यांची तऱ्हा अखेरपर्यंत

होती. एकदां कुटुंबांतील लोकांच्या, स्वतःच्या आप्त स्वजनांच्या व कुलपरंपरेच्या गोष्टी सांगावयास लागले, कीं असें वाटे, कीं जणूं काय सर्व जगांत कौतुक करण्यासारखें इतर जातिकुल त्यांना दिसतच नव्हतें. पहिल्या पहिल्यांदां त्यांच्या या करण्याचें मोठें आश्चर्य वाटे. परंतु जसजसा जास्त परिचय झाला, तसतसें त्यांच्या या वागण्याचें महत्व लक्षांत आलें. एक तर असें कीं; त्यांच्याभोंवतीं असणाऱ्या निरनिराळ्या अधिकाराच्या आणि लहानांपासून थोरांपर्यंत सर्व वयाच्या लोकांना कांहींतरी शिक्षण मिळावें, अशा तऱ्हेचें त्यांचें वागणें असे; त्यामुळें 'बद्धची चेववावे मुमुक्षु निरूपणें' अशा समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें उत्तरोत्तर क्रमानें त्यांस शिक्षण देण्याची आवश्यकता व पद्धति होती.

मनुष्यशरीर प्राप्त झालें म्हणजे प्रत्येक जीव लागलींच देवत्व संपादण्याच्या योग्य होतो असें नाहीं. मानवकोटीपर्यंत उत्क्रांत झालेल्या जीवाचें मन केवळ पशुस्थितीमधेंच असतें; अशा त्या मनाची संपूर्ण वाढ होऊन, म्हणजे त्यांत ज्या अनेक प्रकारच्या शक्ति आहेत; त्यांचा इष्ट तसा विकास होऊन, त्याची पकड कांहीं ढिली झाली, तरच मनुष्यजीव त्याच्या पलीकडील देवत्वाच्या पायरीवर स्थिर होऊं शकेल. एरवीं निग्रहानें अथवा क्वचित् कोणाच्या अनुग्रहानें त्या पायरीस हात लागला, तरीही अखेरीस मनाचा जोर जास्त होऊन जीव मागें खेंचला जातो, आणि हातची पायरी निसटून जाते. सारांश काय कीं, येथें सर्वथैव निग्रहाचेंच काम नाहीं. म्हणूनच 'या संसारीं जन्मूनियां। निववावें सकळ इंद्रियां। मग पावे धर्मकाया। नाहीं तरी गति नव्हे॥' असें न केल्यास केवळ हट्टानें थोडेंसें साधलेंसें वाटलें तरी, 'निर्मळ मोक्ष' मिळत नाहीं, आणि जन्मांतरीं म्हणजे पुढें केव्हां तरी, तीं बाधा करतात, असें अनुभवी लोकांचे अनुभव व शास्त्राचे सिद्धांतही आहेत. आणि म्हणून इंद्रियप्रवृत्ति म्हणजे अर्थातच मनाच्या निरनिराळ्या वृत्ति यांचा निवळ तिरस्कार न करतां आदर करून त्यांचेंच साह्य आपल्या कामास जीवानें मिळवावें, व त्यामुळें त्याची उन्नति अनायासें लौकर व्हावी, अशा तऱ्हेच्या प्रणालिका वेदांनीं घालून दिल्या.

दुसरें असें कीं, जीवाच्या ठिकाणीं या ज्या निरनिराळ्या शक्ति

परमात्म्यानें ठेविल्या आहेत, त्या किती जरी वाईट दिसल्या, तरी त्यांत त्याचा कांहींतरी हेतु असला पाहिजे; आणि त्या हेतूप्रमाणें त्या शक्तींचें कार्य घडून आल्याखेरीज त्यांच्या बंधनांतून मनुष्य आपली सुटका केवळ निग्रहाच्या ऐटीनें करून घेऊं शकेल, हें अशक्य आहे. तोफेंत भरलेल्या दारूची जरी स्वतः तोफेला गरज नसते, अथवा तो जर नीट उडाला नाहीं तर, तोफ फोडून तिचेच तुकडे करतो, तरी सेनापतीस त्याची गरज असते. तशीच ही स्थिति आहे. या मनःप्रवृत्ति जरी किरकोळ दिसल्या तरी वस्तुतः त्या भयंकर स्फोटकशक्ति आहेत, आणि जरी त्यांची जीवाच्या वाढीस आवश्यकता आहे असें दिसलें नाहीं, तरी बाहेरील विश्वांत त्यांचें कांहींतरी कार्य असतें हें खास. म्हणून मैत्री, करुणा, मुदिता, इत्यादि शुद्ध सात्त्विक तर काय, पण रोग, द्वेष, अभिमान, मीतूंपणा, क्रौर्य वगैरे राजसी आणि अतितामसी वृत्तींचाही तिरस्कार न करतां त्यांचें इष्ट प्रमाणांत पोषण होऊन विश्वांतील कार्य तर घडून यावें, परंतु त्यांनीं जीवाच्या वाढीस वस्तुतः अडथळा करूं नये, अशा खुबीनें वेदांनीं त्यांचा निर्वाह केला आहे. मनुष्याचें मनुष्यपण या सर्व शक्तींच्या कमीअधिक मिश्रणांतच आहे. व तशी त्यांची वाढ न झाली तर, मनुष्य अपंग व विकल होतो. सर्व धर्मांनीं, आणि भागवत धर्मानेंही हें रहस्य ओळखून या साऱ्या प्रवृत्तींचें पोषण होऊन त्या टाकल्या जाव्या, अशीच धाटी घालून दिली. आणि एवढ्याचकरितां, एका बाजूनें निर्वासन स्थितीचें ध्येय पुढें ठेवून वेदानें जीवास ईश्वराजवळ 'हें दे, तें दे,' असें मागावयास शिकविलें. अगदीं अलीकडे कलिकालांतील भविष्यत् वेद करणारे श्रीतुकाराम महाराज यांनीं देखील "त्यजिलें आणुनी भेटूनी वासना। दाविल्याचें जना काय काज ॥ देवाचिये चाडें आळवावें देवा।" असेंच शिकविलें आहे.

सारांश काय, कीं अलीकडे निष्कामकर्माचा आणि मनुष्यास साहजिक असलेल्या, इतकेंच नव्हे तर अवश्य असलेल्या, सर्व प्रवृत्तींचा, परस्परांचे ठिकाणीं उपहास करण्याचा जो 'मिथ्याचार' उत्पन्न झाला आहे, तसें कोठें भागवत धर्माचें, गीतेचें अथवा वेदाचेंही मत नाहीं. या मिथ्याचारामुळें व्यक्तिव्यक्तींचा मनमोकळेपणा नाहींसा होऊन, परस्परांचाच परस्परांना जाच होऊं लागतो, व एवढ्या तेवढ्या दोषासाठीं चांगलीं गुणी माणसें

मातीमोल होऊन द्वेषादिकआगींनीं समाज धुमसत राहतो. Plain living, high thinking च्या ऐवजीं Low living high talking मात्र वाढलें. व जिकडे तिकडे मिथ्याचार म्हणजे Hypocracy चें साम्राज्य झालें. उदाहरणार्थः—पूर्वीच्या काळीं एकाद्या धडधाकट माणसास अनावर वृत्ति असल्यास तो खुशाल ऐपतीप्रमाणें एकादी रक्षा ठेवीत असे. आणि ती गोष्ट जरी आदरणीय अशी केव्हांही समजली गेली नाहीं, तरीही तिच्यामुळें त्याचा सामाजिक दर्जा यत्किंचितही कमी होत नसे, व त्याचीही मनाची ताकद अशी रहात असे कीं इतरांनीं आपल्या आयावहिणी निर्धास्तपणें त्याच्या स्वाधीन कराव्या. आतां त्याच्या अगदीं उलट स्थिति झाली आहे. एकादी स्त्री जरा रस्त्यांतून फटक् फटक् करीत चालली, तर तिला पाहण्याकरतां पन्नास अंतःकरणें वेगानें धांव घेतील; परंतु, त्याचवेळेला नीतिशास्त्राच्या मोठाल्या गप्पा मारून दुसऱ्याचा उपहास करण्यास कमी करणार नाहींत. आंधारांत वाटेल तें करावयास बेगुमानपणें तयार होऊन पुन्हा शिष्टपणानें दुसऱ्या लोकांस खालीं पाडण्यास आमची केव्हाही तयारी असते. याच्यामुळें होतें काय, व्यक्तीचा सर्व जोर आपला आर्थिक, नैतिक, धार्मिक असा निरनिराळ्या तऱ्हेचा सामाजिक दर्जा सांभाळण्यांतच खर्च होऊन जातो, आणि तिच्या कर्तृत्वाला वाव असा सांपडतच नाहीं. मत्सरामुळें गुणग्राहकतेचा लेशही राहिलेला नाहीं. अशा स्थितींत जें काय थोडें बहुत चांगलें अंगीं असेल, अथवा हातून घडण्याचा प्रयत्न होत असेल, त्याला प्रोत्साहन मिळत नाहीं, उलट स्वाभाविक रीतीनें एकादा मानवी दोष थोडासा जरी दिसला, तर तेवढ्याकरितां, लोकांतून उठल्यासारखें होऊन जातें. अशामुळें समाजाची सडल्यासारखी स्थिति होते. आणि तशांतच निरभिमानता, औदार्य इत्यादिकांच्या ढोंगाखालीं या 'मिथ्याचारा'च्या समर्थन करण्याच्या प्रवृत्तीमुळें ही घाण निघून जाण्याचा मार्गही बंद होतो.

हें विषयांतर जरी सोडून दिलें तरी सारांश एवढाच कीं, मनुष्य म्हटला कीं त्याच्या ठिकाणीं जे सहज धर्म असावयाचे, ते निग्रहानें मारून टाकून त्यांच्या पलीकडे जावयाचें क्वचित् कोणा पुण्यश्लोकास जरी साधत असलें, तरी असा मनुष्य खरोखरच अनामिका सार्थ करणाराच असावयाचा, बाकी आमच्यासारख्या 'येरांना' ही गोष्ट

कालत्रयींही शक्य नाहीं. अशा स्थितीत, वेदांताचे थोडें आकलन बुद्धीस झालें, अथवा जास्त अधिकारी पुरुषांचा, किंवा त्यांच्या अनुकरणानें परमार्थाच्या शाळा चालविणाऱ्यांचा थोडासा सहवास झाला कीं तेवढ्यानें झिंगून जाऊन सर्व मानवी प्रवृत्ति ही ईश्वरदत्त सकारण सामग्री आहे. व तिची कर्मकुशलतेनेंच वाट लावावयाची आहे, असें म्हणणें देखील कर्मीपणाचें वाटू लागतें, मग तसें वागणें लाजिरवाणें वाटेल, अथवा वागणारा तुच्छ वाटू लागेल, यांत कांहीं नवल नाहीं. एकदां असें झालें, म्हणजे निर्भयपणानें व युक्तीनें या सामग्रीचा उपयोग करून घेत मार्ग क्रमण्याचें आवडेनासें होतें, आणि अण्णासाहेब यांच्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे, 'मनुष्य एकदम शुक वामदेव व्हावयास पहातो.' आणि कांहीं काळ तसा 'मिथ्याचार' जरी घडला तरी अखेरीस तें रेटण्याची ताकद नसल्यामुळें म्हाताऱ्या नवऱ्याच्या तिसऱ्या बायकोप्रमाणें घेतलेला मार्गच अखेरीस बोकांडी बसतो, आणि साऱ्या आयुष्याची एक नक्कलच होऊन जाते. ही गोष्ट मनावर ठसविण्याचा त्यांचा कटाक्ष होता.

या आमच्या विवेचनावरही अशी एक शंका येईल कीं, या 'मिथ्याचार' शब्दास तुम्हीं फार उचलून धरिलें, परंतु गीतेंतील 'मिथ्याचार' शब्द पाहिला म्हणजे सिद्ध कोटींतील कोणा व्यक्तींचा व्यवहार सोडला तर, सत्याचार कोणास शक्य आहे? खुद्द मनोनाश करण्याकरितां भगवंतांनीं सांगितलेले 'अभ्यास' आणि 'वैराग्य' हे तरी मिथ्याचारच आहेत. मनःप्रवृत्ति एक असतां 'प्रतिप्रसव' संस्कारांनीं तिचा ओघ वळवून शनैः शनैः मनास जिंकण्याचा अभ्यास म्हणजे तरी मिथ्याचारच आहे. परंतु ही शंका योग्य नाहीं; कारण 'कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्। इंद्रियार्थान्' अशी मिथ्याचाराची भगवंतांनीं व्याख्या सांगितली आहे. आणि त्याला 'विमूढता' असें म्हटलें आहे. कारण तेथें अंतःप्रवृत्तीच इंद्रियार्थांची असते. तेव्हां अखेरीला त्यांतून या नाहीं त्या रीतीनें तरी, व आज नाहीं उद्यां तरी इंद्रियार्थांचाच कोंभ बाहेर यावयाचा. असें असतांना 'मिथ्याचारा'नें तो बाभळीच्या झाडास बोरी आणण्याची उमेद बाळगतो, तेव्हां त्याला 'विमूढात्म' कसें म्हणूं नये? परंतु अभ्यासाची गोष्ट अशी नाहीं. तेथें कांहीं काळ जरी 'कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्' अशी स्थिति

असते, तरी त्या मानसिक स्मरणाच्या बुडाशीं सुरुंग लावल्याप्रमाणें कांहीं तरी 'प्रतिप्रसव' प्रवृत्ति ०पेटत असते. म्हणून दोघांच्या फलांत फरक पडला. माणसाची स्थिति नेहमीं लहान मुलासारखी असते. कोणी खावयास बसलें, कीं हे शिष्ट जवळ येऊन उभे राहतात, व मोठ्या संभावितपणानें म्हणतात, 'मी कांहीं मागत नाहीं, मागूं नये, कोणीं दिलें तर घ्यावें.' पोटांतील हेतु असा कीं खाणाराच्या ताटांतील गोड घांस आपणास मिळावा. तसेंच सामान्यतः मनुष्याच्या अभ्यासवैराग्याचें असतें.

अथवा त्याहीपेक्षां चांगलें उदाहरण म्हणजे मुलगा जगून पुत्रसुखाची पूर्ण प्राप्ती व्हावी, म्हणून 'हा मुलगा माझा नाहीं, देवा तुझा आहे,' असें म्हणून देवास वाहतात, त्याचें आहे. सारांश इतकाच कीं ही सर्व वस्तुस्थिति ध्यानांत घेऊनच वेदानें मनुष्यांना धर्मार्थ--काम---मोक्ष अशी प्रणालिका लावून दिली, आणि तेवढ्याकरितां उघड 'जीवाम शरदः शतम्'। 'भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः' 'स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः' 'मधुनक्तमुतोषसि' 'माध्वीर्गावो भवंतु नः' अथवा 'आयुः पृथिव्यां द्रविणं ब्रह्मवर्चसम्' असें मागावयास शिकविलें. आणि 'ऋणानि त्रीनपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत्। अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः। असें मानवधर्मशास्त्र लावून दिलें. आतां ही गोष्ट खरी कीं, देशकाल परिस्थित्यनुरूप या ऋणांचा बोजा कमीजास्त राहील, व तीं फेडण्याच्या विधींतहि फरक पडेल, परंतु सरसहा सर्व लोकांकरितां मार्ग हाच. तेव्हां आपल्या भोंवतालील लोकांनीं याच मार्गानें जावें, अशी त्यांची शिक्षा होती.

एकदां त्यांना महाराजांच्या जवळ कांहीं मागावें कीं नाहीं, असा कांहीं प्रश्न केला होता; तेव्हां 'हो हो तर, महाराजांच्या जवळच मागावें, आणि काय वाटेल तें मागावें. मात्र तें त्यांच्या जवळूनच घ्यावें, म्हणजे ते देतातही, आणि त्याचा सर्व तऱ्हेनें निर्वाह करून त्यांतून काढतातही.' असें त्यांनीं सांगितलें. आणि एवढ्याचकरितां आपल्या भोंवतीं असलेल्या लहानमोठ्या वयाच्या व कमीअधिक अधिकारांच्या जीवांच्या अंतःप्रवृत्तींची वाढ त्यांच्या त्यांच्या वयाला आणि अधिकाराला अनुरूप अशी जोमदारपणें व्हावी, व त्यांतून निघण्याचा मार्ग त्यांना लागावा त्यांनीं निरुत्साह, नीरस, व शेळपट बनूं

नये, इतकेंच तर काय, तर उलट हौसी, साक्षेपी, व रसज्ञ व्हावें, अशीच त्यांची इच्छा असे. आणि म्हणून ते इतक्या बारीकसारीक गोष्टींपासूनही आपल्या वागण्यानें धडे देत.

गोष्ट करावयाची म्हणजे ती लौकिक असो, अथवा पारमार्थिक असो, ती मन लावून यथासांग करावी. उगीच कशी तरी करावी, असें त्यांना कधीं आवडलें नाहीं. एका गृहस्थानें एकदां त्यांच्याकरितां कॉफी पाठविली. ती तयार करून देणाराला सराव नसल्यामुळें साधत नसे. परंतु त्या पेयाची लज्जत ठाऊक नसल्यामुळें जी काय होई, तीच त्याला चांगली वाटत असे. त्यांना कॉफी दिल्याबरोबर त्यांनीं सांगितलें की, ‘ कॉफीची खरी चव काय आहे, हेंच तुला माहीत नाहीं, ’ इतकें बोलूनच ते राहिले नाहींत, तर त्याला हाताशीं घेऊन लागलीच त्यांनीं स्वतः कॉफी करून दाखविली. असेंच एकदां, गाणें शिकण्याची लहर येऊन एक जण गवईबोवापाशीं शिकावयास बसले. खोलीचीं दारें वगैरे लावून यांना ऐकूं जाऊं नये, असा बंदोबस्त केला होता, परंतु तो कोठून जमणार ? त्यांचीं इंद्रियें फारच तिखट. लागलेंच ते तेथें आले, व सारा प्रकार त्यांनीं पाहिला. परंतु थट्टा न करतांना त्यांनीं मोठ्या गंभीरपणानें ‘ याला तुम्ही पहिल्यांदा वीणा लावावयास शिकवा, गाणें शिकावयाचें म्हणजे, आधीं तार लावतां आली पाहिजे, ’ असें गवईबोवांस म्हणून त्यांनीं त्या विषयाची थोडक्यांत माहिती सांगितली. अगदीं खेळण्यासारख्या पोरकट गोष्टीपासूनही ते पराकाष्ठेची हौस दाखवीत, व गमतीदार गोष्टी सांगत. फक्त एका गोष्टीस प्रोत्साहन ते कधीं देत नसत. आणि ती गोष्ट म्हणजे शुष्क वादविवाद.

वादविवाद करतांना बहुतकरून शब्दांचे घोटाळे होतात, आणि उगीच काथ्याकूट होतो. एवढ्याकरितां वाद जर करावयाचाच असला, तर लेखी करावा, म्हणजे त्यांत वादभूत विषयाची परिभाषा निश्चित होते, आणि उगीच गोंधळ होत नाहीं. त्याचप्रमाणें वादाचा विषय काय, आणि तो कोणत्या प्रमाणांनीं सिद्ध करावयाचा, म्हणजे त्यांत अनुमान, शब्द, आप्त वगैरे प्रमाणांना किती व कशा तऱ्हेचें महत्त्व द्यावयाचें, आणि तसें तें द्यावयाचें ठरल्यावर, कोणकोणचे ग्रंथ अथवा त्यांतील कशा तऱ्हेचीं वचनें प्रमाणभूत मानावयाचीं, वगैरे साऱ्या गोष्टी आधीं निश्चित

केलेल्या असाव्यात, म्हणजे त्या वादांतून कांहींतरी निष्पन्न होतें. नाहीं तर फुकट 'लाथांचा सुकाळ' होतो. विषयाची मांडणी करतांना परिभाषेची आणि प्रमाणांची निश्चितता करण्याची एक बाब अजीबाद गाळूनच टाकल्यामुळें मोठमोठ्या लेखकांच्या लेखांतही विसंगतपणा उत्पन्न होतो. * आपल्या मतलबास हवें तेवढें उचलून धरावें, बाकीचें खुशाल गाळून टाकावें, व मानेल त्या कल्पना सिद्धांतवाक्य म्हणून जोरानें मांडाव्यात, म्हणजे आपलें लिहिणें अथवा बोलणें अपसिद्धांत म्हणून ठरण्याची भीतिच नाहीं, असल्या तऱ्हेच्या वादविवादांत ते कधींही शिरत नसत.

---

* समजुतीकरितां म्हणून अगदीं अलीकडील एक उदाहरण देतों. प्रसिद्ध इतिहास संशोधक वि. का. राजवाडे यांनी 'राधामाधव चंपूच्या' प्रस्तावनेंत भारतवर्षीय क्षत्राचा इतिहास लिहिण्याची प्रतिज्ञा करून त्यांच्या सामर्थ्याप्रमाणें ती पुरीही केली आहे. असें करितांना त्यांना मध्येंच वेद व त्यांतील कांहीं सूक्तें यांचा समाचार घेणें भाग पडलें. व मोठ्या युक्तीनें त्याप्रमाणें करून त्यांनीं आपला कार्य भाग साधला आहे. व स्वतःच्या बेतास अर्थ जमेना तेव्हां वेदाचा स्वरच चुकला असला पाहिजे नव्हे आहेच असा यांनीं निर्णय केला आहे. राजवाडे हे फार विशद लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत परंतु जिज्ञासूंना ह्या भाग वाचितांना ज्या सामान्य गोष्टी अडतात त्याची ही त्यांनीं फोड केलेली नाहीं. याचें कारण काय तर वर सांगितल्याप्रमाणें लेखनपद्धति. कसें तें पहाः—

( १ ) वास्तविक ब्रह्मणस्पति हा देव आहे किंवा मनुष्य आहे हें जर ठरवावयाचें आहे तर जितकीं सूक्तें त्याचीं आढळतील अथवा जितके उल्लेख इतर सूक्तांत आढळतील ते सारे एकत्र करून त्यावरून काय बोध होतो, ती स्तुति माणसांना लागू पडते कां कोणा दिव्य शक्तीस लागू पडते हें ठरवावयास पाहिजे होतें व ( २ ) 'सोमानं स्वरणं कृणु' वगैरे ज्या त्याच्या प्रार्थना आहेत तशा तऱ्हेची 'सोम पिणाऱ्याला उत्तम कांति दे' वगैरे प्रार्थना देवतेस न करितां माणसास केल्याचें एकादें दुसरें उदाहरण ऋग्वेदांत आढळतें किंवा काय तें पहावयास पाहिजे होतें.

पण तसें न करितां एकच ऋचा घेऊन व कांहीं शब्द घेऊन त्यांनीं

इतक्यावर कोणी जास्त म्हणालाच, तर ' तुझें लिहिणें लिहून काढ, म्हणजे मी वाद करतों ' असें ते म्हणत. तें केवळ गोष्ट उडवून देण्याकरितांच नव्हे, हें वरील थोड्याशा विषयांतरानें लक्षांत येईल. अशा तऱ्हेचें लेखी आव्हान त्यांनीं दोघांस दिल्याचें लक्षांत आहे. कशावरून कोण जाणे, परंतु गायत्रीचा प्रत्येक पाद प्रत्येक वेदांतून घेतला आहे, अशावरून कांहीं बोलणें निघून, वेदाविषयीं कांहीं वाद निघाला असतां वांईकर धर्ममार्तंडांना ' तुमचें म्हणणें लिहून आणा, म्हणजे मी लेखी वाद करतों, ' असें सांगितलें होतें. लेले शास्त्र्यांनाही स्वतःला वादाची पराकाष्ठेची हौस होती. मग हा वाद कां झाला नाहीं कोण जाणे! त्याचप्रमाणें प्रो० जिन्सीवाले यांची आणि हंसस्वरूप स्वामींची ' वेद अपौरुषेय आहेत कां पौरुषेय आहेत, ' या विषयावर मोठी खडाजंगी झाली होती. ती पुण्यांतील लोकांस ठाऊकच आहे.

---

सिद्धांत ठरवून टाकिला. व त्याला लागलीच वाजसनेयी श्रुतीचा आधारही देऊन टाकिला याचें कारण काय तर मूळ —

१ विभूतिपूजेंतून देवाची कल्पना निघाली कां देवाच्या म्हणजे अतींद्रिय अस्तित्वाच्या कल्पनेवरून विभूतिपूजा प्रचलित झाली?

२ देवाची कल्पना म्हणजे नुसती सामर्थ्याची कल्पना कां अतींद्रियतेचें सामर्थ्य या प्रश्नांचा निकाल न करितां प्रमाणांत धरिलेला पाश्चात्य सिद्धांत. इतकेंही करून कशा मौजा झाल्या आहेत पहा. ' जनिता ब्रह्मणां असि ' याचा अर्थ 'प्रायः ज्येष्ठराज हा सर्व गणांचा साक्षात् पिता असे. ' व सर्व व्यक्ति राजशब्दोपजीवी असत. यांतील अडचणी अशाः—

( १ ) सर्व गणांचा तो साक्षात्पिता असे म्हणजे त्याच्या भोंवतालचे गणही त्याचीच संतति असे. म्हणजे केव्हां तरी त्याला तरुणपणींच ब्रह्मणस्पतित्व मिळालें असलें पाहिजे पण तसें म्हणावें तर ज्येष्ठराज म्हणजे वयानें व अनुभवानें वडील हें लागूं पडत नाहीं, बरें, तसें न म्हणावें तर ' जनिता ब्रह्मणामसि ' हें सर्वांच्या स्तुतींत कसें येऊं शकेल!

२ गणराज्यसंस्थेत प्रत्येक व्यक्ति नियामक असते हें खरें पण त्यामुळें प्रत्येक व्यक्ति राजशब्दोपजीवी होतीच हें कसें ठरतें व तसें ठरत असल्यास त्याचें वेदांत कुठें आणखी उदाहरण आहे कां?

त्यानंतर थोड्याशा दिवसांनीं अण्णासाहेब व जिन्सीवाले यांची गांठ पडली, तेव्हां बोलण्यावरून बोलणें निघालें असतां अण्णासाहेब यांनीं त्यांना सांगितलें कीं, ' तुझा काय पुरावा वगैरे आहे, तो सारा घेऊन ये, म्हणजे आपण लेखी वाद करूं. ' त्यावर त्यांनीं सांगितलें कीं, ' सामान मुंबईस आहे, आज रात्रींच मी मुंबईस जात आहें; येतांना मी जरूर सारा पुरावा घेऊन येईन. ' व त्याप्रमाणें त्या रात्रीं ते गेलेही. परंतु दुर्दैवानें तेथें त्यांचा लागलींच अंत झाल्यामुळें, ते परत केव्हांच येऊं शकले नाहींत. या अतीरथी महारथ्यांचा वाद झाला असता, तर खरोखर मोठीच मौज दिसली असती, व लाभही झाला असता. परंतु तसा योग नव्हता. असो. या दोनही गोष्टी त्यांनीं स्वतःच सांगितल्यावरून समजल्या.

---

३ सूक्तांतील कालीं गणसंस्था एकनायकीच असली पाहिजे. तेव्हां अशा संस्थेंत प्रत्येक व्यक्ति राजशब्दोपजीवी असण्याचें कारण काय ? [ एकनायकी असण्याचें कारण उघडच आहे. बहुनायकी गणांतील घटक येवढे नेभळे, दुबळे, भित्रे, तेजोहीन, व ' आमच्या मुलाबाळांचा उत्पन्नकर्ता तूं आहेस ' असें भूषणानें दुसऱ्यास म्हणण्याइतके स्वत्वशून्य असणें शक्यच नाहीं. राजवाड्यांना एकादें उदाहरण ठाऊक असेल तर कोण जाणे ! ]

४ ' न तं अंहो नदुरितं न अरातयः तितिरुः ' यांतील ' अंहो ' हें पद विचारांत कां घेण्याचें सोडून दिलें ?

५ ' हव्य ' व ' घृतवत् ' हे वस्तुतः एकार्थकच असतां विशेषण विशेष्यांसारखे कां वापरले ? कां ' हव्य ' याचा ' देवांचें अन्न ' असा रूढार्थक उपयोग केला म्हणून पुनः ' घृतवद्भिः' पद योजिलें ?

यापैकीं एकाचाही खुलासा नाहीं. बरें वाजसनेयी श्रुतीकडे पहावें तर तेथें तर मोठाच चमत्कार दिसतो. गणांतील स्त्रिया गणपती करून घेण्यांत भूषण मानीत ! कां तर त्यांनीं—

' गणानां त्वा ' वगैरे आवाहन केलें आहे. परंतु हें येवढेंच आवाहन केवळ भक्तिपुरःसरही असूं शकेल. म्हणून त्याला ' आहं अजानि ' वगैरे जोड दिली आहे. यांत मौज अशी आहे कीं हें आवाहन ' वसु ' देवतेचें आहे, गणपतीचें नाहीं. दोन्ही आवाहनांचे विनियोगही वेगळाले

अशा तऱ्हेचे शुष्क वाद सोडले तर सर्व तऱ्हेच्या भाषणांत ते मनापासून भाग घेत, व पुष्कळ बोलत. अमुक एका तऱ्हेची माहिती ऐकणारास नसावी, असें कधीं त्यांना वाटलेंच नाहीं, त्यामुळें परमार्थाच्या गोष्टींपासून तों बारीकसारीक सांसारिक गोष्टींपर्यंत, इतकेंच काय; तर पूर्वकालीन पुण्यांतील नायकिणींच्या अनेक प्रकारच्या तऱ्हांपर्यंत सर्व गोष्टी प्रसंगोपात्त ते बोलत. असें करण्यांत, भोंवताल‌च्या लोकांस बहुश्रुतपणा उत्पन्न होऊन सदभिरुचि उत्पन्न व्हावी, असाच त्यांचा हेतु असे. चांगलें आणि वाईट हे दोन्ही पुढें मांडून त्यांचें अंतरंग उघडें केलें म्हणजेच माणसांत खरी व जिवंत सदभिरुचि उत्पन्न होते. एरवीं संवयीमुळें जरी

---

आहेत व ‘ आहं अजानि ’ वगैरे प्रार्थना अश्वसंगत झालेल्या राजमहिषीनें म्हणावयाची आहे. गणांतल्या स्त्रियांनीं नव्हे. असें असतां हीं दोन एकत्र कां केलीं ? का गणपती व वसू एकच. ? [ पण तसें मागील अध्यायावरून दिसत नाहीं. वसू व गणपती असे स्पष्ट वेगळे उल्लेख असून गणपतिशिवाय एका वेगळ्या अधिपतीचा उल्लेख आहे. ] अशा अनेक भानगडी दडपून टाकून राजवाडे सिद्धांत मांडणार व त्यांचें वाक्य गृहीत धरून त्यावर वादविवाद होणार. इतक्या सर्व घोंटाळ्याचें कारण काय तर प्रमाणांची प्रमाणताच मूळ लक्ष्यांत घेतली नाहीं. शिवाय मोठा प्रश्न तर उरतोच. सर्व देवांच्या मागें मूळ कोणी माणूस होता असें जरी धरिलें तरी सूक्तकारानें तें देवताबुद्धीनें केलें नसून माणुसबुद्धीनेंच केलें आहे असें तेवढ्यावरून कसें ठरतें ? पंढरीचा पांडुरंग हा मूळ कोणी तरी एकादा विशेष माणूस असेल कदाचित्. पण तेवढ्यावरून श्रीतुकोबांचे ‘ विराण्या ’ चे अभंग म्हणजे त्याच्यावर आषक झालेल्या एकाद्या बेफाम छबेलीची जबानी आहे असें म्हणतां येईल काय ? जर तसें नसेल तर सूक्तकाराची खरोखरच देवताबुद्धी असल्याकारणानें त्याच्या अभिप्रायास धरून असलेला स्वर चुकीचा कसा म्हणतां येईल ? याप्रमाणेंच ‘ पुरुषसूक्त ’ ‘ गणपत्यथर्वशीर्ष ’ इत्यादींवरील त्यांच्या विवेचनाची गति आहे. पण त्याच्याशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. तो स्वतंत्र लेखाचाच विषय आहे व तें काम राजवाड्यांसारख्या पंडितांचेंच आहे.

चांगले संस्कार असले, तरी ते भिन्न भिन्न परिस्थितींत टिकाव धरींत नाहींत, आणि मोठमोठ्या गुणवंताची ही पंतांच्या म्हणण्याप्रमाणें 'सदधिक्षेपीं पर्वर्तते बुद्धि ।' अशी स्थिति होते. त्यामुळें मोठेधाकटेपणाचा फारसा प्रश्न न ठेवतां, जेणें करून अभिजात संस्कार रूढ होतील, अशी सर्व तऱ्हेची उपयुक्त माहिती, काम पडल्यास अगदीं उघड शब्दांत देखील ते देत. अश्लीलपणाचा एका प्रकारचा मोठा बाऊ करून, भाषेच्या सोंवळेपणाचें बंड माजविल्यानें फायदा न होतां उलट त्या शब्दांनीं ग्राम्य विषयाची सूचना मिळण्याची मनास संवय लागते. याच्या उलट, बोलण्या चालण्यांतल्या साधारण मर्यादा पाळून त्या शब्दांची फारशी प्रतिष्ठा न ठेवल्यास ते शब्द तोंडांत खेळूनही, दांत पाडलेल्या सापाप्रमाणें मनास दंश करूं शकत नाहींत. याचा अर्थ असा नाहीं कीं नित्य निरंकुश शिमगाच करावा. त्यांच्या कित्येक वेळच्या भाषेचें व उघड बोलण्याचें कांहीं लोकांना जें चमत्कारिक वाटे, त्याचें धोरण यावरून समजावयाचें.

एकदां शिमग्यांतील पोरांच्या शब्दोच्चाराबद्दल असाच प्रश्न निघाला

---

वास्तविक पाहिलें तर असला वादग्रस्त विषय ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब यांच्या चरित्रांत येण्याचेंही कांहीं कारण नाहीं. कारण त्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. कांहीं तरी उदाहरण द्यावयाचें होतें. हें एक आठवलें. हें दिलें इतकेंच; तरी पण हेंही एक प्रकारें ठीकच झालें. या निमित्तानें इतिहासर्षींकडून माझें समाधान होईल व त्यामुळें त्या सबंध प्रस्तावनेवरील माझ्या 'संस्था' शब्दाचा उपयोग 'सर्वावयवव्यापक वस्तु' असा कोठें केलेला आहे? 'मंगलानां शतं दर्शनात् स्पर्शनात् कीर्तनात् चाशुभानि व्यपोह्य अर्थसिद्धिं दिशत्युत्तमां ॥ **इति** विश्वनाथभट्ट**भणितं** प्रातः**स्मरणं आकर्ण्य** उदतिष्ठत्' यावरून शाहजीच्या दिनचर्येचें मनोहर काव्य कसें उत्पन्न होतें? 'आपल्याला ईश्वरी साक्षात्कार होतो अशी शिवाजी महाराजांची खरोखर श्रद्धा नसून ती एक सोईची भाषा उर्फ थोतांड होतें ही माहिती त्यांना कोणत्या अॅबटनें दिली अथवा कोणच्या शिवानें हा साक्षात्कार दिला'? वगैरे अनेक शंका त्यांच्या पुढें मांडावयाचा मला धीर येईल.

लेखक.

होता. तेव्हां ते म्हणाले, 'अरे, तें बरें आहे.त्यानें त्या शब्दांचा मनावरील एक प्रकारचा फाजील ताण निघून जातो, व मन साफ होतें.' मानसशास्त्रदृष्ट्या यांत तथ्य नाहीं, असें कोण म्हणेल ? परंतु कांहीं झालें तरी, ही विषारी औषधी आहे, व तिचा एकादा टक द्यावासा जरी वाटला, तरी तो मोठ्या युक्तीनें व बेतानेंच द्यावयास पाहिजे, हें हि पूर्वशिष्टांनीं लक्षांत ठेवलें होतें, हें विसरतां कामा नये. सारांश काय, कीं सर्व तऱ्हेचा निर्भयपणा ऐकणाऱ्याच्या अंगीं उत्पन्न व्हावा, हें त्यांच्या शिकवणीचें मुख्य सार होतें. गोष्ट वाईट कां असेना, तिच्यापासून भित्रेपणानें परावृत्त होणें, त्यांना कधीं आवडलें नाहीं* निर्भयपणानें तिच्यासमोर राहणें, अथवा मनाच्या ऐटीनें तिला तुच्छ करून टाकणें त्यांना आवडे. आणि सर्व प्रकारच्या मानवी प्रवृत्तींचा योग्य तऱ्हेनें निर्वाह करूनच पुढें न्यावयाच्या त्यांच्या पद्धतीला तें अनुसरूनच होतें.

आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या स्वभावांत एका बाजूनें पराकाष्ठेची निरहंकारता, तर दुसरीकडून उत्कट साभिमानता ठेवून, तशा तऱ्हेच्या स्वभावतः विरोधी गोष्टीही, त्यांच्यातील विरोधाचा कशा रीतीनें परिहार करून वाढवाव्या तें शिकविलें. आणि त्यामुळें हल्लीच्या विरोधी परिस्थितीची दोन्ही अंगें सांभाळून कसें व्हावें तें दाखविलें. त्यांच्या राहण्याची मुख्य खुबी अशी होती कीं, जेथें केवळ त्यांच्या व्यक्तीचा संबंध येई, तेथें अगदीं कमालीची निरभिमानता असावयाची. अगदीं ह्या गालांत मारली, तर तो गाल पुढें करावयाची तयारी, परंतु जेथें सामाजिक प्रश्न आला तेथें मात्र त्या सामाजिक जीवनास अवश्य असे सर्व तऱ्हेचे अभिमान उत्कटतेनें असावयाचे. आणि ही गोष्ट फक्त एका निर्भयतेनेंच शक्य आहे. कारण, एका गालांत मारली असतां सारी क्षिति गिळून टाकून दुसरा पुढें करण्यास जें धैर्य लागतें, तेंच धैर्य आवेशानें तरवारीवर तुटून पडण्या-

---

*ज्या गोष्टी वाईट अथवा अयोग्य असतील त्या एवढ्या करितां मुद्दाम करावयाच्या व महाश्वेतेसमोरून एकदम निघून न जातां मुद्दाम ठाण मारून बसावयाचें असा याचा अर्थ खास नाहीं ! कोणत्याहीं गोष्टीचा फार बाऊ करणेंही मानसशास्त्रदृष्ट्या अपायकारक असतें येवढाच भावार्थ आहे.

सही लागतें; आणि एवढ्याच करतां दैवी संपत्तीच्या प्रारंभीं भगवंतांनीं ' अभय ' या गुणास स्थान दिलें. असो; अशा रीतीनें, वैदिक धर्माच्या सर्व सूक्ष्म तत्त्वांनीं आपली खाजगी वाढ करावयाची, व लौकिक चरित्रांत विरोधी संस्कृतीचा जो जो परिणाम आवश्यक असेल, त्याचा त्याचा आदर करून रस्ता काढावयाचा, अशी सुंदर सांगड घालणारा मनुष्यच, पूर्वोक्त वैदिक धर्माभिमानी लोकांच्या आकांक्षा पुऱ्या करूं शकेल. या सर्व गोष्टींचें दिग्दर्शन, स्तोत्रकारानें ' संकेतरेखा नवभारतस्य ', असें वर्णन करून मोठ्या खुबीदार रीतीनें केलें आहे.

त्यांच्या सर्व वागण्यांत प्रत्येक द्वंद्वाची अशी खुबीदार सांगड घातलेली आहे. बोलणें फार विपुल होतें, परंतु त्यानें त्यांचें स्वतःचें मौन कधीं चळलें नाहीं. वाटेल त्या विषयाचें प्रतिपादन करावयाचें व माहिती देण्याजोगता कोणचाही प्रसंग वांया जाऊं द्यावयाचा नाहीं, मग त्या वेळेला स्वतः कोण-त्याही व्यवसायांत असोत, परंतु ती माहिती इतक्या सहज रीतीनें दिली जात असे कीं, स्वतःच्या हुषारीचें प्रदर्शन त्यांत काडीमात्रही व्हावयाचें नाहीं. ग्रंथाचें नांव तर कधींच यावयाचें नाहीं, मग त्यांनीं स्वतः केलेले कष्ट व सायास यांची तर गोष्टच बोलावयास नको. आणि एका तऱ्हेनें तें बरोबर आहे. साधारणतः सर्व साधुसंतांविषयीं असा एक आक्षेप घेण्यांत येतो कीं, त्यांच्या साधनकालाचा इतिहास सांपडत नाहीं. या गोष्टीमुळें नवीन साध-काची काय हानि होते, हा एक प्रश्नच आहे.

साधनकालचा इतिहास म्हणजे, त्यांनीं कोणकोणच्या हेतूनें कशीं कशीं साधनें केलीं, तीं करीत असतां त्यांना काय अडथळे आले, व ते त्यांनीं कसे दूर केले, अथवा, कसे कसे अनुभव येऊन त्यांची गोडी वाढली, व ते पुढें गेले, यांची माहिती. अशा तऱ्हेची माहिती साधुसंतांविषयीं मिळत नाहीं, याचें कारण केवळ यहच्छा अथवा विनयातिरेक हें नसून, त्याच्या मुळाशीं कांहीं तरी खोल हेतु आहे. साधक-भाव पूर्ण होऊन गुरुपदावर आरूढ होतांच सत्पुरुषाशीं मुमुक्षु लोकांचें मोहोळ जमतें. त्यांतून सद्भाग्यानें जे त्यांच्या अंतरंगांत प्रवेश करितात, त्यांच्यापाशीं प्रेमालाप करितांना असल्या कित्येक गोष्टी नाहीं नाहीं म्हणत असतांही बाहेर येतातच. अशा ज्या कित्येक गोष्टी बाहेर येतात त्या, अथव

बंगालच्या श्रीरामकृष्णांसारख्यांनी अगदीं खुला बाजार करून सांगितलेल्या आहेत, त्यांचा जर नीट विचार केला, तर असें दिसून येतें कीं, या गोष्टी सांगण्यांत आणि लपवून ठेवण्यांतही कांहीं सुसंगतपणा आहे.

सर्व साधन मार्गाचें जर निरीक्षण केलें तर त्याचे साधारणतः तीन भाग पड-तात. साधनांतील जो ' क्रियायोग ' असतो त्याच्या आचरणाकरितां केलेले व सोसलेले कष्ट—म्हणजे तप हा एक. दुसरा मनाचा चंचलपणा मोडून मल आणि विक्षेप हे दोष धुवून काढण्याचा केलेला खटाटोप, म्हणजे प्रत्याहार. आणि तिसरा, हीं दोन्हींही अंगें निरलसपणें आचरीत असतां, जेव्हां जेव्हां हात टेकावयाचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां इंद्रियांतीत प्रदेशांतून त्यांना कसें साह्य झालें, व त्यांच्या विशिष्ट अभ्यासानें, अतींद्रिय विश्वाशीं त्यांचें दळणवळण कसें कसें सुरू झालें, व हळू हळू तेथेंही त्यांनीं वतनदारी कशी संपादन केली, म्हणजेच त्यांना दैवी व अध्यात्मिक काय काय अनुभव आले, हा होय.

आपले पूर्वकालीन साधुसंत, आणि रामकृष्णपरमहंसांच्या सारखे प्रचलित, यांनीं सांगितलेल्या माहितीचा विचार केला तर असें दिसून येतें कीं,त्यांनीं केलेलें कायिक तप याची माहिती बहुतेक सर्वांना असते. त्यांच्या मानसिक परिश्र-माचीही माहिती पुष्कळ असते. समर्थ, तुकाराम महाराज, यांच्या सारख्यांचें " समाधान साधूजनांचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें । " अथवा ' रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग । ' किंवा ' पाउलां पाउलीं करितां विचार अनंत विकार चित्ताअंगीं ॥ म्हणवुनि भयाभीत होतो जीव । भाकी-तसे कींव अट्टाहासें ' असे उद्गार, आणि श्रीरामकृष्णांचें ' मी मातींत तोंड घांसून त्यावेळेस रात्रंदिवस रडत असे, ' असें सांगणें, यांत कांहीं फरक नाहीं. पंचवटींत रामकृष्णांनीं केलेली कडक तपश्चर्या जशी लोकांस ठाऊक झाली, तशीच शेंडीला दोरी बांधून केलेलें तुकोबारायाचें भजनही ठाऊक आहे. रामकृष्णांना आपल्या सर्व व्यापकतेचा जगन्मातेनें दिलेला अनुभव आणि श्रीसमर्थांकरतां पंढरीची झालेली अयोध्या यांचा अर्थ एकच आहे. रामकृष्णांची अचाट तळमळ, आणि श्रीतुकाराम महाराजांचे ' तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया । ' अथवा समर्थांचें ' बहूसाल भेटावया प्राण फूटे ' किंवा ' वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया,' या दोन्हीही सारख्याच उद्बोधक आहेत. तेव्हां असें दिसून येतें कीं परमार्थाकरतां कसकसे कष्ट

केले पाहिजेत, कसे हाल सोसले पाहिजेत, मनाचा ताप किती होतो, व विवेकानें, निग्रहानें, युक्तीनें आणि प्रार्थनेनें हळू हळू त्याची वाट कशी लावतां येते, याविषयींची साधकांच्या ठिकाणीं वीर्योत्साह वाढता रहावा म्हणून सर्वजण सारखी माहिती देतात. क्वचित् थोडेसे देवाचा साक्षात्कार कसा झाला, केव्हां एकादेवेळीं कशी कृपा कोणी केली, अथवा साधन क्रमानें इंद्रियातीत स्थलीं प्रवेश केल्यावर तेथें काय काय दिसलें, वगैरे माहिती देतात. त्यांच्या साधनांचा साधारण वर्गही कळतो; परंतु तपप्रत्याहार जर बाजूला टाकले तर, बाकाची माहिती अशी असते कीं उत्साहवर्धनापलीकडे साधकास प्रत्यक्ष तिचा उपयोग कांहींही होत नाहीं म्हणजे तपप्रत्याहारांनीं दावांत धरलेल्या व मलविक्षेपरहित मनाचा अतींद्रियतेंत प्रवेश होण्याला अथवा जास्त शुद्ध भाषेंत बोलावयाचें म्हणजे, अशा मनाला हळू हळू सोडून अतींद्रियतेचा अनुभव येण्याला त्यांनीं निरनिराळे जे अभ्यास केले, अथवा तप आणि भगवत्कृपा यांच्या योगानें हळू हळू अतींद्रियता त्यांना कशी प्राप्त झाली, त्या मुद्याच्या गोष्टी मात्र कोणाच्याही बाहेर आलेल्या सांपडत नाहींत. आणि साधकाची धांव तर प्रथमतः याच गोष्टी समजण्यावर जाते, व अगदीं मोकळ्यांत मोकळें बोलणारे रामकृष्ण परमहंस घेतले, तरी त्यांच्यापाशींही जिज्ञासेला हिरमुसली होऊन परतावें लागतें. जी गोष्ट केवळ मनुष्य यत्नानेंच सद्यःप्राप्त नाहीं, व भगवत्-कृपेनेंच मिळणारी आहे, अशी प्रचंड तळमळ जर सोडली तर या भागांतून प्रत्यक्ष आचरणाकरितां साधकास काय उचलण्याजोगतें आहे ? तेव्हां असें दिसतें कीं, रामकृष्ण असोत कीं कोणीही असोत आपले अनुभव लोकांस देण्याची त्यांची कांहीं ठराविक तऱ्हा दिसते.

पूर्वोक्त साधनमार्गाच्या तीन भागांवरून साधनकालाचे मुख्य दोन भाग पडतात. एक, तप, प्रत्याहार, अभ्यास, संवेग आणि कृपा या पांचांच्या योगानें कांहीं काल तप वाढल्यावर, पुष्कळ दिवसांच्या रखरखलेल्या उन्हावर पावसाची सर यावी, त्याप्रमाणें मनुष्यभाव लोपून दिव्यत्व प्रकट होण्यास प्रारंभ होऊं लागतो. हा जो पुष्कळ दिवसांच्या उन्हाळ्यावर पावसाळ्याचा एक दिवस येतो तेथपर्यंतचा एक भाग, आणि त्यानंतर सारीं गात्रें शीतल होऊन पुढें क्लेशरहित, उल्हासानें पूर्णता संपादीपर्यंत गेलेला एक भाग. यांतील पहिल्या कालासंबंधानें आपले अनुभव आपण होऊन शिष्यास द्याव-

याचे, व तेणेंकरून त्याचा वीर्योत्साह वाढवून त्याच्या ठिकाणीं अकुंठित क्रिया-शक्ति चेतवावयाची, परंतु त्याच्याच बरोबर पुढील भागासंबंधानें त्यास फक्त मार्ग लावून देऊन आपण होऊन जास्त एक अवाक्षरही सांगावयाचें नाहीं, अशी त्यांची सरसहा एक तऱ्हा दिसते. त्यावरून प्राप्तपुरुष म्हटला म्हणजे तो एक अत्यंत आंतल्या गांठीचा आणि साऱ्या जगाच्या डोळ्यांत धूळ टाकून जाण्याचा विडा उचललेला ठकशिरोमणी असतो, अशी सर्वज्ञ समजूत झालेली दिसते; आणि ' जिन्ने पाई उन्ने छुपाई' असल्या तऱ्हेच्या कल्पना रूढ झालेल्या दिसतात.

कांहीं लोक तर असें समजतात कीं, या पूर्ण झालेल्या लोकांच्या मूळ स्वभावांतील कोतेपणामुळें त्यांच्या ठिकाणीं अनुदारपणा राहिलेला असतो ! व त्यामुळेंच कित्येक महापुरुषांना सर्व साधुसंतांचीं चरित्रें निरुपयोगी वाटतात. परंतु थोडा विचार केला तर असें आढळून येईल कीं, हें पूर्वसंतांचें करणें केवळ विक्षिप्तपणाचें नसून शास्त्रसंमत आहे. त्यांच्या ठिकाणीं स्वतःच्या कांहीं लौकिकमनोवृत्तीच्या शांत्यर्थ असलें वर्तन संभवतच नाहीं. दया, लोक-कल्याण, वगैरेंच्या मनोवृत्ति कितीही उत्कट असल्या, तरी जगाच्या खऱ्या अंतरंगाचा यथार्थ प्रबोध असल्यामुळें, जगांत सर्व गोष्टींची ' वाउगी चाउटी ' कशी होते, हें त्यांना पुरतें ठाऊक झालेलें असतें; त्यामुळें त्यांचा नाइलाज होऊन ' जिन्ने पाई उन्ने लुपाई ' असें त्यांना व्हावें लागतें. एरवीं त्यांना तर हा आपला अंतरंग ठेवा कोणास तरी देऊन आपल्या सुखाचा भागीदार करा-वयाची इतकी अमर्याद उत्कंठा असते कीं, ' किंचितही सुख टाकीं वो थुंकोनी,' असें म्हणणाऱ्या तुकाराम महाराजांनाही ' माझिये जातीचे भेटो मज कोणी । आवडीची धणी फेडावया । ' अशी प्रार्थना केल्याखेरीज राहवत नाहीं. स्वतः अण्णासाहेब असें सांगत कीं ' खरोखर अधिकारी आणि योग्य असें पात्र न मिळाल्यास हे लोक अखेरीला एकाद्या मत्स्यगंधेशीं रममाण होणाऱ्या पराशराप्रमाणें अगदीं अप्रज्ञ शिष्यावर अनुग्रह करण्यासही तयार असतात व करितातही. ' असें असून देखील आपल्या पसंतीचा, व सत्पात्र असा साधक असूनही जेव्हां त्याला हे लोक आपल्या पुढील भागासंबंधानें म्हणण्यासारखी माहिती देत नाहींत, तेव्हां त्यांचें कांहींतरी तसेंच कारण असलें पाहिजे. तें कारण हेंच आहे कीं, तसे अनुभव आधीं सांगितले असतां,

शिष्याच्या मनाचा, तो कितीही समर्थ असला तरी, ' चाउटी ' होऊन जाते, व त्यामुळें तो अगदीं मार्गगलितच झाला नाहीं, तरी त्याचें काम फार कठीण होऊन, फार श्रम व काल लागतो.

पतंजलींनीं योगाचे पूर्वांग आणि उत्तरांग असे दोन भाग केलेले आहेत. यांतील उत्तरांगाच्या चटकदारपणाची माहिती ऐकून मनास जो चटका लागतो त्यामुळें, उतावळीनें अथवा कर्तृत्वाच्या अभिमानानें पूर्वांग घटविणे जिवावर येतें, किंवा अनवश्यक वाटतें. आणि पूर्वांग अति उत्तम घटल्याखेरीज काय वाटेल तें केलें तरी उत्तरांग केव्हांही जमणें शक्य नाहीं. क्वचित् कोठें निर्धारानें थोडें जमलें, तरी अखेरीस पाण्यांत बुडविलेल्या भोपळ्याप्रमाणें मन पुन्हां वेगानें बाहेर पडतें, व सर्व अभिमान सोडून जेव्हां पुन्हां खडे मांडावे, तेव्हांच हिशोब जमतो. तसेंच मनाचा हा धर्म तर प्रसिद्धच आहे, कीं त्याला जी नको ती सूचना जास्त पटते. द्रव्याकरितां अनुष्ठान करणाऱ्या गृहस्थास जप करतांना ' वानराची कल्पना डोक्यांत आणूं नको ' म्हणून सांगितलें असतां अखेरीस त्यानें त्रासून गुरूला ' एवढी सूचना तुम्हीं मला न देतां, तर बरें झालें असतें; कारण त्यापूर्वी वानराची कल्पना माझ्या डोक्यांत केव्हांही आली नाहीं, परंतु आतां मात्र तें माझा पिच्छा सोडीत नाहीं,' असें सांगितल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे.

हल्लीं योगाची खटपट करणारे कित्येक लोक आढळतात, परंतु उत्तरांगांत प्रवेश न झाल्यामुळें हताश झालेले, दांभिकपणानें कांहीं तरी स्तोम माजवून बसलेले, अथवा निरर्गलतेनें सर्व गोष्टींस सरसहा शिव्या देणारेच बहुतेक सांपडतात. व शेवटीं योगशास्त्र अथवा निदान त्यांतील अनुभवी म्हणविणारे पूर्व प्रचलित सर्व लोक मूर्ख, अथवा ढोंगी ठरण्याची वेळ येते, याचें तरी कारण हेंच आहे. कांहीं काल नियमित आचरण व अभ्यास, आणि साधारण नीतिशास्त्रास धरून दोषरहित वर्तन, असें असलें कीं यमनियमादि सारीं पूर्वांगें साधलीं असें वाटतें, व एकदम उत्तरांगास मनुष्य हात घालतो. परंतु, नीति फक्त माणसास दोषापासून परावृत्त करते, आणि यम, नियम, आसन, प्राणायाम प्रत्याहार, हीं माणसाच्या ठिकाणीं विशेष गुण व सामर्थ्य रूढ करतात हें लक्षांत येत नाहीं. त्यामुळें या सर्वांनंतर ' धारणासु योग्यता मनसः '

म्हणून जें पतंजलीनें सांगितलें, तें मनांत भरत नाहीं. ज्यामध्यें अशीं अष्टांगें पृथक् केलेलीं नाहींत अशा प्रकारचे इतर कांहीं मार्ग एकदम उत्तरांगास सुरवात करतातसें वाटतें; त्यामुळें तर साधकाचा फारच बुद्धिभ्रंश होतो, वस्तुतः त्या मार्गांचीही खुबी अशीच असते कीं, जरी त्यांची सुरुवात एकदम उत्तरांगापासून दिसते, तरी त्यांच्यातील अनुष्ठानाच्या विशिष्टपणामुळें नकळत जेव्हां हीं पूर्वांगें साधतात, तेव्हांच खरोखर त्याच्या अभ्यासास सुरुवात होते. सर्वांतील मूळ मुद्दा एक आहे, ‘चित्तवालकाच्या’ समजुतीकरितां ठिकाठिकाणीं फक्त मोड वेगळी आहे.

तसेंच आणखीही एक कारण आहे. तें असें कीं कोणचीही गोष्ट अकल्पित रीतीनें घडून आली असतां मनावर जो नैसर्गिक परिणाम करते, तसा तिची अपेक्षा असतां घडून येत नाहीं. अर्थात् त्या परिणामाच्या योगानें सुखदुःखात्मक भोग आणि मानासिक सामर्थ्य अथवा, मनाला मिळणारें वळण, हें अपेक्षित प्रमाणांत हवें तसें जोरदार रीतीनें घडून येत नाहीं. म्हणूनच पूर्वाचार्यांची अशी पद्धत होती कीं, साधकाला फक्त मार्गावर सोडून द्यावयाचा, आणि तो तेथून घरंगळणार नाहीं, एवढ्या पुरती काळजी घ्यावयाची. बाकी त्यास कांहीं सांगावयाचें नाहीं. पुढचे अनुभव गुरूनें शिष्यास सांगून ठेवावयाचे नसून, शिष्यानें गुरूला सांगावयाचें आहेत; म्हणजे ‘ मला आतां असें असें होतें, व अमुक अनुभव येतो, हें कसें काय ? ’ असें शिष्यानें गुरूला सांगावयाचें व गुरूनें आतिशय संतोषानें ‘ तूं आतां अमुक स्थितीपर्यंत आलास, या स्थितीमध्यें असें असें होत असतें, मला स्वतःला अथवा कोणा साधकाला असेंच झालें होतें, व त्या वेळीं अथवा त्यानंतर त्यानें असें केलें’ असें आपलें अंतरंग हळू हळू उघडें करावयाचें. आणि ही पद्धति सामान्य विचारसरणीला जरी पटली नाहीं, तरी आतिमानसशास्त्रास धरून आहे. सारांश, साधुसंतांच्या साधनकालाचा इतिहास मिळत नसल्यामुळें आपला मार्ग अडून राहिला आहे, अशी समजूत करून घेऊन आपल्या शिथिलसंवेगाचें समर्थन करणाऱ्यांचा फार मोठा वर्ग सांपडतो. परंतु त्यांचें खरोखर अडलेलें असतें. पूर्वांगें उत्तम न घटावित्यामुळें एकदां योगपूर्वांगें उत्तम घटवून उत्तरांगास हात घातला म्हणजे तेथील अनुभवांची वेगळी खटपट करावी लागत नाहीं. यथा-

क्रम ते आपोआपच प्रगट होतात. मग साधकानें फक्त ठरावीक काम अवंचकतेनें करावयाचें, एवढेंच त्याचें काम राहतें.

अशा सर्व कारणांनींच या पुढील भागाविषयीं प्रश्न विचारून त्यांना उगीच सतावून सोडणाऱ्या आमच्यासारख्या न कर्त्या परमार्थ्यांना सांप्रदायिक उपासना देववून चरकाला लावून देत, व " आम्हीं या मार्गानें गेलेले आहोंत, तुलाहि तेंच सांगितलें, महाराजांवर विश्वास ठेवून करीत रहा, म्हणजे सर्व कांहीं हळू हळू घडून येईल. आज या गोष्टी तुला कळणें शक्य नाहीं, सांगितलेलें कर. ' ढुंगणावर पाणी घाल ' कीं पाणी घालावें; लोंबतें काय, हें पाहण्याचें काय काम ! " असें अतिशय कळकळीनें सांगत. आणि एवढ्याकरितां साधकाच्या प्रयत्नाचें मूळ अधिष्ठानच अतिशय शुद्ध ठेवण्याचा ते प्रयत्न करीत. त्यांच्या अनुकरणानें निंबाचा पाला खाऊन दुग्धाहार करणारे, व आपणास कांहीं तरी प्रतीति यावी, म्हणून श्रीगुरुचरित्रावर झोंड उडविणारे कोणी नव्हते असें नाहीं. त्यांनाही ते असेंच सांगत कीं ' बाबारे, येथें कांहीं तमाशा नाहीं. महाराजांची सेवा कर, ( महाराज आणि देव हे त्यांच्या भाषेंत पर्यायशब्द होते. परंतु देव ही कल्पना खरी. आळंदीचे स्वामी म्हणजेच देव समजा, असा त्यांचा अतिशय नव्हता. कोणीकडून तरी जगन्नियंता, दयाज्ञानगुणसागर, भूतभव्यभवत्प्रभु असा देव आहे व तो सर्व करतो अशी भावना उत्पन्न करावी, एवढाच त्यांचा कटाक्ष असे. साधकास त्या भावनेची गरज आहे, त्या भावनेला धरून असणारे आकार या केवळ ' इमामच्या जूती ' आहेत, असें ते काम पडल्यास उघड सांगत. ) कारण त्यांची सेवा करणें हें आपलें काम आहे. '

मनुष्याला या जगामध्यें अनेक तऱ्हेच्या वासना पूर्ण करून घ्यावयाच्या असतात, त्या सर्व थोड्याबहुत पुरल्याच पाहिजेत, नुसत्या ' अरे मिथ्या रे मिथ्या, टाक' असें वेदांतानें कितीही ओरडून सांगितलें, तरी काम भागत नाहीं हें खरें आहे. व तितक्याच त्या वासना पुरणें आणि त्याहींपेक्षां कठीण म्हणजे, त्या पुरल्या असतांना त्यांचा उपशम होणें, हें दोन्हीही मनुष्यप्रयत्नाच्या बाहेरचें आहे. परंतु त्या दोहोंचीही आवश्यकता आहे. म्हणून त्यानें ईश्वरी कृपेनें हें घडून येण्याची इच्छा करणें हें योग्यच आहे. तेव्हां, अपेक्षित गोष्ट मग ती कशीही असो, देवाजवळ मागणें यांत कांहींही वाईट नाहीं. वर

सांगितलेंच आहे कीं वेदानें तर उलटें मागावयास शिकविलें आहे, व आज्ञा केली आहे. परंतु या दोन गोष्टी एक करणें हें ठीक नाहीं. या दोन्ही स्वतंत्र आहेत. म्हणून, आपलें काम म्हणून देवाची सेवा केली पाहिजे, व देवाजवळ मागण्याचा आपला हक्क आहे, म्हणून मागितलें पाहिजे. मात्र, मागणें पुरेल म्हणून सेवा, अथवा पुरेल तोंपर्यंत सेवा, ही विचारसरणी ते खोडून काढीत. आणि अशा धोरणानेंच त्यांनीं पूर्वी दिल्याप्रमाणें एका ठिकाणीं ‘ वासनेचा उत्पादक श्री आहे, आपण श्रीची सेवा करावी. अर्थात् निरिच्छपणें.तो धनी, स्वामी, गुरु, पिता, आणि देव आहे. आपल्या वासना सुवासना करून सिद्धीस नेणें त्याकडेच आहे. ’ असें लिहून ठेवलें आहे. व हें प्रत्यक्ष लोकांच्या मनावर बिंबावें, म्हणून स्वतः त्यांनीं पूर्णाभिषिक्त असतांही केवळ सामान्य मुमुक्षूचा बाणा आपल्याकडे घेऊन आपलें विगार इयत्तेंतील श्रीगणेशा गिरविणें अखेरपर्यंत सोडलें नाहीं.

आम्हास खात्रीलायक माहीत आहे कीं धुळ्याच्या श्रीनारायणबोवांइतकाच महाराजांचा सांप्रदाय चालविण्याचा त्यांनाही अधिकार होता, व तशाच कांहीं प्रसंगानीं कोणास लिहून अगर तोंडानें त्यांनीं कांहीं सांगितलें नाहीं, असेंही नाहीं. परंतु आपल्याकडे आचार्यत्व न घेतां, साहाजिक रीतीनें त्यांनीं तें केलें. एरवीं कोणीही त्यांना विचारलें असतां, त्यास ते ‘हा अधिकार आळंदी व धुळें येथील संस्थानांचाच आहे ’ असें सांगून तेथील सांप्रदायिक दीक्षा घ्यावयास सांगत.

वेगळे वेगळे सांप्रदाय यांच्यांत कांहीं शास्त्रीय रहस्य आहे, कीं ही केवळ लौकिक सृष्टि आहे, त्याचप्रमाणें सांप्रदायिक मंत्र आणि तंत्र यांत कांहीं स्वतंत्र सामर्थ्य आहे, किंवा तो एक केवळ भाविक भजनाचा प्रकार आहे, आजकालच्या पतित स्थितींत सर्व गोष्टींप्रमाणें याही परमार्थ पद्धतींत जिकडे तिकडे महारवाडा होऊन गेला आहे, ही गोष्ट खरी, तरी अण्णासाहेबांसारख्यांनीं तिचा जो पुरस्कार केला तो काय केवळ महाराजांची दुकानदारी चालविण्याकरितां, किंवा तिच्यांत तसेंच कांहीं तरी तत्व आहे म्हणून, या साऱ्या प्रश्नांचा खल करण्याचें हें स्थळ नव्हे. तरी, एवढें सांगितलेंच पाहिजे कीं, कोणाला सांप्रदायिक दीक्षा घ्यावयास सांगत असतां ‘ अरे, आम्हीं त्या मार्गानें गेलों आहोंत, म्हणून तुला सांगतों, उगीच तुला कांहींतरी सांगून

मला काय करावयाचें आहे ? ' असें त्यांनीं कळकळीनें सांगितलेले आठवतें अशा रीतीनें एकदां त्यानें दीक्षा घेतली, कीं त्याच्या वीर्यप्रज्ञेस अनुसरून लागेल तें त्याला सांगण्याची त्यांची तयारी असे.

महाराजांच्या सांप्रदायांत मनुष्य आला असतां तो आपल्या अत्यंत निकट आला असें त्यांना होऊन मोठा संतोष होई, हें खास. परंतु साधकानें याच सांप्रदायाची दीक्षा घेतली पाहिजे, असा प्रपंच त्यांच्या ठिकाणीं नव्हता. त्यांच्या सर्व खटाटोपींचा हेतु भारतवर्षीय म्हणजे हिंदु लोकांची 'वैदिक राष्ट्र' म्हणून सर्वांगसुंदर उन्नति व्हावी असा असल्यामुळें असा प्रपंच त्यांच्या मनांत येण्यास वावच नव्हता; उलट महाराजांची प्रार्थना करतांना, हा सांप्रदायच तर काय परंतु ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, इत्यादि प्रचलित सिद्ध सांप्रदायांचें ऊर्जित व्हावें म्हणून, प्रार्थना केलेली पुष्कळ वेळां ऐकण्यांत आहे. राष्ट्राची उन्नति म्हटली म्हणजे ती सर्वांगांनींच झाली पाहिजे, व तिला सर्वांची गरज लागते. तेव्हां तिच्याकरितां तपस्या करणाऱ्यास संकुचितपणा ठेवून कसें चालेल ? असो.

कोणच्याहि खऱ्या सांप्रदायाचा मनुष्य असला तर उलट त्याला ' तुला उपदेश घेण्याची गरज नाहीं, ' असें सांगितलेलें आम्हांस माहित आहे. उमरावती येथील सुप्रसिद्ध वकील प. वा. रा. रा. भाऊसाहेब असनारे यांच्या मनांत महाराजांच्या सांप्रदायाची दीक्षा घ्यावयाचें असतां, उलट ' तुला घेण्याची गरज नाहीं, पूर्वीच तुला मिळालेला आहे,' असें त्यांनीं सांगितलेलें पुष्कळांस ठाऊक आहे, हा उपदेश त्यांना लहानपणीं १०।१२ वर्षांचे असतां कोणीं दिला होता. तो कोणी दिला हेंहि त्यांच्या लक्षांत राहिलें नव्हतें; परंतु त्यांना जें काय करावयास सांगावयाचें तें तर त्यांनीं सांगितलेंच, पण ' उपदेश मात्र घेण्याची गरज नाहीं ' म्हणून सांगितलें. वर ' खऱ्या सांप्रदायाचा' मनुष्य असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, कांहीं अर्वाचीन स्वयंसिद्ध संप्रदायप्रवर्तकांच्या उपदिष्टांना त्यांनीं महाराजांच्या येथें दीक्षा घेण्यास अनुज्ञा दिली, हें होय. हें खरें खोटें निवडण्याचें काय शास्त्र होतें, तें त्यांचें त्यानांच ठाऊक.

अशा रीतीनें एका रीतीनें त्यांनीं सर्व कांहीं स्वतःच्या अंगाबाहेर ठेवून स्वतः सुटे राहून देवव्रत भीष्मांनीं ज्याप्रमाणें तीन पिढ्या कौरव साम्राज्य चालविलें त्या-

प्रमाणें महाराजांच्या सांप्रदायाचा सर्व तऱ्हेनें प्रपंच केला, आणि सर्व आयुष्यभर अशा तऱ्हेचे अनेक विरोधाभास करून, हें त्यांनीं साधिलें; एका बाजूनें ‘अंतर्बहिश्च व्याप्य नारायणः स्थितः’ अथवा ‘ नारायणः श्रीनृसिंहसद्गुरुदेव एव,’ व ‘ इतरांचा देह भिन्नपणें कैसा । प्रत्यक्ष नयनीं देखतसे जैसा । मी आपुला मानितसें तैसा । परकीयत्वें.’ अशा अन्वय व्यतिरेकांच्या अनुभवांची जागती ज्योत उजळीत असतां दुसरीकडून, एकाद्या ‘ धुंडिराज’पंताप्रमाणें* तोंडावरून पांघरूण काढल्याबरोबर ‘ कराग्रे वसते लक्ष्मीः ’ असें करदर्शन घेऊन पर्वतस्तनमंडला धरित्रीवर विनयानें ते पाऊल ठेवीत. व क्रमाक्रमानें महाराजांचें नांव घेणें, त्यांच्या तसबिरीचें व हस्ताक्षराचें दर्शन घेणें, स्वतः रामनाम लिहून अक्षर काढणें, उघड्यावर जाऊन अनेक पुण्यनदी द पुण्यस्थलें व इतर पुण्य गोष्टी इत्यादिकांचें स्मरण करून, कलाकाष्टऋतुसंवत्सरादिघटित अशा महाराजांच्या काल स्वरूपाचें स्मरण करून, व तद्बोधक सूर्यचंद्रनक्षत्रादि आकाशस्थ ज्योतींचें दर्शन घेऊन, आणि देवघर, तुळसीवृंदावन व औदुंबर यांस प्रदक्षिणा घालून ते आपल्या दिवसास सुरुवात करीत. त्यानंतर कांहीं म्हणणें नाथभागवत, ज्ञानमोदक, स्वात्मसौख्य, इत्यादि ग्रंथांचें थोडें वाचन व नित्यपाठाचे अभंग वगैरे म्हणून शौचास जात. पुढें पुढें त्यांच्या मागें प्रचंड व्याप लागल्यामुळें हें सर्व याच क्रमानें होई, असें नाहीं. केव्हांतरी आगेंमागें व थोड्याफार संक्षेपानें होई परंतु तें सारें स्वल्प प्रमाणांत कां होईना करणें अगदीं अखेरपर्यंत त्यांनीं सोडलें नाहीं.

कोणचाही नियम कसा करावा व तो कसा पाळावा, हें त्यांच्यापासून शिकावें. नाथभागवत स्वात्मसौख्य ज्ञानमोदक वगैरे ग्रंथ त्यांच्या नित्यपाठांत होते, व वेळेनुसार ते सबंध अध्याय अथवा ग्रंथही वाचून घेत, तरी पण त्यांचा नित्य नियम निदान या ग्रंथांची एक ओवी तरी वाचावी असा होता. आणि शेवटीं शेवटीं तर त्यांना तो शब्दशः तसा पाळावा लागला. स्वात्मसुखाविषयीं तर त्यांनीं स्वतःच ‘ स्वात्मसौख्य ग्रंथस्य नित्यं एका ओवी वाचनीया, इति क्रमे तद्दिनक्रमागत उपासना कांडस्य ’ वगैरे वगैरे लिहून ठेवलें आहे. अशा रीतीनें हें सर्व आह्निक साधेल तसें उरकून ते शौचास जात.

---

* गोविंदाग्रजांच्या ‘भावबंधन’ नाटकांतलें एक भाबडें पात्र.

अगदीं प्रारंभीं सांगितलेंच आहे कीं, यांना शौचास फार वेळ लागत असे. म्हणजे पुरा एक तास लागत असे. शौचाहून आल्यावर त्यांच्या सर्व आह्निकास सुरुवात होत असे. तें सर्व काय काय होतें, हें कळण्यास साधनच नव्हतें. आणि त्याची आवश्यकताही पण नाहीं. तरी पण जें कांहीं थोडेंबहुत कानावर पडे, त्यावरून असें दिसतें कीं, त्यांतील पुष्कळसा भाग सामान्यत्वेंकरून " भारतवर्षीयाणां भरतखंडस्थितानां वैदिकधर्यीयाणाम्' आणि विशेषेंकरून 'मम तथा च मामकानां इत्यादि अस्माकं सर्वेषाम् अर्थेच' असे, व त्यांतील कांहीं कांहीं गोष्टी तर मुद्दाम 'अमक्याकरितां,' व 'अमुक कारणाकरितां' अशा असत.

लखनौ कांग्रेसच्या वेळेला लोकमान्यांचा जो अपूर्व सत्कार झाला, आणि राष्ट्रानें बहिऱ्याचेही कान फोडून त्याच्या डोक्यांत भरेल अशा रीतीनें त्यांच्याविषयींची 'मान्यता' व्यक्त केली, त्यावेळीं अण्णासाहेब आळंदीस होते. अलीकडे कधीं कोणची वर्तमानपत्रें ऐकण्याची व वाचण्याची त्यांना इच्छाच होत नसे..व कारणही पडत नसे. कारण सर्व प्रकारची लोकवार्ता कानावर आपोआपच येत असे. या सत्काराची ही हकीकत त्यांचे कानावर आली. परंतु तेवढ्यानें संतुष्ट न होतां आवडीचा पदार्थ पुन्हा पुन्हा जसा मागून घ्यावा, तसें वर्तमानपत्रें मुद्दाम आणवून त्यांतील हकीकत ते वाचवीत, व त्यांना मोठा आनंद झाला असें दिसे. याविषयीं बोलणें निघालें असतां, सहज ते बोलून गेले, 'अरे, कां आनंद होणार नाहीं ? रोज महाराजांची प्रार्थना करतों ना, 'त्याची अशी कीर्ति होऊं द्या,' म्हणून ?'

महाराजांचा प्रसाद घेणें, आरती घेणें, इतकेंच तर काय, पण नुसतें दर्शन घेणें, अशा गोष्टींपासूनही, स्वतःमिळतीं दुसऱ्याकरतां ते प्रत्यक्ष कर्म करीत; म्हणजे 'हा अमक्याकरतां नमस्कार,' अथवा 'सर्वत्रांकरतां,' असें म्हणून प्रत्यक्ष ते कर्म करीत. पानावर बसून नुसते नैवेद्य दाखवावयाला लागले, तरी, अथवा, महाराजांची आरती घ्यावयास लागले तरी, अर्धा पाऊण तास सहज निघून जात असे ह्याचें कारण हेंच. सर्व विश्व हें युतायवघटित एक वस्तु आहे, हा महासिद्धांत घेतला कीं, एकाला दुसऱ्याकरतां कर्म करतां येतें, हा प्रतिसिद्धांत सहजच सिद्ध होतो. त्यांचे सारे व्यवहार या तत्त्वाला धरून असत.

महाराजांच्या तीर्थप्रसादाचा अवमान होऊं नये, म्हणून तर ते जपतच परंतु, तो सर्वांच्या पोटांत जावा, याची त्यांना इतकी कळकळ असे कीं,बहुत-करून ते आपल्याकडे येणाऱ्या सर्व लोकांस, इतकेंच तर काय, परंतु मांजर गाय, पोपट, इत्यादि जीवानांही तीर्थप्रसाद देत. एकदां त्यांना, ‘ पोपटास तुम्हीं प्रसाद घालतां, त्याला त्याचें काय आहे ? त्याच्या ठिकाणीं काय श्रद्धा आहे ? असा प्रश्न केला होता. तेव्हां ते म्हणाले, ‘ त्याची नसेना ? आमची तर आहे ? ’ अशाच श्रद्धेनें त्यांचें सारें आह्निक वाढलेलें होतें.

रामदास तुकाराम व इतरही संतांच्या, व इतरही चांगल्या सांप्रदायांत अधिकारी माणसें निपजून त्यांचें उर्जित व्हावें, म्हणून प्रार्थना करतांना आम्हीं स्वतः ऐकलें आहे. व त्याप्रमाणें ते नेहमीं म्हणतही ‘ अरे, आळंदीस महा-राजांनीं खातें घातलें असे आणखीनही ठिकठिकाणीं कारखाने आहेत. सर्व बाजूंनीं सर्वांचेंच उर्जित झाल्याखेरीज राष्ट्राचें कल्याण कसें होईल ? तेव्हां आपल्या तपश्चर्येचें कार्यही आपल्याच हातून व्हावें, असा अभिमान धरून चालणारा मनुष्य कुचकामाचा. कोणालाही महाराज वर आणोत, व कोणाच्याही हातानें करून घेवोत, अशी कळकळ पाहिजे. मग त्यांत ‘ हें माझ्या हातानें होऊं द्या, ’ असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतकेंच नाहीं, तर प्रत्येकानें झोपें-तून उठतांच जागृतीच्या पहिल्या सपाट्यासच महाराजांस ‘ आमच्या या भारतवर्षीय देशास आमच्या या डोळ्यांदेखत आमच्या हातांकरवीं पारतंत्र्या-पासून मुक्त करा आणि वैदक धर्माचें वैभव ‘ याचि देहीं याचि डोळां ’ पाहूं द्या,’ असें न म्हणणें म्हणजे, आपल्या जन्मदेच्या ‘ खाटल्यावर ’ जाण्यापेक्षां घोर पातक आहे, ’ असें स्पष्टपणें त्यांनीं सांगितलें. परंतु आपल्या हातून होईल तरच तें ठीक असेंच मनांत बाळगणें मात्र खोटें. एवढ्याचकरितां जर्मनींतील व इतर पाश्चात्य राष्ट्रांतील थोर पुरुषांचीं ते उदाहरणें देत. असा संकुचित अभिमान त्यांनीं धरला असता तर, निराशेनें ते केव्हांच गळून गेले असते, व त्या देशांत कांहींही झालें नसतें. परंतु मला यश नाहीं आलें तरी तो धागा उचलून धरून देशांतील कोणी दुसरे उद्योग करतील, परंतु अखेरीस आपलें कार्य सिद्धीला जाईल, अशा निरपेक्ष उत्कटतेनें त्यांनीं आपली सोन्या-सारखीं आयुष्यें जाळलीं, तेव्हां कोठें राष्ट्राची मूस तयार झाली. असो.

अशा रीतीनें त्यांचें आह्निक २॥-३ तास चाले. परंतु असे सलग ३ तास

त्यांना फार क्वचित् मिळत असल्या कारणानें व मध्यंतरी एका मागून एक अशा अनेक भानगडी° उपस्थित होत असल्याकारणानें, एवढेसें आह्निक आटोपावयास वेळेस त्यांना २।२ दिवस लागत ! हें सर्व आह्निक आटोपलें म्हणजे स्नान करीत, व तसेच ओलेत्यानें तुळसीवृंदावनांतील गणपतीपाशीं पुन्हा दीड दोन तास बसत. नंतर देवास बेल व भस्म वाहून श्रीगुरूचरित्राच्या कांहीं ओव्या वाचीत, व मग दुसरें वस्त्र परिधान करीत. एवढें कडकडीत सोंवळ्याचें काम केल्यावर बाकी सर्व व्यवहार ते ' कार्पासं कटिनिर्मुक्तं ' या शास्त्रास धरून धूतवस्त्रावरच उरकीत. आंघोळीस बसले म्हणजे अतिशय कडकडीत पाणी लागत असे, व अशा विपुल पाण्यानें स्नान करण्याची मनापासून आवडी असल्यामुळें भले मोठे दोन हंडे जरी तापविले,तरी त्यांनीं कधीं 'नाहीं' म्हटलें नाहीं परंतु त्यांतली मौज अशी होती कीं अंघोळ करतां करतां मध्येंच ते म्हणावयास लागत. व तसें म्हणतांना शेवटीं आंग पुन्हां थंड होऊन पुन्हां कुडकुडत बाहेर येण्याची पाळी येई ! असें होऊं नये म्हणून त्यांचें म्हणणें झाल्यावर मुद्दाम त्यांना घालण्याकरतां ऊन पाणी राखून ठेवावें, तरी पण शेवटीं असें व्हावें कीं काय वाटेल तें झालें तरी तें कांहीं साधूं नये. सारें पाणी संपून अखेरचा तांब्या हातांत घेतला, कीं त्यानीं आपली सुरूवात करावी. यामुळें अखेरीस स्नान घालणाऱ्या श्रीभक्त सीतारामपंत दांडेकर यांच्यासारख्या एकनिष्ठ भक्तांची नुसती चरफड उडून जाई. परंतु त्याला कांहीं उपाय नव्हता.

अशा कित्येक प्रसंगीं त्यांचें वर्तन एकाद्या भानावर नसलेल्या माणसासारखें होत असे. ' दोन प्रहर ओले राहती । ऊष्णोदकें स्नान करिती । ' असें सौ० भागीरथीबाईंनीं कौतुकपूर्ण वर्णन केलें आहे. निव्वळ डोक्यांत राख घालून नागवें उघडें हिंडणें असाच पिशाच शब्दाचा अर्थ केला तर गोष्ट वेगळी. एरवीं पूर्ण साम्यावस्थेस गेलेलें एकच मन निरनिराळ्या वेळीं बालोन्मत्त जड कसें राहतें याचें तें उदाहरण होतें. मात्र पाहणाऱ्याची दृष्टी सूक्ष्म पाहिजे होती. मंडळींत बसून बोलत असतांही त्यांचें धोतर अस्ताव्यस्त होऊन जाई, परंतु त्याची त्यांना शुद्ध नसे. इतकेंच तर काय पण अशा वेळीं जवळ कोणी नवखा असल्यास त्याला अनभ्यस्ततेमुळें थोडेसें जें चमत्कारिक होऊन जाई, तेंही त्यांच्या लक्षांत येत नसे. पोटदुखीच्या आजारांत त्रास होई म्हणून ते नुसती लंगोटीच नेसत. कित्येक वेळां असें होई कीं गच्चीवर उभे राहून

म्हणत असतां आपली लंगोटी गळून गेली आहे, ही गोष्टही त्यांच्या गावीं नसे. परंतु अशा वेळीं म्हणजे ते कांहीं एकाद्या अतिमानुषभावांत असत असेंही नाहीं, कारण त्याच वेळेला आपलें म्हणणें व त्याबरोबरच मुंग्यांची लढाई अथवा कोंबड्याचें विशेष ओरडणें इकडेही त्यांचें लक्ष असे; तथापि आपल्याला शरीर आहे, व त्याच्या द्वारें आपले व्यवहार होतात, यांची जाणीव अगदी लहान पोराप्रमाणेंच त्यांच्या ठिकाणीं दिसत नसे.

कित्येक वेळां असें होई कीं,आपण एकादी गोष्ट त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न करावा, परंतु असें आढळून येई कीं कांहीं केल्या तें त्यांच्या डोक्यांत शिरतच नाहीं, आणि ती गोष्ट इतकी साधी असे कीं आपल्यालाच मोठें आश्चर्य वाटे. अशा वेळीं ऐकण्याकडे त्यांचें दुर्लक्ष असे, असेंही नाही. अशा कांहीं गोष्टी तर कोणालाही हसूं आणतील. एका गृहस्थास आळंदीहून यावयास उशीर लागला. त्याची चौकशी करतां त्यानें असें सांगितलें ' वाटेंत सायकल पंक्चर झाली म्हणून वेळ मोडला. ' तेव्हां हे त्याला म्हणूं लागले ' पंक्चर झाली तर काय झालें ? चाकें तर तशींच होती ना ? तसेंच बसून यावयाचें होतें, थोडा वेळ लागला असता ! ' अशा गमती पुष्कळ वेळां घडत. एकाद्या कामास लागले, अथवा कोणाशीं बोलूं लागले म्हणजे पुष्कळ वेळां असें होई कीं त्यांना लघ्वीस लागे. परंतु ' आतां जाऊं ' मग जाऊं ' ' एवढें बोलणें आटपलें कीं जाऊं,' असें करतां करतां पांच पांच तास निघून जात ! मग शरीरधर्म अनावर झाला म्हणजे, एकाद्या दोन वर्षाच्या पोराप्रमाणें हातानें लघ्वी दावीत धांवपळ करीत गच्चीवर जातांना त्यांना पाहिलें म्हणजे पाहणाऱ्याच्या मनांत, प्रेम, कौतुक, आश्चर्य आणि आदर असे सारे विकार क्षणमात्र गर्दी करीत. असो.

अशा रीतीनें त्यांचें आह्निक संपलें म्हणजे मग जठराग्नीस समिध द्यावयाची त्यांना आठवण होई, व मग तो विधीही अतिशय संतोषानें होई. मध्यंतरीं जर कधीं कोणी कांहीं खावयाची गोष्ट काढली तर ते अतिशय चिडून जात. आणि अलीकडे अलीकडे तर त्यांचें दिनमान लांबतच चालल्यामुळें जवळच्या माणसास तसें म्हणण्याचा वारंवार प्रसंग येई. महाराजांचा नैवेद्य तशाच सत्पात्र हातून व्हावा, म्हणून त्यांनीं श्रीभक्त माधवराव दांडेकर यांचे कुटुंबास मुद्दाम जवळ ठेऊन घेतलें होतें. श्रीभक्त दादा दांडेकर यांस ते वडी-

लपणानें मान देत, व तसाच ती० स्व० गं. भा. काकूंनाही देत. त्यांच्या-वरच ही पाळी येत असे. 'आतां थोडें काहींतरी खा' असें त्यांनीं म्हटलें कीं पहिल्यांदा यांनीं अगदीं चिडून जावयाचें व 'अहो काकू, खाण्याकरतां का माझा जन्म आहे ?' असें म्हणावयाचें. तरीही रागरंग पाहून काकू आग्रह केल्याखेरीज राहात नसत, व त्यांच्या म्हणण्यास मान देऊन आपल्या आह्नि-कान्या तानमानाप्रमाणें अण्णासाहेब थोडेंबहुत तोंडांत टाकीत. तरी पण नीट पान मांडून फराळ करावयाचा प्रसंग सारें आह्निक आटोपलें म्हणजेच २।४ दिवसांनीं केव्हांतरी येई !

या आह्निकांतला अलीकडील मोठा भाग म्हणजे श्रीगुरुचरित्र आणि देव-दर्शन. अण्णासाहेब यांच्या नित्यक्रमांत नाथभागवत आणि ज्ञानमोदक हे दोन ग्रथ पूर्वीपासूनच होते. स्वात्मसौख्याची भर त्यांत मागाहून पडली. व त्यांच्या जोडीस श्रीगुरुचरित्रही सहज येऊन बसलें. ती० स्व० गं. भा. गयाताईंना श्रीगुरुचरित्र ऐकावयाचें असे, त्या निमित्तानें हा ग्रंथ अण्णासाहेब यांनीं सहज आणला. आणि एकदां त्या निमित्तानें तो त्यांच्या हातांत पडल्यावर यांच्या पद्धतीप्रमाणें यांनीं त्याचा इतका पिट्टया पाडला कीं पुढें पुढें तर, सारा वाडाच तिन्ही त्रिकाळ श्रीगुरुचरित्र बोलूं लागला, आणि अण्णासाहेब म्हणजे श्रीगुरुचरित्र आणि श्रीगुरुचरित्र म्हणजे अण्णासाहेब अशी दोघांची सांगड घालण्यांत येऊं लागली. स्वतः पारायणें करून व इतरांकडून* पारायणें सप्ताह वगैरे ऐकून त्यांनीं हा ग्रंथ व त्याच्या जोडीस स्वात्मसौख्य हें इतकें आत्मसात् करून टाकले कीं या ग्रंथांतील अक्षर ना अक्षर त्यांच्यापाशीं आपलें रहस्य ओकूं लागलें. कोणच्याही प्रसं-गावर बोलणें असो, आणि कशाही तऱ्हेची शंका असो, अण्णासाहेबांनीं

---

* या कामीं विशेषतः रा. रा. काशिनाथपंत वागदरीकर ऊर्फ बारिक मास्तर यांची चिकाटी खरोखरच विलक्षण होती. स्वतःचा संसार व नोकरी सांभाळून आणि नानासाहेब यांच्या दांडग्या विरोधास मुकाट्यानें गिळून टाकून श्रीअण्णासाहेब यांच्या धोरणानें वेळीं अवेळीं पोथी वाचण्याचें व्रत त्यांनीं मोठ्या नेटानें केलें. यांनीं शुद्ध केलेल्या पाठांचेंएक श्रीगुरुचरित्रही बेळगांवच्या 'रामतत्त्व' छापखान्यानें प्रसिद्ध केलें आहे.

आपला या ग्रंथांतून आधार काढून द्यावा. त्यांना काय सांगावयाचें तें सांगून ‘ महाराजांनीं नाहीं म्हटलें ? ’ असें म्हणून ते या ग्रंथापैकीं एकादी सूत्रभूत ओंवी, शब्द, अथवा काम पडल्यास अक्षरही म्हणून दाखवीत. श्रीगुरुचरित्र हा ज्याच्यांत अवैदिक भाषेचा एकही शब्द नाहीं, असा पहिलाच मराठी ग्रंथ म्हणून त्याचा त्यांना फारच अभिमान वाटे. स्वात्मसौख्याविषयींही त्यांचा आदर असाच विलक्षण होता.

स्वात्मसौख्य हा ग्रंथ श्रीमहाराजांनीं सांगितला, व तो कोणा नारायण-स्वामींनीं उतरून घेतला. ही गोष्ट, केव्हां तरी श्रीनृसिंहसरस्वती यांची जन्मभूमि जें करंजनगर ( म्हणजे वऱ्हाडांतील कारंजें ) त्या ठिकाणीं घडली. या पलीकडे त्याची दुसरी कांहींच माहिती नसल्यामुळें, आणि महाराजांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें, ज्यांच्याजवळ तो ग्रंथ होता, त्यांना स्वतः महाराज शांत होईपर्यंत, तो ग्रंथ बाहेर काढण्याची त्यांनीं बंदी केली असल्यामुळें, या ग्रंथाविषयीं सांप्रदायिकांतही कित्येक हा ग्रंथ महाराजांनीं केलेला आहे किंवा नाहीं, असें म्हणणारे आहेत. आणि त्याचीं दुसरींही दोन तीन कारणें आहेत. एकतर, ह्या ग्रंथाची भाषा अगदीं स्वतंत्रपद्धतीची आणि पारिभाषिक असल्या-मुळें आणि यांतील शब्दांचा उपयोग रूढार्थापेक्षां वेदवाणीप्रमाणें यौगिकच जास्त असल्यामुळें त्याची मोड कळल्याखेरीज एक अक्षरही समजणें दुरापास्त आहे. त्यामुळें वाचणारास कांहीं न कळून ‘ महाराज असें अर्थशून्य कांहीं कसे लिहितील ? ’ असें वाटून तो ग्रंथ महाराजांचा नसेल अशी शंका येते. दुसरें असें कीं, त्यांत लेखक आणि वक्ता यांना उद्देशून कृष्णचैतन्य, कृष्णानंद, निरंजन, रामचंद्र इत्यादि शब्द कांहीं विशेष अर्थानें वापरले आहेत. त्याची परिभाषा न समजल्यामुळेंही असें वाटतें, आणि कोणी कोणी तर असेंही म्हण-तात कीं हा ग्रंथ जर महाराजांचा असता, तर, तो बुवासाहेबांचे पाठांत खास आला असता. परंतु ह्या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. हा ग्रंथ बुवा-साहेबांच्या नित्यपाठांत नव्हता, अथवा त्यांच्या तोंडूनही याचा कधीं उल्लेख कोणीं ऐकला नाहीं, तरी एवढें खरें कीं त्यांना हा ग्रंथ माहीत होता, इतकेंच नाहीं, तर या ग्रंथांतील मुख्य रहस्यभूत जी ओंवी अण्णासाहेब सांगत असत, तीच ओंवी त्यांनींही रा. गंगाधरपंत आंबडेकर ऊर्फ महंत, यांना म्हणून दाखवून ‘ काय लाख किंमतीची ओंवी आहे ! परंतु विषयीं जीवांना काय,

राख आहे,' असें सांगितलें होतें. तेव्हां तेवढ्यावरून हा ग्रंथ महाराजांचा नव्हे, असें म्हणतां येत नाहीं. अर्थासंबंधानें व पारिभाषिकसंबंधानेंही असेंच आहे. एवढें खरें कीं, या ग्रंथाचा अर्थ सांगणारा कोणीच नसल्यामुळें त्याच्या लाखांची राख झाली असती, परंतु सुदैवानें अण्णासाहेब यांनीं ती अडचण दूर केली असल्यामुळें, तो आतां सांप्रयदायिक लोकांच्या उपयोगास स्वाध्याय व बोध अशा दोन्ही रीतीनें उपयोगीं पडूं शकेल. त्यांतील शब्दांचा यौगिकपणा विशिष्ट शब्दांची परिभाषा, उपनिषदांशीं त्याचें असलेलें सौहार्द, इत्यादि गोष्टी सविस्तर नाहींत तरी, त्यांची मोड करून बुद्धीची वाटचाली करण्यापुरत्या अण्णासाहेब यांनीं सांगून ठेवल्या असल्यामुळें सांप्रदायिका लोकांचा जो कांहीं फायदा झाला आहे, तो सांगतां येत नाहीं. असो.

या दोन ग्रंथांना धरूनच बहुतेक सर्व त्यांचें बोलणें असें. अशा रीतीनें सर्व कार्यक्रम झाला म्हणजे देवदर्शन निघे. काशीकरांचा विष्णु, श्रीगुंडगणपती, कसब्याचा गणपति, जोगेश्वरी, भिकारदासचा मारुति, शनवारचा मारुति, आणि ओंकारेश्वर, हे बहुतकरून त्यांच्या नित्यांतले होते. याशिवाय कांहीं निमित्तानें इतर देवांसही जात. गणपतीला प्रदाक्षिणा घालण्याचा तर हिशोबच नव्हता. एकदां प्रदक्षिणा घालूं लागले म्हणजे चांगल्या ताकदवान् माणसाचीही मात्रा चालत नसे. शेवटीं थकून बरोबरच्या लोकांनीं बसून रहावें, व मग यांनीं आपल्या प्रदक्षिणा संपल्यावर त्यांस उठवावें, असें होई. देवाच्या दर्शनास जावयाचें म्हणजे मुद्दाम दर्शनाकारितांच जावयाचें, असा त्यांचा स्वभाव होता. वेळेस देवदर्शनांत दुसरीं कामें उरकीत. परंतु दुसऱ्या कामास अगदीं शेजारीं गेले असले तरी, त्यांतच दर्शन घेऊन कधीं आले नाहींत. घरीं परत येऊन पुन्हा दर्शनास जात. त्याचप्रमाणें दोन दोन दिवस देवदर्शनास सवड न झाली, तर ती शिल्लक बाकी हिशेबानें एक दिवसच भरून काढीत; म्हणजे एक चक्कर संपवून घरीं यावें, व गणपतीचें दर्शन घेऊन पुन्हां दुसऱ्या चक्कास जावें, असें चाले!

जातांना रिक्तहस्तानें जाऊं नये म्हणून खिशांत पुष्कळसे तांदूळ टाकून नेण्याची त्यांना संवय होती. अलीकडे त्यांचेबरोबर घरचीं दोनचार मुलें व बाहेरचें कोणीतरी, असा थोडासा परिवार, व एकादा कंदील बिंदील असे. परंतु पूर्वीं ज्यावेळेस एकटे दुकटेच हिंडत असत, त्यावेळेला, धिप्पाड शरीर,

अंगांतील अस्ताव्यस्त सदरा, डोक्यास उपरणें गुंडाळलेलें अगर काश्मिरी टोपी, अर्धीमुर्धी दाढी, आणि हातांतील जाड सोटा, अशी ही अवधूताची फेरी नित्य रात्रीं, वेळीं अवेळीं, पुण्याच्या निरानिराळ्या भागांतून भर्रकन् जात असे. तेव्हां त्यांना पाहून कितीतरी लोकांना मौज वाटत असे, आणि कितीकांना तरी त्यांचा वचक बसे. रात्रींच्या वेळीं सर्व निजानिज झाल्यावर, घरांतील कर्ता वडील माणूस जशी एकदां साऱ्या घरांत नजर टाकतो, त्याप्रमाणें हा पुण्यांतील वडील माणूस आपल्या आवडत्या शहरावर नीट नजर टाकून आणि सर्वांचें क्षेम आपल्या डोळ्यांनीं पाहून, आणि ठिकठिकाणीं मनानें चिंतून, शांत चित्तानें व संतोषानें दोन घास खावयास बसे. आणि अशा रीतीनें एकदां दिवस पदरांत पडला कीं विश्रांतीकरितां आडवा होत असे.

त्यांना झोंप लागत असे किंवा नाहीं कोण जाणें ? त्यांनीं पाय पसरलेले तर कधीं कोणी पाहिलेच नाहींत. परंतु तसेही कधीं म्हणजे जास्त पडले आहेत असें नाहीं. एकदा तास झाला नाहीं तोंच, त्यांचें ' हसं हसं '* सुरू झालेलें ऐकूं यावयाचें. आडवे असले म्हणजे पुष्कळ वेळां चांगलें घोरतांना ऐकूं येत परंतु ते कधीं खरोखरच निजत किंवा नाहीं, याची शंका आहे. एकदां तर त्यांनीं स्वतः मलाच, ' मी नेहमीं जागाच तर असतों, कधींच निजत नाहीं, ' असें सांगितलें होतें. अशा रीतीची त्यांची दिनचर्या आखलेली असे. यांत मग उदंड सृष्टि होई. व ' सपर्यापर्यायस्तव भवतु यन्मे विलसितम् ' (श्रीशंकराचार्यकृत सौंदर्यलहरी.) अशी त्यांची अखंड धारणा असल्यामुळें ती सारीही त्यांची उपासनाच चाले. त्यामुळें पुष्कळवेळां बोलल्यावर ' पुंडलीक वरदे हरि विठ्ठल ! ' असें म्हणून आपलें भाषण ते संपवीत.

अशा रीतीनें वर्षानुवर्ष त्यांनीं घालविलेल्या आयुष्यांतील एकेक गोष्ट आणि प्रसंग सांगूं लागलें तर हजार पानेंही पुरावयाचीं नाहींत. विस्तृत मांडीवरील पोटाच्या घड्यांवर हालणारी पांढरी शुभ्र दाढी, आनंदी मुद्रा, सरल हास्य, दोन बोटांत तपकिरीची चिमटी धरलेली, आणि अनामिका व करांगुली वाकून मध्यमा उभारलेली अशी हस्तमुद्रा वरखालीं करीत आणि मधून मधून

---

* यांच्या ' म्हणण्यांती 'ल कांहीं शब्दांवरून मंडळींनीं गमतीनें त्या म्हणण्याला हें नांव दिलें होतें.

हाताच्या पाठीनें दुसऱ्यास टोकीत असलेली त्यांची मूर्ति डोळ्यासमोर आली, व ज्याच्यांत तासचे तासही चुटकी सारखे निघून जात, असें त्यांचें तें बहुरंगी भाषण आठवलें म्हणजे त्याचा ' पुंडलीकवरदा ' व्हावा असें कोणास वाटणार आहे ! परंतु तो मोह आवरलाच पाहिजे. कारण ' बोलविता धनी ' जरी ' वेगळाच ' असला तरी ' कुठें चंचू ही अल्प पाखराची ' असेंच म्हणणें भाग आहे. तेव्हां तें कितीही उपयुक्त असलें आणि मनोरंजक असलें, तरीही तो मोह आवरलाच पाहिजे. म्हणून हात आखडता घेऊन त्यांच्या स्वभावांतील कांहीं ठळक विशेषांचें अगदीं त्रोटक वर्णन करून हा भाग संपवूं.

अपरिग्रह, दान, अवलोकन, स्वाभिमान, सरलता, वात्सल्य, समता, समदुःखिता, अशा त्यांच्या अनेक गुणांचें वर्णन तरी काय करावयाचें ? सौ० भागीरथीबाईंनीं खरोखरच म्हटल्याप्रमाणें ' पटवर्धन गुण सिंधूचें । माहात्म्य थोर असे ॥ ' परंतु त्याचप्रमाणें ' भागीरथीचें काव्य किती, ' म्हणून त्यांनीं म्हटलें आहे, तसाच दीनपणा मलाही माझ्या वार्णाविषयीं वाटत असल्यामुळें, पुष्कळ हांव असूनही मनोमय समाधानच करून घेतली पाहिजे.

मागील सर्व त्रोटक वर्णनावरून लक्षांत येईलच कीं यांच्या सर्व आचरणाचें व स्वभावाचें सार म्हणजे एक प्रकारची विलक्षण समता व सर्वात्मता हें आहे. आणि त्यामुळें त्यांच्या प्रत्येक कृतीच्या मुळाशीं ' सर्वांकरितां सर्व ' आणि ' सर्वांमिळतीं आपण ' हें तत्व आढळून येई. आणि हेंच आपल्या भोंवतालच्या जीवांच्या मनावर ठसावें, असा त्यांचा प्रयत्न असे. आणि तेवढ्या करितां त्याचा उच्चार हरप्रसंगानें दिवसांतून वाटेल तितके वेळां करण्यासही ते कंटाळत नसत; स्वतः तर अगदीं क्षुल्लक गोष्टीपासूनही तसें वागून दाखवीत. एकट्याचें वैभव, एकटा उपभोग, फार तर काय, पण महाराजांची कृपा व प्रत्यक्ष एकट्याची मुक्ति, यांची देखील कोणी गोष्ट काढल्यास ' एकट्याची ? थूः थूः ' असें म्हणून ते त्याला अगदीं तिटकारून टाकीत. बाजारांत जाणें, शाळेंत जाणें, देवदर्शनास जाणें, इत्यादि अगदीं बारीक गोष्टीपासूनही एकट्या एकट्यानें एकादें काम केलेलें त्यांना आवडत नसे. त्यांच्या जवळ सुष्ट दुष्ट, समर्थ दुर्बळ, भक्त अभक्त, अशा अनेक तऱ्हेचीं माणसें होतीं, व नैसर्गिक

रीतीनेंच जरी त्या सर्वांविषयीं त्यांच्या पोटांत सारखाच कळवळा असला तरी आवड व लोभ हे त्या त्या मानानें कमी अधिक असतील, हें उघड आहे. परंतु त्यांनीं कधीं स्वतः तसें यत्किंचित् देखील कोणाच्या नजरेस येऊं दिलें नाहीं, आणि 'यांचें प्रेम आपल्या एकट्यावरच जास्त आहे.' असा अभिमान, अथवा याच्या उलट 'आपल्या गुणहीनतेमुळें आपल्यावर यांचा लोभ नाहीं' असें दैन्य कोणाच्याही अंतःकरणांत उत्पन्न होऊं नये, अशी त्यांच्या वागण्याची हातोटी होती. तेवढ्याकरितां प्रत्येक माणसाशीं त्यांचा कांहीं विशेष प्रकारचा संबंध असे, व कसाही मनुष्य असला तरी त्या विशेषापुरता इतर कोणापेक्षांही त्या माणसाचा अधिक आदर करून ते सर्व माणसांच्या संबंधांत सारखेपणा राखीत. पहिल्यापासूनच त्यांच्या स्वभावामध्यें एक प्रकारचा विलक्षण एकमार्गीपणा होता.

एकदां कोणतीही गोष्ट त्यांच्या क्रमांत पडली, कीं वज्रलेप झाली म्हणून समजावें. केवळ यदृच्छेनेंच ती सुटून जाईल तेव्हां जाईल. त्यामुळें अगदीं बारीक सारीक गोष्टींपासूनही त्यांचे धारे ठरलेले असत. गणपतीनेंच धुतलें पाहिजे. आणि दुसऱ्या कोणी कितीही केलें, तरी तें त्यास धुवावयास द्यावयाचें नाहीं. असें प्रत्येक बाबतींत सहज ठरून गेलेलें असे. त्यामुळें प्रत्येकाला थोडेंबहुत त्यांच्या अगदीं निकट यावयास सांपडे, व त्या निकट येण्याच्या फाजील फायदा घेणें शक्य नसे. कारण तो मनुष्य कितीही योग्य व लोभांतला असला, तरी तेवढी बाजू संपली कीं लागलेंच अंगाबाहेर टाकला जात असे. तेव्हां प्रत्यक्ष पाहिलें तर त्यांच्या लोभांत आपण अधिक आहों, असें कोणास म्हणण्यास जागा नव्हती. परंतु प्रत्येकास त्यांच्याशीं वाटेल तें हितगुज करून घेतां येत असल्याकारणानें, आणि प्रत्येकाच्या योगक्षेमाची चिंता ते सारखीच वाहतांना दिसत असल्यामुळें त्यांच्या सहवासाचा आनंद आपल्या अंतःकरणांत प्रत्येकास सारखाच घेतां येई. श्रीमन्महाराजांनी आपल्या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें जो 'आप्त' आहे त्याला 'विषमभाव' धरावाच लागतो, आणि यांच्या भोंवतीं तर सर्व प्रकारची अद्‌भुत विषमता होती. परंतु अशा प्रकारांनीं त्यांत समता उत्पन्न करून, ही दोरीवरील कसरत त्यांनीं करून दाखविली. परंतु दुःखाची गोष्ट एवढीच कीं, समता शब्दाचा हा त्यांनीं प्रत्यक्ष आचरून दाखविलेला अर्थ समजण्यास व त्यांचें कौतुक पाहण्यास योग्य अशी प्रौढ

बुद्धि असलेले निदान त्या वेळीं तरी त्यांच्याभोंवतीं कोणी नव्हतें. त्यामुळें एकाद्या अरण्यामध्यें दिव्य गायन होऊन, जसें तें अवकाशांत विलीन व्हावें, असाच जवळ जवळ हा प्रकार झाला. परंतु असें जरी असलें तरी, आनंदाची गोष्ट अशी आहे कीं हें गायन जिवंत वाणीचें होतें, आणि त्या अरण्यांतील वृक्षपाषाणाला ही बसलेली त्याची भावना कधीं वाया जावयाची नाहीं; आज नाहीं उद्यां ते वृक्षपाषाणच सजीव होऊन सूर काढूं लागतील, असा भावार्थ त्यांच्या स्वतःच्या बोलण्यांत नेहमीं येत असे. असो.

लोकनायकत्वाचें लक्षण एकेठिकाणीं मोठ्या उत्कृष्ट रीतीनें असें सांगितलें आहे कीं, The real test of a leader lies in holding widely different people together, along the line of there common sympathies, and this can only be done unconsciously, never by trying. ( Sister Nivedita ). अशा प्रकारची विषम समता आणि सर्वांविषयीं एकजात जिवंत कळवळा ह्यांच्या योगानें ते अनाथ सनाथांचें माहेर होऊन राहिले.

व्यक्तिकल्पनेचा धिःकार आणि सर्वांकरितां सर्व व सर्वांमिळती आपण ही कल्पना नुसत्या बोलण्यांत अगर खाण्यापिण्यासारखा उपभोग घेण्याच्या बाबतींतच नव्हे, तर शरीरक्लेशाच्या बाबतींतही अगदीं बारीकसारीक गोष्टीं-पासून प्रमुख होती. धुळ्याच्या प्रवासाचें मागें वर्णन दिलेंच आहे. त्यांना सेकंडक्लासमधून जाण्याची म्हणजे ऐपत नव्हती असें नाहीं, व त्याप्रमाणें पुष्कळ आग्रहही करण्यांत येत असे. परंतु त्यांचें आपलें एक उत्तर ठरलेलें असे; " जाऊं तर सगळेच सेकंडमधून जाऊं, नाहीं तर आपला तिसरा वर्गच बरा. " आळंदीस जातांनाही असेंच व्हावयाचें. अगदीं तरुण व होतकरू मंडळीस पायीं जाण्यांत आनंद वाटे, आणि पुणें व आळंदी म्हणजे घर-आंगणासारखेंच म्हणून त्यांचीही त्यांना तसें पाठविण्यास हरकत नसे. त्यांना स्वतःला अनंत व्यापांमुळें लौकर निघावयास वेळ मिळत नसे, आणि आळं-दीस वेळेवर पोहोंचण्याकरितां टांगा करावा लागे. परंतु स्वतः त्यांना मागें उरलेली मंडळी बरोबर घेऊन बैलगाडींतून जाणें अतिशय आवडे. मोटारचें

तर नांवच नको. मुळजी शेटच्या मुलावर त्यांचा फार लोभ होता, व त्याच्या आग्रहाकरितां एकदां ते मोटारमध्यें बसलेही परंतु तेव्हां देखील ' आमच्या इकडे मोटार तयार झाल्याखेरीज मोटारमध्यें बसणें बरें वाटत नाहीं, ' असें त्यांनीं उद्गार काढले.

त्यांच्या आयुष्यासंबंधानें गोष्टी चालल्या असतां, ते असें म्हणाले कीं, ' अरे, मी भासक्याभुसक्या गोष्टीला हातच घातला नाहीं, आणि जे प्रयत्न झाले, तेही असे झाले कीं, आतां फक्त ' एकच पाऊल, ' कीं इकडचा डोंगर तिकडे; पण तें ' एकच पाऊल ' पडूं देण्याची महाराजांची इच्छा नव्हती. आणि दर वेळेस तें ' एकच पाऊल ' सोडून द्यावें लागत असे. परंतु कांहीं मनुष्यकृत अडचणींमुळें नव्हे हो. दर वेळेला, ज्याच्यावर तें पाऊल टाकणें अवलंबून असे, असा मनुष्यच अचूक मरून जात असे. अशा रीतीनें मध्यशिलाच ढळून गेल्यामुळें सारी उभारणी वाया जाई. " अण्णासाहेब यांना महाराजांनींही ' हें लष्करी खातें आहे, ' ' याच्याकडे इकडचा डोंगर तिकडे करण्याचें काम आहे, ' ' हा कृतयुगींचा कंटक आहे ' असें नेहमीं म्हणावें त्या प्रसंगांना उद्देशून हें भाषण होतें. त्यावर त्यांना विचारलें कीं, ' एकच पाऊल ' जर पडलें असतें, तर काय झालें असतें ? तेंव्हां त्यांनीं त्याचें थोडें वर्णन करून सांगितलें कीं, ' अशी स्थिति म्हणजेच कृतयुग. कृतयुग काय आणखी वेगळें असतें ? ' त्यावर ' शिवाजी महाराजांत आणि यांत काय फरक झाला असतां ? ' ' हें तर तसेंच काम झालें असतें ! ' असें विचारल्यावरून ते म्हणाले ' अरे हो. पण तशी महाराजांची इच्छा नव्हती; ' तेव्हां अर्थातच ' महाराजांची तरी पण अशी इच्छा कां नसावी ' असा प्रश्न आला. तेव्हां ते म्हणाले ' अरे तें बरोबर आहे. तें कितीही झालें असतें तरी व्यक्तिविषयक व एकट्याचें झालें असतें, आणि म्हणून जास्त टिकलेंही पण नसतें. म्हणून सांधा वळवून गाडी या रुळावर घातली. आतां होईल तें खरें व पक्कें काम होईल. " या शब्दांचे अर्थ व महत्त्व पुरें समजण्याची कांहीं आमची ताकद नाहीं. परंतु त्यांतून एक बोध उमटून पडतो कीं, एकट्याकरितां म्हणून होणाऱ्या गोष्टींचा त्याग करण्याची त्यांची मजल कोठवर गेली होती.

शिवाजी महाराजांचें नांव यांत आलें म्हणून चिचकून जावयाचेंही कांहीं कारण नाहीं. हें चरित्र फारच त्रोटक आहे, आणि गायत्रीप्रमाणें, अनेक

शापांनीं बाधित आहे, तथापि त्यांच्या अनेकमुखी खटाटोपांची पुष्कळशी विस्तृत माहिती असणारे अजूनही पुण्यांत कोणी नाहींत असें नाहीं. आणि त्या गोष्टी जरी सोडल्या, व केवळ वऱ्हाडचें कारस्थान घेतलें, तरीही कोणासही यांत कांहीं अतिशयोक्ति आहे, असें वाटणार नाहीं. श्रीसयाजीराव गायकवाडां-सारख्या माणसाच्या हातीं सत्ता आली आणि त्याला जर सदिच्छा असली, तर काय करतां येतें, हें बडोदा संस्थानावरून कोणाच्याही लक्षांत येतें. वऱ्हाडसारखा सुपीक व संपन्न मुलूख, पैशाचा सावकारी पेंच, अण्णासाहेबां-सारख्या लोकोत्तर पुरुषाचें नेतृत्व, कमालीची निरपेक्षता, केवळ लोककल्याणा-चाच जिव्हाळा, समतोल वागणूक, अविश्रांत उद्योग, आणि परदेशांतील कॉन्सल्स वगैरेंसारख्या जबाबदार व महत्त्वाच्या राजपुरुषांशीं असलेलें त्यांचें हितगुज या सर्वांचा विचार केला, तर जें कांहीं महापुरुषांनीं मोठ्या प्रमाणांत जर्मनींत करून दाखविलें, त्याचाच प्रयोग लहान प्रमाणावर येथें करतां आला नसता, असें कसें म्हणावें ?

आतां इतकें सर्वही ' किती झालें तरी एकट्याचेंच ' कसें झालें असतें, तें समजणें आमच्या शक्तीच्या बाहेर आहे, परंतु त्यापासून दोन गोष्टी उघड होतात कीं, सालरजंगाच्या मृत्यूनें हताश होऊन अण्णासाहेब ' श्रीविठ्ठल ' ' श्रीविठ्ठल ' करूं लागले, असें नसून आपल्या ध्येयाच्या पाहिजे तशा सिद्धी-करितां त्यांनीं जाणूनबुजून केलेला प्रचंड स्वार्थत्याग आहे, आणि पूर्वी आम्हीं एका प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें मनुष्यहानीनें नव्हे, तर कांहीं तरी अतिमानुष ज्ञानामुळें त्यांच्या गाडीचा सांधा बदलला आहे. आणि म्हणूनच त्यांच्या ठिकाणीं दुःखशोकाचा लवलेशही नसून, उलट अतिशय उत्साह, आणि अतिशय आशावादित्व होतें.

एकदां ' आपण परमार्थांत पुष्कळ परिश्रम केले आहेत ' असें समजणाऱ्या आणि गिरनारप्रभूच्या कृपेमुळें थोडीबहुत कांहीं सिद्धी असलेल्या एका माणसा-विषयीं बोलणें चाललें होतें. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याविषयीं आणि भविष्या-विषयीं बोलत असतां, तो असें म्हणाला कीं, ' तें काय व्हावयाचें आहे, तें तुमच्यावर अवलंबून आहे. तुम्हीं जर आपली पात्रता दाखविली नाहीं, तर संधी निघून जाईल तें काय व्हावयाचें आहे, म्हणजे तुमची पात्रता सिद्ध होऊन तुम्हीं वर येणार का संधी वांया जाऊन नामशेष होणार हें अजून

ठरावयाचें आहे. ’ त्यावर ‘ आमच्यावर अवलंबून आहे, हें तर खरेंच,’ असें म्हणून ते एकदम झटक्यानें म्हणाले कीं ‘ मूर्ख आहे तो; काय व्हावयाचें आहे तें ठरलेलें आहे. ’ असो.

सर्वांच्या खऱ्या कल्याणाकरितां एकट्याच्या वैभवाचा केलेला हा प्रचंड त्याग पाहिला म्हणजे, त्यांच्या एकंदर राहणीचें नवल वाटेनासें होतें. आणि त्यांच्या सबंध चरित्रांतून जर कांहीं एक शिकवण घ्यावयाची असली तर, व्यक्तिकल्पनेचा परोपरीनें नाश, आणि राष्ट्रीयत्वानें जगण्याचा अट्टाहास, ही निर्धास्तपणानें घ्यावी. म्हणजे त्यांच्या इतर सर्व शिक्षणाचें रहस्य आपोआप लाधेल असें वाटतें. ‘ ब्राह्मणाचें सर्वस्व काय तें गायत्री; तीच तर मुळीं ‘ सर्वांमिळतीं आपण ’ असें सांगते, ’ असें ते पुन्हा पुन्हा सांगत. आणि तेवढ्याचकरितां गायत्रींत ‘ नः ’ हें अनेकवचनी सर्वनाम योजलेलें आहे, आणि त्यांतही पुन्हा, ‘ अस्माकम् ’ वगैरे प्रयोग न योजतां ‘ नः ’ च शब्द योजलेला आहे. या शब्दाचें रहस्य ते असें सांगत कीं, ‘ गायत्री ही देवाची प्रार्थना आहे, मंत्र तर आहेच, परंतु प्रार्थनाही आहे. हिच्यांतील पहिला ‘ त ’ ब्रह्मपर, व अंतीचा अर्धा ‘ त् ’ ब्रह्मपर, ‘ त्स ’ पासून ‘ यो ’ पर्यंत निरनिराळ्या नाना पापांच्या क्षालनार्थ दोन ते अठरा आहेत. येणेंकरून ‘ नः ’ म्हणजे ‘ आम्हां सर्व प्रकारच्या मनुष्यांची बुद्धि शुद्ध होऊन ‘ प्रचोदयात् ’ पर्यंत सर्व देवपदवी, व तिन्ही लोक प्राप्त होऊन ब्रह्मप्राप्तीस योग्य होतो. परंतु इतकेंही जरी झालें तरी या सर्वांसही ईश्वरी कृपा पाहिजेच. इतकें होऊनही अखेरी साधणें, हें अखेरीस त्याच्या कृपेवरच अवलंबून असल्यामुळें, अंतःकरणांत त्याच्या कृपेनें हें चाललें आहे असा विनीतभाव, आणि त्याच्या कृपेनेंच त्यानें अखेरी साधून द्यावी, अशी शरणागति ही पाहिजेतच. अशीच शरणागति असणें, अथवा अशा रीतीनें देवापाशीं ‘ तुझ्या कृपेचें दान दे ’ असें म्हणणें, म्हणजेच प्रार्थना. म्हणून गायत्री हा मंत्र आणि प्रार्थना दोनही आहे. आणि ही प्रार्थना ‘ सर्वांकरितां सर्व, ’ आणि ‘ सर्वांमिळतीं आपण, ’ हें मनांत बाळगून सर्वांकरितां एकट्यानें, एका ठिकाणीं बसून, मुकाट्यानें करावयाची आहे. आणि म्हणून त्यांत अनेकवचनी सर्वनाम घातलें. एवंगुणविशिष्ट परमात्म्याचें ध्यान आम्हीं जीवांनीं करावें,—आणि ध्यान हें अर्थातच ध्येयाशीं एकरूप होऊन, व एकप्रत्यय होऊन करावयाचें असतें—हें आमचें कर्तव्य आहे, त्या परमात्म्यानें—

आमच्या निश्चयशक्तीस प्रेरणा करावी. असा या मंत्रांतील प्रार्थनेचा भाव आहे. आणि त्यांतील मंत्रमयता पापक्षालनापासून तों ब्रह्मपदवीचा अधिकार देण्यापर्यंतच्या सामर्थ्यांत आहे.

यांत 'नः' हेंच पद योजण्याचें असें कारण आहे म्हणून ते सांगत कीं, आर्य लोकांच्या भोंवतीं त्यावेळीं अशा जातीचे कांहीं लोक होते कीं, त्यांच्या विशिष्ट शरीररचनेमुळें त्यांना दोन्ही ओंठ जुळवितां येत नव्हते. म्हणजे अर्थात् ओष्ठ्य वर्णाचा उच्चार करितां येत नव्हता. केवळ वैदिक लोकांकरितांच नव्हे, तर जीवमात्राकरितां प्रार्थना करावयाची अशा करुणावृत्तीनें ही प्रार्थना असल्यामुळें अवैदिक लोकांचें दर्शक असें हें 'नः' पद घातलें. कारण या अपवर्ग लोकांच्या उच्चारांत 'प' वगैरे वर्ण थोडेबहुत उच्चारले गेले तरी अनुनासिकांचा उच्चार साधारण सारखाच होत असल्याकारणानें 'म' चा उच्चार 'न' सारखा होत असे. त्यामुळें जेव्हां वैदिक लोकांना वैदिक व अवैदिक असे लोक मिळून सामान्य उल्लेख करावयाचा असेल, तेव्हां 'म'च्या ऐवजीं 'न' येत असे. त्याचेंच 'नः' हें एक रूप आहे. त्यामुळें इतरही कांहीं संस्कृत शब्दांत 'म' ची जागा 'न' नें घेतलेली आहे, असें ते सांगत असत. परंतु टिपून ठेवण्याचा प्रयत्न न झाल्यामुळें आतां तें मांडून दाखविणें आमच्या शक्तीबाहेर आहे.* असो. हा मूळ इतिहास अजूनही एका कल्पनेच्या रूपानें अवशिष्ट आहे. आमच्या पुराणांतलि राक्षसांचीं वर्णनें आणि जुनीं पौराणिक चित्रें हीं पाहिलीं म्हणजे, त्यांत एक कल्पना अगदीं ठरलेली दिसते कीं, राक्षस आणि दैत्य म्हटले म्हणजे, त्यांचे ओंठ अतिशय लांब, जाड, व फकाटलेले असावयाचे. या कल्पनेंत कांहीं ठिकाणीं तर इतकी अतिशयोक्ति झाली आहे कीं, राक्षसाचा वरचा ओंठ आभाळाला लागलेला, आणि खालच्या ओंठानें पाताळ चाटलें आहे, असें वर्णन आढळतें, व जुनींच तर काय परंतु अगदीं परवांचीं जरी पोथ्यांतलीं चित्रें घेतलीं, तरीही त्यांत राक्षसांचीं चित्रें या ठराविक पद्धतीनें छापलेलीं दिसतात. इतकी ही कल्पना न कळत रुजलेली आहे. असो.

तात्पर्य इतकेंच कीं, सर्वांकरितां आणि सर्वांमिळतीं व्याक्ति असें असल्या-

---

* या विषयीं त्यांचे कांहीं उतारे प्रकरणाचे शेवटीं दिले आहेत.

मुळें, जगतांतील यच्चयावत् सृष्ट परमाणु, मग ते गोचर असोत अथवा अगोचर असोत, एकमेकांस जसे कांहीं अगदीं चिकटून आहेत, आणि म्हणूनच आमच्या किंचित् दृष्टीस जरी दिसत नाहीं, तरी जें काय त्यांचें बरें वाईट व्हावयाचें आहे, तें सर्वांचेंच परस्परांस धरूनच व्हावयाचें आहे, व परस्परांशीं त्यांचा कर्मभोगरूप व्यापारविनिमय अखंड आहे, आणि म्हणूनच हें ओळखून, अहंकारविशिष्ट जीवानें आपल्या सर्व भोगकर्मांची रचना केली पाहिजे, हें त्यांचें साऱ्या वैदिक शिक्षेचें सार होतें. व तें त्यांनीं स्वतः तंतोतंत आचरून दाखविलें. जेवावयास बसलेल्या लोकांचीं पानें काढण्यासारख्या गोष्टीपासूनही भोंवतालच्या मुलांना ‘ अरे, मी तुमच्यांतला, आपण सारे मिळून काम करूं, मला कांहीं तरी करूं द्या ’ असें त्यांचें शिकविणें होतें व अशा कांहीं कांहीं वेळीं श्रीभक्त सीतारामपंतांसारख्या एकनिष्ठ भक्तांनीं त्यांनीं काम करूं नये, म्हणून कितीही अट्टाहास केला, तरी तें न चालूं देतां पाणी वाढणें, पान उचलून टाकणें, शेणगोळा बाहेर टाकणें, अशा तऱ्हेचें कांहीं तरी काम, अगदीं लहान कां होईना, पण केल्याखेरीज त्यांच्यानें राहवत नसे.

मनुष्यमात्राच्या ठिकाणीं ईश्वराचें आस्तित्व पाहणें, व जेथें कोठें गरज असेल, तेथें अनुकूल ती सेवा करून संतोष देणें, व “ करावें कर्म पितरांचें नामीं। समर्पावें विष्णूस आम्हीं। ” ( श्रीगुरुचरित्र ५ ) अशा रीतीनें प्रत्येक क्रिया महाराजांस चिकटून द्यावी, हें सर्व तपांहून मोठें तप आहे, व अशा रीतीनें एकाद्या अंतःकरणास झालेला संतोष, म्हणजे सर्व यज्ञांपेक्षांही महायज्ञ आहे, असें आपल्या सर्व कृतीनें निमूटपणें ते शिकवीत. एकदां एक साधारण वेडसरच असा प्राणी दुपारीं ३।४ वाजतांच येऊन उभा राहिला, व ‘ भूक लागली,’ म्हणून म्हणूं लागला. तेव्हां पान मांडून जें काय त्या वेळेला होतें, तें त्यांनीं त्याच्यापुढें ठेविलें, व शिवाय वर दूध होतें, तेंही आणून त्यास शिळ्या भातास दूध साखर घातली. जेवून तृप्त झाल्यावर त्या वेडप्याचे डोळे आनंदानें भरून आले. तो म्हणूं लागला कीं “ महाराज, आगेमागें कां होईना, व थोडेबहुत हाल होऊन कां होईना, पोटास गोळा तर कुठें तरी मिळतोच. परंतु भात वाळलेला आहे म्हणून दूध साखर कोण घालणार ? तो त्याचा संतोष पाहून त्यांना किती आनंद झाला, व बाकीचें दूध, केवळ महाराजांचा

प्रसाद अशा आदरानें त्यांनीं स्वतः घेऊन इतरांसही दिलें, तें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांच्या स्मरणांतून केव्हांहि जाणार नाहीं.

त्यांना दान करण्याचें जणूं कांहीं वेडच होतें, असें नेहमीं म्हटलेलें ऐकूं येतें, आणि तें यथार्थही आहे. मात्र इतकेंच कीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें आपल्या इतर सर्व व्यसनांप्रमाणें हें वेड अथवा व्यसन देखील स्वाधीनतेचेंच त्यांनीं सांभाळलें होतें. पै, पैसा अथवा मूठभर धान्य मागणारे भिकारी तर घरोघरीं येतात, व पुष्कळ ठिकाणीं त्यांना मिळतेंही. परंतु यांच्याभोंवतीं असलेल्या याचकांची तऱ्हाच निराळी. सामान्य भिक्षेकरी आला असतां यांनीं त्याला नुसती मूठ अशी कधीं घातलीच नाहीं, अच्छेर, शेर, जें काय माप हातीं लागेल, तें पदरांत पडून, तो जर तेवढ्यावरच गेला, तर त्याच्यासारखा दुर्दैवी कोणीच नाहीं! त्याचप्रमाणें पैसा दोन पैसे देणें यांतही कांहीं विशेष नाहीं; परंतु कित्येक लोकांचे प्रपंचच यांच्यावर चालत होते, आणि कित्येक भिक्षेकऱ्यांना ती एक वतनाची बाब होऊन बसली होती! अमुक भिकाऱ्याला अमुक वारीं एक पैसा द्यावयाचा, अमक्याला इतकें धान्य द्यावयाचें, अमक्याला आला असतांना अमुक तऱ्हेचें भोजन घालून इतकी दक्षिणा द्यावयाची येथपासून तों ५०।५० रुपयांपर्यंत असे धारे सहज ठरून जात. याशिवाय कोणी धोतर मागतो, तर कोणी जोडा, छत्री, असें कांहीं उपयोगाचें मागतो, कोणी लघुरुद्र करावयाचा म्हणतो, कोणी देऊळ बांधतो, कोणी तिकीट काढून मागतो,— असे त्यांच्या दानाचे अनेक पर्याय होते. त्यांना अनुकूल असलेली कोणचीही गोष्ट कोणी मागितली असतां, त्यांच्या तोंडून 'नाहीं' असें कधींच आलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर अनुकूल नसलेलीही जर कांहीं प्रयत्नानें देतां येण्याजोगती असली, तरी ते तसें करून द्यावयास कमी करीत नसत.

ही गोष्ट अर्थातच कुटुंबांतील इतर मंडळींना आणि त्यांच्याभोंवतीं असलेल्या इतर गणांना पसंत पडत नसे, व त्यामुळें त्या भिकाऱ्यांना पुष्कळ वेळां या लोकांपासून त्रास होई. म्हणून या गोष्टींत ते कुणावरही विसंबत नसत. कसल्याही कामांत असले, इतकेंच नाहीं, तर त्यांच्या मंत्रपठणादि आह्निकांत असले, किंवा शौचासही गेलेले असले, तरी भिक्षेकऱ्याची हांक ऐकूं आली कीं तांतडीनें धांवतच खालीं यावयाचे; आणि कसल्याही गडबडींत ते असले, तरी त्यांना भिक्षेकऱ्याची हांकही पण नेमानें ऐकूं येई! परंतु इतकें

सर्व करीत असतांही त्यांनीं तें कोणाच्याही विशेषसें नजरेस कधीं येऊं दिलें नाहीं. घरच्या कर्त्या पुरुषाजवळ कुटुंबियांनीं हक्कानें वस्तु मागावी, त्याप्रमाणें हे लोक हक्कानें व नेमानें येऊन वर सांगितल्याप्रमाणें काय हवें तें मागून घेत. श्रीमन्महाराजांनीं देव मामलेदार यशवंतराव महाराज यांस कृतार्थ केल्यावर दानधर्माची आज्ञा केली, * व त्यांनीं पुढें तें व्रत कशा रीतीनें चालविलें, हें प्रसिद्धच आहे. तेंच लोण धुळ्याचे बुवासाहेब व अण्णासाहेब अशा क्रमानें पुढें चाललेलें दिसतें. मात्र एवढेंच कीं अण्णासाहेब यांचें, इतर सर्व व्यवहाराप्रमाणेंच मुकाट्यामुकाट्यानें झालें.

त्यापासून अर्थातच त्यांना पुष्कल त्रास होत असावा; कारण आलेल्या लोकांनीं वाटेल तशी मागणी करावी, व त्यांच्याजवळ तें नसल्यामुळें, यांनीं हात जोडून नम्रतेनें एकाद्या व्याह्याजांवयाप्रमाणें त्यांची समजूत काढावी, असा प्रकार पुष्कळ होई. शिवाय घरच्या मंडळीपासून त्रास होतो म्हणून कित्येकांची अशी मिजास असे कीं दाराशीं यावयाचेंच नाहीं; म्हणून अण्णासाहेबांस कोठें तरी रस्त्यांत गांठून, अथवा रस्त्यावरूनच ग्यालरींत हांक मारून आपलें दैन्य कळवावयाचें, व मग त्याप्रमाणें जेथें ते असतील तेथें स्वतः जाऊन यांनीं तें नेऊन द्यावयाचें ! पुष्कळ वेळां असें होई कीं, कोठें जात असतां दुकानांतून यांनीं छत्री विकत घेतलेली समजे, परंतु ती कोणास नेऊन दिली हें मात्र कधींच कळत नसे. इतकें करून पुन्हां वर गृहस्थाश्रमी बाणा कायमच असे. रस्त्यानें जर एकादा भिक्षेकरी भेटला, तर त्याला जें काय हातीं येईल तें टाक, असें त्यांनीं कधीं केलें नाहीं. सामान्य लोकांप्रमाणें एक दिडकी मात्र त्याच्या हातावर पडावयाची. मात्र घरीं येऊन मागितलें कीं हवें तें मिळे. एक वारकरी नेमानें दोन चार दिवसांआड रस्त्यांत हांक मारावयाचा. त्याला प्रत्येक वेळीं भला भक्कम शिधा, व रुपया आठ आणे कांहीं तरी देत असत. असाच एक दुसरा बोवा चार आठ दिवसांनीं यावयाचा. केळीच्या पानावर दूधभातसाखर खावी व त्याच्या हातावर एक रुपया ठेवून अण्णासाहेब

---

* देव मामलेदार यांनीं श्रीमहाराजांना धाडिलेल्या एका पत्रांत 'परोपकाराची आज्ञा झाली त्याप्रमाणें प्रारंभ केला आहे' अशा तऱ्हेचा मजकूर आहे. या पत्राची प्रत श्रीमहाराजांचे मठांत आहे.

यांनीं प्रणिपात केला म्हणजे संतोषानें निघून जावयाचें, असा त्याचा क्रम होता.

कोठेंही काय थोर माणूस म्हटला कीं त्याच्याभोंवतीं खर्चणाऱ्याचें खरचतें, आणि कोठवळ्याचें पोट दुखतें, अशी स्थिति असावयाची, त्याला इथेंच अपवाद कोठून सांपाडवयाचा ? या असल्या देण्याचा व भिक्षेकरी लोकांच्या मगरूरीचा आणि तऱ्हेवाईकपणाचा भोंवतालच्या मंडळीस अर्थातच संताप येई; आणि दुसऱ्याचें अंतःकरण दुखवूं नये म्हणून हे तर पराकाष्ठेची काळजी घेत. अशा स्थितींत एकादें जास्त मागणी करणारें कुळ आलें, आणि त्याला मुक्तहस्तानें कांहींतरी मोठें देणें देऊन टाकलेलें कोणाच्या पहाण्यांत आलें, म्हणजे त्यांची जी कानकोंड्यासारखी स्थिति होऊन जाई, ती पाहिली म्हणजे त्या पराकाष्ठेच्या निरभिमानतेनें आणि सरलतेनें, पहाणारा मनुष्य विरून जाई व त्याला गहिंवर आल्यावांचून रहात नसे. एकाद्या प्रेमळ परंतु करड्या बापाच्या उधळ्या मुलानें अगदीं नीटपणानें चालण्याचें कबूल करूनही कांहीं मोठा खर्च केला, म्हणजे तो जसा हळूच वडिलांची समजूत घालावयाचा प्रयत्न करतो, व तो खर्च अवास्तव झाला नसून उलट ' बरें झालें, थोडक्यांत प्रकरण मिटलें,' असें वाटून थोडेसें समाधान त्यांना होईल, अशा रीतीनें कांहीं तरी सांगतो, अशा तऱ्हेची कांहींशी यांची स्थिति होऊन जाई. "आपला तो हा होता," अथवा "आपल्या त्या ह्याचा तो होता" असें कांहीं तरी हळू हळू म्हणत, एकाद्या कचाट्यांतून सुटावें तशी मुद्रा करून, "चला, एकदांचा १॥ रुपयावर तंटा तोडला," असें पुन्हा पुन्हा सांगत, दुसऱ्याचीही मुद्रा संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतांना त्यांना पाहिलें म्हणजे त्या अंतःकरणाच्या नवनीत--कोमलतेनें--कोणाचें अंतःकरण भरून येणार नाहीं ?

दुसरेही दानशूरतेकरितां प्रसिद्ध असलेले अनेक महात्मे आहेत, व ' मृदु सबाह्य नवनीत ' असल्या चित्तवृत्तीच्या भगवन्मूर्तीही कित्येक ठिकाणीं असतील, परंतु सामान्यतः यांच्या व इतर दाते लोकांच्या दानव्यवस्थितींत असा मोठा फरक आढळून येतो कीं बहुतेक सर्व दात्यांचें दानत्व सरदारी बाण्याचें असतें; म्हणजे सदयता तर खरीच, परंतु त्यांत दानाचें तानमान, कांहीं स्वतःचा दर्जा, व कांहीं याचकाची पात्रापात्रता, वगैरे कित्येक धोरणांनीं ठरतें, आणि म्हणून त्यांत एक प्रकारची आपला सत्त्वभंग होईल, अशी भीति

राहते. परंतु अण्णासाहेबांच्या ठिकाणीं स्वतःचा दर्जा व दुसऱ्याची पात्रापात्रता या दोहोंचाही विचारच नव्हता असें दिसून येई. याचें कारण असें कीं त्यांच्या ठिकाणीं विश्वकुटुंबतेची जाणीव सदैव इतकी जागृत असे कीं, आपण कोणाला कांहीं देत नसून ज्याचें त्याचें हक्काचेंच तो घेतो, तेव्हां त्याचा अभिमान तरी कसला धरावयाचा, आणि त्यांत पात्रापात्र तरी कसलें पाहावयाचें ? व एकाद्या विशिष्ट रीतीनें कोणाची इच्छा पुरवितां आली नाहीं, म्हणून त्यांत सत्त्वभंग तरी कसला व्हावयाचा ? आईच्या अंतःकरणाला ज्याप्रमाणें मुलाचा हट्ट सोसत नाहीं, म्हणून केवळ ती त्याच्या इच्छा पुरविण्यास प्रवृत्त होते, त्यांत कांहीं दर्जा अथवा पात्रापात्रता येणेंच शक्य नाहीं, तशी त्यांची स्वभावतःच मनो-रचना होती; आणि दुसरीकडून जसें एकाद्या कार्यप्रसंगीं सर्वजण कोठीवाल्या-जवळ आपल्या वस्तु आणून टाकतात, व मागावयास आले म्हणजे तो त्यांना असेल नसेल त्याप्रमाणें भराभर वाटेला लावीत असतो, तशी त्यांची धारणा होती.

एकदां एका प्रसंगीं असाच कांहीं विलक्षण योगायोग आला कीं यांच्या हाताशीं केवळ एका चवलीपलीकडे त्यावेळीं कांहींच नव्हतें, आणि एक हजरत मौला तर दाराशीं येऊन उभे राहिले. बरें, त्यांचा सवालही कांहीं फार नव्हता; केवळ १॥–२ रुपयाचाच प्रश्न होता. अगदीं हाताशीं नस-ल्यास कोणाकडून आणून देखील दुसऱ्याची गरज भागवावयाची, असेंही पुष्कळ वेळां होई; परंतु त्या वेळचा कर्मधर्मयोग असा होता कीं तशींही सोय नव्हती. ज्या हातांनीं चुटकीसरसे २।२ कोट रुपये उचलून ठेवावे, त्याच हातांनीं, केवळ दीड दोन रुपयाकरितां आपल्या नांवावर आलेल्या एका फालतू माणसाचे हातावर केवळ एक चवली ठेवून ' आज एवढेंच आहे महाराज, ' असें म्हणण्याचा प्रसंग आला असतांनाही मनाची समता यत्किंचितही न ढळल्याचें पहावयाचें देखील नशीबांत पाहिजे. असाच विचित्र योगायोग तेव्हां घडून आला. परंतु दारीं आलेल्या गृहस्थास त्याचें काय ? तो तर आपल्या ऐटीतच होता. त्याचा तो उर्मटपणा पाहून, बाजूच्या लोकांस तर स्वस्थ बसणें अशक्य झालें. परंतु यांनीं मात्र उलट अतिशय नम्रतेनें ' अरे बाबा, यावेळीं माझेजवळ जास्त नाहीं, मी अगदीं शपथ वाहून सांगतों, ' असें त्याला सांगून पाहिलें. परंतु जेव्हां त्याचें तोंड

वाटेल तसें चालू झालें तेव्हां ‘ तूं वेडा आहेस, तुझ्यासारख्या माणसानें असें बोलूं नये ’ असें सांगून ‘ त्याला उपद्रव देऊं नका ’ म्हणून जवळच्या लोकांस बजावून ते माडीवर गेले, व कांहीं लिहिणें सांगणें होतें तें पूर्ववत् करूं लागले. मग त्यांच्या चित्तावर या गोष्टीचा कांहीं देखील परिणाम उरला नाहीं. अशी विलक्षण नम्रता, आणि निखळ समता, पाहण्यास मिळणेंही खरोखरच दुर्लभ आहे.

हें उदाहरण दिल्यानें कदाचित् कोणास वाईट वाटण्याचा संभव आहे. कारण अण्णासाहेब यांची स्थिति हलाखीची असे, असें सांगणें म्हणजे त्यांच्या दृष्टीनें अण्णासाहेब यांचा प्रत्यक्ष दुर्लौकिक करण्यासारखेंच आहे. परंतु ही विचारसरणी कोतेपणाची आहे, हें उघड आहे. कारण अण्णासाहेब यांच्यासारख्या विभूतींच्या ठिकाणीं संपत्तीच्या अलोटपणानें मोठेपणा येत नसून अशा हलाखीच्या स्थितींतच ‘ लक्ष्म लक्ष्मीं तनोति, ’ अशी त्यांची शोभा अधिक उमटून पडते. आणि म्हणूनच कीं, काय अशा लोकांच्या मागें विधात्यानें हें भूषण लावून दिलेलें असतें, असा सार्वकालिक अनुभव आहे. मग असल्या विश्वकुटुंबितेंत कुबेराचा खजीना असला म्हणून काय पुरा पडावयाचा आहे ? आणि तो पुरा पडला नाहीं, म्हणून काय लाघव यावयाचें आहे ? त्यांतूनही सर्व तऱ्हेचीं अंमली व्यसनें केवळ लीलेनें जवळ बाळगणाऱ्या शंकराप्रमाणें हें निर्धनतेचें व्यसन अण्णासाहेब यांनीं तर खरोखरच कौतुकासारखें जवळ बाळगिलें होतें. आणि म्हणून त्याचें आम्हींही कौतुकच केलें पाहिजे.

एरवीं, पैसा म्हणजे तर काय, त्यांच्या हातचा मळ होता. त्यांचे बंधु तर त्यांना नेहमीं अजीजीनें म्हणत कीं ‘ अरे बाबा, तूं नेमानें एक तास रोज संसाराकडे देशील, तरी पैशाचा पाऊस पडेल. ’ परंतु तो एक तास त्यांनीं तसा केव्हांही दिला नाहीं. ते स्वतःच म्हणत असत कीं ‘ पैशाला काय कमी ? मी जर उद्योग केला असता, तर सारा वाडा सोन्यानें केव्हांच भरून टाकला असता. ’ या उद्गारांत केवढें सत्य आहे, हें मागील चरित्रावरून लक्षांत येईलच. तिसरी गोष्ट अशी कीं, अशी जरी नेहमीं हलाखी असे, तरी यांचा गृहस्थाश्रमी बाणा रेंसभरही कधीं ढळला नाहीं, व कोणत्याही प्रसंगांत गृहस्थाश्रमी ऐटदारपणा कधीं टळला नाहीं. शेवटपर्यंत प्रपंच सारा त्यांच्याच अंगावर होता. व तो त्यांनीं स्वतःच कमाई करून रेटला. त्या-

करितां कधीं कोणाच्या तोंडाकडे त्यांना पहावें लागलें नाहीं. तेव्हां जाणून बुजून धारण केलेल्या श्रीविनायकाच्या वक्षःस्थलावरील या उरगबंधाकडे पाहून कोणाच्या अंगावर जर अनिवार शहारे येऊं लागले, तर ती एक विशिष्ट प्रकृति आहे, असें म्हणून सोडून देणेंच भाग आहे. एरवीं कोणीहि झाला तरी त्याच्याकडे कौतुकानेंच बोट दाखवील. त्यामुळें त्यांना कमीपणा न येतां उलट त्यांचा अपरिग्रह मात्र जास्त खुलून दिसतो.

पोटाचा उद्योग म्हणून ते वकिली शिकले होते, व पूर्वी सांगितल्याप्रमाणें डॉक्टरी त्यांच्या गळ्यांत पडली होती. वैद्यकावर जर पैसे मिळवावयाचें त्यांनीं मनांत आणलें असतें, तर लक्षावधि रुपयांचा खरोखरच पाऊस पाडला असता. ब्राह्मणानें वैद्यकावर पैसे मिळवूं नयेत, अशी शास्त्राज्ञा असल्यामुळें त्यांच्या वडिलांनींही ‘ वकिलीवर चरितार्थ चालवावा आणि वैद्यकाचा उपयोग परोपकारार्थ करावा,’ असें सांगून ठेविलें होतें. ही आज्ञा त्यांनीं अखेरपर्यंत कशी कडकपणानें पाळली, तें प्रसिद्धच आहे. मोठमोठे धनिक हात दाखवावयास येत, व मोठ्या संतोषानेंही त्यांच्याकडून लाभ करून घेऊन गोरगरिबांस फुकट उपयोगी पडणें हेंहि त्यांस साधलें असतें. परंतु कोणाजवळून कांहीं घेण्याची गोष्ट तर असोच, ज्याला औषध सुरू असे त्याच्याजवळून कांहीं घेणे तर असोच, पण त्याच्यायेथें नुसता पाण्याचा घोंट देखील ते घेत नसत. इतकेंच तर काय परंतु एकादें साधें फळ, अथवा एकादें केळ जरी कोणीं श्रीमहाराजांस नैवेद्य दाखवावयाच्या निमित्तानें आणलें तर त्याचा नैवेद्य देखील आपल्या घरीं न दाखवितां परभारें श्रीओंकारेश्वरावर तें वाटावयास सांगत.

असल्या कडक अपरिग्रहानें दिपून जाऊन, सहसा कोणी तसली गोष्ट काढीतही नसे. परंतु पूर्वी त्यांना पैसा घ्यावयास लावावा, असे पुष्कळ प्रयत्न लोकांनीं केले. सरदार बाळासाहेब नातु यांच्या मनांत एकदां असें आलें कीं कोणीकडून तरी अण्णासाहेब यांस मोठी प्राप्ति करून द्यावी, व त्याप्रमाणें त्यांनीं तशा तऱ्हेचा एक घाट घातला- श्री० जमनाबाईसाहेब गायकवाड यांची कन्या ही त्याच वेळेला अतिशय आजारी होती. जमनाबाईसाहेब तेव्हां पुण्यासच राहत असत. व त्यांनीं बाळासाहेबांपाशीं आग्रह धरला कीं कसेंही करून अण्णासाहेब यांचें औषध मुलीस देववावें, आणि बाळासाहेब यांच्याही मनांत, हें

संधान जुळलें तर अण्णासाहेब यांचाही फायदा करून द्यावा, असें होतें त्याप्रमाणें हो ना करितां करितां अण्णासाहेब यांनीं जावयाचें कबूल केलें. औषधाचे निमित्तानें तेथें गेल्यावर कांहीं तरी करून जन्नाबाईसाहेब यांचेकडून त्यांना गळ घालवावी, असा बेत होता. अण्णासाहेब यांनीं जावयाचें कबूल केलें, व त्याप्रमाणें पोषाखही केला. परंतु तितक्यांतच काय वास आला कोण जाणे, त्यांनीं संतापानें बाळासाहेबांस "मला बाटवूं पाहतां काय?" असें म्हणून आंगरखा काढून ठेविला, व त्यानंतर इतर लोकांनीं वाटेल तेवढा आग्रह केला, आणि वशिले लावले तरीही जन्नाबाईसाहेब यांचेकडे कधीं ते गेले नाहींत.

परिग्रह तर असोच, पण उलट पदरचें खर्चूनच औषध देण्याची पाळी येत असे. जी गोष्ट पैशासंबंधीं, तीच गोष्ट मान स्तुति, वगैरे संबंधाची होती. कोणी एकादा उगीच स्तुति करूं लागला, अथवा आपला गौरव करूं लागला, तर त्याला अशाच कांहीं रीतीनें तटकन् तोडून टाकण्याची त्यांची संवय होती. एकदां एक डॉक्टर हे कुरुंदवाडकर कीं जमखिंडीकर कोणातरी संस्थानिकाला घेऊन यांचेकडे आले होते. त्यांच्या वडिलांचा आणि यांचा चांगलाच परिचय होता. ती मंडळी आल्याबरोबर संस्थानी थाटाचा नमस्कार चमत्कार करून त्यांनीं अण्णासाहेब यांची थोरवी गाण्यास प्रारंभ केला. त्यावेळचें यांचें वर्तन लक्षांत घेण्याजोगतें आहे. अगदींच तिऱ्हाईतपणानें नमस्कार घेऊन अण्णासाहेब यांनीं तक्रार समजून घेतली, व डॉ. साहेबांच्या गळ्यांतच तें घोंगडें घालून दिलें. मंडळी उठून गेल्यावर त्यांनीं सांगितलें—"कोणच्याही गोष्टींत तटका तोडण्याची ताकद पाहिजे. जर मीं या वेळेला उगीच थोडें जास्त बोलतों, तर हे अधिकच माझ्यामागें लागले असते." परंतु याच्या उलट एकादा अत्यंत गरीब इसम औषधाकरितां आला, तर त्याच्याशीं मात्र तीन तीन तास बोलत बसत. 'आपण अण्णासाहेबांकडे गेलों व त्यांनीं आपल्याकडे नीट लक्ष दिलें नाहीं,' अशी पुष्कळांची तक्रार ऐकूं येते. त्याचें कारणही हेंच आहे.

प्रख्यात शूद्र साधु गुलाबराव माधानकर यांचीही अशीच गोष्ट आहे. गुलाबराव यांची विद्वत्ता प्रसिद्धच आहे. शूद्र जाति, जवळजवळ जन्मांधत्व, स्वधर्माचा व संस्कृतीचा कट्टा अभिमान इत्यादि गोष्टींमुळें त्यांच्या ठिकाणीं वादविवादाची

अतिशय हौस असे. व प्रक्रीडा करणाऱ्या दिग्गजाप्रमाणें जेथें हवें तेथें धडक देण्यास त्यांचें डोकें सळसळत असे; व थोड्याबहुत प्रमाणानें निर्वीरमुर्वीतलम्, असें त्यांना वाटूं लागतांच अण्णासाहेब यांच्यासारख्या वृद्ध पितामहाशीं टक्कर घेण्याची त्यांना इच्छा होणें साहजिक होतें. व त्याप्रमाणें मोठ्या हौसेनें ते अण्णासाहेब यांच्याकडे गेलेही. त्या दिवशीं हात पाहण्याचा वार नसल्यामुळें अण्णासाहेब यांस खालीं येण्यास फार उशीर लागला, व यांची वर्दीही वर न पोहोंचल्यामुळें दीड दोन तास खालीं बाकावरच बसून रहावें लागलें. पुढें अण्णासाहेब खालीं आल्यावरही त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें उभ्याउभ्याच त्यांनीं यांची चौकशी केली, व त्यामुळें गुलाबरावांनाही पुष्कळ वेळ उभेंच रहावें लागलें. परंतु अण्णासाहेब यांच्या तें लक्षांतही येणें शक्य नव्हतें. कारण आलेल्या माणसास मुद्दाम बसवून त्यांच्याशीं गोष्टी करण्याइतका शिष्टाचार त्यांच्या कधीं ध्यानांत रहात नसे. व सहज तास दोन तास उभें राहणें, म्हणजे कांहीं विशेष गोष्ट नव्हती. यांची हकीकत कळल्यावरही प्रत्यक्ष त्यांच्याशीं यांचें असें कांहीं काम नसल्यामुळें ‘ ठीक ठीक ’ असें म्हणूनच यांना निरोप दिला. अण्णासाहेब कांहीं तरी बोलतील, व त्यावर शंका घेऊन आपण काहींतरी बोलूं ही त्यांच्या मनांतील हौस तशीच राहून गेली. उमरावतीस परत आल्यावर वै० भाऊसाहेब असनारे यांच्याशीं बोलतांना त्यांनीं अशी तक्रार केली कीं, ‘ असे कसे तुमचे अण्णासाहेब. ’ दारांतच उभ्याउभ्या आमची भेट घेतली, आणि धड दोन शब्द देखील बोलले नाहींत. ’ अशीच त्यांच्यावर पुष्कळ मंडळी नाराज होत असे. हेच गुलाबराव पुढें अण्णासाहेब यांचेकडे आले, व त्या वेळेला अण्णासाहेबही त्यांच्याशीं वेगळ्या रीतीनें वागले, ती सारी हकीगत पुढें स्वतंत्र द्यावयाचीच आहे. असो.

असें त्यांचें वर्णन करण्याजोगते अनेक गुण आहेत, परंतु त्याला स्थल काल विपुल पाहिजे, व वर्णन करणाऱ्याची रसवंतीही तशीच पाहिजे. या त्रोटक चरित्रांत अगदींच ठळक गोष्टींचे त्रोटकपणानेंच उल्लेख करण्यापलीकडे जास्त काय साधावयाचें आहे ? खऱ्या फुलाचा सुगंध आणि सौंदर्य कागदी फुलांत कोठून येणार ? त्यांतून हें तर बोलूनचालून भेंडाचें फूल. कागदी फुलातील मार्दव देखील यांत येणें शक्य नाहीं. तरीपण त्याच्यायोगानें खऱ्या गुलाबाची कल्पना येते, आणि मधुराकृति सुंदरींचें सौंदर्यही खुलून दिसतें.

तेवढेंच कार्य निसर्गरमणीय महाराष्ट्र शारदेसंबंधीं यानें केलें, म्हणजे झालें; असो.

अण्णासाहेब यांच्या सहवासांतील कोणत्याही व्यक्तीला आम्हीं सांगितल्याप्रमाणेंच साधारण अनुभव आला असता, मग ती कशाही स्वभावगुणधर्माची, व संस्कारांची असो, याचें दिग्दर्शन म्हणून एक उदाहरण येथें मुद्दाम द्यावेंसें वाटतें. संदेशकर्ते रा. अ. ब. कोल्हटकर हे प्रसिद्धच आहेत. अशा गृहस्थानेंही अण्णासाहेब यांच्याविषयीं काय लिहिलेलें आहे, हें पाहिलें म्हणजे एकाद्या देवभोळ्या खुळ्या माणसाच्या दृष्टींतून पहा, अथवा अगदीं पूर्ण अर्वाचीन दृष्टींतून पहा, अण्णासाहेब यांचें चारित्र्य धवलगिरीसारख्या नजर न ठरणाऱ्या उंच उंच शिखरांनीं सारखें झळकत असलेलें दिसतें, ही गोष्ट उघड होईल. म्हणून आपल्या एका कादंबरींत रा. अच्युतराव यांनीं आपाततः केलेलें अण्णासाहेब यांचें वर्णन थोडें विस्तृत असलें तरी, जसेंच्या तसें देऊन हा भाग आटोपूं. इतकें सुरस आणि सत्यपूर्ण वर्णन क्वचितच आढळेल. या उताऱ्याबद्दल आम्हीं रा. अच्युतराव यांचे फार आभारी आहोंत.

"पुण्यांत बरे वाईट अनेक लोक आजपर्यंत झाले—पण आण्णासाहेब पटवर्धनांइतका थोर पुरुष आजपर्यंत पुण्यांत झाला असेल कीं नाहीं ह्याविषयीं संशयच आहे! किंबहुना रामशास्त्र्यांनंतर इतक्या वर्षांत या वर्तनाचा पुण्यांत ह्याच पुरुष निर्माण झाला असेल! त्यांचेजवळ सर्वांना रिघाव होता. ते जुन्या मतांचे व कडक सोंवळ्याओंवळ्याचे होते, तरी पण त्यांचे घरीं ब्राह्मणापासून अस्पृश्यांपर्यंत आणि पारशांपासून ख्रिश्चनांपर्यंत सर्वजण येत असत! त्यांचा स्पर्शास्पर्श—त्यांचा विटाळचंडाळ—त्यांचा नेमधर्म हें सर्व त्यांचे खाजगी पूजागृहांत! ते आपल्या दिवाणखान्यांत बसले म्हणजे तिथें सगळे सारखे! मग तिथें त्यांचा गोंडस नातू असो, अथवा एखादें महाराचें पोर असो!

त्यांचेसारखा पवित्र वर्तनाचा पुरुष तर मिळणारच नाहीं! ते एल्. एल्. बी. व एल्. एम्. अ‍ॅण्ड एस्. अशा दोन्ही परीक्षांपर्यंत शिकलेले होते: पण आपल्या एल्. एम्. अ‍ॅण्ड एस् परीक्षेचें ज्ञान त्यांनीं पैसे मिळविण्याचे कामीं खर्च कधींही केलें नाहीं! एल्. एल्. बी. परीक्षेवर—वकिलीचें ज्ञानावर त्यांनीं हजारों रुपये मिळविले—पण एल्. एम्. अ‍ॅण्ड एस्. च्या डॉक्टरी ज्ञानावर त्यांनीं कपर्दिकही मिळविली नाहीं! तें ज्ञान त्यांनीं परोपकाराकरितां राखून ठेवलेलें होतें.

कायद्याचें ज्ञान द्रव्यार्जनाकरितां व डॉक्टरी ज्ञान लोकोपकाराकरितां अशी आपल्या ज्ञानाची बरोबर वांटणी करून संसार व परमार्थ जोडीनें करणारा त्यांचेसारखा विरळाच असेल ! आणि म्हणून केव्हांहि गेलें तरी व्याधिग्रस्त लोकांची त्यांचे घरीं गर्दी असे—ह्या व्याधिग्रस्तांत कांहीं लक्षाधिपतिही जात ! इतर डॉक्टर वैद्यांचें औषध थकलें म्हणजे अखेरीस अण्णासाहेब पटवर्धनांकडे जाण्याची त्यांना पाळी येत असे. पण त्यांचेकडे कोणी लक्षाधीश गेला म्हणून त्याचे द्रव्यावर त्यांनीं कधींही लक्ष्य ठेवलें नाहीं. एखादा गरीब मनुष्य ज्याप्रमाणें त्यांचेकडून फुकट औषध योजना घेऊन जाई त्याप्रमाणें लक्षाधीशासही त्यांचेकडून फुकट चिकित्साच करून घ्यावी लागत असे. कोणीं त्यांना कोणत्याही स्वरूपानें पैसे देण्याचा प्रयत्न केल्यास ते अतिशय रागावत व त्या देणगीचा इनकार करीत !

कांचनाला इतक्या निरिच्छपणानें धुत्कारणारा सत्पुरुष कामिनीचे बाबतीत किती निष्पाप असेल हें सांगावयास नकोच ! खरोखर संसारी असून—विवाहित व पुत्रकन्यावान् असून —स्वतःचे पैशानें संसाराचा गाडा चालवीत—असून स्त्रियांचे कामांत इतका निष्पाप पुरुष कधीं झालाच नसेल ! वाटेल त्या सुंदर स्त्रीनें त्यांचेजवळ जावें आणि आपल्या वाटेल त्या व्याधीची हकीकत त्यांना सांगावी ! आण्णासाहेबांचे मनांत तिचेविषयीं पापवासना कधींही उत्पन्न व्हावयाची नाहीं ! तिला असें वाटावें कीं आपले बापाजवळच आपण बोलत आहोंत. अहो—-एखादे वेळीं बापाजवळ बोलायलादेखील स्त्रियांना लाजच वाटत असेल—-पण अण्णासाहेबांचें वर्तन इतकें निर्मळ असे कीं तरुण स्त्रियांना आपल्या आईपेक्षां देखील त्यांचेजवळ मन मोकळें करावेंसें वाटे ! त्यांना “ महर्षि ” ही पदवी खरोखरच शोभत होती ! पापी लोकांनीं त्यांच्या पायांचें तीर्थ घेण्याइतकी त्यांची योग्यता होती !

* * *

अण्णासाहेबांचें सर्व आयुष्यच सामान्य पद्धतीहून निराळें होतें. कनक आणि कान्ता ह्याचे बाबतींत इतका निर्मळ पुरुष पुण्यांत अनेक वर्षांत झाला नसेल हें आम्हीं पूर्वीं सांगितलेंच आहे ! किंबहुना आम्हीं पूर्वीं म्हटल्याप्रमाणें रामशास्त्र्यांपासून तों आधुनिक कालापर्यंत इतका निःस्पृह पुरुष पुण्यांत झालाच नाहीं असें म्हणण्याला कांहीं हरकत नाहीं.

अण्णासाहेबांचें आयुष्य तीन गोष्टींत इतर लोकांचे आयुष्याहून निराळें होतें. पाहिली गोष्ट म्हणजे त्यांना जेवण नव्हतें. सकाळीं सात वाजल्यापासून त्यांचेकडे माणसें यायला लागत आणि तीं बहुशः रात्रीं ९।१० वाजेपर्यंत असत. ह्यांच्या काळांत ते माणसांनी अगदीं वेढलेले असत. त्यांचेकडे येणारीं माणसें म्हणजे कांहीं कायद्याचे कामाकरितां, बरींचशीं औषधाचे सल्ल्याकरितां, कांहीं ते " साधु " म्हणून त्यांचे दर्शनाकरितां व बाकीचीं सार्वजनिक कामाकरितां असत! ह्या सार्वजनिक कामांतच राजकारण, म्युनिसिपालिटी वगैरे विषय येत. कै. महादेव गोविंद रानड्यांपासून तों शंकरराव लवट्यांपर्यंत सर्व माणसें त्यांना मानीत व त्यांचेकडे येत! ना. गोखले, लो. टिळक हेही त्यांचेकडे जाऊन त्यांची सल्ला घेत. पण अण्णासाहेबांचें वर्तन सर्वांशीं सारखें असे. त्याच माडीवर व त्याच सत्रंजीवर त्यांचे सर्व व्यवहार चालत. मग ते रानडे असोत, टिळक असोत गोखले असोत किंवा पोटदुखीनें विव्हळणारा एखादा गरीब मनुष्य असो.

अण्णासाहेबांच्या स्वभावांत " नाहीं " हा शब्द नव्हता. कोणी केव्हांही आले आणि कितीही वेळ बसले तरी ते त्यास 'नको' असें कधीं म्हणत नसत. त्यामुळें एकएक मनुष्य तासासाठीं म्हणून जरी आला तरी अण्णासाहेबांना एकसारखी तांगड पडे! एखादे वेळीं ही तांगड इतकी होई कीं दोन दोन तीन तीन वाजेपर्यंत त्यांना जागेवरून उठतां येत नसे. ह्यापुढें त्यांचें स्नान व पूजा! त्यांसही भरपूर वेळ देऊन पुन्हा माडीवरील दिवाणखान्यांत ते हजर होत व तेथून रात्रीं अगदीं शेंवटचा मनुष्य निघून गेला म्हणजे पुन्हां स्नानाला व रात्रीच्या पूजेला उठत!

ह्या कार्यक्रमांत जेवायला वेळ मुळींच नव्हता हें वाचकांचे लक्ष्यांत आलेंच असेल! रात्रीं ९।१० वाजतां लोकांचे गर्दीतून ते मोकळे झाले म्हणजे पुढें स्नान करून ते पोथी–पूजा वगैरे करीत आणि मग डोक्यावर पागोटें ठेवून व बाहेर जायचा पोषाख करून देवदर्शनाला निघत! हें त्यांचें देवदर्शन पहांटे ५ वाजेपर्यंत चाले. पहांटे पांच वाजले म्हणजे ते घरीं परत फिरत! व त्यांचेकरितां एक गादी पसरून ठेवलेली असे त्या गादीवर विश्रांतीकरितां जात! पण ह्यांत निद्रेचा भाग कितीसा असे हा प्रश्नच आहे. कोणी म्हणत

कीं ते एक तासभर निद्रा घेत व कोणी म्हणत कीं ते योगासन घालून एकांतांत बसत ! आतां ह्यापैकीं खरें कोणतें हें त्या त्यांच्या जिवाला माहीत ! तें माहीत होणें शक्य नाहीं ! पण एवढी गोष्ट खरी कीं पुन्हा सकाळीं सात वाजल्यापासून त्यांचा जो कार्यक्रम सुरू होत असे तो अगदीं थेट पुन्हा पहांटे पांच वाजेपर्यन्त चाले ! ह्यांत कोणतीही गुप्तता किंवा रहस्य नव्हतें आणि कोणत्याही मनुष्यास तें सहज पाहून आपली खात्री करून घेतां येण्याजोगी होती.

अशा ह्या कार्यक्रमांत जेवायला जागा कुठें आहे ? घरांत त्यांची पत्नी असे, भाऊ असे, मुलगा असे—पाहुणे तर तोडून काढले तरी तुटायचे नाहींत इतके येत ! पण अण्णासाहेबांची न् त्यांची पंगत कधींहि होत नसे. ती होणें शक्यच नव्हतें. आदरसत्कारांत अण्णासाहेबांइतका दिलदार व उदार मनुष्य क्वचित्—पण तें स्वतः जर मुळींच जेवीत नव्हते तर पाहुण्यांबरोबर ते जेवायला येणार कोठून ? त्यांचा भाऊ व मुलगा यांना त्यांचेशिवायच जेवायला बसावें लागे. व त्यांची पत्नी—ती फार साध्वी होती व सच्छीलपणानें त्यांच्या पवित्र आयुष्यांत आणखी पवित्रता घालीत असे—पण " जेवायला उठा " असें म्हणण्याची तिची प्राज्ञा नव्हती. ती रोज कांहीं दशमी व दूध त्यांचे नेमलेल्या ठिकाणीं झांकून ठेवी—पण तेवढें देखील ते दोन दोन दिवसांत घेत नसत. दोन तीन दिवसांनीं लहर लागली म्हणजे केव्हां तरी तेवढ्या अन्नाचा स्वीकार करीत ! एवढाच काय तो अण्णासाहेबांचा आहार ! एवढ्या आहारावर त्यांनीं आपल्या आयुष्याचीं निदान तीस वर्षें घालविलीं शेवटीं शेवटीं तर आहार याहीपेक्षां संपुष्टांत आणला !

सर्वांच्या आयुष्याहून अण्णासाहेबांचें आयुष्य जें भिन्न होतें त्यांतली पहिली गोष्ट म्हणजे ही आहाराची होय. केवळ दुग्धपानावर निर्वाह करणाऱ्या—४० दिवस उपास पाळणाऱ्या—नुसतें गोमूत्र प्राशन करून पुरश्चरण करणाऱ्या—अनेक बोवाजींच्या गोष्टी आपण ऐकतों. त्या खऱ्या असोत किंवा खोट्या असोत ! आपल्याला इथें त्यांच्याशीं कांहीं करावयाचें नाहीं. पण अण्णासाहेबांचें आयुष्य खुलें होतें—उघडें होतें—कुणालाही पाहतां येण्याजोगें होतें. तें पाहून त्यांच्या निराशित्वाबद्दल खात्री करून घ्यायला कोणालाही अडचण नव्हती.

आणि ज्याप्रमाणें त्यांच्या रोजच्या क्रमांत जेवणाला जागा नव्हती. त्याप्रमाणें निद्रेलाहि नव्हती. ते जर निजत असतील तर पहांटे ५ वाजायचे पुढें व तेहि ७ वाजेपर्यंतच. पण एवढीशी झोंप म्हणजे जवळ जवळ विनिद्र स्थितिच ! ह्या विनिद्र स्थितींत त्यांनीं शेवटची तीस वर्षें घालविलीं ! तीस वर्षेंपर्यन्त निरन्न आणि विनिद्र राहणें म्हणजे लहानसहान गोष्ट नव्हे !

निद्रा व आहार ह्यांचा संबंध नसला म्हणजे विषयांना आयताच फांटा मिळतो ! सकाळीं ७ वाजल्यापासून तों पहांटे ५ वाजेपर्यंत जनता व जनार्दन ह्यांचे सेवेंत जो एकसारखा वेळ घालवीत असे त्याचे आयुष्यांत विषयांना अवसर मिळणार कोठून ? अशा पुरुषाचे पुढें विषयांची होळीच व्हायची ! अण्णासाहेबांस एक पुत्र आणि एक कन्या अशी अपत्यप्राप्ति झाल्यावर विषयसंसर्ग त्यांनीं अजीबात सोडून दिला—आणि तो एकदां जो त्यांनी सोडला तो अखेरपर्यंत ! पुन्हा आपलें मन त्यांनीं कधींहि विषयचंचल होऊं दिलें नाहीं. आणि तरी कोणतीही भलतीं ढोंगें न माजवितां व दांभिक संन्यास न घेतां ते अखेरपर्यंत संसारांतच राहिले. शेंवटच्या १५ वर्षांत त्यांच्या पत्नीनें स्वर्गवास केला ! तरी पण अचल वृत्तीनें, समतोल अन्तःकरणानें, प्रेमपूर्वक परोपकारानें व सर्वोज्ज्वल विश्वमयतेनें त्यांनीं प्रायोपवेशनांत आपली आयुष्ययात्रा संपविली ! त्यांनीं इहलोकांतून प्रयाण केलें त्या वेळीं तें त्यांचें मरण होतें कीं शयन होतें हेंहि समजलें नाहीं ! पण श्रेष्ठ जीवांचें असेंच असतें ! त्यांस मरण आणि शयन हीं सारखींच असतात ! किंबहुना विश्वोपकारांत श्रान्त झाल्यामुळें विश्रान्तीकरितांच ते मृत्युरूपीं मोठें शयन पत्करीत असतात !

* * * *

आधुनिक कालांत असा कोण मनुष्य झाला हें दाखवा ! डॉक्टरीमध्यें एक पैसाही न घेणारा—शेंकडों जीवांवर रोज उपकार करणारा—कामिनी आणि कांचन हीं विषासारखीं मानणारा-एकीकडे एल्. एल्. बी. एकीकडे एल्. एम्. ॲण्ड एस्. अशा दोन्ही अभ्यासांत वरचढपणा मिळविणारा—एक बिल्व कुटुंबभरणार्थ ठेवून एक बिल्व जनतेच्या सेवेकडे समग्र अर्पण करणारा—साधुत्वाचे सगळे गुण असून कधींही ‘ साधु ’ म्हणून न मिरविणारा—“ साधु ” त्वावर कधीं एक पैही कमावण्याची इच्छा न धरणारा—लोकोपयोगार्थ व परोपकारार्थ आपला पैसा उदार हस्तानें खर्चणारा—अतीतअभ्यागतांचें व पैपाहु-

ण्यांचें उत्तम कुटुंबीयांप्रमाणें स्वागत करणारा–ज्ञानाचा भोक्ता, राजकारणाचा अध्येता, नागरिकत्वांतील कर्ता, दीनजनांचा त्राता—निराशी, अनिद्र, निर्विषय व निरपेक्ष–संसारांत विरागी व वैराग्यानें संसार करणारा—असा पुण्यात्मा पुन्हा कधीं होईल का बोला ! खरोखर, अण्णासाहेबांच्या पवित्र जीवनाची आठवण झाली म्हणजे मन कृतार्थ होतें, सद्भावना उसळतात, शरीर पुलकित होतें, हृदय आनंदानें भरून जातें व पुणें शहराची पुण्याई जर कोणती असेल तर तो हाच सत्पुरुष असें वाटायला लागतें. ”

खरोखर ह्या पुरुषानें जर स्वतःला साधु म्हणवून घेतलें असतें--शिष्य जवळ गोळा केले असते—मठ काढला असता --रामराम, रामराम, रामराम, असें म्हणून लोकांचें लक्ष्य वेधलें असतें--गबाळी पोषाख केला असता--डोक्याला भगवें गुण्डाळलें असतें--कफनी घातली असती--मंत्रोपदेश दिले असते–हारतुरे घेतले असते–पाद्योपचार स्वीकारले असते–खडावा वाजविल्या असत्या–चिपळ्या झिजविल्या असत्या–फोटो काढविले असते–चरित्रें लिहविलीं असतीं - स्तोत्रें गावविलीं असतीं--मंदिरें बांधविलीं असतीं--तर आज ह्या पुरुषाचा केवढा जयजयकार झाला असता ! निदान महाराष्ट्रांत जन्म न घेतां जर बंगाल, मद्रास किंवा पंजाब येथें त्यानें जन्म घेतला असता तर आज त्याचें केवढें कौतुक झालें असतें ! निदान हा थिऑसाफिस्ट असता तर आज त्याचें केवढें प्रस्थ माजलें असतें ! पण आत्मप्रौढीचा त्यास पूर्ण कंटाळा–आत्मस्तुतीचा पूर्ण तिटकारा–आत्मगौरवाचा पूर्ण–पूर्ण–किळस–त्यामुळें त्याचेवर मोर्चेलें उडविली गेलीं नाहींत–त्याची प्रतिष्ठा वाढली नाहीं —त्याचीं मंदिरें बांधलीं गेलीं नाहींत--किंवा त्याचीं चरित्रेंही लिहिलीं गेलीं नाहींत !

* * * *

पण खरोखर अण्णासाहेब पटवर्धनांचें चारित्र्य इतकें पवित्र होतें कीं तें पाहून रामशास्त्र्यांच्या निःस्पृहतेची आठवण होई—एकनाथाच्या विरक्त संसाराची आठवण होई—तुकारामाच्या कामिनीकनकाविषयींची निर्लोभिता डोळ्यांपुढें येई—कबीराचा परोपकारीपणा आढळे—नामदेवाची प्रेमप्रवृत्ती दिसावयाला लागे ! रामकृष्ण परमहंसांची शान्तता—विवेकानंदांची बुद्धिमत्ता व श्रीरामतीर्थांची तेजस्विता अण्णासाहेबांचे चरित्रांत बघायला सांपडे! अण्णा–

साहेब वारल्यानन्तर मराठी भाषेंतच त्यांचें चरित्र व्हायला पाहिजे होतें एवढेंच नव्हे तर इंग्रजी, बंगाली, कानडी, हिन्दी ह्या सगळ्या भाषांत त्यांचें चरित्र व्हायला पाहिजे होतें. कारण आमची खात्री आहे कीं वंगभूमीनें जसा रामकृष्ण निर्माण केला, किंवा पंजाबनें जसें रामतीर्थासारखें रत्न इहलोकांत आणलें त्या महत्त्वाचें—त्या किंमतीचें—हेंही रत्न होतें. आमची महाराष्ट्रभूमीं अशी वन्ध्या खचित नाहीं कीं जी रामकृष्ण किंवा रामतीर्थासारखीं पुत्ररत्नें प्रसवत नाहीं ! हें रत्न त्याच काळचें होतें–त्याच वृत्तीचें होतें–त्याच वैराग्याचें होतें–त्याच ज्ञानाचें होतें—त्याच पारमार्थिक योग्यतेचें होतें–किंबहुना भीष्माचार्याप्रमाणें प्रायोपवेशनांत आपल्या इहलोकची यात्रा संपविणारा महापुरुष अनेक शतकांत हा पहिलाच ! दुसरा कोणी असेल तर सांगा व पुण्यनगरीच्या अपूर्व पुरुषरत्नांत ह्याचा "क्रमांक" त्यांचे वरती लागतो कीं खालती लागतो ह्याचा विचार करा.

* * * *

पुण्यशील पुरुषांच्या सद्वृत्तीनीं, स्वजनसेवेनें, पुण्येच्छांनीं, पुण्यांशांनीं, परिपूरित, मंडित--उज्ज्वलित--गौरवित अशा या शहराला अण्णासाहेब पटवर्धनांच्या पुण्यस्मृतीचा वियोग कसा पत्करेल ? त्यांच्या विश्वप्रेमाचा--सरलतेचा--लीनतेचा--समतेचा व पवित्रतेचा एवढा झेंडा या पुण्यनगरीवर अखंड फडकत राहील कीं पुढील पिढ्यांना ह्यांचेवरून मार्गोपदेश होईल आणि ते विस्मित पूज्यबुद्धीनें नेहमीं असें म्हणत राहतील कीं हा पहा महाराष्ट्रीय रामकृष्ण परमहंस–हा पहा पुनर्जन्मित याज्ञवल्क्य किंवा एकनाथ !

---

( २४५ पानावरील टीप. )

The particle न or नहि which means no, not, etc is purely Vaidik, and its meaning of negation can be derived from the philosophy of the series and sequence of the Vaidik **Alphabet** alone, and from no other source.

It has been also said that the labial letter म has many functions. Being the last letter of the upper or nasal arc,-along which the four nasals ङ्, ञ्, ण्, न् suc-

cessively pass and are sounded म is the *terminus* both of the upper or nasal arc and of the lower *arc* and it has the meaning of prohibition, negation, etc. "माकुरु" ( Do not do ) "माचिरं" ( without delay ) etc.

This negative &c. meaning is derived from the fact that the position of the letter म of the series of the Alphabet is terminal and that no other letter-sound succeeds the sound of "म". Likewise "न" being the nasal immediately preceeding the nasal "म", न becomes naturally the end or terminus both of the upper or nasal *arc* and of the lower or mouth *arc* in cases of persons who from any cause whatever cannot close the two lips, or have lost, especially the upper lip, or who have their lips reverted or have the front teeth-row protruding beyound the lips and the dental "न" therefore, naturally takes the place of the labial "म" and accordingly, "न" has become the particle denoting negation, privation etc. in the case of all persons whether Vaidik or non-Vaidik.

* * * *

The whole series of **Simple** letters of the Vaidik or Sanskrit Alphabet ( or अल् ) as divided for the practical purposes of vocalisation begins with the *guteral* vowel-letter 'अ', and ends with the labial nasal 'म'. Hence the word अम् is rightly deemed to symbolically represent all the sounds of the whole series of the Vaidik or Sanskrit *simple* Alphabet, and has received the meaning-to speak, to utter, to vocalize &c. any Vaidik or Sanskrit letter word &c.

This, therefore, proves that the whole series of the letters of the Vaidik Alphabet as contained in the **fourteen** transcendental Sutras ( Wilson's gr. 1841 p.6 ).

the *Hebrew* name *Aleph*, and the Greek name *Alpha*; and the pronoun अहम् have been of Vaidik origin and have been the products of the Vaidik intellect alone. The dual and plural forms of अहम् namely आवाम् and वयम् in the first or nominative case are formed by permutation and combination so to say, of the Vaidik series of vowels alone and not from any other letters, and hence the VIII Chapters of the Vaidik or Sanskrit *practical grammar* as composed by the Sage or *Rishi* Panini open with the सूत्र ( sutra-aphorism or syllabus ) वृद्धिरादैच् ( that is आ, ऐ, औ आल् & आर् are वृद्धि or augment letters ) and the second सूत्र is अदेंगुणः ( that is the letters अ, ए, ओ, अल् and अर् are गुण amalgam letters ) and the third *Sutra* सूत्र is 'इको गुण वृद्धिः' ets. The rules contained in the said Aphorisms have been really based on and derived from the theory of the formation of dual and plural forms of pronoun अहम्. It may be also noted here that the Virddhi वृद्धि and the Gune गुण etc. *Sutras* are used *not only* initiatory of auspiciousness but also for the purpose of indicating the elements of the Science of *numbers*, the Vaidik Social Science of Joint Corporation, Community, Association, Active Universal pervasion etc. Here a question may naturally arise as to why Panini's Grammar does not refer to this theory of the formation of the words अहम्, आवाम्, &c.

* * * *

The **Principles** of *Grammar* and Etymology of the Vaidik or Sanskrit words have been *deeply rooted* in the subject matter of the T. S. and that the **Vaidik Language**, and the **Vaiidk People** being naturally co-eval, must be *considered* as being both of *immense*

antiquity, Panini's Grammar as well as the Grammars of the **Rishis** who had preceded him could, not therefore, properly and legitimately discuss the principles and Etymology of the Vaidik or Sanskrit language.

Moreover, Panini's Grammar being in the form of a *syllabus* of Sanskrit grammar was evidently intended to assist oral instruction & the memory of the student. This is one of the main reasons why पाणिनि did not refer to the theory of the formation of the words such as अहम्, त्वम्; सः, अहः, अच्, अस्, or to that of the forms of the declination and conjugation some of which have been already mentioned above and will also be referred to here in this sequal. In his grammatical scheme Panini has relegated the forms of declination of अहम्, त्वम् &c. to the seven chapter of his grammar by way of special rules but as already said above he inaugarated his grand scientific grammatical scheme with tha Sutras "वृद्धिरादैच्" &c. under which the forms were really formed and which practically showed that the grammar of the Vedic Language has been founded on the T. S. and the fourteen सूत्रs derived from it. The forms in the singular number of the above cases of the personal pronominal word अहम् have been derived **from its final letter** "म" & the duals and plurals of those cases have been derived from आवाम् and अस्मान्. It is not however necessary here to trace the course of changes which end in producing forms आवाम् and वयम् but it will be useful to refer to **the fact** that the optional forms नौ and नः were originally intended to apply to the Vedic and non-Vedic people mixed or assembled together or to the Non-vedic people alone, without discussing here the

valid principales which underlie those changes and the resulting forms.

*    *    *    *

But as the Vedic ऋषि's and practical philosophers travelled all over the world in various directions for the **propagation** of the **transcendental science** and their **original civilisation**, the languages of the various Non-vedic races came to be united and mixed with the elements of the Vedic Language in various ways and degrees according to the rules mentioned herein above.

*    *    *    *

Now in connection with this subject the only matter that requires some explanation is the appearance of the letter "न" in such pronominal forms as नौ, अस्मान्, नः, युष्मान्. Reasons as to how the dental nasal letter न् came to acquire the negative privative &c. qualities of the labial nasal letter म् have been already mentioned above. Similar reasons or the said reasons in a modified form account for the appearance of the nasal letter न् in the said pronominal forms.

*    *    *    *

Moreover the *mixture or coalition* of the Vedic and Non-vedic races has undoubtedly caused the introduction of Vedic vowel sounds and consonants into the Non-vdic languages and making allowance for the number of vowel letters and consonants so introduced, the Vedic people originally used the word अन् instead of अम् to *indicate* the act of breathing or speaking on the part of the Non-vedic races, and fixed the letter न् as the *distinguishing sign* of the Non-vedic individual.

That is an individual of the Non-vedic race who

on account of the peculiar formation of the mouth &c. was not able to pronounce the labial nasal म् and as he was not able to pronounce the whole series of the vedic alphabet from अ to ह, and as the pronominal forms of the cases other than the nominative case of the personal pronominal word अहम् were obtained from the terminal letter of the word अहम् and were made to preserve and retain that letter to indicate that such forms were the derivatives of the word अहम the Vedic people fix the letter न् in the place of the letter म् to indicate the Non-vedic individual, &c., accordingly, the verb root अन् instead of अम् was added to the letter न् by the Vedic people, and thus they produced the word "Nan" (न+अग्) to be used for अहम् in the case of the Non-vedic races who consequently came to use that word as the form of the nominative case of the first personal pronoun, and the forms of the other cases, of the personal pronouns were obtained from the letter न् instead of म्. Thus in course of time either owing to the coalition of the Vedic and Non-vedic races, or to various other circumstances as the influence of the Vedic teaching declined, especially, beyond the boundaries of India, the forms of the cases of the personal pronominal words or terms formed from the terminal म् and the terminal न् came to be promiscuously mixed or confused.

---

# वैद्यकी.

अण्णासाहेब यांच्या इतर सर्व गोष्टींप्रमाणेंच त्यांची वैद्यकी ही ही लोकांस एक मोठें कोडेंच होतें. त्यांचें तें निमित्ताला हात पाहणें, वेळेस शंभर शंभर माणसांचे हात आधीं भराभर पाहून, मग क्रमानें औषधें सांगत सुटणें, आणि रोगाचें निदान व त्याची उत्पत्ति यांविषयींच्या विलक्षण वाटणाऱ्या उपपत्त्या, हें सर्वच कांहीं विलक्षण होतें. बरें, चिकित्सा म्हणावी तर तेंही असलेंच विलक्षण खटलें होतें. मोठा धन्वंतरी म्हणून आतिशय उत्कंठेनें त्यांचेकडे जावें, व कांहीं तरी मोठें औषध ते आपणास देतील, अशी आशा करावी, तों कोठें सैंधव आणि ओंवा, अथवा मिरपूड आणि जिरेंपूड असलें कांहीं तरी दीड-दमडीचें औषध त्यांनीं घेण्यास सांगावें. अण्णासाहेब यांच्यासारखा सव्य-साची भिषग्वर आणि त्याच्यापाशीं ही असली वैदूगिरी! आणि ती औषध-योजना तरी काय? आगगाडीच्या डब्यांप्रमाणें एंजिन आणि ब्रेकसारखें गुळ-वेल आणि कडूनिंबाचीं पानें प्रत्येक योजनेच्या आदिअंतीं असावयाचींच! व मधें मात्र एरंडमूळ, पांढऱ्या वसूची मुळी वगैरे डबे जरूरीप्रमाणें कमजास्त असावयाचे. त्यांतल्या त्यांतही सुंठ, धमासा इत्यादि ठराविक औषधें, सेकंड-क्लास इंटरसारखीं मध्यंतरीं असलींच पाहिजेत. पांच पन्नास रोगांची चिकित्सा काढून पाहिली तर या असल्या औषधांतून उगीच कुठें दोनचार औषधांचा किरकोळ फरक असावयाचा. याला काय वैद्यकी म्हणावयाचें?

तसेंच तें पथ्य तरी काय कडक! चहा, कॉफी आणि मिसळभजीं यांना चटावलेल्या जिभेला तर तें एक भयंकर दिव्यच होतें. चांगल्या निग्रही माण-साला देखील साधारण मोठ्या रोगांत या सर्व उपाययोजनेनें बरा होणें, म्हणजे, पांडवांच्या अज्ञातवासांतून पार पडण्यापेक्षांही कठीण. त्यामुळें चांगले चांगले विद्वान् लोक देखील "अण्णासाहेब यांच्या योजनेंत औषधपणा काय आहे, त्यांच्या कृपेचीच जास्त किंमत, व तेवढ्याच करितां अण्णासाहेब यांचे-कडे जावें; एरवीं औषधांत कांहीं अर्थ नाहीं," असें म्हणतांना आढळत. कित्येक वेळां असें आढळे कीं, उगीच दोनचार औषधांच्या फरकानें पांच पंचवीस रोग्यांनाही तेंच औषध ते सांगत. त्यामुळें अशीही समजूत झाली होती कीं, औषधें सांगतांना ते भानावरही नसत, आणि नादिष्टपणानें तोच

काढा सर्व रोगावर सांगत, व लोकांच्या श्रद्धेनें अथवा अण्णासाहेबांच्या तपोयुक्त वाणीमुळें कांहीं तरी गुण येई! असले अनेक प्रकारचे विचित्र समज त्यांच्या वैद्यकीसंबंधानें आढळून येत. अण्णासाहेब यांच्या तपश्चर्येसंबंधानें व प्रभाववती वाणीबद्दल कांहींच प्रश्न नाहीं. त्याचप्रमाणें श्रद्धेमुळें औषधांचा प्रभाव होतो, हीही गोष्ट खरी आहे. व त्याप्रमाणें आज त्यांच्या मागेंही त्यांच्या ५।१५ काढ्यांवर सर्व प्रकारची वैद्यकी उत्तम चालवीत असलेले लोक कित्येक ठिकाणीं आढळतात; परंतु त्यांच्या काढ्यांत कांहीं शास्त्रीयता नव्हती, अथवा भरमसाट-पणानें 'यस्य कस्य तरोर्मूलं' असा प्रकार होत असे, हें मात्र खरें नाहीं. या सर्व गैरसमजाचें कारण इतकेंच कीं, खुद्द त्यांच्यासंबंधीं लोकांत पराकाष्ठेचें अज्ञान आहे; म्हणून याविषयीं थोडा विस्तृत विचार करणें भाग पडलें.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, डॉक्टरी अण्णासाहेब यांचे गळ्यांत केवळ अनपेक्षितपणें पडली. परंतु एकदां गळ्यांत पडल्यावर तिच्यांत त्यांनीं यथायोग्य प्रावीण्य मिळविलें. मेडिकल कॉलेजमध्यें असतांनाच डॉक्टरी करण्यास सुरुवात केली होती. त्यांची प्रज्ञा आणि कल्पकता यांच्याविषयीं डॉ. स्मिथ या अध्यापकाचें तर इतकें उत्तम मत होतें कीं, त्याला स्वतःला एकाद्या रोग्याची स्थिति जरा विचार करण्यासारखी वाटली, तर तो अण्णासाहेब यांस बरोबर घेऊन जात असे, व त्यांच्या सल्ल्यानें त्याचें निदान चिकित्साही ठरवी. डॉ. स्मिथ याचा धंदा त्यावेळेस बऱ्याच मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें अण्णासाहेब यांसही कॉलेज वॉर्डमध्यें मिळणाऱ्या तात्पुरत्या अनुभवापेक्षां वैद्यकीचा सर्व तऱ्हेचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थि--दशेंतच घेतां आला. आणि खाजगी रीतीनें त्यांनीं आर्यवैद्यकाचा अभ्यास केला असल्यामुळें दोघांचा तुलनात्मक अनुभव घेण्याची तेव्हांपासूनच त्यांना संधी मिळाली.

आयुर्वेद हा (Emperical) आहे किंवा त्यांत अर्वाचीन दृष्ट्याही पूर्ण शास्त्रीयता आहे, हा प्रश्न सप्रयोग सोडविण्याकरितां दोन्ही पद्धतींचे दवाखाने काढून दोनही पद्धतींचीं मासिकें चालविण्याचा आणि आयुर्वेदाच्या प्रसिद्ध अप्रसिद्ध ग्रंथांचें संशोधन करण्यासाठीं दोन लाखांचा प्रचंड फंड उभारण्याचा त्यांनीं उपक्रम केला होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. डॉ० स्मिथशीं या संबंधानें त्यांचा वाद नेहमींच होत असावा व चांगल्या मोठमोठ्या व केवळ

साधारण अशा अपायांवरही पाश्चात्य पद्धतींत मुळींच उपाय योजना नाहीं, व कित्येक प्रसंगीं ती कशी लंगडी पडते, हें त्यांनीं डॉ० स्मिथच्या गळीं चांगलेंच उतरून दिलें होतें. त्यांतील एक उदाहरण आम्हांस माहीत आहे. वाघाच्या विषावर म्हणून कांहीं स्वतंत्र योजना त्या पद्धतींत नाहीं. तशा तऱ्हेचा एक रोगी अण्णासाहेब यांनी हटकून बरा करून दाखविला होता.

वैद्यशास्त्रांत खरोखर महत्त्व म्हणजे निदानाचेंच. एकदां निदान ठरलें म्हणजे चिकित्सा करणें शास्त्र जाणणारा कोणीही करूं शकेल. त्यांत देखील कौशल्य नाहीं असें नाहीं. परंतु किती झालें तरी तें गौण आहे, आणि अण्णासाहेबांच्या वैद्यकचातुर्यांतला मुख्य गुण म्हणजे त्यांचें निदानकौशल्य. किती रोगी त्यांचेकडे येत, व त्यांतले किती बरे होऊन जात, हा प्रश्न कांहीं मोठासा महत्वाचा नाहीं, कारण रोग्याचें बरें होणें हें कांहीं वैद्याच्या निदानावर अथवा चिकित्सेच्या चांगुलपणावरच अवलंबून नाहीं. त्याचा बराचसा भाग रोगाची साध्यासाध्यता, रोग्याचे प्रकृतिधर्म व स्वभाव, त्याची शुश्रूषा, अशा बऱ्याच अवांतर गोष्टींकडे असतो. म्हणून त्या दृष्टीनें इतके लोक अण्णासाहेब यांचेकडे येत, म्हणून त्यांच्या वैद्यकनैपुण्याची तारीफ करणें, म्हणजे कांहीं खरें गुणगौरव नव्हे. पुन्हा, असें होतें कीं, कांहीं थोडे अपवाद सोडले, तर, अण्णासाहेबांचा रोगी म्हटला म्हणजे एकदां औषध घेऊन गेल्यावर त्यांच्या देखरेखेसाठीं असा कर्धा नसावयचाच. त्यामुळें चिकित्सा करतांना अण्णासाहेबांस नेहमीं उपाय न झाला तर न होवो, पण अपाय खास होणार नाहीं, अशा रीतीनें भीतभीत औषधयोजना करावी लागे. त्यांचें औषध पुष्कळ दिवस घ्यावें लागे, याचें हेंहि एक कारण होतें. त्यामुळें यांना औषध विचारून जाणारेच पुष्कळ असत, परंतु टिकून घेणारा मात्र क्वचित असे.

निदानासंबंधाच्या अद्भुत अशा शेंकडों गोष्टी आहेत कीं, त्याचा या त्रोटक चरित्रांत अधिक त्रोटकपणानें उल्लेख करणेंही शक्य नाहीं. अगदींच साधी परंतु अगदीं अलीकडील उदाहरणें सांगावयाचीं म्हणचे श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या थोरल्या सुनेचें, प. वा. रा. हरी नारायण आपटे यांच्या कुटुंबाचें, एका मुलीच्या जंताचें वगैरे होत. सौ. मनुताई यांस क्षयाची भावना झाली असें सर्व वैद्य व डॉक्टर यांनीं ठरविलें होतें, व त्याप्रमाणें सर्व लक्षणें असून त्यांची दशाही अत्यवस्थ झाली होती. मोठमोठे नामांकित वैद्य व

विलायतेहून आलेले डॉ. देशमुखांसारखे M.D. यांनींही निराश होऊन त्यांचा रोग असाध्य आहे, व फार झालें तर त्या महिन्या दोन महिन्याच्याच सोबती आहेत, म्हणून ठरविलें होतें. शेवटीं श्री० दादासाहेब यांनीं त्यांना अण्णासाहेब यांचेकडे आणून टाकिलें. अण्णासाहेब यांचा त्यांचेवर लोभ होता, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. त्यांनीं औषध द्यावयाचें कबूल केलें, व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वर्ष दीडवर्ष काढल्यावर सौ० मनुताई यांची प्रकृतीही चांगली झाली आज त्यांची प्रकृति अगदीं सुंदर असून त्या प्रसंगाचें स्मारक म्हणूनच कीं काय त्या अजूनहीं दुधावरच राहतात व फलाहार करतात यांतली सांगण्याजोगती गोष्ट एवढीच आहे कीं अण्णासाहेब यांनीं त्यांना मुख्यत्वेंकरून लिव्हर वरचेंच औषध दिलें होतें, व तसें त्यांनीं मजजवळ स्पष्ट बोलूनही दाखविलें होतें.

रा. आपटे यांचे कुटुंबास बहुत दिवसांनंतर दिवस राहिले. परंतु तें समजण्यांत न आल्यामुळें त्यांस कांहीं तरी रोग झाला आहे,असें वाटून पुण्यामुंबईच्या मोठमोठ्या सर्व वैद्य व डॉक्टरांस दाखविलें; आणि प्रत्येकानें कांहीं तरी वेगळें निदान करून काथ्यामेथ्यापासून तों थेट चीरफाडीपर्यंत सारे उपाय सुचविले. आपटे यांचे पुतणे रा. लक्ष्मणराव ऊर्फ बापूसाहेब हे अण्णासाहेब यांचेकडे येणारे असत त्यांचेबरोबर बाई अण्णासाहेब यांस प्रकृति दाखविण्यास आल्या. उभ्याउभ्यांच दारांत गांठ पडली, व बापूसाहेब यांनीं त्यांच्या प्रकृतीची हकीकत व डॉक्टरांचीं मतें सांगितलीं. तेव्हां एकदां त्यांच्याकडे नीट पाहून अण्णासाहेब यांनीं सांगितलें कीं, 'वेडे आहेत वेटे सारे. यांना औषध नऊ महिन्यानंतर देऊं.' हें अनपेक्षित परंतु चिरवांछित निदान ऐकून बाईस पराकाष्ठेचा हर्ष झाला. पुढें यथाकालीं प्रसूति होऊन रा. आपटे यांस एक कन्या झाली.

जंतांची गोष्ट ती मुलगी मला दाखवून त्यांनीं स्वतःच सांगितली. तिच्या ओटीपोटांत साधारण लहान नारळाएवढा गोळा होऊन ती अगदीं आसन्नमरण झाली होती. नांवें कांहीं आतां नक्कीं लक्षांत नाहींत, परंतु असें म्हणतां येईल कीं, पुण्यांतील लहानमोठ्या सर्व डॉक्टरांनीं Adnormal devslapment of ovaries ( अंडफलकांची भलतीशी वाढ ) असें तिच्या रोगाचें निदान ठरवून ऑपरेशनाशिवाय इलाज नाहीं, असा निश्चय केला होता. नऊ वर्षांचें मूल तें काय आणि तिच्या Ovaries एवढ्या कशा

वाढल्या, असें सर्वांस वाटलें, परंतु डॉक्टरनीं सांगितलें तेव्हां इलाज काय? ऑपरेशन करावयाचें ठरलें. पण मुलीची स्थिति तर अशी होती कीं, तिच्या अंगास बोट लावणेंही शक्य नव्हतें. त्यामुळें तिची आजी कांहीं ऑपरेशनला तयार होईना. अशा स्थितींत काय करावें, म्हणून अण्णासाहेब यांस ती विचारावयास आली. अण्णासाहेब यांनीं सर्व प्रकार पाहून तिला सांगितलें कीं 'ऑपरेशन करवूं नकोस, इतक्या नाजूक स्थितींत तिला सोसणार नाहीं. एवीतेवीं मुलगी तर गेल्यासारखीच आहे, तेव्हां मुकाट्यानें सांगतों तसें कर. मग पुढें काय महाराजांची इच्छा असेल तसें होईल' तिनें तें पत्करल्यावर अण्णासाहेब यांनीं तिला पुढीलप्रमाणें उपचार करण्यास सांगितलें. एक दिवस रात्रीं सँटोनाइन द्यावयाचें एक दिवस मधें जाऊं द्यावयाचा, व तिसरे दिवशीं सकाळीं एरंडेल द्यावयाचें. पुन्हा दुसरे दिवशीं सँटोनाइन, व एक दिवस टाकून एरंडेल द्यावयाचें. आणि एरवींच्या वेळीं वावडिंग सुंठ आणि कडुनिंबाचीं पानें यांचा फांट मधून मधून घोंट घोंट पाजावयाचा. व नेहमीं येऊन प्रकृतिमान कळवावयाचें. याप्रमाणें उपचार सुरू झाला. एवढ्या मोठ्या रोगावरील हा असला उपचार पाहून सर्वांस मोठी मौज वाटली, व 'अण्णासाहेब यांच्या नादीं तुम्हीं काय लागलांत,' म्हणून सर्व लोक आपापल्या परीनें म्हातारीचा बुद्धिभेद करूं लागले. त्यामुळें मधून मधून तिचें मन अस्थिर होऊन तिनेंही अण्णासाहेबांस खूप त्रास द्यावा. 'इतके दिवस गेले अजून गुण नाहीं,' 'ते अमुक डॉक्टर असें म्हणत होते,' वगैरे ठराविक तक्रारींना 'हो हो, आतां चार दिवस गेले कीं गुण येईल, शनवार गेला कीं उत्तम औषध देतों, मुलगी जगते आहे, हाच औषधाचा गुण आहे' इत्यादि शब्दांनीं केव्हां ममताळूपणानें, केव्हां चिडल्यासारखें करून अशा रीतीनें अण्णासाहेबांनीं सहा महिने लोटले! सर्वांचीच खात्री झाली कीं रोग असाध्य आहे, म्हणून अण्सासाहेब असें करीत आहेत. असें होतां होतां सुमारें सहा महिन्यांनंतर त्या मुलीस जंत पडूं लागले, व ते इतक्या प्रमाणानें दोनही द्वारांतून पडूं लागले कीं घरांतल्या माणसांचें अन्न बंद होण्याची वेळ आली! अशा स्थितींत दोन महिने गेल्यावर त्या मुलीचें पोट साफ बरें झालें, व ती हिंडूं फिरूं लागली. तरीही जंताची प्रवृत्ति नाहींशी होण्याकरितां त्यानंतर दोन वर्षेपर्यंत उपचार चालू ठेवलाच होता.

उमरावती येथील प्रसिद्ध वकील रा. बाबासाहेब पाळेकर यांस प्लेग होऊन सपाटून ताप भरला. कैरीसारखी गांठ येऊन प्लेगविषयीं कोणास शंका राहिली नाहीं. आणि कांहीं काळ त्यांची स्थितीही अत्यवस्थ होती. परंतु प्लेगवरील इतर कांहीं उपचार करण्याचें टाकून अण्णासाहेबांनीं त्यांना सॅंटोनाइन व एरंडेल हेंच आधीं दिलें. त्यानंतर त्या दिवशीं प्रकृति अतिशयच बिघडून त्यांस वात झाला. अण्णासाहेब यांस सांगितलें असतां शांतपणानें 'होऊं दे वात झाला तर, पण एरंडेल लागूं पडलें का!' म्हणून ते विचारीत. अखेरीस दुसरे दिवशीं मागल्या पहांटेस त्यांस भला मोठा जंत पडला, व तेथपासून त्यांच्या प्रकृतीस उतार पडला. मग अण्णासाहेब यांनींही प्लेगवरील इतर उपचार करून गांठ कापून काढविली.

या तर अगदींच क्षुल्लक गोष्टी आहेत, अगदीं अलीकडच्या, सहज तोंडाशीं आल्या, म्हणून दिल्या. वैद्यकामध्यें अनेक तऱ्हेच्या परीक्षा सांगितल्या आहेत, नाडीपरीक्षा, मुखपरीक्षा, वगैरे अनेक प्रकारांपैकीं यांची दृष्टिपरीक्षा खरोखरच अद्भुत होती. एकाद्या मुलीस दिवस राहून केवळ दहा पंधरा दिवसाचाच काल लोटला असला तरी सूक्ष्म अवलोकनानें अथवा प्रसंगीं नाडी पाहून 'तुला औषध कसलें द्यावयाचें ?' म्हणून तिची थट्टा करीत, अथवा मोठी स्त्री असल्यास दिवस असल्याचें स्पष्ट सांगत. तरुण विद्यार्थी आले असतां त्यांच्या हाताच्या स्पर्शावरून 'तुला औषध कसलें द्यावयाचें ? आधीं तुझे हात बांधले पाहिजेत, संध्या कर, नमस्कार घाल, 'छत्र्याच्या शाळेंत जावयाचें सोडून दे,' म्हणून सांगत. छत्र्याची शाळा म्हणजे माटेकरांचें दुकान. तेथें पूर्वी माडीवर नारायणराव छत्र्यांचा दवाखाना असून खालीं कसलीशी शाळा होती, तेव्हांपासून छत्र्यांची शाळा म्हणून त्यांच्या तोंडांत जे शब्द बसले होते, ते तसेच होते. पुढें तेथें माटेकराचें फराळाचें दुकान झालें तरीही अण्णा० त्याला छत्र्याची शाळाच म्हणत. असो. अशीं अनेक उदाहरणें आहेत कीं अण्णा० यांनीं रोगाची सूचना द्यावी, व पुढें कैक वर्षांनीं तो उद्भवावा. त्या सगळ्यांचा नुसता नामनिर्देशही करणें शक्य नाहीं.

यांच्याकडे येणाऱ्या रोग्यांचे मुख्यतः चार वर्ग असत. हे कधीं पैसे घेत नसत, तेव्हां जरा कांहीं झालें कीं चला अण्णासाहेबाकडे, अशा पुण्यांतील लोकांचा एक वर्ग. हा अर्थातच फार मोठा असावयाचा. यामधें अनेक तऱ्हेचे

लोक अनेक हेतूंनीं आलेले असत. व आल्यासारखें उगीच हात दाखवून जात. कोणी मौज पाहण्याकरितां, कोणी यांचे दर्शनाकरितां, कोणी तेथें काय चाललें आहे याची बातमी ठेवण्याकरितां, कोणी दुसऱ्या कोणाबरोबर आला म्हणून, असे अनेक लोक जरा कुठें पडसें आलें, उगीच आंग ऊन झालें कीं, हात पुढें करीत. व यांनींही वाटेल तितका त्रास झाला तरीही कधीं कोणास नाहीं न म्हणतां प्रत्येकाशीं थोडेंबहुत बोलून कांहींना कांहीं तरी औषध सांगावें. अर्थातच अशा प्रसंगीं त्यांना कधीं थोडाही विचार करण्याचें कारण नसे, औषधही खरोखरच समजुतीदाखलच असे. याच्या उलट दुसरा वर्ग असा असे कीं, सर्व प्रकारच्या अतिक्रमांनीं जर्जर झालेलें शरीर आणि विकोपास गेलेली व्याधी व अनेक पद्धतींचे उपचार आणि अनेक वैद्य डॉक्टरांची निराशा हीं पदरांत घेऊन प्रकरण असाध्य ठरलें म्हणजे त्यांस अण्णासाहेब यांचेकडे आणून टाकावयाचें. या रोग्यांची स्थितिच 'शंकरो यदि रक्षिता' अशी झालेली असे, तेथें अण्णासाहेब तरी काय करणार? तरी पण तोंडांतून अशुभ काढण्याचा त्यांच्या वाणीस संस्कारच नसल्यामुळें ते भरपूर आशा देत, व योग्य तो उपचारही करवीत. या दोन वर्गांतील लोकांचा भरणाच त्यांचेकडे अधिक असे; व त्यामुळेंच त्यांच्या वैद्यकीविषयीं विद्वान म्हणविणाऱ्या लोकांत अनेक गैरसमज असत. पुष्कळ रोग्यांचा रोग साध्य असे व त्यांचें निदान ठरवून कुशलतेनें चिकित्साही ते सांगत; परंतु पथ्य वगैरे सर्व भानगडी नीट न केल्यामुळें अखेरीस त्यांत यश येत नसे. या तीनही वर्गांच्या मानानें पुष्कळच थोडा असा एक चौथा वर्ग होता यांतील लोक मात्र सांगितल्याप्रमाणें औषध घेऊन रोगमुक्त होत, व जन्मभर अण्णासाहेब यांस धन्यता देणारे असे हजारों लोक आजही आहेत. अण्णासाहेब यांच्या वैद्यकीचें खरें स्वरूप व माहात्म्य लक्षांत येण्यास रोग्यांचें हें वर्गीकरण लक्षांत ठेविलें पाहिजे. म्हणजे त्यांच्या योजनापद्धतींतील विशेष लक्षांत येतो.

हात पहावयाचें टाकून, अथवा उपचार सांगावयाचें सोडून पांच पांच दहा दहा मिनिटें रोग्याशीं ते अवांतरपणानें उगीच बोलत बसलेले दिसत, व त्याचें बाकीच्या लोकांस मोठें नवल वाटे. हात पहावयाचा फार झालें तर कांहीं थोडी माहिती विचारावयाची, तें सोडून 'तूं राहतोस कुठें? करतोस

काय ? घरीं कोण कोण आहे ? ' इ. इ. घरगुती गोष्टी विचारीत बसलेले त्यांना पाहिलें म्हणजे बाकीच्या तिष्ठत बसलेल्या लोकांना अर्थातच राग येई, परंतु या सर्व गोष्टींचा उपयोग औषधाची योजना करतांना होत असे; पण त्याची कल्पना खुद्द रोग्यालाही येत नसे. खानदेशांतील एका गृहस्थास असाच कांहीं मोठा रोग होता, व अण्णासाहेब यांनी त्याला काढा सांगून कडुनिंबाच्या पानांचा एक मोठा गोळा रोज घ्यावयास सांगितला. त्या गृहस्थानेंही एक वर्षपर्यंत नेमानें तसें केलें. पुढें त्यानें अण्णासाहेबांस विनंति केली कीं, " वर्षभर सतत औषध घेत आहे, परंतु म्हगण्यासारखा गुण तर कांहींच येत नाहीं, तेव्हां आतां मी औषध बंद करतो. " त्यावर अण्णासाहेब यांनीं समजून सांगितलें कीं, " तुला अमुक अमुक रोग झालेला आहे, व तो आतांपर्यंत इतक्या थराला गेला असता. सामान्य चांगली प्रकृति असल्याप्रमाणें तूं हिंडतोस फिरतोस हाच औषधाचा गुण आहे. मग न कंटाळतां आणखी एक वर्षपर्यंत तुला घेतलें पाहिजे, म्हणजे रोगाचें निर्मूलन होऊन खडखडीत बरा होशील. " त्यावर त्यानें सांगितलें कीं, ' काढ्याचें कांहीं नाहीं, परंतु निंबाचा गोळा घेणें जिवावर येतें; तेवढा काढून टाका, म्हणजे मी औषध घेतों. " तेव्हां यांनीं त्याला समजून सांगितलें कीं, ' खानदेशची हवा, सरकारी नौकरी, घरीं परिवार बराच व काढ्यावर तर दूध तूप वगैरे पुष्कळ घेतलें पाहिजे, तूं गरीब मनुष्य काय करणार ? उलट औषधानें अपाय होईल, म्हणून मुद्दाम निंबाच्या पाल्याची योजना केली आहे, व तशाच तऱ्हेनें काढाही दिला आहे. एवढ्याकरितां त्रासूं नकोस. " यावरून औषधयोजना किती काळजीपूर्वक व कशा रीतीनें केली जात होती, हें लक्षांत येईल.

१८९२ पर्यंत अण्णासाहेब आंग्ल व आर्य अशीं दोनही तऱ्हेचीं औषधें सांगत, तेथून पुढें आंग्ल औषधांचें प्रमाण कमी होत गेलें, व अखेरच्या १५।१६ वर्षांत तर क्विनाईन व सँटोनाइन हीं दोन औषधें सोडलीं तर दुसरें इंग्रजी औषध त्यांनीं कधीं कोणास सांगितलेंच नाहीं, असे म्हटलें तरी चालेल. आंग्लवैद्यकाची प्रगति अलीकडे इंजेक्शन्स व ऑपरेशन्स याच दिशेकडे कमालीची होऊं लागली आहे, व आंग्लवैद्यक म्हणजे टोंचून घेणें व चीरफाड करणें, असाच त्याचा अर्थ होऊन बसणार कीं काय कोण जाणे. स्वतः अण्णासाहेब हे या दोन्ही पद्धतींच्या अगदीं विरुद्ध असत. अंतर्गळासारखे

क्वचित् कांहीं रोग सोडले तर व आगंतुक कारणानें शरीरांत उत्पन्न झालेली कांहीं तोडमोड असली तर चीरफाड करणें ही गोष्ट वेगळी. परंतु आमांशापासून तों राजयक्ष्म्यापर्यंत वाटेल त्या व्याधीकरितां दे क्लोरोफार्म की टाक चिरफाड करून, असल्या उपचारपद्धतीला ते पशुचिकित्सा म्हणत, व सृष्टपदार्थांतील रोगनाशक धर्माच्या अज्ञानाचें तें लक्षण समजत, व इंजेक्शन्स इनॉक्युलेशन्स वगैरेंच्या तर ते तत्त्वतःच अतिशय विरुद्ध होते.

एकदां त्यांना अडविण्याकरितां म्हणून एका डॉक्टरांनीं त्यांस असें विचारलें कीं 'इंजेक्शन्सचीं जर कल्पनाच पूर्वीं नव्हती, तर आर्यवैद्यकास ती विरुद्ध आहे, असें तरी कसें म्हणावें ? कदाचित् आर्यवैद्यकानें मान्यही केली असती." यावर गीतेंतील पंधराव्या अध्यायांतील

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनः षष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥**

या श्लोकाच्या आधारें सुमारें दोन अडीच तासपर्यंत निरूपण करून या श्लोकांतून आर्यवैद्यकाचीं सारीं मूलतत्त्वें कशीं निघतात, व त्यांअन्वयें इंजेक्शन्स वगैरे अस्वाभाविक उपचार आर्यवैद्यकास विरुद्ध कसे आहेत, वगैरे त्यांनीं समजवून सांगितलें. मनासह इंद्रियें प्रकृतिस्थ असतील तर जीवात्मा तें शरीर चालवितो, व तसें नसल्यास शरीर सोडून जातो, म्हणजे शरीरास मृत्यु येतो. अर्थात् कसलीही भानगड उत्पन्न झाली असतांना शरीर पुन्हा प्रकृतिस्थ करणें हें साऱ्या वैद्यकाचें सार आहे. अर्थात् तें पुन्हा प्रकृतिस्थ करतांना त्याच्या मूळ प्रकृतीस अनुकूल असे उपचार झाले, तरच तें खरें प्रकृतिस्थ होईल. एकाद्या रक्तास विजातीय अशा द्रव्यानें त्यांत विकृति नाहींसा करण्याचा धर्म जरी उत्पन्न झाला तरी तें रक्त अखेरीस विकृतच राहणार, व त्यामुळें प्रकृतिस्थ शरीराच्या साह्यानें जीवात्मा जें करूं शकेल, तसें कर्षण त्यास करितां यावयाचें नाहीं; म्हणजे अर्थातच प्रकृतिस्थ शरीराच्या द्वारें जें त्यास संपादावयाचें असतें, तसें संपादितां येणार नाहीं. अशी त्यांच्या विवेचनाची तात्त्विक सरणी होती. याशिवाय एक रोग बरा करावयास टोंचून घेतलेल्या द्रव्यानें तो रोग जरी अजीबात बरा झाला, असें धरलें तरी रक्तावर इतर अनिष्ट परिणाम कसे घडतात, वगैरे वैद्यशास्त्रीय,

बाजूही होती, व त्याच्या जोडीस त्यांच्या अनुभवाचें शेंकडो रोग्यांचे पुरावे होते; त्यांचें अंशतःही प्रतिपादन करणें शक्य नाहीं.

सबंध पाश्चात्य वैद्यकाची चिकित्सापद्धति पाहिली तर बीजतः रोग नाहींसा करून शरीर प्रकृतिस्थ करण्यापेक्षां व रक्तपरमाणूंचा रोगनाशक धर्म तीव्र करण्यापेक्षां, कोणीकडून तरी तात्पुरतें आरोग्य उत्पन्न करण्याकडे त्याचें धोरण असतें. त्यामुळें इंजेक्शन सारख्या उपायांनीं रोगनाशाबरोबरच उत्पन्न झालेला रक्तदोष घालविण्याचीही त्यांत कांहीं योजना नसते. पुण्यास इनॉक्युलेशनच्या वेळीं वाद झाला होता, त्यावेळेस देखील अखेरीला, अण्णासाहेब यांनीं काढलेल्या शंकांचें समाधान न करतां आल्यामुळें * * * साहेबांस 'अजून आमचे प्रयोग चालू आहेत, त्यामुळें निश्चितपणें आपल्या प्रश्नांना उत्तरें देतां येत नाहीत,' असेंच म्हणावें लागलें. इंजेक्शन्स व ऑपरेशन्स यांच्या प्रमाणेंच प्राणिज चिकित्सेसंबंधींही त्यांस मनापासून तिटकारा होता. व तो केवळ निर्मांसतेकरितांच नसून वैद्यशास्त्राचे दृष्टीनेंच होता.

स्वतः ते तर काष्ठौषधींशिवाय इतर द्रव्याचा उपयोग करीतच नसत म्हटलें तरी चालेल. मात्रा, भस्मे वगैरे आर्यचिकित्साशास्त्रांतील इतर प्रकारांची गुणकारिता अधिक तीव्र, सुलभ, व शीघ्र असूनही त्यांचा ते उपयोग करीत नसत, याचें कारण इतकेंच कीं तीं तयार करतांना शास्त्रीय पद्धतीनें मोठ्या कसोशीनें व खर्चानें तयार करावीं लागतात; त्यामुळें इतर कोणाचीं औषधें जशीं पाहिजे तशीं झालेलीं नसल्यास अपाय होण्याचा संभव जास्त. व यांचें धोरण तर, उपाय लागूं पडला नाहीं तरी चालेल, पण अपाय होऊं नये, असें असे. म्हणून त्यांनीं काष्ठौषधींचा हा थोडा दगदगीचा, व दिरंगाईचा कां होईना, परंतु अतिशय सौम्य, स्वस्त व कमी धोक्याचा मार्ग पत्करिला होता. तसेंच कोणाचें अगदीं खात्रीचें औषध असलें, तर घ्यावयास सांगत नसत असें नाहीं. व प्रवाळ भस्मासारखें सौम्य औषध सांगतही. भस्मासंबंधीं त्यांचा एक अनुभवही प्रसिद्ध आहे.

बाबासाहेब यांच्या एका दुखण्यात अण्णासाहेब लक्ष देईनात म्हणून नानासाहेबांनीं घाबरून कोणच्याशा एका वैद्याचें औषध आणलें, व सांगितल्याप्रमाणें मधांतून तें देत असतां वाटीच्या कांठावर हिरवटपणा आलेला त्यांनीं पाहिला. त्यामुळें त्यांनीं तें औषध अण्णासाहेबास दाखविलें व 'देऊं कां'

म्हणून विचारिलें. 'हें कोठून आणलें?' असें विचारून अण्णासाहेब यांनीं वाटींतील औषध फेंकून दिलें, व पागोटें चढवून तसेच त्या वैद्यांचे घरीं गेले. नुकतेंच औषध नेलेलें होतें, व पाठोंपाठ अण्णासाहेब आलेले पाहिले, त्यामुळें वैद्यबोवांसही थोडेसें धस्स झालें. परंतु यांनीं चिरंजीवांची तब्बेत ठीक असल्याचें सांगून त्यांनीं जें भस्म दिलें होतें, तें कोणी केलें वगैरे चौकशी केलीं, व आणखी भस्म मागितलें. तेव्हां वैद्यबुवांसही संतोष होऊन त्यांनीं पुष्कळसें काढून दिलें. परंतु तेवढ्यानेंच समजूत न झाल्यासारखें करून अण्णासाहेब यांनीं सबंधच भस्म मागितलें, आणि त्याच्या म्हणण्याकडे फारसें लक्ष न देतां सबंध बाटलीच घरीं आणली. घरीं येतांच त्यांनीं तें भस्म गटारांत सांडून टाकलें, व एका गृहस्थाच्या हातीं त्याची किंमत पाठवून दिली. भस्माची भट्टी नीट न साधल्यामुळें तें अपायकारक झालें होतें, पण तसें सांगितलें तर त्याला वाईट वाटेल म्हणून त्यांनीं हा मार्ग स्वीकारला, व तें अपायकारक भस्म इतरांच्या पोटांत जाऊं नये, अशीही व्यवस्था केली. सर्व बाबतींत अशीच त्यांची वागण्याची तऱ्हा असे. असो. यावरून ते काढेच कां देत हें लक्षांत येईल.

तसें पाहिलें तर, कोणींही औषध घ्यावें, याचाच त्यांना मनापासून कंटाळा येई. होतां होईल तों आहारविहारादि स्वाभाविक गोष्टींनींच प्रकृति नीट ठेवावी, औषधाचें कामच पडूं देऊं नये, हें त्यांस मनापासून आवडे. साधी राहणी, आरोग्यनियमांचें परिपालन व योग्य व्यायाम यांच्या योगानें वैद्याचें तोंड पाहण्याचें कधींही काम पडणार नाहीं, असें ते म्हणत. व्यायामांत नमस्कारांचा व्यायाम इतर सर्व प्रकारांत त्यांना अधिक पसंत होता. इतर कोणत्याही व्यायामानें शरीरावर जो परिणाम होतो, तो चिरकाल रहात नाहीं, आणि व्यायाम सुटतांच शरीर ढिलें होतें. परंतु नमस्कारांच्या योगानें स्नायूंस बसलेला पीळ थोडाबहुत अखेरपर्यंत कायम राहतो. याशिवाय इतर दृष्टींनींही नमस्काराचा व्यायाम सोपा व सोईचा आहे खावयास पुरेसें मिळत नाहीं म्हणून व्यायाम चांगला घेतां येत नाहीं अशीही एक तक्रार आढळते; परंतु अण्णासाहेब असें सांगत असत कीं आपण जें तूप खातों तें बहुतेक सर्व तसेंच बाहेर पडतें. त्यांतील कांहीं थोड्या भागाचा वंगणासारखा उपयोग होतो. एक तोळा तूप पचविण्यास २५० नमस्कार घालणें अवश्य आहे. यावरून पाहतां क्वचित् कांहीं प्रमाणांत खरी असली तरी 'खावयास

मिळत नाहीं, म्हणून व्यायाम होत नाहीं ’ ही ओरड सर्वांशीं खरी नव्हे. व शरीरपुष्टीकरितां अंडीं, मांस, कॉडलिव्हर अथवा स्टन्स वाईन, यांचीच आवश्यकता आहे हें म्हणणेंही भ्रामक आहे, असें दिसतें. थोडेसे भुइमुगाचे दाणे अतिशय संथपणानें चावून जर सकाळीं खाल्ले, व त्यावर ताकाचा एकादा सुंदर पेला चढवून दिला, तर जो परिणाम होईल त्यापुढें कॉडलिव्हर कांहींच नाहीं, असें ते प्रतिज्ञेनें सांगत. नारळ वगैरेंच्या पौष्टिकपणाबद्दलही असेंच त्यांचें मत होतें, आणि जोपर्यंत असे पदार्थ इकडे मिळतात, तोंपर्यंत त्यांचा फायदा कुशलतेनें घेण्याऐवजीं, कॉडलिव्हरसारखीं औषधें घेणें त्यांना कसेंसेंच वाटे. असो.

आजच्या पिढीचा शारीरिक ऱ्हास, त्याला कारणीभूत असलेलीं व त्यापासून उत्पन्न होत असलेलीं व्यसनें, त्यामुळें प्रगट होणारे तऱ्हेतऱ्हेचे अनेक रोग, आणि विशेषतः स्त्रीवर्गांत वाढत असलेल्या प्रदर व तत्संबंधीं अनेक रोगाचे प्रकार व प्रमाण यामुळें त्यांचा जीव तुटत असे, व त्याविषयीं आपले विचार ते नेहमीं बोलून दाखवीत. उठल्यासुटल्या वैद्याकडे धांव घेण्याची व औषधांवर भर ठेवण्याची जी प्रवृत्ति वाढत आहे, तिचा तर त्यांना फारच खेद होत असे. चांगल्या चांगल्या म्हाताऱ्यांनाही एवढ्या तेवढ्या गोष्टींवरून औषध मागतांना पाहून त्यांना मौज वाटे व ‘ आतां औषध कशाला पाहिजे ? दूध प्या, निंबाचा पाला खा, ’ असें म्हणून वैराग्यमार्गाकडे त्यांना वळविण्याची ते खटपट करीत.

स्त्रीवर्गांत आजकाल बाळंतरोगाचा जो सरसहा फैलाव दिसत आहे, त्याचें मुख्य कारण ते असें सांगत कीं बाळंतपणें हीं नव्या जुन्या कोणत्या तरी शास्त्रीय पद्धतीनें न होतां कशीं तरी होतात, प्रसूतीनंतर पोट बांधून ठेवणें हें आजकालच्या नवीन मुलींना त्रासदायक, गैरसोईचें, अथवा कसेंसेंच वाटतें. वडील माणसांचा धाकही बेताचाच असल्यामुळें अथवा वडील माणसांसही त्याचें महत्त्व कळेनासें झाल्यामुळें, एक तर पोट दोन अडीच महिने सारखें बांधलें जात नाहीं, अथवा कोठें बांधलें तरी जसें पाहिजे तसें बांधलें जात नाहीं, व त्यामुळें आंतील यंत्रें ढिलीं होऊन जातात. ( Dilation of Stomach ) त्याच्यायोगानें अपचन, यकृतासंबंधाचे अनेक विकार, व इतरही स्त्रियांचे अनेक रोग उत्पन्न होऊन त्यांचा बाळंत-

रोगांत परिपाक होतो. ह्या साध्या गोष्टींचें त्यांना अतिशय महत्व वाटत असावेंसें दिसतें. आणि म्हणूनच ती स्त्रियांनीं लक्षांत ठेवण्याजोगती आहे. अलीकडे पुष्कळांना पोट कसें बांधावें हें देखील कळत नसतें, त्यामुळें ते स्वतःच चौकोनी रुमालाची घडी घालून बांधून दाखवीत. असो.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें काष्ठौषधींच त्यांच्या एकंदर धोरणांत बसल्यामुळें त्यांचाच उपयोग करूं लागल्यामुळें लोकांस एक मोठीच अडचण भासूं लागली. काष्ठौषधी जंगलांतून आणावयाची खटपट जरी सोडली, तरी तिची ओळख असणें कठीण. त्यामुळें बाजारांत जशी मिळेल तशी ती घेणें अवश्य होतें. व काष्ठौषधीं तर होतां होईल तों ५।६ महिन्यांपेक्षां जुनी असूं नये. त्यामुळेंही काढ्यांचा गुण यावयास वेळ लागे. पुढें पुढें त्यांच्याजवळ औषधें लिहून देण्यास बसणारे भिषग्रत्न गंगाधरशास्त्री जोशी यांनीं आपल्या सर्वौषधी-संग्रहालयानें ही अडचण थोडीफार दूर केली होती. व स्वतःच्या दुकानांतील वनस्पतींचा सांठा ४।४ महिल्यांनीं ताजा ठेवावयाची ते खबरदारी घेत. त्यामुळें ' स्वार्थाय च सुखाय च' या त्यांच्या तत्त्वाप्रमाणें त्यांचा स्वार्थ साधून लोकांचाही थोडी सोय झाली. तरी पण एकंदरांत ही अडचणही मोठीच होती. एवढ्या-करितां अण्णासाहेब यांनीं लोकांच्या साधारण परिचयांत असलेल्या ५।२५ साध्या वनस्पतींवरच होतां होईल तों काम करण्याचा प्रघात ठेवला होता; आणि त्यामुळेंच अण्णासाहेब यांचे शेंदोनशें काढे पाहिले, तरी त्याच ५।२५ द्रव्यांचा सारखा उपयोग दिसून येतो, व ५।१० औषधें तर कोणच्याही काढ्यांत अगदीं हटकून तींच आढळून येतात. उगीच कोठें तरी दोनचार पदार्थांचा फरक केलेला दिसतो. ' अण्णासाहेब यांच्या वैद्यकींत अलीकडे शास्त्रदृष्ट्या कांहीं अर्थ राहिला नव्हता, साधूचा प्रसाद म्हणून श्रद्धेनें औषध घ्यावें इतकेंच, ' असा जो प्रवाद आढळून येतो, त्याचें कारण हेंच आहे. त्यांचे काढे कोणच्याही ग्रंथांत आढळणें शक्य नाहीं, ते सर्व ते नवीनच बसवीत, व त्यामुळें औषधें सांगतांना क्वचित्प्रसंगीं जास्त विचारांत पडल्याचेंही दिसत. हातानें ते कधींच कोणाला औषध देत नसत, तोंडानें यांनीं औषधें सांगावीं, व कोणीतरी लिहून घ्यावीं असें चाले. अशीं औषधें सांगतांना मधेंच एकादे वेळेला बराच वेळ ते स्वस्थ रहात, अथवा दुसऱ्या कोणाशीं कांहीं बोलत बसत. इतर लोकांस अर्थातच

हा त्यांचा नादिष्टपणा वाटे; परंतु अशा वेळीं वर सांगितल्याप्रमाणें सारीं धोरणें सांभाळून, औषधयोजना कशी करावी, याचाच ते विचार करीत.

'आपल्या काढ्यांत इतकीं औषधें कां असतात,' याचें कारण एकदां त्यांनीं स्वतःच सांगितलें होतें कीं, "वनस्पतींच्या अंगीं भिन्नभिन्न धर्म असतात, त्यांतील एकाद्या दुसऱ्या धर्माची मला गरज असते व बाकींच्या धर्माची गरज नसते इतकेंच नाहीं तर, कांहीं प्रसंगीं ते टाळणेंही जरूर असतें; तेव्हां नेमक्या त्याच धर्माचा उपयोग व्हावा, आणि इतरांचा परिणाम होऊं नये, म्हणून एका औषधावरोबर दुसरीं औषधेंही घालावीं लागतात; व अशा रीतीनें काढा लांबलचक होतो. उदाहरणार्थ एकाद्या प्रसंगीं सुंठींतील दीपक गुण तर पाहिजे आहे, परंतु तिच्या उष्णपणाचा तर परिणाम होऊं नये, म्हणून तिला धमासा, वाळा, वगैरेची जोड दिलेली असते. अशाच बारीक योजनेनें सर्व काढे तयार होत, परंतु त्यांतील बारीक धोरण लक्षांत न आल्यामुळें चांगल्या चांगल्या वैद्यांच्याही एवढ्या औषधांचें, अथवा ह्या काढ्यांत ह्या औषधांचें काय काम, हें लक्षांत येत नसे व त्यामुळें ज्याला जसे वाटेल तसे तो तर्क करी.

याचें एक लहानसें उदाहरण सुप्रसिद्ध तपस्वी बाबासाहेब परांजपे, यांचें आमचे लक्षांत आहे. फार काळ गेला असल्यामुळें व गोष्ट लहान असल्यामुळें खुद्द त्यांच्याच स्मरणांत ती असेल कीं नाहीं कोण जाणे, परंतु आम्हांस ती चांगलीच आठवते. रात्रीं १०ची वेळ होती. व प. वा. डॉ. वझे किंवा कोणीसा गृहस्थ आजारी होता, (बहुतकरून डॉ. वझे असावे असें वाटतें). त्यांच्या औषधासंबधीं बोलणें करण्यास बाबासाहेब आले होते बोलतां बोलतां त्यांनीं मध्येंच सुचविलें कीं 'बाळहिरडा बहावा शेंग वगैरे असल्यामुळें एरंडमुळाची कांहीं गरज नाहीं, व तें काढून टाकलें तरी चालेल.' अण्णासाहेब यांचा काढा म्हटला म्हणजे त्यांचा प्रारंभ गुळवेलीनेंच व्हावयाचा, व शेवट कडुनिंबाच्या पानांनींच व्हावयाचा हें अगदीं ठरलेलेंच असे. या एंजिन ब्रेक्सच्या मध्यें मग वाटेल तितके डबे असोत. त्याचप्रमाणें मध्यें पांढरी वसू, एरंडमूळ, हे वतनदार लोक असावयाचे मधून मधून खगोलांत फिरणाऱ्या जोड ताऱ्यांप्रमाणें सुंठ धमासा, देवदाररास्ना, वगैरे जोड्याही एकमेकांस न सोडतां बिनचूक यावयाच्याच. त्याप्रमाणेंच या काढ्यांतही एरंडमूळ होतें. बाबासाहेबांची सूचना

ऐकल्यावर अण्णासाहेबांनीं सरळपणानें सांगितलें कीं ' अहो, काढ्यांत एरंड-मूळ मी जें ठेवतों, तें काहीं विरेचक म्हणून नव्हे, तर त्याच्या अंगीं जो वाहकधर्म आहे, त्याकरितां ठेवतों, त्यामुळें बाकींच्या औषधांचें कार्य चांगलें व लौकर घडून येण्यास मदत होते.' यावरून काढे सांगण्यांतील त्यांचें धोरण थोडेंबहुत लक्षांत येईल. संग्रहणी वगैरे सारख्या रोगावरील काढ्यांत एरंडमूळ गाळलेलें असे, हें मग आमच्या लक्षांत आलें. मनुष्यशरीराच्या सर्व विकृतींचा विचार करून त्यांनीं एक चौसष्ट औषधांचा काढा तयार केला आहे, व त्यांतलि औषधांचीं प्रमाणें जर देशकालवर्तमानास अनुसरून, कोणी जाणत्या माणसानें बसवून दिलीं तर तो काढा सामान्यतः वाटेल त्या विकृतीवर चालण्यास हरकत नाहीं असें वाटतें. कुशलतेनें योजना केली असतां या चौसष्ट औषधांपलीकडे इतर वनस्पतींचा उपयोग बहुतकरून पडत नाहीं, असें ते म्हणत. असो.

वैद्यकीच्या कामासंबंधीं गुरुवार व रविवार असे दोन वार पूर्वींपासूनच ठेविले होते. आणि त्या दिवशीं हात दाखविणारांचा एकच तोबा उडत असे. अलीकडे अलीकडे तर या दिवशीं पहाटेस सात वाजल्यापासूनच लोकांची रहदारी सुरू होई. व घरांतल्या माणसांनीं कितीही मनाई केली तरी कांहींना कांहीं करून लोकांनीं वर जावें, व मग त्यांना नुसतें प्रातःस्मरणही करावयास वेळ सांपडूं नये. अशा रीतीनें दुपारीं चार पांच वाजेपर्यंत व कधीं कधीं तर सायंकाळपर्यंतही माडीवरच कारखाना सुरू होई. तेवढ्या वेळांत खालीं चौक व पडवी स्त्रीपुरुषांनीं गच्च भरून जाई. तेव्हां ते खालीं येत. व मग रात्रीं चार चार वाजेपर्यंत सारखा कारखाना सुरू असे. याचा अनुभव असलेले हजारों लोक पुण्यांत अजूनही आहेत, यांत एका अक्षराचीही अतिशयोक्ति नाहीं.

एक मोठा दिवा, लहानसें तढव, दौत, टांक, व कागदांचे तुकडे ही या दवाखान्याची सामग्री असे. तेथें रात्रींच्या वेळीं, दिव्याच्या प्रकाशांत सर्व तऱ्हेच्या स्त्रीपुरुषांच्या घोळक्यांत आठ आठ तास सारखें बसून, हास्य विनोदानें, कोणाचा हात पहा, कोणास औषध सांग, कोणाची कांहींतरी थट्टा कर, अशा रीतीनें काम करीत असतांना, अधिक श्रमानें थकून न जातां उलट त्यांची कांति जास्त देदीप्यमान होऊन मुद्रा अधिक प्रफुल्ल झालेली पाहून पाहणारास काहीं विचित्र तऱ्हेचा भास होत असे. माणसाच्या तेजानें अथवा

सौंदर्याच्या प्रभेनें दिव्याची प्रभा देखील मंद होते, अशा प्रकारचीं वर्णनें काव्यनाटकांत वाचण्यांत येतात; त्याचा प्रत्यक्ष अनुभव त्या वेळीं घ्यावयास सांपडे, आणि क्षणमात्र, दिव्याच्या तेजानें यांचें मुखमंडल उज्ज्वल झालें आहे, किंवा यांच्या मुद्रेवरील दिव्य प्रभापूरांत दिव्याची ज्योत बुडून जात आहे, हें समजत नसे! दिवसभर पोटांत पाण्याचा थेंब देखील नसे, त्यांतल्या त्यांत हात पाहतां पाहतां मधेंच वेळ करून कोणा तरी रोग्याला त्याचे घरीं पाहून आलेले असत, व इतरही परिश्रम झालेले असत; परंतु तशा वेळींही हातांत कंदील घेऊन स्वतःचा दिवस सुरू करण्याकरितां शौचास जावयाची तयारीच असे. मात्र खाण्यापिण्याची गोष्ट काढली कीं मोठा राग येई.

अगदीं अलीकडे तर दिवसांचा आणि वेळेचाही निर्बंध नव्हता; हरप्रकार करून पुरुषांनीं व बायांनीं वर यावें, व मग कोणचाही दिवस असो, चिकित्सेस सुरवात व्हावयाची. वैद्यकीवर पैसा मिळवावयाचा नाहीं, वकीलीवर उदरनिर्वाह करावयाचा, हें तर त्यांचें ठरलेलेंच होतें, व तें त्यांनीं इतक्या कडकपणें पाळलें कीं, तशा संबंधानें येणाऱ्या एकाद्यानें प्रसादाच्या निमित्तानें आणलेलें एकादें केळदेखील त्यांनी घरांत वाटूं देऊं नये, तसेंच ओंकारेश्वरावर अथवा एकाद्या देवळांत पाठवून तेथें वाटावयास सांगावें. रोगीं पहावयास म्हणून कोठें गेले असतां तेथें तर पाण्याचा घोंटही न घेण्याचा त्यांचा परिपाठ होता. श्रीमंत व मिजासखोर लोक सोडून दिले तर रोगी पहावयास नेण्याकरितां कोणी टांगा आणलेलाही त्यांना आवडला नाहीं, व कोणी आग्रहानें आणलाच तर, ते अतिशय नाराज झालेले दिसत, चटकन् कधीं रोगी पहावयास गेले आहेत, असें होत नसे. 'आज येतों, उद्यां येतों, आत्तां येतों, मग येतों, या गुरुवारीं येतों, आज तर काय अमावास्या आहे, आजचा दिवस जाऊं द्या,' असें करतां करतां, दिवसचे दिवस निघून जात, व त्यांचा मतलब न कळल्यामुळें रोगी व त्याच्या येथील माणसेंही निराश होऊन जात; परंतु असें करण्यांत त्यांचें धोरण काय असे, याचें दिग्दर्शन मागें केलेंच आहे.

एकदां त्यांना विचारलें होतें कीं, 'रोग्यानें निव्वळ दुधावरच रहावें, असा सर्वच रोगांत तुमचा कटाक्ष कां? रोगी तर तसें करीत नाहीं, तोंडावर 'हो' म्हणून मागें भातबित कांहीं तरी खातातच!' तेव्हां ते म्हणाले, 'हें काय मला माहीत नाहीं? सर्वच रोगांत एकरसाची एवढी गरजही नसते, परंतु

मी जेव्हां इतका कडक निर्बंध करतों तेव्हां हे कुठें भीत भीत थोडासा भात खातात; आणि मीच जर भात खाण्याची परवानगी देईन, तर पालटवाण्याच्या निमित्तानें यांनीं हरभऱ्याची उसळ आणि बटाट्याची भाजी खाल्लीच म्हणून समजावें' कित्येक रोग्यांना दुग्धाहार वावडा आहे, व कित्येक माणसांना तो अपथ्य आहे, या समजुतीवर ते असें सांगत कीं, 'दुग्धाहार हा कोणाच्याही प्रकृतीस अपथ्य असण्याचें खरोखर कारण नाहीं. तें जीवाचें ईश्वरनिर्मित मूळ अन्न आहे. केवळ रक्त पिऊन राहणारा वाघ देखील आधीं वाघिणीचें दूध पिऊनच जगतो व वाढतो. त्याच्याकरितां वाघिणीच्या थानांतून कांहीं रक्ताची धार येत नाहीं. कोणचाही नवा आहार युक्तीनेंच सुरू करावा लागतो, तसें दुधासही करावें लागणारच. तसें केलें असतां कोणासही दूध मानवण्यास पंचाईत पडूं नये.' अशा अनेक कारणांनीं त्यांनीं दुग्धाहारावर फार भर ठेवला होता. आणि पूर्वी लोकांसही तो आहार सोईचा पडे. परंतु अलीकडे दूध, तूप, वगैरे पदार्थांचे अगदींच आंडूक्‍व झाल्याकारणानें दुग्धाहार सांगावयास खुद्द त्यांचें त्यांनाच पुष्कळ वेळां जड वाटे. साधारण कोणत्याही स्थितींतल्या रोग्यास खाण्याजोगता निरुपद्रवी पदार्थ म्हणजे साळीच्या लाह्या आहेत, असें त्यांचें मत होतें, व तसें तें सांगतही.*

बहुतेक सर्व रोगांशीं अपचन व कृमि यांचा संबंध असल्यामुळें रोग्यास प्रथमतः पुष्कळवेळां, व क्वचित् मधून मधून सँटोनाइन देऊन टाकीत. आणि अगदींच साधारण केसें सोडली तर रोग्यास मूत्रपरीक्षा करून आणण्यास सांगत, आणि ती मूत्रपरीक्षाही नुसता कागद टाकून केलेली त्यांना चालत नसे, सबंध दिवसाची लघ्वी धरून मायक्रॉसकोप खालीं घातल्याखेरीज परीक्षा पुरी झाली असें त्यांना वाटत नसे. आणि खरोखरच अशा परीक्षेंत पुष्कळवेळां कांहीं तरी नवें सांपडे. रोगी आला असतां प्रथमतः इतक्या खोलांत न जातां, वरवर पाहून कांहीं निदान ठरवावयाचें, व मग प्रयोगाखालीं तो अर्धमेला झाला कीं 'थांबा, आपण त्याची लघवी तपासून पाहूं,' अशी सरसहा पद्धत

---

* सन्निपातासारख्या रोगांत जेथें रोग्यास दूध देखील देण्याची शास्त्रानें मनाई आहे तेथें देखील साळीच्या लाह्यांचें पाणी देण्यास हरकत नाहीं असें ते सांगत असत.

असलेल्या डॉक्टरांना अर्थातच असें करणें नादिष्टपणाचें वाटे. जरा जास्त अवस्थेंतला एकादा स्त्रीरोगी आला असतां,लगेच लेडी डॉक्टरकडून गर्भाशयाची वगैरे परीक्षा करून घेण्यास सांगत, व क्वचित्प्रसंगीं एक्सरेजचे फोटो वगैरे घेण्यास सांगत. पूर्वी कँपमध्यें मिस रोज ही डॉक्टरीण प्रसिद्ध असल्यामुळें बहुत-करून तिच्याकडे जावयास सांगत, व अलीकडे मिसेस कीर्तनें या डॉक्टरिणी-कडे जावयास सांगत. अण्णासाहेब यांस कशातऱ्हेची माहिती लागे, हें त्यांनाहि ठाऊक असल्यामुळें त्यांच्याकडून परीक्षा करून घेणेंच रोग्यास इष्ट असे. मूत्रपरीक्षा, करण्याचें काम बहुतेक डॉक्टर छत्रे यांचेकडे येई, व एरवीं कांहीं आंग्लवैद्यकाचा संबंध लागल्यास डॉक्टर सुंदरलाल मोदी यांच्याकडे जावयास सांगत.

अगदीं पूर्वी यांनीं औषधें सांगावीं व ज्यानें त्यानें, अथवा जमलेल्या लोकां-पैकींच कोणीं तरी फेरबदलानें लिहून द्यावीं,असें चाले. अखेरच्या पंधरा सोळा वर्षांत रा. पाळंदे यांनीं काढिलेलें व पुढें भिषग्रत्न गंगाधर कृष्ण जोशी यांनीं चालविलेलें काष्ठौषधी विकण्याचें दुकान निघालें. त्याच्याकरतां म्हणून ते स्वतःच लिहावयास बसत, व स्वतःचे छापील फार्महीं लिहिण्यास घेत. या योगानें लोकांची सोय होऊन शास्त्रीबोवांचेंही कल्याण झालें. असो. अशा-रीतीनें हें काम वर्षानुवर्ष अव्याहत चाललें होतें, आणि त्यामुळें शेंकडों हजारों तर काय, परंतु लक्षावधी लोकांचें कल्याण झालें. त्याचा इतिहास जर प्रयत्नपूर्वक कोणी मिळविला तर आर्यवैद्यकास अतिशय अमूल्य लाभ होईल, यांत संशय नाहीं. वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें स्वतःजवळ असलेल्या दुकानच्या याद्यांवरून अखेरच्या १५।१६ वर्षांचा आपला अनुभव' वैद्य गंगाधरशास्त्री यांनीं लोकांपुढें मांडून आर्यवैद्यकाची अमोल सेवा करण्याचें श्रेय अवश्य घ्यावें, अशी आमची त्यांस विनंति आहे.

# श्री अण्णासाहेब यांचीं दोन स्तोत्रें.

॥ श्रीः ॥

श्रीमन्महाराष्ट्रभुवो हृदीव ।
मूळामुठापंचनदीप्रवाहैः[1] ॥
संवेष्टिते पुण्यपुरे विशाले ।
योगेश्वरः श्रीशविनायकोऽयम् ॥ १ ॥
जातः कुले श्रीपटवर्धनानाम् ।
कौंडण्यगोत्रस्य च मंडनानाम् ॥
योऽभूत्स्वयं मंडनमुत्तमांगे ।
योगेश्वरः श्रीशविनायकोऽयम् ॥ २ ॥
भौमेऽसिते माधवमासि रम्ये ।
प्रातः शके नंदरसाब्धिचंद्रे ॥
आक्रोशमाकर्ण्य हतार्यभूमे-
र्योगेश्वरो ह्याविरभूच्चतुर्थ्याम् ॥ ३ ॥
रामाभिधस्तात उदग्रमूर्तिः ।
श्रीजानकी मातृपदप्रतिष्ठा ॥
संसारमुक्त्योरभिसंगमोऽयम् ।
योगेश्वरस्तत्फलमेव दिव्यम् ॥ ४ ॥
सा केतकीपत्रसुगौरमूर्तिः ।
साकेतकेशस्ययशःप्रपूर्तिः[2] ॥

---

१ मूळा, मुठा, नाग, माणका आणि अंबा या पूर्वींच्या पुण्यांतील पांच नद्या.

२ श्रीरामायणे स्त्रीपरायणता, शोकक्षोभौ, युद्धेऽपसृतिरित्यादयो दोषाः कृतमानुषावतारेण श्रीभगवता प्रकटिताः । अत्र तेऽपि न । अत एव साकेतकेशस्य यशःप्रपूर्तिरिति वाक् ।

संकेतरेखा नवभारतस्य ।
दृशां नराणां कृतकृत्यतैव ॥ ५ ॥
अपूर्ववैराग्यमपूर्ववीर्यम् ।
अपूर्वपांडित्यमपूर्वशांतिः ॥
अपूर्वनैष्कर्म्यमपूर्वकर्म ।
सर्वं तथापूर्वमलक्षितं तत् ॥ ६ ॥
अपूर्वता स्नेहविरागयोश्च ।
स स्वाभिमानोऽपि न दृष्टपूर्वः ॥
सर्वस्य बीजं नवभारतस्य ।
दयामयेनोप्तमदृष्टभूमौ ॥ ७ ॥
कृतं त्वया न श्वसनं निजार्थम् ।
अन्यस्य भोगस्य कथा कथं स्यात् ॥
आविश्रमोऽनिद्र उपोषितो वा ।
कृतास्मदर्थे तपसां कृषिः सा ॥ ८ ॥
यथा पचस्यन्नमिहोदरे वा ।
यथा स्वयं प्रेरयसींद्रियाणि ॥
यथा न तत् ज्ञातुमहं समर्थ-
स्तथा कृतं कोऽपि न वेत्ति लोके ॥ ९ ॥
परं त्वदीयेन कृपालवेन ।
कृता मया वाक्पटुता यथैषा ॥
तथैव पादांबुजयोर्विलीनां ।
भक्तिं दृढां मे त्वयि संतनोतु ॥ १० ॥
आर्याणामपि सर्वेषां द्रुतं योगेश्वर प्रभो ।
संहृत्याशेषदारिद्र्यं यत्कल्याणं प्रयच्छ तत् ॥ ११ ॥

शके १८४० मार्गशीर्ष शु॥ ९. गुरुवासर.

---

॥ श्रीः ॥

स्तुतोऽसि त्वं स्वामिन् कविभिरपि वाक्कंठमणिभि-
र्न वेदैः पारं ते वरगुणगुणानामधिगतम् ॥
तथापि त्वां स्तोतुं प्रभवति यदा मादृशनरो ।
न तच्चित्रं चित्रं भवति महतांचापि विदुषां ॥ १ ॥
न जाने साहित्यं मृदुलपदलालित्यमपि वा ।
न वा प्रेमस्फूर्तिं न च वरदवाङ् मे रसवती ॥
न जाने ते लीलां जडवचनशीलां गुणवतीं ।
न वा ध्याता मूर्तिर्मधुरतरसीमा भगवती ॥ २ ॥
स्तुतिं पुण्यां दिव्यां निजशिशुवचोभी रचयितुं ।
यदुद्युक्तो मोहात्सकलमपि तत्बालचरितम् ।
इति क्षंतव्यं ते परमकरुणासान्द्रहृदये ।
कृतिर्मे कर्तव्या कृतिकविकुले कौतुकवती ॥ ३ ॥
अहो त्यक्त्वा किं वा मधुप इव दुर्वासनमिदं
सदा गुंजन् गीतं तदुदितसुधापानमुदितः ॥
प्रमत्तोऽहं विश्वं कमलमिव मन्ये कथमिति ।
विना त्वां कश्चिताज्वरशमनकार्ये प्रभुरिह ॥ ४ ॥
कलिक्रांतां भूमिं भरतनृपतेरार्यचरिताम् ।
विलोक्यानार्यैःस्तां पिशुनचरितैरार्दितवतीम् ॥
पुनर्भूतिं यायादिति तपति यः कर्कशतप-
स्तनुं धृत्वा रम्यां शुचितरकुले पुण्यनगरे ॥ ५ ॥
परेषां तंत्रेऽस्तंगमितमहिमानो जनपदा ।
भवन्त्यप्यास्ते निजवधपराभ्रष्टमतयः ॥
समीक्ष्येदं तेषां पुनरपि यथाचोदनामिति ।
स्वकीयं चारित्र्यं प्रथममकरोदुद्यममयम् ॥ ६ ॥
अनार्याः खल्वर्धस्वरितवचनैर्वेट्पुटमयै-
र्भवेद् वाग्येषां तेऽप्यवददिति यो युक्तवचनम् ॥

अनार्या तन्नीतिः श्रुतिपथविरुद्धा कृतिरतो ।
न तेषां यद् ध्येयं न तु समुचिता संस्कृतिरपि ॥ ७ ॥
सुराज्यं स्वे तंत्रे किमपि न परस्मिन्नपि सति ।
सुराज्ये जीवानां सकलपुरुषार्थाः सुखमपि ॥
सुखं सर्वेषां तत्सदसदिति वैयक्तिकमहो ।
कथं तद्भूत्यर्थं प्रभवति विना तस्य यजनम् ॥ ८ ॥
इति ज्ञात्वा तत्त्वं रहसि कृतवानद्भुतमिमम् ।
क्रतुं स्वत्वं हुत्वा प्रखरतपसां हव्यहवने ॥
भवत्वैश्वर्यं तत्पुनरिति यथापूर्वमचलम् ।
पृथग्देहं त्यक्त्वा स्वजनमविशद्यज्ञपुरुषः ॥ ९ ॥
यथाकालं सर्वं भवति हि यथा तेन रचितम् ।
अविज्ञायाप्येतद्भवति सुखभाक् भारतजनः ॥
न शंका काप्यत्राभवदिव हि पश्यामि चरितम् ।
तथा पश्यंत्येते प्रथितमचिरेणाथ जगति ॥ १० ॥

मूर्तिं कथं नयनयोर्मम कौमुदी या ।
गात्रेषु जीवनरसं वितरष्यतीव ॥
पश्यामि जीवनमिदं विकलं विमूढ-
मित्थं तया विरहितं ननु भूतिभिः किम् ॥ ११ ॥
येषामर्थे कांक्षितं सर्वमेतत् ।
दत्तं तेषां तत्सुखं सर्वमस्तु ॥
शास्त्रे पूर्वं वारणं बालकानाम् ।
कार्यं जानास्यर्भकः केवलोऽहम् ॥ १२ ॥

माहात्म्यं ननु जानामि न तत्र रमते मनः ।
योगेश्वर प्रभो रूपं चारु दर्शय तत्पुनः ॥ १३ ॥

काठेवाड, शके १८४३ चैत्र शु॥ १३. सोमवार.

---

# खंड ३ रा.

# चातुर्वर्ण्य.

वैदिक संस्कृतीच्या प्रत्येक आभिमान्याप्रमाणें अण्णासाहेबांसही वर्णाश्रमधर्मसंस्थेचा अत्यंत आभिमान होता. मानवसंस्कृतीचें इतकें अत्युच्च स्वरूप आणि संस्कृत भाषेइतकी परिणत भाषा इतर कोठेंही सांपडावयाची नाहीं, अशी त्यांची ठाम समजूत होती. अर्वाचीन पद्धतीनें वैदिक संस्कृतीचा आणि तिच्यापासून झालेल्या पुढील प्रपंचाचा विचार करणाऱ्या विद्वानांनीं कांहीं अत्यंत सरळ गोष्टी लक्षांत न ठेवल्यामुळें, या अभ्यासांत अंतर्मुखता त्यांस कधींच येत नाहीं, आणि त्यामुळें तिचें खरोखर हृद्गत ओळखणें त्यांस शक्य नाहीं. दोन पैशांस ५ आंबे तर ५ पैशास केळीं किती, असा प्रश्न विचारला असतां चट्दिशीं १५ अगर असेंच कांहीं उत्तर देणाऱ्या लहान मुलाइतकीच यांची चतुराई दिसून येते.

कोणच्याही शास्त्राचा संगतवार अभ्यास करावयाचा म्हणजे ज्या मूलतत्त्वांवर तीं उभारलेलीं असतात, तीं जशींच्या तशीं घेऊनच त्यांतील सर्व चिंत्य गोष्टींची उपपत्ति बसवावी लागते. तीं मूलतत्त्वें ग्राह्य आहेत किंवा नाहींत, आणि म्हणून त्यांच्यावरील सर्व रचनाच ग्राह्य आहे किंवा अग्राह्य आहे, हा प्रश्न अलाहिदा आहे. परंतु त्यांतील चिंत्य गोष्टींचें रहस्य आणि कार्यकारणभाव उमगण्यास, तरी तीं तत्त्वें जशींच्या तशींच घेतलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें वैदिक संस्कृति आणि अर्वाचीन संस्कृति यांचा तुलनात्मक विचार करतांना अथवा वैदिक संस्कृतींतील अनेक गहनप्रश्नांचा निकाल लावतांना व त्यांची उपयुक्तता ठरवितांना एक मोठी चूक होते. अर्वाचीन संस्कृति ही अनुगमावस्थेंत असल्यामुळें, आणि ज्या एकाद्या प्रचंड तत्त्वांत तिच्या सर्व अंगप्रत्यंगांचा समन्वय करतां येईल, असें कोणचेंही तत्त्व तिच्या आदीं अंतीं नसल्यामुळें, तिच्यांतील सर्वस्थूल सूक्ष्म शास्त्रें आणि संशोधनपद्धति यांच्या सरणी तिच्याहून स्वभावतःच भिन्न असलेल्या निर्गत अवस्थेंतील वैदिक संस्कृतीचीं कोडीं उलगडण्यास लावण्यांत येतात; आणि त्यामुळें ‘ यद्वा तद्वा भविष्यति ’ असें कांहींतरी निष्पन्न होतें. त्यामुळें कदाचित् उपयुक्ततेच्या दृष्टीनें प्रस्तुतकाळीं कांहीं फायदा होत असेल; परंतु हा कांहीं खरा अभ्यास अथवा

त्या वस्तूचें हृद्गत खरें समजणें नव्हे. काय आहे हें प्रथमतः जसेंच्या तसें समजून घ्या आणि मग एकाद्या विशेष दृष्टीनें त्याची उपयुक्तता आणि ग्राह्या-ग्राह्यता पहा.

पाश्चात्य संस्कृति कोणच्याही एका निश्चित तत्त्वावर नसल्यामुळें एकाद्या गोष्टीचें मूळ शोधतांना माणसांच्या डोक्यांत जितक्या कल्पना येऊं शकतील, तितकीं सारीं कारणें संभवनीय ठरतात, आणि प्रत्येक गोष्टीस कांहीं तरी सामाजिक उपयुक्तता अथवा मनुष्याचें अज्ञान आणि लबाडी हेंच मूळ कारण आहे, असल्या दृढ ग्रहावर त्यांचें सारें संशोधन असल्यामुळें, त्यांना इतर संस्कृतीचें अंतरंग कळणें शक्य नाहीं. याशिवाय, ऐतिहासिक कालाची अत्यंत संकुचित कल्पना स्वतःचें श्रेष्ठत्व स्थापित करण्याचा दुरभिमान, इत्यादि दोषांमुळें पाश्चात्य पंडितांची अत्यंत प्रशंसनीय तपश्चर्याही परिणामीं सत्य-पराङ्मुखच असते. पाश्चात्य गुरूपासून संशोधनाच्या पद्धति शिकलेल्या आमच्या हिंदी विद्वानांच्याही बाबतींत तर हें अधिक प्रमाणानेंच भरतें. ज्या पायावर हल्लींची आमची संस्कृति आहे,ती वर्णाश्रमधर्मसंस्कृति आणि तिला बीजभूत असलेली वैदिक संस्कृति, या फार पूर्वींच नष्टप्राय झाल्यामुळें, आणि ज्या सामग्रीवर म्हणजे वाङ्मय आणि आचारादिक इतर साधनें यांच्यावर हें संशोधन व्हावयाचें त्या सामग्रींत या तिन्ही संस्कृतावस्थांची सरमिसळ झाल्यामुळें तर अतिशयच कठीण काम झालें आहे. अशा वेळीं, या तीन अवस्थांची भिन्नता आणि एकरूपता, त्यांच्यांत अवस्थांतरें होण्याचीं कारणें, आणि त्या दृष्टीनें त्यांची उपयुक्तता, या सर्वांचा समन्वय न करतां कांहींतरी अनुगमावस्थेंतील कल्पना डोक्यांत घेऊन विचार करणारांनीं काढलेलीं अनुमानें सुंदर दिसलीं तरी सत्यास धरून कशीं होतील ? हाच प्रकार वर्णाश्रमसंस्थेच्याही बाबतींत झाला आहे. श्रमविभागाच्या तत्त्वावर चातुर्वर्ण्याची उत्पत्ति आणि इतर सर्व वर्णांस विद्यावंचित करून स्वतःचेंच श्रेष्ठत्व अबाधित ठेवण्यांत ब्राम्हणांनीं केलेली लबाडी, यांच्यावर त्याचें जीवित्व आहे, असें यांनीं ठरविलें आहे.

पूर्वीं केव्हां तरी समाजांत सारीच सवर्णता असून चातुर्वर्ण्य हें मागून निर्माण झालें,याविषयीं संस्कृत वाङ्मयांत एकवाक्यता आहे.आणि त्याप्रमाणें पुन्हा सवर्णता करणें अवश्य वाटल्यास तसे करणें अवश्य म्हणून करा; परंतु तेवढ्याकरतां चातुर्वर्ण्याचें मूळस्वरूप विकृत करूं नका. वैदिक संस्कृतीचा अभ्यास करणारांनीं ही

संस्कृति अज्ञानांतून निघाली आहे ही कल्पना सोडून दिली पाहिजे. ऋषींनीं अतींद्रिय ज्ञानाच्या साहाय्यानें या संस्कृतीची रचना केली, असें म्हणणें जर भोळवटपणाचें वाटत असेल, तर पाहिजे तर तसें म्हणूं नका; परंतु ज्या संस्कृतींत कामशास्त्रापासून तों ब्रह्मविद्येपर्यंत सर्व अंगप्रत्यंगांत कांहीं तरी एकसूत्रीपणा दिसून येतो, आणि अत्यंत श्रेष्ठ अशा तत्त्वज्ञानाचा आधार त्यास आहे ती संस्कृति अजाणपणांतून निघाली आहे, असें म्हणणें क्षुद्रपणाचें आहे. नानाप्रकारच्या स्थितींचा अनुभव घेऊन सांप्रतच्या अवस्थेंत आलेल्या पाश्चात्यसंस्कृतीसही हळूहळू या नाहीं त्या रूपानें तींच तत्त्वें मान्य करावीं लागत आहेत, व त्याच वळणावर समाजानें जाण्याची आवश्यकता वाटत आहे. परंतु हें आमचें आद्यज्ञान नाहीं आणि शहाणपणाच्या बाबतींत एकादें वडील भावंड आपणास आहे, हें कबूल करणें त्यांच्या 'निर्वीरमुर्वीतलम्' अशा रगेल समजुतीस लाजिरवाणें वाटतें, आणि शुद्धबुध्दीचे भ्रामक वेड घेऊन बसणाऱ्या आमच्या इकडील महात्म्यांना तें संकुचितपणाचें वाटतें.

निरनिराळ्या तऱ्हेच्या सर्व उत्क्रांतींतून वर गेलेल्या एका अत्यंत विशाल संस्कृतीची परिणतावस्था म्हणजेच मूळ वैदिक संस्कृति. मनुष्याच्या आयुष्याचें आणि विश्वाच्या अस्तित्वाचें, त्यांच्या परस्परसंबंधाचें 'आणि पर्यवसनाचें सर्व कोडें उत्तम रितीनें सोडवल्याखेरीज त्या संस्कृतीस परिणतावस्था येणें, आणि तिच्यांत एकसूत्रीपणा असणें शक्य नाहीं. या पूर्ण वैदिक संस्कृतीनें हें कोडें 'एकमेवाद्वितीयम्' या महावाक्यानें सोडवलें, आणि या आधारभूत सूत्रावर वैदिक संस्कृतीची रचना केली. त्यामुळें वैदिकसंस्कृति, वर्णाश्रमधर्मसंस्कृति, पौराणिक संस्कृति, आणि या सर्वांची हल्लींची विकृति हीं सर्व वस्तुतः या मूळ स्वरूपापासून उतरत आलेली, परंतु त्या मूळ स्वरूपास न सोडतां घट्ट धरून ठेवण्याची धडपड करीत असलेलीं दिसतात, आणि म्हणूनच पुढील सर्व तऱ्हेचे फरक वस्तुतः उत्क्रांतीच्या पायऱ्या नसून अधःपातास घातलेले तात्पुरते अडसर आहेत. चातुर्वर्ण्य हाही असाच एक मोठा अडसर आहे, आणि त्याची उत्पत्ति श्रमविभागाच्या तत्वावर बसवलेली नसून निरनिराळ्या शरिरांच्या ब्रह्मविद्याशास्त्राच्या तत्वांस अनुसरून लागणाऱ्या क्षमतेच्या विभागावर केली आहे.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, 'एकमेवाद्वितियम्' या महावाक्याची प्रत्यक्ष

प्रतीति हें मानवी जीविताचें आणि सर्व विश्वव्यापाराचें अंतिम ठरलें. त्याचा प्रतिसिद्धांत म्हणून हेंहि सहज ठरलें कीं, कोणासहीं या जगांत एकट्याचें हित या अंतिम ध्येयाच्या दृष्टीनें सर्व जगांस सोडून एकटेंच करून घेतां येणार नाहीं; आणि म्हणूनच यच्चयावत् सर्व अस्तित्व परस्पराश्रयी असल्यामुळें 'परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ' हाच शेवटीं श्रेयाचा रस्ता ठरला. 'एकमेवाद्वितीयम्' असें जें कांहीं अनिर्वाच्य असेल, त्याच्या आणि या इंद्रियगोचर विश्वाच्या मधें अगोचर अशा अस्तित्वाच्या, सूक्ष्म सूक्ष्मतर पायऱ्या आहेत, आणि 'परस्परं भावयंतः' अशा रीतीनें या अंतिम ध्येयाची सर्वांसच आणि सर्वांमिळती व्यक्तीस प्राप्ति व्हावयाची, म्हणजे ह्या सूक्ष्मतर अस्तित्वकोटी विसरून चालावयाचें नाहीं. ह्या सर्वांनीं परस्परांस धरून यत्न केले असतां सर्वांसच, आणि अर्थात् त्या मिळती व्यक्तीसही त्या ध्येयाची अढळप्राप्ती लवकरच होईल. यावरून त्या शास्त्रकारांनीं असा तिसरा सिद्धांत सांगितला कीं, व्यक्तींस विश्वाकरितां काम करतां येतें. असें काम व्यक्तीस करतां यावें, विश्व आणि व्यक्ती यांचा मृत्यूशिवाय न उघडणारा परस्वाधीन पडदा निघून जाऊन स्वाधीनतेनें उभयतांत दळणवळण सुरू व्हावें, आणि येवढी उच्च पायरी प्रत्येक व्यक्तीस जरी गाठतां आली नाहीं, तरी प्रत्येक व्यक्तीची सर्व क्रिया अशी व्हावी कीं, तिच्या योगानें, परस्परांस उपयोग होऊन श्रेय मिळावें. केवळ भौतिक जडेंद्रियव्यापारांनीं ही गोष्ट घडणें सर्वथा शक्य नाहीं. यास मानवी शरीरांत ज्या अतिमानुष शक्ति क्रिया करतात, त्यांचेंच साह्य घेतलें पाहिजे. आणि जेणेंकरून तें होईल असेंच मानवी शरीर वागलें पाहिजे. अथवा अण्णासाहेबांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे The root principle of the transendental science, is the drowning & merging of individualism, including all the Concomittant notions of separation, exclusiveness and the like, into the active universal whole; and to teach the methods by which conscious communication can be established between the groups of Powers as exhibited in the outer world on the one hand and the inner world of knowledge, on other hand, such knowledge being in part exhibited by a condition of (एकमेवाद्वितियम्) At man, or

Soul called consciousness, and also to teach the ways by which the several powers etc. can be generated and manifested independantly of the outer world. हें कसें घडून येईल, आणि त्याची परंपरा नित्य कशी टिकेल, असा दूरवर विचार करून जी समाजरचना केली, तिचें नांव चातुर्वर्ण्य. श्रमविभाग हें या संस्थेचें रहस्य नसून आपआपल्या परीनें सर्वोपयोगी असे श्रम शक्य तितके जास्त आणि चांगले कसे करतां येतील, हें या संस्थेचें रहस्य आहे.

अनेक प्रकारचे प्रयोग केल्यावर त्यांना असें आढळून आलें कीं या विश्वोत्पत्तीच्या मूलस्थानीं सर्वत्र ध्वनीच असून आणि हें विश्व त्या ठिकाणीं अभेद-रूप होतें. व्यक्ततेला आरंभ झाल्याबरोबर हा ध्वनीच जसजसा जास्त स्पष्ट होऊं लागला, तसतसा त्यास मर्यादितपणा येऊन तो साकार आणि सरूप दिसूं लागला. म्हणून ध्वनी आणि हें साकार सरूप विश्व हीं परस्परांचीच वेगळीं वेगळीं रूपें आहेत; आणि म्हणूनच नाम आणि रूप, अथवा पद म्हणजे शब्द आणि त्याचा अर्थ म्हणजे वस्तु, हें द्वंद्व अस्तित्वांत आलें. अर्थातच यांचा जन्यजनकसंबंध आहे. बाह्यवस्तूंतून ध्वनी आणि ध्वनीपासून बाह्य वस्तु निर्माण होते, म्हणजे त्यांचे एकमेकांत रूपांतर करतां येतें. एवढेंच कीं बाह्यवस्तूचा मूलस्थानींय ध्वनी कोणचा हें नक्की कळलें पाहिजे.

व्यवहाराकरितां मानवी संकेतानें निरनिराळ्या भाषारूप जे ध्वनी ठरविले जातात ते अर्थातच नाम आणि रूप यांच्या या मूळ संबंधास अनुसरून नस-तात. म्हणून ते पालटतात आणि भाषापरत्वे त्याच वस्तूचें द्योतक असे अनेक संकेत होऊं शकतात. परंतु शब्द आणि अर्थ यांचा जो हा सृष्टींतील संबंध तो स्वयंभू असून कोणीं केलेला नाहीं, आणि कोणास तो पालटतां येणार नाहीं. म्हणून तो नित्यसिद्ध अखंड आणि चिच्छक्तीनें युक्त असा आहे. परंतु मूलस्थानीय ध्वनि या मानवयंत्रांतून बाहेर पडतांना, या यंत्राच्या क्षमतेप्रमाणें ५२ मातृकांचे स्थूल रूप घेऊनच बाहेर पडणार आणि त्यामुळें मनुष्याच्या वाचेनें होणाऱ्या उच्चारांत संकेतकृतभाषा व एकाद्या वस्तूचे हे मूलध्वनि मूलस्थानीं उत्पन्न होतील असे कांहीं उच्चार, त्या वस्तूसंबंधानें उत्पन्न होतील, मग हा संबंध त्यास कळो अथवा न कळो. ही जी दुसऱ्या प्रकारच्या उच्चारांची भाषा तिलाच वेद अथवा छंद ( म्हणजे गूढ अथवा झांकून टाकणारी ) आणि

पहिल्या प्रतीच्या भाषेस संस्कृत ( म्हणजे सुलभ, अथवा जिच्यांत शब्दार्थांचे संबंध वेगवेगळे न राहतां एकत्र झाले आहेत अशी भाषा ) अशीं नांवें दिलीं. म्हणून वेद हे अपौरुषेय नित्यसिद्ध,सृष्टीच्या उत्पत्तीच्या पूर्वीचे असून, सृष्टी ही त्यांचे व्यक्त स्वरूप आहे. यास्तव सृष्ट वस्तु अथवा सृष्टिकार्य हा वेदांचा खरा अर्थ होय. मग मानवी संकेतास अनुसरून दुसरा एकादा अर्थ होईल अथवा होणार नाहीं. इतर कोणच्याही वस्तूंपेक्षां वाक्शक्ति ही प्रत्येकास सुलभ असल्याकारणानें, या वेदशक्तीच्या शास्त्रावर आपलें इष्टकार्य घडवून आणण्याचा त्यांनीं यत्न केला. अण्णासाहेबांनीं स्वत: ही गोष्ट खालील शब्दांनीं सांगितली आहे.

The power in a substance of selecting its own form of cristalization is certainly a living power. As all the powers proceed from the souls or active part of the supreme being ( एकमेवाद्वितीयम् ) the modes of the action, must be considered to be determined by the soul, and it is for the simple reason, that all kinds of powers. being various modes or degrees of motion are found to be interchangeable. The colour, light, heat, magnetism or the like being forms of motion, are mutually convertible and as sound is a form of conscious motion of the soul, and as direct consciousness of external objects, including mental consciousness, etc. can be produced by means of the practise of the transcendental sicience homogineity, and correspondence becomes directly established between the sound on the one hand and the external object on the other, and thus sound can be and has been made to aasume all forms of conceivable and conscious living motion...Thus the whole universe was a sort of Conjela--tion of sound. Thus the gifted individuals of the Vaidic-race early recognized that sound was itself an independent creative power.

याप्रमाणें ध्वनी ही एक स्वतंत्र उत्पादक शक्ति ठरल्यावर आणि ध्वनि-

शास्त्रावर आपला हेतू सिद्धीस न्यावयाचा असें ठरल्यावर, जेणेंकरून तो ध्वनी व्यक्त सृष्टींतील इष्ट कार्यांचें मूलभूतध्वनीच मूलस्थानीं उत्पन्न करील, आणि जशी मूलस्थानीं उत्पत्ती झाली, तशीच, म्हणजे त्यांतील वीर्य क्षीण न होतां त्याची वैखरीनें वाच्यता होईल, हें अवश्य झालें. म्हणून ज्या शरीरयंत्रांतून तो ध्वनी बाहेर येईल तें यंत्र विशिष्ट स्थितींत असणें जरूर झालें. निरनिराळ्या हॉर्सपॉवरच्या एंजिनांत जर वाफेची शक्ति कोंडली गेली, तर तिचे जसे—तें एंजिन व्यवस्थेशीर चालविणें, बेफाम होऊन वाटेल तिकडे जाऊन दुसऱ्या वस्तूचा नाश करून कोठें तरी अडकून पडणें, अथवा ठायींच तडकून फुटून जाणें, असे वेगवेगळाले परिणाम होतील, तसेंच शरीरांत वाक्शक्ती उत्पन्न झाली, तर घडून येतील. ब्रह्मदेवानें उच्चारलेलीं अमूर्तवाचा अथवा वेद यांच्या परस्परसंबंधांत कांहीं अधडळा नसल्यामुळें ब्रह्मदेवाची मूर्त होत होत सृष्टीरूपानें अप्रतिहत प्रगट होते. मानवी शरीरांत सर्व क्रिया प्राणाच्या आधारें प्रगट होतात; आणि बहात्तर हजार प्रकारच्या निरानिराळ्या प्रवाहरूपानें शरीराचे लक्षावधी व्यापार करितात. या सर्व प्रवाहांतून शक्तीचा प्रवाह अव्याहत असेल तर तें शरीर खरोखर प्रकृतिस्थ आहे; आणि ब्रह्मांडाशीं त्याचें साधर्म्य असल्यामुळें तारेनें विणलेलें जाळीचें भांडें पाण्यांत बुडवून ठेवावें, त्याप्रमाणें त्या भांड्यांत आणि विश्वांत सर्व क्रिया एकरूपच असते. हे प्रवाह जसजसे आणि जितक्या कमीअधिक प्रमाणानें मोकळीं असतील तितक्या प्रमाणानें विश्वापासून तें शरीर व त्याचे व्यापार हे तुटक होतात. हे सारे प्रवाह ज्या वेळेस बंद होतात, त्या वेळेला शरीरास मृत्यु येतो. शरीर चालण्यास पांच इंद्रियें आणि मन यांचे व्यापार होण्यापुरते तरी प्रवाह मोकळे पाहिजेत; म्हणूनच "जरी मी जीवरूपानें वास करतों, तरी देखील मनासह इंद्रियें प्रकृतिस्थ असतील तरच हें शरीर चालवितों,' असें भगवंतांनीं गीतेंत म्हटलें आहे. अशा प्रकारचीं सर्वांत जास्त प्रकृतिस्थ शरीरें निवडून काढून, त्यांच्याकडे वेदोच्चाराचें काम दिलें असतां त्याचा समाजास आणि समाजमिळती स्वतःसही फायदा होऊन दोघांचेंही कल्याण होईल, हें उघड आहे.

वर संकलित केलेल्या एकंदर मूल तत्त्वांवरून ध्यानांत येईल कीं, वेदोच्चाराच्या दृष्टीनें चार प्रकारचीं शरीरें असूं शकतील. एकतर अशीं कांहीं शरीरें असूं शकतील कीं ज्यांमध्यें शब्द आणि अर्थ यांच्यांतील हा संबंध-

रूप प्रवाह अथवा पतंजलीच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे 'शब्दार्थप्रत्यय' अबाधित असूं शकेल. अर्थात् त्या यंत्रांतून बाहेर पडणारी वेदवाणी ही त्या यंत्रास व सर्वांसच हितकारी होऊं शकेल त्याप्रमाणें अशींही कांहीं शरीरें असतील कीं, त्यांच्यातून निघणारी वाणी ही जशीच्या तशी बाहेर पडत नसल्यामुळें ती स्वतःस उपकारक होत असली तरी इतरांस तिचा उपयोग होत नाहीं अथवा कदाचित् अशाही विकृततेनें बाहेर पडेल कीं त्यामुळें इतरांस अनिष्ट असेच परिणाम होतील. त्याचप्रमाणें कांहीं शरीर प्रकृति इतक्या बिघडल्या असतील कीं वेदांचा उच्चार होणें इतरांच्या आणि खुद्द त्यांच्याही अनर्थास कारण होईल तसेंच स्वतःस फायदेशीर असलेली वाणी देखील, तिचा फायदा दोन तऱ्हेनें देऊं शकेल. म्हणजे ज्या शरीरांत ती जवळजवळ पूर्ण प्रगट होऊन त्या शरीरास शुद्ध करून ब्रह्मविद्येस पात्र करिते, अशी,-आणि ब्रह्मविद्येस पालता आणण्याइतकी तर प्रगट होत नाहीं, परंतु सर्व तऱ्हेच्या वैषयिक सुखाची मात्र जोड करून देऊं शकते अशी;—अशा दोन तऱ्हा तिच्या असूं शकतील; आणि यावरूनच चातुर्वर्ण्य अस्तित्वांत आलें. ज्या शरीरांत वेदवाणी सर्वथैव अनिष्टच क्रिया करूं शकते, अशा शरीरांचेही दोन प्रकार होऊं शकतील. जरी वेदमार्गास योग्य नसली तरी योगादि दुसऱ्या साधनांनीं ब्रह्मविद्येस प्राप्त होऊं शकतील, अशीं कांहीं शरीरें;—आणि ज्यांच्या ठिकाणीं हें कांहींही संभवत नाहीं, अशीं केवळ खाण्यापिण्याचेंच—मग ते 'पुष्कळांचें पुष्कळ' असो, अथवा व्यक्तीचें असो,—सुख उपभोगण्याकरितांच योग्य अशी,—असे त्यांचेही दोन वर्ग असूं शकतील.

वर सांगितलेंच आहे कीं चातुर्वर्ण्याची रचना करणाऱ्या ऋषींना 'एकमेवाद्वितियम्' या महावाक्यापासून निःसृत झालेली आणि सृष्टीस उपयोगी पडणारी ब्रह्मविद्या ही जेणेंकरून चिरंजीव राहील आणि तिचा फायदा सर्वांस शक्य तितक्या सुलभ आणि जास्त रीतीनें मिळेल, असें करावयाचें होतें; आणि हें करतांनाच व्यक्तीचेंही परम कल्याण घडवून आणावयाचें होतें. व्यक्तीचें तर कल्याण व्हावयाचेंच, पण त्यांचा विश्वास उपयोग होऊन पुन्हां ती परंपरा कायम रहावयाची, अशी समाजव्यवस्था व वेदासारखें सुलभ साधन यांचा जोड घालून देऊन भुक्ति आणि मुक्ति यांचा त्यांनीं सुकाळ करून दिला. व्यक्तीची मुक्ति कोणीही पाहूं नये, म्हणून

' ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत ।
' अनपाकृत्य मोक्षं तुं सेवमानो व्रजत्यधः ॥ ' मनु०

हें महातत्त्व सांगून जेणेंकरून उत्तम रीतीनें अनृणी होतां येईल, अशी आश्रमव्यवस्था लावून दिली. या आश्रमव्यवस्थेंत गृहस्थाश्रम आणि त्यामुळें समाज व राज्य वगैरे सर्व आल्यामुळें ब्रह्मविद्येच्या तत्त्वावर म्हणजे 'आत्मौपम्येन सर्वत्र' या तत्वावर अनेक प्रकारचीं शास्त्रें उत्पन्न करून दिलीं, आणि ही समाजव्यवस्था अखंड टिकावी म्हणून तिला, अतींद्रिय जगांतून शक्तीचा पुरवठा करण्याकरितां वेदपठणाचा कारखाना काढून दिला. हा कारखाना सर्वांच्याच मालकीचा असून सर्वांवर त्याचीही सत्ता आहे म्हणून ' लोकपालक ' ब्राह्मणांनीं स्वतःकरितां अशी एकही क्रिया न करितां, केवळ वेदपठण आणि त्यास योग्य असें प्रकृतिस्थ शरीर रहाण्यास अवश्य अशी राहणी हीं संभाळून रहावें, हें ब्राह्मणांचें कर्तव्य ठरलें. या राहणीचे मुख्य भाग दोन होते. एक तर, वेदपठणास योग्य अशा रीतीनें शरीर प्रकृतिस्थ ठेवणें; हें त्यांनीं ब्राह्मणांचें नित्यकर्म, आचार, आणि षोडशसंस्कार यांच्या साहाय्यानें घडवून आणलें; दुसरें– ही शरीराची परंपरा चालण्याकरितां गृहस्थाश्रम म्हटला म्हणजे वित्तादि अनेक बाह्य साधनांची जरूर असल्यामुळें आणि पौरोहित्य हें त्यांच्याकडे देऊन, त्यांनीं सर्वांच्याच उपयोगी पडावें असें ठरवून दिलें. याच्या उलट, ब्राह्मणांचें तेज कमी होणार नाहीं, अशा रीतीनें समाजावर त्याची जबाबदारी टाकली. अग्नीनें मनुष्याचीं कार्यें करावयाचीं, आणि माणसांनीं अग्नी प्रज्वलित ठेवावयाचा, अशी ही व्यवस्था आहे.

यांच्या खालोखाल स्थान, ज्यांना वेदानें ब्रह्मविद्येची पात्रता येऊं शकेल, अशांचें आलें; कारण ब्रह्मविद्येची पात्रता " अभयं सत्वसंशुद्धिः " इत्यादि दैवी गुण असल्याखेरीज येणें शक्यच नाहीं. यांनाही वेदाच्या साह्यानें स्वतःच्या शरीराची पात्रता वाढवून ब्रह्मरूप होतां येणें शक्य होतें; परंतु त्या वेदवाणीनें इतरांचें कल्याण व्हावें, अशी ती वीर्यवती नसल्यामुळें अथवा अनर्थकारक असल्यामुळें घेण्याचें कारण नव्हतें; तेव्हां अर्थातच अनुच्चारित वेदवाणीनें स्वतःचा फायदा करून घ्यावा, आणि इतर शक्तींचा उपयोग समाजाचें हित चिंतण्यांत आणि रक्षण्यांत करावा, असें करीत असतां, साधल्यास सर्व तऱ्हेचे सुखोपभोग ब्रह्मसरूपतेस अनुकूल होतील, असे स्वाधीनतेनें घ्यावे, नाहींतर जीविताचीही

पर्वा करूं नये, हें क्षत्रियांचें कर्तव्य ठरलें; आणि त्याला योग्य असेच संस्कार व शिक्षा त्यांना लावून देण्यांत आली. ब्रह्मविद्येची पात्रता यावी एवढ्या मोठ्या कार्यास वेदमार्गाप्रमाणें ज्यांचीं शरीरें लायक नाहींत, परंतु वेदसामर्थ्यानें सर्व प्रकारच्या धर्मास अविरुद्ध असलेल्या उपयोगांनीं वासना आणि इंद्रियें हीं तृप्त करून इतर मार्गांनीं ज्यांना ब्रह्मसारूप्य मिळवितां येईल. अशा वर्गास वैश्य हें नांव दिलें आणि म्हणून या दोघांस वेद शिकण्याचा अधिकार आला, शिकवणें मात्र शक्य नव्हतें. या नंतर वेदवाणीचा ज्यांना कोणचाच उपयोग होऊं शकत नाहीं, परंतु दुसऱ्यांनीं त्यांच्याकरितां वेदविहित कार्य केलें असतां फायदा होतो, आणि इतर मार्गांनीं ब्रह्मविद्येचे अधिकारी होऊं शकतात, असा वर्ग आला. यांना ऐहिकसुखोपभोग व इतर मार्गांचें रहस्य हीं दोन्हीही प्राप्त व्हावीं म्हणून स्वतःच सर्व प्रकारची धडपड करणें भाग आहे. म्हणून त्यांच्याकडे परिचर्यात्मक कर्म आलें.

याप्रमाणें या नाहीं त्या रितीनें ब्रह्मविद्येची प्राप्ती होऊं शकेल, अशीं शरीरें निवडून काढून त्या शरीरांची बीजतः परंपरा कायम राहील, अशी राहणी आणि संस्कार ठरवून टाकले. आणि इतकेंहि करून सृष्टीच्या अर्वाक्स्रोततेमुळें परंपरेमधें जो कांहीं कमीपणा उत्पन्न होतो तो आश्रमसंस्था व तिला अनुसरून सारी समाजव्यवस्था बसवून ब्रह्मचर्य, गृहस्थ, इत्यादि आश्रमांतील अवश्य असलेल्या तपानें भरून निघावा, अशी व्यवस्था केली. या व्यवस्थेंत ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी होती कीं, त्यांनीं ठरविलेलें परमकल्याण करून घेण्यास कोणासही मनाई नव्हती, अथवा ब्राह्मणाखेरीज इतर कोणास कोणच्याही तऱ्हेची ऐहिक सुखें उपभोगण्यास अडथळा नव्हता; उलट ज्या रीतीनें सुखोपभोग घेतला असतां इंद्रियें आणि वासना यांची खरी तृप्ती होऊन मनुष्याची ओजोहानि होत नाहीं आणि पूर्ण यत्न केला असतां ब्राह्मणाप्रमाणेंच जीवन्मुक्ति मिळवतां येते, अशा रीतीनें सुखोपभोग घेण्यास सांगून त्यांचा मार्ग जास्त सुलभ करून ठेविला. सुखोपभोगाचें साधन ज्या वेळेस विद्या हें नसून शौर्य आणि संपत्ति हेंच होतें, अशा वेळेस अपवादात्मक उदाहरणें सोडलीं तर ढुंगणाखालीं खंदा घोडा घेऊन जरीफेट्याच्या झोकांत भाल्याची फेंक करणें सोडून, बळेंच घोकंपट्टींत डोकें खुपसणें कोणास आवडणार? राजसभेमध्यें मिळणाऱ्या शालजोडीपेक्षां शूर म्हणून सुंदर स्त्रियांनीं केलेली ओंवाळणी को-

णास अधिक पसंत पडणार नाहीं ? अशा स्थितींत जर इतर वर्गांनीं सर्वच तऱ्हेच्या विद्यांस फांटा देऊन 'तें काम बामणाचें' म्हणून मोठ्या खुशीनें ब्राह्मणाचा आदर केला असला, तर त्यांत ब्राह्मणांचा काय दोष ? शिवाजी महाराजांच्या काळीं पाहिलें तरी देखील भाल्याची फेंक करून संपत्ति आणि गौरव मिळवणें यांतच भूषण वाटत असे. अजून देखील वऱ्हाडसारख्या सुपीक देशांत जेथें या इंग्रेजी विद्येचीं सर्व साधनें सुलभ आहेत तेथेंही 'शिकून काय करावयाचें ? आहेत दोन नंबर घरीं, करील चैन' अशी प्रवृत्ति आढळून येते. असें असतां ब्राह्मणांनीं इतर वर्गास अज्ञानांत ठेवलें, आणि लबाडीनें स्वतःचें वर्चस्व अबाधित ठेवलें, असा आरोप करणें नीचपणाचें आहे. याच्या उलट असें मात्र आहे कीं, पेशवाईचा एक अपवाद सोडला तर, ब्राह्मणांनीं सत्ता आणि वैभव हीं फक्त विद्येनेंच प्राप्त करून घ्यावयाचीं असा कडक निर्बंध स्वतःस घालून घेतल्यामुळें, इतर सर्व लोकांस यांचा उपभोग हजारों वर्षें अव्याहत घ्यावयास सांपडला, आणि एक उत्तम संस्कृति, कशाही रीतीनें कां होईना जिवंत राहून तिचा सर्व प्रकारचा फायदा राष्ट्रास मिळाला.

असाच प्रश्न स्त्रियांच्याही बाबतींत निघतो. पूर्वीं केव्हां तरी स्त्रियांस वेदाधिकार असावा, हें उघड आहे. कारण कित्येक ऋचांचे ऋषीच स्त्रिया आहेत; आणि अग्निहोत्र्याच्या सहधर्मिणीला कांहीं ऋचा म्हणून अग्नीस समिध देण्याचा अजूनही अधिकार आहे. चौल वगैरे संस्कार स्त्रियांस पूर्वीं होते, आणि व्रतबंधही असावा. परंतु पुढें गृहकृत्यांतच जास्त गढून गेल्यामुळें आणि इतर कारणांनीं ज्यावेळेस त्यांचीं शरीरें वेदोच्चाराच्या उपयोगांत येईनाशीं झालीं, तेव्हां तो त्यांचा अधिकार काढून घेण्यांत आला. परंतु एक वेद सोडला तर इतर शास्त्रें आणि विद्या, अथवा योग आणि ब्रह्मप्राप्ति, वगैरे कोणाच्याही गोष्टीस त्यांना अडथळा नव्हता. उलट, कोणच्याही तऱ्हेचा योगायोग न करतां श्रीभगवद्गीतेनें सांगितल्याप्रमाणें 'आत्मार्पण' रूप श्रेष्ठ साधन त्यांच्या हांतून सहज घडावें, आणि तपश्चर्यांनीं व योगायोगांनीं जें जन्मोजन्म पुरुषांस मिळवितां येणार नाहीं, तें एकाच जन्मांत मिळेल, अशा प्रकारचा पातिव्रत्यधर्म त्यांच्या मागें लावून दिला. योगाभ्यास वगैरे साधनें ज्याप्रमाणें देवावर उपकार करण्याकरितां करावयाचीं नसून स्वतःकरतांच करावयाचीं आहेत, त्याचप्रमाणें नवरा हा वस्तुतः दगडाच्या मूर्तीप्रमाणें प्रतीक असून पातिव्रत्याचार हा स्वतः-

त्याच सामर्थ्यवृद्धीकरितां आणि निःश्रेयसाकरितां करावयाचा असतो. हें लक्षांत नसल्यामुळें आधुनिक विद्वान् आणि विदुषी, स्त्रियांच्या अवनतीची व शास्त्रकारांच्या मोंगलाईची गाऱ्हाणीं गातात. असो.

याप्रमाणें चातुर्वर्ण्याची उत्पत्तीही अध्यात्मविद्येस धरून आहे; आणि म्हणूनच या संस्थेस चातुर्वर्ण्य हें नांव पडलें. कारण योगशास्त्राप्रमाणें प्रत्येक ध्वनीस कांहीं तरी आकार आणि रूप म्हणजे रंग अथवा वर्ण हें आहे. याच्या उलट प्रत्येक रूपास अथवा वर्णास ध्वनि ही एक बाजू आहेच. फक्त आमच्या इंद्रियांस प्रेरणा करणारी त्यांची आंदोलनसंख्या आणि शक्ति हीं भिन्न भिन्न आहेत. जर त्याला अनुसरून अशीं आमच्या इंद्रियांस वळणें देतां आली तर आम्हांस कोणचाही पदार्थ त्याच्या पद आणि अर्थ अशा वाटेल त्या स्वरूपांत इच्छेनुरूप जाणतां येईल. म्हणूनच व्यक्तध्वनीस आणि ज्यांच्या साह्यानें साकारतां येतें ते त्यांचे रंग, यांना 'वर्ण' अशी एकच संज्ञा लावतां आली. मूलस्थानीं अथवा शरीरांत इतरत्रही व्यक्त होणाऱ्या ध्वनीचे जे वर्ण तत्रस्थ आकाशांत उमटले पाहिजेत, तसे ते डोळ्यांनी पाहून ध्वनि उच्चार बरोबर आहे, असें ठरवलें गेलें; म्हणजे वर्ण आणि ध्वनि हे एकमेकांचे ताळे आहेत. ब्रह्मविद्येच्या पायतेस पूर्वी सांगितल्याप्रमाणें यांच्या शुद्धतेचें अथवा संकराचे चार प्रकार जेमतेम उपयोगी पडूं शकतात; म्हणून त्यांस वेगळे काढून चातुर्वर्ण्य असें नांव दिलें. ही गोष्ट निव्वळ कल्पना नसून पातंजलशास्त्रास धरून आहे, हें विसरून अथवा पातंजलशास्त्राचा प्रत्यक्ष प्रयोगानें अनुभव न घेतां त्यास अप्रमाण म्हणून चातुर्वर्ण्य हें कांहींतरी एक थोतांड अथवा खूळ अथवा सामाजिक सोय आहे असें म्हणणाऱ्यांना 'न्यायशास्त्र शिकला नाहींस, चल बाजूला हो,' म्हणून ज्याप्रमाणें श्रीशंकराचार्यांनीं एका वावदूकास 'कशाघातपुरःसर' हांकून दिलें, त्याप्रमाणें मूर्ख म्हणून सोडून दिलें पाहिजे. याप्रमाणें चातुर्वर्ण्याची सशास्त्र उत्पत्ति आहे, आणि म्हणूनच गीतेंत व्यासांनीं 'सृष्ट' असें पद योजिलें आहे.

'एकमेवाद्वितीयम्' हा महासिद्धांत आणि मनुष्याच्या स्थूल इंद्रियांस अग्राह्य अशी सूक्ष्म, सूक्ष्मतर अतींद्रिय अस्तित्वें, स्थूल देहांत असतांच, या अतींद्रिय विश्वाशीं जाणून, अथवा न कळत दळणवळण करतां येतें, आणि केलें पाहिजे ही भावना सर्व विश्वाचें एककुटुंबीयत्व, एकास दुसऱ्याकरितां कर्म

करतां येतें, हा सिद्धांत, पुनर्जन्म आणि इंद्रियजय इत्यादि ब्रह्मविद्येच्या अंगभूत असलेल्या सिद्ध गोष्टींवर चातुर्वर्ण्याची इमारत उभारली आहे. या गोष्टींत ज्यांचा विश्वास नसेल त्यांची गोष्ट अलाहिदा आहे; परंतु या गोष्टी मान्य नसणारा मनुष्य वैदिकधर्मी नव्हे, आणि म्हणूनच त्याला चातुर्वर्ण्याचें महत्त्वही नाहीं. परंतु जे वैदिकधर्मीच म्हणवीत असतील त्यांना तीं तत्त्वें मान्य असलींच पाहिजेत. म्हणून चातुर्वर्ण्यसंस्था सुधारण्याच्या तात्पुरत्या भरांत आपल्या एकांगी विद्वत्तेनें तिची वाटेल तशी उपपत्ति बसवून, तिचें खरें महत्त्व घालवणें त्यांना योग्य नाहीं. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, राष्ट्राच्या एकंदर अधःपाताबरोबर या संस्थेचेंही रूप विकृत झालें आहे, आणि तें सुधारून नीट घडी बसवली पाहिजे. परंतु त्यांतील हें मूळ धोरण लक्षांत ठेऊन सुधारणा केली पाहिजे. यावर अशी शंका येते कीं, जरी चातुर्वर्ण्य एकाकाळीं अत्यंत उपयुक्त असलें तरी आज तें उपयुक्त नाहीं; पण हा प्रश्न वेगळा आहे. त्याचा संबंध ध्येयाशीं येतो स्वरूपाशीं येत नाहीं. राष्ट्राचें ध्येयच जर पालटलें असेल तर, त्या दुसऱ्या ध्येयाच्या प्राप्तीस चातुर्वर्ण्य उपयोगी पडेल किंवा नाहीं ? हा प्रश्न सोडवणें कठीण आहे. मुद्दा एवढाच आहे कीं, जर तेंच ध्येय ठेवावयाचें असेल, तर या संस्थेचें रक्षण केलें पाहिजे. आणि जर तें ध्येय नको असेल, तर चातुर्वर्ण्य सोडून द्या. परंतु चातुर्वर्ण्य सुधारण्याच्या नांवाखालीं साराच सांवळा गोंधळ करूं नका. देशांतील एकी चातुर्वर्ण्यामुळें अडून बसली आहे, ही कल्पना पुष्कळ अंशीं भ्रामक आहे, आणि परक्या लोकांनीं उत्पन्न केलेल्या राजनीतिमूलक अनेक भूतांपैकीं हें एक महाभूत आहे. शास्त्रीय विषयांत तडजोड होऊं शकत नाहीं. एकाद्या मात्रेस अमुक प्रकारचीं औषधें आणि प्रयोग सांगितला असतां तेथें जशी तडजोड नाहीं, तसाच हाही प्रश्न आहे.

याच्यावर ठराविक प्रश्न असा येतो कीं, आतां तशी प्रकृतिस्थ शरीरें कोणाचींच नाहींत. तेव्हां चातुर्वर्ण्य मोडून सवर्णता कां करूं नये; आणि असल्या शरीरांनीं पूर्वींचा हेतु साधत नसल्यामुळें, त्यांच्या मागें लागण्यांत काय अर्थ आहे ? याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, उच्चवर्णांनीं आपली सहजप्राप्त श्रेष्ठसाधनसंपत्ति सोडून शूद्रत्व पत्करावें; कारण कितीही अधःपात झाला असला तरी, इतर वर्णांच्या मानानें आणि शूद्रांच्या मानानें उत्तरोत्तर

वर्ण आणि ब्राह्मण, आणि त्यांतून ब्राह्मणांची तर कितीतरी पटींनें अधिक, ब्रह्मविद्येच्या लायख शरीरें आहेत. खालील जातींना ब्राह्मण बनणें तर कांहीं शक्य नाहीं. कारण नुसत्या नांवानें कांहीं शरीराची आंतररचना पालटत नाहीं. विश्वामित्राचें पौराणिक उदाहरण टाकलें तरी, त्याला निदान तुकाराम महाराजांच्या इतकी तरी तपश्चर्या पाहिजे. तेव्हां सवर्णता करण्याचा एकच मार्ग म्हणजे सर्वांनींच चातुर्वर्ण्यबाह्य व्हावें. असें चातुर्वर्ण्यबाह्य होऊन परमश्रेष्ठ ध्येय सोडून द्यावें, वाडवडिलांनीं हजारों वर्षें आपल्या सर्वस्वाच्या आहुति देऊन जतन केलेली संस्कृति झुगारून द्यावी, आणि वैदिक राष्ट्र या दृष्टीनें नामशेष होऊन रहावें; किंवा खाण्यापिण्याचें सुख जरी मिळालें नाहीं, आणि अत्यंत हाल सोसावे लागले, तरी तेंच ध्येय उराशीं ठेवून वैदिक संस्कृति आणि वैदिक राष्ट्रियत्व हीं एकच आहेत, हें ओळखून त्याच राष्ट्रियत्वानें जगण्यांत शोभा मानावी, हा प्रश्न आहे. जर त्याच राष्ट्रियत्वानें जगावयाचें असेल तर, दिशाभूल होणार नाहीं इतक्या ठसठसीत रीतीनें तरी ती संस्कृति टिकविली पाहिजे, आणि चातुर्वर्ण्यसंस्था सुधारली पाहिजे. मिश्रविवाह, अतिनिर्बंध, अन्नपानादि व्यवहार, यांनीं सवर्णता येईल, व राजकीयदृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या कांहीं तात्पुरते फायदे होतील. पण ती चातुर्वर्ण्याची सुधारणा नसून, चातुर्वर्ण्य मोडून आलेली एकरूपता आहे. ज्यांना चातुर्वर्ण्य खरें सुधारावयाचें असेल, त्यांनीं सर्वप्रकारचा स्वार्थत्याग करून, ब्राह्मणांनीं गायत्रीच्या साहाय्यानें आणि इतरांनीं योग, भक्ति इत्यादि इतर साधनांनीं आपलीं शरीरें शुद्ध करून, निदान कांहीं पिढ्यांनीं तरी तीं पूर्वस्थितीवर येतील, असा आचार व असलें कर्म केलें पाहिजे. प्रस्तुतच्या काळांत आणि भौतिकशास्त्रांच्या सर्वव्यापी प्रगतींत हें कसें घडून आणतां येईल, तें एकाच वाक्यांत सांगतां येणार नाहीं. तरी पण कळकळीनें, करावयासच बसलें असतां, हे प्रश्न न सुटण्याइतकी परिस्थिती खास विघडली नाहीं. याचा अर्थ असा नाहीं कीं, शरीरें सुधारावयाचीं म्हणजे सर्वांनीं जंगलांत जाऊन रहावयाचें, उलट सर्व प्रकारचें भौतिक शास्त्रीय ज्ञान आणि साधनें यांचा उपयोग करूनच हें करावयाचें आहे. त्याचप्रमाणें, याच्या मागें लागल्यास राजकीयदृष्ट्या प्रगति होणार नाहीं, आणि राष्ट्रियत्वाची अशी घडी बसविण्याच्या नादांत आम्ही राजकीयदृष्ट्या मरून जाऊं, अशी शंका घेण्याचेंही कारण नाहीं. राजकीयदृष्ट्या प्रगति करण्याकरितां

म्हणून सवर्णता करण्याच्या यत्नांत मत्सर, द्वेष, संकुचितपणा, स्वार्थ, वगैरे तर निघून जात नाहींतच, परंतु उलट सामान्य भलेपणापलीकडे राष्ट्रियदृष्टीनें शीलास कांहींच बंध न राहिल्यामुळें समाजांतील जोम निघून जाऊन, तो जास्त विस्कळित आणि पतित होतो. राष्ट्र जगतें, तें जोमदारपणानें जगतें, नुसत्या गोड कल्पनांनीं जगत नाहीं; आणि वरीलप्रमाणें चातुर्वर्ण्य सुधारण्याच्या प्रयत्नांनीं राष्ट्राचा जोम कमी न होतां, उलट अशा रीतीनें वाढेल कीं, इंग्रजशाहीसारखे आणखी घाले आले तरी देखील त्यांस झुगारून देण्याची ताकद येईल.

वरील सर्व विवेचनावरून लक्षांत येईलच कीं चातुर्वर्ण्य हें केव्हांहि उत्पत्तिसिद्धच असलें पाहिजे, आणि जरी आजच्या स्थितींत त्याची पुनर्घटना करणारांना, चातुर्वर्ण्यच करतां आलें नाहीं, तरी प्रथमतः निदान ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर एवढा भेद ठेवूनच सुरवात करणें भाग आहे; आणि चातुर्वर्ण्याच्या उत्पत्तीकडे पाहिलें तर एवढेच दोन वर्ण असणें अवश्य आहे. हल्लींच्या काळीं चातुर्वर्ण्य रक्षण करणारांना आणि त्यांतून ब्राह्मणांना (कारण, त्यांच्यावरच ही जबाबदारी विशेष आहे, कारण अर्वाचीन कल्पनांप्रमाणें त्यांना खालील समाजांत मिळून जावयाचें आहे.) त्यांच्या आचारधर्माविषयीं फार मोठा प्रश्न येऊन पडेल. कारण, विधवांची वाढती संख्या, दारिद्र्य, विवाहसंस्थेंतील फरक, आधुनिक शिक्षणाची आवश्यकता, आणि त्याचे दुष्परिणाम, त्याचप्रमाणें नवीन काळानें उत्पन्न केलेल्या अनेक संस्था, या सर्वांचे प्रश्न कसे सोडवावे, हा मोठाच प्रश्न वाटेल; परंतु ही विचारसरणी चुकीची आहे. निःसत्त्व माणूस अशा स्थितींत जो जो मार्ग काढूं म्हणेल, तो तो शरणागतीचाच असावयाचा. चातुर्वर्ण्य सुधारण्याच्या दृष्टीनें त्यांच्या हातून काय काम होणार? तेव्हां प्रथमतः वैदिक संस्कृति आणि वैदिक राष्ट्रियत्व हीं ठळकपणें उमटून पडतील अशा रीतीनें चातुर्वर्ण्य राखण्याची शपथ घेऊं द्या, आणि त्या दृष्टीनें शरीरें सुधारण्याचें कंकण बांधू द्या, म्हणजे हे सारे प्रश्न थोडी देखील खळखळ न होतां कालाला अनुसरून जसे पाहिजेत तसे आपोआप सुटतील; आणि जरी वाटतें तितक्या वेळांत सुटले नाहींत आणि समाजांत अतिशय भिन्नता राहिली, तरी ती भिन्नता राजकीय कल्याणाच्या आड येणार नाहीं. राष्ट्रामध्यें

कितीही भिन्नता असली, तरी राष्ट्राचा जोम जर कायम असेल तर राजकीय आपत्तींत त्याची एकी व्हावयास मुळींच वेळ लागत नाहीं. याच्या उलट जरी सर्वच सवर्णता असली, आणि राष्ट्रांत जोम नसला तर अनेक कृत्रिम भेद उत्पन्न होतात, आणि राष्ट्र नाश पावतें, अथवा वर डोकें करूं शकत नाहीं, असें इतिहासाचें महावाक्य आहे. दुसऱ्या अनेक तऱ्हांनीं पुष्कळ काळांत जोम उत्पन्न करतां येईल, परंतु त्याच काळांत, किंबहुना त्यापेक्षां फारच थोड्या काळांत जर चातुर्वर्ण्याचा उद्धार हें काम अधिक तीव्रतेनें करूं शकेल, तर स्वतःच्या एवढ्या भव्य आणि दिव्य राष्ट्रीयत्वास पारखें होऊन, केवळ राजकीयदृष्ट्या खाण्यापिण्याचें सुख थोडें चांगलें मिळवून, कोणी तरी लोक म्हणून जगण्यांत माणुसकी ती काय आहे ?

* * * *

श्रीअण्णासाहेब यांच्या लेखांतील ज्या कांहीं उताऱ्यांवरून हें प्रकरण तयार केलें आहे त्यांतील कांहीं पुढें दिले आहेत उतारे बरेच मोठे असल्यानें ते जर लेखात ठिकठिकाणीं घातले असते तर त्या योगानें मराठी वाचकांचा वाचतांना वारंवार विरस झाला असता. त्यांच्या करितां म्हणून या उताऱ्यांचें मराठी भाषांतर द्यावें तर लेखांत तोच विषय असल्यानें विनाकारण प्रकरण मात्र लांबलें असतें. एवढ्या करितां यांचा समावेश लेखांत न करितां ते येथें स्वतंत्रच दिले आहेत.

[ T. Science म्हणजे Transcendental Science हा शब्द या सर्व उताऱ्यांत क्यांट वगैरे युरोपीय विद्वांनाच्या अर्थानें योजिला नसून ' ब्रह्मविद्या ' अशा अर्थानें योजिला आहे व त्या शब्दाचा अर्थ पुढें पान २१ कलम ७ यांत स्पष्ट केला आहे. ]

It may, perhaps, be asked or questioned whether T. Science is capable of doing anygood to world at large. It has already been said above that the study of the T. Science has never been opposed to, nor has it any retarding effect on the advancement— of the Secular and material knowledge. In the halcyon days of the Vaidk Civilization the T. Science was the UNFAILING

SOURCE from which important FACTS and TRUTHS were derived to replenish the Secular and Material Sciences which as already above, were made into THREE Divisions, मणि, मंत्र, औषधि.

* * * *

The powers of the Human Soul or स्व alone create sounds by means of the articulating apparatus in such a manner that the sounds are fitted or adapted both to the various conditions of the external objects and to the various states of the interal consciousness. The adaptation in the waking state of ordinary human beings is influenced by the impressions made or received by the mind through the agency of the various senses and the degree of completeness of the adaptation depends on the force aud strength used in the process of becoming conscious of the adaptation.

* * * *

The Shudra class being in general not qualified by nature to study the Veadas, other adequate means have been devised by the Vaidik people to enable the members of that class to acquire proficiency in the Transcendental Science and Art and there have been in modern times numerous instances of persons of Shudra class who are known to have actually attained proficiency in the Science.

* * * *

What are known as the four Vedas have been but fragments of the unlimited whole which were systematically arranged under four heads by the great Rishi Vyasa now more than five thousand years ago.

* * * *

The principles of Grammar and Etymology of the Vaidik or Sanskrit words have been deeply rooted in the subject matter of the Transcendental Science and that the Vaidik Language and the Vaidik People being co-eval, must be considered as being both of immense antiquity.

* * * *

(1) It may be affirmed without any fear of contradiction that as already remarked above, there **has not been yet found** by the Western people either any **test or standard** of the so called **happiness, right** or **justice**. All what the Wertern Jurisprudence and Jurisprudence and Science in general ( excluding only such branches of knowledge as e. g. Mathematics ( pure and applied ) have hitherto done in the case of the advancement of Western knowlenge in general, is that various men of intelligence have colletced and systematized facts in the several departments of knowledge and deduced certain general tentative rules and principles which, naturally enough cannot be universal in their application, nor can they be utilized for the purpose of either correctly explaining or appreciating **facts** and **phenomena** (whether physical, social, or intellectual ) which have come into existense on account of the rules and principles, that have been derived from an altogether distinct department of knowledge called the **Brahma-vidya** ( ब्रह्मविद्या ) and that have been *successfully* studied, preached and practised from hoary antiquity by the *Vaidik People* alone.

**It**, therefore, clearly *follows* that so far as the Indian **Soil** is concerned, a **correct** knowledge of the **origin** and the *character* of the landed proprietary right must be obtained from the *sources* of knowledge, which have

hitherto been explored and exploited by the *Vaidik people* alone. ( p. 174 ).

*  *  *  *

(1) "स्व" that is, soul is the source of all life, knowledge, intellect, truth, energy, including all forms of physical and intellectual force, labour &c, vocal power including all forms of human speech and the like.

(2) स्व pervades every thing, and is therefore, essentially communal in nature and quality.

(3) स्व distributes and individualises itself in the objective world of creatures or created things in varying quantity and quality.

(4) The *quantity* especially, of land with all varieties of its products ( incuding both natural and artificial ) available for human being is *not unlimited.*

(5) As a nature corollary, every human being naturally stands in need of the aid of others.

(6) As a further corollary, every human being is, also, in duty bound to educate and qualify oneself so as to be able to live in, and to realise the peaceful communal condition of life and to give to others the maximum of benefit of both the quantity and quality of स्व ( universal soul ) centered in one's own individual self.

(7) As an additional corollary, there arises the necessity of acquiring–by means of the T. Sc. and the Art i. e. by means of what is called परोक्षविद्या or the ब्रह्मविद्या i. e. (the science of acquiring universal knowledge and power without the medium of the mind and its subordinates the senses by means of securing union with ब्रह्म पर or स्व soul ), the highest degree as far as practicable of uni-

versal knowledge and power for the *benifit* and *happiness* especially, of human creatures.

(8) The only rational way and method of acquiring proficiency in the T. S. and Art are that human beings must learn to suppress individualism, and acquire the habit of living a communal life.

(9) Human beings must live in the from of *joint and corporate* society, and make communal their life, livelihood, protection or Government and thus prevent, rectify, &c., by suitable means, such as, punishment, penance, &c. all aberrations of conduct which must otherwise eventually lead to the disruption of the society, and the consequent causing of obstruction to the study and attainment of the T. S.

* * * *

Without discussing and determining the question whether consciousness is a manifestation of the Soul as a whole, or is that of one of the distinct and seperate faculties or powers of the soul, this much is certain that it is a kind of entity of knowledge which identifies itself with each and every object in respect of form, quality, motion &c. and to which any or all of these directly or indirectly are communicated. In the ordinary waking state there is only produced consciousness in respect of conditions of mind and of external objects through the *medium* of the mind and the senses alone, but not for instance in respect of the varions living processes of growth, development and decay that are being constantly carried on, for instance, iu the human frame.

Now, as the स्व or soul has the consciousness, for instance, of the various colours etc., of external objects, it follows as a natural corollary that the soul in the form

of consciousness has all the formative elements, whatever they may be, of such colour &c. and as sound with i s various forms is produced by the soul it follows also as a natural corollary that it must possess all the formative elements of the colours &c. and thus sound adapts itself to the various conditions of the external objects &c. In short, there exists *homogenity* and *correspondence* between the external objects and *internal states* of consciousness &c. appearing *in the form* of notions, sensations passions &c., on the one hand, and the sound as proceeding from, and representing the *active energy* in its various forms of स्व or soul, or *the active universal portion* of आत्मा or the Supreme Being on the other hand.

The *homogeneity* and *correspondence* are due to the *effect* of the power of selection which can be known by means of T S. alone. The *adapsation* of sound to the *states* of consciousness on the one hand and *external* objects &c. on the other, may be explained, or rather, illustrated by the *chemical* processes which produce *two different* kinds of a compound substance containing the metal iron called *ferrum* in Latin and a non-metal, such as, oxygen, chlorine or the like. The two kinds of iron-compounds are respectively called *ferrous* compounds and *ferric* compounds. The *first* kind or class contains the non-metal, such as, oxygen in a less quantity, and the *second* class contains the non-metal in a larger quintity. Oxygen is represented by the sybol O, and Iron is represented by the Fe. Thus a compound of the first class is represented by Symhol Fe O, and a compound of the second class is represented by the symbol Fe2O3. The symbol for the compound of the first class means that **one** atom of *iron* or *ferrum* combines with **one**

atom of oxygen where as the symbol for the second class means that **two** atoms of iron combine with **three** atoms of Oxygen. The **combining** power of iron in the first class is said to be *dauble* that of a fixed unit or an atom of a substance, called Hydrogen, whereas the **combining** pewer of Iron in the second class is known to be triple with reference to the *same* unit Accordingly, Iron is said to be *dyad* as well as *triad.* The *question* or *point* of observation and consideration is why should Iron which is one and the same substance in the two classes of compounds exhibit *two* different combining powers ? No investigation has yet succeeded in finding ont the reason of the exhibition of different combining powers of elementary substances. The *sound,* like the iron in the above mentioned cases, adapts itself to *states* of consciousness on the one hand and *external* objects, mental conditions, &c. on the other. The adaptation or exhibition of the selecting power can only be known by means of the T. S. Aa an additional illustration there may be mentioned the case of the *Power of Crystallization.*

Investigatisn *has* not yet succeeded in discovering the mode in which such crystals are produced. The province of ignorance in that respect is enlarged when it is found that when common *salt* and *Nitre* are dissolved together in water the two substances assume their respective forms. The **power** in a *substance* of **selecting** its own form of crystalization is certainly a *living* power.

# मांसाशन.

मांसाशन हा राष्ट्रापुढें एक नवीन प्रश्न उत्पन्न होऊं पहात आहे. मांसाशन करणें हें सशास्त्र आहे किंवा कसें? योग्य आहे कीं अयोग्य आहे? आणि आवश्यक आहे कीं अनवश्यक आहे? असे यांत तीन मोठे प्रश्न आहेत. सशास्त्र आहे किंवा कसें याचा अर्थ असा कीं ब्राह्मणांचा ब्राह्मणपणा म्हणून जो कांहीं आहे म्हणून शास्त्रें सांगतात, त्यास मांसाशन हें विरुद्ध पडतें कीं काय, आणि विरुद्ध आहे असें शास्त्रांत सांगितलें आहे कीं काय? त्याचप्रमाणें जरी विरुद्ध आहे असें ठरलें तरी एकादे वेळेस आपाततः अथवा औषधीसारख्या उपयुक्ततेकरतां वगैरे जर त्याचें क्वचित् किंचित् सेवन झालें, तरी देखील ब्राह्मणाचा ब्राह्मणपणा नाहींसा होतो कीं काय? आमच्या इकडील पौराणिक वैदिक वगैरे सर्व वाङ्मयांत पूर्वीचे ऋषि आणि ब्राह्मण मांस खात असल्याचा उल्लेख सांपडतो; अशा स्थितींत मांसाशन हें ब्राह्मणास विरुद्ध आहे, अशी कल्पना कां करावी? आणि बुद्धधर्माचा संसर्ग वगैरे आगंतुक कारणांनीं जर ती आली असली, तरी तिला तसेंच चिकटून कां रहावें? असा हा सरळ प्रश्न आहे. तें योग्य आहे कीं अयोग्य आहे, याचा अर्थ जरी शास्त्रदृष्टी सोडून दिली, तरी सृष्टिशास्त्र आणि वैद्यशास्त्र यांच्या दृष्टीनें तसें हितावह आहे किंवा कसें? आणि तिसऱ्या प्रश्नाचा सरळ अर्थ असा आहे कीं हल्लींच्या आमच्या परिस्थितींत राष्ट्राच्या प्रगतीस त्याची आवश्यकता आहे किंवा काय? अथवा, अगदीं आवश्यक नसूनही सुरू केलें तर तें थोडें बहुत हितावहच होईल कां घातुक होईल? अशा या प्रश्नाच्या तीन बाजू आहेत.

याविषयीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अण्णासाहेब यांचें मत अत्यंत विरुद्ध होतें; इतकेंच नव्हे तर ती कल्पनाही त्यांच्या मनास दुःसह होत असे. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, मांसाशन हें विश्वकुटुंबत्वाच्या भावनेस स्वभावतःच इतकें विरुद्ध आहे कीं, त्याची आणि ब्रह्मविद्येची सांगड घालणें अशक्य आहे. पुराणांत वगैरे जी माहिती आहे ती शेकडों वर्षांच्या इतिहासाचा आणि अध्यात्म, योग तंत्र वगैरे शास्त्रांचा संकर आहे. आणि तेथें ही मांस खाण्याची उदाहरणें फक्त ऋषींच्या विषयींच आहेत; आणि त्यांचीं उदाहरणें चातुर्व-

र्ष्यांच्या मर्यादेंतील ब्राह्मणास लावून चालावयाचें नाहीं. कारण, ऋषि हा मूळ कोणीही असला तरी, ज्याचें शरीर कणशः ब्रह्मशक्तियुक्त आहे, असा प्राणी असल्यामुळें चातुर्वर्ण्यांतूनच बाहेर गेलेल्या चतुर्वर्णांतीत परमहंसाप्रमाणें होय. ऋर्षींच्या खेरीज करून ब्राह्मणांच्या मांसाशनाचीं उदाहरणें कोठेंही नाहींत. यज्ञयागांत पशुहिंसा करून मांस पुरोडाश भक्षण करण्याचे, आणि गवालंभन वगैरे विधि यांचे उल्लेख सांपडतात; त्यावरून त्याकाळीं सर्रास मांसाशनाची पद्धत होती, असें वाटतें; पण तें चूक आहे. गवालंभन अथवा पलपैतृक यांची चालही कांहीं भिन्न कारणामुळें अस्तित्वांत होती. पूर्वी अनुलोम विवाह असल्याकारणानें ब्राह्मणाच्या अनुलोमज संगतीनें आपल्या मातृपक्षीय पितरांना मांसपिंड द्यावे लागत, म्हणून पलपैतृक प्रचारांत आलें. अनुलोमाविवाह निषिद्ध ठरतांच पलपैतृकही वर्ज झालें.

यज्ञयागांतील हिंसा ही वस्तुतः हिंसाच नव्हती. कारण मूळ यज्ञसंस्था ज्या हेतूनें उत्पन्न झाली तो असा कीं, त्याच्या योगानें संजीविनी वगैरे विद्यांची प्रत्यक्ष प्रतीति लोकांस द्यावी. मानवी शरीर म्हणजे अर्थात् आंतील लिंगदेह हा, देवताघटित आहे. इंद्रादिक देवता या वस्तुतः विष्णु, शंकर, राम यांच्या सारख्या व्यक्ति नसून विश्व चालविणाऱ्या भिन्न भिन्न प्रकारच्या शक्तींचे समुच्चय होत. विश्वांतील यच्चयावत् क्रियाशक्ति म्हणजे इंद्र, अशाच प्रकारें सविता प्रजापति वगैरे देवता होत. सूर्य बारा आहेत, म्हणजे ज्या एका तेजोत्पादक शक्तीस सूर्य म्हटलें, ती शरीरांत आणि विश्वांत बारा प्रकारांनीं काम करते. या सर्व शक्तींना बाहेर प्रगट होण्यास मुख्य साधन म्हणजे मनुष्याचा लिंगदेह; कारण हा लिंगदेह परिणत झाला असल्यामुळें त्याच्या द्वारें बाहेर प्रगट होऊं शकतात, म्हणून मनुष्याचें शरीर मध्यवर्ती असलेल्या सांध्याप्रमाणें या जडाजड विश्वांत अतिशय महत्त्वाचें होऊन बसलें, आणि सर्व प्रकारच्या उन्नतीस आश्रयस्थान झालें. पशूंचें लिंग शरीर हें असें परिणत नसल्यामुळें अवयव पृथक् पृथक् न वाढलेल्या गर्भपिंडासारखी त्याची स्थिति असते. उत्क्रांतिक्रमामध्यें अनेक योनींतून जात असतां हळू हळू हा लिंगदेह पूर्ण व्हावयाचा. असा तो पूर्ण झाला असतां मानव सृष्टींत एका जिवाची भर पडल्यामुळें, म्हणजे स्वतःस एक नवीन कार्यक्षेत्र मिळाल्यामुळें इंद्रादि सर्व दिव्य शक्तीस आनंद व्हावा, हें साहजिक आहे. याचा अर्थ असा कीं, तितका उत्तम कर्मांच

एक नवा कारखाना निघून विश्वाच्या उन्नतीस मदत झाली. त्यामुळें सर्व विश्वासच हा आनंद होतो. उत्क्रांतिक्रमांत केव्हांतरी निघणारे हे कारखाने जर आजच काढतां आले तर अर्थातच विश्वाच्या उन्नतीस मोठेंच साहाय्य होऊन, ती थोडीतरी लवकर होईल. स्वतःच्या योग आणि मंत्र इत्यादि साह्यांनीं जर पशूच्या लिंग देहांतील या सर्व बीजभूत शक्ति प्रगट करून त्या देहाला मनुष्यता आणतां आली, तर हें कार्य अर्थातच साधलें असें होईल. अशा प्रकारें त्यांच्यातील शक्ती जागृत करून विश्वांतील त्या त्या शक्तींस त्यांची जोड घालून देणें हा खरा यज्ञ, आणि याचेंच नांव आहुति देणें. सर्व वैदिक संस्कृतींच्या अत्यंत परिणतावस्थेंत मूळ हा यज्ञ उत्पन्न झाला, आणि हळू हळू जसजशी माणसाची योगशक्ति कमी कमी होत गेली, तसतशीं त्याचीं विकृतस्वरूपें होत होत पुराणांत दिसणाऱ्या केवळ मांसाशनरूप यज्ञापर्यंत त्याचीं रूपांतरें झालीं. आणि यज्ञाचा मूळ हेतु व त्यांतील मांसाशन हें मांसाशन कसें होत नाहीं, हें विसरून जाऊन पुढील वाङ्मयांत आणि आचारांत मांसाशनाची मात्र परंपरा राहिली.

यज्ञयागाचा उल्लेख टाकला तर ऋषि या अपार्थिव कोटींतील व्यक्तींखेरीज इतर ब्राह्मणांनीं मांस खाल्ल्याचे उल्लेख नाहींत. आणि क्वचित् कोठें जे आलेले आहेत, ते अशा चुकीच्या समजुतीनें व मांसलोलुप लोकांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ केलेले आहेत. येथें हेंहि सांगणें जरूर आहे कीं, संस्कृत वाङ्मय हें संस्कृतीच्या अवस्थांतराच्या वेळीं निरनिराळ्या संस्करणांतून गेलेलें आहे. आणि त्यामुळें तें जसेच्या तसें राखून ठेवण्याचे जरी भगीरथ प्रयत्न करण्यांत आले तरीहीं प्रक्षेप, विक्षेप, पाठभेद वगैरे सर्व दोषांपासून तेंही अलिप्त राहिलें नाहीं, असें अण्णासाहेब यांचें मत होतें. मात्र प्रक्षेप, विक्षेप, पाठभेद अध्यायांची व श्लोकांची अदलाबदल मूळ कल्पनेचा लोप झाल्यामुळें स्वतःच्या तात्पुरत्या कल्पनांनीं लावलेली संगति, आणि सोडविलेलीं प्रमेयें इत्यादि दोषांतून मूळ रहस्य चाळून घेण्याची त्यांची चाळणी मात्र भाषा, ऐतिहासिक उल्लेख वगैरेंची अगदींच उपटसुंभ नसून, वैदिक संस्कृतीचें जें हृद्गत म्हणून सांगितलें त्याची होती. भाषा वगैरे पद्धतीची चाळणी अनुगमावस्थेंतील (Induction) संशोधनास उपयोगी पडते. कारण तेथें सत्यासत्यता ठरविण्याला निश्चित अशी कसोटीच नसते. परंतु जेथें एका महासिद्धांतापासून अनेक

परंपरा निर्गत होतात, तेथें त्या परंपरा त्या मूळ सिद्धांतास किती धरून असतात, हें पाहणें, हीच मुख्य कसोटी आहे. त्यांतून संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यांनीं दुसऱ्याही कित्येक बाबी लक्षांत ठेवाव्या लागतात, आणि न्याय शास्त्रांतील 'अतिदेश' हा मोठ्या काळजीपूर्वक लावावा लागतो. असो. यज्ञांतील मांसाशन हे मांसाशन कां होऊं शकत नाहीं, हें थोडक्यांत सांगणें भाग आहे.

वर सांगितल्याप्रमाणें पशूचा देह आणि आंत माणसाचा जाणता जीव अशी परिस्थिती उत्पन्न होणें, म्हणजे त्या जिवाला भयंकर हाल होणें आहे. आणि एकदां अशी परिस्थिति आली म्हणजे त्या देहाचा नाश करणेंच योग्य आहे. आणि म्हणूनच त्याचा वध करून आंतील लिंगदेहास मनुष्यरूपानें जन्मास येण्याची संधि तत्काळ देण्याकरितां केलेली हत्या ही हत्या नव्हे. आणि म्हणूनच ज्या वेळेस असा खरा यज्ञ करण्याचे सामर्थ्य नाहींसें झालें, त्यावेळीं पशुहत्या बंद करून पिष्टपशु करण्याचा विधि ठरला. येथें दोन शंका येतात कीं, जरी त्या पशुदेहाचा नाश करणें हेंच योग्य ठरलें तरी आपणच त्याचा नाश कां करावा? विषम परिस्थितीच्या तापानें पशू स्वतःच तें करणार नाहीं काय? याचें उत्तर असें आहे कीं असेंही क्वचित् होऊं शकेल. उदा० मृगयोनींतील जड भरतानें आपलें शरीर प्रायोप्रवेशनानें टाकिलें. विषम परिस्थितींत आत्महत्या करणारीं माणसेंही आढळतात परंतु शरीराची आसक्ति इतकी जबरदस्त असते कीं, कांहीही झालें तरी तें टाकवत नाहीं; आणि विपत्तिआणि क्लेश यांनीं गांजून जाऊन डोळ्यांतून सारखें पाणी काढीत असतांही शरीर टाकण्याचा धीर होत नसलेलीच संख्या जास्त असते. साहसानें शरीर टाकल्याची उदाहरणें माणसांतही अपवादात्मकच होत. म्हणून त्या शरीराचा नाश करणें हें उपकारच आहे. अशा उपकारकत्वाचें निश्चितज्ञान असल्याखेरीज मात्र कोणीही स्वतःची अथवा दुसऱ्याची हत्या करणें, हें पाप होय. कारण क्वचित् प्रसंगीं तें उपकारक ठरलें तरी बहुतांशीं दुसऱ्यास आणि त्यामुळें परिणामीं आपणासही अनर्थावहच आहे.

दुसरी शंका अशी कीं, जरी अशा रीतीनें पशुहिंसा ही योग्य ठरली तरी देखील तो पशू स्वतःच खाण्याची आवश्यकता कां? त्याचें कारण असें आहे कीं, मनुष्यशरीरांत कोणचाहि संस्कार अथवा शक्ति म्हणजे अर्थात् त्याच्या बुद्धींत तो संस्कार घालण्याची अथवा वाढविण्याची मुख्य साधनें तीन आहेत. एक तर

स्वतःच्या योगशक्तीनें त्याची बुद्धि ताब्यांत घेऊन तिच्यावर संस्कार करणें. परंतु हें प्रत्येकासच आणि प्रत्येकाच्याच बाबतींत अथवा कितीही मोठी ताकद असली तरी, सर्वांच्याच बाबतींत अशक्य आहे. दुसरा मार्ग वाणी आणि बाह्यचेष्टा यांच्या योगानें बुद्धीवर आघात करून, तिच्यांत तो संस्कार उत्पन्न करणें, परंतु हाही मार्ग अतिशय कष्टसाध्य व खात्रीनें काम करणारा नाहीं, हें आपल्या नित्य व्यवहारापासूनही समजण्याजोगतें आहे. याच्याशिवाय तिसरा एकच मार्ग आहे कीं, ज्या पदार्थांची बुद्धि बनली आहे, ते पदार्थच इष्ट संस्कारयुक्त जर करितां आले तर कोणत्याही प्रमाणांत कां होईना, पण कार्य खात्रीनें होऊन बहुतेक सर्वच ठिकाणीं यशस्वी होईल. बुद्धी ही मनुष्य जें अन्न खातो त्याच्या आत्यंतिक सत्त्वापासून बनली आहे, असा योगशास्त्राचा अनुभव आहे. म्हणून 'यादृशं खादयेदन्नं बुद्धिर्भवति तादृशी' असा श्रुतीनें सिद्धांत सांगितला आहे. जर कोणचाही संस्कार विशेष खटपटीवांचून देणें असेल, तर तो अन्नांतून देतां येतो; म्हणजे अन्न जर त्या संस्कारानें युक्त करतां आलें, तर त्या अन्नाच्या सेवनानें बुद्धींत तो संस्कार उत्पन्न होतो, आणि एवढ्याच करितां देवाचा नैवेद्य व प्रसाद आणि अन्नदान यांना सर्वांत महत्त्व आहे. पशुशरीरावर संस्कार करून मंत्रशक्तीनें हें कार्य तत्काळ घडवून आणतांना त्या दिव्य शक्तीची भावना सर्व शरीरास बसते. अशा वेळीं पशूचा वध केल्यावर त्याचें तें अत्यंत दिव्य संस्कारयुक्त शरीर, कांहीं काल तरी अत्यंत पवित्र आणि दिव्य शक्तीनें युक्त असें असतें. या शक्तीचा अंश जर सर्व समूहास मिळावयाचा असला, तर त्या शरीराचा आपणास पचेल असा कांहीं तरी भाग पोटांत घालणें हा त्याचा मार्ग होय. असा तो प्रसादरूप भाग सेवन केल्यावर त्या पवित्र शरीरानें सडून अथवा कुजून जाऊं नये म्हणून त्यास जाळून टाकण्याची व्यवस्था करण्यांत आली कारण त्या शरीराचें सेवन जरी माणसास हितावह ठरलें, तरी मनुष्येतर जीवांस तें थोड्याबहुत प्रमाणानें, पूर्वी सांगितल्याप्रमाणें अपायकारकच होणार. पुढें कालांतरानें मूळ यज्ञ लुप्त झाल्यावर शरीर जाळणें मात्र राहिलें.

याप्रमाणें यज्ञांतील मांसभक्षण हें जरी हितकारक ठरलें तरी त्याचा अर्थ असा नाहीं कीं, त्याचे गोळेच्या गोळे मारावयाचे. विद्युत्प्रवाह

इकडून तिकडे नेण्यास ज्याप्रमाणें वाहक पदार्थाच्या जाडीचें अथवा वजनाचें कारण नाहीं, तांब्याची कितीही वारीक कां होईना तार असली म्हणजे पुरे. तसेंच हेंही आहे. आणि त्याचप्रमाणानें पूर्वी ग्रहण करीत. जसा मूळयज्ञ जाऊन केवळ पशु जाळणें राहिलें, तसाच मांसाचा उपयोग वाहक पदार्थ म्हणून केवळ अणुमात्र करावयाचा हें मागें पडून, त्यावर यथेच्छ ताव मारण्याची क्वचित् प्रवृत्ति झाली. मांसबलि वगैरे सांगणाऱ्या तंत्रशास्त्रांत देखील मूळ माषप्रमाण मांस घ्यावें जास्त सेवन करणें हें पाप आहे, असेंच सांगितलें आहे. आणि त्याचें कारणही हेंच आहे. ज्या वेळेस अशा रीतीनें यज्ञ होईनासा झाला, तेव्हां अर्थातच यज्ञसंस्था कायम ठेवून पिष्टपशूची योजना करण्यांत आली. पिष्टपशूनें केलेल्या यज्ञांत कांहीं अर्थ आहे किंवा नाहीं, अथवा ती संस्थाच कायम ठेवली, हा प्रश्न वेगळा आहे, त्याचा मांसाशनाशीं संबंध नाहीं. सारांश शास्त्रीय दृष्ट्याहि मांस खाणें निषिद्ध आहे, आणि ब्राह्मण्यास विरुद्ध आहे, असें त्यांचें ठाम मत होतें. गवालंभनासंबधेंहि असेंच त्यांचें मत होतें, परंतु कांहीं कारणामुळें प्रस्तुत लेखकास त्याचा उद्देश ऐकावयास सांपडला नाहीं.

सृष्टिशास्त्रदृष्ट्या आणि वैद्यकदृष्ट्याही मांसाशन अयोग्य आहे, असेंच त्यांचें मत होतें. भूमीवरील मांसाहारी प्राणी आणि शाकाहारी प्राणी यांची तुलना केली असतां असें आढळून येतें कीं मांसाहारी प्राण्यापेक्षां शुद्ध शाकाहारी प्राणीच बलवान् ज्यास्त सांपडतात. वाघ, सिंह अथवा ध्रुव प्रदेशांतील अस्वलें हेच काय ते मांसाहारी प्राण्यांतील मोठे जबरदस्त होत. परंतु हत्ती, गेंडा, आफ्रिकेंतील कित्येक वानरांच्या जाति फार तर काय पण साधा रानरेडा, यांच्या पासंगासही व्याघ्रादिकांची शक्ति पुरावयाची नाहीं. त्याचप्रमाणें वनस्पत्याहारी जीवांच्या शरीराशींच मनुष्याच्या शरीराचें साधर्म्य आहे, वगैरे कारणें सांगत असत. परंतु त्या दृष्टीनें पुष्कळांनीं विचार केला असल्यामुळें त्याचा विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं. वैद्यशास्त्रदृष्ट्याही त्याची आवश्यकता नाहीं, असें त्यांचें मत होतें. आपल्याकडील वैद्यशास्त्रांतही प्राण्यांच्या मांसाचा वगैरे उपयोग सांगितला आहे, आणि त्यावरून पूर्वी केव्हां तरी ब्राह्मण लोक मांस खात असलेच पाहिजेत, असें कांहीं लोक म्हणतात. परंतु जेथें प्राणिज पदार्थांची चिकित्सा दिली आहे, तेथेंच खनिज आणि वानस्पत्य द्रव्यांचा

उपयोग सांगितला आहे. त्यांतील ब्राह्मणादिकांनीं वनस्पतीचा वगैरे व इतरांनीं वाटल्यास मांसाचा वगैरे उपयोग करावयाचा ही गोष्ट इतकी सरळ होती कीं तिचा मुद्दाम उल्लेख करण्याचेंही कारण नव्हतें. त्यावरून ब्राह्मण मांस खात होते, हा सिद्धांत स्थापित होत नाहीं. जर एकाद्या रोगास प्राणिज चिकित्से-खेरीज दुसरा उपायच दिला नसता तर मात्र तसें म्हणतां आलें असतें. हल्लींही असें पैजेवर दाखवितां येईल कीं युरोपिअन प्राणिज औषधापेक्षां, वनस्पती अथवा खनिज पदार्थ हेच वैद्यकदृष्ट्या खरे गुणकारी असतात. प्राणिज औष-धांचा रोग बरा करण्यांत जरी उपयोग होतो, तरी, रोगाची समूळ भावना रक्तांतून काढण्याचें काम तीं करूं शकत नाहींत, आणि रोग्याचें रक्त पूर्वी-प्रमाणें प्रकृतिस्थ करण्याच्या ऐवजीं आपला कांहींतरी शिक्का त्यावर तीं ठेव-तात. त्यामुळें त्यांचा गुण व त्यांनी आलेलें आरोग्य हीं टिकाऊ नसतात. म्हणून वैद्यशास्त्रदृष्ट्याही त्यांचा उपयोग करणें पिढ्यान् पिढ्या शुद्ध असलेल्या आमच्या शरीरास एकंदर घातकच आहे. वस्तुतः वनस्पति वगैरेंतून जो कांहीं सत्त्वांश मनुष्याच्या मनबुद्धि वगैरेंच्या पोषणास लागावयाचा तो त्या वनस्पति वगैरे पशुशरीरांत जाऊन मांसरूप झाल्यामुळें त्यांतून निघून गेलेला असतो, म्हणजे ओज वगैरेंच्या दृष्टीनें तें आधींच मेलेलें असतें. अशा मृत अन्नापासून जरी शरीर जास्त पोसलें गेलें, आणि स्नायुबल अधिक वाढलें, तरी आंतल्या जीवास लाभ न होतां उलट नुकसानच होणार हें उघड आहे. वनस्पतींचें मांसांत रूपांतर करून त्यांतील प्रोटीन ( Proteins ) वगैरे निघून गेल्यावर त्यांचें सेवन करण्यापेक्षां ऐनजिनशीं जिवंत स्थितींतच ( वनस्पतिद्वारा ) सेवन केलेलें काय वाईट ?

आवश्यकतेच्या दृष्टीनेंही तें सेवन करूं नये, असें त्यांचें म्हणणें होतें. आवश्यकतेच्या दृष्टीनें मांसाशनाचें समर्थन करणारे लोक मुख्य दोन मुद्दे पुढें आणतात. पहिला,—त्या खेरीज आजकाल अवश्य असलेली क्षात्रवृत्ति उत्पन्न होणार नाहीं, आणि वाढणार नाहीं. क्रौर्य व शौर्य या दोन सारख्या दिसल्या तरी अगदीं भिन्न वृत्ति आहेत, मासांशनानें क्रौर्य वाढतें, शौर्याचा त्याच्याशीं संबंध नाहीं, व राष्ट्राच्या खऱ्या उन्नतीस क्रौर्याची गरज आहे कां शौर्याची वगैरे गोष्टी लक्षांत न घेतल्यामुळें हा भ्रम उत्पन्न झाला आहे. दुसरा असा

कीं, हल्लींच्या जीवनकलहांत मांसाहाराखेरीज भागणार नाहीं. परंतु हें म्हणणें भ्रामक असून मांस खाण्यास चटावलेल्या लोकांचें आहे.

एक तर, राष्ट्रीयदृष्ट्या हिंदु लोकांत क्षात्रवृत्ति–धैर्य, साहस वगैरेंचा उणेंपणा आहे, असें कबूल केलें तरी त्याचीं अनेक दुसरीं कारणें आहेत. फार झालें तर, दीडकोट ब्राह्मण वजा जातां बाकीचा हिंदुधर्मी समाज मांस खाण्यास मोकळा होता व आहेही. असें असतां, राष्ट्रीयदृष्ट्या अडून राहिलें आहे, असें म्हणणें कसें शोभेल? आणि घटकाभर असेंही कबूल केलें कीं अडलें आहे, तरी देखील, बाकीच्या सुमारें २० कोटी लोकांस उजळ माथ्यानें वाटेल तितकें मांस खावयास घालून पृथ्वीवरील कोणच्याही जातींत हिंदुलोकांस आजिंक्य होण्याची सोय आहे. तेवढ्याकरितां ब्राह्मणांनींच आपला विशिष्टपणा सोडण्याचें कारण नाहीं. बरें बाकीचा समाज क्षात्रवृत्तीनें युक्त असतां, त्यांच्याबरोबर निवृत्तमांस ब्राह्मणही कांहीं तरवार गाजवूं शकतो, याची इतिहास जाणणाऱ्यांस तरी शंका नको. कांहीं ब्राह्मण लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हल्लींच्या परिस्थितींत ब्राह्मण लोकांचा विशिष्टपणा त्यांना कायम राखतां येणार नाहीं, आणि मांशासन न केल्यास इतरांच्या मानानें तेच फार दुबळे राहून समाजांतील एक घटक ( Class ) या नात्यानेंही त्यांना आपलें अस्तित्व राखतां येणार नाहीं. कारण पूर्वींसारखा दूध, तूप वगैरे स्निग्ध पदार्थांचा पुरवठा दिवसेंदिवस मिळत नाहीं, आणि कदाचित् कांहीं कालानें त्यांचा वेदांतील सोमरसाप्रमाणें अजीबात अभाव होतो कीं काय,०अशी स्थिति दिसत आहे. अशा वेळीं शरीरास पुष्ट करणारें व दुधातुपासारखें स्निग्ध असें मांसाशिवाय दुसरें काय आहे? यावर त्यांचें असें म्हणणें होतें कीं ब्राह्मणांच्या आहाराची घडी इतकी चांगली बसविली आहे कीं, इतर बाजूंनीं आचार व्यवहार वगैरे जसा पाहिजे तसा ठेवला, आणि बीजतः संतति श्रेष्ठ प्रतीची होण्याइतका इंद्रियनिग्रह ठेवला, तर मांसाशनाची गरज पडणार नाहीं. वनस्पतीच्या आहारांतच शास्त्रीयदृष्ट्या पाहिजे तसे फरक केले म्हणजे दुधातुपाचेंही कार्य घडून येतें; त्यांतूनही जर कांहीं कमी पडतें असें वाटलें तर प्राणायाम वगैरे ब्रह्मकर्मांनीं उत्पन्न झालेल्या ओजस्वितेनें तें भरून निघेल, इतकेंच नाहीं, तर ब्राह्मण जातीचें विशिष्टत्व आणि उच्चपणा हीं त्यामुळेंच वाटेल त्या विरोधांत अबाधित राहतील, जड दृष्टीनें बोलावयाचें म्हणजे तंतुजाल

Nervous system हा खरा मनुष्य आहे; आणि मांसाशनानें स्नायुरचना Musculer system कितीही सशक्त झाली, तरी तें Nervous system ची ताकद वाढवूं शकत नाहीं. उलट विहिताचारानें Nervous system फारच सुंदर तयार होते. आणि Nervous system उत्कृष्ट असलेल्या माणसाचें, तसें नसलेल्या वाटेल तितक्या सशक्त माणसावर नेहमींच वर्चस्व राहतें, म्हणून मांसाशनाच्या समर्थनार्थ उपयोगांत येणारें तर्कशास्त्र हें सर्व एकांगी असून कोणीकडून तरी जगावें असें म्हणणाऱ्या सुखलोलुप माणसांचें आहे.

---

# ' भाषाशास्त्र ' व मानववंश.

अर्वाचीन संशोधन पद्धतींमध्यें भाषाशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांना अतिशय महत्त्व आलें आहे. संस्कृतभाषा व इतर कांहीं भाषा यांच्यांतील साम्यामुळें पूर्वी केव्हां तरी या भाषा बोलणारे लोक हे एकजातीय असून, त्यांची एक भाषा असावी, आणि या पूर्ववैदिक भाषेपासून आणि पूर्ववैदिक अथवा वैदिक मानववंशापासून हल्लींचे हिंदु, इराणी, आणि युरोपिअन आर्यवंश निघाले आहेत, असा युरोपिअन पंडितांनीं सिद्धांत केला आहे. काळाच्या अनंत पोटांत केव्हांतरी मानववंश एकजातीय असेल, नाहीं असें नाहीं. परंतु त्यांच्यांत पृथक् वंशत्व स्पष्टपणें सिद्ध होऊन आजच्या काळीं मनुष्यजातीचा इतिहास लिहिणाराला ती गोष्ट भूमितींतील गृहितकृत्यांप्रमाणें धरावी लागते. आणि तशी ती धरली आहे, म्हणूनच या शास्त्रास महत्त्व आलें. अशा दृष्टीनें पाहतां आमचे वैदिक आणि इराणी आर्य व ट्युटानिक वगैरे आर्य म्हणविणारे युरोपिअन वंश हे मुळचे एकवंशीय नसून अगदीं भिन्नभिन्न अशा दोनवंशांतून पुढें आले आहेत, असें भाषाशास्त्रदृष्ट्या श्री अण्णासाहेब यांचें मत होतें.

स्वतः अण्णासाहेब यांस संस्कृत व इंग्रजी प्रमाणेच तामीळ, तेलगु,ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, रशियन, जर्मन, पर्शियन यांचें चांगलें ज्ञान होतें; आणि कानडी व अरबी यांचीं कामापुरती माहिती होती. कायद्याच्या दृष्टीनें, स्मृतिकारांचा फौजदारी कायदा हा अर्वाचीन कोणत्याही कायद्यापेक्षां जास्त पायाशुद्ध आणि परिणत आहे, आणि दिवाणी कायद्यासंबंधानेंही जवळ जवळ तसेंच दाखवितां येतें, अशा दृष्टीनें राजा व प्रजा यांच्या जमीनीवरील हक्कासंबंधीं एका अपीलांत लिहीत असतां त्यांनीं सुंदर विवरण केलें आहे. असें करीत असतां, अर्थातच मानवंशाचा प्रश्न निघून भाषाशास्त्रदृष्ट्या त्याचें विवरण करीत असतांना या भाषाज्ञानाचा त्यांना उत्तम उपयोग झाला; आणि जरी पुढें त्यांना तो लेख पुरा करतां आला नाहीं, तरी देखील हा विषय त्यांच्या मनांत अखेरपर्यंत घोळत होता व त्या संबंधानें मधून मधून त्यांना कांहीं तरी सुचत असें.

संस्कृतांत केव्हां तरी शद्बाच्या सुरवातीस असलेला जोड ' स् '–जसें स्मृति, स्त्री, स्व वगैरे, हा वैदिक भाषेत केव्हांतरी नञ् द्योतक होता, असें ते सांगत असत; आणि त्यांवरून ' स्मृति ' म्हणजे मेलेला संस्कार

पुन्हां जिवंत करणें, ' स्व ' म्हणजे उ आणि अ ( अर्थात् ओठापासून कंठापर्यंत उच्चारली जाणारी सर्व वाणी ) यांच्या पलीकडील, म्हणजे वाणी नसलेला असा आत्मा, म्हणजे ' The active state of the soul ', अशा प्रकारच्या व्युत्पत्त्या ते सांगत असत. अशा प्रकारचा नञ् अर्थी ' स ' कित्येक इंग्रजी शद्बांच्या व्युत्पत्तींत सांपडतो. त्याचें उदाहरण म्हणून small शद्ब त्यांनीं सांगितला होता. मूळ mall शब्द ' ओंडका ' अथवा ' ठोकळा ' म्हणजे कांहीं तरी जाड प्रस्थ अशा अर्थाचा आहे. जें mall नव्हे तें small अशी त्यांची व्युत्पत्ति आहे. इंग्रजी कोशकारांनीं दिलेल्या इंग्रेजी शब्दांच्या व्युत्पत्या कित्येक ठिकाणीं कशा चुकीच्या आहेत, आणि त्यामुळें त्या व्युत्पत्तींतील अडचणी त्यांना मुकाट्यानें कशा गिळून बसाव्या लागतात, हें Sovereigu, Write, Calf, ( घोटा ) Thread, Appeal, Dine, Want, Give, Past, See, Nil, Supper इत्यादि शब्दावरून दाखवीत असत. Psyche या ग्रीक शब्दांत P कोठून आली, Write च्या मागें हें W चें शेंपूट काय म्हणून, आणि Sovereign मध्यें J कशाकरितां हें इंग्रेजी कोशकारांना सांगतां येत नाहीं याचें कारण भाषाशास्त्राचे त्यांनीं बसविलेले नियम सदोष आणि एककल्ली आहेत, असें त्यांच्या बोलण्यांत नेहमीं येई. एकदां कशावरून कोण जाणें, रात्रीं २ वाजतां बागेंतील नळावर उभे असतांच त्यांस एकाएकीं Snug या शब्दाची आठवण झाली. आणि लगेच त्यांनीं माडीवर येऊन सांगितलें कीं हें एक नञर्थी ' स ' काराचें उदाहरण आहे. Snug चा मूळ अर्थ Conceal असा भाव दाखविणारे आहे. त्यावरून पुढें Cosy वगैरे दुसरे अर्थ निघालें. नग्न या संस्कृत शब्दास न अर्थी ' स् ' लागून Snug असा शब्द झाला:—म्हणजे नग्न नव्हे तें. Conceal शब्दही संस्कृतच असून सचैल शब्दापासून निघाला आहे. असो.

या विषयावर त्यांनीं कांहीं सिद्धांत बसविले होते, आणि त्यावरून हल्लींच्या भाषाशास्त्रांत मोठाले फरक करावे लागतात. द्राविडी आणि आंध्र या भाषा बोलणारे लोक हे अगदीं स्वतंत्र असून दोन्हीही वैदिक आर्यांहून वेगळे होते, आणि पुढें जरी कांहीं वैदिक आर्यांनीं त्यांच्या भाषा व चालीरीती उचलून ते द्रविड व आंध्र बनून गेले, आणि त्यामुळें

संस्कृतप्राय होऊन त्यांच्या भाषा संस्कृतोत्पन्न वाटण्यासारख्या झाल्या, तरी मूळ त्यांच्या प्रकृती भिन्न आहेत. पैकीं द्रवीड मानववंश विस्तृत असून पृथ्वीवर पुष्कळ ठिकाणीं पसरलेला होता असें त्यांचें मत होतें.* ग्रीक लोक ही मूळचीं तामीळ वसाहत असून ग्रीक भाषेचें मूळ तामीळ भाषेंत सांपडतें. त्याचप्रमाणें रोमन लोक व त्यांची भाषा हे मूळ द्राविडी होत. 'लॅटिन' शब्दच मुळीं द्राविडीय आहे. द्राविडी भाषेंत तेलगु हा शब्द 'तेनेगी' असा आहे. 'तेने' म्हणजे मधुर आणि संस्कृत ' गी' म्हणजे वाणी यांच्या मिश्रणानें द्रविड लोकांच्या स्वभाषेच्या अभिमानाचें द्योतक असा हा शब्द बनला. तेनेगी म्हणजे मधुर भाषा, इंग्लीश Honey शब्द या तेनेचाच वंशज आहे. तेलगु भाषेंत ' लात ' म्हणजे ' मागचे ' असा शब्द आहे. तो लात ( इंग्लीश Late ) आणि तेनेगी यापासून ' लात तेनेगी ' म्हणजे मागाहूनची भाषा असा शब्द झाला. तेंच लॅटिन शब्दाचें मूळरूप आहे. आर्य लोकांच्या सहवासानें त्यांच्या भाषेमध्यें संस्कृताचें मिश्रण झालें आणि संस्कृताच्या लकबीही त्यांनीं उचलल्या. तरी मूळ दोघांचेंहि अगदीं वेग-

---

* या कल्पनांस पुष्टि देण्याजोगे कित्येक शोध ' मोहेनजोडारो ' व ' हराप्पा ' येथील भूगर्भ संशोधनांत ' पुराणवस्तु संशोधक ' खात्यास नुकतेच लागले आहेत. ता० १०-१-२६च्या ' इंडियन डेली मेल'च्या अंकांत त्याची माहिती देऊन लेखक म्हणतो ' It may already be taken for granted that as branches of a common race, the populations of North-West India and Sumer enjoyed a common civilisation at a time when the former was probably free from any admixture of of that Aryan Stock which now dominates its political complexion.

* * * *

It will indeed be strange reversal of preconceived ideas should it proved that the magnificent civilisation of Babylonia, with all its art, literature, and economic excellence and its almost world--wide dominance, was infact due to the Dravidian tribes which in later years came to be associated with one of the lesser forms of civilisation.'

वेगळें आहे. वैदिक लोकांच्या भाषेहून आणि मानववंशाहून तदितर भाषा आणि वंश हे ओळखण्याची मुख्य खूण त्या भाषेंतील स्वरांत आणि धातूंच्या रचनेंत आहे. अण्णासाहेबांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "*It may be generally affirmed that the roots or verb-words of the Vaidic or Sanskrit language have been analytical and constitutional and conventional or accidental circumstances have taken a small part, if any, in their formation...... The Vaidic roots or Verb-words being generally constitutional and analytical in their formation, derivatives from such roots are generally expressive or indicatory of their analytical formation. The Vaidic language, therefore, as a whole, has ever remained pure, original and unmixed with any sound foreign to the physical frame and mind of the Vaidic human being. But as the Vaidic Rishis and practical philosophers travelled all over the world, in various directions for the propagation of the Transcendental Science, and their original civilization, the languages of the various non-vaidic races, came to be united and mixed with the elements of the Vaidic

---

* वैदिक भाषा आजपर्यंत शुद्ध, जशीच्या तशीच आणि निर्मळ राहिली आहे. याचें कारण असें कीं तिच्यांतील 'धातु' अथवा त्यांच्यापासून निघालेले शब्द यांची रचनाच अशी कांहीं विशिष्ट तऱ्हेची आहे कीं त्यांच्या व्युत्पत्तींतच त्यांनीं द्योतित केलेल्या सर्व भावांचा समावेश असतो. त्यांच्या रचनेंत केवळ लोकाचार अथवा अशाच प्रकारच्या इतर भानगडी फार थोड्या असतात. त्यामुळें मूळ वैदिक शरीरें व मनें यांना अपरिचित अशा शब्दोच्चाराचा तिला संपर्क लागलेला नाहीं. परंतु वैदिक ऋषि आणि योगी हे ज्ञानदानाकरितां जगभर हिंडत असतां त्यांचा व अवैदिक लोकांचा संबंध येऊन त्यांची व अवैदिक लोकांची भाषा यांचे वर (म्हणजे त्यांच्या मूळ लेखांत) सांगितलेल्या नियमान्वयें मिश्रण होऊन अवैदिक भाषांत नवीनपणा आला. ]

language, in various ways and degrees, according to the rules mentioned herein, above."

ह्या नियमां पैकीं मुख्य नियम असा होता कीं,* When two humam beings belonging to different races and speaking their respective languages communicated their notions to each other, they joined the words in cheir respective languages, for the common notions, relating especially to perceptible acts, objects etc. ( as shown in the formation of the word 'elf' ). Of course, in the process of joining the words, parts of the words were lost, positions of letters in the respective portions were reversed. हा या विषयावरील त्यांचा स्वतंत्र सिद्धांत आहे. वैदिक लोकांच्या मूळाक्षरापेक्षां अवैदिक लोकांचीं मुळाक्षरें कमी आहेत. याविषयीं ते म्हणतात:-§The number of letters of alphabets forming the languages of the non-vaidic races, is far less than the number—of letters forming the Vaidic alphabets— not to say that there are some vowel letter sounds which

---

* 'दोन भिन्न भाषा बोलणारे लोक जेव्हां परस्पर व्यवहार करूं लागत तेव्हां त्यांच्या भाषेंतील एका कल्पनेचे समानार्थक शब्द एकत्र होऊन वेगळेच शब्द बनत. आणि हे शब्द बहुतकरून नित्य व्यवहारातले पदार्थ, क्रिया व साधे साधे भाव, यांचे द्योतक असत. हे शब्द बनताना अर्थातच कांहीं वर्ण गळून जात, कांहींची उलटापालट होई, व क्वचित कोठें थोडें रूपांतर होई.' याला ते 'एल्फ' म्हणजे पिशाच या शब्दाचें उदाहरण देत. हा शब्द कानडी 'एल्' म्हणजे हडळ अथवा भूत आणि संस्कृत 'पिशाच' यांच्यापासून झाला आहे असें ते म्हणत असत.

§ वैदिक भाषेंतील मूळाक्षरांच्या संख्येपेक्षां अवैदिक भाषांतील मूळाक्षरें संख्येनें पुष्कळच कमी आहेत व अवैदिक भाषांत कित्येक 'स्वरध्वनी' असे आहेत कीं ते वैदिक भाषेस अगदींच अपरिचित असल्यामुळें त्यांच्या सहाय्यानें वैदिक भाषेहून अवैदिक भाषा केव्हांही वेगळेपणानें उमटून काढतां येईल.

must always serve to preeminently distinguish the languages of the non-vaidic races from the Vaidic or Sanskrit language.

वैदिक भाषांहून अवैदिक भाषा ओळखावयाची एक मुख्य खूण अशी आहे कीं, but, put, can, ought वगैरे शब्दांच्या उच्चारांत असलेले स्वर हे ऱ्हस्व स्वर नसून अर्धस्वर आहेत. अ, इ, उ वगैरे स्वर ऱ्हस्व असले तरी पूर्ण आहेत, आणि त्यांचा उच्चार करतांना नाभिस्थानीं मूळ धक्का बसतो. परंतु हे but, put वगैरे अर्धस्वर उच्चारतांना हृदयाजवळील शिंपीवर आघात होतो.* असे अर्धस्वर संस्कृत भाषेमध्यें मुळींच नाहींत आणि संस्कृतेतर भाषांतून मात्र आहेत. 'अःकपाभ्यां' या एका सूत्राचा अपवाद सोडला तर, आणि येथेंही अर्धस्वरता विसर्गामुळें आहे. संस्कृत भाषेमध्यें अर्धस्वर एकही नाहीं. अर्थात् हे अर्धस्वर असलेल्या भाषा बोलणाऱ्या लोकांचा पूर्वी एक स्वतंत्र वर्ग असून, त्या लोकांची शरीरेंही मूळ वेगळीं असलीं पाहिजेत. कारण* The sound and its living energy are modified and modulated according to the physic al structure or parts of the animal whose soul produces the sound. एकमेकांच्या संकरानें जसे इतर मानववंश शुद्ध राहिले नाहींत, तसेच त्यांच्या भाषाही राहिल्या नाहींत. त्याकाळीं वैदिक संस्कृती आणि वैदिक लोकांचें वर्चस्व हें सर्वत्र अबाधित असल्यामुळें त्यांचीं शरीरें आणि भाषा यांत वैदिक वळण आलें, आणि

---

* They are not short vowelsounds and do not correspound to the sounds of अ, इ, उ, ए. ओ to be found in Vaidik words. For, the sounds of these Vaidik letters begin i. e. in the sence of being first felt, at or about the hyoid bone. Where as the sounds of those letters as illustrated by the *said* English words are first felt at or about the lower end of the ensiform cartilage of the chest.

* शब्दांचा नेटकेपणा व त्यांची शक्तिसंपन्नता हीं उच्चार करणाऱ्या प्राण्यांच्या शरीरयंत्रावर अवलंबून आहेत.

त्यामुळें मूळ हा कीं ती अशी पंचनळी उत्पन्न झाली, परंतु अर्धस्वराची खूण जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत हा भ्रम दूर होण्यास मार्ग आहे.

दोन भाषांतील सारख्याच अर्थाचे शद्व एकत्र येऊन त्यांचा एक शद्व कसा बनतो याच्या उदाहरणार्थ मराठींतील ' कोण ' ( सं. कः + वन. ते. ) आणि इंग्रजींतील Nil, Soul, Devil, Land, Juhova, Calf, Horse, Make, वगैरे शद्वांचीं उदाहरणें ते देत. Nil हा शद्व संस्कृत ' न ' अथवा ' ना ' आणि तेलगु ' इल्ले ' या पासून झालेला आहे. Soul हा संस्कृत ' स्व ' आणि तेलगू ' इल् ' ( पिशाच ); Devil ' देव ' आणि ' इल् '; Land तेलगू ' न्याला ' ( जमीन ) संस्कृत ' देश '; Juhova जीव + वायु; व Calf 'काल' या तामीळ शद्वास संस्कृत 'पाद' हा त्याच अर्थी शद्व लागून झाला. Horse तेलगु गुन्ह + अश्व; Make कानडी माडु + कृ. कानडी माडु पासूनच do हा इंग्लिश शद्व आहे. कारण त्याचा भूतकाळ did हा कानडींतही माडिदि असा आहे. Make शब्दाच्या भूतार्थी दुसरें रूप न येतां माडिदिचाच 'दि' गळालेला दुसरा अपभ्रंश Made हा राहिला. याच्याच जोडीला 'दिशांतर' शब्दांतला 'दि' गळून बनलेला Country शब्द, स्वराजन् आणि परराजन् यापासून झालेले Sovereign आणि Foreign, ( या शब्दांतील g कोठून आली ते पाश्चात्य पंडीतास सांगतां येत नाहीं. ही g राजन् मधील 'ज' चें अपत्य आहे. ) नाइक=काइन King, आणि नाइकीण=Queen; व्याघ्र पासून बनलेला अमेरिकन वाघाच्या जातीचा वाचक jagwar; बहुल शब्दापासून झालेला whole ( यांतील w चा पत्ता लागत नव्हता ) तामीळ सप अथवा सापडा यापासून झालेले Sup, Supped; तामीळ तळी ( स्त्री ) आणि ग्रीक Thalia; तामीळ तंड्री आणि ग्रीक Andry ( पुरुष ), तामीळ सपात् आणि इं० Supper; कानडी होग्ग आणि इं० hug आणि go ( जवळ जाणें ); तैलगु च्यूसी आणि इं० See अथवा Show; तेलगू सचि आणि इ० Cease; तेलगू पिलु, तिनु, यापासून त्याच अर्थाचे बनलेले Appeal, dine; त्राडु, इव, वांडा यांचे Thread, give, Want आणि व्रातचें write ( Write मधील W च्या शेंपटाचें मूळ )

पिशाच शब्दापासून झालेला Psyche ( यांतील P चे पाश्चात्य पंडीतास कोडें होतें ); तसेंच तेलगू गोटलु आणि goat, cattle; संस्कृत 'ऋक्थ आणि right ( हीं g उलगडत नव्हती तीं ऋक्थ मधील 'क' कार होय ) असे अनेक शब्द ते भराभर सांगत, परंतु कोणी उतरून ठेवण्याचा उद्योग न केल्यामुळें या नुसत्या दिग्दर्शनावरच तहान भागविणें भाग आहे.

रोमन लोकांना विशेषतः आपल्या राजकीय संस्था आणि कायदे यांचाच फार अभिमान होता, आणि त्याकरितां अजूनही त्यांचा अभिमान बाळगण्यांत येतो. परंतु त्यांच्या राजकीय संस्था आणि कायद्याची पद्धती या वैदिक लोकांपासून जशाच्या तशाच उचलल्या आहेत, असें ते दाखवीत असत. मूळ स्टेट हाच शब्द ' संस्था ' शब्दापासूनच झाला आहे. त्याचप्रमाणें तत्संबंधीं इतर कल्पनांचे शब्द Comitia म्हणजे समिति Curia म्हणजे सुर to govern, rex राजा, Socious सखी, Juris ऊर्जस्, Tribune त्रैवर्ण, Triumvirate त्र्यावरा, आणि Decemvirate दशावरा- अशा रितीनें संस्कृतांतून जसेच्या तसे उचलले आहेत. त्याशिवाय Allodium म्हणजे लोष्ठ, Savants=सर्वज्ञ, Omega ओं + एकं, आणि Amen= तेलगु ऑ माँ, वगैरे शब्दांचे इतिहास सांगून तें आपलें म्हणणें सिद्ध करून दाखवीत असत. तसें अर्थातच मला सांगणें शक्य नाहीं. परंतु मुख्य कल्पना मला मांडतां आली तितक्या स्पष्टपणें मी मांडीत आहे. ही सूचक होऊन जर कोणी विद्वान परिश्रम करील, तर वाङ्मय व इतिहास यांच्या दृष्टीनें व इतरही अनेक बाजूंनीं फायदा होईल. यासंबंधीं त्यांचा हातचा एक मराठी उल्लेख सापडतो–' स्व, ' ' निज, ' 'हीं नांवें आत्म्याचीं आहेत, व तीं अव्ययें होत. जरी यातील अर्थ किंवा वस्तु नामवाचक आहे तरी. कारण ती वस्तु अविनाशी किंवा न पालटणारी ( आहे ). किंवा कमीजास्त होणारी नाहीं. हें माझें राज्य असें प्रत्येकाला म्हणतां येईल तें स्वराज्य–लोकनियुक्त–प्रजासत्ताक होय. आत्मा एकच असून तो सर्वत्र भरलेला आहे, म्हणून त्याच्या सत्तेचा व अधिकाराचा अंश सर्वांस सारखाच मिळाला पाहिजे. हा स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा पाया मूळ वैदिकज्ञान व भाषा ( यांत ) व त्या भाषेच्या रक्तांत होय. अवैदिक भाषेंतील अ. इ, उ, ए इत्यादि स्वर Cut, Kit, Put, Get, Fat इत्यादि उच्चारते वेळेस समजलें पाहिजे, कारण यांचा

उच्चार होते वेळेस उराच्या शिंपी जवळील भागास धक्का बसतो. तसा वैदिक अ, इ इत्यादि उच्चारते वेळेस बसत नाहीं. '

रोमन लोकांत पुढें उत्पन्न झालेली आणि परंपरेनें आतां सर्व जगांत स्थापित होऊं पाहणारी लोकसत्ताक राज्याची कल्पना ही देखील मूळ रोमन कल्पना नसून वैदिक कल्पनाच आहे. याविषयीं ते स्वतःच लिहितात. " 'स्वतंत्रः कर्ता' ". ( तंत्र म्हणजे राज्य करणें, नियमन करणें; जसें 'प्रजाः प्रजाः स्वा इव तंत्रयित्वा. ' शाकुंतल. ) मनुष्य स्वतंत्र्य असून जर त्यानें एखादी गोष्ट केली, तरच ती त्यानें केली असें म्हणतां येईल व त्याबद्दल त्यांस जबाबदार धरतां येईल. म्हणून वागणुकीचे नियम ज्याचे त्यानेंच केलें पाहिजेत. दुसऱ्यानें केलेल्या नियमांचें उल्लंघन एखाद्यानें केलें तर त्याबद्दल तो जबाबदार नाहीं. कारण त्यांनीं तो बांधला जात नाहीं. म्हणून राज्य नियम लोकांनी आपापलें स्वतः केलें पाहिजेत; किंवा त्यांना ते मान्य असलें पाहिजेत. म्हणून नियम किंवा राज्य करण्याचा अधिकार लोकांनींच दिला पाहिजे, व तो अधिकार स्वतः अविभाज्य आहे. म्हणून तो एका व्यक्तीस अथवा समूह व्यक्तीस देतां येईल. म्हणून राज्य म्हणजे लोकसत्तात्मकच पाहिजे. म्हणून हिंदुधर्म शास्त्रांत राज्य कोणास मिळावें याविषयीं नियम सांगितलें नाहींत. राज्य देतां येतें, पण घेतां येत नाहीं. ......... पाश्चिमात्य देशांत राज्य म्हणजे लोकांवरील व लोकांचा नियमन व अधिकार ही मूळ कल्पना नष्ट होऊन, सामान्य भूमी असा अर्थ झाला, व तें स्थावर वडील मुलास मिळतें, असा वारसाचा नियम होऊन बसला, यावरून लोकसत्तात्मक राज्य कल्पना त्या त्या देशांत नव्हती किंवा नष्ट झाली असें म्हटलें पाहिजे."

बुधवार १--१--१९०२ ].

# स्त्रिया आणि वैदिक संस्कृति.

"Subjection to Hindu Law must be deemed to be voluntary, for the very Nature of the principles to which it has been adjusted, has rendered it incapable of being forced upon any person.

No Rule of Hindu Law is opposed to the acquisition of Secular Knowledge, nor to the improvement and enlargement of the accommodation of human life. On the contary the rules of Hindu Law, as lead down by Manu, have made it obligatory upon a Hindu to pass the ordinary course of life and follow all fair avocations as a member of an organized or civil society.

The active or universal portion of the Supreme Being or Soul, has purposely kept limited the quantity of land as being available, for human purposes, and made human frame comparatively weak, and defective, and endowed a human being with a comparatively very high degree of intellectual powers and faculties both in point of quality and quantity and thus put him in the way and condition to study and acquire the knowledge of the outer physical world of which his own frame forms but a part, and to use the knowledge so acquired for the protective purpose of his secular life and also for the development and attainment of the highest practical degree of inlellectual powers and faculties which directly form part of the Supreme Being pervading the human frame, in order to enable a human being enjoy ultimately the highest pleasure of the Supreme Being, as an active universal existence, by putting himself, as a matter of course, above the usual wants, necessities and limitations of his mortal frame. As already remarked above, the social

life under Vaidic Hindu Law, is a sort of practising school and should be looked upon as only a means to the attainment of higher intellectual end. Life is a valuable gift and should be carefully and cautiously utilised. Accordingly Hindu Law inculcates that, human labour, both physical and intellectual should be spent or used only productively that is to say, for producing in plenty only the best quality of the necessaries and not luxuries of Secular life.

The first 'Sine qua non' of The Transendental Science has been to prevent and control the rise of the feeling and notion in one's self of separation, difference, exclusion, distence, and the like in relation to the external world and to establish the feeling of common bond or union between one's self and the outer world, in all matters and all occasions as far as possible. Consequently all the rules of the Hindu Law, whether regarding succession, inheritence, transfer and acquisition of property, public and private duties, or other like matters, tend to promote and are adjusted to the primary principles and the attainment of the said one great object of the human existence.

The corporate character of both property and society in India, was brought about only by the popular conviction of the truth of the Transendental Science, and the all pervading nature and trans-migration of the soul and also of the first and chief principal of the science namely to produce the enervation and suppression of individualism, and was not created by the principal of reciprocity which is usually founded upon considerations of utility or convenience or both."

"It will thus be seen that the Vaidic Hindus are voluntary subjects of the Law and the subjection has had

its origin in the free and voluntary determination of every individual to abide by the law and not any pact force or compulsion of any kind whatever."

वरील विस्तृत उताऱ्यांवरून आणि चातुर्वर्ण्य वगैरे प्रकरणांत ठिकठिकाणीं आलेल्या त्रोटक विवेचनावरून वैदिक संस्कृति आणि ब्रह्मविद्याशास्त्र यांचें एकंदर धोरण काय आहे, हें लक्षांत येईल. हिंदुस्त्रियांच्या अवनतीचीं मोठीं हृदयस्पर्शी चित्रें काढून आज सारें अवैदिक जग आणि हिंदु समाजांतील त्याचे 'मानस' पुत्र हे वर्षानुवर्ष हळहळत आहेत. आणि या त्यांच्या हळहळण्याचा परिणाम आमच्यांतील मोठ्या धाकट्या विदुषींच्यावरही होऊन त्यांचेही एकापेक्षां एक तारे तुटलेले सभांतून आणि लेखांतून ऐकूं येतात. त्या सर्वांचा मथितार्थ इतकाच आहे कीं, विधात्यानें स्त्रीपुरुषामध्यें जो भेद ठेवला आहे, तो 'देहींच मात्र' आहे, आणि तो 'संतति कार्याला'च आहे. जणूं कांहीं हा भेद म्हणजे अगदीं क्षुल्लक आणि 'संतति कार्या'सारख्या एखाद्या किरकोळ क्षणिक कार्यापुरताच आहे! त्याचें महत्व तें काय? आणि तो विसरून गेला असतां, स्त्री आणि पुरुष हे दोन्हीही सारखेच असून दोघांसही श्वान वगैरेंच्या समाजांत ज्याप्रमाणें सर्वच स्त्रीपुरुषांचा सर्व सुखोपभोगाच्या बाबतींत एकमेकांवर सारखाच हक्क असतो, त्याचप्रमाणें अगदीं समसमान हक्क असले पाहिजेत. अशी वस्तुस्थिती असतां पुरुषांनीं आपल्या अप्पलपोटेपणानें स्त्रियांना दास्यत्वांत ठेवून अज्ञानाचें साम्राज्य दिलें आणि त्यामुळेंच आज हिंदुस्थानांत सामाजिक अवनति होऊन परकीयांचें साम्राज्य झालें. अजूनही जरी डोळे उघडावयाचे असले, तर स्त्रियांस समान हक्क देऊन त्यांचा दर्जा वाढविला पाहिजे, असा सर्वत्र ध्वनि उठत आहे. यांत कांहीं तथ्य आहे किंवा नाहीं आणि असल्यास काय तथ्य आहे, सामाजिक अवनति स्त्रियांच्या दास्यत्वामुळें आणि अज्ञानामुळें झाली, किंवा सामाजिक अवनतीमुळें हीं दोन मध्यें घुसलीं, आणि समसमान हक्काचे हें खूळ काय आहे, व व त्याचें निराकरण कसें करावयास पाहिजे याचा थोडक्यांत विचार करून, त्या विषयीं अण्णासाहेब यांची कल्पना सांगणें जरूर आहे, इतका तो प्रश्न आजकाल महत्वाचा होऊन बसला आहे.

कोणताही प्रश्न उपस्थित होवो, त्याच्या जोडीस स्त्रीशिक्षणाचें एक शेंपूट

असतेंच. *शिक्षण म्हणजे काय*, याचाच जेथें कांहीं निर्णय लागत नाहीं, आणि पुरुषाच्या शिक्षणासच ठिकाण नाहीं, तेथें स्त्रीशिक्षणाच्या नांवानें मात्र मोठा अट्टाहास चाललेला दिसून येतो. त्यामुळें धड कोणत्याच शास्त्रीय तत्त्वावर न उभारलेले संस्कार आणि कांहीं तरी आगापिछा नसलेल्या कल्पना यांचा मारा स्त्रियांच्या मेंदूवरही होऊन तो एक विचित्र प्राणिवर्ग होत चालला आहे. अशा रीतीनें स्त्री आणि पुरुष हीं समाजाचीं दोन्हीही अंगें प्रत्येक तऱ्हेच्या वैदिकत्वाला दिवसोंदिवस जास्त पारखीं, आधुनिक संस्कृतीच्या दृष्टीनें जास्त अडाणीं अशीं होत आहेत. अशा स्थितीमध्यें जर वरील प्रश्नांच्या वैदिक संस्कृतीच्या दृष्टीनें कांहीं नव्या बाजू दिसल्या, तर हें गाडें कोणच्या वळणावर न्यावें तें समजण्यास कांहीं लोकांना तरी उपयोग होईल.

वर सांगितलेंच आहे कीं, वैदिक धर्माचा ' एकमेवाद्वितीयम् ' हा आद्य सिद्धांत असून याला धरूनच त्यांनीं आपलीं सारीं शास्त्रें रचिलीं. अर्थात् त्या सर्वशास्त्रांचें धोरण ' एकमेवाद्वितीयम् ' या महासिद्धांचा प्रतिसिद्धांत जो सर्व तऱ्हेच्या विषमतेचा नाश करणें, तो जेणें करून साधेल अशीं रचिलीं. अशा स्थितींत स्त्रीपुरुषांच्या बाबतींत मात्र अप्पलपोटेपणानें त्यांनीं विषमता ठेविली असें म्हणणें अज्ञानीपणाचें आहे. या लोकांच्या समतेची व्याख्याच कांहीं और असली पाहिजे. सर्वभूतांच्या ठिकाणीं समत्व पाहावयाचें, म्हणजे गाईचा चारा माणसापुढें ठेवावयाचा आणि कांडून कुटून जवळजवळ निःसत्व केलेला भात गाईस घालावयाचा, अशीच यांच्या समतेची व्याख्या दिसते. समतेची अशा प्रकारची कल्पना वैदिक धर्मांत केव्हांही नव्हती. मनुष्याचें अत्युच्च ध्येय जें ब्रह्मप्राप्ती आणि त्याला आवश्यक असलेली अतींद्रियता हीं जेणेंकरून शक्य तितक्या थोडथा वेळांत आणि योग्य परिश्रमांत प्राप्त करून घेतां येतील, अशी परिस्थिति प्रत्येकापुढें ठेवणें, आणि तिचा फायदा त्या प्रत्येकास थोडाबहुत तरी मिळेल, अशी सहजच व्यवस्था असणें, हीच त्यांची समतेची कल्पना होती. समतेच्या नांवाखालीं एकापेक्षां दुसरा अधिक लठ्ठ झाला म्हणून त्याचें तेवढें अंग कापून काढा, असली खुळी कल्पना त्यांनीं कधींही वाढविली नाहीं.

अर्वाचीन विचार पद्धति आणि वैदिक लोक यांच्या समतेच्या कल्पनेंत फरक पडण्याचें आणखीही कारण आहे. अर्वाचीन विचारपद्धति सर्व इंद्रियांची

थोड्या श्रमांत पुष्कळ वेळपर्यंत अबाधीत चैन कशी चालावी, या एका ध्येया-प्रीत्यर्थच धडपडत असल्यामुळें, इंद्रियसुखाच्या आड जें जें येईल तें तें दूर करण्यापलीकडे तिच्यापुढें दुसरा विषय नाहीं; आणि विषयोपभोग हा त्यांत जोडीदार असल्याखेरीज खरोखर सुखकारक कधींच होत नाहीं. म्हणून त्यांच्या समतेच्या कल्पनेमध्यें सहपान सहभोजन इत्यादिकांना फाजील महत्व आलें. आमच्या इकडे 'वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता' हेंच मुळीं शहाणपणाचें लक्षण ठरल्यामुळें हें साध्य करण्याचें माणसाच्या उपाधि आणि प्रकृति यांस अनुसरून अनेक मार्ग झाले, आणि त्यामुळें समता न बिघडतांही अनेक प्रकारची विषमता उत्पन्न झाली. त्यामुळें एकमेकाच्या गळ्यांत गळा घालणें, आणि एकमेकाचें उष्टें खाणें असा समतेचा संकुचित अर्थ आमच्या इकडे कोणाच्याही डोक्यांत येत नाहीं. उलट प्रेम आणि समता यांत काडीइतकेंहि न्यून न येतां आईच्या हातचें मुलानें, आणि एका भावांस चालणारें अन्न दुसऱ्यानें न खाण्याइतकी क्षमता उत्पन्न झाली. अशा दृष्टीनें पाहिलें तर स्त्रिया आणि शूद्र यांसही समाजांत बाकीच्या इतकाच समान हक्क ठेवला होता.

पूर्वी चातुर्वर्ण्यावरील विवेचनांत सांगितलेंच आहे कीं ब्रह्मविद्या आणि ब्रह्मप्राप्ती या परम ध्येयाची प्राप्ती करून घेण्याची कोणासच मनाई नव्हती. इतकेंच नव्हे, तर ती "याचि देहीं याचि डोळां" प्रत्येकाच्या वाट्यांस कशी येईल, हाच प्रश्न समाजरचना करणाऱ्या ऋषींच्या पुढें होता. कारणपरत्वें स्त्रियांच्या स्वभावाविषयीं आणि चारित्र्याविषयीं अत्यंत कठोरसे विचार उत्तर वाङ्मयांत आलेले आहेत, आणि त्या मूर्ख, अज्ञानी व 'अनृतं साहसं माया' इत्यादि स्फोटक द्रव्यांनीं भरलेल्या बांबगोळ्या आहेत, असें म्हटलेलें असलें तरी, त्यावरून स्त्रियांच्या संबंधानें शास्त्रकारांना कांहीं जबाबदारी वाटत नव्हती, अथवा त्यांच्या संबंधाची पीडा कशी तरी टाळावयाची होती, असें नाहीं. स्त्रियांच्या अनुदारपणासंबंधीं शास्त्रकारांवर मुख्य आरोप असें करण्यांत येतात कीं, ( १ ) स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षां सर्व तऱ्हेनें हीन कोटीच्या असून त्यांच्या अंगीं, पुरुषांस कल्याणकारक असणाऱ्या गोष्टींपेक्षां घातुक होणाऱ्याच गोष्टी जास्त आहेत; ( २ ) त्या जात्याच अतिशय कपटी, असत्यप्रिय, निर्दय, धूर्त आणि साहसीं आहेत; ( ३ ) स्वभावतःच त्यांची प्रवृत्ति पापा-

कडे आणि विषयोपभोगाकडे अनिवार असते. (४) त्यांच्या मत्सरी, कलहप्रिय आणि चंचल प्रवृत्तीमुळें त्यांना स्वतंत्र राहूं देणें, केव्हांही अपायकारक आहे, म्हणून त्यांना पारतंत्र्यांतच ठेवलें पाहिजे, आणि त्यांच्या बुद्धीला फांटे न फुटूं देण्याकरितां त्यांना अज्ञानांतच गाडून टाकलें पाहिजे--असे सिद्धांत त्यांनीं प्रचलित केले, आणि त्यामुळें स्त्रियांना शिक्षणाचा लाभ न होतां पारतंत्र्यामध्यें कष्टानें दिवस काढावे लागतात.

हे सिद्धांत खरे आहेत किंवा खोटे आहेत, त्यांची व्याप्ति अमर्याद आहे, कीं, कांहीं रीतीनें मर्यादित आहे, आणि ते कांहीं विशेष कालास अनुसरून आहेत कीं त्रिकालाबाधित आहेत, यासंबंधीं विशेष खोलांत न जातां, इतकेंच म्हणतां येईल कीं स्त्रियांची योग्यता अतिशय मोठी असून स्त्री म्हणजेच भावी राष्ट्राची जन्मदात्री, म्हणून जेणेंकरून ती संतुष्ट राहील, अशा प्रकारें त्यांना वागवावें, अशाही अनेक समजुती शास्त्रांत सांपडतात; आणि आजच्याकाळीं देखील, सुधारणेच्या अत्युच्च स्थितींत असलेल्या राष्ट्रांतदेखील, त्याच्याविषयीं या दोन्ही प्रकारच्या समजुती साधारणतः सारख्याच प्रमाणांत आहेत असें दिसून येईल. एकीकडे संस्था, सभा, वृत्तपत्रें व मासिकें, इत्यादि दर्शनी वाङ्मय त्यांची तारीफ करीत असल्याचें दिसून येतें; तर दुसरीकडे समाजाचीं चित्रें रेखाटणाऱ्या कादंबऱ्या, नाटकें, सिनेमा वगैरेंतून त्यांचीं काढलेलीं चित्रें " अनृत साहसं माया " इत्यादि सिद्धांतांना सोडून तर नसतातच, परंतु उलट अधिक बळकटी आणणारीं असतात. तेव्हां त्या संबंधानें शास्त्रकारांनाच वेड्यांत काढण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. स्त्री आणि पुरुष हा केवळ संततिकार्याकरितां म्हणूनच जो भेद वाटतो, तो तितका क्षुद्र नसून, अत्यंत महत्वाचा आहे, असें बीजतःच शरीरें विशेष तऱ्हेचीं निपजावीं म्हणून पराकाष्ठेची काळजी घेणाऱ्या शास्त्रकारांना वाटत होतें. ज्या अर्थी स्त्रीपुरुषांचीं कार्येंच भिन्नभिन्न आहेत, त्या अर्थी त्या भिन्नभिन्न कारणांवरूनच, त्या दोघांचीही तयारी, भिन्नभिन्न रीतीनेंच झाली पाहिजे हें उघड आहे. मनुष्याचें शरीर हें ज्या ध्येयाकरितां योग्य व्हावें असें वाटत होतें, त्या ध्येयासाठीं या शरीरांतील सर्व तऱ्हेच्या भावनांचा संग्रह जें हृदय तेंच उत्तम बनावें, हें उघड आहे. 'मातृजं चास्य हृदयं' असा सिद्धांत आहे. म्हणून मातेचें हृदयच तसल्या प्रकारच्या तत्वानीं बनलेलें असावें हें उघड आहे. स्त्री आणि पुरुष ही एक

प्रकारच्या Negative ऋण and Positive धन विद्युत् प्रवाहासारखीं आहेत, हीं आपलीं भिन्नभिन्न कार्यें सांभाळून ब्रह्मप्राप्तीचें अत्युच्च ध्येय कसें संपादितां येईल, इकडे लक्ष असल्यामुळें आणि व्यक्ति ही समाजाची घटक असून सामुदायिक हिताहिताच्या दृष्टीनें तिच्या हिताहिताची योग्यता ठरविली पाहिजे, आकुंचित दृष्टीस कदाचित् एखाद्या किरकोळ बाबींत त्यांचें अहित होतें असें जरी दिसलें तरी त्यानें एकंदर समाजाचा जर फायदा झाला तर त्याच्याबरोबर अखेरीस यांचाही आहेच, अशी विचारपद्धति उपयोगांत आणून शास्त्रकारांनीं स्त्रियां-संबंधीं सर्व प्रश्न सोडविले आहेत.

शिक्षण म्हणजे एखादी भाषा उत्तम बोलतां येणें, अगर एखाद्या विष-यांत जास्त कल्पना करतां येणें अशी त्यांची कल्पनाच नव्हती. शरीरांतील इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन मुख्य शक्तींची समप्रमाणांत परस्परांस प्रेरक, पोषक आणि वर्धक होतील, अशा रीतीनें वाढ होऊन त्या ठिकाणीं, स्वभावतःच जे गुणधर्म ठेवले गेले आहेत ते शक्य तितके उत्कृष्ट रीतीनें प्रगट व्हावे, आणि त्यांच्या मोबदल्यांत ' वशे हि यस्येंद्रियाणि ' अशा रीतीनें प्रजा प्रतिष्ठित होऊन, प्राप्त परिस्थितीचा शक्य तितका उपयोग ध्येयाच्या प्राप्तीस कुशलतेनें करून घेतां यावा, व अशा रीतीनें व्यक्तीचें आणि समाजाचें दोघां-चेंही समान कल्याण व्हावें असेंच त्यांचें धोरण होतें. अशा प्रकारचें वळण मनुष्याच्या मनबुद्धींद्रियांना कळून न कळून खुषीनें अथवा सक्तीनें, सुखानें अथवा कष्टानें, कोणीकडून तरी लागावें हाच त्यांच्या शिक्षणाचा अर्थ होय. अहिल्याबाई होळकरीण अथवा भोंसल्यांची जिजाबाई यांना स्वतःला कदा-चित् एक अक्षरही लिहितां येत नसेल ! अगर आजकालच्या मानानें स्त्री-शिक्षण म्हणतां येईल असें त्यांच्या अंगीं कांहींही नसेल, म्हणून त्या अशि-क्षित होत्या, असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं हीच दृष्टी ठेवून स्त्रियांच्या शिक्षणाची त्यांनीं व्यवस्था लावली.

वर सांगितल्याप्रमाणें पुरुषांकडून भिन्न असलेलें आपलें कार्य सांभाळून अतिशय सहज रीतीनें त्यांस उत्तमपदप्राप्ति व्हावी, म्हणून जी शिस्त त्यांना लावून देण्यांत आली, तिचें नांव पातिव्रत्यधर्म.

या पातिव्रत्यधर्मानें जरी पतीचें आणि उभयपक्षांकडील अनेक कुळांचें

कल्याण होत असलें, तरी वस्तुतः स्त्रीनें हा स्वतः करितांच आचरावयाचा आहे. हरएक प्रकारचा व्यक्तिकल्पनेचा लोप होऊन विश्वकुटुंबित्वच उदयास यावें, अशी रचना करतांना शास्त्रकारांनीं असें पाहिलें कीं, व्यक्तीव्यक्तींत भेद उत्पन्न करून वितुष्ट आणणाऱ्या सर्व गोष्टींत पैसा, स्त्री आणि कोणावर तरी आपली अकुंठित सत्ता असावी ही इच्छा, या तीन प्रमुख होत. याविषयीं ते लिहितात की, " Hindu Law recognized the fact that the woman, the capital whether in the shape of land or other things, and the indomitable desire to possess exclusive power over beings and things, have been the three great factors or agents, which generally cause disunion, and differences among men. It therefore amalgamates, as it were, the woman with the man with an indissoluble marriage-tie having at the same time due regard to the natural laws that hybrids never continue their race and that consanguinity deteriorates the race in the long run.

याप्रमाणें स्त्रियांना अभेद्य रीतीनें पुरुषांशीं गांठून दिल्यावर साहजिकच त्यांच्यामागें स्वतंत्र कर्तव्य असें उरलें नाहीं. कर्तव्यबुद्धीनें प्राप्त परिस्थिति पार पाडावी, एवढेंच त्यांचेमागें कर्तव्य उरलें. त्यामुळें त्यांचा खरोखर फायदा झाला, किंवा नुकसान झालें, तें पाहूं.

पूर्वी एका प्रकरणांत हें उघडच सांगितलें आहे कीं त्रैवार्णिक आणि शूद्र व स्त्रिया यांच्यामध्यें निर्बंध काय तो वेदमार्गाचाच होता. इतर कोणच्याही तऱ्हेच्या ज्ञानाचा अथवा मार्गाचा निर्बंध नव्हता. वेदमार्गाचा तरी निर्बंध कां असावा, हें त्या प्रकरणांत स्पष्टपणें सांगितलें आहे. त्यामुळें स्त्रियांस मुद्दाम अज्ञानांत ठेविलें हें म्हणणें अयोग्य ठरतें. स्त्रिया अज्ञानांत राहिल्या असतील तर तो इतर सामाजिक कारणांचा परिणाम होय. त्याचप्रमाणें स्त्रियांस पारतंत्र्यांत ठेविलें, हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वाक्याचा अर्थ स्त्रियांना मोकळीक असूं नये, असा नसून राज्यशासनामध्यें त्यांना मत ( Vote ) देण्याचा अधिकार नव्हता, असा असून हें वाक्य मनुस्मृतीमध्यें हल्लीं ज्या अध्यायांत सांपडतें, तेथील मूळचें नसून दुसऱ्या अध्यायांतील आहे, असें

अण्णासाहेब सांगत असत. आणि पूर्वी एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें स्त्री शब्दांतील स्त्रीचा नञर्थी 'स'शीं जडलेला योग पाहिला, व वैदिकशास्त्रांत राज्य, दंडनेतृत्व आणि सेनापत्य यांचा अभिषेक कोठेंही सांगितलेला नाहीं, अथवा झाल्याचें उदाहरण नाहीं, हें पाहिलें म्हणजे या तिन्हींचा अधिकार नसलेली समाजांतील व्यक्ती म्हणजे अर्थात् स्त्री-हिला शासनपद्धतींतही मत देण्याचा अधिकार नसावा, हें कांहीं फारसें वावगें दिसत नाहीं-असा अर्थ स्वातंत्र्य शब्दाचा कसा होतो, याविषयीं त्यांचे म्हणणें जास्त मांडतां येणार नाहीं परंतु एका लहानशा टांचणावरून कदाचित् थोडासा बोध होईल. बुधवार तारीख १-१-१९०२ या दिवशींचें हें टाचण आहे व त्यांत एकाखालीं एक अशा नुसत्या दहाबारा कल्पना मांडून पूर्वी एका प्रकरणांत दिलेली 'स्वतंत्रः कर्ता' म्हणजे मनुष्य स्वतंत्र असून वगैरे टीप दिली आहे.

"१ भूगोल = गोल भू = ग्लो + भू = ग्लोब; Be बी = होणें.

२ 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति'—अर्थात् पुमान् स्वातंत्र्यमर्हति.

३ स्वातंत्र्य = स्वातंत्र्यस्य अधिकारः

४ तंत्रं किंवा तंत्र्यम् = नियमन करणें, राज्य करणें, आज्ञा करणें, नियमन करून घेणें (दुसऱ्याकडून किंवा आपल्याकडून.)

५ राजन् = नियमन करणें, आज्ञा करणें—पासून राजा मुख्य असणें.

६ राजा प्रकृतिरंजनात् (रघु० सर्ग ४).

७ प्रजाः प्रजाःस्वाः इव तंत्रायित्वा (शाकुंतल).

८ स्वाराज्यम्.

९ राज्यम् = नियमन करण्याचा अधिकार.

१० स्वतंत्र = स्वराजा.

११ राज्य किंवा तंत्र याचा प्रथम संबंध मनुष्याशीं येतो व मनुष्याचे द्वारें भूमीशीं किंवा देशाशीं परंपरेनें येतो.

१२ प्रत्येक पुरुष स्वतःचा राजा, व स्वतःचीच प्रजा किंवा दास आहे.

१३ स्वतंत्र कर्ता म्ह० मनुष्य स्वतंत्र असून जर त्यानें एकादी गोष्ट केली, तरच ती त्यानें केली असें म्हणता येईल, व त्याबद्दल त्यास जबाबदार धरतां येईल म्हणून वागणुकीचे नियम ज्याचे त्यानेंच केले पाहिजेत. म्हणून दुसऱ्यानें केलेल्या नियमांचें उल्लंघन एकाद्यानें केलें, तर त्याबद्दल तो जबाबदार नाहीं,

कारण त्यांनीं तो बांधला जात नाहीं. म्हणून राज्यनियम लोकांनीं आपापले स्वतःच केले पाहिजेत, किंवा त्यांना ते मान्य असले पाहिजेत. ”

यावरून स्वातंत्र्यामध्यें स्वतःचें नियमन स्वतःच करणें, आणि दुसऱ्याकडून करून घेणें, या दोहोंचाही अंतर्भाव होतो. पैकीं ‘ न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ’ याचा अर्थ तिला स्वतःचें नियमन करून घेण्याचा अधिकार नाहीं, असा होऊं शकत नाहीं. कारण नाहींतर, ‘ स्वतंत्र कर्ता ’ या न्यायानें त्यांच्याकडे कोणचीही जबावदारी न राहती, परंतु कायद्यानें कित्येक गुन्ह्यांत त्यांना दोषी ठरवून, त्यांना शिक्षा सांगितल्या आहेत; म्हणजे त्यांच्याकडे स्वातंत्र्य ठेविलें आहे. म्हणून दुसऱ्याकडून नियमन करून घेण्याचा व त्यानें केलेले नियम मान्य करण्याचा जो एक प्रकार सामुदायिक अथवा वैयक्तिक शासनपद्धतींत आहे त्याच्या संबंधानेंच ‘ न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ’ हें लागू पडतें. स्वातंत्र्य शब्दामध्यें जो स्वायत्ततेचा अर्थ आहे, तो वाटेल तसा मोकाटपणा या अर्थानें नसून दुसऱ्याकडून अथवा स्वतःचें स्वतः नियमन करून घेण्याची स्वायत्तता अशा निर्बंधतेच्याच अर्थानें आहे, कारण ‘ तंत्र ’ शब्दाचाच अर्थ मुळीं तसा आहे, ही गोष्ट विसरून गेल्यामुळें, स्वातंत्र्य म्हणजे ‘ मोकाटपणा ’ अशी कल्पना होऊन, त्यावरोबरच असा मोकाटपणा नसणें म्हणजे पारतंत्र्य, अशा कल्पना आल्या. ‘ तंत्र ’ शब्दामध्यें ‘ तन् ’=विस्तार करणे, मांडणी करणें, आणि ‘ त्रै ’=रक्षण करणें, हे दोन घटक असून,‘ रक्षक–शक्तीची कांहीं तरी मांडणी, किंवा उत्पत्ति ’ असा या शब्दाचा अर्थ आहे. असो. सारांश काय कीं ‘ न स्त्री स्वातंत्र्यमर्हति’ वगैरे कल्पना आज समजल्या जातात, अशा रीतीनें वैदिक नव्हेत. त्याचप्रमाणें समानता वगैरे कल्पनांचीही गोष्ट आहे. वैदिक धर्मामध्यें स्त्री ही नवऱ्याची अर्धांगी असून धर्म, अर्थ, काम, इत्यादिकांचे ठिकाणीं त्या दोघांनींही समाचरण करावें असें सांगितलें आहे. परंतु त्या अर्धभागित्वाचा अर्थ नवरा टेबलाच्या या बाजूस बसला, तर बायकोनें त्या बाजूस बसावें आणि यानें सोमरसाचा एक चषक उडविल्यावरोबर तिनें दुसरा खालीं करावा, असा केव्हांही नव्हता. पाश्चात्य पद्धतींत दंपत्याचे आदर्शभूत संबंधही घेतले, तर त्यांच्या मुळाशीं फार झालें तर प्रेम असूं शकतें, आणि कर्तव्याची कल्पना त्यांच्या मानानें गौण आहे. प्रेमाची उत्कटता कितीही निरपेक्ष असली, तरी त्यांत निदान प्रेमाचा तरी मोबदला मिळावा एवढी तरी

अपेक्षा असते, आणि ती पुरत नसतांनाही प्रेम म्हणजे अंतःकरणाची ओढ आणि कळवळा, ही अढळ असलेली आढळून येतात, परंतु त्या प्रेमी माणसाच्या सुखांत कांहीं तरी, न्यूनता असल्याचा भाव असतो. तशी गोष्ट कर्तव्याची नाहीं. आपण कर्तव्य करीत आहों, याची जाणीव हेंच त्यांतील सुख आहे; आणि मनुष्य कर्तव्य करीत असतांना या सुखांत न्यूनता होणें शक्यच नाहीं म्हणून प्रेमापेक्षां कर्तव्याचा जोर अधिक. प्रेम या वृत्तीचा जोर केवढाही असला, तरी ती वृत्तीच अशी आहे कीं, कोणीतरी तिचा उपभोग घेण्यांत तिची पूर्तता न झाली तर तिचा जोर कांहीं कमी होतो असें नाहीं. उलट तो अतिशय भयंकर रीतीनें वाढेल आणि मनुष्याची अक्कल गुंग करून टाकणाऱ्या धीरोदात्त गोष्टी करील, तरीपण अखेरीस आपला यथायोग्य रीतीनें उपभोग घेतला गेला नाहीं, आणि त्यामुळें आपली पूर्तता झाली नाहीं अशी अंतर्गत जाणीव, त्या वृत्तींत असते. परंतु कर्तव्य करीत राहणें हीच कर्तव्याची पूर्तता असल्यामुळें, कर्तव्य हें केवळ 'स्व'तंत्र आहे आणि प्रेम हें थोडेसें 'पर'तंत्र आहे. वैदिक कल्पनेप्रमाणें माणसांनीं दुसऱ्याशीं जें वागावयाचें तें कांहीं दुसऱ्यावर उपकार करण्यासाठीं नसून, स्वतः करितांच वागावयाचें आहे. त्यामुळें दुसऱ्याच्या बरेवाईटपणाचा फारसा प्रश्न राहत नाहीं. याशिवाय पुनर्जन्म आणि पारलौकिक अस्तित्व वगैरे गोष्टी वैदिक धर्मास म्हणजे अर्थातच तो धर्म मान्य असलेल्या कोणासही खऱ्या वाटत असल्यामुळें, मनुष्यानें केलेल्या उद्योगाचें पर्यवसान या साडेतीन हात देहाच्या पर्यवसानाबरोबरच होतें असें कधींही वाटलें नाहीं. उलट कोणचेंही कर्म,—मग तें कितीही लहान अथवा मोठें असो,—फटकळ माणसाच्या वाय बोलाप्रमाणें फुकट जात नाहीं, इतकेंच नव्हे तर, कालाच्या अनंत पोटांत केव्हांना केव्हांतरी फलरूपानें परिणाम पावतें. अशी त्यांची दृढ श्रद्धा असते. त्यामुळें चांगलें करीत रहावें, आणि 'कालं तावत् प्रतीक्षस्व,' याला धरून मुकाट्यानें बसावें. हाच एक त्यांच्या समजुतीप्रमाणें उत्तम मार्ग होय. हें मुख्य तत्त्व लक्षांत ठेवून त्यांनीं आपल्या सर्व सामाजिक व खाजगी आचारपरंपरा आणि पद्धति बसविल्या; आणि पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ज्याच्या त्याच्या उपाधीच्या क्षमतेस अनुसरून त्याला मार्ग सांगत असतां स्त्रियांच्या वांट्यास पातिव्रत्य आलें. यांत कांहीं अप्पलपोटेपणा नाहीं अथवा वंचकताही नाहीं. हें कसें तें आपण पाहूं.

पूर्वी एका प्रकरणांत सर्व साधनास आधारभूत असलेले चार प्रकार सांगितले. त्या चारही प्रकारांचा मूळ हेतु आपण शरीर नसून आपलें शरीर आहे-म्हणजे आपण कोणी तरी वेगळे असून शरीर हें साधन आहे ही जाणीव म्हणजे शरीराहून वेगळे असल्याची जाणीव, अर्थात् साक्षित्व--दशा उत्पन्न व्हावी तिच्या योगानें पुढें या शरीराख्य साधनावर पूर्ण सत्ता चालवितां येऊन स्वाधीनतेनें तें घेतां यावें, चालवितां यावें, अथवा टाकतां यावें असा आहे. कोणत्याही प्रकारचीं साधनें घेतलीं तरी, त्याच्या योगानें अतींद्रियता प्राप्त होण्यास पातंजलोक्त योग पूर्वांगाची तयारी लागते. ह्मणून या योगांगांची तयारी जेणें करून होईल, ती गोष्ट असल्यामुळें, परमार्थाच्या अनेक मार्गांमध्यें कर्म मार्ग आणि वैधी उपासना या उत्पन्न झाल्या. यांचे आचरण करीत असतां मनुष्य सहजासहजीं या पूर्वांगांनीं संपन्न असा होतो; व सर्व साधानांचा हेतु जो कर्तृत्वाचा अहंकार नाहींसा व्हावा, व त्यामुळें लिंग देहाचा नाश होऊन मनुष्यास जिवन्मुक्ति प्राप्त व्हावी, तो सहजच साधतो. व्याधगीतेमध्यें केवळ पतिसेवा करीत असलेल्या तरुणाला अतींद्रियज्ञान प्राप्त असल्याचें आणि मांस विकणाऱ्या धर्मव्याधास केवळ स्वकर्मनिरततेनें जीवन्मुक्तीचा उपभोग असल्याचें सांगितलें आहे, त्यांतील बीज हेंच आहे. पातिव्रत धर्म अथवा पुढें उत्पन्न झालेली गुरुभक्ति आणि शूद्रांचें दास्य हीं तीनही वस्तुतः एकच आहेत; आणि त्यांचा हेतु कोणीकडून तरी वर सांगितल्याप्रमाणें साक्षित्व उत्पन्न होऊन देह ममता ह्म० अर्थात् त्या विशिष्ट देहाच्या इंद्रियजन्य सुख--दुःखाविषयीं तिऱ्हाईतपणा उत्पन्न व्हावा, व हें होत असतांना इच्छाशक्तीची वाढ उत्कृष्ठ रीतीनें व्हावी, हा आहे. सतीचा पति, सच्छिष्याचा गुरु, आणि शूद्राचा समाजरूप धनी हे सर्व मलखांबाप्रमाणें असून त्यांच्या योगानें करणाऱ्याचें शरीर जमावयाचें असतें. कसरत म्हणजे तेथें अर्थातच गोडपणा कमी असणार आणि क्लेशच अधिक असणार. अशा स्थितींत वैदिक धर्माचें ध्येय आणि मार्ग ज्यास पसंत नाहींत, ते वैदिक म्हणवीत असले तरी वस्तुतः अवैदिकच होत. अशा लोकांनीं त्या परस्परांतील कष्टकारक बाजूकडेच भर देऊन कोल्हेकुई केल्यास फारसें नवल नाहीं. परंतु त्यांना जर खरोखरच वैदिक असावयाचें असेल तर एकीकडे वैदिक आहे म्हणून म्हणावयाचें आणि

दुसरीकडे पुनर्जन्म अथवा त्या भक्कम पायावर उभारलेल्या इतर सरण्या तर मानावयाच्या नाहींत, असली घेडगुजरी चालावयाची नाहीं.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं, वैदिक धर्माचीं तत्त्वें मान्य असलेला प्रत्येक इसम त्याचे सुखदुःखकारक परिणाम राजीखुषीनें पत्करूनच त्याप्रमाणें आचरण करीत असतो. येथें कांहीं जोरजुलमाचें काम नाहीं. अशा स्थितींत पुरुषांनीं स्त्रियांस दास्यांत ठेवलें, वगैरे म्हणणें अप्रयोजक आहे. त्या त्या परंपरांचें वैदिक धर्मास इष्ट असलेलें फळ जर पाहिजे असेल, तर त्यांचें परिपालन त्या पद्धतीनेंच केलें पाहिजे. येथें कांहीं तडजोड नाहीं, इतक्या त्या वैदिक शास्त्ररीत्या परिपूर्ण आहेत. या परंपरा जर पालन करवत नसतील, तर, एक तर तें फलच डोळ्यांपुढें ठेवून तेंच मिळवून देणाऱ्या दुसऱ्या पद्धती बसवा, अगर त्या फलाची आशा सोडून वाटेल त्या रीतीनें वागा. ही गोष्ट हिशोबी आहे. परंतु अशा दुसऱ्या पद्धति बसविणें हें काम तडजोडीचें, बहुमताचें, अथवा युक्तिवादाचें नाहीं. वैदिक संस्कृतीच्या प्रत्येक बाबींत इंद्रियगोचर आणि अतींद्रिय विश्वाची ' परस्परं भावयंतः ' अशी सांगड घातली आहे, तशी ती दुसऱ्या पद्धतींत घालतां यावी, म्हणून ज्याप्रमाणें इंद्रियगोचर विश्वाचें कामापुरतें कां होईना पण उत्तम ज्ञान असणें अवश्य आहे त्याचप्रमाणें इंद्रियांतीत विश्वांतही अधिकार असला पाहिजे. नुसतें बरें वाटतें, कल्पना योग्य दिसतें, अथवा आपल्या टीचभर बुद्धीस (Conscience सारखें) कांहीं तरी नांव देऊन तिला तें सम्मत आहे, असें म्हणण्यावर हीं कोडीं सुटत नाहींत. " ज्यांनीं या परंपरा बसविल्या, ते तरी असे अधिकारी होते का ?" अशी शंका टिकत नाहीं; कारण त्यांनी तो अधिकार प्राप्त करून घेण्याचे मार्ग दाखवून दिले आहेत; आणि ते देखील अनेक आहेत. अशा स्थितींत एकतर आपल्यास इतक्या खोलांत शिरून काय करावयाचें, जेवढें पुढें दिसतें आहे, तेवढ्यापुरतें पाहून मोकळें व्हावें, अशी कमकुवतपणाची डोळेझांक करणें ही गोष्ट वेगळी; परंतु आपण विचारपूर्वक चालतों व प्रमाणशीर ठरेल तेंच ग्रहण करतों, असें तर म्हणावयाचें परंतु त्या मार्गाचा अनुभव घेण्याची सोय असतां पुरतें एक तपही त्यांत घालवावयाचें नाहीं, आणि त्यांस अप्रमाण ठरवून वाटेल तशी जीभ हालवावयाची, यास काय म्हणावें, ते ' न जानीमहे ' असेंच

म्हटलें पाहिजे. अशा तऱ्हेच्या नवीन धर्मपरंपरा उत्पन्न करून देण्याचा ज्यांना अधिकार आहे, अशा लोकांस पूर्वी 'शिष्ट' असें म्हणत असत.

**अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादिति चेत् भवेत्**
**यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुः स धर्मः स्यादशंकितः ॥**

असें म्हणून मनूनें—

**धर्मेणाधिगतो यैस्तु वेदः सपरिबृहणः ।**
**ते शिष्टा ब्राह्मणा ज्ञेयाः श्रुतिप्रत्यक्षहेतवः ॥**

असें शिष्टांचें लक्षण सांगितलें आहे. ज्यांना श्रुतीची प्रत्यक्षता करतां येते, ते शिष्ट. यांतील 'धर्मेणाधिगतः' हेंहि लक्षांत ठेवण्याजोगें आहे. कोशेनाधिगतः असें श्रुतिबोधक 'शिष्ट' नव्हत. असे शिष्ट उपलब्ध नसतील तर, आपल्या कोणचीच निश्चित शास्त्रीय दृष्टी नसलेल्या गुंजभर अकलेनें 'बीचमें मेरा चांदभाई' करून पूर्वपरंपरांचा एकपणा नाहींसा करून, त्या विस्कळित व निर्जीव करण्यापेक्षां, वाटेल तो स्वार्थत्याग करून व जिवापाड धडपड करून त्या कशावशा राखून ठेवणें, व त्यांची परंपरा कायम राखणें, हेंच हाडाच्या ब्राह्मणाचें काम आहे. असें करण्यापासून त्यांचें मुख्य फल जरी पदरांत न पडलें तरी निदान माणसांचें सत्त्ववीर्य तरी राहतें. कर्मठ मनुष्यांस जरी वेड्यांत काढण्याची रीत आहे, तरी देखील त्यांची तेजस्विता आणि कणखरपणा याचें प्रत्येक उदारमतवादी आश्चर्यच करतो.

सारांश काय कीं गृहिणीपदाची अत्युच्च थोरवी जाणणाऱ्या वैदिक संस्कृतीनें स्त्रियांना दास्यांत ठेवलें, हें म्हणणें शोभत नाहीं. त्याचप्रमाणें फक्त वेदोच्चाराचा अधिकार जरी नव्हता, तरी सर्व प्रकारच्या ज्ञानाचे इतर मार्ग मोकळे होते, त्यामुळें त्यांना अज्ञानांत ठेवलें असेंही म्हणतां येत नाहीं. पेशवाईच्या काळांत उच्च वर्गाच्या ब्राह्मण स्त्रिया लिहिणें वाचणें येत असलेल्या आणि व्यवहारज्ञानसंपन्न व बहुश्रुत असत. आणि ब्राह्मणेतर वर्गांत जरी लिहिणें वाचणें येत नसले तरीही बहुश्रुतपणा आणि सुशिक्षणाचा खरा संस्कार यांच्या बाबतींत आजकालच्या पदवीधर विदुषींनींही मान खालीं घालावी असा अधिकार असलेल्या कैक स्त्रिया असत. स्त्री आणि पुरुष यांची अभेद्य गांठ आणि स्त्रियांचें विनय, शील वगैरेच्या कांहीं कडक कल्पना, व त्यांच्यामागें

लावून दिलेली पतिउपासना यांच्यामुळें सामाजिक अवनतीच्या काळांत कित्येक स्त्रियांचीं बहुमोल आयुष्यें मातींत मिळाल्यासारखीं होत असतील, आणि त्यांच्या अंगचे रत्नांसारखे सद्गुण उकिरड्यावर पडल्यासारखे वांया जात असतील, आणि तें पाहून दया वगैरे कोमल मनोवृत्तींनीं कळकळणाऱ्या माणसास 'असला कसला हा धर्म' अथवा 'हेंच कां धर्माचरणाचें फळ ?' असें क्षणभर वाटणें साहजिक आहे. धर्मराजांची विपत्ति पाहून खुद्द त्याच्या भावांना व बायकोलाच हा संदेह पडला होता. तेथेंही धर्मानें त्यांना 'धर्माचे आचरणही स्वतःच्या मनोरथांच्या पूर्तीकरितां करावयाचें नसून धर्माकरितांच म्हणजे त्या धर्माचें जें ध्येय असेल, त्याच्या प्राप्तीकरितां करावयाचें असतें; आनुषंगानें स्वतःचे मनोरथ पुरतील, अथवा पुरणार नाहींत' अशाच अर्थाचें उत्तर दिलेलें आहे. आणि मनोरथांच्या सफलतेचा आनंद उपभोगणाऱ्यापेक्षां धर्मासारख्या कांहीं उदात्त हेतूस्तव त्या आनंदाचा त्याग करणाऱ्याविषयींच मनुष्याच्या अंतःकरणांत जास्त पूज्यभाव आणि आदर उत्पन्न होतो. पहिल्या-पेक्षां दुसऱ्या माणसाच्या श्रेष्ठत्वाची निर्विवाद जाणीव माणसाच्या अंतःकरणांत सहज असते. म्हणूनच असल्या उदात्तपणाचीं तऱ्हतऱ्हेचीं चित्रें काढून लोकां-पुढें मांडण्याचा कवी, कादंबरीकार, चित्रकार, शिल्पी, नाटककार, गवई—वगैरे सर्व ललितकलाभिज्ञांचा यत्न चाललेला असतो. ही गोष्ट मनुष्यस्वभावसुलभ असल्यामुळें पाश्चात्य विचारी लोकांनाही पटूं लागली आहे.*

---

A character of a highly virtuous and lofly stamp is degraded rather than exalted by an attempt to reward virtue with temporal prosperity. Such is not the recompense which Providence has deemed worthy of suffering merit, and it is a dangerous and fatal doctrine to teach young persons, the most common readers of romance, that rectitude of conduct and principal are either naturally allied with or adequately rewarded by the gratification of our passion, or attainment of our wishes In a word, if a virtuous and self denied character, is dismissed with temporal wealth, greatness,

टीप मागील पानावरून पुढें चालू.

---

rank, or the indulgence of such a rashly formed or ill assorted passion as that of Rebecca for Ivanhoe, the reader will be apt to say, " Verily virtue has had its reward."But a glance on the great picture of life will show that the duties of self denial and the sacrifice of passion to principle are seldom thus remunerated; and that the internal consciousness of their high minded discharge of duty produces on their own reflections, a more adequate recompense, in the form of that peace which they cannot give or take away.

*Extract from the Introduction to Ivanhoe by Sir* **Walter Scott.**

## राष्ट्रीय चळवळ.

**सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें ।**
**परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥**

एकदां आळंदीस बोलत असतां अण्णासाहेबांनीं सांगितलें कीं, " कसल्याही वैभवाची मला किंमत वाटत नाहीं. प्रत्यक्ष इंद्राचें जरी ऐश्वर्य आलें तरी तें ' पशमूबराबर ' आहे. तेव्हां इंग्लिश लोकांच्या वैभवाचें तरी काय महत्त्व वाटावयाचें आहे ? " त्यावर ' मग तुम्हांला देशाच्या उद्धाराविषयीं खरोखरच वाटतें कां ?' असा प्रश्न केल्यावरून त्यांनीं सांगितलें कीं, " हो, हो खरोखरच वाटतें. आणि तें किती वाटतें, तें तुला काय सांगूं ? आधीं येथली मुक्ति आणि मग तेथील मुक्ति. येथल्या मुक्तीशिवाय, ती मुक्ति मिळाली तरी तिची शोभा नाहीं. " तेव्हां सहज चर्चा निघून या विषयाचा बराच खल झाला. मनुष्य जातीची आध्यात्मिक उन्नति आणि राज्यव्यवस्था यांचा अत्यंत निकट संबंध असल्यामुळें, आध्यात्मिक उन्नतीस पारतंत्र्य हें विघातक असून राज्यव्यवस्थाही ज्यांची त्यांच्याच हातांत असली पाहिजे, असें त्यांचें मत होतें. कोणाचाही द्वेष करूं नये; हें जरी खरें असलें, तरी स्वतःचें कल्याण कर म्हणून परमेश्वराची प्रार्थना करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे; इतकेंच नव्हे, तर तें त्याचें कामच आहे. अशा स्थितींमध्यें " प्राणिमात्र तितका सारखा, कोणींही वैभव उपभोगिलें म्हणून काय झालें ? कोणीकडून तरी आपणास निर्विघ्नपणें हरी हरी करतां आलें म्हणजे पुरे, " असला ' समंजस '-पणा त्यांच्या कोशांत लिहिलेला नव्हता. वैदिक संस्कृति ही जर जगावयाची असेल, तर वैदिक लोक हे पारतंत्र्यांतून निघालेच पाहिजेत, आणि तेवढ्याकरतां झोपेंतून जागें झाल्याबरोबर देखील, प्रत्येक वैदिक माणसाचा आद्य उद्गार ' महाराज, आतां आमचें आम्हांस द्या, ' असाच असला पाहिजे, असें ते म्हणत. परंतु नुसतें मुबलक खाण्यापिण्याचें स्वातंत्र्य हेंही त्यांना संमत नव्हतें. वैदिक धर्माचा आणि वैदिक राष्ट्राचा अभ्युदय व्हावा, आणि या भारतवर्षांतील लोकांनीं त्यांचें वैदिक राष्ट्रियत्व कायम राहून स्वतंत्र व्हावें, हेंच त्यांना पाहिजे होतें; आणि म्हणून त्यांना ज्यांत राष्ट्रीयत्वाची निश्चित

भावना नाहीं, आणि आमचें राष्ट्रीयत्व होतां होईल तों जास्त पूर्वोतिहास धरून राहील असा प्रयत्न नाहीं, अशी कांहींतरी 'देश' या नांवाखालीं केलेली धामधूम पसंत नसे. सारांश, परिस्थितीचें लोकांस ज्ञान करून देणें, व जसा जमेल तसा कांहींतरी प्रकारचा आपल्या हक्कासाठीं सरकारशीं झगडा करणें, यांच्याच बरोबर राष्ट्रीयत्व उत्पन्न होईल, दृढ होईल, निश्चित होईल, आणि लोकांची हीनता जाऊन ते तेजस्वी, व कर्तृत्ववान् होतील, अशा प्रकारच्या लोकशिक्षणाची सोय ज्या चळवळींत नाहीं, ती कधीं यशस्वी होईल, असें त्यांस वाटलें नाहीं.

म्हणजे असल्या प्रकारच्या राष्ट्रीय चळवळीचीं दोन अंगें असलीं पाहिजेत, असें त्यांचें मत होतें. एक अंग हें लोकांस परिस्थितीचें ज्ञान देऊन आमच्या राष्ट्रियत्वावर परकीय लोक जो घाव घालीत आहेत, त्यांच्या डावास तोडीस तोड अशा झगड्याचें, आणि दुसरें अंग व्यक्तिशः प्रत्येक व्यक्तीची सर्व तऱ्हेनें प्रत्यक्ष वाढ होईल, अशा तऱ्हेच्या आखाड्यांचें, असें दुसरें अंग असल्याखेरीज केवळ पहिल्या प्रतीची चळवळ केव्हांही जीव धरणार नाहीं. नुसत्या आरडाओरडीनें हिंदुस्थानसारखें गिळलेलें माणिक इंग्लंडचा शार्क बाहेर ओकील, ही गोष्ट केवळ अशक्य आहे. त्यांनीं तसें करावें, असा जबरदस्त पेंच त्यांस पडला पाहिजे, तरच हें काम होणार; आणि असा पेंच त्यांस टाकणें, हें काम येरागबाळाचें खास नव्हे. तेथें जातीवंतच पाहिजे. म्हणून पहिल्या प्रतीची नुसती एकमुखी चळवळ केव्हांही यशस्वी होणार नाहीं, असें ते निश्चितपणें सांगत. आणि तशा तऱ्हेचा आज प्रत्यक्ष अनुभव येत आहे असेंच विचारी माणसास कबूल करावें लागेल. या दोनही अंगांनीं चळवळ सुरू व्हावी, हें देखील कांहीं लहानसान काम नव्हे, मग प्रत्यक्ष तिला यश येणें दूरच राहिलें. पारतंत्र्यांत असलेल्या राष्ट्राला सर्व प्रकारचें शहाणपण बाजूस ठेवून देऊन 'कालं तावत् प्रतीक्षस्व' असेंच अखेरीस म्हणावें लागतें, हीहि गोष्ट उघडच आहे. अशा स्थितींत त्यांच्यावर मोठी जबाबदारी जीव मुठींत धरून कसेंबसें आपलेपणानें जगण्याची, आणि अर्थातच, ज्यावर तो आपलेपणा अवलंबून आहे, असल्या सर्व प्रकारच्या संस्कारपरंपरा जिवंत राखण्याची असते. म्हणून या प्राथमिक अवस्थेंत जास्त जोर शत्रूशीं दोन हात करून कांहींतरी संपादण्याची धडपड करण्यापेक्षां सॅमसन् प्रमाणें स्वतःचे केस वाढविण्यावर

असला पाहिजे. हाच अर्थ जास्त चांगल्या रीतीनें वरील ओंवींत व्यक्त केला आहे. तिच्यांतील ईश्वराचें अधिष्ठान म्हणजे प्रत्येक कार्यारंभीं अथवा कार्यांत कुळधर्माप्रमाणें अनुष्ठान करणें, असाच केवळ खास नाहीं. कारण तसें असतें तर ग्वालेरीचा किल्ला ताब्यांत आल्याबरोबर शिंद्यांची गंगाजळी फोडून सहस्रशः समाराधना करणारे तात्या टोपी व रावसाहेब यांस अपयश कधींच आलें नसतें. ईश्वराचें अधिष्ठान जेथें असतें, तेथें जी दैवी संपत्ती सहज वास करते, ती दैवी संपत्ती आणि ईश्वरीकृपेनें येणारें सर्व प्रकारचें अमानुष धैर्य हीं सर्व जेथें असतील, तेथें सर्व प्रकारच्या चळवळी उत्तम रीतीनें वाढून यशस्वी होतात असा त्यांतील भावार्थ आहे. म्हणून चळवळींचें सामर्थ्य प्रतीत होण्याकरितां मुळांत ईश्वराचें अधिष्ठान होईल, असेंच अनुष्ठान प्रथमतः केलें पाहिजे. मग त्याचा परिणाम केव्हां व कसा करावयाचा हें ईश्वरयोजनेवर अवलंबून राहील; आणि तेवढ्याच पुरतें 'कालं तावत् प्रतीक्षस्व' हें सूत्र योग्य आहे. पुण्याचे कलेक्टर हॅच यांनीं एकदां अण्णासाहेब यांस प्रश्न केला कीं,*Are you an extremist, or moderate ? त्यावर 'या शब्दांच्याविषयीं आपली समजूत काय आहे, तें कळलें म्हणजे मी उत्तर देईन' असें अण्णासाहेब यांनीं सांगितलें.तेव्हां साहेबबहादुरांनीं खोंचदारपणानें +An Extremist is he who wants self Goverment sooner, असें सहज उत्तर दिलें. या साध्या शब्दांत केवढी खोंच होती, तें लक्षांत येऊन अण्णासाहेब यांनीं उत्तर दिलें.×" Well it rests neither with you nor with me, it rests with the Almighty who brought you in. " Sooner या शब्दामध्यें irrespectvie of means असा व्यंगार्थ होता. सारांश काय कीं शेवटीं 'कालं तावत् प्रतीक्षस्व' हेंच खरें आहे. परंतु तोंपर्यंत वर सांगितल्याप्रमाणें अनुष्ठान करणें हें आपलें

* आपण जहाल अहा कां मवाळ ?

\+ ज्याला मिळेल तितकें लवकर स्वराज्य पाहिजे तो जहाल.

× तर मग तें आपल्या कोणाच्याच हातीं नाहीं. ज्यानें आपणांस येथें आणलें तोच तें जाणतो. लवकर म्हणण्यांत 'वाटेल त्या साधनांनीं' असा ध्वनि होता.

काम आहे. हल्लींच्या बहुतेक राष्ट्रीय म्हणविणाऱ्या चळवळी अशा तऱ्हेच्या नसल्यामुळें बिनपायाच्या घराप्रमाणें एवढासा वारा आला कीं कोलमडून जातात. या सर्व प्रकारच्या चळवळींना प्रोत्साहन देऊन पायीं शुद्ध करण्याचा ते आपल्याकडून प्रयत्न करीत, आणि तेवढ्याकरतां जो कोणी मागेल ती मदत देण्यास तयार असत; परंतु त्याचबरोबर त्यांतील सर्व कार्यकारी लोकांचें धोरण पाहून त्यांना त्या चळवळीचें हसूं येई. 'होमरूल लीग' ज्या वेळेस स्थापन झाली त्या वेळेस ती बातमी श्री. दादासाहेब खापर्डे यांनीं आळंदीस मोटारींतून जाऊन अण्णासाहेबास कळविली. त्या लीगमध्यें अर्थातच अण्णासाहेब यांचेंही नांव होतें त्यावरून मी त्यांना विचारलें कीं, 'ही लीग म्हणण्याजोगतें कांहीं काम खरोखर करील असें तुम्हांला वाटतें काय'? तेव्हां मनापासून हंसूं येऊन त्यांनीं सांगितलें कीं सर्व चांगल्या प्रयत्नास मदत करणें हें काम आहे, कालानुरूप शक्य तो प्रयत्न केला पाहिजे म्हणूनच या चळवळी करावयाच्या व थोडा फार फायदा त्यांचेकडून होतोच. परंतु या चळवळी केवळ राजकीय असतात असल्या 'लीगां'नीं काय व्हावयाचें? मला स्वतःला त्यांत कांहींच अर्थ दिसत नाहीं.' त्यावर बोलणें निघून त्यांनीं सांगितलें कीं, "आजकाल जो तो 'सामर्थ्य आहे चळवळीचें' ही समर्थांची ओळ घोकतो, परंतु 'आधीं भगवंताचें अधिष्ठाथ पाहिजे.' या दुसऱ्या अर्थाकडे मात्र कोणीच लक्ष देत नाहीं. परंतु जर चळवळीचें सामर्थ्य दिसावयाचें असेल तर आधीं दुसऱ्या अर्थाचाच विचार केला पाहिजे."

शस्त्र कितीही उत्तम असलें तरी त्याची करामत शस्त्र वाहणाऱ्या हातावरच अवलंबून असतें, त्याचप्रमाणें चळवळ कितीही चांगल्या तत्त्वावर निघालेली असो, तिचें कार्य कार्यकर्ते म्हणविणाऱ्या लोकांवरच अवलंबून असतें. महाराष्ट्रांतील सर्व चळवळीविषयीं जें त्यांचें एकजात अनुकूल मत नव्हतें त्याचें कारण तरी त्या चळवळी मोठ्या सदोष होत्या असें नव्हे; तर चळवळ करणाऱ्या लोकांविषयींच त्यांचें मत अनुकूल नव्हतें. लो० टिळक अगर रा. ब. ग. व्यं. जोशी यांच्यासारखीं माणसें वगळलीं तर महाराष्ट्रांतील देशभक्तांबद्दल त्यांचा ग्रह वाईटच होता, असें म्हटलें तरी चालेल. पृथ्वीचा उद्धार करण्याकरतां परमेश्वर षड्गुणैश्वर्यसंपन्न रूप धारण करतो, त्याप्रमाणें देशोद्धारार्थ कमरा बांधलेल्या या देशभक्तांच्या करुणमूर्तीही (!) षड्गुणसंपन्न

असतात, म्हणून ते त्यांचें मोठें गमतीदार वर्णन करीत असत. भरल्या पोटावर केवळ 'घरची'च्या आग्रहाकरितां दोन पोळ्या जास्त खाऊन, दुष्काळ फंडाकरतां व्याख्यान देणारे *अगर त्या दुष्काळपीडित लोकांच्या अन्नान्न दशेचें आणि हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचें मोठें सुरस वर्णन करून लोकांच्या डोळ्यांतून पाणी काढल्यावर आणि स्वतःचें उपरणें ओलें चिंब केल्यावर घरचीला 'अगे, जरा साखरेचा शिरा तर भाज, आज वरेंच बोलावें लागलें,' म्हणून सांगणारे हे देशभक्त, देशाकरतां वाटेल ती गोष्ट करावयास तयार असतात, फक्त त्यांची एकच अट असतेः—पदराला खार नको, अंगाला ओरखडा नको, दहाव्या घंटेचा वरणभात चुकावयास नको, बाकी काय हवें तें सांगा, मी करायला एका पायावर तयार आहें,' असें या लोकांचें ते विनोदी वर्णन करीत असत. साठ वर्षांच्या अनुभवानें महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाविषयीं जो त्यांना अनुभव आला व त्यामुळें त्यांचें जें मत झालें, त्याचा निष्कर्ष एके ठिकाणीं लिहिलेला आढळतो, तो असा:—

श्री २८—१--१९०८

१. मी ( आपण ) च सबंध शहाणा, बाकी सर्व मिळून अर्धा किंवा निमशहाणा; एवं जगांत दीड शहाणा म्हणून एकी अशक्य.

* २. सर्व जो विचार करणें किंवा हित पाहणें तें आपल्या साडेतीन हात देहापुरतें; दुसरा मरेना; आपल्या पोळीवर तूप ओढणें.

३. ( दुसऱ्यावर ) विश्वास ठेवावा व झक मारावी, किंवा झक मारली, विश्वास ठेवला.

४. पदराला खार नको.

५. अंगाला ओरखडा नको.

६. दहाव्या घंटेचा वरणभात चुकावयास नको.

चळवळ करणाऱ्या लोकांसंबंधीच्या या मतावरून त्यांच्या चळवळी विषयींच्या मताचें निदर्शन होतें, आणि सर्व प्रकारच्या चळवळीचा तटस्थपणानें जर आढावा काढला, तर तें मुळींच चूक नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांत अति-

---

* आपल्या करंगळीवर मुतावयास नको, देवाण घेवाण शिवाय नको, जें हें स्वार्थ. प्रेम=निरपेक्ष काम=ज्यांत बदला नाहीं.

शयोक्ति देखील नाहीं, असेंच बहुतेकांच्या अंतःकरणास कबूल करावें लागेल. सारांश काय कीं, जोंपर्यंत राष्ट्रघटकांची अशी अवस्था कायम आहे, तोंपर्यंत नुसत्या उत्तमोत्तम तत्त्वांवर काढलेल्या चळवळींनीं कांहींही व्हावयाचें नाहीं. अथवा कांहीं थोडें कार्य होतेंच म्हटलें तर तें इतकें अल्प होईल कीं त्याच्या-योगानें उद्दिष्ट हेतु कधींही साधणार नाहीं.

धर्माचा आणि राष्ट्रीय व राजकीय चळवळींचा काय संबंध असावा हा एक आजकाल मोठाच वादाचा प्रश्न होऊन बसला आहे. तो सोडून दिला तरी निरनिराळ्या लोकांचे विचार, त्यांचे प्रयत्न आणि उत्पन्न होणारें सर्व तऱ्हेचें वाङ्मय यांचें धोरण पाहिलें, तर असें दिसून येतें कीं, माणसामाणसांत बंधुभावाचें संवर्धन आणि तत्प्रीत्यर्थ स्वार्थत्यागाची सीमा व परसेवा या महत्त्वांची आवश्यकता भासूं लागली आहे, आणि कल्पनेनें कां होईना, त्यांच्या सर्व तऱ्हेच्या सीमा व नमुने अनुभविण्यांत मौज व आनंद वाटतो. मग ती धर्ममूलक असोत, अथवा कशीही असोत. व सर्वसाधारण प्रवृत्ति पाहिली, तर यांसच अतिमानुष उन्नति समजण्यांत येते, आणि हें पाहून समाजाच्या वस्तुस्थितीची त्यांना फार कींव येत असे. खर्ड्याच्या विजयानें सवाई माधवरावाच्या डोळ्यां-तून ज्याप्रमाणें पाणी आलें, त्याचप्रमाणें त्यांनाही वस्तुतः मनुष्य म्हणून ज्या गोष्टी माणसाजवळ असावयास पाहिजेत, त्याच गोष्टींचें मोठें प्राप्तव्य म्हणून माजविलेलें एवढें स्तोम पाहून वाईट वाटे. समाजाच्या स्थितीचा प्रश्न निघाला असतां अंतःकरणास दुःख होऊन "शेजारचा माणूस जेवला आहे कीं, उपाशी आहे, याची देखील कोणी चौकशी करीत नाहीं रे!" म्हणून ते वारंवार म्हणत असत. याचा अर्थ असा कीं, वर सांगितलेले परसेवा, त्याग, बंधुभाव वगैरे गुण यांतच मनुष्यत्व आहे; आणि जेथें पूर्वोक्त षाड्गुण्याचें साम्राज्य होऊन, याच तत्त्वांना अंतिम उन्नति समजण्यांत येते, तेथें मनुष्य-त्वाचा अत्यंत ऱ्हास झाला आहे हें उघड आहे. त्यांच्या दृष्टीनें मनुष्यानें मनुष्याची सेवा करावी, बंधुभाव बाळगावा असें वैदिक राष्ट्रास सांगावयाची पाळी यावी, म्हणजे माणसांनीं दोन पायांवरच चालावें असा नियम शिक-विण्याइतकें विचित्र होतें; परंतु तशी पाळी दुर्दैवानें येऊन पोहोंचली आहे, याचा त्यांना अत्यंत खेद होई, आणि जोंपर्यंत ही स्थिति पालटून वैदिक लोकांचें मनुष्यत्व त्यांच्यांत आलें नाहीं, तोंपर्यंत त्यांच्यानें कोणचीही

गोष्ट होणें दुरापास्त आहे, असें ते म्हणत. १९०८ सालीं मे महिन्यांत रा. अ. ब. कोल्हटकर हे धुळयास आले असतां त्यांच्या वर्तमानपत्राच्या 'देश-सेवक' या नांवावर गमतीनें टीका करून "कसले रे तुम्हीं देशसेवक? खरोखर तुम्हीं 'कोडगे' सेवकच आहां" असें म्हणून त्यांनीं पूर्वोक्त षाड्गुण्याचें व मनुष्यामनुष्यांतील या दूरीभवनाचें वर्णन करून, 'जोंपर्यंत ही स्थिति पालटली नाहीं, तोंपर्यंत नुसत्या राजकीय चळवळीनें कांहीं व्हावयाचें नाहीं,' असें स्पष्ट सांगितलें होतें. त्यांच्या असल्या एकंदर सांगण्याचा सारांश असा दिसतो कीं, राष्ट्रीय अस्तित्व आणि राजकीय अस्तित्व या दोन गोष्टी जरी परस्पराश्रयी असल्या, तरी त्या अगदीं भिन्न आहेत, व त्यांचा संकर हा दोघांनाही मारक आहे; आणि हल्लींच्या सारख्या परिस्थितींत राष्ट्रीय चळवळींची जास्त आवश्यकता आहे. राजकीय चळवळीचा आणि राष्ट्रीय चळवळीचा संकर करून, राजकीय फायदा तर कांहीं एक पदरांत न घेतां, किंवा खरें म्हणावयाचें तर घेण्याची ताकद नसतां, राष्ट्रीय चळवळी मात्र फुकट मारून टाकणाऱ्या शहाणपणास काय म्हणावें, तें त्यांस समजत नसे. झाडाखालीं झाड वाढत नाहीं, हें तर उघडच आहे. त्याचप्रमाणें परकीय सत्तेखालीं राष्ट्रीयत्वाची वाढ होणें, आणि राष्ट्रीय चळवळी पोसल्या जाणें, ही गोष्ट अत्यंत दुर्घट आहे. अशा स्थितींत राजनीतीच्या कौटिल्यामुळेंच कां होईना, तसें होण्याचा जो कांहीं थोडाबहुत संभव आहे, तो देखील अशा रीतीनें वाया घालविल्याबद्दल त्यांस वाईट वाटे. आपलें मूळचें तत्त्व*

---

*राष्ट्रनेते महात्मा गांधी यांनीं लो० टिळकांच्या प्रयाणाची संधी साधून त्याच मुहूर्तावर सुरू केलेल्या जोरदार चळवळीचा मूळ पाया खरोखरच चांगला होता. त्यांचा सत्याग्रहाश्रम, स्वतःचें वर्तन, त्यावेळचे लेख, आणि विशेषतः मद्रास येथील व्याख्यानें, आणि त्यांच्या चळवळीनें, वाणीनें आणि मतांनीं निरनिराळे धारण केलेले अवतार, या सर्वांचा निष्कर्ष थोडक्यांत असा सांगतां येईल कीं, म. गांधींनीं आपली चळवळ दुधारी तलवारीसारखी मुळापासूनच दोन अंगांनीं सुरू केली. आमच्या वरील लेखनपद्धतीप्रमाणें म्हणावयाचें म्हणजे सुरू करतांना राष्ट्रीय आणि राजकीय अशा तिच्या दोन स्वतंत्र बाजू

विसरून या दोन गोष्टींचा नागपूरच्या कॉंग्रेसमध्यें संकर केल्यामुळें आज राष्ट्राची, राष्ट्रसभेची, आणि राष्ट्रनेत्याची ( महात्मा गांधी ) काय दशा झाली आहे, तें पाहिलें म्हणजे या विचारसरणीचें महत्त्व लक्षांत येतें.

---

होत्या, व व्यक्तीनें आपल्या स्वतःच्या सदसद्विवेकप्रेरणेनें, म्हणजे इतर कोणत्याही दुसऱ्या विकारास बळी न पडतां देशासंबंधीं आपलें कर्तव्य करण्यास तयार व्हावें व तें कर्तव्यच असल्याकारणानें त्यास कोणत्याही साहाय्याची अपेक्षा न ठेवतां, काम पडल्यास केवळ एकान्तीपणानेंच ते करण्याची पराकाष्ठा करावी, आणि असें करीत असतां पृथ्वीवरील वाटेल त्या मानवशक्ति त्याच्या आड आल्या. तरी त्यांच्याशीं टक्कर देण्याइतकें आत्मबल तिचें वाढावें, अशी राष्ट्रघटकांची व्यक्तिशः (आमच्या एका स्नेह्यांनीं हें मूळतत्त्व पुढील वाक्यांत मोठ्या सुंदर रीतीनें बसविलें आहे:— An individual against the whole Empire actuated by his own sense of right and wrong.) तयारी करणें हें तिचें एक अंग होतें; आणि जोंपर्यंत अशी तयारी झाली नाहीं तोंपर्यंत राजकीयदृष्ट्या जरी कांहीं होणें शक्य नसलें तरी केवळ हातपाय जोडून बसणें योग्य नाहीं, म्हणूनच त्याच्या जोडीस थोडाबहुत राजकीय ' प्रोपागँडा 'ही चालू ठेवावा, अशा मोठ्या सुंदर रीतीनें या चळवळीस त्यांनीं सुरुवात केली. आणि जर यांतील मूळतत्त्व, व पहिलें अंग यांसच ते चिकटून राहते, तर कदाचित् जरी त्यांचा एवढा बोलबाला झाला नसता, तरी राष्ट्राचें कल्याण त्यांच्या हातून आतांपेक्षां कांहींतरी पटीनें खास जास्त झालें असतें. परंतु एक तर त्यांचा जन्म बहुतेक दूरस्थळीं गेल्याकारणानें केव्हांही कोणाचीही वरात काढण्यास तयार असणाऱ्या आमच्या लोकांची खरी तयारी काय असते, याची त्यांना कल्पना नसल्यामुळें आणि नागपूर येथील तीस हजार लोकांच्या जयजयकारांत स्वतःच वाहून गेल्यामुळें त्यांनीं मूलतत्वांचा हा सुसंघटितपणा विसरून सर्वच गोष्टींचा एकच गोंधळ केला, आणि स्वतःच्या बिनतोड युक्तिवादाचा अभिमान, आणि अनुयायांच्या योग्यतेविषयीं भ्रम, यांच्या भरीस पडून स्वराज्य देण्याविषयीं मुदतीचे सट्टे करण्याची त्यांस संवय लागली, व

अशा तऱ्हेचें मनुष्यत्व परत आणण्याचें आणि राष्ट्रीयत्वाचें संगोपन, पुनरुज्जीवन,आणि संवर्धन करण्याचें काम सर्व तऱ्हेनें एवढ्या विस्कळलेल्या स्थितींत प्रथमतः संहत प्रयत्नांनीं केव्हांही साधत नसतें राष्ट्रीयत्व ही एक शक्ति आहे, आणि कोणचीही शक्ति केवळ नुसत्या कल्पनांनीं उत्पन्न होत नसते, कारण शरीरांत नवी अशी शक्ती कोणचीच उत्पन्न होत नसते. शरीरांत अनेक प्रवाहांनीं अखंड वाहणाऱ्या पूर्वीच्या शक्तीलाच निरुद्ध करून इष्ट स्वरूप द्यावें लागतें. म्हणून राष्ट्रीयत्व हें नुसत्या कल्पनेंत न राहतां त्याची एक शरीरस्थ शक्ती बनवावयाची असेल तर शरीरांतून वाहणाऱ्या शक्तीच्या धारेस इष्ट त्या तऱ्हेनें आळा घालून, तिचेंच रूपांतर केलें पाहिजे. घरीं, दारीं, रात्रीं, दिवसां, शरीरस्थ शक्तिप्रवाह वाटेल त्या दिशेनें वाहूं देऊन काम पडलें कीं नुसत्या कल्पनेबरोबर राष्ट्रीयत्व स्फूर्तिसारखें शरीरांत प्रकट होईल, असें समजून वागणाऱ्या देशभक्तांनी हा गैरसमज टाळून दिला पाहिजे, आणि इष्ट त्या दिशेनें स्वतःच्या कायिक, वाचिक, मानसिक वर्तनास आळा घालून शक्तिसंवर्धक केलें पाहिजे, मग त्यांत फार मोठ्या शहाणपणाच्या दृष्टीनें थोडा मूर्खपणा असला तरीं चालेल असें त्यांचें मत होतें. सर्वस्वी कर्तृत्वहीन बनून शहाणपणाचें पुरें माप पदरांत घेण्यापेक्षां, थोडीशी कर्तृत्वाची जोड करून कांहीं मूर्खपणा गांठीस पडला तरी चालेल, असें एकंदर त्याचें धोरण होतें.* आणि या रीतीनें

---

त्यामुळें सारा चुथडा होऊन जाऊन जिकडे तिकडे कमालीची अनवस्था होऊन गेली.

*व्यवहारांत वागतांना, अशा रीतीनें स्वतःकडे थोडासा हेकडपणा अगर वेडगळपणा ते नेहमींच घेत असत. त्याचें एक प्रसिद्ध उदाहरण लेव्हीच्या जोड्याचें आहे. १९०८ सालीं सर जॉर्ज क्लार्क यांच्या लेव्हीस म्युनिसिपल कौन्सिलर म्हणून अण्णासाहेब यांस निमंत्रण होतें, व त्या सालीं त्यांनींही लेव्हीस जावयाचें ठरविलें होतें. परंतु इतर लोकांप्रमाणें लेव्हीस जावयाचें म्हणजे कांहीं विशेष तयारी करावयाची हें त्यांच्या गांवींही नसल्यामुळें खुंटीवर ठेवलेला लेव्हीचा काळा कोट घालून तसेच ते लेव्हीस गेले. बूट पायांत घालणें त्यांस शक्य नव्हतें, परंतु एवढ्या समाजांत जोडा घालून जाणें अगर उघड्या पायांनीं जाणें हेंहि वेडगळपणाचेंच वाटणार होतें. परंतु ते तसेच

राष्ट्रांतील जाणत्या लोकांनीं स्वतः होऊन आपलें स्वतःचे आयुष्यास वळण दिल्याखेरीज, आणि आपणांवर अवलंबून असणाऱ्या लोकांस तसें वळण पचनीं पडेल अशा रीतीनें पक्कें लावल्याखेरीज कार्यभाग व्हावयाचा नाहीं, असा त्यांचा सिद्धांत होता.

असें करण्याचे मार्ग कोणचेही असोत, त्याचा वाद नव्हता परंतु त्यांचा स्वतःचा धर्मांवर विश्वास असल्यामुळें धर्माच्या साहाय्यानेंच हें घडणें शक्य आहे असें ते म्हणत; परंतु धर्माविषयीं त्यांची कल्पना मात्र पूर्वी सांगितल्याप्रमाणें संदिग्ध नसून निश्चित होती. धार्मिक जीवनास प्रारंभ व्हावा म्हणून परसेवादि गुण तर हवेतच, परंतु ईश्वराच्या अस्तित्वांतील जिवंत विश्वास हाच धार्मिक जीवनांचा प्रारंभ आहे, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. श्रीसमर्थांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ देवा वेगळें कोणी नाहीं ’। असें सर्वही बोलतात, परंतु खरोखर त्यांची “ श्रद्धा कांहीं । तैसीच नसे ॥ ” ही स्थिति जाऊन ईश्वराच्या अस्तित्वावर खरोखर विश्वास उत्पन्न झाल्याखेरीज तरणोपाय नाहीं. ईश्वराच्या अस्तित्वावर एक प्रकारचा विश्वास तर बहुतेकांचा

---

जाऊन बसले. जित लोकांच्या शिष्टसांप्रदायाप्रमाणें साहेब बहादुरास भेटतांना एक तर त्यांचा बूट घालून जावें अथवा कांहींही न घालतां उघड्या पायांनीं जावें, ही रीत प्रसिद्धच आहे. तेव्हां मोठाच प्रश्न येऊन पडला. भेटीपुरता तेथल्या तेथें जोडा काढून ठेवणें हें अण्णासाहेब यांस अपमानास्पद होतें. व जोड्यासुद्धां भेटणें, हें गव्हर्नर साहेबांचा उपमर्द करण्यासारखें होतें. आणि गव्हर्नर तर सर जॉर्ज क्लार्क अशा स्थितींत आतां काय होते, अशी सर्वांस चिंता पडली, व कित्येक लोकांस मनापासून आनंदही झाला. स्वतः अण्णासाहेब यांस चिंता म्हणजे काय पदार्थ आहे हें माहीतच नसल्यामुळें ते मात्र नेहमीप्रमाणेंच शांत गंभीर होतें. त्यांचा उल्लेख होतांच तसेच ते डायसवर गेले. आणि त्यांच्या पायांतील जोडा पाहून सर जॉर्ज क्लार्कच्याही कपाळांत तिडीक उठली. तो प्रसंगच मोठा विचित्र होता. जोड्याकडे दुर्लक्ष करावें, तर स्वतःच अपमान होतो, व त्याचा इनकार करावा तर जोडा घालणारी व्यक्ति कोणीतरी अशी तशी नसून प्रत्यक्ष अण्णासाहेबच ! तेव्हां काय करावें, ही सर क्लार्कलाही मोठीच पंचाईत पडली. इतर कोणी व्यक्ति असती तर

असतो, परंतु तो त्यांच्या सर्व कृतींना व्यापून नसतो. एक वेगळ्या तऱ्हेचें उदाहरण घेऊन सांगावयाचें म्हणजे मनुष्याच्या अंतःकरणांतील भीतिसारखें हे आहे. सामान्यतः भीति हा अंतःकरणाचा धर्म सर्वच ठिकाणीं असतो, आणि माणसांना घरांत राहण्यासारख्या यःकश्चित् गोष्टीपासूनही ‘ सर्प म्हणती माझें घर । विंचू म्हणती माझें घर । ’ अशा अनुभवानें–‘ भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे ’ असें प्रतीत होत असतें. परंतु ही भीति त्यांच्या कोणत्याही व्यवहारास, अगर व्यवहारांत त्यांच्या अंतःकरणांत व्यापून नसते. शेजारींच बीळ आहे हें ठाऊक असतें, तरी तेथेंच तो अंथरूण घालून बेगुमानपणानें घोरत पडतो. परंतु एखादे दिवशीं ज्यावेळीं साप अगर प्रत्यक्ष विंचू भेटीस येतात, तेव्हां कांहीं काळ, त्यांच्या सर्व व्यवहारांत त्या सर्प विंचवांची स्मृति जागृत असते.

---

त्यानें केव्हां उडवून दिली असती. परंतु अण्णासाहेबाविषयीं तसें करण्यास मन घेईना. क्षणमात्र तो मोठ्याच विचारांत पडला. एकीकडे असल्या आपत्तींत पडलेला लाल चेहऱ्याचा गव्हर्नर, व दुसरीकडे शांत गंभीरपणानें स्मितपूर्वक त्याचेकडे पहात असलेली अण्णासाहेबांची मूर्ति, आणि आतां काय होतें कोण जाणें, म्हणून उर्ध्वश्वासानें अवलोकन करणारी तटस्थ सभा, असा क्षणमात्र भारतीय देखावा दिसला शिष्टाई करण्यास उभे असलेले भगवान् श्रीकृष्ण, आणि त्यांना कैद करण्याचा हुकूम देऊन सभा सोडणारा दुर्योधन, व भोंवतालचे सभासद यांचाही असाच देखावा एखाद्या संजयास दिसला असेल. परंतु सुदैवानें परिणाम मात्र तसा न होतां, म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष नौरोजी पदमजी यांच्या प्रसंगावधानानें वेळ निभून गेली. त्यांच्याकडे निमंत्रित पाहुण्याचा परिचय करून देण्याचें काम होतें. त्यांनीं चटकन् पुढें होऊन Mr. Vinayk Ramchandra Patwardhan, rather an orthodox Brahman, असें म्हटलें. त्याबरोबर साराच मनु पालटला व सारा राग गिळून टाकून जणूं कांहीं या टीकेनें मौज वाटल्यासारखें करून क्लार्क साहेबानें हंसत हंसत हस्तांदोलन केलें ! त्या प्रसंगाचें वर्णन करतांना त्या Orthodox शब्दाची अण्णासाहेब स्वतः मौज करीत असत, व “ Orthodox नाहीं तर आणखी कांहीं खुशाल म्हण पण माझ्या जोड्यां-कडे पाहूं नको. ” असें विनोदानें म्हणत असत.

मग मारे–अंधार असला तर दिवा लाव, जागा झाडून काढ, बाहेर पाऊल टाकावयाचें तर आठवणीनें जोडा घाल, जरा कोठें खट्ट झालें तर न जाणों तो सुटून गेलेला साप आला कीं काय असा ध्यास असतो. मोठी हिंमत करून निर्भयपणानें व्यवहार तर चाललेले असतात, कोणी कांहीं घर सोडून जात नाहीं, परंतु अंतःकरणांत त्या सापाची स्मृति सर्व व्यवहारास व्यापून असते, व व्यवहार त्या स्मृतीला धरून विशेष तऱ्हेनें चालतात. आस्तिक मनुष्याची स्थिति सामान्यतः अशी असते. व अशी ज्याची ईश्वराच्या अस्तित्वाची भावना, त्याच्या व्यवहारास व्यापून असेल, तोच खरा आस्तिक, बाकीचे कितीही पंडित असले तरी, नास्तिकच.

असा आस्तिक मनुष्य म्हटला म्हणजे ईशतत्त्वाशीं गांठ घालणारा, अशीच कांहीं मोठी समजूत करून घेण्याचें कारण नाहीं. ही एक मधली पायरी आहे. त्याचे सर्व व्यवहार सुटलेले असतात, अगर चित्तशुद्धि वगैरेच्या दृष्टीनें त्यानें पूर्णता संपादिलेली असते, अथवा त्याच्या ठिकाणीं, इतर माणसांच्या ठिकाणीं आढळून येणारा दुर्बळपणा व प्रवृत्ति नसतात, असें नाहीं. परंतु इतर लोकांत आणि त्याच्यामध्यें एवढाच फरक राहतो कीं, इतर लोकांची आस्तिक्यबुद्धि लाभ हानि इत्यादि प्रसंगीं जागृत होते, आणि इतर व्यवहारांत घोरत पडलेल्या माणसाप्रमाणें ‘ असून अडचण नसून खोळंबा,’ अशा तऱ्हेची असते. तीच या माणसाच्या ठिकाणीं कोणच्याही काळीं आणि कसल्याही व्यवहारांत जागृत-उभी असते, त्यामुळें त्याच्या मनांत असो नसो, त्याचे सारे व्यवहार तिच्या धोरणानेंच घडतात. यामुळें दोघांच्या सर्व कृति व त्या कृतींच्या परिणामांत जमीनअस्मानाचें अंतर पडतें. निदान एवढी आस्तिक्यबुद्धि तरी जागृत झाली पाहिजे आणि तशी ती जागृत होऊन मनुष्य आपले व्यवहार करूं लागणें म्हणजेच धार्मिक जीवनास खरोखर प्रारंभ होणें आहे, अशा तऱ्हेची बुद्धि नसल्यामुळें, एका बाजूनें धर्माचें सूक्त गात असतांच, राष्ट्र नास्तिकपणांत बुडून गेलें आहे. ही स्थिति जाऊन आस्तिकपणा येईल आणि देशांतील अनेक धर्मपंथांना नवीन चालना मिळेल तेव्हां स्वातंत्र्याच्या खटपटी करण्यास राष्ट्र तयार होईल. तोंपर्यंत उदंड खटपटी केल्या तरी त्यांना यश येणार नाहीं. असें त्यांचें ठाम मत होतें. देशाचें स्वातंत्र्य बाँब आणि बंदुका यांच्याकरितां अडून राहिलें नाहीं, आणि

वेळ आली म्हणजे त्यांच्याकरितां कोठें जावेंही लागावयाचें नाहीं, देशांत हत्यारें आहेत तीं आपलीच आहेत, असें ते नेहमीं म्हणत. अडून राहिलें आहे तें राष्ट्रांतील व्यक्तींच्या निःसत्त्वतेमुळें.

राष्ट्रीय चळवळीच्या लाटेंत सांपडलेले कित्येक तरुण केव्हां केव्हां त्यांना सल्ला विचारावयास येत असत. त्यांसही ते उघड उघड असेंच सांगत असत. " देशसेवेच्या मार्गास लागण्यास हरकत नाहीं, परंतु आधीं भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ' एवढें लक्षांत ठेव, त्याच्या खेरीज कांहीं प्राप्त होणार नाहीं. आणि तें जर होत नसेल तर यांत पडूं नका, " असा उघड उघड सल्ला ते देत. कित्येक वेळां त्यांची सल्ला भित्रेपणाची व चमत्कारिक देखील वाटे. परंतु बेजबाबदारपणानें स्वतःचा विश्वास नसतां, तरुण मुलांचीं आयुष्यें निरर्थक बळी देऊन स्वतःचा पुढारीपणा त्यांनीं कायम ठेवला नाहीं. एकदां एका राजकीय खटल्यांत सांपडलेला तरुण त्यांच्याकडे आला,आणि आपण पोलिसांत काय जबाब द्यावा, म्हणून विचारूं लागला. यांचा सर्व जन्म वकीलीचा धंदा करण्यांतच गेला होता, तरीं पण ' तूं खोटें बोल,' असें कोणासही सांगणें त्यांना शक्य नव्हतें. त्यांनीं त्याला सरळ असें सांगितलें कीं ' एक तर काय वाटेल तें झालें तरी, आपणास कांहींच सांगावयाचें नाहीं ' म्हणून तोंडांतून एक अक्षरही काढूं नकोस, त्यांत कांहीं वाईट नाहीं, कारण, कोणत्याही गोष्टीविषयीं बोलणें किंवा न बोलणें हा ज्याच्या त्याच्या खुषीचा प्रश्न आहे. साक्ष न दिल्यास सरकार तुरुंगांत घालतें, परंतु त्यांत कांहीं अनीति होत नाहीं. मात्र बोलावयाचेंच असल्यास खोटें बोलूं नकोस, सरळ सांगून मोकळा हो. '

१९१४ सालीं लोकमान्य परत आल्यावर कांहीं वेळ त्यांच्या दारावर पहारा ठेवला असून आंत जाणाऱ्यांची पोलीस नोंद करीत असे. अशा वेळीं खानदेशांतील कुकरमुंड्याचे भगवद्भक्त संतोजीबुवा हे पुण्यास आले असतां त्यांच्या निरभिमान वृत्तीस अनुसरून त्यांना लोकमान्यासारख्या राष्ट्रपुरुषाचें दर्शन घ्यावें अशी इच्छा झाली. परंतु लोकमान्यांच्या घरावर असलेली पोलीसची देखरेख पाहून त्यांना थोडा विचार पडला. तेव्हां त्यांनीं अण्णासाहेब यांस सल्ला विचारला. अण्णासाहेबांनीं ' आपण जाऊं नका,' असें स्पष्ट सांगितलेलें ऐकून सर्व लोकांस आश्चर्य वाटलें. तेव्हां ' अण्णांचें अन्न ' करणारे सुप्रसिद्ध डॉ. हरी-

भाऊ साठे जवळच होते, त्यांनीं वैतागून अण्णासाहेबांस म्हटलें कीं, ' आपणच असा सल्ला देतां, अशा भित्रेपणानें काय व्हावयाचें आहे ? बेधडक आंत जायला पाहिजे, काय करतें पोलीस ? पण तुम्हींच असा सल्ला देतां तेव्हां आम्हीं नेहमीं असेंच राहणार, असाच योग दिसतो. ' त्यावर थोड्याशा झटक्यानें अण्णासाहेबांनीं उत्तर दिलें, ' हो, हो, जोंपर्यंत तुमच्यासारखे देशभक्त म्हणवत आहेत, तोंपर्यंत असेंच राहणार. बेजबाबदारपणानें सल्ला द्यावयास कांहीं वाटतें ? माझ्या गुरूनें मला असलें धैर्य शिकविलें नाहीं. एकदां मान पुढें केली, कीं तुटली तरी परत मागें घ्यावयाची नाहीं, हेंच मी शिकलों आहे. दुसऱ्यास परभारें सल्ला देऊन त्याची मौज पाहणारे तुम्हीं, काय बोंब मारणार, दिसतच आहे. अशाच रीतीनें त्याला ( टिळकांना ) एकट्याला पुढें पाडून जेथें तेथें तोंडघशीं पाडतांना कांहीं वाटलें नाहीं; पिकेटिंगची दोमदोम् करावयास सारे तयार, परंतु शिक्षा झाल्या म्हणजे भरा बळवंतराव आपल्या खिशांतून ! एवढें वाटत होतें, तर एक दहा हजार लोक गोळा करून ' हे आम्हीं जातों वाड्यांत, काय करावयाचें तें करा, ' असें म्हणून पोलीसच्या उरावर तेथें रावता नाहीं पाडला कोणी. हा गरीब बुवा, बरोबर परिवार; त्याचें हें काम नाहीं, अशा स्थितींत परभारें त्याच्यावर प्रयोग करायला तयार. पुढें थोडासा पेंचांत आला म्हणजे पैसे कांहीं तूं काढून देशील का ? ' यावरून बरेंच बोलणें निघून त्यांनीं रानडे, शं. पां. पंडित, वगैरेंच्या कित्येक हास्यकारक गोष्टीहीं सांगितल्या. याप्रमाणें पुढाऱ्यांच्या बेजबाबदार-पणाचा व आंगचुकारपणाचा त्यांना संताप येत असे, व अशा तऱ्हेचें वर्तन व अशा तऱ्हेची देशसेवा न करतांना, समर्थांच्या उक्तीप्रमाणें ' सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें, । परंतु आधीं भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ॥ ' हें वचन लक्षांत ठेवून वागा म्हणून ते सांगत असत. आणि गेल्या वर्षांतील अनेक अवस्थांतून निघाल्यावर हल्लीं जी स्थिति राष्ट्र व त्यांतील चळवळी यांना आलेली आहे, ती पाहिली असतां, त्यांची मतें बरोबर नव्हतीं असें कोण म्हणेल ? असो.

येथें एक गोष्ट उघड सांगावीशी वाटते. देशाच्या भवितव्यतेविषयीं अण्णासाहेबांच्या तोंडून निघालेल्या भविष्यांसंबंधीं आम्हीं मागें स्पष्टच लिहिलें आहे. त्यावरून भविष्यवाद अशा रीतीनें त्यांनीं कधीं कोणास कांहीं सांगितलेंच नाहीं,

हें उघड आहे. तरी पण एक गोष्ट मात्र ते नेहमीं मोठ्या कळकळीनें सांगत. आणि ती उघडपणें तशीच लोकांस सांगणें अवश्य आहे असें आम्हांसही वाटतें. " देशाचा उद्धार कधींही होवो, आज देशाची स्थिति कितीही सुव्यवस्थित व शांत असो, आणि लोकांत उन्नति व ऐक्यहभाव कितीही झालेला दिसो, त्याच्यावर म्हणजे विशेषतः हिंदु लोकांवर असा एक काळ लौकरच येणार आहे कीं, त्याच्याकरितां आतांपासून जर तरतूद केली नाही, तर त्यांना 'दे माय धरणी ठाय' होऊन जाईल. यांतून केवळ परमेश्वराच्या कृपेनेंच पार पडणें शक्य आहे. त्या काळांत 'जीव मुठींत धरून' कसेंबसें तरी जगतां येईल, ( अर्थात् राष्ट्र या रीतीनें ) अशी सोय करणें भाग आहे; व स्वतःच्या श्रद्धाबुद्ध्यनुरूप कांहीं तरी त्याकरतां इमानें इतबारें प्रत्येकानें केलें पाहिजे, मग ती नमस्कारानें शरीर कमावण्यासारखी एकादी दृश्य, अथवा ईश्वरास कळकळीनें प्रार्थना करण्यासारखी एकादी अदृश्य गोष्ट असो, " असें तें सांगत असत. या विषयीं कांहीं जास्त लिहितां येत नाहीं, परंतु जगांतील एकंदर राजकारण 'तंजीब' व 'तघलीव' यासारख्या चळवळी, आणि भयसूचक घंटेसारखीं पुस्तकें, इत्यादि सर्व प्रकार लक्षांत घेतां व या दिशेनें कांहीं तरी केलें पाहिजे, असें विचारी लोकांस जें वाटूं लागलें आहे, तें पाहिलें म्हणजे या उपदेशाचें महत्त्व लक्षांत येतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. नं. ....... ता. .......

# राष्ट्रीय शिक्षण.

The great thing in all education is to make our nervous system our ally instead of our enemy. We must make automatic and habitual, as early as possible, as many useful actions as we can, and as carefully guard against the growing into ways, that are likely to be disadvantageous. The more details of our daily life we can hand over to the effo tless custody of automation, the more our higher powers of mind will be set free for their own proper work. Do not preach too much to your pupils, or abound in good talk in the abstract. Lie in wait rather for the practical opportunities, be prompt to seize those that pass, and thus at one operation get your pupils both to think, to feel, to do. The srokes of behaviour are what give the new set to the character and work the good habits into its organic tissue. Preaching and talking too much soon become in-effectual bore.

सुप्रसिद्ध अमेरिकन मानसशास्त्री प्रो. जेम्स यांच्या वरील उताऱ्यांत अण्णासाहेब यांच्या अथवा थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे आमच्या पूर्वपरंपरेतील शिक्षणपद्धतींचें रहस्यच सूत्ररूपानें सांगितलें आहे. शिक्षण हाच राष्ट्रीय जीवनाचा आत्मा आहे, याविषयीं कांहींच वाद नाहीं. आणि 'राष्ट्रास शिक्षण द्या,' 'राष्ट्रास शिक्षण द्या,' अशी जी देशाच्या दुर्दशेवरील उतारा म्हणून ओरड करण्यांत येते, तीही यथार्थच आहे. परंतु हें शिक्षण म्हणजे काय, आणि तें द्यावयाचें कसें हाच काय तो वैचित्र्याचा प्रश्न आहे. पाश्चात्य संस्कृतीशीं संबंध आल्याबरोबर तिच्या झगझगाटानें दिपून जाऊन पाश्चात्य लोकांचें ज्ञान, त्यांच्या विचारसरणी, आणि त्यांची शास्त्रें यांत प्रावीण्य मिळविणें एवढाच शिक्षणाचा अर्थ केला जात होता. त्यानंतर हळू हळू त्या शिक्षणाचा स्वतःच्या संस्कृतीच्या दृष्टीनें व राष्ट्रीय दृष्ट्या असलेला घातुकपणा लक्षांत येऊन त्यांतील चांगलें तेवढें घ्यावें व आमच्यांतील कांहीं घेऊन निराळाच मसाला तयार

करावा, अशी बुद्धि उत्पन्न झाली, आणि होतां होतां आजच्या घटकेस राष्ट्रीय शिक्षणाच्या नांवाखालीं इंग्रजी विद्येस दूर सारण्याचा मनु येऊन ठेपला. परंतु व्यसनाच्या आहारीं अतिशय पडलेल्या माणसाप्रमाणें, एकीकडे त्या शिक्षणास शिव्या देऊन, राष्ट्रीय शिक्षण अशा शब्दानें अनिश्चित कल्पनांचा उद्गार करावा, आणि दुसरीकडे वेडेंवांकडें तोंड करीत घशांत ओतलेल्या दारूप्रमाणें त्या शिक्षणाच्या अधिकाधिक पचनीं पडावें, अशी असहाय स्थिति झाली आहे. तरुण पिढी हीच राष्ट्राची खाण आहे, या खाणीची जशा रीतीनें जोपासना केली जावी, तशाच रीतीनें पुढील राष्ट्र तयार होईल, ही गोष्ट सर्वांस पटली आहे, परंतु मुख्य अडचण अशी येते कीं, आमचें राष्ट्रीयत्व म्हणजे काय, शिक्षण म्हणजे काय व तें कसें दिलें जातें, यांच्या निश्चित कल्पनेचा अभाव आणि दुसरें, शिक्षणाचा आणि अन्नोदकाचा असलेला अपरिहार्य संबंध यामुळें कितीही ओरड झाली तरी, नवीन असें कांहींच शिक्षण मिळत नाहीं, आणि पाश्चात्य शिक्षणही दिवसेंदिवस कठीण होऊं लागलें अशी स्थिति होऊन, कांहीं तरी एकच गोंधळ झाला आहे.

अशा स्थितींत, या विषयाशीं संबंध असलेले सारे प्रश्न नीट रीतीनें सोडवून, त्यांची कांहीं तरी निश्चित कल्पना करणें जरूर आहे, असें वाटून हा भाग हातीं घेतला आहे. मात्र पूर्वीच्या कोणच्याही प्रकरणापेक्षां यांतील विचारांची जबाबदारी आमच्यावर जास्त आहे, कारण पूर्वीच्या प्रकरणांत आलेले सारे विषय बहुतेक जसेच्या तसे अण्णासाहेब यांच्या शब्दांतच मांडण्याचा प्रयत्न केल्यामुळें त्यांतील शब्दरचना जरी आमची असली तरी, एकंदर प्रतिपादन हें बहुतेक सर्व त्यांचेंच आहे, व कित्येक ठिकाणीं तर त्यांच्या शब्दांतच आहे. म्हणून त्याविषयीं कोणी कांहीं शंका काढली असतां आम्ही निःशंकपणानें अण्णासाहेब यांचेकडे बोट दाखवूं शकतों. तसें या ठिकाणीं आम्हांस कानांवर हात ठेवतां येत नाहींत; कारण हा विषय इतक्या स्पष्टपणें त्यांच्यासमोर कधींच निघाला नसल्यामुळें या विषयावर असे स्वतंत्र त्यांचे कांहीं उद्गार सांगतां येत नाहीत. परंतु यास जोडून असलेल्या इतर कित्येक विषयांवरील त्यांच्या उद्गारांवरून हा प्रश्न कसा सोडविला पाहिजे तें पाहण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून यांत जर कोठें चूक असेल, तर ती आमची आहे, आणि जर त्यांतील विचार-

सरणीनें हा प्रश्न बराचसा सुटण्यास मदत होत असली, तर ज्या त्यांच्या विचारांवरून याची मांडणी करतां आली, त्यांचेंच तें श्रेय आहे. याविषयीं त्यांचें प्रत्यक्ष असें वाक्य नसतांना हा केवळ अव्यापारेषु व्यापारही वाटण्याचें कारण नाहीं. कारण, देशामध्यें एक विशिष्ट विचार-परंपरा कायम राहावी, अथवा उत्पन्न व्हावी, हाच या चरित्राचा हेतु आहे; आणि जर हा विशिष्ट सांप्रदाय जोमदारपणानें वाढावयाचा असेल, तर त्याला अनुकूल अशा कोणत्या शिक्षणपद्धतीनें तो वाढेल, हेंही सांगणें योग्यच आहे; असो.

इंग्रजी शिक्षणाचें जेव्हां परीक्षण सुरू झालें, तेव्हां त्यांतील एक दोष असा सांगण्यांत आला कीं, जेणेंकरून राष्ट्रजागृती होईल, व जितकी त्यांच्या संबंधाची वस्तुस्थिति कळेल अशी माहिती त्यांत नसते. हिंदी लोकांच्या प्रत्येक गोष्टीस लाघव आणि तद्व्यतिरिक्त तेवढ्या सर्व गोष्टींस मुसलमान ग्रीक अथवा रोमन आणि युरोपिअन असल्या परंपरेनें उत्तरोत्तर गौरव द्यावयाचें अशी त्या शिक्षणाची तऱ्हा आहे; यामुळें याच्या उलट तें राष्ट्रीय शिक्षण, अशी कल्पना सररहा झालेली दिसते. इंग्रेजी शिक्षणाची तऱ्हा अशी मानभावी आहे, हें तर उघडच आहे, परंतु चांगला विचार केला तर, असें आढळून येईल कीं, विष्णुशास्त्र्यांच्या काळानंतर तरी, राष्ट्राचें घोडें त्यामुळें फारसें अडून बसलें नव्हतें. इंग्रेजी शाळेंत शिकणारा अगदीं अत्यंत राजनिष्ठाचा कां मुलगा असेना, भोंवतालच्या परिस्थितीमुळें त्याला हें सहज कळत असे कीं, क्रमिक पुस्तकांतील माहिती खोडसाळ असून वस्तुस्थिति अगदीं भिन्न आहे. शिवाजी महाराजांस क्रमिक पुस्तकांत जरी सामान्य लुटारू म्हटलें तरी वस्तुतः त्यांची योग्यता कोणची होती, हें गेल्या पन्नास वर्षांतील विद्यार्थ्यांस तरी पूर्णपणें ठाऊक असतें. असें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं तरुण माणसाचें ज्ञान केवळ क्रमिक पुस्तकांवरच अवलंबून नसतें, आणि सरकारनें कितीही निर्बंध घातले तरी भोंवतालच्या वातावरणांतून सर्व तऱ्हेचे विचार त्यास मिळतच असतात. अशा स्थितींत क्रमिक पुस्तकांतील थोड्याशा शिक्षणानें त्यांचें गाडें अडून राहतें, असें म्हणतां यावयाचें नाहीं. जर कांहीं नुकसान झालें असेल तर तें इंग्रजी शिक्षणानें नव्हे; तर इंग्रजी संस्कृतीला दिपून गेल्यामुळें आम्हीं जें धुपाटणें पालथें घातल्यासारखें केलें त्याचा तो दोष आहे. याच इंग्रजी शिक्षणांतून, ज्यांनीं राष्ट्रांत जागृती उत्पन्न केली, आणि इंग्रजी

राज्याचा व संस्कृतीचा हल्ला परत फिरविण्याकरतां झगडा सुरू केला, त्यांची पिढी बाहेर पडली. तेव्हां हा दोष इंग्रजी शिक्षणाचा म्हणजे अर्थातच निवळ शाळाखात्याचा नाहीं.

इंग्रजी शिक्षणाविरुद्ध ज्या वेळेस ओरड करण्यांत येते, ती वस्तुतः सभोंवतालच्या वातावरणांत खचून भरलेल्या इंग्रजीपणामुळें जें हजारों प्रकारानें इंग्रजी शिक्षण मिळत असतें, त्याविरुद्ध नसून, शिक्षण खात्याकडून मिळणाऱ्या शिक्षणपद्धतीविरुद्ध असते. इंग्रजी शिक्षण जर वाईट असेल, तर वातावरणांत जेथें तेथें भरून राहिलेल्या इंग्रजी संस्कृतीस उडवून दिलें पाहिजे, अथवा कांहीं काल तसें साधणें शक्य नसल्यास, निदान ती संस्कृति आमच्या अंत:करणांवर वाटेल तो परिणाम करणार नाहीं, व तिच्या अनुरोधानें आमच्या आयुष्यास वळण लागणार नाहीं, असा कांहींतरी पक्केपणा आमचे ठिकाणीं उत्पन्न केला पाहिजे. ज्याला आज राष्ट्रीय शिक्षण म्हणतात, त्याचा आणि शिक्षणखात्यातील शिक्षणाचा तुलनात्मक विचार केल्यास, दोघां-मध्यें इतकाच फरक आढळून येतो कीं राष्ट्रीय शाळेंतून विशेषपणा दाख-विण्याकरितां धंदे शिक्षणाचा एक धूमकेतु तिला जोडलेला असतो; व सभांना वगैरे जाण्याची आणि कांहीं चळवळींत प्रत्यक्ष भाग घेण्याची त्यांना मुभा असते. व कदाचित् देशी भाषेच्या उपयोगामुळें अभ्यासक्रम थोडा सुगम होत असेल. पण एवढ्यामुळें त्यांत राष्ट्रीयत्व अशा दृष्टीनें कांहीं मोठासा विशिष्टपणा येतो असें नाहीं. माहितीच्या दृष्टीनें पाहिलें तर दोनही शाळांतील विद्यार्थ्यांना सारखीच माहिती असते, आणि राजकीय कार्यक्रमांत एकास प्रत्यक्ष भाग घेतां आला नाहीं तरी इष्टानिष्ट परिणाम दोघांवरही सारखेच आढळून येतात. राष्ट्रीय शाळेंत कांहीं काळ घालवून पोटापाण्यास लागलेला, आणि इंग्रेजी शिक्षणांतून बाहेर पडलेला अशा दोघांच्याही शीलांत व जीवन-क्रमांत असा कोणचाच फरक आढळून येत नाहीं कीं, ज्यामुळें त्यांच्या भिन्नभिन्न खाणी उमटून पडतील. जो कांहीं फरक राहतो तो शिक्षण संस्का रांचा नसून पोटापाण्यांच्या साधनांचा जो अवश्य परिणाम जीवावर होतो, त्याचा असतो.

याचें कारण असें दिसून येतें कीं, ज्यास राष्ट्रीय शिक्षण म्हणून म्हणण्यांत येतें तें वस्तुतः राष्ट्रीय नसून कांहीं गैरसोयी दूर करण्या-

करितां काढलेलें इंग्रजी शिक्षणच असतें; कारण देश, देशाभिमान आणि राजकीय झगड्यास योग्य अशा कांहीं मनोवृत्तींस प्रेरक अशा गोष्टी एवढ्यानें कांहीं राष्ट्रीयत्व होत नसतें. कारण, देश आणि देशाभिमान या सामान्य शब्दांनीं झाल्यास फार झालें तर त्यागबुद्धि उत्पन्न होऊं शकेल, परंतु अंतःकरणाची विशिष्ट तऱ्हेची मूर्ति बनूं शकणार नाहीं. आणि अशा तऱ्हेची मूर्ति बनणें, यांतच राष्ट्रीयत्व आहे. आमच्या राष्ट्रीयत्वाच्या स्वरूपाविषयीं हल्लीं इतका गोंधळ होऊन गेला आहे कीं, जो हिंदु म्हणावयास तयार असेल तो हिंदु, असली त्या राष्ट्रीयत्वाची व्याख्या करण्यापर्यंत मजल येऊन पोहोंचली. ज्यांनीं राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचें, त्यांच्याच जवळ अशा रीतीनें राष्ट्रीयत्वाचा अभाव असल्यामुळें, राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा म्हणजे इंग्रजी शिक्षणपद्धतीच्याच सुधारलेल्या* आवृत्ति होणें साहाजिक आहे. एवढ्याकरितां राष्ट्रीयत्व म्हणजे काय हें आधीं पाहूं, आणि मग त्याचें शिक्षण कसें दिलें जावें याचा विचार करूं.

इंग्रजी शिक्षणाच्या योगानें निःसत्त्वता येऊन अनेक उत्कृष्ट गुणांची हानि होते. ती होऊं नये म्हणून देश, या सामान्य शब्दानें आजकाल वाङ्मयांत अट्टाहास चालविला आहे. देश हा इतका सामान्य शब्द आहे कीं जर तत्संबंधीं गुणसंस्कारांची विशिष्ट मूर्ति तयार नसेल, तर तो मनुष्याच्या अंतःकरणास उद्बोध करूं शकणार नाहीं. इतर देशांतील इतिहास पाहिला तरी देखील असें दिसतें कीं, ज्यास कांहीं संघटनात्मक कार्य करावयाचें आहे, त्यास विशिष्ट गुणसंस्कारांचीच मूर्ति लोकांपुढें मांडावी लागते. आणि देश या नांवांत जी एक जादु आहे असें वाटतें, तिचा निष्कर्ष कोणच्या तरी एका जनसमूहाच्या ठिकाणीं आत्मबुद्धि आणि तत्प्रीत्यर्थ स्वार्थत्यागाची तयारी या दोन उदात्त भावनांत दिसून येतो; व त्यांच्या योगानें जेथें कोणच्याही तऱ्हेचें प्रतिकारकार्य कराव-

---

*' याचा अर्थ मात्र असा नाहीं कीं, हल्लींच्या राष्ट्रीय शिक्षण संस्था प्रशंसनीय नाहींत. दगडापेक्षां वीट केव्हांही मऊच असणार व शिक्षण घ्यावयाचेंच म्हटलें तर राष्ट्रीय शाळेंत घेणेंच जास्त हितावह असणार आणि तेथेंच तें घेतलें पाहिजे हें तर उघड आहे. ' न निंदा निंदितुं अपि तु विधेयं स्तोतुं ' या न्यायानें वरील लिहिणें आहे.

याचें आहे, त्यास लागणारें शौर्य थोडेंबहुत उत्पन्न होतें. परंतु राष्ट्रीयत्वास लागणाऱ्या अनेक गुणांपैकीं जरी तो बिनमोल असला, व त्याच्या योगानें व्यक्तीची किंमत कितीही वाढली, तरी त्यांना कांहीं संस्काराची जोड असल्याखेरीज त्याची राष्ट्रीयत्वास मदत होऊं शकत नाहीं. सारांश, गुण आणि संस्कार या उभयतांची मिळून जेव्हां एकादी विशिष्ट मूर्ति ठरते, तेव्हांच तिच्या ठिकाणीं राष्ट्रीयत्व येऊं शकतें.

उदा० एकादा मनुष्य कितीही शूर असला तरी तेवढ्यानें तो मुसलमान होऊं शकणार नाहीं; त्या शौर्याचा अभिमान कुराणास व पैगंबरास चिकटून असेल, म्हणजे अर्थातच त्यांच्या अनुषंगानें मुसलमानी समाजास धरून असेल, तरच त्याला मुसलमान म्हणतां येईल. मुसलमानांचेंही राष्ट्रीयत्व इस्लामी धर्माशीं चिकटून असल्यामुळें धर्माशीं चिकटून असणें हेंच त्यांच्या राष्ट्रीयत्वाचें लक्षण झालें. इंग्लिश लोकांचें राष्ट्रीयत्व ख्रिश्चन धर्माशीं चिकटून नसल्यामुळें, इंग्लंडच्या राजकीय हिताहितास एकरूप असणें, आणि ज्या कित्येक गोष्टींमुळें जगांतील इतर युरोपियन लोकांहून इंग्लिश मनुष्य आपला वेगळेपणा कायम राखूं शकतो, त्या गोष्टी म्हणजे आचार, विचार, आणि गुण हे अंगीं असणें, यांतच त्यांचें राष्ट्रीयत्व आहे; मग तो माणूस कोणत्याही धर्माचा असो. या विशिष्टपणांत आनुवंशिकतेलाही एक स्थान असल्यामुळें इंग्लंडांत इंग्लिश म्हणविणाऱ्या आईबापांच्या पोटीं जन्म येणें, हाही एक संस्कार अवश्य आहे. असो.

सारांश काय देशजागृतीकरितां धैर्य, साहस वगैरे जे कांहीं गुण यावे असें आपणांस वाटतें, ते तर वस्तुतः मनुष्यत्वाला आवश्यक आहेत. त्यांच्या योगानें फार झालें तर यथार्थ मनुष्यत्व येईल. या गुणांचा उपयोग हिंदुस्थान देश म्हणून आज ज्याला समजतात, अथवा समजण्यांत येईल, त्याच्या व त्याचा घटक या नात्यानें स्वतःच्या हिताहितसंबंधांतच करूं असें म्हटल्यानेंही त्या समाजास राष्ट्रीयत्व येणार नाहीं. कारण त्या भावनेंत स्थायीकपणा नसल्यामुळें, परंपरा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं, व हिताहितसंबंधावरच त्या गुणांचा उपयोग आणि त्या भावनेचें अस्तित्व असल्यामुळें, हिताहितसंबंध पालटले म्हणजे त्यांची योजनाही पालटली. अशाप्रमाणें त्या गुणांतला उदात्तपणा निघून जातो.

सारांश काय, असले सर्व उदात्त गुण अंगीं असावें, आणि त्यांच्या जोडीस जेणेंकरून जगांतील इतर जनसमाजाकडून आपलें विशिष्टत्व कायम राहून, त्यामुळें मानवसृष्टींत कांही स्पष्ट विशिष्ट कार्य करतां येईल, अशा तऱ्हेच्या सर्व संस्कारास अभिमान चिकटून असेल, तरच तिला राष्ट्रीय भावना म्हणतां येईल, व त्या अभिमानाच्या जोपासनेंतच राष्ट्रीयत्व आहे. अशी राष्ट्रीय शब्दाची सामान्य व्याख्या आजच्या घटकेस करतां येईल. मग व्युत्पत्तिशास्त्र-दृष्ट्या कोणी कितीही तर्क बसवोत. या ठिकाणीं संस्कार हा शब्द मानसिक परिणाम, व गंध लावणें, स्नान करणें, माळ अथवा जानवें घालणें, गुडघे टेंकूनच नमाज पढणें अथवा अंगावर पाणी शिंपडून घेऊन पवित्रात्म्यानें शुद्ध होणें असली प्रत्यक्ष लहान मोठी क्रिया असल्या दोनही अर्थांनीं वापरला आहे.

आजकाल जी जागृति उत्पन्न होत आहे तिच्यांत उत्तम गुण उत्पन्न व्हावे, असा स्तुत्य प्रयत्न आहे. परंतु त्याला समाधानकारक यश न येण्याचें कारण हें आहे कीं, असा कांहीं विशिष्ट संस्काराचा अभिमान उत्पन्न केला जात नाहीं किंबहुना असा अभिमान असणें हें कोतेपणाचें व वेडगळपणाचें समजलें जातें; परंतु कोणत्याही संघटनेंतील खरा जोम असल्या वेडगळपणांतच असतो; तत्त्वांच्या बारकाईनें इच्छाशक्तीची वाफ निघून जाते. या गोष्टीच्या अज्ञानामुळें व कांहींसें, जरी ही गोष्ट पटली तरी, हल्लीं जिकडे तिकडे झालेल्या अनवस्थेमुळें, सर्वांस पटतील असे संस्कार कोणते घ्यावे, याचा निर्णय करितां येत नसल्यामुळें, असल्या संस्कारच्या अभिमानाच्या अभावीं उत्तम गुण प्रौढ पिढीच्या अंगीं खेळत नाहींत, आणि म्हणून नवीन पिढ्यांत त्यांचें परिवर्तन व उत्पत्ति होत नाहीं. कार्यवशात् कोठें कांहीं गुण चमकतात, ते त्या कार्यास धरून असल्यामुळें, तत्क्षणींच विजेप्रमाणें मालवून जातात. पयाळनाथांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ निशाण फडकें तें काष्ठ । त्याचें मोल काय । पारे त्या अभिमानासाठीं रायाचें शिर जाय ॥ ” यांत सारें रहस्य आहे. क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीचेच संस्कार बनवून त्यांच्या ठिकाणीं ‘ रायाचें शिर जाय ’ असला अभिमान धरल्यानेंच राष्ट्रचैतन्य उत्पन्न होतें, व राष्ट्र जगतें. नुसत्या गोल गोल गोष्टीनें कांहीं देखील होत नाहीं. परंतु, संभावितपणाच्या विचित्र कल्पनांमुळें असल्या तऱ्हेचें वर्तन आपल्या योग्यतेस कमीपणा आणणारें वाटतें, अगर सर्व प्रकारच्या अर्धवट पांडित्यानें कशांतच कांहीं वाटत नसल्यानें अतिशहाण-

पणानें जुनें अंतरलें आणि पारतंत्र्यामुळें नवीन पारखें झालें, अशी स्थिति उत्पन्न झाली आहे. जुन्या सुइणी मरून गेल्या, आणि नवीन तऱ्हेनें इस्पितळांत बाळंतपण करणें तर पटत नाहीं, अशा स्थितींत बाळंतीणच मरून जावयाची पाळी आली आहे. एकाद्या विषयांत थोडासा व्यासंग केला अथवा पुष्कळशा विषयांचा चांवा घेऊन पाश्चात्य पंडितांची ठराविक विचारसरणी पाळली, कीं मनुष्याच्या आयुष्याशीं संबद्ध असलेल्या सर्व विषयांत अकुंठित संचार करण्याची बुद्धीस पात्रता येते, त्यामुळें जें लहरीस येईल तें शास्त्र आणि जी सोयीस पडेल ती शास्त्रीयता असें होऊन बसल्यावर राष्ट्रीयत्वाची नुसती चाळणी व्हावी हें ठीकच आहे. असल्या या चाळणींत कितीही चैतन्यप्रवाह ओतला गेला तरी एक थेंबही कसा सांचेल ?

या सर्व गोष्टींची थोडीबहुत जाणीव सर्वत्रच आहे. व अशा तऱ्हेनें होणारी चूक भरून काढण्याचे थोडे बहुत प्रयत्नही आहेत; परंतु एक तर अशा राष्ट्रीयत्वाच्या बाबतींत अशी सुनिश्चितता आणणें दुर्घट झाल्यामुळें व शिक्षण शब्दाची व्याख्याच मुळीं बदलून गेल्यामुळें राष्ट्रीय शिक्षण म्हणजे इंग्रजी शिक्षणाचीच एक सुधारलेली आवृत्ति व्हावी यांत, नवल नाहीं. या शरीरांतील Nervous system (ज्ञानतंतुजाल) म्हणजे खरा मनुष्य. स्नायुमय शरीर आणि स्नायुबल याची व त्या Nervous system ची जर उत्तम जोड असली तरच मनुष्य म्हटला म्हणजे आपल्या मनांत ज्या जोमदारपणाची, कर्तेपणाची आणि प्रभुतेची कल्पना येते, अशा तऱ्हेचा मनुष्य तयार होतो. त्यामुळें Nervous system आणि Muscular system यांचा असा परस्पर जोड घालून देऊन त्या वाढतील अशाच तऱ्हेचें ज्ञान व वळण त्यांना देणें हा सर्व शिक्षणाचा हेतु आहे. नवीन रोपट्याला कांहीं काळ कुंड्यांत ठेवून खत, पाणी, वारा, ऊन वगैरे सर्व विशिष्ट तऱ्हेनेंच द्यावें लागतें, तरच त्याची योग्य वाढ होते. त्याचप्रमाणें मनुष्याची अशी वाढ होतांनाही घडावें लागतें. नाहीं तर Nervous system आणि Muscular system यांच्यांत विस्कळितपणा होऊन हल्लींच्या समाजासारखी विचित्र मानवसृष्टि उत्पन्न होते हीं

गोष्ट लक्षांत घेऊन, तशाच तऱ्हेची राहणी आमच्या इकडील जाणत्या लोकांनीं बनवून दिली होती.

शिक्षणांतील हा खरा हेतु लक्षांत घेतला असतां असें आढळून येईल कीं हल्लींच्या कोणत्याही शिक्षणपद्धतींत शिष्याची पूर्वीची कांहीं तयारी नसतां हा हेतु साधणें शक्य नाहीं. कारण या शिक्षणपद्धतींच्या कक्षेंत तो पुरा येईपर्यंत शरीरांतील या दोन संस्थांची वाढ होऊन गेलेली असते. वर सांगितल्या प्रमाणें शिक्षणांतील खऱ्या हेतूची वासलात त्या पूर्वींच्या वयांतच लागून जाते. जर कर्मधर्मसंयोगानें त्या जीवाच्या बाबतींत हें थोडेंबहुत घडून आलें असलें, तर मात्र त्यास वाढवून विशिष्ट रूप देण्याचे कामीं हें शिक्षण पडूं शकतें. त्यामुळें जेथें ही मूळ तयारी घडते, तेथेंच खरोखर काळजी घेतली पाहिजे. म्हणजे ज्या विचारवान् गृहस्थास आपल्या मुलास राष्ट्रीय शिक्षण द्यावेसें वाटत असेल, त्यानें स्वतःच्या घरासच राष्ट्रीय शाळा बनविलें पाहिजे, आणि डोळे उघडूं लागतांच आपल्या पिलांस दयामाया न करतां तिच्यांत घातलें पाहिजे. परंतु त्या शाळेंत घालून सर्व तऱ्हेची नुसती माहिती त्याला देऊन अगर कानाशीं अष्टौ प्रहर वडबड करूनही हें साधणार नाहीं. उलट मुलांच्या कानीं वाटेल तशी आणि वाटेल तितकी बडबड केल्यानें, त्यांच्या क्रिया-शक्तीची वाफ निघून जाते, व विरुद्ध परिणाम मात्र घडून येतो. परंतु शिक्षणाचा हा हेतु लक्षांत ठेवून, अथवा न ठेवूनही कां होईना, वरील इंग्रेजी उताऱ्यांत सांगितल्याप्रमाणें वागण्याची शिस्त ज्यांना लागलेली आहे, व स्वतः ज्यांच्याजवळ कांहीं गुणसंस्कारांची कमाई आहे, तेच योग्य गुरु होऊन सहज रीतीनें शिक्षण देऊं शकतात. अशा तऱ्हेनें घरोघरीं मनुष्यत्वाचें शिक्षण घेतलेली प्रजा जेव्हां एकत्र होते, तेव्हां त्यांच्या क्रियाशक्तीला त्यांच्या स्वभावानुरूप निरनिराळीं वळणें देऊन तदनुरूप ज्ञानाचा पुरवठा करण्याचें काम मात्र सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्था करितात. अशी वस्तुस्थिति असतां, शिक्षण म्हणजे कांहीं तरी विषयांच्या माहितीचा संग्रह व तें मुलगा कांहीं तरी वयांत आल्यावर त्याच्या कानाशीं कटकट करूनच दिलें जातें, त्याचा देणाऱ्यांच्या व्यक्तित्वाशीं कांहीं संबंध नसतो, व तें देण्याची कांहीं विशिष्ट पद्धतीही नाहीं, अशा तऱ्हेच्या मुकाट्यानें सर्व संमत झालेल्या एक प्रकारच्या समजामुळें राष्ट्रांतील नवीन पिढीस कसल्याही प्रकारची कितीही माहिती

मिळत असली, तरी शिक्षण असें बहुतेक मिळतच नाहीं. आणि तसें तें मिळाल्याखेरीज तर राष्ट्र सजीव होऊन वर येणें शक्य नाहीं. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे विचारवान् पुरुषांनीं अतिविचारता व प्रत्युत्पन्नकर्तृत्व यांचा भ्रम टाकून देऊन, संकुचित अभिमान धरावयास तयार झालें पाहिजे, म्हणजे गुण-संस्कारांची थोडीबहुत कांहीं तरी प्रत्यक्ष कमाई केली पाहिजे, व आपल्या जीवाचे कोड अथवा कींव न करितां अखंड त्या शिस्तींत स्वतःस घालून घेतलें पाहिजे, म्हणजे तें शिक्षण कुटुंबास मिळून मोठ्या शिक्षण-संस्थांचा राष्ट्रीय दृष्टया फायदा घेण्याची पात्रता पुढील पिढींत येईल. नुसत्या उत्तम विचारांनीं, अगर शिक्षणसंस्था व्याख्यानें आणि वाङ्मयसाधनें यांत पोरास बुडवून ठेवल्यानें कांहींही व्हावयाचें नाहीं. सारांश समाजघटकांची खाजगी रहाणी व माणसांचें कौटुंबिक जीवन यांचें महत्व ध्यानांत घेऊन तेथपासून जेव्हां कोणच्याही चळवळीस सुरवात होईल, तेव्हां कार्य होऊं लागेल. मनुष्याची चळवळ वेगळी व त्याचें खाजगी जीवन वेगळें, अशी फारकत झाल्यानेंच साऱ्या चळवळी निर्वीर्य होऊन मरून जातात.

दुसरी मोठी अडचण म्हणजे, जुनें आणि नवें यांचा तंटा, जीवनकलह, दारिद्र्य, राजकीय परिस्थिति, इत्यादि गोष्टींच्या भाऊ-गर्दींत शिरल्यावर मनुष्याच्या विचाराचा पत्ताच लागत नाहीं; अशा स्थितींत स्वतःच्या राष्ट्रीयत्वाची निश्चित कल्पना करून, तिला सुसंगत असे गुणसंस्कार भोंवतालच्या परिस्थितींत अंगी आणावयाचे, व परिपाळावयाचे, ही गोष्ट सर्वांसच कशी साधेल? स्वतः अण्णासाहेब देखील म्हणत असत कीं, "हें काम फार कठीण आहे, महाराज स्वतःच अवतार घेऊन तें करतील, तेव्हांच सारी अव्यवस्था मोडली जाईल." असें जरी असलें, व एकादा अवतारी महापुरुष पुढें येईपर्यंत हें जरी साध्य नसलें, तरी तोंपर्यंत एक गोष्ट करणें आमचें कर्तव्य आहे, असें ते म्हणत असत. ती ही कीं सर्व तऱ्हेची गुण-संपत्ति आंगीं आणावी, आणि जुने संस्कार व परंपरा या जिवंत ठेवण्याची खटपट करावी; मग तेवढ्याकरितां वाटेल त्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी हरकत नाहीं, त्यांत भूषणच आहे. ज्याला त्याला त्याच्या त्याच्या जातिकुलशीलानुरूप सहज प्राप्त होणाऱ्या अशा अनेक गोष्टी असतात कीं, वरील रीतीनें त्यांचें परिपालन करून महाराष्ट्र धर्म त्याला वाढवितां येईल.

तेजस्वी व्यक्तींच्या अनेक लहान लहान अभिमानांचा समुच्चय म्हणजे राष्ट्र-जागृति; अनेक लहानसान अभिमान कितीही वाढले तरी व त्यांनीं एकमेकांशीं कशाही कुस्त्या केल्या तरी ते एकमेकांस मारून टाकणार नाहींत; उलट एकाच आखाड्यांतील तालीमबाजांप्रमाणें एकमेकांचें बल वाढवितील, असा त्यांत जो एकसूत्रीपणा असतो, त्याचेंच नांव 'महाराष्ट्रधर्म'. श्रीसमर्थांनीं 'मराठा तितका मेळवावा' म्हणून महाराष्ट्र धर्माचें लक्षण सांगतांना कांहीं एकंकार शिकविला नाहीं, तर उलट ज्यानें त्यानें आपणास शहाणें करावें. व सर्वांनीं मिळून देशद्रोही कुत्ते मारून परते घालण्यास शिकावें, असेंच शिकविलें आहे. ही गोष्ट एकाच रीतीनें साध्य आहे मराठा तितुका मिळवून एक विचारानें भरावा, म्हणून समर्थांनीं सांगितलें; आमचे लोकही आज ह्याचीच इच्छा करीत आहेत परंतु 'एक विचार' मात्र कोणांतच भरला जात नाहीं. याचें कारण सर्व प्रकारचे प्रयत्न करीत असतां महाराष्ट्र धर्माचें मुख्य अंग आम्हीं विसरून गेलों.

श्रीगुरुचरित्र या ग्रंथावर अण्णासाहेब यांचें फार प्रेम होतें, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. ज्यामध्यें परकी भाषेंतील एकही शब्द नाहीं, असा हा ज्ञानेश्वरीनंतर भर मुसलमानींत निर्माण झालेला असा एकच ग्रंथ आहे. समर्थांनीं उपयोगांत आणलेला 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द प्रथमतः या ग्रंथांत आलेला आहे, असें ते मोठ्या अभिमानानें सांगत. 'महाराष्ट्रधर्म म्हणजे काय?' असें मीं त्यांना विचारलें असतां सर्व गोष्टींस श्रीगुरुचरित्रांतून आधार काढून देण्याच्या त्यांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून त्यांनीं चटकन् सांगितलें कीं 'अरे, महाराजांनींच श्रीगुरुचरित्रांत हा शब्द योजिला आहे; व तेथेंच त्याचें सूत्रमय लक्षण सांगून टाकलें आहे. श्रीगुरुचरित्र अध्याय पन्नास, ओवी १३५, "ऐसा हा राव असतां। महाराष्ट्रधर्मीं वर्ततां। आपुला द्वेष तत्वतां। न करील कीं जाण पां"॥ यांत महाराजांनीं महाराष्ट्र धर्माचें मुख्य लक्षण सांगून ठेवलें आहे. असें म्हणून त्यांनीं बरेंच भाषण केलें. त्याचा सारांश एवढाच आहे कीं 'कोणच्याही गोष्टीचा उगम प्रेमांतून झाला पाहिजे, द्वेषांतून होतां कामा नये. कुणाचा द्वेष करावयाचा नाहीं, व द्वेषाकरितां कोणतीही गोष्ट करावयाची नाहीं, हाच महाराष्ट्र धर्म. प्रेम म्हणजे निरपेक्ष कळवळा. द्वेषामुळें उत्पन्न झालेली चळवळ जोरदार असली

तरी, ती सर्वत्र एक विचार भरूं शकत नाहीं, व तिच्यांत परंपरा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नसतें. तत्त्वावरील आपल्या प्रेमामुळें सर्व तऱ्हेची क्रिया निर्माण झाली पाहिजे, परंतु असें होत असतां, त्या प्रेमामुळेंच दुसऱ्याचा द्वेष अथवा त्याच्या अंतःकरणास दुखविणें घडणार नाहीं अशा तऱ्हेची मनोभूमिका म्हणजे महाराष्ट्र धर्म. मात्र याचा अर्थ असा होत नाहीं कीं, दुसऱ्यास दुखवावयाचें नाहीं, एक या अहिंसा धर्माचें फाजील स्तोम करून, कोणी एक गालांत मारली तर दुसरा गाल पुढें करावयाचा, अगर आपल्या कुटुंबिनीवर कोणी बलात्कार करूं म्हणेल तर त्यास सत्रंजी घालून द्यावयाची.

महाराष्ट्र धर्म हा वस्तुतः मनुष्याला शूर व कर्तृत्ववान् असा बनवितो; कारण प्रेम आणि कर्तव्य यांच्या पुढें भय टिकतच नाहीं, आणि यांच्या इतका जोर दुसऱ्या कशांतही नसतो. परंतु अहिंसेचें फाजील स्तोम सामान्यतः माणसास पंगु व नामर्द बनविणारें आहे. परंतु कर्तव्य हें सर्व तऱ्हेच्या विरोधाचा समन्वय करितें. अहिंसा, द्वेष, प्रेम वगैरे मनोवृत्ति अंतःकरणाच्या आहेत, व शौर्य, पंगूपणा, प्रतिकार वगैरे क्रिया त्या सर्वांपासून बाहेर सारख्याच उत्पन्न होऊं शकतात. त्या क्रियांचा प्रश्न नाहीं, अंतःकरणाचा आहे. कोणत्याही तऱ्हेचा द्वेष अंतःकरणांत नसतांना, काम पडल्यास स्वतःच्या हातानेंच, आडवें आलें कीं कापून काढावें लागतें. सैन्यांतला शिपाई Fire म्हटल्याबरोबर गोळी सोडतो, तेव्हांही त्याच्या मनांत केवळ कर्तव्यावरील प्रेमच असतें. त्याप्रमाणें काम पडल्यास, शरीररक्षणार्थ शस्त्रक्रिया जशी अवश्य आहे, तसेंच समाजरक्षणार्थ भीषण क्षात्रकर्मही करण्यास तयार असणें, माणसाचें कर्तव्यच आहे. मुद्दा एवढाच आहे कीं, अंतःकरणांतील दृढप्रेमांतून क्रियेचा उदय झाला पाहिजे; व तत्त्वाविषयीं अथवा वस्तूविषयीं अशा प्रेमामुळें जो अभिमान उत्पन्न होतो, त्याच्याच योगानें मनुष्यांत शौर्य उत्पन्न होतें. हा केवळ शब्दच्छल वाटेल परंतु तसें नव्हे. चळवळीवरील चळवळ करणाराचा अभिमान किती क्षीण असतो, व त्यामुळें तिच्याशीं त्याचें जीवन एकरूप कसें होऊं शकत नाहीं, हें दाखविण्याकरितां इतकी फोड करणें अवश्य होतें.

सारांश गोष्ट एवढीच आहे कीं, कांहींतरी विशिष्ट गुणसंस्कार (नुसते गुण नव्हेत) यांच्या ठिकाणीं अभिमान उत्पन्न झाल्याखेरीज शिक्षणास राष्ट्रीयता येणार नाहीं. असा अभिमान उत्पन्न होणें, हें वेदांताच्या अगर भागवतधर्माच्या तत्त्वास

विसंगत आहे असेंही नाहीं. वेदांतांतील निरहंकारिता आणि भागवत धर्मांतील लीनता यांचा विपर्यास केल्यामुळेंच हल्लींची तेजहीन स्थिति उत्पन्न झाली. मनुष्याच्या कणाकणांत ' हें काम मीं केलें पाहिजे, ' अशी जी स्फूर्ति भरून राहते, तिचें नांव ' अहंकार. ' अंतःकरणानें ठरलेलें कर्तव्य करण्यास जणूं काय शरीरांतील कणाकणानें ' हें मी आधीं करतों, ' अशा चढाओढीनें उत्सुकता दाखविणें, याचें नांव अहंकार. ही एक अंतःकरणाची शक्ति आहे, व ती नसली तर मनुष्याच्या घटनेंत व्यंग उत्पन्न होऊन, तो अपंग होऊन जातो. अहंकार, अभिमान, अहंमति वगैरे शब्द हे सारेच एकमेकांचे पर्याय समजले जातात, परंतु वेदांतांत व इतर ग्रंथांतूनही ते कोठें कोठें पर्याय म्हणून तर कोठें कोठें त्यांच्यांतील सूक्ष्म फरक लक्षांत घेऊन वेगवेगळया अर्थानें योजिलें असल्यामुळें असा घोंटाळा उत्पन्न होतो.

याविषयीं एके ठिकाणीं त्यांची स्वतंत्र टीप सांपडली ती अशीः—

" दूष्य किंवा दुष्ट अहंकार म्हणजे गर्वाच्या अर्थी हा साक्षेप म्हणजे द्वैतयुक्त म्हणजे अन्य व्यक्तींच्या संबंधानें असतो. म्यणून त्याला त्याज्य, गर्हणीय, मद आणि मत्सर यांची जोड मानून ' विकार ' असें मानण्यांत येतें. परंतु देवाच्या किंवा श्रींच्या ठिकाणीं गर्व असणें संभवत नाहीं. त्याचप्रमाणें कामक्रोधाधिक मनोवृत्ति विकार म्हणून संभवत नाहींत. कारण दुसरी व्यक्तीच त्यांच्याशिवाय नाहीं. अंतःकरण चतुष्टयांतील अहंकार, स्वतंत्र. ही शक्ति आहे, गर्व नव्हे."—३०–७–१९०९. जेणेंकरून • इतर मानव जातींहून मनुष्य आपणास वेगळा काढतो, व स्वतःच्या अपेक्षेनें इतरांस कमी लेखतो, अशा प्रकारची जी स्वतःविषयीं वृत्ति, त्या अर्थानें अहंकार, अभिमान, गर्व, इत्यादि शब्द दुष्ट मानले गेले आहेत. किंवा वेदांतांतील अत्युच्च आणि अति सूक्ष्म सीमा सांगण्याकरितां 'अस्मिते'लाही जडांत आणि वृत्तींत काढून निर्विकल्पतेची खूण दाखविली जाते, तेथेंही अहंकार शब्दाचा निषेध केला आहे. परंतु हे दोन विशेष अर्थ जर सोडले, तर असें दिसून येईल कीं, अहंकार ही अंतःकरणांतील स्वतंत्र शक्ति असल्यामुळें मनुष्याची पूर्ण वाढ होण्यास इतर शक्तींबरोबर तीही योग्य प्रमाणांत वाढलीच पाहिजे. आणि या स्फूर्तीस व्यक्त स्वरूप येण्याकरितां कांहींतरी बाह्य गुणकर्मसंस्कार इत्यादि उपाधींशीं ती चिकटून असली पाहिजे; मात्र एवढेंच कीं वर सांगितल्याप्रमाणें तिचें दूष्य

अहंकारांत अथवा गर्वांत रूपांतर होतां कामा नये, आणि कशावरही तिनें अशा रीतीनें ' ममता ' स्थापिणें योग्य नाहीं.

अशा रीतीनें व्यवस्थितपणें अंतःकरणाची जी वाढ तिचें नांव शिक्षण. असा अहंकार तर असावा, परंतु गर्व आणि ममता नसावी, अशा दोन विरोधांचा समन्वय करण्याची खुबी अशी आहे कीं, जेथें केवळ स्वतःच्या व्यक्तीचा प्रश्न असेल, तेथें अगदीं एका गालफडींत मारली असतां, दुसरा गाल पुढें करण्याइतकी लीनता, आणि अहिंसा, क्षमा वगैरे कोमलवृत्ति परिपूर्ण असावयाच्या, आणि जेथें सामाजिक प्रश्न असेल, तेथें मात्र त्याच्या अपेक्षेनें अहंकारादि कठोरवृत्ति ' अपि भज्येद्‌पर्वाणि ' अशा रीतीनें बाळगाव्या, म्हणजे मनुष्याची स्वतःची सर्व तऱ्हेनें परिपूर्ण वाढ होते. पूर्णत्वाचें खरें रहस्य अपूर्णतेनें वागण्याची भीति नसणें, अथवा अट्टाहास नसणें, असल्या सहजतेमधेंच आहे; आणि यामुळेंच ' वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि,' असले लोकोत्तरतेचे नमुने पहावयास मिळतात. चुटकीसरसे दोन दोन कोटींचे खेळ करणाऱ्या, आणि मानधनास विष्टेसारखें लाथाडून टाकणाऱ्या अण्णासाहेबांनाही घराचा तंटा चालला असतां स्वतः पुढें होऊन ' बांध पाहूं भिंत, कोण काय करतो पाहूं दे, ' असें आवेशानें म्हणून त्याप्रमाणें ती बांधून घेण्याच्या हट्टास पेटलेले पाहून कोणास मौज वाटणार नाहीं ? परंतु असल्या तऱ्हेचें बाह्य आचाराविषयीं साभिमान राहणें, अर्वाचीन संभावितांस कसेसेंच वाटतें आणि क्वचित् प्रसंगीं तसला प्रसंग उपस्थित झालाच तर शरीरास त्याचें वळण नसल्यामुळें, साराच ' क्षीण नराचा कोप ' होऊन जातो.

याविषयीं ते नेहमीं म्हणत असत कीं " नुसतें मनांत असून कांहीं उपयोगी नाहीं बाबा; शरीरास त्याचें वळण असावें लागतें. तरच तें ऐन वेळास कामास येतें. असलेली गोष्ट देखील ऐन वेळां बाहेर काढीन, असें म्हणून नुसतें भागत नाहीं, यत्नपूर्वक ती टिकवावी लागते. श्रीगुरुचरित्रांत " पूर्वीं ऋषीमुनीं सकळीं । नित्य पेरूनी पिकविती साळी । ऐसे त्यांचे मंत्र प्रबळी । महातपस्वी पुण्यपुरुष ॥ ( १३ अ. ६५. ). म्हणून सांगितलें आहे, त्यांतील आख्यायिकेंत हाच भाव आहे. स्नानास जातांना ऋषी धान्य पेरीत जात असत, आणि परत येतांना पीक गोळा करीत येत

असत, या पौराणिक कथेचा उल्लेख या ओवींत आहे. धान्याची ही अद्भुत वाढ अर्थातच मंत्रसामर्थ्यानें होत असे. ऋषींना कांहीं खावयास कमी होतें, अथवा असल्या शेतीवरच त्यावेळीं समाजाचा निर्वाह असे, असा मात्र याचा अर्थ नाहीं. व तेवढ्या करितां या कथेवर absurd म्हणून शेरा मारण्याचेंही कारण नाहीं. स्वतःचें मंत्रबल अथवा तपोबल किती कायम आहे, हें अजमावण्याचा हा एक प्रयोग होता, व त्यामुळें ज्याचा त्यास आपला हिशेब समजून येई. सहस्रार्जुनाकडे लक्ष गेल्याबरोबर रेणुकेच्या डोक्यावरील फडक्याच्या मोटेंतून पाणी गळूं लागलें, यांतीलही भावार्थ हाच आहे. सामर्थ्य प्रयत्नांनीं अव्याहत टिकवीत असत, व तसें तें टिकलें आहे कीं नाहा, हें अजमावण्याकरितां असले प्रयोग होत असत. परंतु अशा तऱ्हेची कसलीही कसरत करणें हें आजकाल कर्मापणाचें दगदगीचें अथवा विक्षिप्तपणाचें वाटतें." असो.

यावरून शिक्षण म्हणजे निव्वळ माहिती अथवा पोटापाण्याचा धंदा व तें मुलगा कांहीं वयांत आल्यानंतर द्यावयाचें अशी जी घातुक कल्पना होऊन बसली आहे, तिनें किती अनर्थ केला आहे हें लक्षांत येईल; आणि जर कोणच्याही चळवळी आंग धरून यशस्वी व्हावयाच्या असतील, ज्यास शिक्षण म्हणतां येईल अशा तऱ्हेची शिस्त इतरांस लावण्याचा व तेथें ती फलद्रूप व्हावी म्हणून स्वतःच ती लावून घेण्याचा उद्योग सुरू झाल्याखेरीज, व तोही घरोघरीं लहानपणापासूनच विद्यार्थ्यांस लावल्याखेरीज राष्ट्रीय विद्यालयें हीं यथार्थ रीतीनें नामसार्थ होणार नाहींत. यांत कांहीं ज्यांनीं तीं विद्यालयें आज काढलीं आहेत, अथवा जे तीं चालवीत आहेत, त्यांचा दोष आहे, अथवा त्यांच्या प्रयत्नांची योग्यता कमी करण्याचा रोख आहे, असें मात्र नाहीं. हा सबंध समाजाचा दोष आहे, व सर्व समाजाच्या पापामुळें अशा कांहीं प्रशंसनीय व्यक्तींच्या तपस्याही कशा वाया जातात, हेंच दाखविलें आहे.

सारांश इतकाच आहे कीं राष्ट्रीय शिक्षणाशिवाय देशाचा तरणोपाय नाहीं, व शिक्षण हें कौटुंबिक जीवनाशी नित्यसंबद्ध केल्याखेरीज खरें राष्ट्रीय शिक्षण मिळणार नाहीं, आणि असें राष्ट्रीय शिक्षण केवळ विद्यार्थ्यांनींच नव्हे, तर स्त्रीपुरुष, बाल, तरुण, वृद्ध, ज्या ज्या कोणास खरेंच कांहीं देशाविषयीं वाटत असेल, त्या सर्व वयाच्या सर्व जातींच्या आणि सर्व दर्जांच्या लोकांनीं आपण

होऊन घ्यावयास प्रारंभ केला, तरच कांहीं होण्याची आशा आहे. असें राष्ट्रीय शिक्षण जर सुरू होईल तर, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशीं संबंध असलेलें शिक्षण कोणचें द्यावें, कसें द्यावें, या भाषेंतून द्यावें, कीं त्या भाषेंतून द्यावें, सरकारी शाळांतून द्यावें, कां असहकारी शाळांतून शिकवावें, त्यानें पोटापाण्याचा प्रश्न कसा सोडवावा, शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळींचा नुसता अभ्यासच करावा कीं त्यांत प्रत्यक्ष भाग घ्यावा, स्त्रियांचें व पुरुषांचें शिक्षण सामान्यतः एकच असावें, किंवा त्यांत आमूलाग्र फरक असावा, स्त्रियांस शिक्षण किती द्यावें, व कशा रीतीनें द्यावें, शिक्षणाची वयोमर्यादा काय असावी,— वगैरे प्रश्न मेळ्यांत गाणें गाणाऱ्या पोरांच्या गोफाप्रमाणें अनायासें समाधानकारक रीतीनें सुटतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नं. ......
ता. ......

# इतिहास.

इतिहास वाचणाऱ्यांची अशी ठाम समजूत आहे कीं, शेवटचे बाजीरावसाहेब हा एक अतिशय नादान मनुष्य असून, त्यानें इंग्रज सरकारास मराठी राज्याची देणगी देऊन टाकली. हा समज चुकीचा आहे, असें जर सांगूं लागलें तर आजकाल कोणीही खरें मानणार नाहीं. कारण इतिहासाचीं उपलब्ध साधनें म्हणजे इंग्रज लोकांचे ग्रंथ, सरकारी कागदपत्रें, आणि आमच्या इकडील लेखी माहिती यांपैकीं कोठेंही हा समज चुकीचा आहे असें आढळत नाहीं. बाजीराव हा नादान मनुष्य होता किंवा कसें हा प्रश्न मोठासा महत्त्वाचा नाहीं. तो व्यसनाधीन असला, तरीही कोणत्याही मोगल बादशहापेक्षां अनेक पटीनें बेतांत होता. दुर्बळ होता, असा दोष जर काढला तर स्वराज्यांतील सरदारांचें, प्रजेचें आणि सेनेचें, पाठबळ असतें तर त्याचा दुर्बळपणा कांहीं नुकसान करूं शकला नसता. स्वाभिमानशून्य म्हणावा तर सरदारांनीं खाऊन टाकण्याची वेळ आणल्यामुळेंच त्यानें इंग्रजांस घरांत घेतलें, हें उघड आहे. आणि केव्हांही ही चूक त्याला जाचतच होती. म्हणून जेव्हां पहावें तेव्हां या इंग्रजी मगरमिठींतून सुटण्याची धडपड करीत असतांना तो दिसतो. सरदार लोकांनीं फितूर होऊन त्याला सोडून दिलें होतें. दगलबाजीच्या लाक्षागृहांतच त्याला रात्रंदिवस निजावें लागत होतें, हेंही उघडच आहे. अशा स्थितींत त्रासून जाऊन, " नको ही दगदग आणि राजवैभव, यापेक्षां 'हरी हरी करीत निर्भयतेनें दिवस काढणें बरें, " असें त्यास वाटत असल्यास नवल नाहीं; व त्यामुळें ' त्यानें राज्याची सोडचिठ्ठी दिली, ' या भाषेवर चटकन् विश्वास बसतो. त्यानें सोडचिठ्ठी दिली नसून येथेंही कांहीं उमीचंदी झाली आहे, असें सांगितलें तर तें कोणास खरेंही वाटणार नाहीं. यासंबंधीं बारकाईनें पुरावा गोळा करून अण्णासाहेब यांनीं असें ठरविलें होतें कीं, ही समजूत वस्तुस्थितीस सोडून आहे.

बाजीरावसाहेबांस लबाडीच्या जाळ्यांत गुंतवून तह करण्यास मालकम् साहेबानें कसें भाग पाडलें, याचें मोठें सुंदर वर्णन चित्रमय जगत्च्या एका अंकांत आलें होतें. परंतु तह करण्यास प्रवृत्त करण्यापुरतीच ही लबाडी होती, असें त्यावरून वाटतें. त्यानंतरही वस्तुतः केवढा व्यूह झाला, याची

कोणास कल्पना नाहीं. असें ते म्हणत. वस्तुतः बाजीरावसाहेबानें मालकी हक्क न सोडतां, आणि सर्व राज्याचें दान सपशेल देऊन न टाकतां, इंग्रजांस आपले मुतालीक म्हणून नेमलें होतें. महाराष्ट्रांत माजून राहिलेल्या एकंदर वजवजपुरीपासून जर आपण दूर राहिलों तर स्वराज्यांतील लोकांस पस्तावा होऊन फंद फितूर मोडतील, व आपल्या बाजूचा एकादा पक्ष उत्पन्न होईल, अशा कांहीं विचारानें तो ब्रह्मावर्तास राहण्यास तयार झाला. तेथेंही आपण एक प्रकारें कैदेंतच राहूं अशी त्यास कल्पना आली नाहीं. विश्वासानें इंग्रज लोकांच्या स्वाधीन होणाऱ्या बिचाऱ्या नेपोलियनचा धडा त्यानें वाचला नव्हता. या मुतालिकी-बद्दल इंग्रज सरकारास राज्यांतील प्राप्तीचा दहा आणे हिस्सा मिळावा, आणि ६ आणे बाजीरावसाहेब यांस मिळावे, अशी अट होती. दुसऱ्याही एकंदर वीस अटी होत्या. ज्या तहावरून बाजीरावसाहेब इंग्रजांच्या स्वाधीन झाले, तो अशा स्वरूपाचा होता असें म्हणतात. पुढें हा तह गुलदस्तांत ठेवून हल्लींच्या प्रचारांतील समजुती कशा आल्या, वगैरे ते केव्हां केव्हां सांगत. तें सर्व अंशतःही आतां सांगणें शक्य नाहीं.

या विषयावर त्यांनीं तयारी केली होती. त्यांतील मुख्यमुद्यांत वेळोवेळी झालेला ब्रिटिश नाण्यांच्या ठशांवरील फरक हा एक होता. त्याचप्रमाणें लागलाच थोड्या वेळानें सातारकरांचे पेशवे म्हणून म्हणवून घेण्याची इंग्रजांस वाटलेली आवश्यकता, 'एचिसन्स ट्रीटीज' या पुस्तकांतील किंवा अशाच कोणत्या पुस्तकांतील आवृत्तींतील शब्दांत बाजीरावसाहेब मेल्याबरोबर केलेला फरक, आणि शेवटीं लिटनशाहींत लोकांकडून चक्रवर्तित्वाची पदवी घेण्याची आवश्यकता, वगैरे गोष्टी मुख्य असून या सर्व गोष्टी जरी सहज झालेल्या दिसतात, तरी कायद्याच्या दृष्टीनें त्यांत बारीक धोरण असून त्या जाणूनबुजून केलेल्या होत्या, असें ते मांडून दाखवीत. त्या माहितीवरून रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांनीं एक चोपडें तयार केलें होतें, आणि लवकरच तें प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मानस होता; परंतु अण्णासाहेब यांच्या प्रत्येक गोष्टीप्रमाणें येथेंही मृत्यूच आडवा आला, आणि अंतर्गळाच्या विकारानें जोशीबुवा एकाएकींच वारले. हे कागदपत्र काय झाले असतील कोण जाणे. त्यांचा पुष्कळ शोध करूनही पत्ता लागत नाहीं. या कागदांत त्यावेळीं साताऱ्यास असलेल्या ब्रिग्ज

साहेबाच्या कारस्थानासंबंधीं कांहीं प्रत्यक्ष लेखी पुरावा होता, असें ऐकण्यांत आहे.

पुस्तकांतील फरकासंबंधीं एवढेंच आठवतें कीं, ‘ Propositions made to Bajirao and accepted by him ’ असे शब्द मूळ १८३५ किंवा अशाच कांहीं सालांत छापलेल्या प्रतींत होते. बाजीरावसाहेब यांच्या मृत्यूनंतर लागलीच जी प्रत बाहेर पडली, त्या प्रतींत, ‘ and accepted by him’ एवढेच शब्द नेमके गाळून टाकण्यांत आले. या शब्दांचें महत्त्व काय होतें, हें सांगणें आमच्या आटोक्याबाहेर आहे. आणि त्यांनीं थोडक्यांत सांगितलेली विचारसरणीही लक्षांत नाहीं. परंतु राजनीतिनिपुण अशा कायदेपंडिताच्या तें कदाचित् लक्षांत येईल. याशिवाय आणखी कांहीं फरक त्या पुस्तकांत आहेत कीं काय हें माहीत नाहीं. मूळ तह अशा स्वरूपाचा असून वीस खंडांचा होता व ती एक प्रकारची खंडचिठ्ठी होती, असें, त्यावेळीं वाड्यांत जात असलेल्या भाऊसाहेबांच्याकडून त्यांच्या कानावर आलें. मुंबईस असतांना मूळ प्रत त्यांनीं वाचली होती; परंतु तेव्हां या गोष्टीकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं. परंतु पुढें सांगलीकर, जंजिरेकर, डफळापूरकर वगैरे संस्थानिकांचीं अपिलें लिहितांना पुस्तक पुन्हा वाचण्यांत आलें, आणि त्यामुळें दोन आवृत्तींतला फरक लक्षांत आला. रा. ब. जोशांचे कागद सुदैवानें पुढें मागें सांपडल्यास इतिहासाला मोठीच मदत होईल. तोंपर्यंत जुन्या लोकांतील आख्यायिका म्हणून हा भाग लक्ष्यांत ठेवावयास तरी हरकत नाहीं.

---

# खंड ४ था.

# परिशिष्ट.

श्री अण्णासाहेब पटवर्धन यांचें चरित्र अगदीं त्रोटक लिहावयाचें म्हटलें तरी त्यांच्याशीं विशेष संबंध असलेल्या कित्येक व्यक्तींसंबंधीं निदान चार ओळी तरी लिहिल्याखेरीज तें पुरें झालें, असें कधींच होणार नाहीं. निवळ कोंदणावरून देखील आंतील खडा काय किंमतीचा असावा, याचा अंदाज करतां येतो; त्याचप्रमाणें एकादें नररत्न ज्या माणसांच्या प्रभावळींत चमकतें, त्यांच्या योग्यतेवरून देखील त्याचें त्याचें महत्त्व जास्त लक्षांत येतें; म्हणून श्रीअण्णासाहेब यांच्या आयुष्याशीं विशेष संबंध आलेल्या अथवा त्यांच्या तोंडून विशेषपणानें ऐकलेल्या अशा कांहीं थोड्या व्यक्तींची माहिती त्रोटकपणानें द्यावयाचें या भागांत योजिलें आहे.

## श्री. तात्यासाहेब रायरीकर.

श्री. अण्णासाहेब यांच्या आयुष्याशीं महत्त्वाचा संबंध असलेले पहिले गृहस्थ श्रीमंत तात्यासाहेब रायरीकर हे होत. तात्यासाहेब यांचे पूर्वज इतिहासप्रसिद्ध सरदार चिंतो विठ्ठल रायरीकर हे बारभाईंच्या कारस्थानांत श्रीमंत दादासाहेब यांच्या पक्षांत असून, स्वजातीयांविरुद्ध इंग्रज सरकारची मदत घेण्याचा धडा राघो भरारींना त्यांनींच शिकविला असें म्हणतात. तात्यासाहेब यांचेंही नांव चिंतो विठ्ठलच होतें. आपल्याच नांवाच्या आपल्या पूर्वजानें केलेला हा द्रोह तात्यासाहेब यांच्या अंतःकरणांत अखंड सलत होता; व आपली जहागीर ही स्वजनद्रोहाचें पारितोषक म्हणून ब्रिटिश सरकारनें राखलेली आहे, ही गोष्ट त्यांच्या अंतःकरणांस लागून राहिली होती. या थोर पुरुषास अशी सहजच बुद्धि झाली कीं, कांहीं तरी उपायानें कुळास लागलेला हा डाग धुऊन टाकावा; व तेवढ्याकरितां त्यांचें अंतःकरण रात्रंदिवस तळमळत असे. उत्तम प्रकारच्या श्रीमंतींत असूनही चितोडच्या प्रतापसूर्याप्रमाणें तात्यासाहेब यांनीं आपलें आयुष्य केवळ संन्यस्तवृत्तीनें घालविलें. तात्यासाहेब यांचा स्वभाव अतिशय स्वाभिमानी, मोठा कडक, दृढनिश्चयी व तेजस्वी होता. एकदां जो निश्चय अंतःकरणानें ठरला तो ठरला. सर्व सुखोपभोगाचा त्याग करून केवळ भुईमुगाच्या आहारावर त्यांनीं कडक तपश्चर्या केली. जावत्काल-

पर्यंत हिंदुस्थानदेशावर परकीयांचें राज्य आहे, तावत्कालपर्यंत दूध तूप देखील तोंडांत घालावयाचें नाहीं, असा त्यांचा निर्धार होता. अशा प्रकारें आयुष्य कंठीत असतां त्यांना एक मार्गदर्शकही भेटला.

पुण्यास ओंकारेश्वराजवळ पावसाळी स्मशानांत दोन समाधी आहेत. जिच्यावर पत्र्याची छाया आहे, ती श्रीपादस्वामींची, व उघड्यावर औदुंबराजवळ असलेली ती नरहर स्वामींची. हे नरहरस्वामी म्हणजे त्यावेळचें पुण्यांतलें मोठेंच प्रस्थ होतें. यांचा अधिकार अतिशय मोठा असून शरीर अक्कलकोटच्या स्वामींसारखें धिप्पाड होतें, व त्या स्वामींप्रमाणें हेहि बहुतेक दिगंबर स्थितींत पिशाच्चवृत्तीनें असत. यांचा स्वभाव फारच तापट व कडक होता, व अक्कलकोटच्या स्वामींप्रमाणेंच जें दिसेल तें लहरीप्रमाणें उघड बोलून टाकण्याची त्यांना संवय होती. त्यामुळें वाटेल तशा वर्तनाच्या स्त्रीपुरुषांची त्यांच्या समोर जाण्याची सोयच नसे. असा त्यांचा सर्वांस धाक होता. बंडानंतर थोडेच दिवसांनीं म्हणजे शके १७८७ च्या आषाढ व॥ ४ थीस हे समाधिस्थ झाले. या सत्पुरुषाच्या कृपेनें तात्यासाहेब यांसही योग्य दिशा लागून त्यांनीं २॥ वर्षेंपर्यंत कांहीं विशेष अनुष्ठान केलें. अनुष्ठानसमाप्तीनंतर त्यांस इष्ट देवतेचें दर्शन होऊन वरप्रसादही झाला. परंतु तात्यासाहेब यांस देशाच्या स्वातंत्र्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही वराची अपेक्षा नसल्यामुळें त्यांनीं अस्त्रप्राप्तीची याचना केली. तेव्हां जगदंबेनें त्यांस खड्ग देऊन आशीर्वादही दिला. परंतु त्याच वेळेस सांगितलें कीं ' याच्या उपयोगाची वेळ टळून गेली आहे, सध्यां उपयोग होणार नाहीं, तरी पण वर दिला आहे, तो पुढें फलद्रूप होईल. तात्यासाहेब यांच्या मनांत अस्त्रसंपन्न होऊन उत्तर हिंदुस्थानांत जावयाचें होतें, व पेशव्यांस हातीं धरून स्वराज्यप्राप्तीसाठीं इंग्रजांशीं युद्ध खेळावयाचें होतें.

अनुष्ठानसमाप्तीनंतर लागलीच त्यांना असें समजलें कीं उत्तरेकडील बंडाचा मोड होऊन सर्वच मसलत फसली आहे. तरी पण हिंदुस्थानांत जाण्याचा निश्चय करून ते निघाले. परंतु तेवढ्यांत ती बातमी फुटून पंढरपुरास पोहोंचतात न पोहोंचतात तोंच ते पकडले गेले. पुण्यास आणल्यावर लष्करी कोर्टापुढे त्यांची चौकशी होऊन त्यांस तोफेच्या तोंडीं द्यावयाचें ठरलें. परंतु पुण्याचे त्यावेळचे कले-

क्टर डेव्हिससाहेब हे तात्यासाहेब यांची योग्यता जाणून होते. असा थोर पुरुष फुकट मारला जावा, हें बरें न वाटून त्यांनीं तात्यासाहेब यांच्याकरतां मध्यस्थी केली, व सरकारास कळविल्याखेरीज पुण्याच्या बाहेर पाऊल टाकावयाचें नाहीं, या एका अटीवर तात्यासाहेब यांची सुटका झाली. तात्यासाहेब ही अट पाळतील अशी जामीनकी खुद्द डेव्हिससाहेबानें घेतल्यावरून त्यांना अजीबात सोडून देण्यांत आलें. त्यानंतर कांहीं दिवस रोज एक वेळ डेव्हिससाहेव रायरीकरांकडे जाऊन तात्यासाहेब यांचा शोध घेत असत, परंतु तात्यासाहेब यांनीं त्यांस निक्षून सांगितलें कीं, ' साहेव, आतां आपण रोज तसदी घेऊं नये; माझा शब्द केव्हांही खोटा होणार नाहीं ' त्यावरून साहेबाच्या मागचा त्रास सुटला. पुढें लौकरच नरहरस्वामी समाधिस्थ झाले, व तात्यासाहेब यांच्या अंतःकरणाची तळमळ तशीच राहून गेली. त्यामुळें साधुसंत संन्याशी यांची सद्भावानें सेवा करावी, व कुणा तरी प्राप्त पुरुषाचा आपल्यावर अनुग्रह व्हावा, असें त्यांस सहजच वाटे. अशामुळें अनेक खऱ्या खोट्या लोकांचा सहवास घडल्यावर, व बराचसा अनुभव आल्यावर, महाराज श्रीनरसिंव्हसरस्वती यांची व तात्यासाहेब यांची गांठ पडली, आणि हळू हळू तात्यासाहेब यांची निष्ठा त्यांचे ठिकाणीं जडली, व त्यांच्याकरतां म्हणून महाराज पुण्यास राहूं लागले. तेव्हां साहजिकच तात्यासाहेब यांच्या परिवारांतील इतर मंडळींचा व महाराजांचा संबंध जडला

कोणीही कर्तृत्ववान् पुरुष कार्य करण्यास निघाला म्हणजे पहिली आवश्यक गोष्ट त्याला अशी होते कीं, होतकरू अशा तरुणांचें मंडळ भोंवतीं जमवावें लागतें. यशापयशाची गोष्ट वेगळी आहे, परंतु माणसाच्या कर्तेपणाची ही खूण आहे. होतकरू अशा तरुणांचें मंडळ ज्याच्या भोंवतीं अधिक आहे, व सहज जमतें त्याच्या अंगांत बोलण्यापलीकडे कांहीं तरी कर्तृत्व आहे, म्हणून खास समजावें. अशाच प्रकारें तात्यासाहेब यांच्या जवळही कांहीं तरुण लोक होते, त्यांतच अण्णासाहेब हे प्रमुख होते. अण्णासाहेब यांचेवर त्यांचा लोभही विशेष होता,, व त्यांच्या गुणांची आणि योग्यतेची पुरी पारख झाल्यामुळें वयानें लहान असूनही तात्यासाहेब यांना बरोबरीच्या नात्यानें वागवीत. अण्णासाहेब यांच्या ठिकाणीं राज-

कारणी पुरुषाचीं मुळचीच बत्तीस लक्षणें जरी होतीं, तरी देखील त्यांचा योग्य विकास होऊन तीं कार्यक्षम होण्यास तात्यासाहेब यांचा सहवासच कारणीभूत झाला; किंबहुना मागील एका प्रकरणांतील दृष्टांताच्या भाषेनेंच बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, ज्याप्रमाणें शिवछत्रपतींचे दादोजी कोंडदेव त्याचप्रमाणें अण्णासाहेब यांचे तात्यासाहेब. राजकारणाचें सर्व प्रकारचें शिक्षण तात्यासाहेब यांच्या अनुभवांसह अण्णासाहेब यांनीं त्यांच्यापासून मिळविलें; आणि त्यामुळें स्वराज्यांतील मूळ राजकारण आणि अण्णासाहेब यांचा संबंध केवळ ऐतिहासिक नसून एक प्रकारचा जिवंत होता.

स्वराज्यांतील मूळ राजकारण, पेशवाईच्या अखेरीस झालेल्या राष्ट्रीय अधःपातामुळें त्याचा झालेला चुथडा, आणि इंग्रजांचे प्रतिस्पर्धी खरें व दिखाऊ राजकारण या सर्वांशीं त्यांचा एक प्रकारचा असा सजीव संबंध प्रत्यक्ष आल्यामुळें, अण्णासाहेब यांच्या व तात्कालीन महादेव गोविंद वगैरे इतर पुढाऱ्यांच्या राजकीय वगैरे सर्व विचारपद्धतींत येवढें मोठें अंतर पडलें. राष्ट्रीय अधःपातामुळें पानिपतानंतर मराठ्यांच्या मूळ राजकीय धोरणांत फरक पडून शेवटीं शेवटीं तर स्वार्थापलीकडे व स्वसंरक्षणापलीकडे कांहीं राजकीय धोरण म्हणून महाराष्ट्रांत आहे किंवा नाहीं, असें वाटण्याइतकी स्थिति आली, तरी देखील व्यक्तिशः सर्व प्रकारचें शहाणपण ठिकठिकाणीं जिवंत होतें, व त्यामुळें खरोखर काय होतें, काय व्हावयास पाहिजे होतें, परंतु झालें काय, कसें झालें, काय चाललें आहे, व याचें पुढें काय होईल, याचें गणित सोडविण्यास साधन होतें. या साधनाचा उपयोग अण्णासाहेब यांनीं नीट करून घेतल्यामुळेंच इंग्रज लोकांच्या राष्ट्रीय व राजकीय प्रकृति, आणि स्वकीयांच्या परिस्थितीचें व बलवीर्योत्साहाचें फार सूक्ष्म ज्ञान त्यांस होतें. त्यांच्यामध्यें व इतर पुढाऱ्यांत हाच मोठा फरक होता. केवळ स्वतःच्या अंतःकरणप्रवृत्ति व इंग्रजांपासूनच मिळाविलेलें इंग्रजांच्या राष्ट्रीय व राजकीय प्रकृतींचें ज्ञान, आणि स्वकीयांविषयींचें विज्ञान यांत पुष्कळसा लंगडेपणा रहाणारच. असो. तात्यासाहेब यांच्यापासून अण्णासाहेब यांस सर्वांत मोठा फायदा झाला तो हाच.

श्रीमहाराजांचें ठिकाणीं विश्वास जडल्यावर तात्यासाहेबांनीं अण्णासाहेबांची व त्यांची ओळख करून दिली. महाराजांची गांठ पडल्यावरही तात्यासाहेब यांचें

तपाचरण यथापूर्व चालूच होतें. पुढें त्यांचें शरीर थकल्यावर अंतकाळ जवळ आला असें समजून संन्यास घेण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. तेव्हां महाराजांनीं त्यांना संन्यास दिला. असें सांगतात कीं, त्या वेळेस तात्यासाहेबांची स्थिति अगदीं आसन्न झाली होती. सर्व विधि झाल्यावर महाराजांनीं चमच्यांत दूध घेऊन त्यांच्या तोंडाशीं नेलें, व 'आ करा,' म्हणून सांगितलें. तेव्हां मनास मोठे क्लेश होऊन तात्यासाहेब म्हणाले कीं, 'हें आपण काय देतां? माझें व्रत ठाऊक नाहीं कां?' त्यावर महाराजांनीं सांगितलें कीं, 'मला माहीत आहे, परंतु तात्यासाहेब आतां तुम्ही नारायणरूप झालां, राग-द्वेष टाकून द्या.' तेव्हां डोळे पाण्यानें भरून येऊन मोठ्या आवेशानें त्यांनीं सांगितलें कीं, 'महाराज, असें असेल तर हा तुमचा संन्यास मला नको. तो आपला परत घ्या कसा? माझें व्रत पूर्ण झालेंच पाहिजे.' असें बोलून त्यांनीं दूध घेण्याचें साफ नाकारलें. तेव्हां मोठा संतोष होऊन महाराजांनींही सांगितलें कीं, 'तात्यासाहेब, तुमची खरोखरच धन्य आहे. तुमचें व्रत पूर्ण झालें. तुमच्या हातूनच हें कार्य पुढें होईल. आतां हा प्रसाद घ्या.' तात्यासाहेब यांची महाराजांचे ठिकाणीं विलक्षण निष्ठा होती. त्यांच्या तोंडून निघालेलें हें आश्वासन ऐकून, तात्यासाहेब यांस अतिशय संतोष झाला, व त्यांनीं मोठ्या आनंदानें 'नारायण' म्हणून तें दूध प्राशन केलें. महाराजांनाही मोठा आनंद होऊन जमलेल्या मंडळींत तात्यासाहेबांची त्यांनीं अतिशय प्रशंसा केली. या वेळेस गाडींत बसून महाराजांस कोठें बाहेर जावयाचें होतें. परंतु तो बेत रहित करून त्यांनीं बैठक टाकण्यास सांगितलें, व 'यशवंतराव भेटीस येत आहेत' म्हणून सांगितलें. असें थोडें बोलणें चालणें होत आहे तोंच यशवंतराव ऊर्फ देवमामलेदार तेथें येऊन पोहोंचले. नमस्कारचमत्कार झाल्यावर महाराजांनीं तात्यासाहेबांचें गुणवर्णन करून सांगितलें कीं 'यशवंतराव! तात्यासारखा मनुष्य होणार नाहीं. गृहस्थाश्रमी मंडळींत तात्यासाहेब यांचा नंबर पहिला. यावज्जन्म तोंडांतून असत्यवाणी म्हणून निघालीच नाहीं,' वगैरे पुष्कळ प्रशंसा केली. अण्णासाहेब त्यावेळीं जवळच होते, ते सांगत कीं हें सर्व ऐकून यशवंतरावांनाही फार वाईट वाटलें, व डोळ्यांत अश्रु आणून त्यांनीं प्रार्थना केली कीं 'महाराज, तात्यासाहेबांचें तर सार्थक झालें, पण आतां या शरीराचें काय करणार? एक तर आतां पुरें तडीस लावा, नाहीं तर

आपल्या हातानें कोठें तरी आडांत लोटून द्या. ' त्यावर महाराजांचा व त्यांचा कांहीं एकांत होऊन देवमामलेदार अतिशय समाधानानें परत गेले. देवमामलेदार यांस श्रीनरसिंहउपासना पूर्वी केव्हां तरी महाराजांनींच दिलेली होती, ही गोष्ट कोणास फारशी ठाऊक नाहीं.

वरील प्रसंग झाल्यानंतर लवकरच केव्हां तरी, किंवा कदाचित् वरील प्रसंगींच महाराजांनीं त्यांना परोपकार करण्याविषयीं आज्ञा केली, असें महाराजांस आलेल्या त्यांच्या एका पत्रावरून दिसतें. ही आज्ञा त्यांनीं जन्मभर कशा कसोशीनें पाळली, व पुढें त्यांचा अधिकार वाढून मोठा लौकिकही कसा झाला, वगैरे गोष्टी प्रसिद्धच आहेत. असो, यानंतर तिसरे दिवशीं तात्यासाहेबांनीं देह ठेविला. नरहरस्वामींच्या समाधीला लागूनच ओंकारेश्वरासमोरील पडवीच्या मागें तात्यासाहेब व त्यांचें चिरंजीव यांच्या समाधी आहेत. स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां अखंड तळमळणाऱ्या या महात्म्याची आठवण आज जरी पुण्यास नसली, तरी त्यांची तपश्चर्या, त्या ठिकाणीं सदैव जागृत असली पाहिजे; व जेव्हां केव्हां ऊर्जितकाल यावयाचा असेल, तेव्हां देशोद्धारक वीरांना अनुकूल अशा गुणसंपत्तीची प्रेरणा व पुरवठा तेथून होईल, यांत संशय नाहीं. परमार्थी जिवापेक्षांही देशवीराचें महत्त्व अधिक मानणाऱ्या आधुनिक लोकांनीं तर तात्यासाहेब यांच्या समाधीचें दर्शन नित्य नेमानें घेतलें पाहिजे.

तात्यासाहेब यांचा बांधा बळकट परंतु ठेंगू होता. वर्णानें गौर व तेजस्वी असून स्वभाव फार तापट होता. रायरीकरांच्या वाड्यांत एका लहानशा ग्रूपमध्यें त्यांचा एक फोटो पाहण्यांत आला. त्यावरून त्यांच्या चेहऱ्याची ठेवण आणि गंडस्थळें वगैरे अवयवांवरून त्यांची बुद्धिमत्ता व धोरण यांचाही बोध होतो. मनुष्यस्वभावाची पारख व शालिहोत्र म्हणजे अश्वविद्या यांच्यांत त्यांचा हातखंडा असे. घोड्यांच्या सर्व प्रकारच्या जाति, त्यांचे गुणधर्म, इष्टानिष्ट, त्यांना वागविण्याच्या व शिकविण्याच्या युक्त्या वगैरे सर्व गोष्टींची त्यांना फार बारीक माहिती होती. घोड्यांच्या रोगांसंबंधाचें व चिकित्सेचेंही ज्ञान चांगलें होतें. सर्कसींमध्यें घोड्यांच्याकडून जीं कांहीं कौशल्याचीं कामें करून घेतलीं जातात, तसलीं करणाऱ्या लोकांस, पूर्वी, चाबुकस्वार म्हणत असत. तात्यासाहेब हे त्या सर्व कलेंत मोठे निष्णात होते. त्यांचा बांधा ठेंगणा होता,

हें वर सांगितलेंच आहे. अण्णासाहेब सांगत कीं मयूरासनावर नित्य तीन तास अभ्यास केल्यामुळें त्यांच्या पाठीस पोंक आलें होतें, व त्यामुळें त्यांची देहयष्टी वांकून ते अधिकच ठेंगणे दिसत. तात्यासाहेब यांचा फोटो या पुस्तकाबरोबर दिलेला आहे त्यांतही पोंक थोडेंसेसें दिसून येतें.

# श्रीनरसिंहसरस्वती महाराज.

श्रीअण्णासाहेब यांच्या चरित्राशीं अत्यंत महत्त्वाचा संबंध असलेली दुसरी एक व्यक्ति महाराज श्रीनरसिंहसरस्वतीस्वामी हे होत. यांचें थोडेसें वर्णन पूर्वी एका प्रकरणांत आलेंच आहे. त्यावरून थोडीशी माहिती लक्षांत येईल. तात्यासाहेब यांच्या निमित्तानें अण्णासाहेबांची व त्यांची गांठ पडली, व एकदां जो ऋणानुबंध जडला तो उत्तरोत्तर दृढ होऊन पुढें पुढें तर अण्णासाहेब व महाराज श्रीनरसिंहसरस्वती हे एकरूपच होऊन गेले. तात्यासाहेबांच्यामुळें परिचय होण्यापूर्वी महाराजांची व अण्णासाहेबांची गांठ पडली होती, असेंही ऐकण्यांत आहे. जटामंडित अशा वेषानें भिक्षेच्या निमित्तानें वाड्यांत येऊन महाराज चौकांत बाकावर बसले होते. व अण्णासाहेबांची आणि त्यांची दृष्टादृष्ट होऊन कांहीं थोडेसें विशेष भाषण होऊन एकमेकांची खूण एकमेकास पटली, अशीही हकीकत ऐकण्यांत आली. तें कांहींही असलें तरी तात्यासाहेबानीं त्यांची व महाराजांची ओळख करून दिली, असेंच त्यांच्या बोलण्यांत येत असे, व महाराजही तात्यासाहेबांची मंडळी म्हणूनच त्यांना ओळखत. पाहिल्यापासूनच महाराजांचा त्यांच्यावर अतिशय लोभ असून 'दादा' म्हणून नेहमीं त्यांस हांक मारीत; अथवा भाषण वगैरे करतांना ' राजा ' अशा शब्दांनीं संबोधीत. ' ही मंडळी म्हणजे आमचें लष्करी खातें आहे, ' ' इकडचा डोंगर तिकडे उचलून ठेवण्याचें काम यांच्याकडें आहे, ' 'हा कृतयुगाचा कंटक आहे, ' अशा तऱ्हेच्या शब्दांनीं ते नेहमीं त्यांचें कौतुक करीत.

अण्णासाहेब यांच्या स्वभावाप्रमाणें त्यांचा आणि महाराजांचा जो संबंध आला, त्याला सुरुवात एक प्रकारच्या कलहांतच झाली. यांची बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व दांडगें असल्यामुळें, आणि त्याला जोडूनच व्यासंग व अवलोकन हींही प्रचंडच असल्यामुळें उगीच कोणी कांहीं एकाद्या विशेष गोष्टीनें त्यांना भारून टाकावें हें शक्य नव्हतें. महाराजांचा बहुरंगीपणा प्रसिद्धच आहे. त्यामुळें अनेक लोक त्यांना आपापल्यापरीनें वेगवेगळया रीतीनें ओळखत. कोणाच्या दृष्टीनें ते एक अलौकिक विद्वान् होते; कोणी त्यांना अतिशय रंगेल म्हणत, कोणाच्या दृष्टीनें उत्तम भगवद्भक्त, उत्तम योगी, दांडगे मंत्रशास्त्री,

अथवा अतिशय धूर्त व व्यवहार-पटु असा सामान्य माणूस, असे अनेक समज त्यांच्याविषयीं होते; अशा स्थितींत त्यांच्याविषयीं वाईट समज असणें जरी शक्य नव्हतें, तरी एकदमच अतिशय उच्च भावना झाली असेल हें संभवत नाहीं. ' महाराज नरसिंहसरस्वती म्हणजे प्रत्यक्ष देव, परमात्मा अशी आपली खात्री एकदम झाली नाहीं; पहिल्यांदा कोणी विद्वान्, योगाभ्यासी अथवा सिद्ध पुरुष असले कांहीं वाटत होतें. पुढें हळूहळू जसजसा, अनुभव आला, तसतशी ही समजूत पालटून महाराज म्हणजे प्रत्यक्ष देवच अशी खात्री झाली,' असें ते नेहमीं सांगत. त्यामुळें पहिल्यापहिल्यांदा महाराजांनीं कांहीं म्हणावें व यांनीं तसें मुद्दाम करूं नये, ज्या त्या गोष्टींत महाराजांशीं वाद घालावा व महाराजांनीं हळूहळू युक्तीयुक्तीनें यांना इष्ट त्या वळणावर आणून सोडावें, अशी ' लठ्ठालठ्ठी ' फार चाले. परंतु ही स्थिति फार टिकली नसावी. महाराजांच्या कांहीं गोष्टींवरून येथें अपार्थिव ज्ञान आणि सामर्थ्य आहे, एवढी तर त्यांची फारच लौकर खात्री झाली, व त्यामुळें व विशेषतः महाराजांनीं त्यांचेवर जो लोभ केला त्यामुळें अण्णासाहेब हे पुरते ओढले गेले.

आळंदीस राहूं लागल्यानंतर महाराजांनीं पहिली गोष्ट अशी केली कीं तेथील लोकांत भजनाची गोडी उत्पन्न करून नादब्रह्मानें आळंदी क्षेत्र आनंदमय करून सोडलें. स्वतः महाराज यांची स्थिति अशी होती कीं ' श्रीविठ्ठल ' नामाचा गजर ५।१० मिनिटें कानांत पडला कीं त्यांचें देहभान हरपून जात असे व शरीर लाकडासारखें होऊन जाई. त्यांच्या रंगेल राहणीमुळें व विनोदी-वृत्तीमुळें आळंदीचे लोक देखील प्रथमतः त्यांच्या विरुद्ध होते व प्रारंभीं महाराजांना बराच त्रासही झाला परंतु पुढें पुढें सर्वांची महाराजांवर श्रद्धा बसली, व त्या टवाळ लोकांना हातीं धरूनच महाराजांनीं आळंदीचें प्रख्यात भजनमंडळ निर्माण केलें. लोकांत नाच तमाशे वगैरेंची आवड जास्त. परंतु हळू हळू नाच तमाशे बंद होऊन त्याच लोकांची भजनावर आवड बसली, व त्याच्या जोडीस नाथभागवत ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांच्या द्वारें महाराजांनींही त्यांना धर्मज्ञान दिलें. या सर्व काळांत बहुतकरून महाराज केव्हां पुण्यास तर केव्हां आळंदीस असत. अण्णासाहेब पुण्यास आले म्हणजे त्यांच्या दर्शनास जात. त्यांचा नेम असा होता कीं रात्रीं दर्शनास जावें. संध्याकाळच्या सुमारास पुण्याहून निघून व दर्शन वगैरे करून पहाटेस पुन्हा परत येत. बाहेर दिसावयास

संबंध 'लठ्ठालठ्ठी'चा होता, परंतु महाराजांच्या विषयीं एवढी पूज्यबुद्धि होती कीं श्रीमंती थाटानें कधीं त्यांच्या समोर गेले नाहींत. गेल्याबरोबर आधीं खालीं रेशीमकाठी धोतर सोडून ठेवावयाचें, व साधीं वस्त्रें परिधान करून महाराजांसमोर जावयाचें असा परिपाठ होता; व बहुतकरून इतर कोणासमोर त्यांचें व यांचें भाषण होत नसे. व इतर लोकांच्या दृष्टीस यांची 'लठ्ठालठ्ठी' तेवढीच पडे. त्यामुळें यांच्या संबंधाचें खरें स्वरूप पहिल्यापासूनच काय होतें, याविषयीं चांगल्या सांप्रदायिकांतही मोठे गैरसमज आढळून येतात. पुण्याची गंमत अण्णासाहेब सांगत असत, कीं, पुराणास येणारे लोक बहुतकरून नुसते माना हालविणारेच असावयाचे. व महाराजांच्या वास्तविक स्वरूपाकडे कोणाचेंही लक्ष नसावयाचें. एकदां कांहीं सांगितल्यावर महाराजांनीं यांना विचारलें 'दादा, काय समजलें ?' त्यावर अण्णासाहेब यांनीं जबाब दिला 'दोन गोष्टी कळल्या; एक तर कांहीं समजत नाहीं हें समजलें, व दुसरें समजलें म्हणून माना डोलविणारे हे सारे लोक किती लबाड आहेत, तें लक्षांत आलें.' त्यावरून रागावल्यासारखें करून महाराजांनीं त्यांना पुराणांस येण्याची व बोलण्याची मनाई केली. अण्णासाहेब सांगत 'अशी मौज नेहमींच चाले. त्यांनीं पुराणास येऊं नको म्हणून म्हणावें, दोन दिवस आपण जाऊं नये, मग 'कां येत नाहीं' म्हणून त्यांनींच चौकशी करावी, तेव्हां 'दादाला आतां पुराणास येऊं द्या, तो आतां मधें मधें बोलणार नाहीं,' अशा तऱ्हेची मध्यस्थी तात्यासाहेबांनीं करावी; परंतु पुराणास गेले कीं दोघांचा कांहींना कांहीं वाद व्हावाच,' असें ते नेहमीं सांगत. ही लठ्ठालठ्ठी अर्थातच वरवर होती.

महाराज आळंदीस एकंदर १२ वर्षें राहिले, व तेथें त्यांनीं अनेक चमत्कारही केले. त्यांतील १।२ चमत्कारांचा उल्लेख मागें केलाच आहे. " भिकाऱ्यासारिखा स्वरूपें । उदंड करी गुप्तरूपें । " अशी त्यांची वृत्ति होती; फरक एवढाच कीं राहणी रंगेल व थाटामाटाची असे. त्याच्यामुळें त्यांच्याविषयीं चमत्कारिक ग्रह असलेले लोकही पुष्कळ आढळत. त्यांच्या १२ वर्षांतील समग्र लीला ५।४ पानांत सांगणें शक्य नाहीं. त्याच्याकरितां अक्कलकोट स्वामींच्या चरित्रासारखें वेगळें चरित्रच लिहिलें पाहिजे. ब्रह्मसमंधास मुक्ति देणें, एका रात्रींतून २०।२५ हजार पान जेऊं घालणें, एकाच वेळीं अनेक ठिकाणीं असणें, मृतसंजीवन

वगैरे प्राप्त पुरुषाच्या हातून सहज घडणारे सर्व चमत्कार यांच्या हातूनही झाले. परंतु या चमत्कारांच्या मुळेंच महाराजांवर अण्णासाहेब यांची श्रद्धा बसली असें नाहीं. पूर्वी सांगितलेला लिंबकाच्या मुंजीचा चमत्कार व असेच दुसरे कित्येक चमत्कार पाहिल्यावर देखील, तात्यासाहेब कर्वे यांच्याकडून श्रीगजाननोपासना त्यांनीं घेतली, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. कशाही रीतीनें कां होईना महाराज हे विद्वान्, चमत्कार करणारे, कोणी सिद्ध पुरुषच नसून, सर्व भूतांच्या ठिकाणीं प्रत्यगात्मा साक्षी, जीव, चैतन्य, प्राण इत्यादि प्रकारानें प्रगट होणारे सकल भूतभव्यभवत् गोचरागोचर वस्तुमात्ररूपधर परमेश्वरच होत, अशी त्यांची खात्री झाली. आणि तेव्हांपासून महाराज हा त्यांच्या भाषेंत वरील सर्व भावनांचा पर्याय शब्द बनला.

अण्णासाहेब मद्रासहून आल्यावर महाराज लौकरच शांत झाले, तरी पण अण्णासाहेबाच्या दृष्टीनें ते जसेच्या तसे अखंड आहेतच. फक्त दुसऱ्यास त्यांचें सहज दर्शन घेतां येत नाहीं, इतकेंच. त्यामुळें महाराजांची पूजा करणें, नैवेद्य दाखविणें, वगैरे कामें त्यांच्या दृष्टीनें केवळ संकल्पमय नसून प्रत्यक्षच होतीं. प्रत्येक वेळेस महाराजांस नमस्कार करणें, प्रत्येक वस्तु महाराजांच्या पायास लावणें, वगैरेंची दुसऱ्यास मोठी मौज वाटे, परंतु जिवंतभाव कसा असतो, याचें तें मूर्तिमंत उदाहरण होतें. किंबहुना महाराजांची तसबीर अशी त्यांना कधी वाटतच नसे. एकदां बोलतांना सहज 'महाराजांची ती तसबीर आहे,' असें एक गृहस्थांच्या बोलण्यांत आलें. त्याबरोबर मोठ्या आवेशानें ते एकदम म्हणाले 'मूर्खा तसबीर कोठली ? प्रत्यक्ष महाराज आहेत !'

तसेंच महाराजांच्या तसबिरीचा फोटो काढवितांना असेंच झालें. महाराज असतांना त्यांचा फोटो काढवावा म्हणून त्यांच्या बड्या बड्या शिष्टमंडळींची खटपट चालली होती. काहीं केल्या महाराज रुकार देईनात. तेव्हां एकदां त्यांना फसवून त्यांचा फोटो काढवावा, असा बूट निघाला. व श्रीमंत बाबासाहेब सांगलीकर यानीं फिरावयाच्या निमित्तानें महाराजांस त्यावेळचा पुण्यांतील सुप्रसिद्ध फोटोग्राफर नौरोजी याचेकडे नेलें. महाराजांस स्टुडिओंत नेऊन बसवितांच सारा प्रकार त्यांच्या लक्षांत आला. परंतु ते नेहमींप्रमाणेंच हास्यमुद्रेनें स्वस्थ बसले. इकडे फोटोग्राफरनें

फोटो घेण्याचा प्रयत्न केला तों काय दरवेळेस त्याची काचच खराब होऊन जाई. बाबासाहेबही हट्टास पेटले. १०।१५ काचा वाया गेल्या, परंतु फोटो कांहीं निघेना. बाबासाहेबांसारख्या श्रीमंत माणसानें आणलेलें काम, आणि कारागीर या नात्यानें असलेला पूर्वीचा स्वतःचा लौकिक यामुळें त्या फोटोग्राफरास अतिशय खेद झाला. तेव्हां 'शेटजी, तुह्मीं कां वाईट वाटून घेतां हा आमच्या चेहऱ्याचाच गुण आहे, त्याला तुम्हीं काय करणार ? आज वेळ नाहीं, येईल एकादे वेळेला.' असें त्यांचें समाधान करून महाराज परत फिरले. शांत होण्यापूर्वीं थोडे दिवस एकदां महाराजांनीं आपण होऊन बाबासाहेबांस सांगितलें कीं, 'चला, आपण नौरोजीकडे जाऊं. त्याला त्यादिवशीं मोठें वाईट वाटलें.' व लागलींच नौरोजीकडे जाऊन त्यांनीं स्वतःचा फोटो काढविला. त्याचवेळीं एकामागून एक असे आसनमांडी घालून बसलेले, उघडी लंगोटीचा, व दरबारी थाटांत बसलेले अशा तीन अवस्थांचे फोटो काढविले. त्यावरूनच आज असलेले सर्व फोटो निघाले आहेत. परंतु प्रतींवरून प्रती झाल्यामुळें मूळच्या सारखेपणांत साहाजिकच फरक पडला आहे, व कित्येक तर अशा विकृत स्वरूपाच्या आहेत कीं काढणारांची कींव येते. असो.

या मूळप्रतींपैकीं एक प्रत अण्णासाहेब यांचेकडे आहे. व तीच त्यांच्या पूजाअर्चेची मूळ तसबीर. तिच्यावरून दुसरा सुबक फोटो काढावा, म्हणून बूट निघाला, व त्यास अण्णासाहेब यांची संमति मिळून रा० माधवराव बापट यांनीं कॅमेरा लावला. परंतु काचेवरून फोटो निघणार नाहीं, तेव्हां त्याची काच दूर केली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें पडलें. आणि या गोष्टीस तर अण्णासाहेब संमति देईनात. ते म्हणत, 'फोटो निघणार महाराजांच्या इच्छेनें, तेव्हां कांचेशीं तुला काय करावयाचें आहे ?' काच ठेवूनच काढ' परंतु बापट यांनीं तर काच काढलीच पाहिजे असा आग्रह धरला. अखेरीस काच काढण्याविषयीं महाराजांची आज्ञा घेऊन काच काढण्यांत आली, परंतु अण्णासाहेब यांच्या शब्दाची प्रतीति दाखविण्याकरतांच कीं काय, पूर्वीचीच नक्कल पुन्हा घडून आली;–म्हणजे दहाबारा कांचा वांया गेल्या, तरी फोटो निघेना. अखेरीस त्रासून पुन्हा कांच बसविली व फोटो ठेवून दिला. असे सांगतात कीं, काच बसवितांना जेव्हां खिळे मारूं लागले, त्या वेळीं अण्णासाहेब यांची अचलप्रति-

ष्ठित धीरगंभीरताही नाहींशी होऊन त्यांच्या डोळ्यांत अश्रु आले. महाराजांची तसबीर म्हणजे त्यांच्या दृष्टीनें प्रत्यक्ष महाराजच होते. महाराजांच्या संमतीनें का होईना त्यांच्या शरीरांत खिळे मारीत असलेले पाहून त्यांचें अंतःकरण कळवळलें. कारण त्यांचा भाव जिवंत होता. असो. आतां तसबीर ठेवून देणार इतक्यांत त्यांनीं बापटांस हाक मारून सांगितलें ' अरे, एकदां काचेवरून तसबीर काढून तर पहा. ' तेव्हां त्यांच्या समजुती करतां तसा फोटो घेण्यांत आला. तो फोटो खरोखरच फार सुंदर निघाला. हें पाहून सर्वांसच मोठें नवल वाटलें.

श्रीमहाराजांचें निर्याण या प्रकरणांत त्यांच्या जाण्यासंबंधीं सर्व हकीकत दिलेलीच आहे. त्यांच्यामागून संस्थानचें चालकत्व क्रमानें ह. भ. दत्तोपंत आठवले, शंकरबुवा सोनगीरकर आणि त्यानंतर हल्लीं गादीवर असलेले श्री. भ. माधवराव गोडबोले यांजकडे आलें. हे तिन्ही पुरुष त्यांच्याकडे आलेल्या कामगिरीस परोपरीनें योग्यच असल्यामुळें श्रीसंस्थानचें काम सुरळीतपणें चालून उत्तरोत्तर उत्कर्षच झाला. हल्लींचे संस्थानिक श्री. भ. माधवबुवा हे आंग्लविद्याविभूषित असून मुंबई विश्वविद्यालयाचे पदवीधर आहेत. यांची निःसंग वृत्ति, सेवापरायणता, उद्योगप्रियता आणि दक्षपणा यांच्यामुळें तर अलीकडे संस्थानचा सर्व कारभार कसा नकाशासारखा रेखीव झाला आहे. संस्थानचे सर्व व्यवहार एकाद्या यंत्राप्रमाणें चालून श्रींच्या उत्सवासारखे मोठाले उत्सवही कसे बिनबोभाट यथासांग पार पडतात तें पाहिलें म्हणजे पहाणारा घटकाभर थक्क होऊन जातो. त्या वसंत ऋतूंतील परोपरीच्या चंदनाच्या उट्या, निरनिराळ्या पौर्णिमा व अनेक सण, पौष्यांतील टोलेजंग उत्सव, वृक्षछायेंत बसलेल्या चार चार हजार स्त्रीपुरुषांच्या एकजात पंक्ती, श्रीमहाराजांचा घाट, उदबत्त्या, रांगोळीसुद्धां सर्व थाट, व्याह्याजांवयाच्या पंक्तीप्रमाणें कुरड्या, पापड, मेतकूट बोरकुटासुद्धां सारी तयारी इ. इ. समारंभ ज्यानें एकदां पाहिला त्याच्या स्मरणांतून जाणें केव्हांही शक्यच नाहीं. मठास ठराविक उत्पन्न असें मोठें मुळींच नसून व स्वतः मठाधिपति हेही त्याकरितां विशेष कोणची खटपट करीत नसून येवढा सर्व गाडा अव्याहत चाललेला पाहून श्रीमहाराजांच्या सत्तेची साक्ष पटते व मनास आनंद होतो.

मंदिराचा सभामंडप व भोंवतालचे सोपे प्रशस्त असून त्यांच्यावर

माड्या आहेत. श्रीमहाराजांच्या समोरच अगदीं रस्त्यावरील प्रवेशस्थलीं मधल्या कमानींत श्रीअण्णासाहेब यांची पायरी असून तिचें काम संगमरवरी आहे. मठास जोडून एक प्रचंड पाकशाळा आहे व भोंवतीं मोठें अस्वार असून त्याच्याभोंवतीं सुंदर तट आहे. आवारांत दोन विहिरी व मोठा बगीचा असून पलीकडे श्रीमहाराजांचा घाट व इंद्रायणीचें पात्र आहे. प्रदक्षिणेचे वाटेवरील औदुंबराजवळ उभे राहिले असतां नयनसुंदर देखावा दिसतो व मनास मोठा आल्हाद होऊन पहाणाराची वृत्ति क्षणभर भक्तिभावांत लीन होऊन जाते. मठांतील गोशाळा बरीच मोठी असून जवळच लहानसा रथ आहे. त्यांतून पौ० शु॥ १४ स सायंकाळीं श्रीमहाराजांची मिरवणूक काढितात. श्रीअण्णासाहेब यांचे कमानीचे वरल्या आंगास नगारखाना असून तिन्हीं त्रिकाळीं चौघडा वाजतो. मठांतील पाकशाळेंत अतीथअभ्यागताचे आदरातिथ्य उत्तम प्रकारें केलें जातें. एकंदर सर्व व्यवस्था पाहून येणारा मनुष्य मोठा संतुष्ट होऊन जातो. उत्सवाचे दिवस खेरीज करून मठांत सर्वत्र शांतता असते. त्यामुळें एकांतवास करण्याला, चार दिवस शांतपणें घालविण्याला, नानाप्रकारचे योगाभ्यास करण्याला, सर्व तऱ्हेचे अध्यात्मिक अनुभव घेण्याला आणि आपल्या मनबुद्धींद्रियांना प्रेमरसाची भावना देऊन आनंदमय अशा भक्तिभावांत मुरून जाण्याला हें स्थळ सर्व तऱ्हेनें अनुकूल असल्यामुळें श्रीअण्णासाहेबांना अतिशय प्रिय असलेल्या या स्थळाचें दर्शन श्रीअण्णासाहेब यांची स्मृति जागविणाऱ्या महाराष्ट्राला सदैव आल्हादकारक व स्फूर्तिप्रदच होईल यांत काय संशय ?

# धुळ्याचे बोवासाहेब.

यांच्या आयुष्याशीं संबंध असलेली तिसरी महत्त्वाची व्यक्ति धुळ्याचे बुवासाहेब म्हणजे नारायणबुवा रुद्र हे होत. यांचा आणि अण्णासाहेबांचा संबंध गुरुबंधु या नात्यानें आला. श्रीशैल्यपर्वतावर अवतार गुप्त न करतां नाना वेषांनीं जगदुद्धार करीत असलेले श्रीनरसिंहसरस्वती म्हणजेच महाराज, अवतार नव्हे, साक्षात् तीच मूर्ति, अशी श्रद्धा असलेले हे दुसरे गृहस्थ. मूळचे जालणकडे राहणारे. पूर्वीच्या कालमानाप्रमाणें थोडेसें शिक्षण होतांच नाशिकास कांहीं उद्योगधंदा करून श्रीरामाचे पुजारी म्हणून पुरंदऱ्यांच्या राममंदिरांत धुळयास आले. नाशिक येथें असतांच एका हरदासबुवांचा सहवास घडून यांना गायनाचा अभ्यास झाला, व त्या झाला अनुकूल अशी गोड आवाज वगैरे सामग्री असल्यामुळें तिच्यांत यांनीं मोठेंच प्रावीण्य संपादिलें. पुजारी म्हणून धुळयास आल्यावर लौकरच श्रीमद्भागवतांतील योगवर्णनें ऐकून यांचें लक्ष योगमार्गाकडे लागलें. बुवासाहेब यांस विवाहाचा संस्कार नुसता शपथेलाच घडला होता. म्हणजे त्या काळाप्रमाणें अगदीं बाळपणीं लग्न होऊन लागलींच त्यांची पत्नी निवर्तली. म्हणजे वस्तुतः ते ब्रम्हचारीच होते. उत्कृष्ट ब्रम्हचर्य, सुदृढ शरीरप्रकृति, पवित्र मनोरचना, भावयुक्त अंतःकरण आणि दृढनिश्चय इत्यादि साहित्याच्या जोरावर लौकरच त्यांनीं योगमार्गांत चांगलीच प्रगति केली. महाराजांची व यांची गांठ केव्हां पडली व कशी पडली, हें कळण्यास कांहींच साधन नाहीं. तरी पण अभ्यासाच्या सुरुवातीलाच महाराजांनीं यांना अनुग्रह दिला असावा असें वाटतें, व तेव्हांपासून आळंदीस महाराजांचे दर्शनास जाण्याचा त्यांचा प्रघात होता.

धुळ्यास त्या वेळेला तीन प्रसिद्ध वेडे होते. त्यांपैकीं 'जगांत पिशाच अंतरीं शहाणा,' अशा एका महात्म्याजवळ श्रीमहाराजांच्या आज्ञेवरून बुवासाहेब योगाभ्यास शिकले. असेंही ऐकण्यांत येतें कीं, स्वतः महाराज देखील त्याकरितां केव्हां तरी धुळयास येऊन राहिले होते. योगाभ्यास करीत असतांना कांहीं वेळेला चित्त चलित होऊं लागलें असतां, अथवा इतर कोणत्याही कारणानें असो, अभ्यासप्रसंगीं वेताच्या-छडीनें त्यांनीं बुवासाहेबांची पाठ फोडून काढावी! असें स्वतः

बुवासाहेबांनींच अण्णासाहेब यांस सांगितलें. बुवासाहेब यांची वृद्ध मातोश्री जवळच असावयाची, परंतु धन्य आहे त्या माउलीच्या श्रद्धेची कीं महाराजांचा राग न येतां, अथवा वाईट न वाटतां उलट बुवासाहेबांच्या पाठीस आपल्या हातानें तेल लावीत असतां त्यांनींच 'नारायण, महाराजांनीं मारलें आहे, त्यांत आपलें कल्याणच आहे, वाईट वाटूं देऊं नकोस,' असें समाधान करावें. बुवासाहेबांना महाराजांनीं षट्चक्रभेदाच्या मार्गानें नेलें होतें. या पद्धतीनें अभ्यास करीत असतां मध्यें केव्हां तरी त्यांची स्थिति अगदीं भ्रमिष्टासारखी झाली होती. निर्विकल्पक स्थितीच्या अनावर मोहानें कित्येक दिवसचे दिवस लाकूड होऊन पडणाऱ्या श्रीरामकृष्ण परमहंसाच्या पाठींत प्रत्यक्ष लांकूड घालूनच त्यांना शुद्धीवर आणावें लागे, असें त्यांच्या चरित्रांत लिहिलेलें आहे. तें वाचलें म्हणजे महाराजांच्या या वर्तनाचा उलगडा होतो.

बुवासाहेब यांचा अभ्यास पुरा झाल्यावर त्यांच्या स्थितप्रज्ञतेची कसोटी पाहण्याकरितांच कीं काय तो वेडा एक दिवस सुरी घेऊन मंदिरांत शिरला, व त्यानें बुवासाहेबांस हांक मारली. योगाभ्यास करीत असतांना कांहीं कारणानें बुवासाहेब यांची दृष्टी गेली होती. त्यामुळें त्यांचे सारे व्यवहार श्रवणद्वारेंच चालत. हांक ऐकतांच बुवासाहेबांनीं हात जोडून 'काय आज्ञा आहे,' म्हणून विनंति केली. त्यावेळेस सुमारें अकरा वाजावयाची वेळ होती, व मंदिरांत साधारण सामसूम होती. वेड्यानें सांगितलें कीं, 'आपली मान कांपून पाहिजे,' त्याबरोबर मोठ्या आनंदानें बुवासाहेबांनीं मान पुढें केली. तेव्हां तिच्यावर जवळजवळ असे तीन घाव घालून त्यानें ती तोडण्याचा प्रयत्न केला. जमिनीवर रक्ताचें थारोळें होऊन गेलें, तरी बुवासाहेबांनीं हूं कां चूं देखील केलें नाहीं! तेव्हां तो वेडा हंसूं लागला. त्यामुळें कोणी तरी तेथें आलें व त्याच्या हाकेवरून बरींच माणसें गोळा झालीं. तेव्हां तो वेडा तेथून निघून ओटीवर हंसत बसला. लवकरच जमलेल्या लोकांनीं त्याला पोलीसच्या स्वाधीन केलें, परंतु बुवासाहेबांनीं ताबडतोब त्यास मोकळें करविलें, व उलट सद्गदितपणानें त्याच्या पायांवर डोकें ठेवलें. वेडाच तो; त्यानें एकदा मानेवरून हात फिरविला, व तेथून जें पलायन केलें, तें स्वारी पुन्हा कोणाच्याही दृष्टीस पडली नाहीं.

पुढें फाल्गुनांत बुवासाहेब जेव्हां आळंदीस आले, तेव्हां महाराजांनीं मोठा आनंद प्रदर्शित करून 'नारायण माझें हृदय आहे,' म्हणून सर्वांस सांगितलें. असें सांगतात कीं, त्यावेळीं महाराजांस पहातां येत नाहीं म्हणून बुवासाहेबांस वाईट वाटलें. तेव्हां डोळ्यावरून हात फिरवून महाराजांनीं त्यांना दृष्टी दिली. व 'आणखी काय इच्छा आहे?' म्हणून विचारलें. महाराजांची श्यामसुंदर मूर्ति आणि सदयधवल असें सुहास्य डोळेभरून पाहिल्यावर बुवासाहेबांनीं विनंति केली कीं 'एकदां आपणास पाहिल्यावर आतां पुन्हां जग पाहण्याची इच्छा नाहीं. तेव्हां डोळे पूर्ववत् करावे.' त्यावर थोडेंसे हंसून महाराजांनीं पुन्हा तोंडावरून हात फिरवितांच दृष्टिहीनत्व आलें. 'दृष्टीवांचून तुझें कांहीं अडणार नाहीं,' असा त्यांना आशीर्वाद देऊन श्रीदत्तजयंतीच्या पारण्याची आज्ञा देऊन महाराजांनीं त्यांना धुळ्यास परत धाडलें. लौकिकरीत्या बुवासाहेबांचा प्रपंच उत्तम चालावा, म्हणून त्याना एक लहानशी सिद्धीही देऊन ठेविली होती, परंतु तिचा उपयोग बुवासाहेबांनीं फारच क्वचित् प्रसंगीं करावा. केव्हांही पैशाचा कांहीं प्रसंग आला असतां यांच्या जवळ एक डबी होती, तींत त्यांनीं पहावयास सांगावें, व जितक्या रकमेची गरज असे तितकी रक्कम अगदीं हटकून त्या डबींत सांपडत असे. योगाभ्यासाच्या परिपाकानें अंगीं अवश्य येणारें सामर्थ्य बुवासाहेबांच्याही जवळ होतें व अंतर्ज्ञान, वाक्सिद्धी, भविष्यज्ञान, थोड्या अन्नाचें पुष्कळ अन्न करणें इत्यादी चमत्कार प्रसंगोपात्त त्यांच्या हातून घडलेले पाहिलेले लोक आज आहेत. परंतु या भानगडींत आपण होऊन ते कधीं पडले नाहींत. त्यांचा स्वभाव अतिशय कडक व उग्र, भाषण फारच परिमित व राहणी कमालीची नेमस्त होती. 'बुवासाहेबांसारखा संत अवघ्या हिंदुस्तानांत पाहिला नाहीं, कोणचीही गोष्ट मी केली, अथवा मी करीन, असें कधीं त्यांच्या मनास शिवलेंच नाहीं, करणें कां न करणें सर्व कांहीं महाराज करतात, असा त्यांचा निर्भर होता,' असें अण्णासाहेब त्यांच्याविषयीं नेहमीं म्हणत.

बुवासाहेबांचें छोटेंसेंच कां होईना एक चरित्र प्रसिद्ध झालेलें आहे, त्यावरून त्यांची जास्त हकीगत सहज कळेल. महाराजांनीं सांप्रदायाचा वडीलपणा त्यांचेकडे दिल्यावर त्यांनीं तो १५ वर्षेपर्यंत यथायोग्य चालविला, व मागील एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें स्वतः जाण्यापूर्वीं

तो त्यांनीं अण्णासाहेब यांजकडे सोंपविला. असें सांगतात कीं मागाहून लोक आपले देव्हारे करतील ते होऊं नयेत म्हणून देह ठेवण्याकरितां ते मुद्दाम आळंदीस आले. परंतु श्रीमहाराजांनीं अगदीं निक्षून आज्ञा केल्यामुळें आळंदीस सुरूं केलेला कार्यक्रम तसाच सोडून त्यांना परत जावें लागलें. पुढें रीतीप्रमाणें व्यवस्था होऊन सांप्रदायाच्या आळंदी, धुळें आणि पुणें, या तीन पीठांपैकीं धुळें येथें एक पीठ स्थापन झालें.

बुवासाहेबांनीं पुष्कळ लोकांस मार्गास लाविलें, परंतु त्यांतल्यात्यांत नुकत्याच निवर्तलेल्या तीं. गं. भा. गयाताई यांचें विस्मरण चालू पिढीस तरी लौकर होणार नाहीं. त्यांची ती तेजःपुंज गौरमूर्ति, तापट स्वभाव, श्रद्धा, सेवापरायणता आणि दूध व निंबाचा पाला सेवन करून सतत २५ वर्षें केलेली कडक तपश्चर्या यांच्यामुळें, सायंकाळ झाली असतांही मेघांवरून परावृत्त झाल्यामुळें जास्त रेंगाळत राहिलेल्या संधिप्रभेचाच भास होत होता. श्रीपाद रानडे म्हणून दुसराही एक यांचा अधिकारी शिष्य होऊन गेला असें सांगतात. त्याच्याविषयीं असें ऐकण्यांत आहे कीं महाराजांचें दर्शन झाल्यावर त्यानें 'बुवासाहेबांस दृष्टी द्या' म्हणून प्रार्थना केली. व 'नुसतें तसें करणें शक्य नसलें तर माझी दृष्टी जाऊं द्या, पण त्यांना दृष्टी द्या' म्हणून सांगितलें. महाराजांनींही तसें करण्याचें कबूल केलें, परंतु अशी अट घातली कीं आधीं बुवासाहेबांस विचारून ये. परंतु बुवासाहेबानीं या गोष्टीचा निषेध केल्यावरून त्याला आपला हट्ट सोडून द्यावा लागला.

# श्रीकंचिस्वामी.

मद्रासेस जावयास निघाले त्यावेळीं अण्णासाहेब यांस महाराजांनीं ' येतांना कंचीस जाऊन ये, ' म्हणून सांगितलें होतें. परंतु तें कशाकरितां वगैरे कांहींच खुलासा केला नव्हता. पुढें ज्या वेळेस कंचीच्या महाराजांसह अण्णासाहेब परत आले, व श्रीमहाराजांचे दर्शनास गेले, त्यावेळीं महाराजांनी रामचंद्र-अय्यांचा ' हा दाक्षिणेतला अगस्ति आहे, ' असें म्हणून मोठा सत्कार केला, व त्यांनींही ' आतां आमची जबाबदारी संपली, आपला माणूस सांभाळा, ' म्हणून महाराजांना सांगितलें. तेव्हां कुठें त्याचा संदर्भ लागला. महाराजांनीं दिलेल्या विशेषणावरून श्रीरामचंद्रअय्या म्हणजे केवढें जाडें प्रस्थ असावें हें लक्षांत येतें. हे गृहस्थ वर्णानें काळेकुट्ट व शरीरानें सुदृढ होते. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें अवश्य ती वेदविद्या व संस्कृत भाषा हीं त्यांना येत असे; परंतु त्यांचें भाषण इतकें कमी असे कीं, कांहीं ठराविक द्राविडी शब्दांपली-कडे त्यांना कांहीं येत असावें, अशी देखील शंका कोणास यावयाची नाहीं. एक पंचेवजा नेसतें धोतर, डोक्यास एक फर्द गुंडाळलेलें, आंगावर एक लहानसा पंचा, एवढा काय तो त्यांचा पोषाख असे. श्रीविष्णुकंचीच्या विष्णुमूर्तीची उपासना ते करीत. सबंध महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें पंढरीचे श्रीपांडुरंग, त्याच-प्रमाणें त्या टापूंत कंचीचे श्रीवरदराज, ही वैष्णवांची माउली आहे. आदरानें, प्रेमानें, सलगीनें इतकेंच काय तर अवहेलनेनें ज्याप्रमाणें पांडुरंगास अनेक प्रकारांनीं आळवण्यांत येतें, तशाच सर्व भावांनीं श्रीवरदराजाची उपासना करण्यांत येते. अण्णासाहेब यांच्या घटसर्पाचे प्रसंगीं रामचंद्रअय्यांनीं ' वरदडा ' ( वर द्या. ) म्हणून त्यांची संभावना केलेली वाचकांच्या लक्षांत असेलच, आणि त्या एकंदर प्रसंगावरून व मागें दिलेल्या नैवेद्याच्या गोष्टीवरून यांचा अधिकार किती मोठा होता हें लक्षांत येईलच. नित्य एक लक्ष नामस्मरण करून श्रीवरदराजास तुळशीची लाखोली वाहाण्याचा त्यांचा नेम असे. स्वतः ते श्रीवरदराजाची कानगी गोळा करण्याकरितां नेहमीं फिरत असत. व मधून मधून कंचीस येत. तरी पण त्यांचा नियम अखंडित चाले. कंचीस त्यांनीं एक तुळशीची बाग लाविली होती व देवळांत वेदाभ्यासा-

तो त्यांनीं अण्णासाहेब यांजकडे सोंपविला. असें सांगतात कीं मागाहून लोक आपले देव्हारे करतील ते होऊं नयेत म्हणून देह ठेवण्याकरितां ते मुद्दाम आळंदीस आले. परंतु श्रीमहाराजांनीं अगदीं निक्षून आज्ञा केल्यामुळें आळंदीस सुरूं केलेला कार्यक्रम तसाच सोडून त्यांना परत जावें लागलें. पुढें रीतीप्रमाणें व्यवस्था होऊन सांप्रदायाच्या आळंदी, धुळें आणि पुणें, या तीन पीठांपैकीं धुळें येथें एक पीठ स्थापन झालें.

बुवासाहेबांनीं पुष्कळ लोकांस मार्गास लाविलें, परंतु त्यांतल्यात्यांत नुकत्याच निवर्तलेल्या ती. गं. भा. गयाताई यांचें विस्मरण चालू पिढीस तरी लौकर होणार नाहीं. त्यांची ती तेजःपुंज गौरमूर्ति, तापट स्वभाव, श्रद्धा, सेवापरायणता आणि दूध व निंबाचा पाला सेवन करून सतत २५ वर्षें केलेली कडक तपश्चर्या यांच्यामुळें, सायंकाळ झाली असतांही मेघांवरून परावृत्त झाल्यामुळें जास्त रेंगाळत राहिलेल्या संधिप्रभेचाच भास होत होता. श्रीपाद रानडे म्हणून दुसराही एक यांचा अधिकारी शिष्य होऊन गेला असें सांगतात. त्याच्याविषयीं असें ऐकण्यांत आहे कीं महाराजांचें दर्शन झाल्यावर त्यानें 'बुवासाहेबांस दृष्टी द्या' म्हणून प्रार्थना केली. व 'नुसतें तसें करणें शक्य नसलें तर माझी दृष्टी जाऊं द्या, पण त्यांना दृष्टी द्या' म्हणून सांगितलें. महाराजांनींही तसें करण्याचें कबूल केलें, परंतु अशी अट घातली कीं आधीं बुवासाहेबांस विचारून ये. परंतु बुवासाहेबानीं या गोष्टीचा निषेध केल्यावरून त्याला आपला हट्ट सोडून द्यावा लागला.

---

# श्रीकंचिस्वामी.

मद्रासेस जावयास निघाले त्यावेळीं अण्णासाहेब यांस महाराजांनीं ' येतांना कंचीस जाऊन ये, ' म्हणून सांगितलें होतें. परंतु तें कशाकरितां वगैरे कांहींच खुलासा केला नव्हता. पुढें ज्या वेळेस कंचीच्या महाराजांसह अण्णासाहेब परत आले, व श्रीमहाराजांचे दर्शनास गेले, त्यावेळीं महाराजांनीं रामचंद्र-अय्यांचा ' हा दक्षिणेतला अगस्ति आहे, ' असें म्हणून मोठा सत्कार केला, व त्यांनींही ' आतां आमची जबाबदारी संपली, आपला माणूस सांभाळा, ' म्हणून महाराजांना सांगितलें. तेव्हां कुठें त्याचा संदर्भ लागला. महाराजांनीं दिलेल्या विशेषणावरून श्रीरामचंद्रअय्या म्हणजे केवढें जाडें प्रस्थ असावें हें लक्षांत येतें. हे गृहस्थ वर्णानें काळेकुट्ट व शरीरानें सुदृढ होते. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें अवश्य ती वेदविद्या व संस्कृत भाषा ही त्यांना येत असे; परंतु त्यांचें भाषण इतकें कमी असे कीं, कांहीं ठराविक द्राविडी शब्दांपली-कडे त्यांना कांहीं येत असावें, अशी देखील शंका कोणास यावयाची नाहीं. एक पंचेवजा नेसतें धोतर, डोक्यास एक फर्द गुंडाळलेलें, आंगावर एक लहानसा पंचा, एवढा काय तो त्यांचा पोषाख असे. श्रीविष्णुकंचीच्या विष्णुमूर्तीची उपासना ते करीत. सबंध महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें पंढरीचे श्रीपांडुरंग, त्याच-प्रमाणें त्या टापूंत कंचीचे श्रीवरदराज, ही वैष्णवांची माउली आहे. आदरानें, प्रेमानें, सलगीनें इतकेंच काय तर अवहेलनेनें ज्याप्रमाणें पांडुरंगास अनेक प्रकारांनीं आळवण्यांत येतें, तशाच सर्व भावांनीं श्रीवरदराजाची उपासना करण्यांत येते. अण्णासाहेब यांच्या घटसर्पाचे प्रसंगीं रामचंद्रअय्यांनीं ' वरदडा ' ( वर द्या. ) म्हणून त्यांची संभावना केलेली वाचकांच्या लक्षांत असेलच, आणि त्या एकंदर प्रसंगावरून व मागें दिलेल्या नैवेद्याच्या गोष्टीवरून यांचा अधिकार किती मोठा होता हें लक्षांत येईलच. नित्य एक लक्ष नामस्मरण करून श्रीवरदराजास तुळशीची लाखोली वाहाण्याचा त्यांचा नेम असे. स्वतः ते श्रीवरदराजाची कानगी गोळा करण्याकरितां नेहमीं फिरत असत. व मधून मधून कंचीस येत. तरी पण त्यांचा नियम अखंडित चाले. कंचीस त्यांनीं एक तुळशीची बाग लाविली होती व देवळांत वेदाभ्यासा-

करितां विद्यार्थी ठेवलेले असत. स्वतः अय्या कोठेंही असले तरी त्यांचें नांव घेणें सुरू असे. व वेदशाळेंतील विद्यार्थी तुळशी तोडून श्रीवरदराजास नित्य नियमानें लाखोली वाहात. ही वेदशाळाही अर्थात् त्यांनाच चालवावी लागे. तेवढ्याकरितां भाविक लोकांकडून मासिक, वार्षिक, व नैमित्तिक अशा देणग्या बांधलेल्या असत. ठरलेल्या दिवशीं रामचंद्रअय्यांची स्वारी त्या गृहस्थांच्या दाराशीं नेमकी हजर व्हावयाची किंबहुना लक्षनामस्मरण व कानगी गोळा करणें येवढे दोनच काय ते हेतु त्यांच्या आयुष्याला होते. अशा रितीनें कोणाच्याही लक्षांत आल्याखेरीज ह्या अधिकारी पुरुषाचें सर्व आयुष्य गेलें. यांच्या अधिकाराच्या व स्थितप्रज्ञतेच्या कांहीं गोष्टी अण्णासाहेब सांगत. एकदां त्यांनीं श्रीवरदराजाकरितां केवडा तोडावा म्हणून झाडास हात घातला तोंच एका भयंकर कृष्ण सर्पानें त्यांस दंश केला. त्याबरोबर लहान पोरानें एकादी चेष्टा केली असतां त्याचें कौतुक करावें तसें 'लज्जा कुडका' (हा रांडलेका!) असें थोडेंसें हसून त्यांनीं म्हटलें, व मंदिरांत जाऊन श्रीवरदराजांचें गंध हातास लाविलें. सर्पदंशापासून त्यांस कांहीं बाधा झाल्याचें थोडें देखील दिसलें नाहीं. असेंच एकदां श्रीवरदराजांची कानगी गोळा करून येत असतां वाटेंत त्यांची व कांहीं चोरांची गाठ पडली. साक्षात् मृत्युचीही भीति ज्यांच्या मनास कधीं शिवावयाची नाहीं त्यांच्या मनास मोठें भय वाटूं लागलें कीं, आतां श्रीवरदराजांचें वित्त त्यांच्या पायाशीं सुरक्षित कसें पोहोंचेल. तेव्हां त्यांनीं त्याच ठिकाणीं मुक्काम केला, व द्रव्याचें गांठोडें उशास घेऊन झाडाखालीं आंग टाकलें त्यांच्या बरोबरच्या मंडळीस तेंच पाहिजे होतें. पुढें काय झालें हें कांहीं ठाऊक नाहीं. परंतु ते एवढेंच सांगत कीं, जागे होऊन पाहातात तों आपण एकटेच असून उशाचें गांठोडें लांबवलें गेलें आहे असें त्यांना आढळून आलें. तेव्हां 'असो वरदराजाची मर्जी' असें म्हणून ते कंचीस परत आले व थोडेशा जड अंतःकरणानेंच श्रीवरदराजांचे दर्शनास गेले. ते सांगत-'जाऊन पाहातों तों 'स्वामी' हांसत होता व त्याच्या पायाशीं द्रव्याचें गांठोडें ठेविलेलें होतें.' पुढें आपणांस चिंता पडलेली पाहून वरदराजांनीं स्वतःच चोरावर मोर करून तें गांठोडें कंचीस आणलें असें समजून आल्यावर त्यांना मोठा हर्ष झाला.

तसेंच एकदां अंधेऱ्या रात्रीं नदीच्या कांठानें चालले असतां पाण्याशीं कोणी तरी खेळत आहे असा त्यांस भास झाला. व कोण आहे म्हणून पहावें

अशी त्यांस सहज इच्छा झाली. दुरूनच त्यांनीं विचारिलें कोण रे तो? एवढ्या रात्रीं काय करतोस ? तेव्हां त्या व्यक्तीनें उत्तर केलें ' मी आहे ' ' ब्रम्हकर्म करीत आहें.' ते सांगत—जवळ जाऊन पाहातों तों 'स्वामी' तेव्हां अतिशय आश्चर्य वाटून त्यांनीं विचारलें तूं रे कसलें ब्रम्हकर्म करतोस ? तेव्हां श्रीवरद-राजांनीं उत्तर केलें ' मला कसलें आलें कर्म पण हें तुझ्याकरितां करतों. माझें नांव सारखें घेत राहिल्यामुळें तुझ्या हातून ब्रम्हकर्म घडत नाहीं तेव्हां तुझा धर्मलोप होऊं नये म्हणून मला हें करावें लागतें. ' अशा प्रकारच्या त्यांच्या मजेदार गोष्टी आहेत.

कोणच्याही तऱ्हेच्या लेखनास प्रारंभ करण्यापूर्वी सकाळीं एकदां राम नाम लिहावयाची जी अण्णासाहेब यांस संवय होती, ती रामचंद्रअय्यांच्या सहवासाचाच परिणाम. रामनामस्मरण लेखन—वाचनाच्या उपदेशाबरोबरच रामचंद्रअय्यांनीं त्यांना ' दशेंद्रियव्यापारसहित स्मृतीचें वैकल्य राहिल्या ' चा वर दिला. अण्णासाहेब यांचें एकंदर पुढील आयुष्य आणि निर्याण ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना या गोष्टीची सत्यता तेव्हांच पटेल. या रामचंद्रअय्यांची समाधी कंचीस आहे.

# श्रीभक्त दादा दांडेकर.

मागें प्रज्ञावर्धन स्तोत्राची गोष्ट आली आहे. तिच्यावरून महादेव अनंत उर्फ दादा दांडेकर यांचें नांव वाचकांस कळलेंच आहे. प्रज्ञावर्धनाची गोष्ट झाल्यापासून अण्णासाहेब यांनाही गुरुस्थानींच मानीत असत. हे गृहस्थ मूळचे दाभोळजवळ गुडघें म्हणून गांव आहे तेथील खोत. यांचे वडील अनंतराव यांस एक मूल झालें त्यावेळीं कर्जामुळें आणि भाऊबंदांच्या त्रासामुळें ते इतके वैतागले होते कीं, उद्योगधंदा पाहाण्याकरितां म्हणून बायको व मूल घेऊन देशावर आले असतां धोम महाबळेश्वराच्या जंगलांत त्यांनीं जीव देण्याचा विचार केला. चार महिन्याच्या पोरास झाडाचे पारावर ठेऊन जवळच कोठें जलाशय होतें तेथें ते जीव द्यावयास गेले. तेव्हां त्या स्त्रीपुरुषांत आधीं कोणीं मरावें असा वाद सुरू झाला. इतक्यांत श्रीनरसिंहसरस्वती महाराज सहज तेथें आले व त्या मुलास पाहून त्यांनीं त्याला उचलून घेतलें व त्याच्या आईबापांचा शोध करीत त्या जलाशयापाशीं आले. त्या दंपत्याची सर्व हकीकत कळून आल्यावर त्यांनीं आत्महत्येपासून त्यांना परावृत्त केलें व तुमचें कल्याण होईल म्हणून आशीर्वाद देऊन परत घरीं पाठविलें.

असें सांगतात कीं, दांडेकर भटजीस दम्याचा विकार होता. महाराजांनीं अनुग्रह देऊन परत घरीं जावयास सांगितलें तेव्हां दादांच्या मातोश्रीनें दम्याच्या विकाराविषयीं तक्रार केली. तेव्हां जर दुसरा कोणी हा दमा घेईल तर अंतू भटजीचा रोग जाईल असें महाराजांनीं सांगितलें.त्यावरून स्वतः त्या बाईनेंच तो दमा पत्करिला. व तेव्हांपासून त्या बाईची ठस् ठस् सुरू होऊन अंतू भटजी खडखडीत बरे झाले.

मूल परत देतांना महाराजांनीं सांगितलें कीं, हा आमचा मुलगा आहे तुम्ही यास वाढवा याची मुंज झाली कीं, आम्ही घेऊन जाऊं.' त्याप्रमाणें अंतू भटजी देशीं परत गेल्यावर त्यांचे दिवस पालटले व यथाकाल त्यांनीं त्या मुलाची मुंजही केली. मुंज केल्यानंतर सुमारें चार महिन्यांनीं कोठूनसे महाराज एकदम येऊन उतरले व सांगून ठेवल्याप्रमाणें त्या मुलास घेऊन गेले. हा मुलगा म्हणजेच दादा दांडेकर.

या नंतर सुमारें बारा वर्षेंपर्यंत दादा महाराजांच्या जवळच होते. त्यामुळें

त्यांना पुष्कळसा प्रवास घडून चमत्कारिक प्रसंग, विचित्र देखावे, महाराजांची अद्भुत लीला व सामर्थ्य हीं सर्व पहावयास सांपडून लहान मोठ्या अनेक लोकांचा परिचयही झाला. व जरी अर्वाचीन पद्धतीप्रमाणें ते विशेषसे सुशिक्षित नव्हते व लिहिण्या वाचण्यापलीकडे त्यांची मजल केव्हांच गेली नाहीं, तरी देखील बहुश्रुतपणा सत्समागम प्रवास व अवलोकन यांनीं जें कार्य करावयाचें तें त्यांचे ठिकाणीं होऊन गेलें होतें. श्रद्धा व उत्साह यांच्या भरांत कित्येक गोष्टी करण्याचा व अतिशयोक्तीनें सांगण्याचा माणसांचा स्वभाव सोडून दिला तर दादा म्हणजे महाराजांविषयींच्या सर्व प्रकारच्या माहितीचें भांडारच होते. सुमारें बारा वर्षे अशा रितीनें काढल्यावर महाराजांनीं विवाह करून गृहस्थाश्रम करण्याची त्यांस आज्ञा केली व त्याप्रमाणें चतुर्भुज होऊन त्यांनीं शाळाखात्यांत नौकरी धरली.

शाळाखात्यांतील नौकरी करीत असतांना सुप्रसिद्ध लीवार्नर साहेब यांचा व त्यांचा प्रसंग झाला. दाव्हर्याजवळ लाडखेड येथें एकदां शाळेंत शिकवीत असतां महाराज त्यांचेकडे आले, व टेबलावर पाय टाकून तमाखु खात बसले होते, इतक्यांत लीवॉर्नर सहज तेथें येऊन पोचले. त्यांना पाहून खुर्चीवरून उठावयाचें अथवा दुसरी कांहीं सलामी करावयाची, तें कांहींच न करितां उलट महाराज हांसत हांसत तमाखु खाऊं लागले. तेव्हां अर्थातच त्याचा संताप होऊन महाराजांस कांहीं तरी अपमानकारक असें तो बोलला. दादा इंग्रजांचे नौकर होते, तरी इंग्रजी शिक्षणाच्या चरकांत पिळले गेले नव्हते. त्यांस तें कोठून सहन व्हावयाचें ? त्यांनीं लागलेंच टेबलावरचा रूळ उचलला, व साहेबास आडवे झाले. तेव्हां मनांत उमजून साहेब बहादूर तसेच परत फिरले व तंबूतून त्यांनीं दादांस बोलावणें पाठविलें.

साहेबासमोर गेल्यावर प्रथमतः नौकरीस खो बसणार, हें तर उघडच होतें; परंतु आणखी काय होतें, तेंही सांगण्याजोगतें नव्हतें; परंतु भीति ही त्यांच्या साहसी मनाला कधीं फारशी शिवलीच नाहीं. खुर्जीवर महाराज तसेच शांतपणें बसून राहिले होते. त्यांची आज्ञा घेऊन दादांनीं साहेबाची भेट घेतली परंतु तेथें पाहतात तों अपेक्षेप्रमाणें कांहीं न घडतां, अगदीं उलट घडून आलें. ' तूं इतका रागावसास कां म्हणून " साहेबानेंच त्यांना विचारलें. तेव्हां ' ते माझे गुरु आहेत. व गुरु म्हणजे आम्हां हिंदु लोकांस काय आहे, याची

कल्पना आपणांस असली पाहिजे, कारण आपण इकडे बरेच राहिलेले आहां,' असें दादांनीं सांगितलें. तेव्हां ती गोष्ठ तितकीच सोडून साहेबांनीं विचारलें कीं, तूं असल्या मास्तरीच्या नौकरीस लायख नाहींस, पोलीस खात्यांत नौकरी करीत असलास तर, एकदम पन्नास रुपायांचीं नौकरी देतों, व पुढें वाढशीलही पुष्कळ' हें ऐकल्याबरोबर दादांस थोठाच हर्ष झाला. कोठें शाळा खात्यांतील आठ रुपये व कक्का किर्कीचें भिकारडें काम, एकदम पन्नास रुपायांची नौकरी, वाढण्याची पुष्कळ आशा, मोठा दर्जा व मनाजोगतें रगडून घोड्यावर बसावयास मिळणार, तेव्हां तो मोह जबरदस्तच होता; परंतु त्यांनीं उत्तर दिलें कीं, 'थांबा, मी महाराजांस विचारून येतों.' महाराजांस विचारतां त्यांनीं ती गोष्ट साफ उडवून दिली. त्यामुळें दादांना जन्मभर दारिद्र्यांत खितपत पडणें भाग आलें.

अशा रीतीनें दारिद्र्यपूर्ण संसाराच्या खडतर शाळेंत त्यांना लोटतांना महाराजांनीं त्यांना दोन देणग्या देऊन ठेवल्या; एक तर एकदम ध्यानयोगास लावून दिलें, व स्वतः अनुग्रह देऊन उपासनेस लाविलें. या दोन गोष्टींच्या सहाय्यानें दादांनीं आपली जीवितयात्रा काढली. यांचा स्वभाव दुर्वासासारखा तामसी होता; परंतु अंतःकरण अतिशय मायाळु, कोणच्याही गोष्टीची खरी कळकळ, अतिशय स्वाभिमान, व स्वदेश आणि स्वधर्म यांच्या ऊर्जिताची तळमळ, इत्यादि इतर गुणांमुळें त्या तामसी वृत्तीचा कांहीं दुरुपयोग न होतांना चार चांगल्या लोकांच्या साहाय्यानें यांचें हें आयुष्य चांगलेंच गेलें. अण्णासाहेब यांचा व दादांचा गुरुबंधूसारखाच संबंध होता, परंतु सर्वत्र महाराजाच दिसत असलेल्या व यत्किंचितही बोध करणाऱ्या वस्तुमात्रास गुरुरूप समजणाऱ्या अण्णासाहेबाच्या अवधूतवृत्तीस प्रज्ञावर्धन स्तोत्राच्या गोष्टी नंतर दादांसंबंधानें विशेष कांहीं वाटत असल्यास मोठेसें आश्चर्य नाहीं. तेव्हांपासून त्यांच्या गुरुमालिकेंत दादांचें नांव पडलें, व अखेरपर्यंत दादांशीं ते तसेच वागले.'

महाराजांच्या संबंधानें आज जी विविध माहिती आहे, तिचें बहुतेक श्रेय दादांनाच आहे. यांच्या ध्यानयोगसिद्धीच्या व महाराजांवरील निष्ठेच्या बऱ्याच गोष्टी आहेत, परंतु त्यांच्याशीं येथें कांहीं कर्तव्य नाहीं. यांच्या संततीपैकीं रा. सदाशिवराव बापुसाहेब हे उमरावतीस म्युनिसिपल शाळेंत मास्तर

आहेत. व मुख्यतः त्यांच्या कळकळीच्या सदिच्छेनें श्रीअण्णासाहेब यांचें हें त्रोटकच कां होईना, चरित्र, बाहेर पडण्याचा योग येत आहे. दुसरे चिरंजीव श्रीभ. सीतारामपंत हे पुण्यासच असतात. यांचीही अण्णासाहेब यांचे ठिकाणीं जबर निष्ठा आहे. या चरित्रांतील पुष्कळशा महत्त्वाच्या माहितीचें श्रेय त्यांच्याचकडे आहे. ' माझी पुष्पमाला ' या पुस्तकाच्या द्वितियावृत्तींतील प्रस्तावनेखालीं यांचेंच नांव आहे.

# कांहीं इतर मंडळी.

अण्णासाहेब यांच्याजवळ असलेल्या लोकांत विष्णु भैरव काळे या गृहस्थांवर त्यांचा विशेष लोभ होता. रात्रींचें देवदर्शन विष्णुपंतास बरोबर घेतल्याखेरीज अण्णासाहेब यांनीं कधींही केलें नाहीं. हे गृहस्थ कोठल्याशा ऑफिसमध्यें नौकर होते, व नौकरीचा वेळ खेरीज करून इतर सर्व वेळ ते अण्णासाहेब यांच्या सहवासांत घालवीत. यांच्या चातुर्याची, हजरजबाबीपणाची, प्रसंगावधानाची, आणि मुत्सद्दीपणाची अण्णासाहेब एवढी तारीफ करीत कीं 'अनुकूल काल असता तर विष्णुपंत नाना फडणीसाच्या योग्यतेस चढले असते,' असें ते नेहमीं म्हणत.

यांच्या प्रमाणेंच गणपतराव आठवले, पंजाब, इंद्रस्वरूप, बारीक मास्तर वामनराव दातार, व माधवराव गोडबोले अशी लहानमोठी मंडळी क्रमाक्रमानें त्यांच्या सहवासाला आली, आणि त्या सर्वांवर त्यांचा लोभ असून प्रत्येकांशीं त्यांचें कांहीं विशेष सहकार्य ठरलेलें असे. गणपतराव आठवले होते तोंपर्यंत त्यांना घेतल्याखेरीज अण्णासाहेब कधीं आळंदीस गेले नाहींत. त्यांच्या मागून पुरुषोत्तमपंत हे होते. त्यांना अण्णासाहेब नेहमीं पंजाब असें म्हणत. इंद्रस्वरूप हे उत्तरहिंदुस्तानी वैद्य होते. पुष्कळ वर्षेंपर्यंत अण्णासाहेब यांचेकडील आण–ने, बाजारहाट तेच करीत असत. वामन हा तर त्यांच्या बहिणीचा नातु. याचा निर्मळ व लहान पोरासारखा सरळ स्वभाव, आणि अण्णासाहेब यांचे वरील एकनिष्ठा ही खरोखरच अप्रतिम होती. 'हें एक महाराजांचें बालस्वरूप होतें, केवळ संतांचा कोंब,' असें त्याच्याविषयीं अण्णासाहेब म्हणत. माधवराव गोडबोले हे धुळें येथील प्रसिद्ध वकील रा० गोविंदराव गोडबोले यांचे चिरंजीव. बी. ए पास झाल्यावर यांनीं एल्. एल्. बी. चाही अभ्यास केला व पुढें खुद्द वडलांच्या उपदेशानें संसारत्याग करून ते अण्णासाहेब यांचेकडे आले. अण्णासाहेब यांच्या आज्ञेप्रमाणें आज सुमारें पंधरा वर्षें हे आळंदीसच राहत असतात. आळंदी येथील महाराजांच्या संस्थानचे दुसरे अधिपती श्रीभक्त शंकरबुवा यांच्या मागून यांनाच एकमतानें गादीवर बसविण्यात आले. त्याप्रमाणें श्रीमहाराजांची सेवा सर्व प्रकारें करून संस्थानचा लौकिक व्यवहार हे किती दक्षतेनें करतात ते सर्व लोकांस ठाउकच आहे.

# श्रीमंत बाळासाहेब नातु.

बाळासाहेब नातु हे इतिहास प्रसिद्ध बाळाजीपंत नातू यांचे वंशज. श्रीमंत तात्यासाहेब रायरीकरांच्याप्रमाणेंच याही पुरुषाच्या मनास पूर्वजांच्या कृतीचें मोठें दुःख होत होतें. यांचा स्वभाव बाणेदार व तेजस्वी होता. आणि स्वधर्माभिमानही चांगलाच होता. पुण्यांत त्या वेळेला सुधारणेचीही लाट उसळली होती. तिच्या विरुद्ध पक्षाचें पुढारीपण बाळासाहेबांकडे होतें बाळासाहेब आणि अण्णासाहेब यांचा यामुळेंच मोठा स्नेह होता. व बाळासाहेबांच्या मनांत अण्णासाहेबांच्याविषयीं फार पूज्यबुद्धि होती.

प्लेगच्या सालीं जेव्हां बाळासाहेबांस सरकारनें अटकेंत ठेविलें तेव्हां त्यांच्या सुटकेकरितां अर्ज करण्याचें काम अण्णासाहेब यांचेकडे आलें. एका अर्जावरून बाळासाहेब सुटतील असें कांहीं कोणास वाटत नव्हतें. परंतु अर्ज जातांच एका पळाचाही विलंब न करितां सरकारनें बाळासाहेबांस जे तडकाफडकी सोडून दिलें तें पाहून सर्वांसच आश्चर्य वाटलें. अर्जांत एवढें अण्णासाहेबांनीं लिहिलें तरी काय होतें, हे विचारण्याकरितां दाजीसाहेब खरे तर लागलेंच अण्णासाहेब यांचेकडे आले होते असें प्रत्यक्ष माहितीवरून समजतें. राजकीय कैद्यासंबंधीं दुसऱ्या जेम्स राजाच्या वेळचा कोठलासा एक कायदा नजर चुकीनें रद्द करावयाचा राहिला होता, नेमका तेवढ्याचाच उपयोग करून अण्णासाहेब यांनीं बाळासाहेबांस सोडविलें.

बाळासाहेबांचा व यांचा एवढा स्नेह असतांही अण्णासाहेबांनीं त्याचे येथें पाण्याचा एक घोटही कधीं घेतला नाहीं. आणि धन्य बाळासाहेबांची कीं, त्यांनींही त्याबद्दल मनांत कधींही विषाद धरला नाहीं. शहाण्णव सालीं साताऱ्यास प्राव्हिंशिअल कान्फरन्स झाली होती. तिला बाळासाहेब व अण्णासाहेब दोघेही गेले होते. बाळासाहेब यांच्या कंपूतच अण्णासाहेब उतरले होते. परंतु ते कांहीं खात नसत नुसतें दूध पीत. तेव्हां बाळासाहेब यांनीं एकदां त्यांना विनंति केली कीं, आपण खात कां नाहीं ? चला तुम्ही आम्ही बरोबर बसून जेऊं. अंगावरचें उपरणें त्यांच्या पुढें टाकून अण्णासाहेब म्हणाले कीं, आनंदाची गोष्ट आहे. न जेवावयास काय झालें; पण माझी एक अट आहे; हें उपरणें घ्या व चार घरीं माधुकरी मागून

आणा. म्हणजे तुम्ही आम्ही भोजन करूं. एरवीं तुमचे एथलें अन्न स्पर्श करण्यासही योग्य नाहीं. याप्रमाणें निर्भीड व चोख उत्तर ऐकतांच बाळासाहेब यांना वाईट तर वाटलेंच परंतु अण्णासाहेब यांचें म्हणणें बरोबर आहे असा विचार करून त्यांनीं त्याचा विषाद करणें टाकून दिलें. इतकेंच नव्हे तर तर त्यांच्या मनांतील आदर उलटा द्विगुणित झाला. असो. अण्णासाहेब यांच्या निर्याणाच्या पूर्वी सुमारें दोन वर्षे मधुमेहाच्या विकारानें बाळासाहेब पुण्यासच वारले.

# लोकमान्य आणि अण्णासाहेब.

लोकमान्य टिळक व अण्णासाहेब यांचा संबंध तर लोकविश्रुतच आहे. लोकमान्य हे मूळचे रानड्यांच्या तालमीतले. परंतु रानड्यांसारख्या शांतिब्रह्माच्या सहवासांत त्यांच्या आंगच्या ‘ वीरो रसः किमयमेत्युत दर्प एव ’ अशा क्षात्रवृत्तीला नीट वाव मिळेना व लौकरच रानड्यांच्याविषयीं मनांत अतिशय आदर असूनही त्यांना रानड्यांना सोडचिठ्ठी द्यावी लागली. मद्रासेस जाण्यापूर्वी अण्णासाहेब यांनीं डेक्कनस्टार व किरण अशी दोन पत्रें सुरू केलीं होतीं. पैकीं डेक्कनस्टार हें इंग्रजी होतें व किरण हें कांहीं इंग्रजी व कांहीं मराठी असें होतें. अण्णासाहेब यांच्याजवळ ज्या अनेक प्रकारच्या योग्यतेच्या माणसांचा संग्रह होता. त्यांत माधवराव नामजोशी हेही एक होते. या गृहस्थांच्या अंगांत विद्वत्ता इत्यादि गुण जरी विशेष नसले तरी गोड भाषण खुबीदार रीतीनें दुसऱ्याचें मन वळविणें एकाद्या कार्यास हात घातला कीं, त्याच्याकरतां वाटेल त्या खटाटोपी करण्याची उपद्व्यापशक्ती व धोरणीपणा वगैरे अनेक गुण होते. मुंबईस ज्या कांहीं अनेक औद्योगिक चळवळींचा उपक्रम अण्णासाहेब यांनीं केला होता, त्यांचे सुईणपण नामजोशांच्याकडे होतें. मद्रासेस जाण्यापूर्वी डेक्कनस्टार व किरण यांचे रूपांतर मराठा व केसरी यांच्यांत केल्यावर नामजोशी व टिळक यांचा विशेष संबंध आला. ह्याच अण्णासाहेब व टिळक यांच्या संबंधांतील मधला दुवा आहे.

नामजोशी व टिळक यांचा संबंध नामजोशी असेपर्यंत तसाच टिकला. गणपतिउत्सवानंतर अण्णासाहेब व टिळक यांचा प्रत्यक्ष संबंध पडूं लागला. तरीही नामजोशी यांच्या द्वारें त्यांचा व अण्णासाहेब यांचा संबंध पूर्वीपासूनच होता. नामजोशी असेपर्यंत टिळक व्यवस्थेशीर होते व पुढें ते वाहवले असा जो एक प्रवाद आहे त्यांत किती तथ्य आहे हें यावरून लक्षांत येईल. कारण नामजोशांच्या मागें असलेले अण्णासाहेब हे जवळ जवळ टिळकांच्या अखेरपर्यंत होते. आणि सर्व महत्त्वाच्या बाबतींत त्यांचा सल्लाही घेतला जात असे. असो.

धैर्य, साहस, विलक्षण चिकाटी, प्रखर स्वाभिमान, वगैरे दोघांच्याही आंगच्या गुणसाधर्म्यामुळें अण्णासाहेब यांचा टिळकांवर फार लोभ जडला.

व उत्तरोत्तर तो वाढतच गेला. टिळकांच्या मनांतही अण्णासाहेब यांच्याविषयीं पराकाष्ठेचा आदर होता. किंबहुना राष्ट्रपुरुष या नात्यानें अण्णासाहेब यांची योग्यता केवढी मोठी होती याची जाणीव असणारा पुण्यांत तेवढाच एक पुरुष होता. सर्व तऱ्हेच्या अनुभवांच्या भट्टींतून बाहेर पडलेल्या अण्णासाहेब यांच्या धार्मिक सामाज़िक वगैरे मतांचे व टिळकांचें पटणें अर्थातच शक्य नव्हतें परंतु त्यामुळें त्यांच्या लोभांत कधींच अंतर आलें नाहीं. याचें कारण असें कीं, पंचहौद प्रकरण जर सोडून दिलें तर वरील बावतींत टिळकांची 'न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति' अशी उपेक्षावृत्ती असल्यामुळें टिळकांचा एखादा वेगळाच पक्ष होऊन दोघांचा उघड विरोध होण्याचें कारण नव्हतें. व राजकीय बाबतींत तर दोघांचीही आकांक्षा एकच होती त्यामुळें हे विरोध आड न येतां लोभ वृद्धिंगतच होत गेला. किंबहुना टिळकांच्या या इतर बाजूकडे न पाहातांच त्यांच्यावर लोभ करावयाचा असें अण्णासाहेब यानीं ठरविलें असावें असें दिसतें.

"आम्ही दोघेही गाडींत बसून चाललों होतों. वाटेंत आमचें बरेंच बोलणें झालें तेव्हांपासून मी त्यांच्याविषयींचें आपलें धोरण ठरवून टाकलें" असें एकदां त्यांनीं सांगितलें. तें कांहीं असलें तरी एवढें खरें कीं, दोघांचा संबंध अतिशय जिव्हाळयाचा होता. व टिळकांच्या सर्व प्रयत्नांस त्यांची सहानुभूती असे. चोंहीकडे माजलेल्या षड्गुणैश्वर्यामुळें जेथें तेथें त्यांना एकट्यालाच पुढें पडावें लागतें, याचा त्यांना मनापासून संताप येई. व त्यामुळें त्याला यश बुद्धि तेज यांचें कृपादान द्यावें म्हणून ते महाराजांची नित्य प्रार्थना करीत. मागें एका ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें त्यांनीं स्वतःच ही गोष्ट सांगितली. लखनौ कॉंग्रेसच्या वेळचा टिळकांचा जयजयकार ऐकून अण्णासाहेब यांस झालेला आनंद ज्यांनीं आळंदीस पाहिला त्यांना तरी शिवरायाकरितां 'तुझा तूं वाढवी राजा' म्हणून तुळजा भवानीची करुणा भाकिल्यावर आनंदवनभुवन पाहाणाऱ्या श्रीसमर्थांची आठवण झाल्यावाचून राहिली नसेल.

लोकमान्यांचें गीतारहस्य बाहेर पडल्यावर त्याची एक प्रत भेट म्हणून यांचेकडे आली. गीतारहस्यानें वाङ्मयक्षेत्रांत कांहीं वेळ केवढी खळबळ उडवून दिली होती, तें प्रसिद्धच आहे. परीक्षणें, निरीक्षणें, खंडणें, आणि मंडणें, टीका प्रतिटीका व व्याख्यानें असें मार एकच रण माजून राहिलें होतें.

यामुळें जवळ जवळ एक वर्ष अशाच रितीनें गेलें. लोकमान्यही धिमेपणानें प्रत्येकास यथायोग्य म्हणजे कोणास शास्त्रीय पद्धतीनें, कोणास युक्तिवादानें असें जल्पवितंड आदिकरून, सर्व वादपद्धतींनीं उत्तर देत होते. अण्णासाहेब यांचे येथेंही यासंबंधीं रोज मोठी चर्चा चाले. अनुकूल प्रतिकूल पक्षाचें लोक भेटा-वयाचेच व अण्णासाहेब यांचें मत मिळावें म्हणून त्यांच्याशीं चर्चा करीत. स्वतः अण्णासाहेब यांनीं हा ग्रंथ वाचून घेण्याचा प्रयत्न केला परतु विषय-प्रवेशापलीकडे काहीं केल्या त्यांची मजल जाईचना. त्यामुळें त्यांच्या तोंडून गीतारहस्याविषयीं निश्चित मत असें कोणासच ऐकावयास मिळालें नाहीं. आलेला मनुष्य जशी विचारसरणी घेईल तशीच घेऊन तशाच प्रकारची विचारसरणी घेऊन अण्णासाहेब त्याच्याबरोबर चर्चा करीत व त्यामुळें अण्णासाहेब हे आमच्याच बाजूस आहेत असें समजणारे पुष्कळ लोक आहेत. वस्तुतः त्यांनीं त्या ग्रंथावर अभिप्राय असा कांहीं दिलाच नाहीं. आणि त्याचें कारण त्यांनीं तो स्वतः नीट वांचला नव्हता हेंच आहे. तरी पण ऐकीव माहिती वरून त्यांना सर्व टीकाकारांच्या व त्या ग्रंथांतील अनुकूल प्रतिकूल, मर्मस्थलांचें चांगलें ज्ञान होतें.

लोकमान्यांचा ज्ञानोत्तर कर्म केलेंच पाहिजे हाच श्रीकृष्णावरील 'च' काराचा आरोप त्यांना कितपत मान्य होता हें सांगणें कठीण आहे. एकंदर ग्रंथाविषयीं असे दोन उद्गार त्यांनीं काढल्याचें स्मरणांत आहे. तरी पण पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि आर्य तत्त्वज्ञान यांची साधिकारपणानें तुलना करून पाश्चात्य विचारसरणीप्रमाणें पाहिलें असतांही आमचें तत्त्वज्ञानच कसें परिपूर्ण आहे आणि मनुष्याच्या जीविताशीं संबंध असलेले सर्व प्रश्न त्यानेंच कसे सुट-तात असे सिद्ध करणारा तो एक ग्रंथ असल्यामुळें वाङ्मय क्षेत्रांतील भारतीय श्रेष्ठत्वाच्या कीर्तिस्तंभाप्रमाणें त्यांना त्याचें महत्त्व वाटे. व तेवढ्याकरितां कोठें कांहीं दोष जर त्यांत असले तर ते निघून जाऊन तो अगदीं निर्दोष व्हावा एवढ्याच दृष्टीनें त्याचें परीक्षण करावें असें ते म्हणत. म्हणजे त्यांतही लोकमान्यांचीं कीर्तिकुसुमें अम्लान राहून त्यांचा परिमल दशदिशांत कसा भरून राहील याचीच चिंता दिसून येई. रहस्यनिरीक्षण करणाऱ्या अनेक वादी पुरुषांची दृष्टी व ही दृष्टी यांच्यांतील जमीन अस्मानाचा फरक पाहिला म्हणजे फार मौज वाटते. किंबहुना कोणच्याही हिंदू मनुष्यानें केलेल्या असल्या कृतीकडे पाहण्याची त्यांची हीच दृष्टी असे.

गीतारहस्याविषयीं कांहीं विशेष बोलले असलेच तर एक वेळेला "अरे अकराव्या अध्यायाबद्दल काय लिहिलें आहे. गीतेंत अकराव्या अध्यायाचें काय महत्त्व आहे हें ज्याला कळलें, त्याला गीतारहस्य कळलें. त्याच्याखेरीज निष्काम कर्म म्हणजे काय हें कळणार नाहीं व होणारही नाहीं. नुसतें 'निष्काम कर्म' 'निष्काम कर्म' म्हटलें म्हणजे झालें वाटतें!" असें म्हटल्याचें आठवतें. त्याचप्रमाणें भारतांतील नारायणी आख्यानास लोकमान्यांनीं अतिशय उचलून धरून त्यावर पुराव्याचा मुख्य भर ठेवला आहे. पण या साक्षीदाराच्या महत्त्वाविषयीं, अधिकाराविषयीं व खरेपणाविषयीं ते शंका प्रदर्शित करीत. नारायणीयांतील विश्वरूप दर्शनाबद्दल तर ते नेहमीं म्हणत कीं, 'याचा मला उलगडा होत नाहीं. जीवाचें गाडें कोठें तरी जबरदस्त अडलेलें चालू करण्याकरतांच असल्या प्रकारचे चमत्कार होतात. ते काय सुखासुखीं वाटेवर पडले आहेत. अशा तऱ्हेचे जबरदस्त प्रयोजन नारदासंबंधीं उपस्थित झालेलें तेथें कांहींच दिलें नाहीं" असें ते म्हणत. व विश्वरूपदर्शन म्हणजे काय? आणि त्याच्यांत व मृत्तिकाभक्षक बाळकृष्णानें यशोदामातेस दाखविलेल्या विश्वरूपांत किंवा तसल्याच पुराणांतील इतर प्रसंगांत काय फरक आहे तोही सांगत. अकराव्या अध्यायांत भगवंतांनीं अर्जुनास नुसतें आपलें ऐश्वर्यच दाखविलें नाहीं. तर त्याला भगवत्संकल्पाचें ज्ञान करून दिलें अशा तऱ्हेची कांहीं त्यांची विचारसरणी होती. असो.

लोकमान्य मंडालेहून आले त्यावेळीं त्यांना कसा आनंद झाला तें मागें सांगितलेंच आहे. नेहमीं लोकमान्यांविषयीं वडील माणसांनीं होतकरू अशा गुणी मुलाचें कौतुक करावें त्याप्रमाणें अरे तुरे असा प्रयोग करून आनंदानें बोलत असतां त्यांचा लोभ व्यक्त होई. आणि लोकमान्यही तशाच जिव्हाळ्यानें त्यांच्याशीं वागत. मंडालेहून आल्यावर प्रायश्चित्त वगैरे घेऊन देवदर्शनास गेले असतां प्रथमतः श्रीगणपती व अण्णासाहेब यांचें दर्शन घेऊन त्यांनीं आपल्या व्यवहारास सुरवात केली हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

# साधु गुलाबराव माधानकर.

गुलाबराव माधानकर यांचें नांव माहीत नाहीं असा इसम वऱ्हाडांत तरी विरळाच. शूद्र जाती, जवळ जवळ जन्मांधत्व, लहान वय इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां त्यांच्या विद्वत्तेनें मनुष्य थोडासा थक्क होऊन जातो. यांचें चरित्र प्रसिद्ध झालेलें आहे. तेव्हां त्याविषयीं अधिक कांहीं लिहावयाचें नाहीं. त्यांचा आणि अण्णासाहेबांचा संबंध कसा आला हें मागें सांगितलेंच आहे. वादविवादाची खुमखुम जिरली नाहीं म्हणून इतकेंच तर काय पण अण्णासाहेब यांनीं स्वतःची नुसती विचारपूसही केली नाहीं म्हणून त्यांचा अण्णासाहेबांवर रोष होता. व त्यांच्या लिहिण्यांत क्वचित् कोठें तो उमटून पडतो. परंतु पुढें अण्णासाहेबांवरील हा त्यांचा राग नाहिसा झाला व उलट त्यांच्यावर त्यांची भक्ती जडली तो प्रसंग असा.

गुलाबराव महाराजांस बद्धकोष्ठतेचा विकार होता. हळूहळू त्याचें पर्यवसान क्षयांत झालें. काय कारण असेल कोण जाणे पण आपणांस क्षयाची भावना झाली असें त्यांना पक्कें वाटतांच त्यांनीं अण्णासाहेब यांचेंच औषध घ्यावयाचें ठरवून ते पुण्यास आले, व अण्णासाहेबांच्या देखरेखीखालीं उपचार सुरू झाला. या निमित्तानें दोघांचा सहवास घडून गुलाबरावांचें मनांत अण्णासाहेबांविषयीं आदर उत्पन्न झाला व तो एकसारखा वाढतच गेला. आणि पुढें पुढें तर अण्णासाहेब यांच्या भेटीकरतां त्यांचा जीव तरसूं लागला. पांच मिनिटें तरी रोज तुम्ही मला भेटा म्हणजे झालें. त्यानें मला जें बरें वाटतें तें सांगतां येत नाहीं असें ते म्हणत. त्याप्रमाणें अण्णासाहेब हे रोज भेटावयास जात. तेवढ्याकरितां गुलाबरावांची माणसें व्हिक्टोरिया घेऊन दाराशीं तीन तीन तास वाट पहात बसत. अशाच एका प्रसंगीं आतां आयुष्य किती उरलें आहे तें सांगा म्हणजे मी माझी तयारी करतों असें गुलाबराव यांनीं विचारलें. त्यावर अण्णासाहेब यांनीं चटदिशी अभ्यासी माणसांनीं आपला बाहेर जाणारा प्रत्येक श्वास हा शेवटचाच आहे असें समजून चालावें असें उत्तर दिलें.

अशाच एका प्रसंगीं दारावरून कांहीं लोक गाई विकावयास नेत असतां एक गाय विकत घ्यावयाची इच्छा होऊन गुलाबराव यांनीं ती विकत घेतली. तेव्हां तिच्याकरतां पांच रुपये अण्णासाहेब यांनींही दिले. पुढ ती गाय कोठें

ठेवावी असा प्रश्न पडला कारण ती दुभती नसून लंगडी होती. अखेरीस ती अण्णासाहेबांनीं आपलेच घरीं ठेऊन घेतली. ती लंगडी व आजारी असल्या-मुळें तिला नेहमीं बांधून ठेवावी लागे. पुढें ती अतिशय आजारी पडली तेव्हां तिची एखाद्या माणसाप्रमाणें शुश्रूषा अण्णासाहेब यांनीं करविली. विन पाण्याचें उत्कृष्ट दुधावर तिला ठेवून सर्वप्रकारचें उपचार करून पाहिले व अखेरीस तिनें देह ठेवल्यावर तिला आळंदी येथें रवाना करून जांबूळ बेटांत समाध देवविली. व स्वतः तिच्या करतां स्नान करून मग त्यांनीं अन्नग्रहण केलें. या गुलाबराव महाराजांच्या गुणांचें व धर्मशास्त्रांवरील श्रद्धेचें अण्णासाहेब फार कौतुक करीत. आणि त्यांच्या दुखण्यांत रा. हरीभाऊ केवले नाना कवि मंडण वगैरे त्यांच्या सभोंवतालच्या मंडळींनीं त्यांची जी शुश्रूषा केली तिचीही प्रशंसा करीत.

# वकीली.

श्रीअण्णासाहेब यांच्या चरित्रासंबंधीं इतर गोष्टी सांगितल्यावर *वकीली-संबंधीं थोडेंबहुत तरी लिहिणें अवश्य आहे. परंतु तितकेंच तें काम कठीणही आहे; कारण एक तर मला स्वतःला कायद्याचें ज्ञान नाहीं; व दुसरें असें कीं, त्यांनीं कोर्टांत जाऊन पद्धतशीर वकीली कधीं केली नाहीं. परीक्षा पास झाल्यावर, काय वर्ष सहा महिने हायकोर्टांत गेले असतील तेवढेंच. त्या वेळचा त्यांचा थाट, व कोर्टांत काम चालविण्याचें कौशल्य हीं सांगणारें विशेषसें कोणी आढळत नाहीं; परंतु जर त्यांनीं काम केलें असतें तर महादेव चिमणाजीप्रमाणेंच त्यांचेंही नांव झालें असतें, हें खास. हायकोर्टांत जाण्यापुरता इंग्रजी फुल् ड्रेस घालावा, व घरीं येतांच तो काढून ठेवावा, इतका त्यांना त्या पोषाखाचा तिटकारा होता. तरी पण ते त्या सर्व थाटानिशीं हायकोर्टांत जात. त्यावेळेस बरोबर त्यांच्या नांवाचे चांदीचे बिल्ले असलेले दोन पट्टेवाले व पुस्तकांचा गठ्ठाही असेच. परंतु असें फार दिवस चाललें नाहीं. हायकोर्टांत वकीली करून पैसा मिळवावा, इकडे त्यांचें मुळीं लक्षच नव्हतें. त्यांस लोक-संग्रहाचा व शिक्षणाचा मोठा व्याप करावयाचा होता, तिकडेच त्यांचें तन-मनधन गुंतलेलें होतें. म्हणून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सालरजंग प्रकरणांत गुंतून ते मद्रासला गेले. तेथून ते कसे पालटून आले, वगैरे हकीकत पूर्वीं आलीच आहे. त्यानंतर स्वतः त्यांनीं कधीं कोर्टांत पाय ठेवला नाहीं, अथवा घरीं बसून देखील धंदा म्हणून वकीली कधीं केली नाहीं. अर्ज लिहिणें, अपीलें करणें, हरप्रकारचा वकीली सल्ला देणें, वगैरे कामें थोडींबहुत त्यांचीं अखेरपर्यंत चाललींच होतीं. आणि अशा किरकोळ कामांवर त्यांनीं कधीं पैसाही मिळविला नाहीं. परंतु सुदैवानें त्यांच्या उत्कृष्ट लौकिकामुळें संस्थानिक व धनिक अशा लोकांचीं कामें त्यांच्याकडे आलीं, आणि त्यामुळें त्यांस

---

*वस्तुतः हा लेख दुसऱ्या खंडांतच यावयाचा. पण या विषयावर रा. बाबासाहेब यांचेकडून थोडें लिहून घ्यावें ही कल्पनाच आमच्या डोक्यांत फार उशीरा आल्यामुळें तो येथें द्यावा लागत आहे.

थोडी बहुत प्राप्तीही पण झाली. अशा लोकांशीं वागतांना, आपण धंदेवाईक वकील आहों, अशा तऱ्हेनें ते वागत नसत. श्री. दादासाहेब खापर्डे हे त्यांच्याविषयीं नेहमीं म्हणतात—"He was not a lawyer but a jurist." असलेल्या कायद्याचा कुशलतेनें उपयोग करून, मनाजोगतें काम करून घेण्यापेक्षां कायदेशास्त्राची उत्पत्ति व मांडणी यांच्या निरनिराळ्या उपपत्ति बसवून, व नवीन नवीन तऱ्हेच्या मांडणी प्रकल्पून स्वतःचा पक्ष यशस्वी करून घेण्यांतच त्यांचें अप्रतिम नैपुण्य होतें, किंवा दोनहीं तऱ्हेनें त्यांचें नैपुण्य सारखेंच होतें, हें कळण्यास साधन नाहीं. कारण त्यांनीं कोर्टांत विशेष कामच केलें नाहीं.

अण्णासाहेब यांच्या वकिलीसंबंधीं थोडी फार अधिक माहिती असली तर त्यांचे चिरंजीवांनाच असण्याचा संभव. म्हणून त्याविषयीं थोडक्यांत लिहून देण्याविषयीं आम्ही त्यांनाच विनंति केली; व त्यांनींही मोठ्या आनंदानें हें काम पत्करून एक छोटासा लेख लिहून दिला. याबद्दल जरी आम्हांस आनंद होत आहे तरी देखील त्यांनीं स्वतःच्या वडिलांच्या केलेल्या या सेवेबद्दल आभार मानण्याचा अतिप्रसंग कसा करावा हेंही समजत नाहीं. रा. बाबासाहेब यांचा लेख जसाचा तसाच खालीं दिला आहे.

श्रीअण्णासाहेब हे आर्टस्प्रमाणें कायद्याचेहि पदवीधर होते आणि त्यांनीं हायकोर्टांत वकीली करण्याची सनदहि काढली होती तेव्हां त्यांनीं वकीली कशी काय चालविली हें जाणण्याची इच्छा सहजच होते. परंतु ती तृप्त होणें शक्य नाहीं. सन १८७९ सालचे सुमारास त्यांना सनद मिळाली त्याप्रमाणें त्यांनीं पांच सहा महिने मुंबईस कामहि केलें, व हायकोर्ट वकिलाला त्यावेळीं शोभेल असा इतमामहि ठेवला. परंतु भवितव्यता निराळीच होती. सन १८८० सालीं सर सालरजंग यांच्या वऱ्हाडासंबंधींच्या योजनेचें कार्य त्यांनीं आंगावर घेतलें व त्यांच्या स्वभावाप्रमाणें त्यांत स्वतःचा पैसा व बुद्धिमत्ता हीं दोन्हीं खर्च करून तें जवळ जवळ शिजवून आणलें. त्याचवेळीं मद्रासनजीक कारव्हटनगर येथील जहागिरी संबंधाचेंहि तसेंच एक काम त्यांचेकडे आलें व दोन्हीं कामें एकाच वेळीं पार पाडण्याच्या निश्चयानें त्यांनी सन १८८० सालीं मद्रासेस प्रयाण केलें. तेथें त्यांचा मुक्काम सरासरी ३॥ वर्षें होता. त्यांचा स्वभाव मुळापासूनच जरी धर्मनिष्ठ, देशनिष्ठ, स्वाभिमानी आणि स्वार्थ-


परङ्मुख होता तरी अत्यंत कडकडीत वैराग्य, निष्कांचनत्व आणि निरपेक्ष परोपकार हा मार्ग जो त्यांनीं पुढें कायमचा स्वीकारला त्याला आरंभ मद्रासकडे असतांनाच झाला. अण्णासाहेब मद्रासेहून सन १८८४ सालीं पुण्यास परत आले ते व्यावहारिक दृष्ट्या बदललेले असेच आले. त्यांच्या स्वार्थत्यागी आणि निश्चयी स्वभावाची ज्यांना माहिती होती. त्यांना हें परिवर्तन आश्चर्यकारक वाटलें नाहीं. परंतु वर्षानुवर्ष किंबहुना त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत तें कायम टिकेल अशी मात्र कोणाचीहि कल्पना नसेल व अण्णासाहेबांनींहि आपल्या निश्चयाची परिस्फुटता कोणाजवळ केली नाहीं. त्यामुळें धंदेवाईका-प्रमाणें कायद्याचें काम ते मधून मधून घेत व तें अगदीं मन लावून करीत. तथापि पुण्यास परत आल्यानंतर प्रत्यक्ष वकीलपत्र घेऊन कोर्टांत कधींही काम केलें नाहीं. परंतु वकीलीचातुर्याचा जो अर्थ लोक समजतात—म्हणजे कायद्याची बारीक छाननी करून त्यावरून आपल्याला अनुकूल अशा तऱ्हेनें आपली बाजू सजविणें, आणि प्रतिपक्षाचे मुद्दे साधार खोडून काढणें—त्या अर्थाप्रमाणें पाहिले असतां त्यांनीं आपली वकिली उत्कृष्ट लढविली असें दिसून येईल. सातारचे महाजनी, पुण्यातील त्यांचे आप्त गणेश दिनकर जोशी; मित्र बाळशास्त्री लागवणकर, त्यांचे दुसरे मित्र भाऊ साठे, तळवड्याचे भालेकर, कोठिंब्याचे इनामदार इत्यादिकांचे मोकदमे व त्याचप्रमाणे वाईकर शेखमिरे, विष्णुपंत साठे, पांडुरंगराव बारी इत्यादि मित्रांचे लहानमोठे अर्ज या सर्व प्रकरणांत त्यांनीं आपल्या बाजूचें म्हणणें लेखी मांडलें आहे. आपलें म्हणणें लेखी मांडण्याविषयीं त्यांचा कटाक्ष फार असे. वकीलानें भाषण करावें व जज्जानें त्यांतून त्याला हवा तो मजकूर टांचण म्हणून उतरून घ्यावा हा प्रकार त्यांस पसंत नव्हता. त्यामुळें त्यांनीं आपलें म्हणणें कोर्टाचें कामांतसुद्धां लेखीच दिलें. त्यामुळें तें किती मुद्देसूद रीतीनें मांडलें व त्यांत कायद्याची कशी छाननी केली आहे हें समजून येतें. विशेषत: साठे, भालेकर, वाई कर यांचें प्रकरणांत तर त्यांच्या मुद्द्याप्रमाणेंच केवळ नव्हे तर विचारसरणीप्रमाणें कोर्टाचे निकाल झाले. साठे यांचें प्रकरणांत, गहाणखता-वरून झालेल्या हुकूमनाम्यांत ऋणकोस गहाण सोडविण्याची सवड देतात असा हुकूमनामा पुनः कायम (absolute) होणें अवश्य आहे कीं काय, असा मुद्दा निघाला. या मुद्यावर मुंबई हायकोर्टाचे निवाडेहि बऱ्याच अंशीं विरुद्धच होते. परंतु अण्णासाहेब यांच्या लेखी प्रतिपादनाचा नामदार जेन्किन्स यांचे

उहापोह होऊन पूर्वीचा निवाडा विरुद्ध असतांहि जेन्किन्स साहेबांनीं हुकूम-नामा पुनः absolute केला पाहिजे असा ठराव केला. अशा तऱ्हेनें त्यांचे पुढें सर्वच लेख कायद्याचे विवरणानें भरलेले आहेत. त्यांत चालू कायद्याचा जसा कीस काढला आहे, त्याचप्रमाणें कायदेशास्त्राचाही परामर्ष घेतला आहे. परंतु या सर्व बाबतींत जो पक्ष अन्यायाचा आहे असें त्यांस वाटलें, त्या बाजूनें त्यांनीं आपली लेखणी धंद्याच्या दृष्टीनेंहि उचलली नाहीं. हें त्यांचें धोरण निश्चित होतें. त्या कारणानें खासगी व्यक्तीपेक्षां सार्वजनिक प्रश्नावरील त्यांच्या लेखांत कायदेपांडित्य ओतप्रोत भरलेलें आढळतें सन १८९५ सालपासून अखेरपर्यंत ते सार्वजनिक सभेचे प्रमुख होते. त्यामुळें ज्यूरीप्रकरण, जमीन महसुलाचा कायदा, जातीजातींतील तंटे, नातूबंधूंची अटक, अधिकार विभागणी इत्यादि सर्व प्रश्नांवर अण्णासाहेबांनीं लेख लिहिले आहेत. त्यांत कायद्याचें विवेचन, कायद्याचें इष्टानिष्टत्व, कायद्याच्या तत्त्वांचे विचार उत्कृष्ट रीतीनें मांडले आहेत. अडचणीची गोष्ट इतकीच कीं हे सर्व लेख कोर्टांकरितां, अगर सरकारकरितां लिहिले असल्यामुळें इंग्रजींत लिहिले आहेत. नातुबन्धूंच्या अर्जांत मुंबई इलाख्यांतील १८२७च्या कायद्याप्रमाणें अटक करण्याचा जो अधिकार सरकारास आहे तो तात्पुरता आहे. महिनोंगणती अटकेंत ठेवण्याचा अधिकार सरकारला नाहीं हा मुद्दा तोंपर्यंत कोणास सुचला नव्हता तो उपस्थित करून सिद्ध करून दाखविला आहे. त्याचप्रमाणें अटक केलेल्या इसमाची खाजगी मिळकत जप्त करतां येत नाहीं हाहि एक मुद्दा होता. 'वरील अर्जाप्रमाणें नातूबन्धूंची जप्त केलेली मिळकत सरकारला लवकरच खुली करावी लागली. आपल्या विचारसरणींत प्रतिपक्षाला कायद्याच्या दृष्टीनें, अगर कायदेशास्त्राच्या दृष्टीनें दोष काढतां येऊं नये अशी पूर्ण खबरदारी अण्णासाहेब यांच्या प्रत्येक लेखांत आहे त्यामुळें कोणताही लेख आटपशीर नाहीं. तथापि लेखनशैली अत्यंत स्पष्ट अशी आहे आणि एकेक शब्द तोलून लिहिला आहे. हयगय किंवा चालढकल याचें नांवच नको. लेख त्यानीं तोंडानें सांगावा व लेखकानें लिहावा असा त्यांचा परिपाठ असे. त्यांच्या अनेक धार्मिक व्यवसायामुळें लिहिण्याचें काम बहुधा रात्रीं ११ च्या पुढें सुरू होई त्यामुळें लेखक टेकीस येऊन कंटाळून जाई. आपलें म्हणणें मांडावयाचें तें किती मुदतींत मांडलें पाहिजे किंवा किती थोडक्या शब्दांत, किंवा किती आर्जवी भाषेंत मांडलें पाहिजे

या गोष्टीकडे त्यांनीं यत्किंचित् लक्ष दिलें नाहीं. त्यामुळें बहुतेक प्रसंग असा येई. कीं अर्ज मुदतीच्या अखेरच्या दिवशींच जावयाचा. अर्जाची भाषा उद्दाम नसे परंतु आर्जवी मुळींच नसे. एखादा वक्ता आपलें म्हणणें श्रोत्यांना ज्या तऱ्हेनें समजावून देतो, त्याप्रमाणें निर्भीडपणें त्यांनीं आपल्या मुद्याचें सर्वत्र समर्थन केलें आहे. त्यामुळें व्यक्तिविषयक संदर्भ काढून टाकून निरनिराळ्या लेखांतील विचारसरणीचेंच जर एकीकरण केलें तर कायदेशास्त्राचा एक ग्रंथ होईल. सर्व विवरण अशा चोख पद्धतीचें आहे. त्यांच्या पारमार्थिक आचरणांतील पुष्कळ गोष्टींचा उलगडा सामान्य मनुष्यास होत नसे. व त्यांनींही त्याचा हेतु फारसा कोणास सांगितलेला नाहीं. परंतु ज्याप्रमाणें त्यांच्या वैद्यकीय प्राविण्याचा आणि निरपेक्ष वैराग्याचा अनुभव सर्व जनतेस वाटेल तसा व वाटेल त्यावेळीं घेतां आला त्याप्रमाणेंच त्यांच्या कायद्यांतील निरनिराळ्या तत्त्वांच्या विवेचनाचा अनुभव घेण्याची त्यांच्या लेखामुळें सोय झाली आहे, नाहीं तर वैद्यकशास्त्रावर त्यांनीं ग्रंथरचना केली नसल्याकारणानें त्यांचे वैद्यकीय चातुर्य आतां आख्यायिकेंतच शिल्लक राहिलें आहे.तशी गोष्ट त्यांच्या कायद्याच्या ज्ञानाची नाहीं. त्यासंबंधानें किंवा राज्यघटनेसंबंधानें त्यांचे जे विचार होते ते त्यांच्या लेखांत आज उपलब्ध आहेत.

जमिनींवर मालकी राजाची कधीं नव्हती व असणें अन्याय्य आहे असें त्यांचें मत होतें. त्याचप्रमाणें राजा हा लोकांनीं निवडलेलाच असला पाहिजे, त्याची सत्ता कायद्यानें उर्फ शास्त्रानें मर्यादित असली पाहिजे, न्यायाच्या कामांत वस्तुस्थितीचा व वहिवाटीचा निर्णय पंचानींच केला पाहिजे आणि अशाच तऱ्हेची पद्धति आर्यधर्मशास्त्राची आहे असें त्यांचें म्हणणें होतें. अशा तऱ्हेचीं मतें हल्लीं पुष्कळांचीं आहेत. परंतु अण्णासाहेब यांच्या लेखांत या विषयाची मांडणी कांहीं अपूर्व कोटिक्रमानें केलेली आढळते. मी म्हणतों त्याप्रमाणें अमक्याचें मत आहे अशा तऱ्हेनें त्यांनीं इतरांचें मत आपल्या समर्थनार्थ घेतलेलें क्वचितच आढळेल. त्यांचें प्रतिपादन, तत्त्वविचार, जुने शास्त्राधार, जुने कायदे, जुना इतिहास, आणि ऐतिहासिक पुरावा यांवरच रचलेलें आहे. त्याकारणानें शास्त्रांतील तत्त्वांची ओळख त्यांच्या लेखावरून चांगलीच पटते. हे त्यांचें लेख जर प्रसिद्ध झाले तर कायदेपंडित आणि न्यायशास्त्रज्ञ या नात्यानें अण्णासाहेबांची ओळख पुढील पिढीस उत्कृष्ट होईल.

श्रीअण्णासाहेब यांचे हातचा महत्वाचा असा शेवटचा लेख म्हणजे पब्लिक सर्व्हिस कमिशननें काढलेल्या प्रश्नांचीं उत्तरें आणि डफळापूरच्या वृद्ध राणी-साहेब याच्या जहागिरींसंबंधाचें प्रकरण हे होत. त्यापैकीं डफळापूरचें काम त्यांनीं सन १९०९ चे अखेरीस हातीं घेतलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, तें त्यांचे हातून पुरें झालें नाहीं. राणीसाहेबांचे कारभारी ज्यांनीं तें अण्णासाहे-बांकडे सोंपविलें त्यांची अण्णासाहेब यांचे ठिकाणीं अत्यंत निष्ठा होती. अण्णा-साहेब यांनीं त्या कामीं पराकाष्ठेची मेहनत घेतली. त्याकरितां मराठी सरकार, इंग्रज सरकार व जहागीरदार यांचे सबंध, तहनामे व कायदा यांच्या दृष्टीनें कसे काय असावे व कसे काय होते असा त्यांत मुद्दा होता. जहागीर-दार हे इंग्रजाचे प्रजाजन नव्हेतच परंतु मांडलिकहि नव्हेत असा अण्णासाहे-बांचा निर्णय होता. ह्याचें थोडकेंसें विवेचन त्यांनीं १८९३ सालीं डेक्कन हेरल्ड या दैनिकांत एक पत्र लिहून केलें. त्यावेळीं मुंबई कायदे कोन्सिलांत जहागीरदारांनीं आपला प्रतिनिधि पाठवूं नये असा त्यांचा अभिप्राय होता. तोच मुद्दा डफळापूर प्रकरणांत अगदीं निर्विवाद सिद्ध करावयाचा अशा धोर-णानें त्यांनीं लिहिण्यास सुरवात केली. मजकूर छापूनहि तयार झाला. इत-क्यांत याहिपेक्षां दुसरा कोटिक्रम त्यांस सुचल्यानें त्यांनीं पूर्वीं छापलेला सर्व मजकूर रद्द केला व पुनः नवीन मजकूर लिहिण्यास सुरवात केली. या वेळीं त्यांचें वय ६५ वर्षांचें होतें. पूर्वीचा रद्द केलेला मजकूरहि उत्तम होता. तेव्हां तेंच प्रकरण तुम्हीं सरकारकडे पाठवा वेळ घालवूं नका असा स्पष्ट इशारा कारभाऱ्यांस त्यांच्या हितचिंतकांनीं निक्षून केला. परंतु अण्णासाहेबांच्या हातूनच काम उत्कृष्ट व्हावें अशाच सद्‌बुद्धीनें त्यांनीं तो सल्ला ऐकला नाहीं. अखेर थोडक्याच दिवसांनी म्हणजे १९१३ च्या अक्टोबरांत पूर्वोक्त कार-भारी पुणें येथेंच वारले. व तें काम त्यांचे जागीं दुसरा कारभारी आल्यामुळें अपूर्णच राहिलें. परंतु महत्त्वाची गोष्ट अशी कीं, प्राचीन राज्यपद्धतीवर अण्णासाहेबांचे अत्यंत निश्चित आणि सुंदर असे विचार याच अपुऱ्या लेखांत ग्रथित झालेले आहेत. यानंतर त्यांनीं कोणताहि लेख लिहिला नाहीं. पुढें सुमारें चार वर्षें ते मनाच्या अत्यंत उदासीन किंवा निर्विकार स्थितींत राहिले आणि "नाभिनन्देत मरणं नाभिनन्देत जीवितम्। कालमेव प्रतीक्षेत निर्देशं भृतको यथा" ॥ हें मनु महाराजांचें वचन त्यांनीं प्रत्यक्ष प्रत्ययास आणून दिलें.



ओंकारेश्वरावरील श्री अण्णासाहेब यांची समाधी.

॥ श्री ॥

# नंतर.

श्रीअण्णासाहेब यांच्या प्रयाणानंतर काय काय झालें तें सर्व पुण्यास विश्रुतच आहे. तरी पण बाहेरच्या लोकांकरितां त्याचा अगदीं त्रोटक इतिहास देतों. निर्याणानंतर लागलीच रेमार्केटांत एक सभा होऊन लोकमान्यांच्या अध्यक्षतेखालीं एक स्मारक मंडळ नेमलें गेलें. या स्मारक मंडळानें आपल्या पुढें प्रथमतः श्रीअण्णासाहेब यांचे समाधिमंदिर बांधून पूजेअर्चेची व्यवस्था करणें व नंतर एक वैद्यविद्यालय काढून त्याला रुग्णालयाची जोड देणें असे दोन उद्देश पुढे ठेविले होते. व त्याप्रमाणें आरंभीं थोडासा प्रयत्न करून त्यांनीं चार हजार रुपये गोळाही केले. परंतु लवकरच लोकमान्यांना इंग्लंडांत जावें लागलें व तेथून आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांचेंही देहावसान झालें. त्यामुळें त्यांची उत्कट इच्छा असूनही गोळा झालेल्या चार हजारांपलीकडे कांहींच झालें नाहीं. स्वतः त्यांच्याही मनास ही गोष्ट फार लागली होती. व ते असतांना त्यांनीं कार्यकारी गृहस्थांना त्याबद्दल स्पष्टपणें सांगितलें होतें. ते असते तर त्यांच्या सर्व व्यापांतूनही त्यांनीं कांहींना कांहीं तरी केलेंच असतें. त्यांच्या नंतर तर काय सर्वच ग्रंथ आटोपला ! महाराष्ट्राचें नेहमीचें दुर्दैव आडवें आलें. समाधी का विद्यालय असा वाद पडून होतां होतां आयती तयार झालेली समाधि दत्तक ( ! ) घेण्यापर्यंत कल्पना निघाल्या व सरते शेवटीं ना धड हे ना धड तें अशी मंडळाची स्थिति झाली. अखेरीस आलेली चार हजारांची रक्कम तयार झालेल्या समाधीकडे अर्धी व विद्यालयाकडे अर्धी द्यावी असें म्हणजे तिचें व्याज द्यावें असें ठरवून दोन ठिकाणीं बँकेंत टाकण्यांत आली व मंडळाच्या कार्याची पण समाप्ति झाली !

मध्यंतरीच्या काळांत कांहीं लोकांनीं स्वतंत्र प्रयत्न करून श्रीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणें श्रीअण्णासाहेब यांच्या दहनभूमीवरच समाधीचें काम उभारलें व होतां होतां त्यास आज असलेलें मंदिराचें स्वरूप प्राप्त झालें. समाधिमंदिर व त्या भोंवतालचा रमणीय देखावा यांचें चित्र या पुस्तकास जोडले-

लेंच आहे. हीच समाधि दत्तक घेण्याची शकल 'स्मारक मंडळां'त निघाली होती. असो. अजून प्रदक्षिणेची वाट वगैरे पुष्कळच गोष्टी व्हावयाच्या आहेत. पूजेअर्चेचीही सोय व्हावयाची आहे. त्यांतल्या त्यांत प्रशंसनीय गोष्ट एवढीच आहे कीं, या स्वतंत्र कार्यकर्त्या मंडळींनीं कांहींही झालें तरी श्रीअण्णासाहेब यांचा वार्षिक उत्सव मात्र अडूं न देतां मोठ्या परिश्रमानें व नेटानें चालू ठेविला आहे ! उडदामाजीं काळे गोरे असावयाचेच तरी पण ज्यांनीं स्वतंत्र रीतीनें या कामाची उभारणी केली व उत्सवास सुरवात केली, ज्यांनीं ज्यांनीं त्यास पुढें मदत करून ते आजच्या स्वरूपास आणिलें व उत्सव सुरू ठेविला व पुढेंही या कार्याकरितां ज्यांची स्वार्थत्याग करण्याची तयारी आहे ते सर्वच प्रशंसेस पात्र आहेत.

तरी पण एवढी गोष्ट खरी कीं पुण्याच्या नांवास साजण्याजोगता हा उत्सव धडाकून होत नाहीं. अनेक संस्था व उत्सव यांना जोमानें चालविणाऱ्या पुण्यानें हा कृतघ्नतेचा दोष काढून टाकिला पाहिजे व श्रीअण्णासाहेब याचेकडून अनेक प्रकारांनीं उपकृत झालेल्या पुण्याबाहेरील महाराष्ट्रीयांनींही या कामांत लक्ष घातलें पाहिजे त्याचप्रमाणें हा उत्सव केवळ एकांगी न होतां श्रीअण्णासाहेब यांच्या राजर्षित्व व ब्रह्मर्षित्व अशा सव्यसाचीपणास अनुसरून व्हावा हेंही युक्तच आहे. म्हणजे अखंडवीणा ठेवण्या बरोबरच व्याख्यानमाला, पुराणें वगैरेचीही जोड त्याच उत्सवास देऊन ज्याप्रमाणें 'वसंत' वगैरे व्याख्यानमाला आहेत तसेंच हें भक्तिज्ञानाचें संयुक्त सत्र व्हावें.

सारांश अण्णासाहेब हे ज्याप्रमाणें केवळ राजकारणी पुरुष नव्हते अथवा केवळ वेदांतीही नव्हते तर राष्ट्रपुरुष होते त्याचप्रमाणें आमच्या राष्ट्रीयत्वासंबंधानें सर्व प्रकारचा विचार करण्याचें हें एक केंद्रस्थान व्हावें. म्हणजे प्रचलित काळांत आमचें राष्ट्रीयत्व म्हणजे काय हें जेणेकरून निश्चित ठरेल व त्यामुळें धार्मिक, सामाजिक, नैतिक, शिक्षणविषयक, जातिमूलक वगैरे अनेक प्रश्नांचा उलगडा एका धोरणानें होऊन या ग्रंथांत ठिकठिकाणीं सांगितल्याप्रमाणें नवीन संस्कार व आचारविचारांच्या नवीन परंपरा उत्पन्न होतील, असलेल्या जोमांत येतील किंवा मृतप्राय झालेल्यांचा पुन्हा उद्धार होईल अथवा इतकें सर्व जरी न साधलें तरी निदान खुल्या दिलानें कोणांसही न दुखवितां या सर्व विचारांचा गोपाळकाला जेथें करितां येईल असें पंढरपूर हें व्हावें

आणि अशा तऱ्हेनें व्यवस्था होणें कठीण वाटण्याचेंही कारण नाहीं. अर्थात ही गोष्ट द्रव्यबल आणि पुण्यांतील लोकांचें अण्णासाहेबांवरील प्रेम यावरच अवलंबून आहे. उत्सवापुरतें द्रव्य तर पुण्यांतील लोकांकडून मिळतेंच. उत्सवास जास्त मनोरम स्वरूप आल्यास हें द्रव्यबल जास्त वाढून संस्थानच्या व्यवस्थेसही मदत होईल.

॥ श्री ॥

# उपसंहार.

आहार, निद्रा, भय, इत्यादि गोष्टी तर निर्माण झालेल्या यच्चयावत् जीवांस सामान्यच आहेत. त्या दृष्टीनें मनुष्यजीव आणि विश्वांतील इतर प्राणी यांच्यांत कांहीं मोठासा फरक नाहीं. फरक आहे तो इतकाच कीं इतर प्राणी या गोष्टी त्याच्यांत जी गोडी आहे तिच्याकरितांच केवळ करि-तात. म्हणजे ते याच गोष्टीकरितां जगतात व जगतात म्हणून या गोष्टी करितात. तशी माणसाची स्थिति नाहीं. या गोष्टींत जी गोडी आहे तिच्याच-करितां या न करितां जगावयाचें साधन म्हणून या गोष्टी करावयाच्या व दुसऱ्या कांहीं तरी हेतूकरितां जगावयाचें असें त्यानें मनांत आणल्यास त्याला करितां येतें. दुसरा मोठा फरक असा आहे कीं, या चतुष्टयांतील मुख्य गोष्ट जी आहार तो इतर प्राण्यांना निसर्गतः उत्पन्न झालेला असेल तसाच फक्त थोड्याशा कष्टानें मिळवून सेवन करावा लागतो, परंतु मनुष्याला मनांत आणल्यास तो स्वतःच्या इच्छेप्रमाणें निसर्गाच्या साहाय्यानें नवीन उत्पन्न करिता येतो व सेवन करितां येतो. म्हणजे एकादी विशेष इच्छा अथवा ध्येय मनांत बाळगण्याची आणि तदनुरूप असें कर्म करण्याची शक्ति त्याच्यांत आहे. म्हणूनच आहारनिद्रादिक सर्व शरीरधर्म केवळ तज्जन्य सुखाकरितांच न करितां कांहीं तरी विशिष्ट ध्येयाकरिता करण्याची व त्या ध्येयाला अनुसरून अखंड कर्म करण्याची त्याचेवर निसर्गतःच जबाबदारी आहे. मानवदेह व जन्म हा कर्म करण्याकरितांच आहे. कारखान्यांतून शक्य तितका जास्त माल ( out-turn ) बाहेर पाडण्याची जबाबदारी जशी एंजि-नियरवर आहे, तशीच जबाबदारी या देहासंबंधानें जीवावर आहे. देशकालप्राप्त व स्वतःच्या व्यक्तिविशिष्टत्वाला अनुरूप अशा भावनांना सजीव राखणें, व कोणत्याही प्रकारची वंचकता अगर कातरता न करितां, त्यांना पराकाष्ठेचें मूर्त स्वरूप देण्यासाठीं अखंड साक्षेप करीत राहणें यांतच मानवाचें मनुष्यत्व आहे. असें न करितां म्हणजे अशा कांहीं उदात्त ध्येयाकरितां न जगतां जर तो केवळ जगावयाचें म्हणून जगूं लागला व जगण्याकरितांच खाऊं पिऊं लागला तर

त्याला मनुष्यप्राणी म्हणूनच ठरवावा का मनुष्य आणि मनुष्येतर सृष्टि यांच्यातला एकादा दुवा ठरवावा याचा शास्त्रज्ञांना विचारच पडेल !

महाराष्ट्राची सांप्रतची स्थिति जर पाहिली तर असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, बहुतेक सर्व देश कुंकवास आधार होणाऱ्या म्हाताऱ्या नवऱ्याच्या स्त्रीप्रमाणें, आस्तिकपणाचा टिळा लावून महाभयंकर नास्तिकपणासह स्वैर संचार करीत आहे. आंगवळणी पडलेला सामाजिक आचारधर्म जर सोडला, तर व्यक्तीच्या प्रायशः आचारविचारादिकांचे मुळाशीं आस्तिकत्वाची भावना नाहींशी झालेली आहे. आस्तिकत्वाकरितां धर्म, धर्माकरितां नीति, आणि नीतिकरितां समाज वगैरे शास्त्रें, या प्रणालिका सुटून गेल्या असून, समाज, व्यक्ति, देश, धर्म, स्वार्थ, परमार्थ, ईश्वर, उन्नति, आचार, विचार, यांचा परस्पराशीं संबंध कांहींच राहिला नसून, तीं सर्व स्वतंत्र शास्त्रेंच होऊन बसलीं आहेत ! आयुष्याला ध्येय नाहीं; विचारांना वळण नाहीं; आचारांना आळा नाहीं; उदात्तपणाची तर कशांतही गरज नाहीं; जुन्या परंपरा मोडून गेल्या; जुनीं शास्त्रें नादान अथवा अपुरीं ठरलीं; जुने संस्कार पुसून चालले; नव्या परंपरांची गरज नाहीं; नव्या शास्त्राची उत्पत्ती नाहीं; नवीन संस्काराची सोय नाहीं ! आर्य म्हणजे काय आणि आर्यसंस्कृतीची प्रकृति काय, हाच जेथें संदेह पडला आहे, तेथें नवीन आर्यशास्त्रें, आर्यपरंपरा व आर्यसंस्कार यांची योजना व्हावी तरी कशी ? विस्कळीतपणाचा कळस झाला; 'यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि मिश्रितम्,' असलें त्रिखंड पांडित्य संपादून, 'यद्वा तद्वा' बुद्धी चालवावी, आणि अद्वातद्वा ओरड करावी, अशी अनवस्था झाली; स्फूर्तीत धैर्य नाहीं; मूर्तींत वीर्य नाहीं; कृतींत स्थैर्य नाहीं; शरीरांत त्राण नाहीं; जीवनांत प्राण नाहीं; असल्या स्थितींत गांधींसारख्या शतं भीष्म म्हणविणाऱ्यास तोंडांत मारून घ्यावी लागली तर नवल काय ? परमार्थ तर दूरच राहिला, स्वार्थ संपादण्याचीही हिम्मत नाहीं; देशकार्याचे नांवानें ओरडून कोरड पडलेले घसे चहाच्या कपांनीं ओले करितां करितां आयुष्याचें आयुष्य जावयाची वेळ येते, तरी लोकमान्यांसारख्या नायकाचे अनुयायी म्हणून घेण्याचीही किंमत येत नाहीं; भक्ति, ज्ञान, वैराग्याच्या कर्ण—कठोर अथवा क्वचित् मनोरम वाटणाऱ्या अद्भुत कथा तर दूरच राहिल्या, पण बायकापोरांचे राजस, अथवा स्रक्चंदनवनितांचें निव्वळ तामस सुख उप-

भोगण्याची पात्रता राहिली नाहीं; जीवन–कलहाच्या दामटींत सांपडून मनुष्यत्वाचीच दामटी होऊन गेली आहे; श्रम करून शरीरसंपत्तीची दाणादाण केली, तरी संसारांतली ताणाताण रतिमात्रही कमी होत नाहीं; क्वचित् कुठें तेजस्विता असली तरी घरांत दाणा नाहीं, रात्रंदिवस ‘ आणा ’ संपत नाहीं; अशा स्थितींत बाणा तरी कसला मिरवावयाचा! एका बाजूनें भिन्नप्रकृति राजसत्ता, घातुक शासनपद्धति, ठेंचून टाकणारें शिक्षण, उल्हास पावणारें दारिद्र्य, यमकिंकराचें अप्रतिहत प्राबल्य, संभावितपणाचे सोंगांत ऐटीनें मिरविणारें इरसाल दौर्बल्य; अनेक प्रकारच्या कायद्यांनीं चहूंकडून जखडून टाकल्यामुळें कसल्याही उद्योगधंद्याचा गर्भ धरण्यास असमर्थ झालेली प्रसववंध्या राष्ट्रलक्ष्मी, कमालीची स्वार्थपरायणता, संकुचितपणाची पराकाष्ठा, कान धरून हलविले तरीही न उघडणारी काळझोंप ‘ मला नाहीं तर नाहीं, पण तुला तरी घेऊं देणार नाहीं, ’ असला अमानुष नीचपणा, पारतंत्र्यांत मुरलेली श्वानवृत्ती, भूषण वाटणारा गळेकापूपणा; जातीजातींचा द्वेष, स्वजनांचा मत्सर, दया, प्रेम वगैरे कोमल मनोवृत्तींचा अभाव; आणि दुसऱ्या बाजूनें व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवानें मिरविणारा उल्लूपणा, व्यासंग आणि उद्योग यांचें कार्पण्य, नाना प्रकारचीं परकीय विलोभनें, विझणाऱ्या ज्योतीप्रमाणें क्षणमात्र उत्तेजित करून कायमचे निर्वीर्य करणारें उद्दीपक साहित्य, कल्पनेचा पाट अनिर्बंध फोंडून देऊन मनोदौर्बल्याचें पीक पिकविणारें भ्रामक वाङ्मय, वाक्शक्तीचा खाऊ हातावर घेऊन क्रियाशक्तीचें भूषण न कळत हरविणारे वर्तमानपत्री विद्यार्थी, इतिहाससंशोधनाच्या अगर सत्यप्रियतेच्या नांवानें होणारें विषारी ग्रंथलेखन, देशकालानें उत्पन्न केलेल्या फराळांचीं दुकानें, नाट्यमंदिरें वगैरे सारख्या संस्था, सुखोपभोगाचीं मोहक व सुलभ साधनें, पाश्चात्य व्यापारानें व संस्कृतीनें निर्माण केलेला हा मायेचा बाजार, पाण्याची भूमी व भूमीचें पाणी भासविण्याची मयासुरी कला अवगत असलेली पाश्चात्य सरस्वती, आणि पूर्वी सांगितल्याप्रमाणें ‘ यस्य कस्य तरोर्मूलं ’ असल्या खंडपंडितांनीं बेजबाबदारपणानें केलेले निरर्गल प्रलाप, अफाट ध्येयें, अचाट कल्पना, अनिवार सभा, बेजार फंड, आणि असल्या खाणींत उत्पन्न झालेला ‘ यद्वा तद्वा’ मानववंश;–यांच्या दुहेरी माऱ्यांत सांपडून वैदिक धर्म, वैदिक संस्कृति, आणि महाराष्ट्र यांची राखरांगोळी होण्याची वेळ आली आहे ! !

साहाजिकच असा प्रश्न उद्भवेल कीं 'हें असें कसें झालें ? हें होणें नैसर्गिकच होतें, कां ही स्थिति आगंतुकपणानें आलेली आहे ?' 'ही स्थिति चांगली कां वाईट ?'. 'हा उन्नतीचा पाया कां अवनतीचा कळस ?' हा हिंदुधर्माचा नालायकपणा, कां हिंदु म्हणविणाऱ्या लोकांची नादानी?' 'हिंदु संस्कृतीचीं हीं फळें आहेत, कां राजकीय दोषांचें प्रायश्चित्त आहे ?' त्याच बरोबर, 'ही स्थिति घालविण्यास काय केलें पाहिजे ?' 'ही जाणें शक्य आहे किंवा नाहीं ?' वैदिक शास्त्रें आणि वैदिक संस्कृति हीं अजिबात टाकून द्यावीं, कां कांहीं तडजोड करून, आहे या भांडवलावरच नवा कारखाना काढावा ?' 'आहे हें अजिबात टाकून द्यावें, कां दुसरें कांहीं निर्माण करावें, कोणाचें तरी आहे तसेंच घ्यावें कां पूर्वीचें आणि नवें यांची मेळवण करून मिश्र जाति उत्पन्न करावी ?' 'जुन्याला नव्याच्या सोंगांत आणावें, कां नव्याला जुन्याच्या कोंदणांत बसवावें ?' असा विचार करितां करितां कित्येक प्रचंड मेंदू थंड होऊन गेले; जवळ जवळ पाऊण शतक अखंड खल झाला, तरी निश्चितार्थाचा कल कोणीकडेच वळत नाहीं; बाबा पदमजी आणि जोतिराव फुले यांच्यापासून तों लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्यापर्यंत अनेकांनीं अनेक उपपत्त्या केल्या; विधवेला इष्काचा पेला पाजण्यापासून तों महाराला स्थापित मूर्तींच्या टाळूवरून हात फिरवूं देण्यापर्यंत सामाजिक, प्रार्थनासमाजापासून तों हिंदुधर्मसभेपर्यंत धार्मिक, कार्पेंटरीच्या वर्गापासून तो महात्म्यांच्या चरख्यापर्यंत औद्योगिक, 'एका लहान काळ्या मुंगी' पासून तों गोविंदाग्रजांच्या 'पहिल्या चुंबना' पर्यंत अथवा 'मोरयाच्या सुंदर रूपा' पासून तों टेकाड्यांच्या 'मोडक्या तरवारी' पर्यंत वाङ्मयात्मक, आणि 'साहेबासी नमन पहिले. कोणी कां तो असेना,' येथपासून तो सेनानी बापटांच्या सशस्त्र प्रतिकारापर्यंत, सर्व प्रकारच्या चळवळी झाल्या. परंतु अधःपाताची शीग उलट चढतीच आहे, असें प्रांजल अंतःकरणाला वाटल्यावांचून रहात नाहीं.

नुसत्या वावदूकतेला ही गोष्ट अर्थातच पटणार नाहीं, आणि पटवून देणेंही शक्य नाहीं. परंतु समाजांतील विचारशील अंतःकरणांत खोलांतल्या खोलांत जे निरनिराळे ध्वनी उठतात, त्यांचा मथितार्थ पाहूं जातां असेंच म्हणणें भाग पडतें कीं, ते सर्व या एकाच निर्णयाचे पर्याय आहेतः—भयंकर अधःपात झाला आहे, इतकेंच नव्हे, तर अजून होत आहे. गेल्या पावशत-

काचा आढावा काढला तरी असेंच म्हणणें भाग पडतें कीं, राष्ट्रदृष्ट्या पिछेहाटच झालेली आहे. राजकीय परिस्थिति कशीही असो, आशावादी व्याख्यानकार आणि खुशामती पुस्तकमाला प्रगतीची कितीही भडक चित्रें काढोत, कोट्यवधी रुपयांचे कितीही फंड जमोत, लक्षावधी लोकांच्या कितीही सभा भरोत, डौलदार इमारती, टुमदार संस्था, आणि ऐटदार कार्यक्रम यांची कितीही वाढ होवो,—एक गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं, कीं एक प्रकारचा भेकडपणा आणि नमुनेदार निरुत्साह यांनीं सर्व वातावरण कोंदून गेलें आहे. उप्परकी टामटूम केवढीही असो, पक्षघात झाल्याप्रमाणें बहुतेक अंतःकरणें माना टाकून पडलीं आहेत. व्यक्तिशः पाहिलें तर येवढीच प्रगती म्हणतां येईल, कीं देश व काल यांचें परिज्ञान सामान्यतः सर्व व्यक्तींना उत्तम झालें असून, राष्ट्राकरितां आंग चोरून अथवा आंग मोडून, क्वचित् कुठें ओरखडा घेऊनही मेहनत करण्याची आणि सोयीप्रमाणें थोडाफार सर्व प्रकारचा त्याग करण्याची प्रवृत्ती सर्वत्र दिसत आहे. परंतु कोणचाही गुण उत्कर्षानें वाढलेला क्वचित्च दिसून येतो. सभोंवतालच्या लोकांत वागतां येतील, असे गुणांचे साठे नाहींसे झाले आहेत, मग त्यांच्या परंपरा तरी कोठून चालतील ? मोठमोठे गुण तर राहोतच, परंतु विक्षिप्तपणासारख्या गोष्टीकरितां देखील ३० वर्षांमागील श्रीधरपंत दात्यांच्या नांवानें गाथा गाणें भाग पडतें! आयुःप्रज्ञा, बलशील, द्वेषत्याग, शौर्यचिकाटी, हौसधडाडी, इत्यादि गुण मासल्याला मिळणेंही कठीण झालें आहे; 'बापसे बेटा सवाई,' या म्हणीचा अर्थच गालटून टाकण्याची वेळ आली आहे ! टिळकासारख्या लोकविलक्षण पुरुषाचा अधिकार केळकरांना न येणें साहजिक आहे; परंतु केळकरांची देखील धमक केळकरी तालमीतल्या लोकांत उतरणें अशक्य झालें आहे ! भरती केलेल्या लोकांत प्रत्येकाजवळ ५।१५ काडतुसें जास्त असलीं म्हणजे जशी त्यांना खऱ्या लष्कराची किंमत येत नाहीं, तशीच ही गोष्ट आहे. क्रप सारखे कारखाने आणि प्लायमाउथ सारख्या गोद्या पाठीशीं असाव्या लागतात, तेव्हांच त्यांना लष्कराची योग्यता येते. घातुक अस्त्रांच्या परंपरा विणाऱ्या या कारखान्यांची किंमत ज्यांना समजली नाहीं, अथवा समजून ज्यांना साधली नाहीं, त्या मराठ्यांची, व्यक्तिविषयक गुण अंगीं उदंड असून देखील, काय दशा झाली, तें आपण प्रत्यक्षच सिद्ध करून देत आहोंत ! तसेंच परंपरा म्हणजे काय चीज आहे, हें ज्या लोकांना

समजत नाहीं, परंपरा राखण्याचें महत्त्व ज्यांना वाटत नाहीं, अथवा उपयुक्त परंपरा उत्पन्न करण्याकरितां जे धडपडत नाहींत, ते लोक व्यक्तिशः कसेही असले, तरी राष्ट्रदृष्ट्या त्यांची मुळींच किंमत नसते; अगर असली तरी ती लवकरच हल्लींच्या जर्मन मार्कच्या शेजारीं येऊन बसते. पारतंत्र्यांतील राष्ट्र या नात्यानें कां होईना, हिंदुस्थानालाच दुनियेच्या बाजारांत किंमत नाहीं. जग त्याला एक भूप्रदेश समजतें, फारच झालें तर एक मृतप्राय राष्ट्र म्हणून त्याची संभावना करण्यांत येते. महाराष्ट्रालाही अर्थातच हें लागू आहे. थोडें याचेही पुढें जाऊन जास्त स्पष्टपणें असें म्हणतां येईल कीं, मुळीं 'मनुष्य-प्राणी या नात्यानेंच सृष्टीच्या बाजारांत हिंदु लोकांची किंमत उतरलेली आहे;' आणि हेंच कदाचित् या सर्व अपयशाचें कारण असेल!

रानड्यांचा प्रार्थनासमाज, ह्यूमसाहेबांची राष्ट्रसभा, विष्णुबोवांचा वेदोक्त-मानवधर्म, सार्वजनिक काकांची स्वदेशी, अंताजीपंतांचा पैसाफंड, विजापूर-करांचें राष्ट्रीय शिक्षण, विवेकानंदांचें रामकृष्णमिशन, रामतीर्थांच्या 'अहं-ब्रह्माच्या' डुरकण्या, वारींद्राची अराजकता, टिळकांची 'जितक्या पुरतें तितकें' म्हणणारी वास्तविक असहकारिता, अथवा गांधींचा कल्पनासुलभ, मनोरम, असहकारयोग,—कांहींही झालें तरी हीं सारीं मनुष्य प्राण्यांच्या करितां आहेत. जेथें मनुष्य या नात्यानेंच देहधाऱ्यांची किंमत उतरली आहे, तेथें कोणाचीही चळवळ झाली म्हणून काय झालें? तिला यश कोठून येणार! कानाला गोड वाटतें, बुद्धीला समजतें, अंतःकरणाला पटतें, घटकाभर वाईट वाटतें,—पण काय करावें? जागृत् झालेला भाव रक्ताबरोबर नसानसांतून वाहतच नाहीं, रोमरोमाला हलवूंच शकत नाहीं, शरीराच्या कणाकणाला व्यापून टाकण्यापूर्वींच 'पंक्चर' करून निघून जातो! अशा स्थितींत अलौकिक पुढारी असले, तरी त्यांनीं निष्कामकर्मयोगानें समाधान मानावें, नाहीं तर काय करावें! कारणें कांहींही असोत, अशी स्थिति झाली आहे खरी. आणि स्थिति सुधारल्याखेरीज, तिच्यांत पालट होणें केव्हांही अशक्यच आहे. आधीं माणूस या नात्यानें आपली किंमत वाढवा, मग काय करावें तें सहज समजेल व साजेल. हा पालट व्हावा म्हणूनच राष्ट्रीय शिक्षण, व्याख्यानमाला, वाङ्मय-प्रसार वगैरे अनेक दिशांनीं प्रयत्न चालू आहेत, आणि मुख्यतः—

मानवी आयुष्य म्हणजे नानाप्रकारच्या जबाबदाऱ्यांचें एक भलें मोठें

पुडकेंच होय. जसजसा सुसंस्कृतपणा जास्त, तसतसें हें पुडकेंही अर्थातच जाड असावयाचें. सर्व हुंड्या पटवून संतोषानें दुकान बंद करणाऱ्या सावकाराप्रमाणें, सर्व प्रकारचीं देणीं घेणीं नीटपणें उरकून, कोणतीही जबाबदारी शिल्लक नाहीं, अशा रीतीनें ज्याला येथून जातां येईल, तो खरोखरच धन्य आहे. 'मनुष्याणां सहस्रेषु' क्वचित् एकाद्या पुण्यवंताच्या वाट्यास केव्हां केव्हां अशी धन्यता येते. ती कांहीं वाटेवर थोडीच पडली आहे? अशी धन्यता सर्वांच्या वांट्याला जरी येत नसली, तरी या धन्यतेकरितां अवंचकपणानें धडपड करणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे. ती त्यानें केली तरच त्याच्या मनुष्यपणाची सार्थकता झाली, असें म्हणतां येईल. जबाबदारी म्हटली, कीं तिचें आणि अनिर्बंधतेचें वांकडेंच असणार. किंबहुना जबाबदारी म्हणजेच निर्बंधता. अंगावरील जबाबदारी धट्टपणानें झुगारून देणारा, भित्रेपणानें सोडून देणारा, अगर वंचकतेनें टाकूं पहाणारा पिंडपोषक, आणि त्याचा पुच्छविषाणवान् बांधव, यांच्यांत वस्तुतः कांहींच भेद नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य, अद्वैती वेदांत, असल्या ढोंगांनीं आपल्या कृतीचें समर्थन संतोषानें करणारा तर त्याहीपेक्षां हीन कोटींतील म्हटला पाहिजे. मनुष्याच्या जबाबदाऱ्या अनेक प्रकारच्या, आणि अत्यंत परस्परविरोधी अशा असतात. त्यांतील कोणच्या जबाबदारीला किती महत्त्व द्यावें, कोणची जबाबदारी सोडून द्यावी, व कोणची हातीं घ्यावी, वगैरे प्रश्न व्यक्तिविषयक आहेत. व ते ज्याचे त्यानें, पूर्वकर्मसंपादित सामुग्रीच्या अनुरोधानें सोडवावयाचे आहेत. परंतु एक गोष्ट मात्र खरी आहे कीं, श्रीमन्नृसिंहसरस्वती सद्गुरुदेवांनीं म्हटल्याप्रमाणें 'कर्मवंचकू अधःपाता। जातां वेळ नलगेची' ॥ हा सिद्धांत मात्र अबाधित आहे. येथें कांहीं क्षमा नाहीं. मग कोणी कितीही मोठा असो, अगर केवढ्याही उदात्त हेतूनें व पवित्र कारणानें ती कर्मवंचकता घडली असो. जेवढ्यापुरती वंचकता, तेवढ्यापुरता त्या मानानें अधःपात ठेवलेलाच. कर्म करून देखील यश पदरांत पडेलच अशी खात्री नाहीं; वंचकता केल्यास अधःपात मात्र ठेवलेला! पथ्य पाळून देखील रोग बरा होईलच असें नाहीं, पण कुपथ्य केल्यास मात्र मृत्यू ठेवलेला, अशा तऱ्हेचा हा सिद्धांत आहे. अशा कैक प्रकारच्या जबाबदाऱ्या आस्तिक, नास्तिक अथवा आस्तिक म्हणून मिरविणारे वास्तविक नास्तिक, हे सर्वच मानतात. परंतु यांच्यांत मोठा भेद असा आहे कीं, नास्तिकाचा जबाब घेणारा कोणी एक नसून, प्रसंगाप्रमाणें ते

अनेक व सर्वच पार्थिव कोटींतील असल्यानें, हीनसामर्थ्य असतात. त्यामुळें त्यांच्याशीं वंचकता करण्यासही सवड राहते, व अधःपाताचेंही भय नसतें. त्यामुळें त्यांच्याजवळ आयुष्य अशी स्वतंत्र वस्तूच नसते. कार्यानुबंधी जबाबदाऱ्या अनेक असल्या तरी आयुष्याची अशी कांहीं त्यांच्याजवळ स्वतंत्र जबाबदारीच नसते. त्यांना ते कोणीं दिलेलेंच नसतें, तेव्हां त्याचा त्यांना जबाब तरी कोण विचारणार ? एक प्रकारें हे लोक फार चांगले. इंद्रियसुखापलीकडे त्यांचेपुढें कोणचेंही ध्येय खरोखरच नसतें. आपलें ध्येय आणि जीवन आपल्याच कर्तृत्वावर अवलंबून आहे, याची जाणीव त्यांना पक्की असल्यामुळें, सर्व प्रकारच्या मानवी शक्ती उपयोगांत आणण्याची संवय लागून त्यांची वाढ होते, आणि त्याला कोणी पुसणारें नसल्यानें, सर्व तऱ्हेच्या तीव्र कोमल मनोवृत्ती अरण्यांतील वेलीप्रमाणें यथेच्छ फोंफावून ‘ पोटा××चा ’ कां होईना पण तो एक ठसठशीत जोमदार माणूस तरी बनतो. मनांत आणल्यास भोगवासना तृप्त करण्यापुरता जोमदारपणानें उपभोग तरी त्याला घेतां येतो.

आस्तिकाची गोष्ट तशी नाहीं. त्याच्या सर्व कृत्यांवर पहारा ठेवणारा कोणी सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वव्यापी असा देव आहे, असें त्याला वाटत असल्यामुळें त्याला कर्मवंचकता करण्यास सवडच नसते. त्याचें जीवन म्हणजे रात्रंदिवस अखंड काम करणारी गिरणी ! अखंड त्यांतून माल बाहेर पडतच असतो, आणि तो शक्य तितका उत्कृष्ट आणि पहिल्या प्रतीचा अप्रतीम काढण्याचा त्याचा अट्टहास सुरू असतो ! त्याखेरीज त्याला गत्यंतरच नसतें. आयुष्यरूपी कर्मक्षेत्र, आणि हें शरीररूपी साधन त्याला देवानें दिलेलें असतें. याचा एक दिवस तो आपल्याला जबाब विचारील, हा धाक त्याला चित्तांत वागवावा लागतो. त्यामुळें त्याच्यावर वस्तुतः एकच जबाबदारी असते, मग त्या जबाबदारीचीं व्यावहारिक स्वरूपें कितीही व कशीही असोत. त्यामुळें आस्तिक माणूस म्हणजे भाड्याच्या घोड्याप्रमाणें शरीरास वागविणारा, व त्याची काळजी घेणारा, आणि त्याच न्यायानें त्याला भोगसुखाचा चारा देणारा, परंतु त्याच वेळीं त्याच्याकडून शक्य तितकी अधिक मजुरी करून घेणारा—असा हिशेबी माणूस असतो. समाजाशीं त्याचें आयुष्य एकजीव झालेलें असलें, तरी वस्तुतः तो त्यांत एकटाच असतो. नवऱ्याचें एक तंत्र सांभाळून, सासऱ्याच्या भरल्या

घरांत हंसून खेळून रावणाऱ्या धाकट्या सुनबाईसारखी त्याची स्थिती असते. तिला कोणाच्याच साह्याची अपेक्षा करितां येत नाहीं. मिळेल तर मिळो, न मिळालें तरी वाहवा! त्याच्याकरितां तिला अडून सहतां येत नाहीं, किंवा कोणीं केल्यास, काम सोडून त्याचे आभार मानण्यास देखील फुरसत नाहीं! कोणाकरितां असें तिला कांहींच करावयाचें नसतें, परंतु करावयाचें मात्र सर्वच असतें. वस्तुतः त्या घरांत तिचें इतर कोणीही नसतें, परंतु करावयाचें मात्र सर्वांचें असतें. ढापणें लाविलेल्या घोड्याप्रमाणें तिला दुसरें कांहींच दिसत नसतें. रात्रीं गांठ पडल्यावर मायेचा हात आपल्या पाठीवरून फिरला पाहिजे, ह्या एकाच गोष्टीचा तिला ध्यास असतो. त्याप्रमाणें आस्तिक माणूस म्हणजे भोगसुखाची फाजील प्रतिष्ठा न बाळगणारा, आकडेदार नागाप्रमाणें उत्साहानें सळसळणारा, कोरड्या कल्पनांत रममाण न होणारा, अखंड कामांत गढून गेलेला, कसलेंही अवडंबर न करणारा, एक अत्यंत साहसी आणि बेगुमान प्राणी असतो!

विवेचक बुद्धीच्या निर्णयाचीं हीं दोन टोकें आहेत. विचारवान् प्राणी अथवा कोणीही विचारवान् प्राण्यानें दिलेला कित्ता, एक तर यांपैकीं कोणत्या तरी टोकांत पडणारा, अगर त्याकडे नेणाराच असला पाहिजे. प्रत्यक्ष देवाचें आस्तित्व न मानणाऱ्या अवैदिक मतांनीं देखील अतींद्रिय आस्तित्व आणि कर्म-चक्र, गति अगति वगैरे मानिल्यामुळें त्यांच्या अनुयायांची देखील मानवी कर्तव्य--दृष्ट्या जवळ जवळ हीच दशा असते; मग अंतिम पर्यवसान कोणाचें कसेंही असो. प्रत्येक मनुष्य कांहीं या दोन टोकांत पडूं शकणें शक्य नाहीं; पण प्रत्येक मनुष्य जर खरोखर मनुष्यत्वानें जगत असेल, तर त्याची आयुष्य-भर कोणच्या ना कोणच्या तरी बाजूनें प्रगती मात्र होत असली पाहिजे,--मग तें त्याच्या स्वतःच्या परिश्रमाचें फळ असो, किंवा कोणचा तरी कित्ता तो मुकाट्यानें गिरवीत असतो म्हणून असो. असें होईल तरच त्याला मनुष्यप्राणी असें यथार्थ म्हणतां येईल; एरवीं फुटकळ कर्तव्यें व कर्में तो कितीही बुद्धि-पुरस्सर करीत असो, त्यांत जीव नाहीं. पशूंच्या व त्यांच्या बुद्धीत फरक फक्त मोठ्या धाकट्या प्रमाणाचाच राहील. रक्षकास फसवून चोरी करण्याकरितां गम-तीदार युक्त्या योजण्याइतकी बुद्धी वानरासही असते, व तें ती उपयोगांतही आणतें. मनुष्येतर दुसऱ्या सर्व सृष्टीविषयींही असेंच दाखवितां येईल. परंतु

सर्व क्रियांचा मिळून कांहीं संकलित भिन्न परिणाम करण्याचें काम त्यांचेकडे नाहीं. मनुष्याकडे तें कर्तव्य आहे. हाच दोघांत खरा फरक आहे; व तो जर राखला नाहीं, तर दोघांतही वस्तुतः कांहींच फरक नाहीं. आलंकारिक भाषेंत बोलावयाचें म्हणजे विविध संस्कारांचा कच्चा माल जीवास दिलेला आहे, त्याची सुंदर वस्तु बनवून या विश्वाच्या प्रदर्शनांत मांडण्याचें काम त्याचेकडे दिलें आहे. तें न करणाऱ्याला 'विचित्र पशु' म्हणून जगत्कर्त्यानें या प्रदर्शनांत मांडिलें आहे, असेंच म्हणावें लागेल!

या त्रोटक परंतु निर्भीड दिग्दर्शनावरून, या शरीरयंत्राची मनुष्य-प्राणी या नात्यानें काय किंमत असली पाहिजे, हें सहज लक्षांत येईल. सर्व तऱ्हेचे दुरभिमान टाकून जर या दिशेनें अंतःकरणें शोधूं लागलों, तर 'मनुष्य-प्राणी या नात्यानें जगाच्या बाजारांत आमचा भाव उतरला आहे,' या माझ्या पुष्कळांस कसेसें वाटणाऱ्या विधानांत कांहीं तरी तथ्य आहे, असें दिसून येईल. सर्व तऱ्हेचे अनुभव घेतल्यावर आणि सर्व तऱ्हेच्या उपपत्त्या बसविल्यावर विवेकानंदांनींही शेवटीं हिंदुस्थानला 'Pray day and night:-Thou Mother of the universe take away my unmanliness and make me man' असाच उपदेश केला आहे. तो शब्दशः खरा आहे, स्वामींच्या हिंदुस्थानसंबंधींच्या सर्व अनुभवाचें तें सार आहे. प्रत्येकानें आपल्या चित्ताचा ठाव काढून पहावा कीं, आपल्याला समजूं लागल्या-पासून या दिशेनें आपली कोणीकडे तरी, समजून अथवा न समजून तरी, प्रगति झाली आहे कां? पैशाकरितां, मानाकरितां, सुखोपभोगाकरितां, कुटुं-बाच्या हिताकरितां, विद्यार्जनाकरितां, देशोद्धार, समाजोद्धार, अध्यात्मिक उन्नति वगैरेसारख्या एकाद्या उदात्त हेतुकरितां,--अशा नाना साध्यांकरितां धडपड करणारांनीं हिशोब करून पहावा कीं, आपण स्वतःस अशा कोणच्या तरी शाळेंत घालून घेतलें आहे कां? आपल्या मुलाबाळांना व संबंधीयांना ती शाळा लाविली आहे कां, कोणत्या तरी ध्येयास धरून शील कमाविलें आहे कां? ध्येयाच्या दृष्टीनें आपलें पाऊल पुढें पडलें आहे किंवा नाहीं? आणि तें ध्येय, मी नाहीं तर माझ्या मुलाबाळांनीं तरी, अथवा ज्याला माझें वळण देतां येईल अशा कोणीं तरी मिळवावें, अशी शिक्षा त्यांना लावण्याचा प्रयत्न केला आहे किंवा नाहीं? अथवा जर कांहीं कमाई केली असें वाटत

असेल, तर ती स्वतःबरोबरच लुप्त होऊं नये व त्याची परंपरा टिकावी, असे यत्न केले आहेत कां ? मी मोठ्या मोठ्या गोष्टींविषयीं तर म्हणतच नाहीं, पण साधी, अगदीं सांसारिक गोष्ट- म्हणजे 'माझ्यापेक्षां माझ्या मुलानें कांहीं तरी गुणसंपत्तीनें जास्त व्हावें ' एवढा तरी अट्टाहास कोणीं केला आहे कां ? येऊन जाऊन आकांक्षा काय ती एकच,--कोणकिडून तरी शक्य तितकी जास्त डिग्री त्यानें मिळवावी ! वा रे ध्येय ! जे प्रयत्नवादी नसतील, व भगवंतावर भार घालून राहण्याचा टेंभा मिरवीत असतील, त्यांनींही 'भक्त या नात्यानें भगवं-ताला अखंड प्रार्थना करण्याचें कर्तव्य केलें आहे कां ?' म्हणून अंतःकरणास घुसावें. समाधानकारक उत्तर येणें केवळ अशक्य आहे. कारण तसें नसतें तर कोणत्याही चळवळी मरून न जातां पोसल्या असत्या. सारांश काय, कीं खरोखर नास्तिकपणानें चार दिवस धुडगूस घालणारा, जगांतील उडाणटप्पू रहिवाशी एक प्रकारें पुष्कळ पुरवला; परंतु देव आहे असें तर म्हणावयाचें, परंतु त्या संबंधानें जबाबदारी तर कांहींच बाळगावयाची नाहीं, हा लफंगेपणा सर्वांत वाईट. यानें जो अधःपात होतो, व जी दुर्बलता येते, तिला तोडच नाहीं. हेंच सांप्रत आमच्या नशीबीं आलें आहे.

यावर असें मनांत येतें कीं, 'असो ऐसा प्रसंग झाला ! झाला तो होऊन गेला ॥' पण आतां तरी याला काय करावें ? सर्व तऱ्हेचे प्रयत्न चालूच आहेत कोणीच कोंभ धरीत नाहीं, त्याला काय करावें ? ' जर सुधारणें शक्य नसेल, तर मग या कटकटींत तरी कां पडा ? आला दिवस पार पडून जावें; " पिछे जो होय सो होय ! " एकटा मी काय करणार ? ' पण श्रीअण्णासाहेब म्हणतात कीं " नाहीं रे बाबा ! तुझ्या बुद्धींत जें स्फुरतें तें होतां होईल तों पूर्णपणें बाहेर आणण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे. कारण तूं स्वतःला आस्तिक म्हणवतोस. जेथून तुझें अडत असेल तेथूनच प्रारंभ कर, कोणाची वाट पाहूं नको. एक पळ उशीर लावूं नको कीं, वादविवाद करीत बसूं नको. दुर्बलता जाण्याचा हाच एक मार्ग आहे. जबाबदारीची जाणीव म्हणजेच दुर्बलतेला ओहोटी. ( I must, therefore I can, असें एक जर्मन पंडित म्हणत असे, त्यांतलें इंगित हेंच आहे. ) देव आहे, व त्याची सेवा केली असतां तो अनु-ग्रह करितो, हें मी सांगतों. मी त्याचा अनुभव घेतला आहे. जी गोष्ट

व्हावी असें नुसतें वाटतें, तिचें बीं कर्मक्षेत्रांत कोणीं ना कोणीं तरी पेरलें पाहिजे, म्हणजे यथाकाल तिचें शेत पिकतें. तुला व्हावीसें वाटतें ना ? तर मग तुझ्यावरच ती करण्याची जबाबदारी आहे; करावयास लाग ! " त्यांनीं स्वतः तेंच केलें. लोकांस धर्माची व तपाची गरज आहे याची त्यांना एक दिवस जाणीव झाली. लागलीच त्यांनीं स्वतःचें जीवनच धर्मरूप होईल, अशा उग्र तपस्येला आरंभ केला ! त्यांनीं कोणाची वाट पाहिली नाहीं. जें जें त्यांना सुचलें तें तें करण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. ते कोणाशीं वादविवाद करीत बसले नाहींत. मनुष्य या नात्यानें ते आधींच पूर्णपणें परिणत झालेले होते, म्हणून त्यांना अडथळे बाजूस सारून प्रयत्न करतां आले. तुम्हीं नास्तिक माणूस असाल, तर तुम्हांला त्यांचें सांगणें आहे कीं " बाबारे, माझ्या दशांश तरी परिश्रम करून, मग नास्तिक होण्याची तुझ्यावर जबाबदारी आहे. आस्तिक म्हणवीत असून दुर्बल म्हणवीत असाल तर तो तुमचा भ्रम आहे. कारण आस्तिकत्व आणि दुबळेपणा एकत्र असणें शक्यच नाहीं ! तुम्ही फसलेले आहां. वास्तविक तुम्ही नास्तिकच आहां; इतकेंच कीं नकळत तुम्हीं आस्तिकपणाच्या शोधांत आहां. ही अर्धवट स्थिति टाकून देऊन या शोधाचे मागें तुम्हांस कंबर कसून लागलें पाहिजे. कारण यानें तुमची सारीं कार्यें होतील. परंतु मनुष्य या नात्यानें तुमची वाढ झालेली नाहीं; तेव्हां आधीं माणूस होण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. देव आहे, हा मीं अनुभव घेतला आहे. तुम्हीं जर तो पदरांत आयता पाडून घ्याल, तर सर्व जबाबदारीची जाणीव तुम्हांस होऊन तुमचे अंगांत शक्ती येईल, व तुमचा लवकर कार्यभाग होईल. ' कोणचा मार्ग?' म्हणून चिंता करून कालक्षेप करूं नका. जें जें त्या करितां सुचेल, तें अवंचकपणानें प्रत्यक्ष कृतींत आणा, म्हणजे आपोआप सारें जुळेल. मी कोठें कोणास विचारीत बसलों ? "

पूर्वीच्या विवेचनावरून एक गोष्ट लक्षांत येईल कीं, कोणत्या तरी एका टोंकास ध्येय समजून तें साध्य केल्याखेरीज, अगर त्याची खटपट केल्याखेरीज माणसाच्या इच्छाशक्तीची वाढ होत नाहीं; आणि अशा तऱ्हेची जबाबदारी बाळगली असतां, तिच्याकरितां जे परिश्रम आपण करितों, अथवा जीं नियंत्रणें स्वतःस घालून घेत असतों, त्यांनींच दौर्बल्य जाऊन अंतःशक्तीची वाढ होते. आजकाल ' व्यक्तिस्वातंत्र्य ' ' मतस्वातंत्र्य ' ' मतौदार्य ' वगैरे

सुंदर आडनांवांनीं जी अनिर्बंधता जिकडे तिकडे बोकाळली आहे, तिच्यामुळें जरी एक प्रकारचा 'स्पिरिट(! )'--यथार्थतेनें म्हणावयाचें म्हणजे एक प्रकारचा 'उल्लूपणा' उत्पन्न झालेला दिसतो, तरी याच घरघेण्या रांडेनें दांभिकता, निःसत्त्वता, वंचकता, स्वार्थैकता वगैरे अनेक घातुक रोगांचीं ठाणीं राष्ट्रशरीरांत वसवून, त्याची दशा करून सोडली आहे. सर्व आपत्तींचें मूळ येथेंच आहे. आस्तिक असां, कीं नास्तिक असां, राष्ट्रदृष्ट्या पहा, कीं व्यक्तिदृष्ट्या पहा, मनुष्य या नात्यानें तुम्हांला स्वतःच्या व्यक्तीची पूर्ण वाढ करून घेतली पाहिजे. ही जबाबदारी तुमचेवर आहे. ही गोष्ट ओळखली पाहिजे, तद्नुरूप साक्षेप केला पाहिजे. कोणचीही संहत स्वरूपाची चळवळ हल्लीं पोसत नाहीं, याचें कारण हेंच आहे कीं, तरवार पेलण्याचें सामर्थ्यच खरोखर घटक अंतःकरणांत नसतें. राष्ट्रपरमाणूंचा मगदूर व्यक्तिशः वाढल्याखेरीज त्यांनीं घडविलेली घटना जिवट कशी होईल ? पाऊण शतकाच्या सर्व व्यापांत ही गोष्ट आम्ही विसरून गेलों. अनेक तऱ्हेच्या राष्ट्रीय चळवळी करणारा वीर, 'स्वतःची वाढ खासगी रीतीनें अव्याहत केली पाहिजे,' ही गोष्ट भुलून गेला. म. गांधी राष्ट्राला वळण लावण्याची धडपड करीत असतां, स्वतःची पूर्ण वाढ व्हावी म्हणून रात्रंदिवस कसरत करितात, हीच गोष्ट त्यांचा भगत नेमकी विसरून जातो ! पुढाऱ्यांनीं ही स्वयंसिद्धतेची घमेंड टाकून दिली पाहिजे, व स्वतःचें व अनुयायांचें खासगी आयुष्य विशिष्ट शिस्तींत घालून घेतलें पाहिजे. विद्यालयांत खरोखर राष्ट्र तयार होत नसतें. आईबापांच्या घरांत, चुलबोळक्यांच्या व विटीदांडूच्या सहवासांतच तें तयार होतें. तयार झालेल्या लोकांना आवश्यक तो माल मात्र या विद्यालयांत पुरविला जातो. राष्ट्रशिक्षकाची जागा राष्ट्रीय कॉलेजांतील खुर्चीवर नाहीं. गृहस्वामिनीच्या कानांतील डुलाप्रमाणें गृहलक्ष्मीला भूषविणाऱ्या पाळण्याजवळच ती असली पाहिजे. हें म्हणणें अतिशयोक्तीचें वाटेल, पण तें शब्दशः खरें आहे. तात्पर्य इतकेंच कीं, संहत प्रयत्न पुष्कळ झाले व ते होतीलही. त्यांना खंड पडण्याची भीतीच नको. ते करणाऱ्यांची मोठीशी वाण पडत नाहीं. परंतु त्यांना यश यावें म्हणून ज्यांना वाटत असेल, त्यांनीं तरी व्यक्तिदृष्ट्या स्वतःची वाढ होईल, व तसें वळण दुसऱ्यास लागेल, असा प्रयत्न करण्यास तयार झालें पाहिजे. 'प्रोपागांडा' कितीही मनोहर व मुद्देसूद असला, तत्त्व केवढेंही उच्च

व सुंदर असलें, तरी तें हृदयांत शिरून मूळ धरीत नाहीं. ही स्थिति घालविण्याचा मार्ग हा एवढाच आहे. बाहेरच्या शिक्षणानें हें काम होणार नाहीं. नुसत्या ' राष्ट्रीय शिक्षणानें ' हें काम घडणार नाहीं.

वर ' मनुष्य या दृष्टीनें वाढ, ' ' मनुष्य या दृष्टीनें किंमत, ' वगैरे शब्द फार ठिकाणीं आले आहेत. त्याचें थोडें निश्चित स्पष्टीकरण करणें जरूर आहे;...म्हणजे ' राष्ट्रीय शिक्षण ' म्हणून हल्लीं ज्याला म्हणतात, त्यानें हें काम कसें घडणार नाहीं, तें लक्षांत येईल. घटकावयवांची परिणती म्हणजेच वस्तूची वाढ. मनुष्यशरीरांत मुख्य घटक दोन;–एक पांचभौतिक शरीर; याची परिणती अन्नपानादिकांच्या योगानें होते, व तें प्रकृतिस्थ असलें म्हणजे त्याला वागविणाऱ्या आंतील अपार्थिव शक्ति व्यक्त होतात; हा दुसरा मुख्य घटक. दुष्काळ, दारिद्र्य, रोग, जीवनकलह अपथ्य–शिक्षण–पद्धति, आणि व्यसनाधीनता वगैरे अनेक गोष्टींनीं आमची शरीरें पूर्ण वाढत नाहींत, ही गोष्ट तर सिद्धच आहे. शारीरिक ऱ्हास झाला आहे व होत आहे, या विषयीं दोन मतेंच नाहींत. उलट मानववंशदृष्ट्या आम्हीं नामशेष होणार, अशी निराशा वाटण्यापर्यंत कित्येकांची मजल गेलेली आहे. ही स्थिति सुधारण्याचे इलाजही चालू आहेत, परंतु ते सारे संहत स्वरूपाचे असल्यामुळें, व्हावे तशा रीतीनें परिणामकारक होत नाहींत. पिंडतःच जीवनक्रम निराळा आणि आखाड्यांत कसरत करावयाची तास दीड तास ! तरी पण या बाजूस जरा जास्त लक्ष लागूं लागलें आहे, हें मात्र खरें; आणि जर केवळ कसरतीवरच शरीराची वाढ अवलंबून असती, तर हें दैन्य लवकरच दूर झालें असतें. पण तसें नसल्यानें उत्तरोत्तर निराशाच होते. अंतःशक्ती मनुष्यांत कितीही असल्या, तरी त्याचे प्रकार मुख्य तीनच आहेत. ज्ञानशक्ती, इच्छाशक्ति आणि क्रियाशक्ति. बाह्य अवयवांची वाढ परस्परांशीं समप्रमाण झाली असतां, ते जसे परस्परसाहाय्यकारक होऊन मूर्ती ही सुदृढ, बलवान् आणि सुंदर होते, नाहीं तर तींत व्यंग येतें, तशीच या अंतरावयवांचीही गोष्ट असते. मनुष्याचे हे तीनही अंतर्घटक परस्परांस प्रेरक, पोषक आणि साहाय्यक होतील अशा रीतीनें त्यांची वाढ झाली, तरच या जड यंत्राच्या आंतील खऱ्या मनुष्याची वाढ पूर्ण झाली, असें म्हणतां येईल. नाहींतर तो देह लंगड्यालुल्याप्रमाणें जरी प्रत्यक्ष दिसत नसला, तरी अपंगच म्हटला पाहिजे. ह्या गोष्टींच्या अज्ञाना-

मुळें कोणच्याही प्रस्तुत शिक्षणपद्धतींतच व्यंग उत्पन्न झालें आहे. तेथें त्या शिक्षण पद्धतींतून उत्पन्न झालेले जीवही सव्यंगच निपजतील, यांत नवल तें काय ? वर सांगितल्याप्रमाणें पालकांच्या बेजबाबदार आयुःक्रमामुळें, घरींदारीं, मुलांस अशा तऱ्हेनें सहज मिळणारें शिक्षण बंद झालें. सरकारनें शिक्षणखातें काढलें. त्या चरकांतून पोराला काढलें कीं काम झालें, अशी एक समजूत पालकांची, व मुलांची, दोघांचीही होऊन बसली ! साराच सवता सुभा झाला. ज्यांनी शिक्षणखात्याची योजना केली तीं माणसें जास्त शहाणीं होतीं यांत कांहीं शंका नाहीं. त्यांनीं त्या खात्याचें नांवच मुळीं Department of Public *Instruction* म्हणजे सर्व प्रकारच्या माहितीचें खातें असें ठेविलें आहे ! या शिक्षणखात्यांतल्या शिक्षणानें, फार तर कांहीं विषयांचें थोडेफार ज्ञान, ( माहिती–instuction, ) विद्यार्थ्याला प्राप्त होतें इच्छाशक्ति व क्रियाशक्ति यांच्या वाढीकडे लक्ष देणें, हें अर्थातच, मुळीं त्याचें कर्तव्यच नाहीं, ध्येयच नाहीं.

ज्या शिक्षणयंत्रांतून आजची वेंधळी पिढी बाहेर पडली, आणि ज्या शिक्षणाच्या नांवानें एवढी ओरड करण्यांत येते, त्या शिक्षणयंत्रांतूनच रानडे, टिळक, गोखले, शास्त्रीबुवा, गांधी वगैरेंची पिढी बाहेर पडली. एकाच शिक्षणाचा भिन्न भिन्न पिढ्यांवर असा निरनिराळ्या तऱ्हेचा परिणाम कां व्हावा ? याचें कारण पहातां असें दिसतें कीं, माणसाचें कौटुंबिक जीवन, व व्यक्तिशः रहाणी यांच्यांत या निरनिराळ्या पिढ्यांत मोठें अंतर पडलें. टिळक, आगरकर यांची पालक पिढी पूर्वीं म्हटल्याप्रमाणें बेजबाबदार बनली नव्हती; आणि जुनाट का होईना, पण कोणत्या तरी शास्त्रीय पद्धतीनें बसविलेल्या परंपरा तिनें राखून ठेविल्या होत्या. त्यांचा फायदा घेऊन वर सांगितल्याप्रमाणें शक्तित्रयांनीं निदान अपंग तरी न होतां ही पिढी Instruction घ्यावयास बसली, त्यामुळें अपाय फारसा न होतां त्यांना कुमारीलभट्टी करितां आली. जसजशी ही स्थिती नाहींशी झाली व जुनी नाहीं आणि नवीही नाहीं अशी अशास्त्रीय व एक तर विचारहीनतेनें उडाणटप्पूपणाची अथवा विचारशक्ती असल्यास बेजबाबदारपणानें सोईस पडेल तशी लवचीक राहणी सुरू झाली, तसतशी नवीन पिढी अंतरींद्रियांनीं दुर्बल, अपंग, निशा घेतल्याप्रमाणें धुंद, अथवा जागृत झालेल्या निशाबाजाप्रमाणें गळून गेलेली निपजली. यावरून एक गोष्ट दिसून

येते कीं, हल्लीं ज्याला आपण शिक्षण म्हणतों, मग तें सरकारी असो, अथवा राष्ट्रीय असो, कसेंही असो, त्यांत या अंतःशक्तीची वाढ करण्याचें साहित्य कितीही असलें, तरी या शक्ति उत्पन्न करण्याची त्यांची योग्यता नाहीं. ह्या शक्ति उत्पन्न झालेला जीव त्याच्या कक्षेखालीं आला, तर थोडेंबहुत तें त्यास पोषक होतें इतकेंच. याचें कारण असें दिसतें कीं, ज्या वयांत आपण लहान मुलांना सोडून देतों, किंबहुना त्यांचे मागें लागणें द्वाडपणाचें, असंभावितेचें अथवा रिकामटेकडेपणाचें समजतों, तेंच खरोखर या शक्तींचें प्रगट होण्याचें वय असतें. झाल्या तर याच वयांत त्या उत्पन्न होतात, नाहीं तर पुढें कितीहि Instruction खात्यांत त्याला घातलें तरी कांहीं उपयोग होत नाहीं. एकदां उत्पन्न झाल्यावर त्यांची वाढ वाटेल तशी करा. मग तो पुढें नास्तिक बनो, आस्तिक बनो, कर्मानुसार उन्नत होवो, अथवा अधःपातास जावो. या वयांत मुख्यत्वें, व पुढें ही पौगंडदशेपर्यंत थोडीबहुत, मुलांची वाढ होण्याचा राजमार्ग म्हटला म्हणजे 'अनुकरण.' अनुकरण--द्वारा न कळत त्यांचे अंतःकरणांत रुजतें, त्याच खतांतून हीं रोपटीं बाहेर पडतात. जेणेंकरून तीं अशीं बाहेर पडतील, व पडल्यावर समप्रमाणानें वाढून नैसर्गिक मगदुराप्रमाणें पूर्ण होतील, त्या पद्धतीचें नांव शिक्षण.

या सूत्रमय विवेचनावरून 'मनुष्य' या नात्यानें वाढ म्हणजे काय व ती संपादण्यास 'राष्ट्रीय शिक्षण' म्हणून म्हणतात तें कां व कसें असमर्थ आहे, हें थोडेसें लक्षांत येईल. तात्पर्य इतकेंच कीं कौटुंबिक जीवनक्रम आणि माणसामाणसांची खाजगी राहणी, हीं बदललीं पाहिजेत. अशी शोगनागिरी करावयास समजदार माणसें आपण होऊन तयार झाल्याखेरीज कोणचीही चळवळ जीव धरणार नाहीं. सांप्रतच्या परिस्थितींत 'राष्ट्रीय शिक्षणा' चें आदिक्षेत्र, उगवणारी पिढी नसून, उगवलेली आणि पालक पिढी आहे; आणि राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य राजकारणांत नसून, या पिढ्यांना जबाबदारीचा आयुष्यक्रम स्वीकारावयास लावण्यांत, आणि वर सांगिल्याप्रमाणें त्यांची व उगवणाऱ्या पिढीची वाढ होईल, अशा खाजगी व सामाजिक राहणीच्या नवीन परंपरा उत्पन्न करून देण्यांत आहे. राष्ट्रीय शिक्षकांनीं आपल्या शाळाकॉलेजच्या इमारतींत आणि व्याख्यानमंदिरांत न चालवितां, घरोघरीं घातल्या पाहिजेत.

हें कसें करावयाचें हा प्रश्न स्वतंत्र आहे. तो विचार या लेख–सीमेच्या बाहेरचा आहे.

हें सर्व घडावयाचें असेल, तेव्हां घडेल; त्याशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. आपला मुद्दा एकच आहे कीं ज्या कोणाला या हातभागी देशाचें व स्वतःचेंहीं कल्याण झालें पाहिजे असे वाटत असेल, त्याच्यावर स्वतःस या प्रमाणें जबाबदार होण्याची, व स्वतःस अशा कांहीं तरी शिस्तींत घालून घेण्याची जबाबदारी आहे. आभाळ फाटलें, त्याला ठिगळ कोण देणार ? असें म्हणून सुटतां येत नाहीं. आणि हेंच मला वाटतें श्रीअण्णासाहेब यांच्या सर्व शिकवणीचें सर्वसामान्य असें सार आहे. श्रीअण्णासाहेब यांच्या चरित्रांपासून जें कांहीं मुख्य घेण्याजोगतें आहे तें हेंच. आणि तें सर्वांनींच घेण्याजोगतें आहे. अण्णासाहेब म्हणजे जशी समतेची मूर्तिच होती आणि जसें समतेनें त्यांनीं आपलें आयुष्य या पतितराष्ट्राच्या सेवेला अर्पण केलें त्याचप्रमाणे त्यांच्या चरित्रापासून मिळणारा हा बोध देखील सर्वांना सारखाच ग्राह्य आहे. मग तो कोणत्याही वर्गाचा कोणत्याही जातीचा अथवा कोणत्याही मतांचा मनुष्य असो. त्यांच्या अंगच्या अपार गुणांचें अनुकरण यथाशक्ति करण्याचें आपलें कामच आहे. परंतु श्रीसमर्थांनीं म्हटल्याप्रमाणें त्या सहज गुणांना उपाय नाहीं. तथापि त्यांनीं दिलेला हा मुख्य संदेश लक्षांत ठेवून मनुष्यप्राणी या नात्यानें जगण्याचा आणि मनुष्यप्राणी या नात्यानें जगाच्या बाजारांत किंमत वाढवून घेण्याचा अट्टाहास करणें हेंच प्रत्येकाचें काम आहे.

श्रीअण्णासाहेब यांचें चरित्र वाचून भिन्न भिन्न प्रकृतींच्या व्यक्तीवर भिन्न भिन्न परिणाम होतील हें तर उघडच आहे. कोणास त्यांचें उत्तर आयुष्य वायां गेलें असे वाटेल तर कोणांस त्यांतच त्यांचें खरें मोठेंपण दिसून येईल; कोणांस त्यांचीं मतें वाचून स्वतःचीं कोडीं उलगडलीं असें वाटेल तर कोणाच्या विचारणीस तीं कठीणपणानें बोंचून कसेसेंच वाटेल; कोणास त्यांच्या ' प्राप्त-पणा ' ची खात्री पटून आनंद होईल तर कोणांस त्यांच्या उत्कृष्ट गुणसंपत्तीनेंच चटका लागेल. परंतु इतकें मात्र खरें कीं ते ' महापुरुष ' होते व राष्ट्रपुरुष या नात्यानें त्यांचीं योग्यता अतिशयच मोठी होती या विषयीं कोणाचाही मतभेद होणार नाहीं. त्याचप्रमाणें त्यांचें वागणें पटो न पटो, त्यांचीं मतें ग्राह्य अथवा अग्राह्य वाटोत, त्यांनीं जें उत्कट प्रेम जीवमात्रांवर केलें, त्यांच्या

कल्याणाचा जो कळवळा अखंड हृदयांत वागविला, जो प्रचंड स्वार्थत्याग केला, जी कठोर तपश्चर्या केली त्यांचीं जाणीव प्रत्येकाचे अंतःकरणास झाल्याखेरीज राहणार नाहीं. आणि त्यामुळेंच त्यांच्या सर्व शिकवणीचें मुख्य सार जें ' व्यक्ति कल्पनेचा नाश ' ' सर्वांकरतां सर्व ' आणि 'सर्वां मिळतीआपण 'त्याची खात्री पटून हेंच ध्येय संपादण्याच्या जबाबदारीची जाणीव प्रत्येकास होईल. अशी जाणीव असूनही अथवा झाल्यावरही तशा तऱ्हेच्या शिस्तींत स्वतःस न घालून घेतल्याबद्दल आपली आपल्यालाच लाज वाटूं लागली म्हणजे लेखकांचें कार्य झालें. इतर ज्याला रुचेल तसें या चरित्रापासून तो उचलीलच.

सरतेशेवटीं सौ० भागीरथीबाईच्या शब्दांत

**' अण्णासाहेब पटवर्धन ।**
**गेले आपुला किता देऊन ।**
**गिरवा गिरवारे प्रबुद्ध जन ।**
**भाविक जनहो पुरा करा ' ।**

अशी वाचकांस विनंति करून आणि आमचें मनुष्यपण आमच्यांत पूर्णपणें प्रगट व्हावें म्हणून श्रीअण्णासाहेब यांची

**" सकळां अंतर्यामीं । पूर्ण प्रगट व्हावें ।**
**हीनता सर्व जावी । इहपर मुक्तीसी द्यावें ।**

अशी करुणा भाकून तूर्त वाचकांची रजा घेतों.

**भद्रं नो अपिवातयमनः ॐ शांतिः शांतिः शांतिः ।**

॥ श्री ॥

# तीन सांप्रदायिक आरत्या.

## आरती श्रीमहाराजांची.

जयदेवा गुरुमूर्ति । नरसिंह सरस्वती ॥
यतिवर्या दिनोद्धारा । ओवाळूं मंगलारती ॥ धृ० ॥
मायागुण नियामका । परमात्मया व्यापका ॥
सच्चिदानंदकंदा । अद्वयास्वयंप्रकाशका ॥ १ ॥
ब्रह्माहरिमहेशा । नुमगसी तूं परेशा ॥
वेदशेषा मौन पडे । वर्णितां तव यशा ॥ २ ॥
गुरु क्षराक्षरातींत । आत्माराम तूं निश्चित ॥
विश्व हा विलास तूझा । ऐसे श्रुतिप्रणीत ॥३॥
जगदुद्धारासाठीं । अवतरसी या सृष्टीं ॥
अनन्य शरणागतां । तारिसी कृपा दृष्टी ॥ ४ ॥
बालोन्मत्त जड । स्थिति दाविसी उघड ॥
विदेहपणें विचरसी । निजरूपीं अखंड ॥ ५ ॥
भक्तिज्ञान वैराग्य । स्वीकारिसी शांतियोग ॥
भाविका बोध करिसी । हरिभक्ति महद्भाग्य ॥ ६ ॥
राधाकृष्ण स्वामीरूपें । भेटी देसी यतिरूपें ॥
निर्विकल्पें कवटाळितां । होय विष्णु दृश्यलोपें ॥ ७ ।

॥ श्री ॥

## आरती श्रीबुवासाहेबांची.

आरती नारायणा । करूं मंगलधामा ॥
सद्‌गुरुनाम साजे । किति वर्णुं मी महिमा ॥ ध्रु० ॥
माया तव अनिवार । भ्रांतिं पडले अंध नर ॥
सन्मार्ग बोधिताही । मोह पाशी गुंतवीते ॥ १ ॥
सगुणार्चनीं निर्गुणप्राप्ति । गुरु ब्रह्म नव्हे परती ॥
वेदादि वर्णिती जें । तुझ्या कृपें उमजें तें ॥ २ ॥
अखंड नामोच्चार । गीतगोविंद मधुर ॥
धन्य जे रस पीती । चुकविती येरझार ॥ ३ ॥
भाविका भक्तिमार्ग । बोधिला तूं सुगम ॥
सर्वांभूतीं अन्नदान । दावियेलें भक्तिवर्म ॥ ४ ॥
श्रीनरसिंहसरस्वती । व्यापी सर्वत्र जगतीं ॥
प्रत्यया आणिले तें । ब्रह्मानंदीं लीन होती ॥ ५ ॥
आदिष्ट गुरुकार्य । करुनी अवतार ॥
संपवी पद्मनाभ । अंतीं होई गुरुरूप ॥ ६ ॥

भिषग्वरो यः खलु लब्धकीर्ति—।
रार्यांग्लविद्यासमवाय एव ॥
धन्वंतारिर्वा गदपीडितानां ।
विनायकं तं शिरसानतोऽस्मि ॥ ७ ॥
लब्धं धनं रोगचिकत्सया यो ।
गोमांसमेवागणयन्महात्मा ॥
व्यचिंतयत्स्वप्नगतोऽपि देशं ।
विनायकं तं शिरसानतोऽस्मि ॥ ८ ॥
लोकोपकारे निरतः सदैव ।
नाहारमप्येष कदाप्यकार्षीत् ॥
पुण्यं महद्यत्स्मरणं ददाति ॥
विनायकं तं शिरसानतोऽस्मि ॥ ९ ॥
धर्माभिमानः स्वजनाभिमानो ।
यस्याभवत्तीव्रतरो जगत्याम् ॥
आदर्श एवाभवदत्र यूनां ।
विनायकं तं शिरसानतोऽस्मि ॥ १० ॥
मुकुंदरचितं स्तोत्रमेतत्पठति यो नरः ।
विनायकप्रसादेन देशभक्तो भवेदसौ ॥ ११ ॥

श्रावण वा। ४ शाके १८४८ मुकुंदरायः

## सूची.

मराठी ग्रंथ संग्रहालय. नं. ... ता. ... ठाणे.

### अ.

**अक्कलकोटचे स्वामी.** ११२-११३; खं. ४. ९६,१०४.

**अण्णासाहेब पटवर्धनः**-घराणें १, तीर्थरूप, आजे, पणजे; **आई-जानकीबाई** २,३-६, जन्म ८, स्वभाव ८, गुण, १०, निर्भयता १०, शिक्षकांच्या मौजा ११, लग्न १२, मातोश्रींचा अधिकार १३, शिक्षण १६, मॅट्रिक १७, शिक्षणाचा उद्देश १८, शक्ति व बुद्धि २०, उच्च शिक्षण २१, बी. ए. २१, I. C. S. चा विचार २२, कायद्याचा अभ्यास २२, तेव्हांचे त्यांचे प्रोफेसर २३, राहणी २३, मुंबईस आगमन २३, देशोद्धाराच्या कल्पना २६,२७, वैद्यशास्त्र गळीं पडतें २८, आर्यवैद्यकाचा अभ्यास २८, मुंबईची राहणी २८, २९, सुधारकांशीं मतभेद ३०,३१, स्त्रीशिक्षण ३२, इंदुप्रकाशचे लेखक ३२, औद्योगिक चळवळ ३३, **मेडिकल कॉलेज जर्नल** ३४,३५, **कुंट्यांशीं** बेबनाव ३५, वैद्यकविषयक चळवळ ३६, सत्तेच्या आवश्यकतेविषयीं खात्री ३७, परदेशीय राजकारण ३८, राजकारणांतील इतर उलाढाली ३९, कांचकारखाना ४० गिरण्या ४०, अभ्यासाची तऱ्हा ४१, **मंडलिकांशीं** झगडा ४३, वकिली ४४, **श्रीनरसिंहसरस्वतींचा** सहवास ४७-४९, **तात्यासाहेब कर्वे** ४९, **श्रीतुकोजीराव होळकरांशीं** मुलाखत ५१, **दिनकरराव राजवाडे** यांशीं मुलाखत ५२-५४; निर्मोह-अवस्था ५४, विषमज्वराचा आजार ५५, सहजत्यागवृत्ति ५७, **मल्हारराव**प्रकरण ५७, **केसरी व मराठा** ५८, त्यांच्या संग्रहांतील मंडळी ५८-६१, **सालरजंगप्रकरण** ६४, अण्णासाहेबांची परीक्षा ६६-६७, मद्रासला प्रयाण, तेथील वास्तव्य व उलाढाली ७०-७३, आयुष्याचें परिवर्तन ७३-७८, मद्रासच्या कांहीं गोष्टी ७८-८१, आजार ८१-८३, **रामचंद्र अय्या** ८५-८६, पुनरागमन ८६, **स्थित्यंतर** (प्रकरण) ८६-११०; (त्यां-

च्या विषयींचीं निरनिराळीं मतें, व त्यांच्या सत्यासत्यतेविषयीं चर्चा ); **श्रीमहाराजांचें निर्याण** ( प्रकरण ) १११-१६; **अप्पासाहेब सांगलीकर यांचा मृत्यु** ( प्रकरण ) ११७-१८, **पुढील आयुष्य** ( प्रकरण ) ११९-१५,५ प्रज्ञावर्धनस्तोत्राची गोष्ट ११९-२२, **गणपतिउत्सव** १२२-२३, पेशव्यांविषयीं एक दंतकथा १२३ २५, पुण्याचा प्लेग १२६-२७, कुटुंबास व स्वतःस प्लेग १२७, **नारायणबुवांचें** निर्याण १२८-२९, धुळ्याचा उत्सव १३०-३१, **श्रीपादस्वामींचें निर्याण** १३२-४३, '**मी कोण** याचा शोध १३३, कुटुंबाचा मृत्यु १३३-३४, **वागळू** १३५,३७ **अमीरांचें** आगमन १४०-४१; सुरतची कॉंग्रेस १४१, **अरविंदबाबू** वगैरे संबंधीं मतें १४१-४२, बाबांचें लग्न व मेजवानी १४३ मुंबईचा व पुण्याचा दंगा व लोकांचें सांत्वन १४३—१४४, रावबहादूर **ग. व्यं. जोशी** १४४—१४८; म्युनिसिपालिटींतील काम १४८—१५०, **मथुबाईचा मृत्यु** १५१. **लेव्हीची गोष्ट** १५१--५४, प्रकृति खालावते १५४-५५; **निर्याण** ( प्रकरण ) १५८-६८; पूर्वसूचना १५७, प्रायोपवेशनाची कल्पना १५७, पटवर्धनी पंचांग १६०-६१, प्रकृतींत जास्त बिघाड १६३, अखेरचे दिवस १६४-१६७, अखेर १६७, **साक्षात् परिचय** ( प्रकरण ) १७१-२६६, वर्ण, शरीरयष्टी १७२, दृष्टी १७३, सूक्ष्म निरीक्षण १७३, चेहरा, मुद्रा १७४, स्वभाववर्णन १७४-७५, त्यांचीं छायाचित्रें १७५-७६, सर्वसंग्राहकत्व १७७, त्यांचें विचित्र कालमान १८१, अवंचकता १८२, थट्टेखोरपणा व लीनता १८३, नापृष्टः कस्यचित् ब्रूयात् १७७-७८, व्याख्यानें १८८, लेखन १८९, कुशल शब्दयोजना १९०-९२, दीर्घसूत्रीपणा? १९२-२००, जलद चालणें २००, परांतर संतोष २०३, अमानित्व २०५, साभिमानिता आणि निरभिमानिता २०७, यथासांग काम करणें २१४, वादविवाद २१५-१८, द्वंद्वांची सांगड २२१, साधनकाल २२१-२४, योगाभ्यास २२५ २६, राष्ट्रीय भावना २२९, **दिनचर्या** २३०-३८, सर्वांकरितां सर्व २३९-२४२, स्वार्थत्याग २४३, दानाचें वेड २४७-५०,

निर्धनतेचें व्यसन २५१, अपरिग्रह २५२, अलिप्तत्व २५३, **कोल्हटकरांनीं** केलेलें त्यांचें वर्णन २५५-६१, **वैद्यकी** ( प्रकरण ) २६७-८४, निदानकौशल्य २६९-७२, त्यांचेकडे येणारे रोगी २७३-७४, ऑपरेशन्स व इंजेक्शन्सवर मत २७४-७६, त्यांच्या पसंतीचा व्यायाम--- **नमस्कार** २७७, काढे सांगण्याची पद्धति २७९-८१, दुग्धाहारावर भर २८२-८३, त्यांचीं दोन **स्तोत्रें** २८५-२८८, त्यांची सल्ला देण्याची तऱ्हा खं. ३. ७१-७२,

## अ.

अमनस्क खं. १. १०२. **अभ्यंकर** बॅरिस्टर २०१. **अमीर** (अफगाणिस्तानचे ) १४०,१४१. **अरविंदबाबू** १४१. **असनारे,** भाऊसाहेब २२९,२५४. अनिर्बंधता खं. ४. १५०. अंताजीपंत पैसाफंड खं. ४. १४३. **अहल्याबाई** होळकर ४९.

## आ.

**आठवले,** गणपतराव ६८. **आठवले,** दत्तोपंत ११३; खं ४. १०७. **आपटे** हरी नारायण १४३,२६९, २७०. **आंबडेकर,** गंगाधरपंत २३६: आनंदवन खं. ४. १२४. आंतडीं बाहेर काढणें खं १. ४९.

## इ.

**इतिहास** (प्रकरण) खं ३. ९०-९२, दुसऱ्या बाजीरावांविषयीं एक चुकीची समजूत ९०. त्यानें राज्य दान दिलें नव्हतें, खंडानें वहिवाट दिली होती ९०-९१, नाण्यांवरील ठशांचा पुरावा ९१, '**एचिसन ट्रीटीज**' या पुस्तकाची साक्ष ९१, त्याच्या दोन निरनिराळ्या प्रतींतील मजकुरांत फरक ९२. इंजेक्शन्स-वर मत २७४-७५. इंद्रस्वरूप खं.४. १२. इंदुप्रकाश ३२. 'इमामकी जूती,' १५८, २२७. इच्छाशक्तीची वाढ खं. ४. १४९.

## ए.

**एकनाथ** २६०, २६१. '**एचिसन ट्रीटीज**' खंड ३. ९१. **एल्फिन्स्टन** २.

## क.

कुमारीलभट्ट खं. ४. १५२. **कबीर** २६०. **कर्नल ऑल्कॉट** ३३. **कर्वे तात्यासाहेब** ४५, ४६, ४९ ८४; खं. ४. १०५. **काथवटे**, आबाजी विष्णु २१. **कॉलिंकूर** २०८. **कॉंग्रेस**, नागपूरची खंड ३. ६६, सुरतची १४१. **किमया** ७९. **कीर्तनें** (डॉक्टरीण) २८४. **कुंटे** अण्णासाहेब २७, ३५. **श्रीकृष्ण** २०५, खं. ३ ६९. **केशवदैवज्ञ** १२३–२४. **केशवभट केळकर** १२०--१२१. **केसरीचें** डिक्लेरेशन ५८, **केसरी** १२३. **केळकर** न. चिं. १९१, खं. ४. १४२. **कोल्हटकर** अ. ब. २५५, खं. ३. ६५. **क्लार्क सर जॉर्ज** खं. ३. ६७--३८. किरण खं. १. ५८, खं. ४. १२४.

## ख

खर्ड्याची लढाई खं. ३. ६४. **खापर्डे श्री. दादासाहेब** ४५, १४३, २०१, २६९. खं. ३. ६२. खं. ४. १३४.

## ग.

**गणपतिउत्सव** १२२--१२३. **गणेशदैवज्ञ** १२३- १२४, **गणेशभट** ६९; **गयाताई ती. गं.** १७८. खं. ४. १.१२, **गायकवाड** जमनाबाईसाहेब २५२-५३. **गायकवाड सयाजीराव** २४३. **गायत्री** १०३, २४४--४५; ' नः ' पदाचें रहस्य, इंग्रजी टीप २६१ -६६; खंड ३. १६, गायनशास्त्र १८४. **गीता** २१०--१२. खं. ३. १४. **श्रीगुरुचरित्र** १०४, १३९, १८४, २२७, २३३, २३४, २३७, २४६. खंड ३. ८४, ८७. **गुलाबराव** ( माधानचे साधु ) २५३ ' खंड ४. १२७, १२८. **गोखले** नामदार गो. कृ. २५७. **गोडबोले, माधवराव** १६३. खंड १०७, १२०. गोविंदाग्रज २३०. खं. ४. १४१. ग्वालेरीचा किल्ला ६१. गीतारहस्य खंड ४. १२४, १२५, १२६.

## च.

**चातुर्वर्ण्य**—( प्रकरण ) खंड ३. १--२४, वर्णाश्रमधर्मसंस्था, आर्यसंस्कृति व तिचीं रूपांतरें ५--६, वाणीचे दोन प्रकार ७, ध्वनि,—

एक उत्पादक शक्ति ८, वेदवाणीस शरीरवैशिष्ठ्याची गरज ९, आश्रम-व्यवस्था १०, ब्राह्मण-लोकपालक-११, इतर वर्ण ११-१२; ब्राह्मणांवरील आरोप १३, स्त्रियांचा प्रश्न १३, ' चातुर्वर्ण्य ' नांव पडण्याचें कारण १४, चातुर्वर्ण्य आज उपयुक्त नाहीं काय ? १५, चातुर्वर्ण्य राखावें कीं राखू नये ? १५-१६ त्याच्या पुनर्घटनेची दिशा १७, अण्णासाहेब यांचे या विषयावरील लेखांतील उतारे १८ २४. चित्रमयजगत् खं. ३. ९०. **चित्राव नाना** ६. **चिरोलकेस**, १६५. चित्तशुद्धि १०५, १०६, १०७.

## छ.

**छत्रे केरूनाना** ६२-६३. **छत्रे**, डॉक्टर २८४.

## ज.

**जडभरत** खं. ३. २८. जंजिऱ्याचे सिद्धी १२३. जांवुळबेट खं. ४. १२८. **जाखडे** अमृतराव १. **जानकीबाई, अण्णासाहेब यांच्या मातोश्री** ३. पुत्रप्राप्त्यर्थ तपश्चर्या ५, पुत्रजन्म, थोर स्वभाव ६, पुन्हा तपश्चर्या ७, **अण्णासाहेब यांचा जन्म** ८. जानकीबाईचा मृत्यु १२, त्यांचा अधिकार १३. **जिजाबाई** ४९. **जिन्सीवाले** प्रोफेसर २१६. **जेम्स**, प्रो. मानसशास्त्रज्ञ ७४. **जोशी** रावबहादूर **ग. व्यं.** १४४-४८; खं. ३. ६२, ९१, ९२. **जोशी** गंगाधर कृष्ण, भिषग्रत्न, १८६, २७९, २८४.
ज्योतिषशास्त्र १९४-९९. जोतीबा फुले खंड ४. १४१.

## ट.

**टिळक लोकमान्य बाळ गंगाधर** २६, १२३, १३९, १४०, १४३, १६४-६५, १६८, १८७, १९०, १९१, १९१, २३१, २५७; ख. ३. ६२, ६५, ७१, ७२; खं. ४. १२३, १२४, १२४, १२६, १४३, १५२. **टेकाडे** खं. ४. १४१.

## ड.

डफळापूर खं. १. २०३; खं. ४. १३४. डेव्हिस-साहेब खं. ४ ९७. डेक्कन स्टार खं. १. ५८; खं. ४. १२४.

त.

तुरीयावस्था खं. १ ९६. **तात्या टोपे** ६१.
**तुकाराम महाराज,** १७७, १८७, २१०, २१८, २२४, २२९, २३२, २६०; खं. ३. १६. तंजीम व तघलीव खं. ३. ७३.

थ.

थिऑसफी ३३.

द.

**दयाळनाथ** खं. ३. ८०. **दातार वामन** ९०, १५४. **दादोजी कोंडदेव** खं. ४. ९८. दान २४७-५०. **दांडेकर, माधवराव** १२०-२२, १३४, १६१, २३४. **दांडेकर सीतारामपंत** १६३, १६७, २३३, २४६; खं. ४. ११९. दांडेकर सदाशिवरावबापु, खं. ४.११९. दुग्धाहार २८३. दुर्योधन ६९. दूरदर्शन ७९. **देव मामलेदार** २४८; खं. ४. ९९-१००. **देवल** १८४. **देशमुख डॉ.** २७०.

ध.

**धर्ममार्तंड**--भाऊशास्त्री लेले २१६. धुळ्याचा उत्सव १३०-३१. धुंडिराज--[ भावबंधनांतील एक पात्र ] २३०. धोंडदेव अण्णासाहेबांचे आजोबा १.

न.

**नमस्काराचा व्यायाम** २७७. नास्तिक व आस्तिक खं. ४. १४५. **श्रीनरसिंहसरस्वती (महाराज)** ४५, ४६, ५०, ७०, ८६, ८८,८९,१००-०१, १०६, १०९,११०; निर्याण प्रकरण १११, ११६, १२०, १२२, १२८, १३२, १३३, १३९, १६२, १७४, १७५, १८२, २०५, २१३, २२७, २२८, २३०, २३१, २३२, २३६, २४०, २४२, २४८; खं. ३. ८४; खं. ४. ९७, ९९. १०९, १११. खं. ४. **परिशिष्ट-त्रोटक माहिती अण्णासाहेबांची प्रथम भेट** १०२, त्यांचा बहुरंगीपणा. १०२-०३, त्यांचें भजनप्रेम १०३, **ते व अण्णासाहेब** यांच्या भेटीतील मौजा १०४, चमत्कार १०४-०५, **अण्णासाहेबांचा** त्यांचे विषयींचा जिवंतभाव १०५, **आळंदीचें संस्थान व त्याची हल्लींची**

**व्यवस्था.** १०७-०८ **नरहरस्वामी** खं ४ ९६, ९७, १००, **नातु** सरदार बाळासाहेब २५२-५३, खं. ४ १२१-२२. **नाना मोरू** ६३, **नानासाहेब** ( नारायणराव ) अण्णासाहेबांचे बंधु, १२, ८३, १३३, १३७, १३८. **नामजोशी** माधवराव ५८. खं. ४. १२३. **नामदेव** २६०. **नारायणबुवा-धुळ्याचे पद्मनाभस्वामी ऊर्फ बुवासाहेब.** १०१, ११८, निर्याण १२८-१२९, २२८,२३६; खं. ४. परिशिष्ट, त्रोटक माहिती. लहानपण १०९, धुळ्याचे तीन वेडे १०९, योगाभ्यास शिक्षण १०९, स्थित-प्रज्ञतेची परीक्षा ११०, दृष्टिहीनत्व १११-१२, सिद्धिलाभ १११; थोरवी १११, सांप्रदायाचें पुढारीपण १११-१२, नारायणीयाख्यान खं. ४. १२६. **निवेदिता** १४२, २४१. **नेपोलियन** २०८. खं. ३. ९१. नौरोजी पदमजी खं. ३. ६९. नौरोजी फोटोग्राफर खं. ४. १०५, १०६. नार्डी खं. १. ९९. नंतर [प्रकरण] खं. ४. १३५-३७,

**प.**

पटवर्धनी पंचांग १६०-६१. पतंजली २२५. **परांजपे,** डॉ. **न. शि.** २०१, २८०. **परांजपे, शिवराम म.** १४३. पंजाब खं. ४. १२०. पंचपक्षी विद्या ७९. पलपैतृक खं. ३. २६. **पंडित** विष्णु-शास्त्री ३०, ३१, ३३, **पंडित** शं. पां. ६३; खं. ३. ७२; पातंजल शास्त्र १४. पातिव्रत्यधर्म ४९. **पाळेकर बाबासाहेब** २७२. पिकेटिंग खं. ३. ७२. पुनर्विवाहाची चळवळ ३०. **पेरुअय्या** ५९-६१. **पेशव्यां**विषयीं एक दंतकथा १२३-२५. पैठणकर बापू १५७, ५८. **प्रज्ञावर्धन**स्तोत्राची गोष्ट ११९-२२. प्रार्थनासमाज ३३. प्लेग [पुण्याचा] १२६-२८.

**फ**

फडके **वासुदेव बळवंत** २५. फॉंटेन् ब्लू २०८.

**ब.**

बंड ५७ सालचें खं. ४. ९६. **बागल--अण्णांचा नातु** १३४, ३५, ३७, १५४. **बाजीरावसाहेब,** दुसरे खं. ३. ९१. **बापट, सौ.**

**भागीरथीबाई** २०७, २३३, २३९. खं. ४. १५४. **बापट, माधवराव** १६७, खं. ४-१०६. **बापट सेनानी** खं. ४ १४१ **बापट**, सदाशिवराव १९०-९१. **बाबासाहेब-अण्णांचे चिरंजीव** १३७,१३८,१४३,२०८,२७६. **बारीक मास्तर** ( काशीनाथपंत वागदरीकर) २३५. विरबल १५८. **बोधानंद भारती** १५९,१६८, ब्रिग्ज खं. ३. ९२. ब्लॅव्हॅट्स्की ३३. बाबा पदमजी खं. ४. १४१.

भ.

भवभूति २०२. भाऊ गोपाळ डॉ. ३६. **भाऊसाहेब पटवर्धन-अण्णासाहेबांचे वडील. 'रामचंद्र'** पहा. भागवत खं. ४. १०९. भागवत धर्म खं.३ ८५. भागवत [नाथांचें] २३०, २३५, खं. ४. १०३. भावबंधन नाटक २३०. **भाषाशास्त्र व मानव-वंश.** प्रकरण खं. ३. ३४-४२. प्रचलित व्युत्पत्तिनियम सदोष ३५, ३६, 'लॅटिन' शब्द ३६, वैदिक व अवैदिक भाषा व मानववंश ओळखण्याची खूण ३७, ३८, ३९, कांहीं शब्दांच्या उत्पत्ति ४०, रोमन राज्यसंस्था मूळच्या वैदिकच ४१, लोकसत्ताक राज्याची कल्पना मूळ वैदिकच. ४२. **भिकाजी रुस्तुम** ६७. **भिडे, महादेव गोविंद** १२४. **भीष्म** २०५, २२९, २६१.

म.

**मथुबाई [ अण्णांची कन्या ]** १३५,१५१,१५३,१५४. **मनुताई** सौ.--**श्री. दादासाहेब खापर्डे यांची सून** २६९. मनुष्यत्व खं.४. १३८. **महात्मा गांधी** १४१-४२. खं.३. ६५. खं.४. १४३, १५०, १५२. **महाराज--'श्री नरसिंह सरस्वती'** पहा. **महाराष्ट्र-धर्म** खं.३. ८४,८५. **मंडलिक** रावसाहेब वि. ना. ४२, ४३, ६०, मंत्रशास्त्र ७८. महाराष्ट्राची सांप्रत स्थिति खं.४. १३९. माटेकराचें दुकान २७२. **माधवराव--सर टी** ३९, मालकम खं.३. ९०. **मांसाशन** ( प्रकरण ) खं.३. २५-३३. यांतील निरनिराळे तीन प्रश्न २५, **अण्णा० यांचें मत विरुद्ध** २५, पूर्वी सर्रास मांसाशन नसे २६, यज्ञयागांतील हिंसा २६, त्यांतील

मांसाशन, मांसाशन नव्हे २७-३०; यज्ञाची मूळ कल्पना २७, **मांसाशन सृष्टिशास्त्र व वैद्यकशास्त्रदृष्ट्या अयोग्य** ३०, **मांसाशन आवश्यक नाहीं** ३१–३३. तंतुबल आणि स्नायुबल ३३. मिथ्याचार २१०-११, २१२, मुक्ता--अण्णा०ची दाई १४, १५. मुरारजी गोकुळदास २८. **मेहेंदळे, बापूसाहेब** १९. **मोडक माधवराव** १३७. **मोहेंजोडारो** येथील भूगर्भसंशोधन खं. ३. ३६.

य.

**याज्ञवल्क्य** २६१. योगाभ्यास २२५.

र.

**रमाबाई सौ. अण्णा०च्या पत्नी.** १२, १३३–१३४, १३७. **राघोभरारी** खं.४. ९५. **राजवाडे दिनकरराव, सर.** ५२-५४ **राजवाडे वि. का.** २१५-१९, राधामाधव चंपू २१५, **रानडे, कृष्णाजीपंत** ६९. **रानडे, महादेव गोविंद.** २५,२६,३०,३३, ३८,४४,२५७, खं. ३. ७२, खं. ४. ९८-१४३. **रामकृष्ण परमहंस** २२२, २२३, २६०, २६१, खं. . . ११०. **रामचंद्र अय्या** ८२, ८३, ८५, ८६, खं. ४. ११३, ११४, ११५. **रामचंद्रपंत ऊर्फ भाऊसाहेब. अण्णासाहेबांचे तीर्थरूप.** १ स्वभाव ३, वकिली ४, मानीपणा ४, राहणी ४, २०७, २०८, खं. ३. ९२. **रामतीर्थ, स्वामी,** २६०, २६१; खं. ४. १४३. **रामदास स्वामी** २२२, २३१-३२; खं. ३. ६२,६८, ८४. खं. ४ १२४, **रामशास्त्री** २५५, २६०. **रायरीकर, तात्यासाहेब** १७, २४, ७९. खं. ४. **त्रोटक माहिती,** स्वभाव ९५, तपश्चर्या व अस्त्रप्राप्ति ९६, देहांताची शिक्षा ९६, सुटका ९७, **श्रीनरसिंहसरस्वतींचें दर्शन** ९७, **तात्यासाहेब व अण्णासाहेब** ९७, ९८, संन्यास ९९, **मृत्युसमयींचा बाणेदारपणा** ९९. **देव मामलेदार** ९९-१००, तात्यासाहेबांची देहयष्टी व गुण १००-१०१. **राष्ट्रीय चळवळ** [प्रकरण] खं. ३, ५९-७३,

अध्यात्मिक उन्नति व राज्यव्यवस्था यांचा निकट संबंध ५९, राष्ट्रीय चळवळीचीं दोन अंगें। ६० **'ईश्वराचें अधिष्ठान'** म्हणजे काय ? ६१, हल्लींचे देशभक्त ६२, ६३, हल्लींची समाजास्थिति ६४, **महात्मा गांधींची** चळवळ ६५, ६६, **पुढाऱ्यांनीं स्वतःला शिस्तींत घालण्याची आवश्यकता** ६८, **धार्मिक जीवनाची जरूरी** ६८, ७०, **अडलें आहे कोठें ? निःसत्त्वतेमुळें** ७१, देशाची भवितव्यता ७२-७३. **राष्ट्रीय शिक्षण,** [ प्रकरण ] खं. ३. ७४-८९. पूर्वपरंपरांतील शिक्षणपद्धतीचें रहस्य ७४, हल्लींची शिक्षणविषयक परिस्थिति ७५, हल्लीचें राष्ट्रीय शिक्षण ७७, तें कसें दिलें जावें ? ७८-७९, राष्ट्रीयत्व म्हणजे काय ? ७९ शिक्षणाचा खरा हेतु ८०-८१, **प्रथमतः घरेंच सुधारलीं पाहिजेत** ८२, **जुने संस्कार व परंपरा जिवंत ठेवण्याची आवश्यकता** ८३. **महाराष्ट्रधर्म** व आहिंसा ८४-८५, निरहंकारिता आणि लीनता; अहंकार व गर्व यांत भेद ८६, **कौटुंबिक जीवनाशीं शिक्षण नित्यसंबद्ध केलें पाहिजे.** ८८-८९. रेणुका खंड ३. ८८.

## ल.

**लवाटे, शंकरराव** २५७. **लागवणकर महादेवशास्त्री** २८. लिटन, खं. ३. ९१. लीवॉर्नर ६३, ११७. लेव्हींची गोष्ट १५१-५४; लेव्हीच्या जोड्याची गोष्ट खं. ३. ६७.

## व.

वर्णाश्रम धर्म ९४, ९५. वऱ्हाड संबंधीचें राजकारण—**'सालरजंग प्रकरण'** पहा. विजापूरकर खं. ४. १४३. वारींद्र खं. ४. १४३, विष्णुबोवा, वेदोक्तमानवधर्म खं. ४. १४३, वाद-विवाद--कसा करावा ? २१४--१८. वासना--पुरविण्यासाठीं ईश्वराची प्रार्थना करावी कीं करूं नये ? २२७--२८, विराण्याचे अभंग २१८. **विवेकानंद,** १४१-४२, २०३, २६०. खं. ४. १४३, १४७. **विष्णुशास्त्री** ( चिपळूणकर ) खं. ३. ७६. **विश्वामित्र** खं. ३. १६. वेदांत, खं. ३. ८५. **वैद्यकी** ( प्रकरण ) २६७-८४. वैद्यसुधा ३६. **व्यंकट परमाळ,** करवट नगरचा राजा ६८. विश्वरूप-

दर्शन खं. ४. १२६. वकीली. (प्रकरण) खं. ४. १२०. ते १३४. विष्णुपंत काळे खं. ४. १२०. विंचवाचा मंत्र ७८.

श.

शहाजी २१९. **शंकराचार्य** खं. ३. १४. शाकुंतल १९७. **शिक्षण म्हणजे काय?** खं. ३. ४९. शिमग्यांतील बीभत्स शब्द २१९-२०. **शिवाजी** २१९, २४२. खं. ३. १३, ७६, खं. ४. ९८. खं. ४ १२४. शोगनगिरी खं. ४. १५३. शोगनशाई खं. १ ३७. शास्त्रीबुवा खं. १५२. श्रीधरपंत दाते खं. ४. १४२.

ष.

षट्चक्रभेदरूपी हठयोग १०१, १३०. खं. ४. ११०.

स.

सयाजीराव गायकवाड खं. १. २४३. समर्थ-'**रामदास**' पहा. **सवाई माधवराव** खं. २. ६४. **सहस्रबुद्धे गणपतराव** ५८, ५९. **सहस्रार्जुन** खं. ३. ८८. **संतोजीबुवा** (कुकरमुंड्याचे) खं. ३. ७१. **साठे** (डॉ.) हरीभाऊ खं. ३. ७२. **सार्वजनिक काका** २५. **सालरजंग, सर** ३७, **सालरजंग प्रकरण** ६४–६८, ७०. **सांगलीकर**, अप्पासाहेब यांचा मृत्यु प्रकरण, ११७–१८. **सांगलीकर**, बाबासाहेब, खं. ४. १०५, १०६. **सुरेंद्रनाथ बानर्जी**, सर १५६. **सुंदरलाल** डॉ. १३४, १६३, ६४, ६५, ६६, २८४. **सोनगीरकर शंकरबुवा** खं. ४. १०७. **स्कॉट**. सर वॉल्टर, खं. ३. ५८. **स्त्रिया व वैदिक संस्कृति**, खं. ३, प्रकरण ४३-५८, वैदिक संस्कृतीचें धोरण ४४-४५, स्त्रियांच्या अवनतीविषयीं ओरड ४५, **वैदिकधर्माचा आद्यसिद्धांत-एकमेवाद्वितीयम्** ४६, समतेविषयीं विचित्र कल्पना ४६, शास्त्रकारांवरील मुख्य चार आरोप ४७-४८, त्यांची सत्यासत्यता ४८, स्त्रीपुरुषांतील भेद, ४८-४९, शास्त्रकारांची दूरदृष्टी ४९, **शिक्षण म्हणजे काय?** ४९, पातिव्रत्यधर्म म्हणजे काय? ४९, हिंदुसमाजव्यवस्थेनें स्त्रियांचें नुकसान झालें काय? ५०, स्वातंत्र्य म्हणजे मोकाटपणा नव्हे ५१,

'**स्वतंत्रः कर्ता**' ५१-५२, प्रेम व कर्तव्य ५३, **सर्व साधनांचा हेतु--साक्षित्व उत्पन्न होणें** ५४, **परंपरा कोणी उत्पन्न करावयाच्या?** ५५, 'शिष्टां'चें लक्षण ५६, **वैदिक संस्कृतीनें स्त्रियांना अज्ञानांत व दास्यांत ठेवलें, हें खोटें** ५६, भोग का त्याग? ५७, स्त्रीशिक्षण--३२. **स्थित्यंतर**-(प्रकरण) ८६-११०. **स्मिथ,** डॉ. ३६, ६६, २६८. **श्रीपादस्वामींचें निर्याण.** १३२-१३३. खं. ४ ९६. **स्वात्मसौख्य-श्रीमहाराजांचा ग्रंथ,** १३९, २३०, २३५-३६.

### ह.

**हराप्पा** येथील भूगर्भसंशोधन खं. ३. ३६. ह्यॅच साहेब खं. ३. ६१. होमरूल लीग-खं. ३. ६२. **होळकर, तुकोजीराव** ५१. ह्यूम राष्ट्रसभा खं. ४. १४३.

### ज्ञ.

ज्ञानमोदक २३०, २३५. **ज्ञानेश्वर;** २२९. ज्ञानेश्वरी खं. ३. ८४. खं. ४. १०३.

**टीपः**–खंड ४ पान १०२ व १०३ यावर श्रीमहाराजांच्या फोटोग्राफरचें नांव 'नौरोजी' म्हणून आलें आहे तें 'बरजोरजी' आहे असें मागाहून समजतें.

# शुद्धिपत्र.

( पानांचे मथळे सोडून ओळी मोजल्या आहेत. )

| पान | ओळ | शब्द | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७ | २० | उडवाउडवी...कोठून | उडवाउडवी त्यांना कोठून |
| २५ | ३ | व स्वतःच्या | तर स्वतःच्या |
| ३७ | १५ | शोगनगिरी | शोगनशाही |
| ५० | ७ | वैशाख व॥४ | वैशाख शु॥४ |
| ५८ | ४ | कारवाई गृहस्थाचा | कारवाईबाज गृहस्थाचा |
| ५८ | २२ | निरुळकर | निउळकर |
| ६५ | २ | ,, | ,, |
| ६८ | २६ | ९७च्या प्लेगांत | १९०६ च्या प्लेगांत |
| ७० | २१ | निरूपूर | निरुतणी |
| ८२ | ३ | पुष्कळच चांगलें | पुष्कळच-चांगलें |
| ८५ | १ | कार्पासं कटिनियुक्तं | कार्पासं कटिनिर्मुक्तं |
| ९४ | २४ | इतरण वादांप्रमाणें | इतर वादांप्रमाणें |
| ९६ | २७ | जरा आणापक्षां | 'जरा' नको |
| ९९ | ८ | ब्रम्हशरीरांची | ब्रह्मशरीरांची |
| १०० | १४ | निजनिधारानें | निज निर्धारानें |
| १०२ | २६ | विश्वास पात्र | विश्वासपात्र |
| १११ | १ | लीलांश्वकरा | लीलाश्वकरा |
| १११ | ४ | ० सद्गरुवरो | ० सद्गुरुवरो |
| १२९ | २१ | साम्यमार्गानें | सौम्यमार्गानें |
| १५० | ११ | जबाब ग दिलांत | जबाब न दिलांत. |
| १५० | १५ | लथतांच | असतांच |
| १५६ | २ | स्वस्वं | स्वत्वं |
| १८१ | १६ | आपलें आन्हिक | माझें आन्हिक |
| १८२ | २८ | शिग्योत्तमाला | शिष्योत्तमालाच |
| १८४ | ५ | यानर त्यानें | या नात्यानें |
| १८५ | १६ | आग्लवैद्यक | आंग्लवैद्यक |
| १८६ | २१ | गंगाधर वासुदेव | गंगाधर कृष्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| २०४ | २४ | स्वतःस दुसऱ्यास | स्वतःस व दुसऱ्यास |
| २०९ | २० | गति नव्हे ॥' | गति नव्हे॥' (श्रीगु. च.) |
| २१० | २२ | भेटुनी | भेटवी |
| २१५ | २० | ब्रह्मणरस्पती | ब्रह्मणस्पति |
| २१९ | २१ | असा कोठें | असा दुसऱ्या कोठें |
| २२२ | १९ | विचार | विचार । |
| २२७ | ८ | पाणी घाल कीं | पाणी घाल म्हटलें कीं |
| २३९ | १२ | खरोखरच म्हटल्याप्रमाणें | म्हटल्याप्रमाणें खरोखरच |
| २४० | १४ | गणपतीनेंच धुतलें | गणपतीनेंच धोतर धुतलें |
| २६८ | २४ | ( Emperical ) | ( Empirical ) |
| २७० | २६ | Adnormal develapment | Abnormal development |
| २७८ | २८ | ( Dilation of Stomach ) | Dilation of Uterus ) |
| २८५ | ११ | रसाब्धि | रसाद्रि |
| २८७ | २२ | त्यप्यास्ते | त्यप्ययांस्ते |
| | | **खंड ३ रा.** | |
| ६ | ३० | At man | Atman. |
| ३० | ११ | संस्थाच | संस्थाच नुसती |
| ३५ | १२ | [ घोटा ] | [ घोंटा पायाचा ] |
| ,, | १५ | मध्यें J | मध्यें G |
| ३९ | ११ | आाण यथें ही | —आणि येथेंही |
| ४५ | ३ | whatever." | whatever."श्रीअण्णासाहेब |
| ५० | ३० | दुसऱ्या अध्यायांतील | दुसऱ्याच एका अध्यायांतिल |
| ५१ | ३ | कोठेंही | त्रीस कोठेंही |
| ५४ | ९ | ती गोष्ट | ती गोष्ट इष्ट |
| ,, | २२ | त्यांच्या योगानें | त्यांच्या योगानें कसरत |
| ६४ | १० | या महत्त्वांची | या महातत्त्वांची |
| ६५ | ४ | ' कोडगे ' | ' नोडगे ' |
| ८० | २२ | पयाळनाथ | दयाळनाथ |
| ११३ | २० | [ वर था ] | [ वर्धा ] |

श्री.

हनुमंतभक्तांनो त्वरा करा! बलभीमभक्तांनो त्वरा करा!!

# श्रीहनुमंतलीलामृत.

## प्रथम कुसुम.

हा हनुमंतभक्तांचा अत्यंत आवडता ग्रंथ आहे. यांतील कथाभाग वाल्मीकिरामायणाच्या बाहेरचा असून अत्यंत मनोवेधक असा आहे. श्रीमारुतीरायासंबंधाचा काव्यग्रंथ याखेरीज दुसरा महाराष्ट्र भाषेंत उपलब्ध नाहीं. श्रीहनुमंतभक्त व परंपरेनें समर्थ सांप्रदायिक मंडळींनी ह्या ग्रंथाची एक एक प्रत अवश्य संग्रहीं ठेवावी. या ग्रंथाचा आकार क्राउन षोडषपत्री पोथी आकाराचा असून पृष्ठें २०० आहेत. किंमतही फारच स्वल्प म्हणजे १ रुपया आहे. टपालखर्च वेगळा पडेल. प्रती फारच थोड्या शिल्लक आहेत, तरी श्रीबलभीमभक्तांनीं व समर्थसांप्रदायिक मंडळीनीं त्वरा करून मागणी करावी.

गोरेगांवकर्स बिल्डिंग चाळ २,
मजला ३ रा, खोली नंबर ५६
गिरगांव मुंबई नंबर ४.

कृष्णाजी वामन तळवलकर.